


भारतीय ग्रंथमुद्रण

बापूराव नाईक

कै. गो. गं. लिमये ट्रस्टची
इतर प्रकाशने

छुक छुक छैया
डॉ. वसंत पटवर्धन

कोथिंबिरीची फुले
सौ. विमल जोशी

अनुक्रमणिका

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

तथापि प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारे काही ग्रंथही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात. त्यानुसार ख्यातकीर्त मुद्रणतज्ज्ञ स्मृतिशेष श्री. बापूराव नाईक ह्यांचे काही महत्त्वाचे आणि संशोधनपर स्वरूपाचे ग्रंथ त्यांचे चिरंजीव श्री. अरुण नाईक ह्यांच्या अनुमतीने अभ्यासकांसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सदर ग्रंथाचे प्रतिमुद्राधिकार स्मृतिशेष बापूराव नाईक ह्यांच्या कुटुंबीयांकडे असून केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी ही सामग्री त्यांच्या अनुमतीने आणि सहकार्याने महाजालावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ह्या ग्रंथांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना आपण खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१) सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती ह्या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२) सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रकम आकारता येणार नाही.
३) पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४) आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी ह्या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अनुक्रमणिका

बापूराव नाईक यांचे
मुद्रणविषयक इतर ग्रंथ

कागद : सुधारित आवृत्ती

टायपोग्राफी ऑफ देवनागरी
इंग्रजी व मराठी : खंड पहिला

टायपोग्राफी ऑफ देवनागरी
इंग्रजी व मराठी : खंड दुसरा

टायपोग्राफी ऑफ देवनागरी
इंग्रजी व मराठी : खंड तिसरा



गणपत कृष्णाजी यांनी १८६९ साली छापलेल्या 'अभिज्ञान शाकुंतल' या पुस्तकातील चारंगी चित्र

अनुक्रमणिका

भारतीय ग्रंथमुद्रण

बापूराव नाईक

कॅ. गो. ग. लिमये ट्रस्ट प्रकाशन

अनुक्रमणिका

प्रकाशिका
डॉ. सौ. शकुंतला लाटकर
कॅ. गो. गं. लिमये ट्रस्टसाठी
४६१/४ सदाशिव
पुणे ४११०३०

प्रथम आवृत्ती : १० मे १९८०

मुखपृष्ठ : ईश्वर दिघे
आईज ॲड्व्हर्टायझिंग, पुणे

किंमत पन्नास रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती', टिळक रस्ता
पुणे ४११०३०

अनुक्रमणिका

प्रकाशकाचे निवेदन

' भारतीय ग्रंथमुद्रण ' या ग्रंथाचे दीर्घ काळानंतर आज प्रकाशन होत आहे. मूळ ज्या व्याख्यानांच्या आधारे हा ग्रंथ सिद्ध झाला ते १९७१ साल होते. त्या वेळी जर या ग्रंथाचे प्रकाशन झाले असते तर आज ज्या स्वरूपात हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे त्या स्वरूपात झाला नसता. व्याख्याने एकदा छापूनही झाली. त्यानंतर असे ठरले की दुर्मिळ ग्रंथांचे दाखले प्रत्यक्ष उपलब्ध करून देण्यात यावेत. त्यानुसार ग्रंथाची फेररचना करण्यात आली, प्रथम छापलेले पुस्तक रद्द करण्यात आले. काही ठसे उपलब्ध झाले, काहींच्या बाबतीत अडचणी उपस्थित झाल्या. उपलब्ध ठशांच्या साहाय्याने एकदा ग्रंथ छापण्यात आला. जे ठसे उपलब्ध होऊ शकले नाहीत, त्या ठिकाणच्या जागा मोकळ्या ठेवण्यात आल्या. त्याची छपाई नंतर करण्यात आली.

' मुद्रण ' या विषयावर मराठीत इतका व्यासंगपूर्ण असा हा पहिलाच ग्रंथ आहे. मुद्रणाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच मुद्रण व्यावसायिकांना हा ग्रंथ अतिशय उपयुक्त ठरेल अशी आम्हांला खात्री आहे.

हा ग्रंथ कॅप्टन गो. गं. लिमये ट्रस्टच्या वतीने प्रसिद्ध होत आहे. या ग्रंथाचे विक्रीचे जे उत्पन्न येईल ते सर्व या ट्रस्टमध्ये जमा होणार आहे.

१० मे, १९८० **प्रकाशिका**

लेखकाचे चार शब्द

११ जुलै १९७१ रोजी ग्रंथमुद्रण परिसंस्थेच्या विद्यमाने 'भारतीय ग्रंथमुद्रण' या विषयावर मी तीन व्याख्याने दिली. ती व्याख्याने मी लिहून काढली होती. ही व्याख्याने छापून प्रसिद्ध करावीत असा आग्रह आमचे स्नेही श्री. चिं. स. लाटकर यांनी धरला. ग्रंथरूपाने ही व्याख्याने प्रसिद्ध करण्याचे ठरल्यावर प्रतिपादनास आधारभूत अशी माहिती जोडून तसेच छापील पुस्तकांचे अनेक नमुने घालून हा ग्रंथ तयार केला. काही दुर्मिळ पुस्तकांच्या मुखपृष्ठांची व आतील पानांची छायाचित्रे घालण्याचा आग्रह धरला. त्यामुळे पुस्तकाचे मुद्रण पूर्ण होण्यास विलंब लागला.

मी जेव्हा ही व्याख्याने दिली तेव्हा मुद्रण व्यवसायाची जी परिस्थिती होती ती आता पूर्णतया बदलली आहे. ग्रंथमुद्रणाचा खर्च वाढला आहे. कागदाच्या, शाईच्या आणि टाइपांच्या धातूच्या किंमती बेसुमार वाढल्या आहेत. बँकांचे व्याज वाढले आहे. त्यामुळे ग्रंथमुद्रण व्यवसायाचा पायाच अस्थिर झाला आहे. भारतातच ग्रंथ प्रसिद्ध करणे अती खर्चाचे झाले आहे असे नव्हे तर जगातील सर्वच देशांत ते खर्चिक बनले आहे. विकसनशील देशांत शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन शासनाने हाती घेतल्यामुळे खाजगी प्रकाशकांच्या धंद्यावर त्याचे दूरगामी परिणाम झाले. सांस्कृतिक, शास्त्रीय, वाङ्मयीन पुस्तकांच्या प्रकाशनांची संख्या घटली, वेग कमी झाला असे स्पष्ट दिसते. या परिस्थितीचा नव्याने विचार करणे आवश्यक झाले आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या लेखनात कै. विष्णुपंत भागवत यांनी फार लक्ष घातले होते. ते आज हयात नाहीत हे आमचे दुर्दैव. पुस्तक मुद्रित करणारे श्री. चिंतामणी लाटकर यांनी ग्रंथ उत्कृष्ट छापून दिल्याबाबत मी त्यांचा आभारी आहे. पुणे मुद्रक संघाच्या हीरक महोत्सवाच्या दिवशी या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे, हा योगायोग घडून यावा हे विशेष आहे. पुणे मुद्रक संघाने ही संधी प्राप्त करून दिली आणि एका सुखकारक ऋणाने मला कायमचे बद्ध केले. मी त्यांचाही आभारी आहे.

१० मे, १९८० **बापूराव नाईक**

अनुक्रमणिका

प्रस्तावना

ग्रंथ-निर्मिती परिसंस्थेच्या वतीने, त्रैमासिक ज्ञानवर्धक सभेच्या निमित्ताने, पुणे शहरातील मुद्रण-व्यावसायिकांनी उभारलेल्या वास्तूमध्ये ' भारतीय ग्रंथ-मुद्रण ' ह्या वेधक विषयावर श्री. बापूराव नाईकांसारख्या विशेषज्ञाचे व्याख्यान-सत्र हा एक अपूर्व योग होता. ह्या व्याख्यानसत्राला जोडून मराठीतील काही आद्य मुद्रित ग्रंथांचे प्रदर्शन मांडून औचित्यपूर्ण जोड देण्यात आली होती. ह्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्याची आणि त्या निमित्ताने मुद्रण उद्योगाविषयी तसेच त्या व्यवसायाविषयी माझे विचार व्यक्त करण्याची संधी स्नेहभावाने मला देण्यात आली. त्या निमित्ताने ग्रंथ-निर्मिती परिसंस्थेच्या प्रस्तुत प्रवर्तकांच्या मनातील आशय समजून आला; तसाच तिचा उद्देशही कळला. महाराष्ट्राच्या मुद्रण व्यवसायातील काही व्यक्ती स्वत:च्या मुद्रणालया-पुरतीच दृष्टी न ठेवता, ह्या उद्योगाच्या भूतकालीन स्थापनेपासून वर्तमान परिस्थितीपर्यंत शोध घेत आहेत; आणि त्याच्या व्यापक सांस्कृतिक महत्त्वाचे व प्रभावाचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात आहेत, हे पाहून व ऐकून आनंद झाला.

उद्योजक तसेच विशेषज्ञ जेव्हा आपल्या उद्योगक्षेत्राचा साक्षेपाने आणि साकल्याने ऊहापोह करू लागतात, तेव्हा त्याच्या व्यावसायिक विकासाला नवी दिशा, तसेच अधिक गती मिळू लागते; आणि तद्द्वारे समाजाला पोषक व उपकारक कार्य होण्याची शक्यता वाढते. उद्योगाचा वा व्यवसायाचा विचार आस्थेवाईकपणे व अभ्यासपूर्ण रीतीने तसेच परंपरेला सांभाळून व आधुनिकतेला धरून सुरू झाला की त्याच्या सुप्त सामर्थ्याचा आविष्कार होण्याचा मार्ग सुलभ होतो. प्रत्येक उद्योगाला बहुधा काही परंपरा असते. इतिहासाच्या ओघात ह्या परंपरेची विस्मृती होत जाते; व्यवसायाची मूळ प्रकृती कालौघात विकृत बनते. मूळ उद्देशाबद्दल विस्मृती होत गेली की तत्संबंधी एक प्रकारची अनास्थाही वाढते; इतकेच नव्हे तर कित्येकदा व्यावसायिक

अनुक्रमणिका

भ्रांती झालेलीही आढळते. उच्च हेतूचे अनुसंधान सुटले म्हणजे कोणत्याही उद्योगाला व व्यवसायाला, इतकेच नव्हे तर कलेलाही अनिष्ट वळण लागते. फेरबदल घडणे ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी हा फेरबदल इष्टच घडेल अशी खात्री नसते. कलेच्या बाबतीत तर या बदलाबरोबर गुणवत्ता वाढेलच ह्याचा नेम नसतो. समाजाच्या गरजा वाढत चालल्या की व्यवसायाचे व कलाप्रकाराचे स्वरूपही पालटत जाते आणि त्याच्या उचित व हितप्रद कार्याची व सामर्थ्याची आठवणही बुजते. आर्थिक लाभासाठी सेवा-व्यवसाय वा कला-प्रकार राबविता येऊ लागला म्हणजे तर त्याचा विपर्यास नि अध:पात त्वरित होतो. तशीच काहीशी स्थिती मुद्रणकलातंत्राची झाली असल्याची जाणीव काही मुद्रक-बंधूंना झाल्यामुळे मुद्रण उद्योगाच्या सद्य:स्थितीबद्दल विचारविमर्श करण्यासाठी आणि ग्रंथनिर्मितीबद्दल जी काहीशी हेळसांड आज दृग्गोचर होत आहे तिच्यावर उपाययोजना शोधण्यासाठी या परिसंस्थेची संस्थापना झाली, हे महाराष्ट्रातील मुद्रण-व्यवसायाला खरोखरच भूषणावह आहे. ज्ञानसंवर्धनासाठी मुद्रणउद्योगाचा जन्म झाला. ग्रंथ-निर्मितीने मुद्रण उद्योगाचा पाया घातला. सांस्कृतिक विकास हा मुद्रण उद्योगाचा प्रारंभकाळात तर आत्मा बनला. मुद्रण उद्योगाचे हे अवतारकार्य विस्मृतीच्या गर्तेत जात आहे आणि ग्रंथमुद्रणाची आबाळ होऊन ग्रंथ-मुद्रणालयांच्या संख्येत उत्तरोत्तर घट होत आहे; ही जर वस्तुस्थिती असेल तर मुद्रकबंधूंना जागे करून त्यांना कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी शक्य तो प्रयत्नाला लागणे ही जबाबदारी विचारी व अनुभवी मुद्रकांवर येते. ही जबाबदारी न विसरणारे व ती पार पाडण्यासाठी आपला उद्योग नेटकेपणाने करू झटणारे मुद्रक महाराष्ट्रात आहेत हे सुचिन्ह व सद्भाग्य आहे असे म्हणावयास हवे.

मुद्रणाचा शोध हा मानवी इतिहासातील एक युगप्रवर्तक शोध ठरला. विस्तवाच्या शोधाने व तदनंतर बंदुकीच्या दारूच्या व दुर्बिणीच्या शोधांनी जेवढे परिवर्तन व स्थित्यंतर घडले, तेवढे किंबहुना काहीसे अधिकच परिवर्तन मुद्रणाच्या शोधाने घडले असे म्हणता येईल. मानवी समाजाच्या उत्कर्षाला व विकासाला मुद्रणामुळे आतोनात चालना मिळाली. पंचखंडात्मक जग एकत्र आणून विचारधनाचे आदान-प्रदान घडविण्याची किमया मुद्रणाने केली. प्राचीन ज्ञान-भांडार निरंतर जतन करण्याची गुरुकिल्ली मुद्रणात गवसली. औद्योगिक क्रांतीचे उत्थापन व संवर्धन करण्याच्या कामी तर मुद्रणाने भलतीच कामगिरी बजावली. ग्रंथ-निर्मिती ही जरी मानवी प्रतिभेच्या पोटी जन्माला येत असली तरी तिचे सूतिकाकार्य मुद्रणकला करीत आली आहे. मुद्रण हा केवळ उद्योग नव्हे; मुद्रण ही प्राय: कला आहे. मुद्रणाचा जन्मदाता गुटेनबर्ग हा जात्या कलाकार होता, तो हरहुन्नर होता; अष्टपैलू होता. समाजाची गरज ओळखून गुटेनबर्गची संशोधकवृत्ती कार्यप्रवण बनली आणि हस्त-लेखनाला यंत्राची जोड देऊन कृत्रिम लेखनाची नवी कला त्याने अस्तित्वात आणली. मुद्रणाचा उद्योग करणारांनी मुद्रणाचे हे कलात्मक स्वरूप विसरता कामा नये. मुद्रण ही तंत्रप्रधान उद्योगाप्रमाणे आलेख्यक

अनुक्रमणिका

(Graphics) कलाही आहे; आणि यंत्राचे माध्यम वापरून मुद्रणाद्वारे आपण कलाकृती निर्माण करणारे एकापरीने कलाकार आहोत अशी मुद्रकाची जिवंत भावना असावयास पाहिजे. मानवी मनाच्या सौंदर्यासक्तीचा तसेच हस्तकौशल्याचा ज्या माध्यमाद्वारे आविष्कार होतो आणि ज्याच्या श्रवणाने वा दर्शनाने मानवी मनाला निर्भेळ आल्हाद किंवा आनंद होऊन त्याचा सांस्कृतिक विकास होतो ती माझ्या मते कला. ह्या अर्थाने मुद्रण हा साधा उद्योग नसून तो कलात्मक आविष्कार आहे; किंबहुना यंत्रसहाय्याने निर्मिती येणारी ती एक औद्योगिक कला आहे असे म्हणता येईल.

सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे साधन म्हणून अवनीतलावर अवतीर्ण झालेली ही मुद्रणकला ग्रंथनिर्मितीद्वारे ज्ञानप्रसाराचे व ज्ञानसंगोपनाचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असली तरी व्यापारी युगात व जगात, आकर्षक व स्वास्थ्यदायक प्रलोभने तिच्या दृष्टिपथात नि आवाक्यात येताच, वृत्ती चाळून मूळ हेतूकडे बरेचसे दुर्लक्ष करू लागली आहे की काय अशी दाट शंका या व्यवसायातील विचारी व्यक्तींना आज वाटू लागली आहे. मानवी समाजाचे अदृष्ट, अश्रुत नि अपूर्व असे परिवर्तन विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर होत चालले आहे. जणू नवी मानवी संस्कृती उदयाला येत आहे आणि मानवी समाजाचे स्वरूप न ओळखता येण्याइतके पालटत चालले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्या दोन चक्रांवर औद्योगिक प्रगतीचा रथ वेगाने दौड करीत आहे. मानवाला सुख व स्वास्थ्य प्राप्त करून देणाऱ्या अनंत सोयी व विविध साधने उद्योगप्रधान संस्कृतीत प्रतिदिनी निर्माण केल्या जात आहेत. मानवाच्या गरजा वाढवीत नेणे आणि त्या गरजा कलात्मकतेने पुऱ्या करीत जाणे हे प्रस्तुत स्पर्धाशील व्यापारी युगाचे एक प्रमुख लक्षण आहे. तेव्हा मुद्रणकला उद्योगधंद्याच्या वेठीला बांधली जाणे जरी अपरिहार्य व अगत्याचे असले तरी तिच्या ज्ञानसंवर्धक नि कलात्मक अंगाची उपेक्षा होऊ देणे तिच्या भवितव्याच्या दृष्टीनेही अनिष्ट ठरेल. औद्योगिक व व्यापारी गरजा भागवत असतानाही मुद्रण ही कला म्हणूनही कशी वाढत राहील, तिला धावत्या नि बदलत्या जगाबरोबर राहून नवनवी रूपे कशी दाखविता येतील आणि तिचे शाश्वत नि संजीवक कार्य जी ग्रंथनिर्मिती, ते पूर्वीपेक्षा सुडौल नि स्वस्त कसे होत राहील, ह्यासंबंधीही सतत विचारमंथन होणे अवश्य व इष्ट ठरेल.

ग्रंथ जेव्हा हस्तलिखित होते तेव्हा त्यांची निर्मिती कलात्मकपणे करण्याची प्रथा होती असे दिसते. अनेक हस्तलिखित ग्रंथ पाहिल्यावर ह्या सत्याची आजही प्रचीती येते. मानवी मनाला सौंदर्याची व त्यामुळे आनंददायी कलेची स्वाभाविक ओढ आहे. श्रवणसुखासारखेच नेत्रसुखही मानवाला हवेहवेसे वाटत असते. नित्य वापराच्या वस्तू सुंदर नि सुखदायक असाव्या असा त्याला हव्यास असतो. त्याचाच प्रत्यय ह्या प्राचीन व मध्यकालीन सुबक हस्ताक्षरांतील शेकडो पानांच्या काही हस्तलिखित, वेलबुट्टीयुक्त व सचित्र ग्रंथांकडे पाहिल्याबरोबर कोणालाही

येतो. मुद्रणास प्रारंभ झाला तेव्हाही ही कलात्मक दृष्टी ठेवण्यात आली होती ह्याचीही साक्ष पटते. युरोपात मुद्रणकलेचा जन्म झाला, तेथेच नव्हे तर आपल्याकडेही पहिले जे ग्रंथ निर्माण झाले व ज्यांनी ते मुद्रित केले त्यांनीही ही कलात्मक दृष्टी ढळू दिली नाही. आज उपलब्ध असणाऱ्या सोयी व साधने त्या वेळी नसतानाही सांप्रत मुद्रित होत असलेल्या ग्रंथांपेक्षा अधिक सुबक ग्रंथ निर्माण होत होते. ह्याचे प्रमुख कारण केवळ ही दृष्टीच होती. सांप्रत अनेक सुविधा हस्तगत झाल्या आहेत, असे असूनही ग्रंथ-निर्मितीचा तो दर्जा मात्र काही अपवाद वगळल्यास आज आढळत नाही. ह्याचे प्रमुख कारण हा कलात्मक दृष्टीचा अभाव हेच म्हणावे लागेल. जावजी दादाजींनी घरच्या चुलीवर स्वयंपाकाच्या कढईत मुद्राक्षरे पाडण्याचे कौशल्य दाखविले. आजही ' निर्णयसागर 'च्या अनेक मुद्राक्षरांना तोड नाही, असा सार्वत्रिक व सर्वमान्य अभिप्राय आहे. मुद्राक्षरांचा सुबकपणा, रेखीवपणा व कातीवपणा तसेच त्याचे वळण, आकार व प्रमाण ह्याबाबत चोखंदळ दृष्टी नि स्वत: कष्ट करण्याची झुंझार वृत्ती ह्याच तशा निर्मितीला कारण आहेत. साधनांची विपुलताच कलानिर्मितीला लागते हे खरे नव्हे ! जगातील शाश्वत मूल्याच्या श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृती जेव्हा साधनांची अगदी कमतरता होती तेव्हाही निर्माण झालेल्या दिसतात. तेथे साधन-समृद्धीचा एवढा प्रश्न नाही; तर तो प्राय: व्यक्तिगत दृष्टीचा नि वृत्तीचा आहे हे मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही.

आज मुद्रण उद्योगाला सापेक्षतया बरे दिवस आले आहेत; त्याचा विस्तार प्रतिवर्षी मोठ्या प्रमाणात होत आहे; नवनवी मुद्रणयंत्रे परदेशातूनही आयात करून विविध स्वरूपाचे मुद्रण आपल्या देशात तसेच महाराष्ट्रात होत चालले आहे. मुद्रणालयांच्या विशाल वास्तू अस्तित्वात येत आहेत; उत्तरोत्तर राजाश्रय नि लोकाश्रयही वाढत्या प्रमाणात ह्या व्यवसायाला लाभत आहे. आधुनिक विज्ञानाने व तंत्रज्ञानाने उत्पादनातील वेगात व पद्धतीत विलक्षण चमत्कार करून दाखवला आहे. उत्पादनाबरोबर मुद्रकांच्या उत्पन्नातही भर पडत चालली आहे. परंतु, एका शतकापूर्वी दर्जेदार मुद्रण करण्याची जी जिद्द, जी चिकाटी व जी आकांक्षा आढळत होती ती कालांतराने ओसरत व ओसंडत गेल्याचा भास होतो, हे नाकारता येत नाही. मुद्रण व्यावसायिकांनी ह्याची कारणमीमांसा करून आपल्या उद्योगाचा आधुनिक दृष्टीने उत्पादनक्षम साधनानिशी विस्तार व विकास करायला हवा. व्यापारी वा औद्योगिक गरजा भागवत असतानाही टिकावू व सुरेख अशी ग्रंथांची निर्मितीही होत राहील असाही प्रयत्न व्हायला हवा.

मुद्रण हा उद्योग आहे आणि उद्योगात व्यवस्थापनाला दिवसेंदिवस विशेष महत्त्व येत चालले आहे हेही मुद्रकबंधूंनी विसरता कामा नये. मुद्रण उद्योग सर्वत्र विखुरलेला आहे; तसेच मुद्रणालयांच्या विविध श्रेणी आहेत. अगदी छोट्या गावातील एका मुद्रणयंत्रावर चालणाऱ्या मुद्रणालयापासून तो मुंबईसारख्या शहरातील प्रचंड नि विविध यंत्रांच्या सहाय्याने चालविल्या जाणाऱ्या मुद्रणालयापर्यंत अनेक स्वरूपाची व श्रेणीची मुद्रणालये महाराष्ट्रात व

भारतात आहेत. त्याचे व्यवस्थापन काही अपवाद वगळल्यास पारंपरिकच नव्हे तर कालबाह्य झालेले आहे. त्यामुळे समाजाच्या तसेच ग्राहकाच्या वाढत्या आणि तातडीच्या गरजा समाधानकारकपणे भागविण्याचे सामर्थ्य पुष्कळ मुद्रणालयांत नाही हे सत्य आहे. ह्याचे खरे कारण व्यवस्थापन दुबळे आहे हेच आहे. यंत्रे व सामग्री ह्यांचा पुरा वापर, यंत्रे व कामगार ह्यांची उत्पादनक्षम जोड, हिशेब–जमाखर्चाधारित नियुक्त दर, कामगारांना तंत्रशिक्षण इत्यादी बाबतींत प्रायः अनास्थाच आढळते. प्रस्तुत काळात व्यवस्थापन हे एक लाभगर्भ उत्पादन झाले आहे. तज्ज्ञ व्यवस्थापक हा उत्तम उत्पादन करील नि चांगला अर्थलाभही करून देईल व घेईल. तसेच आपल्या उद्योगाची पूर्वपीठिका, त्याचे विद्यमान स्वरूप आणि त्याचे उद्याचे विकसित रूप ह्या बाबतीतही सतत अनुसंधान राखून आपल्या उद्योगाचा विकास करीत राहील. उत्पादन करणे महत्त्वाचे आहे. पण उत्पादनक्षमता व तज्जन्य लाभक्षमता वाढवत नेणे हे त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे.

सुव्यवस्थित व्यवस्थापन हे आता शास्त्राचा तसाच तंत्राचा एक परिपुष्ट भाग झाला आहे; आणि उद्योगाची अविरत प्रगती करू इच्छिणाऱ्या कोणाही उद्योजकाने ह्या शास्त्राची नुसती तोंडओळख नव्हे तर सांगोपांग माहिती करून घेणे अवश्य व इष्ट आहे. अनेक अडचणी उद्योग चालविताना येतात व येणार. त्यांपैकी कित्येक परिस्थितिजन्य असतात आणि त्यावर उपाय योजणे सामूहिकरीत्या शक्य होते; येथे औद्योगिक परिसंस्थांच्या कार्याचे काय उद्दिष्ट असले पाहिजे ते स्पष्ट होते. उद्योग-धंद्यांच्या सर्वसामान्य प्रश्नांचे निदान तसेच व्यवहार्य निरसनात्मक उपाय ह्यांची चिकित्सा व मीमांसा अशा संस्थांमार्फत अव्याहत व्हावयास हवी. तथापि, व्यवस्थापनशास्त्रासंबंधी सर्वसाधारण चर्चा केली तरी उद्योजकाला आपला उद्योग कार्यक्षमतेने, उत्पादनक्षमतेने नि लाभक्षमतेने चालवावयास व्यवस्थापनतंत्रातील आवश्यक ती तज्ज्ञताही अंगी आणावयास हवी.

व्यवस्थापनाच्याही दोन बाजू आहेत : एक निव्वळ व्यावसायिक (Professional) आणि दुसरी सामाजिक (Social). उद्योग, मग तो कोणीही कोठेही करीत असो, उद्योजकाने व्यावसायिक प्रावीण्याच्या जोरावर तो यशस्वी व लाभदायक केला की त्याने सारे हस्तगत केले वा उत्तरदायित्व संपले असे मानणे उद्योजकांपासून आधुनिक जगाच्या ज्या अपेक्षा आहेत, तत्संबंधी संपूर्ण अज्ञानाचे द्योतक ठरेल. व्यावसायिक हुशारीबरोबर सामाजिक जबाबदारीचीही जिवंत जाणीव उद्योजकाने ठेवणे आणि तद्विषयक आपले कर्तव्य चोखपणे बजावण्यात तत्पर असणे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अमेरिकेसारख्या वैभवसंपन्न देशात व्यावसायिक तज्ज्ञता पराकोटीला गेली आहे. व्यवस्थापनशास्त्रात व तंत्रात अमेरिकेएवढी प्रगती अन्य कोठेही आढळत नाही; हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. जगातील सर्वार्थाने प्रचंड अशा औद्योगिक, व्यापारी तसेच बँकिंग संस्था

अनुक्रमणिका

येतो. मुद्रणास प्रारंभ झाला तेव्हाही ही कलात्मक दृष्टी ठेवण्यात आली होती ह्याचीही साक्ष पटते. युरोपात मुद्रणकलेचा जन्म झाला, तेथेच नव्हे तर आपल्याकडेही पहिले जे ग्रंथ निर्माण झाले व ज्यांनी ते मुद्रित केले त्यांनीही ही कलात्मक दृष्टी ढळू दिली नाही. आज उपलब्ध असणाऱ्या सोयी व साधने त्या वेळी नसतानाही सांप्रत मुद्रित होत असलेल्या ग्रंथांपेक्षा अधिक सुबक ग्रंथ निर्माण होत होते. ह्याचे प्रमुख कारण केवळ ही दृष्टीच होती. सांप्रत अनेक सुविधा हस्तगत झाल्या आहेत, असे असूनही ग्रंथ-निर्मितीचा तो दर्जा मात्र काही अपवाद वगळल्यास आज आढळत नाही. ह्याचे प्रमुख कारण हा कलात्मक दृष्टीचा अभाव हेच म्हणावे लागेल. जावजी दादाजींनी घरच्या चुलीवर स्वयंपाकाच्या कढईत मुद्राक्षरे पाडण्याचे कौशल्य दाखविले. आजही ' निर्णयसागर 'च्या अनेक मुद्राक्षरांना तोड नाही, असा सार्वत्रिक व सर्वमान्य अभिप्राय आहे. मुद्राक्षरांचा सुबकपणा, रेखीवपणा व कातीवपणा तसेच त्याचे वळण, आकार व प्रमाण ह्याबाबत चोखंदळ दृष्टी नि स्वत: कष्ट करण्याची झुंझार वृत्ती ह्याच तशा निर्मितीला कारण आहेत. साधनांची विपुलताच कलानिर्मितीला लागते हे खरे नव्हे ! जगातील शाश्वत मूल्याच्या श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृती जेव्हा साधनांची अगदी कमतरता होती तेव्हाही निर्माण झालेल्या दिसतात. तेथे साधन-समृद्धीचा एवढा प्रश्न नाही; तर तो प्राय: व्यक्तिगत दृष्टीचा नि वृत्तीचा आहे हे मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही.

आज मुद्रण उद्योगाला सापेक्षतया बरे दिवस आले आहेत; त्याचा विस्तार प्रतिवर्षी मोठ्या प्रमाणात होत आहे; नवनवी मुद्रणयंत्रे परदेशातूनही आयात करून विविध स्वरूपाचे मुद्रण आपल्या देशात तसेच महाराष्ट्रात होत चालले आहे. मुद्रणालयांच्या विशाल वास्तू अस्तित्वात येत आहेत; उत्तरोत्तर राजाश्रय नि लोकाश्रयही वाढत्या प्रमाणात ह्या व्यवसायाला लाभत आहे. आधुनिक विज्ञानाने व तंत्रज्ञानाने उत्पादनातील वेगात व पद्धतीत विलक्षण चमत्कार करून दाखवला आहे. उत्पादनाबरोबर मुद्रकांच्या उत्पन्नातही भर पडत चालली आहे. परंतु, एका शतकापूर्वी दर्जेदार मुद्रण करण्याची जी जिद्द, जी चिकाटी व जी आकांक्षा आढळत होती ती कालांतराने ओसरत व ओसंडत गेल्याचा भास होतो, हे नाकारता येत नाही. मुद्रण व्यावसायिकांनी ह्याची कारणमीमांसा करून आपल्या उद्योगाचा आधुनिक दृष्टीने उत्पादनक्षम साधनानिशी विस्तार व विकास करायला हवा. व्यापारी वा औद्योगिक गरजा भागवत असतानाही टिकावू व सुरेख अशी ग्रंथांची निर्मितीही होत राहील असाही प्रयत्न व्हायला हवा.

मुद्रण हा उद्योग आहे आणि उद्योगात व्यवस्थापनाला दिवसेंदिवस विशेष महत्त्व येत चालले आहे हेही मुद्रकबंधूंनी विसरता कामा नये. मुद्रण उद्योग सर्वत्र विखुरलेला आहे; तसेच मुद्रणालयांच्या विविध श्रेणी आहेत. अगदी छोट्या गावातील एका मुद्रणयंत्रावर चालणाऱ्या मुद्रणालयापासून तो मुंबईसारख्या शहरातील प्रचंड नि विविध यंत्रांच्या सहाय्याने चालविल्या जाणाऱ्या मुद्रणालयापर्यंत अनेक स्वरूपाची व श्रेणीची मुद्रणालये महाराष्ट्रात व

भारतात आहेत. त्याचे व्यवस्थापन काही अपवाद वगळल्यास पारंपरिकच नव्हे तर कालबाह्य झालेले आहे. त्यामुळे समाजाच्या तसेच ग्राहकाच्या वाढत्या आणि तातडीच्या गरजा समाधानकारकपणे भागविण्याचे सामर्थ्य पुष्कळ मुद्रणालयांत नाही हे सत्य आहे. ह्याचे खरे कारण व्यवस्थापन दुबळे आहे हेच आहे. यंत्रे व सामग्री ह्यांचा पुरा वापर, यंत्रे व कामगार ह्यांची उत्पादनक्षम जोड, हिशेब—जमाखर्चाधारित नियुक्त दर, कामगारांना तंत्रशिक्षण इत्यादी बाबतींत प्राय: अनास्थाच आढळते. प्रस्तुत काळात व्यवस्थापन हे एक लाभगर्भ उत्पादन झाले आहे. तज्ज्ञ व्यवस्थापक हा उत्तम उत्पादन करील नि चांगला अर्थलाभही करून देईल व घेईल. तसेच आपल्या उद्योगाची पूर्वपीठिका, त्याचे विद्यमान स्वरूप आणि त्याचे उद्याचे विकसित रूप ह्या बाबतीतही सतत अनुसंधान राखून आपल्या उद्योगाचा विकास करीत राहील. उत्पादन करणे महत्त्वाचे आहे. पण उत्पादनक्षमता व तज्जन्य लाभक्षमता वाढवत नेणे हे त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे.

सुव्यवस्थित व्यवस्थापन हे आता शास्त्राचा तसाच तंत्राचा एक परिपुष्ट भाग झाला आहे; आणि उद्योगाची अविरत प्रगती करू इच्छिणाऱ्या कोणाही उद्योजकाने ह्या शास्त्राची नुसती तोंडओळख नव्हे तर सांगोपांग माहिती करून घेणे अवश्य व इष्ट आहे. अनेक अडचणी उद्योग चालविताना येतात व येणार. त्यांपैकी कित्येक परिस्थितिजन्य असतात आणि त्यावर उपाय योजणे सामूहिकरीत्या शक्य होते; येथे औद्योगिक परिसंस्थांच्या कार्याचे काय उद्दिष्ट असले पाहिजे ते स्पष्ट होते. उद्योग-धंद्यांच्या सर्वसामान्य प्रश्नांचे निदान तसेच व्यवहार्य निरसनात्मक उपाय ह्यांची चिकित्सा व मीमांसा अशा संस्थांमार्फत अव्याहत व्हावयास हवी. तथापि, व्यवस्थापनशास्त्रासंबंधी सर्वसाधारण चर्चा केली तरी उद्योजकाला आपला उद्योग कार्यक्षमतेने, उत्पादनक्षमतेने नि लाभक्षमतेने चालवावयास व्यवस्थापनतंत्रातील आवश्यक ती तज्ज्ञताही अंगी आणावयास हवी.

व्यवस्थापनाच्याही दोन बाजू आहेत : एक निव्वळ व्यावसायिक (Professional) आणि दुसरी सामाजिक (Social). उद्योग, मग तो कोणीही कोठेही करीत असो, उद्योजकाने व्यावसायिक प्रावीण्याच्या जोरावर तो यशस्वी व लाभदायक केला की त्याने सारे हस्तगत केले वा उत्तरदायित्व संपले असे मानणे उद्योजकांपासून आधुनिक जगाच्या ज्या अपेक्षा आहेत, तत्संबंधी संपूर्ण अज्ञानाचे द्योतक ठरेल. व्यावसायिक हुशारीबरोबर सामाजिक जबाबदारीचीही जिवंत जाणीव उद्योजकाने ठेवणे आणि तद्विषयक आपले कर्तव्य चोखपणे बजावण्यात तत्पर असणे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अमेरिकेसारख्या वैभवसंपन्न देशात व्यावसायिक तज्ज्ञता पराकोटीला गेली आहे. व्यवस्थापनशास्त्रात व तंत्रात अमेरिकेएवढी प्रगती अन्य कोठेही आढळत नाही; हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. जगातील सर्वार्थाने प्रचंड अशा औद्योगिक, व्यापारी तसेच बँकिंग संस्था

सांप्रत मोठ्या संख्येने तेथे कारभार व व्यवहार करीत आहेत, नि आपापल्या क्षेत्रात जगावर अधिराज्य गाजवत आहेत. ह्या संस्था म्हणजे अमेरिकेची भूषणे असेच सकृद्दर्शनी कोणालाही वाटेल. तथापि आज त्यांपैकी कित्येक मातबर संस्थांविरुद्ध जनमत तयार झाले आहे आणि त्या संस्था अमेरिकेची भूषणे नसून दूषणे आहेत असा समज प्रचलित होत आहे. बँक ऑफ अमेरिका ही जगातील सर्वांत धनाढ्य व बलाढ्य बँक आहे. सीअर्स बँक ही जगातील सर्वांत प्रचंड विविध वस्तुभांडारे चालविणारी प्रभावी व्यापारी साखळी आहे. हजारो कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष आपल्या संस्थेत तसेच लक्षावधी कामगारांना संलग्न संस्थांमध्ये अप्रत्यक्षरीत्या चांगली रोजंदारी त्यांनी निर्माण केली आहे. लाभाच्या बाबतीत त्यांना इतरत्र तोड व जोड सापडणे अशक्य आहे. असे असूनही त्यांच्याविरुद्ध सामाजिक जबाबदारीची जाणीव नसल्याची भावना वाढीला लागून असंतोषाचा वन्ही प्रज्वलित झाला आहे. ह्या असंतोषाग्नीच्या भक्ष्य-स्थानी बँक ऑफ अमेरिकेच्या काही शाखा अलीकडे पडल्याच्या वार्ता कित्येकांनी वाचल्या असणे शक्य आहे. त्यावरून उद्योजकांनी घ्यावयाचा बोध हाच की, उद्योग हा केवळ वैयक्तिक स्वरूपाचा नसतो, त्याला तितकीच महत्त्वाची सामाजिक बाजू असते. तिकडे दुर्लक्ष होऊ लागले आणि समाजाला सहाय्यक व परिपोषक असे त्याचे स्वरूप पालटत पालटत समाज-पराङ्मुख व समाजशोधक अशा प्रवृत्तींचे प्राबल्य ते चालविणाऱ्या वा त्यांची मालकी असणाऱ्यां-मध्ये दिसून येऊ लागले की समाजाची व प्रशासनाची वक्रदृष्टी त्यांच्याकडे वळते. आपल्या देशातही औषधी-उत्पादन तसेच व्यापारीमुद्रण अशा काही उद्योगांत बाजवीपेक्षा अधिक लाभप्राप्तीच्या लोभाने समाजाचे शोषण करण्याची प्रवृत्ती वाढली आहे की काय असा भास पदोपदी होतो. औषधी-उत्पादनोद्योगावर नियंत्रणे अधिक सख्त होत चालली आहेत. त्याचे प्रमुख कारण हा समज वा ही भावना आहे हे विसरता कामा नये. व्यापारी मुद्रकांनी ह्या अनुभवापासून त्वरित बोध घेतला पाहिजे. औषधी-उत्पादन व व्यापारी मुद्रण त्यांची सोबत जमून समाजापासून बाजवीपेक्षा अधिक अर्थलाभ उकळण्याची प्रवृत्ती प्रबळ झाली आहे अशी जी भावना आहे, ती भावना उपेक्षून चालणार नाही. शिवाय लाभक्षम व्यापारी मुद्रणा-कडे प्राय: वळून समाजोपयोगी ग्रंथ-मुद्रणाची आबाळ केल्यास मुद्रण व्यवसायाकडे आज ना उद्या समाजाची व प्रशासनाची वक्रदृष्टी वळली तर ती स्वाभाविक व अन्यायकारक म्हणता यावयाची नाही. नियंत्रणे ही उद्योगाला जाचक व मारक ठरतात हे खरे; पण समाजात यथा-योग्य भावात व प्रमाणात सेवा व वस्तू पुरवण्याऐवजी परिस्थितीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन बाजवीपेक्षा भारी भावात व प्रमाणात लाभ उकळण्यास प्रवृत्त झालेल्या गब्बर उद्योज-कांची फार काळ गय करणे हेच अस्वाभाविक व अन्यायी ठरेल. म्हणून वैयक्तिक व सामूहिक दृष्ट्याही सामाजिक जबाबदारीची जाणीव सतत मनात बाळगून उद्योगाची वाढ करीत नेणेच सर्वतोपरी श्रेयस्कर ठरेल !

अनुक्रमणिका

सारे उद्योग ग्राहकांसाठी जन्माला येतात. ग्राहकांचे समाधान हा व्यवस्थापनाचा उद्देश असतो. आपल्यावर ही एक सामाजिक जबाबदारी आहे ह्याची जाणीव व्यवस्थापकाला असावयास हवी. व्यावसायिक लाभाबरोबर सामाजिक कल्याणही साधले जाईल असा सातत्याने व अगत्याने विचार व आचार करणारे व्यवस्थापन ही आजची सामाजिक व व्यावसायिक गरज आहे. कोणताही उद्योग परिणामी समाजाला उपयुक्त व पोषक ठरला पाहिजे. तो तसा होईनासा झाला म्हणजे त्या उद्योगातील व्यवस्थापन अधुरे नि दुबळे बनले असेच म्हणावे लागेल. मानवी समाजाचा खरा विकास त्याच्या सांस्कृतिक उत्कर्षात प्रतिबिंबित होतो; ह्याचा अर्थ सांस्कृतिक उत्कर्षाला साधक व सहाय्यक राहणे हेच कोणत्याही उद्योगाचे वास्तविक प्रयोजन बनले पाहिजे. आर्थिक लाभ व सामाजिक सेवा ह्यांच्यामध्ये स्वाभाविक संघर्ष नाही. दुबळ्या व्यवस्थापनाला आपल्या कर्तव्याची जाणीव यथार्थ नसल्यामुळे हा संघर्ष भासत असतो. ह्या दुबळ्या व्यवस्थापकांचे उच्चाटन मुद्रण व्यवसायातून व्हायला हवे. त्यासाठी वैयक्तिक व सामूहिक प्रयत्न अखंड चालले पाहिजेत. मुद्रण उद्योगाच्या विविध बाजू – टाइपाच्या धातुकामापासून तो ग्रंथाच्या वेष्टनापर्यंत साऱ्या – सुव्यवस्थितपणे चालविल्या व वाढविल्या जातील आणि समाजाचे ऋण फेडण्याची त्याची शक्ती उत्तरोत्तर वाढत जाईल, ह्यासंबंधी सतत विचारमंथन व्हावयास हवे. तसेच त्याचे आद्य कार्य जी ग्रंथनिर्मिती त्याची विस्मृती होणार नाही ह्या दृष्टीने मुद्रण उद्योगाच्या व्यवस्थापनामार्फत सार्वत्रिक जाणीव वाढविणारे प्रयत्न करावयास हवेत. उद्योग-संवर्धक साहित्य-मुद्रणाबरोबर ज्ञानप्रसारक ग्रंथ-मुद्रणही विस्तार पावेल नि त्याचा दर्जा अधिकाधिक उंचावत जाऊन त्याचे कलात्मक स्वरूपही अधिक आकर्षक बनेल हाही हेतू मुद्रण व्यवस्थापनाने दृष्टीपुढे ठेवावयास हवा. व्यावसायिक अभिमानाच्या पोटी दर्जेदार वस्तूंची निर्मिती होते. कलात्मक दृष्टी हवी पण त्याहीपेक्षा उत्साह-पूर्ण हौस हवी. महाराष्ट्रात हा उत्साह, ही हौस, ही दृष्टी व हा अभिमान ज्या मुद्रकांत होता त्यांनी मुद्रणाचे विशेषतः ग्रंथ-मुद्रणाचे, त्यांच्याच काळात नव्हे तर आजही अनुल्लंघनीय वाटावे असे विविध आदर्श व मानदंड निर्माण केले. त्यांचा वारसा मराठी मुद्रकांना लाभला आहे; तो पुढे चालविणे हे त्यांचे एक व्यावसायिक कर्तव्य आहे !

ग. बा. नेवाळकर

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१

भारतीय ग्रंथमुद्रण आणि प्रगती

अनुक्रमणिका

२

ग्रंथमुद्रण तंत्र आणि भारतीय भाषांतील मुद्रण

३

ग्रंथमुद्रण व्यवसाय

प्रास्ताविक

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

व्याख्यान पहिले

प्रारंभ आणि प्रगती

अनुक्रमणिका

प्रास्ताविक

ग्रंथनिर्मिती परिसंस्थेचे अध्यक्ष श्री. विसूभाऊ लिमये, ज्ञानवर्गाचे आणि प्रदर्शनाचे उद्‌घाटक श्री. भाऊसाहेब नेवाळकर, परिसंस्थेचे उपाध्यक्ष श्री. विष्णूपंत भागवत, कार्यवाह श्री. दादासाहेब जोशी, श्री. चिं. स. लाटकर आणि मुद्रक मित्रांनो :—

"आपल्यापुढे आज मी तीन व्याख्यानांतून "भारतीय ग्रंथमुद्रण" या विषयाची चर्चा करणार आहे. या ग्रंथमुद्रणावर मी गेली तीन वर्षे लिहितो आहे. परंतु या विषयाच्या अध्ययनास मी सुरुवात केली त्याला आता तीस वर्षे होऊन गेली. पुण्यातच श्री. तुषारकान्ती घोष यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय मुद्रण परिषदेमध्ये मी 'मुद्रण व्यवसायाची पाहणी' हा निबंध वाचला होता. ही परिषद पूना प्रेस ओनर्स असोसिएशनमार्फत भरली होती. त्यांच्याच ह्या मुद्रकभवनात बोलताना मला विशेष आनंद होतो आहे, याचे कारण मला या विषयाच्या अभ्यासास प्रवृत्त करणारे आणि प्रोत्साहन देणारे सज्जन पुण्यातले आहेत. आज विद्यमान आहेत. श्री. मामाराव दाते यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या 'मुद्रण प्रकाश'मधील एका लिखाणावर मी काही शंका उपस्थित केल्या. त्यांनी मला 'मुद्रणसिद्धता' या विषयावर लेख लिहिण्यास प्रवृत्त केले. 'भारतातील कागदनिर्मितीचा इतिहास' या विषयावर एक लेख मी 'चित्रमयजगत्'कडे पाठविला होता. त्या वेळचे संपादक श्री. मामासाहेब देवगिरीकर यांनी मला 'कागद' ह्या विषयावर लेखमाला लिहावयाला प्रवृत्त केले. पुढे ती लेखमाला पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली.[1] तिसरे श्री. 'शा'साहेब पटवर्धन, आर्यभूषणचे निवृत्त व्यवस्थापक, आज जे इथे उपस्थित आहेत. त्यांच्या प्रेरणेने मी आताच उल्लेखलेला 'मुद्रण-व्यवसायाची पाहणी' हा निबंध तयार केला होता. तो निबंध प्रसिद्धीसाठी, 'मुद्रण प्रकाश',-मध्ये छापण्यासाठी, त्या वेळी, त्यांना दिल्याचे आठवते. परंतु त्याची प्रत मात्र आज माझ्या

१. नाईक, बापूराव शिवराम, कागद, चित्रशाळा, १९४२,

अनुक्रमणिका

संग्रही नाही. पुण्यातील त्या वेळचे एक चिकित्सक मुद्रणतज्ज्ञ, वालोद्यानचे श्री. सहस्रबुद्धे यांचीही मला आज आठवण होते. मुद्रणकलेच्या व्यासंगात प्रारंभीच्या काळात त्यांचे मला मार्गदर्शन झाले आहे.

ग्रंथनिर्मिती या विषयावर मी जी तीन व्याख्याने देणार आहे त्यांचे विषय (१) भारतीय ग्रंथमुद्रण : प्रारंभ आणि प्रगती (२) ग्रंथनिर्मिती तंत्र आणि (३) मुद्रणव्यवसाय, पाहणी सद्यःस्थिती आणि भविष्य, असे आहेत. माझ्या पहिल्या व्याख्यानाचा विषय 'भारतीय ग्रंथ-मुद्रणाचा त्रोटक इतिहास' असा असला तरी तिन्ही व्याख्यानांमध्ये चर्चिल्या जावयाच्या एकूण विषयाची तात्त्विक बाजू मी सुरुवातीला स्पष्ट करणार आहे.

ग्रंथ-निर्मितीची चर्चा करताना प्रथम ग्रंथ म्हणजे काय याचा विचार प्रस्तुत ठरतो. आपल्या देशात लिहिण्याची कला फारच उशिरा उपयोगात आली. मग छापण्याची कला अजूनही अप्रगत असावी यात आश्चर्य नाही. वेदकाली आणि वेदोत्तरकालीही काव्यरचना आणि गद्य ग्रंथरचना होत होती. तरी ग्रंथ लेखनबद्ध करून ठेवण्याची प्रवृत्ती नव्हती. किंबहुना सर्व रचना मुखोद्गत करावयाची अशीच पद्धत होती. शिकवताना किंवा वादविवेचन करताना लिखित ग्रंथाचे साहाय्य घेणे तेव्हा निषिद्ध मानले जाई. काही शिक्षक अशी लेखनाची मदत घेत, त्यांना 'लिखितपाठक' असे संबोधले जाई. त्यांची गणना सहा अधमांमध्ये केली होती.[२] स्मरणावरच तेव्हा जास्त भर असे. पुस्तकातील विद्या ही दुसऱ्याकडे ठेवलेल्या संपत्तीसारखी असते, ती वेळेवर उपयोगी पडत नाही. आपली संपत्ती आपण मित्रांच्याजवळ ठेवावी, आपल्याला त्याची गरज लागावी, पण तेव्हा मात्र ती आपल्याला मिळू नये, असे पुस्तकांतील विद्येचे होते.[३] आज तशी स्थिती नाही. आज ग्रंथावर आपण विसंबू शकतो. 'धर्मस्य तत्त्वम् निहितम् गुहायाम्' अशी पूर्वी धारणा होती. धर्मतत्त्व समजून घ्यायचे तर आपल्याला त्या काळी ऋषिमुनींच्याकडे, ते राहात असत तेथे, गुहेमध्ये जावे लागत असे. आज ती स्थिती राहिलेली नाही. आज सर्व ज्ञान ग्रंथरूपाने उपलब्ध होते. 'विश्वस्य तत्त्वम् निहितम् पुस्तकायाम्' अशी आज स्थिती आहे.

लिखित वा मुद्रित ग्रंथ हे ज्ञानप्रसाराचे एकमेव साधन आहे. ग्रंथनिविष्ट विचारामध्ये महान सामर्थ्य आहे; ॲटम्बाँबहून जास्त. म्हणून ग्रंथाच्या निर्मितीची चर्चा करताना ग्रंथांचे स्वरूप आणि प्रयोजन यांचा मूलभूत विचार केला पाहिजे. याच विषयावर अन्यत्र लिहिताना सूत्ररूपाने मी जो विचार मांडला, तो इथे वाचून दाखविला तर माझ्या विवेचनाचे मर्म समजून येईल.

२. गीती शीघ्री शिरःकम्पी तथा लिखितपाठकः । अनर्थज्ञोऽल्पकण्ठश्च षडैते पाठकाधमाः ।
याज्ञवल्क्य शिक्षा.

३. पुस्तकेषु च या विद्या । परहस्तेषु यद् धनम् ॥ समुत्पन्नेषु कार्येषु । न सा विद्या न तद् धनम् ॥३॥
चाणक्यनीति.

अनुक्रमणिका

"In order to be able to produce a good book, including a textbook, it is necessary to understand the nature and purpose of the Book. Books contain thought which is 'frozen' in writing and duplicated by mechanical means to give it a handy form. The information which is 'frozen' and held between two covers is required to be re-activated when the reader perceives it. It then "can liberate a multitude of sounds, images, feelings, ideas, facts, by opening the gates of time and space to them."

ग्रंथामध्ये विचारधन गोठवून ठेवलेले असते. एखादी वस्तू टिकावी म्हणून आपण बर्फात गोठवून ठेवतो ना? तसे. लिखित विचारधनाचा प्रसार व्हावा म्हणून यांत्रिक पद्धतीने अनेक प्रती काढण्यात येतात. ग्रंथाच्या दोन पुठ्ठ्यांमध्ये गोठवून ठेवलेले ज्ञान वाचक वाचू लागतो तेव्हा ते सजीव होते, प्रफुल्लित होते. मुद्रित शब्दांचे नेत्रेंद्रियांस दर्शन झाले की, त्या मुद्राक्षरांकित शब्दपंक्तींतून अनेकविध नाद, प्रतिमा, भावना, कल्पना आणि घटना स्थल-कालाची बंधने तोडून प्रगट होतात.

याच लेखामध्ये पुढे मी म्हटले आहे :

"Principal tool employed in writing down thought is the Letter. In printing, the same mission is performed by the type. Writing and printing make the Language visible by giving graphic forms to the phonemes. The Letter is thus the visual representation of phonemic units in graphemic form. When one speaks a language one utters sounds in pre-determined sequence to form words which make sense when listened to. Here the listener is aided by intonation, pauses and gestures of the speaker. The last aid is absent in Radio Communication but is restored in Television. These direct aids are absent when thought is transmitted through written letter or cold type. Thus the type is supposed to take the place of the sound as well as these direct aids and therefore visual representation of thought, particularly in print, assumes great importance and throws a challenge to the typographer and the printer."

विचार ग्रंथनिविष्ट करण्यासाठी लेखनात शब्दांचा आणि परिणामी अक्षरांचा आधार घेण्यात येतो. मुद्रणात ही गोष्ट मुद्राक्षरांनी साधण्यात येते. लेखनात आणि मुद्रणात वाणीतील नाद अक्षररूप घेतात आणि भाषेला दृश्य स्वरूप प्राप्त होते. अक्षर म्हणजे नादकणांचे चित्रांकित रूप. आपण भाषा बोलतो म्हणजे पूर्वनियोजित नादमालिकेचा उच्चार करतो. नादसमूहांचे शब्द बनतात आणि ते श्रोत्यांमध्ये अर्थज्ञान उत्पन्न करतात. वक्त्याला व्याख्यानात आवाजाचे चढ-उतार, आरोह-अवरोह, उदात्त-अनुदात्त स्वर, शब्दामधील

अनुक्रमणिका

थांबण्याच्या जागा आणि चेहऱ्यावरील भाव ह्या सर्वांची मदत होत असते. रेडिओद्वारे किंवा टेप-रेकॉर्डिंगवरून ऐकताना या आस्यगत भावांची मदत नसते. टेलिव्हिजनमध्ये ती असते. या दोन आधुनिक साधनांमुळे वाणीने स्थलकालाची बंधने झुगारून दिली आहेत हे खरे, परंतु मुद्रित शब्दामधील सामर्थ्य त्यात अभावानेच असते. म्हणून मुद्रित अक्षरांवर आणि त्यांची योजना करणाऱ्या ग्रंथनिर्मात्यांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. विचारांचे दृश्यस्वरूप सिद्ध करताना जी मुद्राक्षर-रचना करावयाची असते ती करण्यात मुद्राक्षरकलाकारांना आणि मुद्रकांना फार मोठे आवाहन स्वीकारावे लागते.

मुद्रितांना "delayed speech tool" असे म्हटले आहे. मुद्रित मजकूर वाचताना शब्दांचे मूळ वाङ्मयीन (of speech) स्वरूप वाचकाला प्रतीत व्हावे म्हणून मुद्राक्षरकलाकाराला मुद्राक्षरांची योग्य निवड, मुद्राक्षरपंक्तीची लांबी, पानांचा आकार, त्यावरील शब्दरचना, चित्रे, इत्यादी अनेक साधनांचा सुयोग्य उपयोग करावा लागतो. विचारधन साठविता यावे, वाचकांच्या सोईसाठी ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता यावे, आबालवृद्धांना हाताळता यावे, म्हणून त्याला पार्थिव स्वरूप द्यावे लागते; ग्रंथरूप द्यावे लागते. हे पार्थिव रूप किंवा दृश्यरूप, वाङ्मयीन, शास्त्रीय, तात्त्विक, उपयुक्त, शालेय अशा सर्व पुस्तकांना बव्हंशी समान असते.

अशा ग्रंथांच्या विश्वव्यापी व्यवहारावर मी बोलणार आहे. माझी तिन्ही व्याख्याने मी लिहून काढली आहेत आणि कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर यांनी ती मुद्रित स्वरूपात मला तातडीने उपलब्ध करून दिली आहेत. परंतु मी त्यांचे वाचन करणार नाही. त्यांच्या अनुरोधाने बोलणार आहे.

१

युरोपमधील मुद्रणकलेचा अवतार आणि वाढ

सुट्या मुद्राक्षरांचे युरोपीय पूर्वज

१. मुद्रणाचा पंधराव्या शतकात युरोपखंडामध्ये अवतार होण्यापूर्वी पुस्तकांच्या प्रती हाताने लिहीत असत. त्यासाठी लेखणी आणि शाई यांचा उपयोग करीत. या पद्धतीने प्रती करण्यास अर्थातच फार विलंब लागे. शिवाय, प्रत्येक अक्षर सजवण्याकडे लेखक लक्ष पुरवत असल्यामुळे आणखीच विलंब होई. परिच्छेदातील पहिले अक्षर बहुरंगी करण्याची आणि कित्येक वेळा सबंध पानभर अक्षरचित्रे रंगविण्याची पद्धती रूढ होती. पुस्तक लिहिण्यासाठी हातकागदाचाच उपयोग करीत. हा कागद टिकाऊ असे; आणि लिहिण्यासाठी सोयीचाही असे. अशा प्रकारे लिहिलेली पुस्तकें उत्तम प्रकारच्या चामड्यामध्ये बांधीत; आणि त्यावर सोनेरी अक्षरे कोरीत. अक्षरे उमटवण्यासाठी पितळेचे ' पंच ' वापरीत. त्यांवर हाताने कोरलेली अक्षरमुखे असत. हे ' पंच ' पंधराव्या शतकामध्ये प्रचारात आलेल्या सुट्या टाइपांचे पूर्वज होत.

मुद्रणकलेचा चीनमधील अवतार

२. खिस्ती शकाच्या सुरुवातीपासूनच चिनी लोकांना कागद करण्याची कला अवगत होती. मुद्रणाचा शोधही चीनमध्येच लागला. चिनी मुद्रणाचा जुन्यातला जुना नमुना म्हणजे ***' हीरकसूत्र '***. ते नवव्या शतकातील आहे. त्याची एक प्रत ब्रिटिश म्यूझियममध्ये आहे. ***हीरकसूत्र*** लाकडी ठशांनी मुद्रित केलेले असून त्यातील प्रत्येक पानाचा एक सलग ठसा होता. सुट्या मुद्राक्षरांचा उपयोग चिनी लोकांना आणि कोरियन लोकांना माहीत होता; परंतु सुट्या मुद्राक्षरांचे मुद्रण तेथे वाढीस लागले नाही. याचे कारण चिनी भाषेमध्ये हजारो चित्राक्षरे आहेत; त्यामुळे सुट्या मुद्राक्षरांचा वापर तेथे मूळ धरू शकला नाही. सुट्या मुद्राक्षरांची

अनुक्रमणिका

जुळणी करून मुद्रण करण्यास लिपी मुळाक्षरीय असणे आवश्यक असते. त्यासाठी सव्वीस मुळाक्षरांची रोमन लिपी अतिशय उपयुक्त ठरली, हे स्वाभाविक होय.

गुटेनबेर्गचा क्रान्तिकारक शोध

३. योहान्न गुटेनबेर्ग ह्या मुद्रणकलेच्या प्रवर्तकाचा जन्म जर्मनीतील ऱ्हाइन आणि मेन ह्या नद्यांच्या संगमावरील मैंझ ह्या शहरामध्ये एका सोनाराच्या कुटुंबात १३९४ ते १३९९ यांच्या दरम्यान झाला. गुटेनबेर्गला तिशीच्या आतच मैंझ शहर सोडून जावे लागले. स्ट्रासबुर्ग ह्या शहरामध्ये त्याचा मुक्काम १४४४-पर्यंत होता. या मुदतीत अनेक शोधांत त्याने लक्ष गुंतविले होते. एका दाव्याच्या कागदांमध्ये (१४३७) असा पुरावा उपलब्ध झालेला आहे की, गुटेनबेर्ग हा आरसे तयार करण्यापासून रत्नांना पैलू पाडण्यापर्यंतच्या अनेक शोधांमध्ये गुंतलेला होता. आपल्या स्ट्रासबुर्गच्या मुक्कामात मुद्रणाच्या शोधामध्येही त्याने लक्ष घातले होते, असे दिसून येते. गुटेनबेर्गच्या उद्योगात आण्ड्रिअस् ड्रिट्झेन नावाच्या एका मित्राने पाचशे गिल्डर्स गुंतवले होते. हे पैसे शिसे, काही धातू आणि फॉर्म (Formen = टाइप) विकत घेण्यास खर्च करावयाचे होते. ड्रिट्झेन मृत्युशय्येवर असताना (१४३८) गुटेनबेर्गने 'सगळे फॉर्म परत करावे आणि आपल्या डोळ्यांसमोर वितळून टाकावेत', असा आदेश दिला होता. ड्रिट्झेनचा भाऊ क्लाँझ याला त्याने अशी ताकीद दिली होती की, "प्रेस कुणालाही दाखवावयाचा नाही, आणि एक वस्तू आहे, तिचे दोन्ही स्क्रू काढून, चार तुकडे वेगळे करून ठेवावे." म्हणजे ती वस्तू काय आहे, हे कुणाला कळू नये. क्लाँझला ती वस्तू सापडलीच नाही. ही वस्तू म्हणजे टाइप पाडण्याचा साचा असावा, असा अंदाज करण्यात आला आहे. गुटेनबेर्ग स्ट्रासबुर्ग शहरामध्ये १२ मार्च १४४४-पर्यंत असल्याचा दाखला तेथील टॅक्स रजिस्टरमध्ये उपलब्ध आहे. तो ऑक्टोबर १४४८-मध्ये मैंझ शहरामध्ये अवतीर्ण झाला. या मधल्या चार वर्षांच्या काळामध्ये तो काय करीत होता, याची माहिती उपलब्ध नाही. अंदाज असा आहे की, प्राग शहरामध्ये राहत असलेल्या प्रकोपियस वाल्डफोगेल नावाच्या सोनाराशी त्याचा संबंध असावा. इ. स. १४४४ ते १४४६ या काळात वाल्डफोगेल 'कृत्रिम लेखना'विषयी काही गुप्त प्रयोग करीत होता, अशी माहिती सापडते.[1]

बेचाळीस ओळींचे बायबल : पहिले मुद्राक्षरित पुस्तक

४. इ. स. १४४९-मध्ये जॉन फूस्ट नावाच्या एका वकिलाकडून गुटेनबेर्गने आठशे गिल्डर्स कर्ज मिळवले. काही वर्षांनंतर जास्त कर्ज द्यावे, अशी त्याने फूस्टकडे मागणी केली असता फूस्टने अट घातली की, 'भागीदारी कबूल करावी, म्हणजे कर्जाऐवजी भांडवलाचा हिस्सा म्हणून आठशे गिल्डर्स द्यावयास मी तयार आहे.' ही भागीदारी 'ग्रंथमुद्रणा'च्या बाबतीमध्ये ('work of the books') होती, असे संबंधित दाव्याच्या कागदपत्रांवरून दिसून येते. इ. स. १४५५-मध्ये फूस्टने गुटेनबेर्गवर कर्जाचे आणि गुंतविलेल्या भांडवलाचे

1. *Johann Gutenberg* : by Scholderer, Victor. The British Museum, London, 1963.

पैसे परत करण्याबाबत दावा केला. पैसे परत करणे अशक्य झाल्यामुळे गुटेनबेर्गला सर्व सामग्रीनिशी आपला छापखाना फ्रूस्टच्या हवाली करणे भाग पडले. याच्या दरम्यान सुप्रसिद्ध '*बेचाळीस ओळींचे बायबल*' प्रसिद्ध झालेले असावे. 'मॅझूरिन बायबल' म्हणून प्रसिद्ध असलेली याची प्रत मैंझच्या एका चर्चमधील व्हिकारने जातीने अलंकृत केली आहे. ती आता पॅरिसच्या ग्रंथसंग्रहालयामध्ये उपलब्ध आहे; दुसरी प्रत मैंझ येथील गुटेनबेर्ग वस्तुसंग्रहालयात माझ्या पाहण्यात आली. पॅरिसमधील प्रतीवर काही हस्तलिखित मजकूर असून त्यावरून या पुस्तकाची बांधणी २४ ऑगस्ट १४५६ रोजी पुरी झाली, असे दिसून येते. हा ग्रंथ दोन खंडांमध्ये प्रसिद्ध झाला असून पहिला खंड ३२४ पृष्ठांचा आणि दुसरा खंड ३१८ पृष्ठांचा आहे.

५. गुटेनबेर्गच्या छापखान्याचा फोरमन पीटर शॉफर हा उत्तम लेखनकार होता. त्याने फ्रूस्टच्या मुलीबरोबर लग्न केले. शॉफरने फ्रूस्टला मुद्रणामध्ये मदत केली, असे त्या दोघांनी छापलेल्या पुस्तकातील इम्प्रिण्टवरून दिसून येते. इ. स. १४५७-मध्ये Latin Psalter छापण्यात आले. त्यावर १४ ऑगस्ट १४५७ अशी तारीख घातलेली आहे. युरोपमध्ये छापलेल्या पुस्तकांतील तारीख असलेले असे ते पहिलेच पुस्तक होय. '*लॅटिन शब्दकोश आणि विश्वकोश*' जॉन बाल्बस याने १४६०-मध्ये प्रसिद्ध केला. त्याची ३७३ पृष्ठे आहेत. या पुस्तकामध्ये खालील आशयाचा मजकूर आढळतो :


> " Under the guidance of the Most High, at whose nod the tongues of infants become eloquent and who often reveals to the simple what he conceals from the wise. "

यामध्ये उल्लेखिलेला Most High म्हणजेच योहान्न गुटेनबेर्ग असावा, असे सुचविण्यात आलेले आहे. मैंझ शहरामधून १४६२-मध्ये गुटेनबेर्गची हकालपट्टी झाली. जानेवारी १४६५-मध्ये त्याचा मैंझमध्ये पुन्हा प्रवेश झाला. त्यानंतर तीन वर्षांनी ३ फेब्रुवारी १४६८ रोजी मुद्रणकलेच्या ह्या संशोधकाचे निधन झाले.

सुट्या मुद्राक्षरांचा शोध : अन्य वाटेकरी

६. *बेचाळीस ओळींचे बायबल* एकूण सहा मुद्रणयंत्रांवर छापण्यात आले. इ. स. १४५४–५५-च्या सुमारास आणखी एक छापखाना स्थापण्यात आल्याचा पुरावा सापडला आहे. त्यात लॅटिन व जर्मन ह्या दोन भाषांमध्ये मुद्रण होत असे. गुटेनबेर्गने मुद्रणाचा शोध लाविला, असे जरी आज सर्वत्र म्हटले जात असले, तरी हॉलंडमधील हार्लेम शहरातील लॉरेन्स कास्टर नावाच्या एका कारागिराने १४४०-मध्येच लाकडी ठोकळ्यांवरून मुद्रणास सुरुवात केल्याचा पुरावा सापडला आहे. त्याने लाकडाच्या ठोकळ्यांऐवजी धातूची मुद्राक्षरे तयार करून त्यांवरून पुस्तक छापण्यास सुरुवात केली होती, आणि त्या पुस्तकाच्या प्रती प्रसिद्ध केल्या होत्या, असे म्हणतात. कास्टरचे हार्लेम येथे स्मारक आहे.

७. गुटेनबेर्गने मुद्राक्षरे पाडण्याचे साचे बनविले होते, हे निश्चित. बिजागरीवर उघडणारा पोलादी साचा त्याने बनविला होता. या साच्याच्या मुळाशी मातृका पकडण्याची सोय असून




आकृती १ : रोम येथे १७४३ ते १७६२ ह्या दरम्यान तयार करण्यात आलेल्या देवनागरी मुद्राक्षरांचा नमुना

त्या मातृकेपर्यंत वितळलेली धातू पोहोचत असे; आणि तीपासून मुद्राक्षरे बनत. मातृका तयार करण्यासाठी पोलादाचे मुद्र बनवीत. ते उभट कोरलेले असत. साच्यामध्ये मातृका पकडल्यानंतर साचा बंद करावयाचा; म्हणजे त्याची एक लहानशी बिनझाकणाची पेटी बने. तीमध्ये हातांनी प्रवाही धातू ओतावयाची असे. काही क्षणांतच ती धातू घट्ट होई, आणि मुद्राक्षर तयार होई. साचा उघडल्याबरोबर मुद्राक्षर बाहेर पडे. त्याच्यामागे आलेला धातूचा तुकडा तोडून ते स्वच्छ केले, म्हणजे मुद्राक्षर सिद्ध होई.

युरोपखंडात मुद्रणकलेचा प्रसार आणि देवनागरी मुद्रण

८. स्वीनहाम आणि पानार्ट्झ या दोन भिक्षूंनी रोमजवळ १४६५-मध्ये रोमन लिपीत व लॅटिन भाषेत मुद्रणास सुरुवात केली. व्हेनिस येथे निकोलस येन्सन (१४००-१४८१) आणि आल्डस मान्युशियस (१४५०-१५१५) यांनी अक्षरमुद्रणाचा भक्कम पाया घातला. आल्डसने १५०१-मध्ये इटालियन टाइपास जन्म दिला. मुद्राक्षरे एकापुढे एक जोडावयाची असल्यामुळे इटॅलिक वळण पुरेसे तिरके ठेवणे कठीण होई. म्हणून युताक्षरे पाडण्याची कल्पना निघाली. पहिल्या इटॅलिक संचात तेव्हा अडुसष्ट युताक्षरे होती. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात या प्रकारच्या इटॅलिक टाइपात संपूर्ण पुस्तके छापिली जात असत. याच काळात प्रसिद्धीस आलेला पॅरिसच्या क्लोद गारेमाँ याने रोमन आणि इटॅलिक टाइपांचा एकत्र वापर प्रचारात आणिला. रोबेर ग्रान्जोन हा पॅरिसचा प्रसिद्ध पंचीगार १५७८-मध्ये पोप ग्रेगरी तेरावा याच्या निमंत्रणावरून रोमला गेला. तेथे त्याने अनेक 'ओरिएण्टल टाइप' तयार केले, असा उल्लेख सापडतो. त्यांत देवनागरी टाइप होते किंवा कसे, ते आज माहीत नाही. ग्रान्जोनचा समकालीन प्लाँते याने फ्रान्समध्ये अनेक ग्रंथ छापले. त्यांतील Polyglot Bible (१५६८-७२) हे पुस्तक मुद्राक्षरकलेचा उत्तम नमुना म्हणून प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकात ख्रिस्तोफर व्हॅन डाइक, या डच पंचीगाराने गारेमाँच्या व ग्रान्जोनच्या रोमन टाइपावरून सुंदर मुद्राक्षरे पाडली. अठराव्या शतकाच्या सुरुवातीस (१७२०) पूर्व-जर्मनीत लायप्त्सिग येथील एरहार्ड टाइप फौंड्रीमध्ये उत्तमोत्तम टाइप पाडले जात. याच काळात फोर्नियर (१७१२-६८) आणि बोदोनी (१७४०-१८१३) यांनी, आज ज्याला आपण 'मॉडर्न रोमन' टाइप म्हणतो, ते प्रचारात आणिले. तत्पूर्वी इंग्लंडमध्ये विल्यम कॅस्लॉनने १७२० ते १७२६ या काळात 'ओल्ड फेस' टाइप पाडला आणि बास्करव्हीलने 'ट्रॅन्झिशनल' म्हणून ओळखिला जाणारा एकमेव रोमन टाइप १७६१-मध्ये प्रचारात आणिला. वर उल्लेखिलेला गैम बाप्तिस्ता बोदोनी याने देवनागरी टाइप पाडला होता. त्याचा नमुना तत्कालीन मुद्राक्षरांच्या कॅटॅलॉगमध्ये पहावयास मिळतो. १७४३-साली रोम येथे छापलेल्या Davidis Millii Dissertatioaes या पुस्तकात देवनागरी अक्षरे छापिलेली आहेत. ती ताम्रपट-मुद्रण-पद्धतीने मुद्रित केलेली आहेत.


146

Symbolum Fidei.

Ego credo unum Deum
हम मानतेहे ऐक परमे
Ham mantahe ek Parme-

Patrem in omnipotentem,
स्वर बाप पर सब सक्ता:
ſuor Bap par ſabh Saktà,

Caeli, & Terrae
अस्मान और जमीन का
Aſmam avor Giamin Ka

Creatorem. Et excelſum
पेदा करनेवाला : और स्री
peeda Karnevalà. Aor ſri

Je-

आकृती २ : 'आलफाबेटम् ब्राम्हनिकम्'मधील एक पान, रोम, १७७१

रोममधील देवनागरी मुद्रण

९. *हिंदी खडी बोलीचे व्याकरण* हे लॅटिनमधील देवनागरी टाइप असलेले पहिले उपलब्ध पुस्तक. ते रोममध्ये १७७१-मध्ये छापिले आहे. त्याची फोटोस्टाट प्रत प्रस्तुत लेखकाच्या संग्रही आहे. यात वापरलेला टाइप १७४३-नंतर काही काळाने रोममध्ये तयार करण्यात आला. त्याचे वळण दाखविण्याचे काम ज्या चार हिंदी विद्यार्थ्यांनी केले, ते पोपच्या परवानगीने रोमला धार्मिक शिक्षणासाठी गेले होते. हे जे टाइप तयार करण्यात आले, ते नंतरच्या काळात दुर्लक्षित राहिले. कॅसियन वेलिगॅटस् माकेराटेन्सीस (Maceratensis) हे हिन्दुस्थानातील मिशनरी कार्यात बरीच वर्षे भाग घेतलेले पाद्री रोमला परतले, तेव्हा देवनागरी मुद्रणास चालना मिळाली. रोम येथील धार्मिक पुस्तके छापणाऱ्या प्रेसचे कॉन्स्टण्टाईन रुगेरियस (Constantine Ruggerius) हे मॅनेजर होते. त्यांनी पूर्वी तयार केलेले टाइप शोधून काढिले; कमी पडत असलेली अक्षरे नवी बनविली. अशा रितीने तयार झालेल्या फाउंटचा उपयोग ऑगस्टाइन अॅन्थोनी जॉर्ज यांच्या ***तिबेटन ग्रामर***मध्ये केला. हा ग्रंथ वरील छापखान्यातून १७६२-मध्ये बाहेर पडला.[२] इ. स. १७७१-मध्ये प्रसिद्ध झालेल्या **आल्फाबेटम्**-मध्ये काही टाइप कमी पडत होते, ते तयार करण्यासाठी निवृत्त होऊन विश्रांतीत काळ काढीत असलेल्या कॅसियनला पुन्हा बोलावून घेण्यात आले होते.

१०. कॅसियनचा देवनागरी लिपीचा चांगला अभ्यास होता. त्याच्या ह्या अभ्यासाची माहिती Amadutiusने वरील पुस्तकास लिहिलेल्या आपल्या लॅटिन भाषेतील प्रस्तावनेत दिलेली आहे.[३] दरम्यान John F. Fritz याने 'शंभर निरनिराळ्या भाषांच्या वर्णमाला आणि वेगवेगळ्या लिप्यांतील आणि भाषांतील प्रार्थनांचे दोनशे नमुने' संपादिले. या कामात त्याला Benjamin Scultuzius याने साहाय्य केले होते. हा ग्रंथ १७४८-मध्ये लायप्सिग येथील G. F. Rumffus Press-मध्ये मुद्रित झाला. त्यात मराठी, नागरी, बालबंधू, देवनगरम् इत्यादी लिप्यांचा समावेश होता. चेंबर लेनियसच्या Course of Dominican Prayers-मध्ये बालबंधूचा उपयोग केलेला आहे. सेंट पीटर्सबर्ग येथील 'शास्त्रीय अॅकॅडेमी'च्या प्रकाशनात या लिपीचा नमुना सापडतो.[४] हे नमुने Theophilus Sigefridus Bayerius यांनी लिहिलेल्या Elements of Brahmanic nanguta- and Mougol Litterature या पुस्तकात देवनागरी आणि नागरी लिपीबद्दल माहिती दिलेली आहे. "ब्राह्मण, त्यांची शास्त्रीय पुस्तके कशी सजवीत," त्याचे नमुने दिले आहेत.

2. *Alphabetum Brammhanicum, seu Indostanum, Universitatis Kasi*: Rome, 1771. Preface.
3. Naik, B. S. : *Typography of Devanagari*, Bombay, 1971, pp. 239–240.
4. *The Commentaries of the Imperial Academy of Sciences of St. Petersburg*, Vol. IV. (1729),pp. 389.

Começa o alegre-
TE E MANVAL DE DO
ctrina christãa, necessário aos
que se querem saluar
& aproueitar.

Cap.1. que trata do estado do peccado mortal, e suas condições.



ui vult ueni re post me, abneget se metipsũ, tollat crucem suã, & sequatur me. Luce cap. nono.
O q̃ quer vir apos mim, negue a si mesmo, tome sua cruz, e siga me.
¶ Estas palauras, filho charissimo preegou a mesma verdade Christo IESV nosso senhor a todo o pouo, como a todos necessarias: porq̃ nellas cõsiste toda a vida christãa. Da boca do senhor as tomei, e da

A v

आकृती ३ : हिन्दुस्थानात छापिलेले पहिले उपलब्ध पुस्तक 'कॉमेम्डिओ' गोवा, १५६१

अनुक्रमणिका

२


भारतीय मुद्रणाचा प्रारंभकाल

हिंदुस्थानातील मुद्रणाचा प्रारंभ

११. हिंदुस्थानात मुद्रणास सुरुवात झाली, ती १५५६-मध्ये. ख्रिस्ती धर्मविषयक वाङ्मय मुद्रित करण्यासाठी आबिसीनियातील धर्मोपदेशकांच्या खास मागणीवरून पोर्तुगालमधून एक छापखाना पाठविण्यात आला होता. तो घेऊन येणारे जहाज त्या वेळच्या प्रथेप्रमाणे प्रथम (६ सप्टेंबर १५५६) गोव्याच्या किनाऱ्यास लागले. तेथे तो छापखाना उतरविण्यात आला. तो का उतरविण्यात आला, माहीत नाही. परंतु अशा प्रकारे हिंदुस्थानातील पहिला छापखाना सुरू करण्याचा मान गोव्यास मिळाला. या जहाजात जे जेजुइट मिशनरी होते, त्यांत आबिसीनियात नेमणूक झालेले पात्रियार्क ज्युवांव नूनिस बाऱ्हेतु होते. त्यांजबरोबर तीन तरुण होते. त्यांपैकी एकाचे नाव होते ज्यूवांव द बुस्तामांती (१५३६–८८). तो मुद्रक होता. त्याच्या मदतीस एका हिंदी तरुणाची योजना केलेली होती. हा छापखाना गोव्यातच चालू करण्यात आला. तेथे छापण्यात आलेल्या मजकुरापैकी पहिले ज्ञात मुद्रित म्हणजे Conclusoes. ते चर्चच्या दारावर चिकटविण्यासाठी तयार केलेले पत्रक होते, असा प्रा. प्रिओळकरांचा निर्णय आहे.[१] कसेही असो, हे हिंदुस्थानातील पहिले मुद्रण याविषयी वाद नाही. हिंदुस्थानात मुद्रित झालेले पहिले मुद्रित पुस्तक म्हणजे १५५७-मध्ये याच छापखान्यातून बाहेर पडलेले ***दौत्रिन ख्रिस्तां*** (Doutrina Christaa) हे झेवियरचे पुस्तक. परंतु आज त्याची प्रत उपलब्ध नाही. पहिले उपलब्ध पुस्तक १५६१-मधले असून त्याचे नाव Compendio spiriual da Vida Christaa असे आहे. त्याची प्रत न्यूयॉर्क येथील सार्वजनिक वाचनालयात उपलब्ध आहे.

१. प्रिओळकर, प्रा. अनंत काकबा : "भारतातील मुद्रणकलेचा प्रवेश", *ग्रंथालय गौरवग्रंथ*, भाग पहिला, मुंबई, १९६४, पान ६.

अनुक्रमणिका



Esta leira, se fez, ẽ Goa: no ãno de lxxvii.

Letra Tamul: feita ẽ Coulã: ãno de lxxviii.

Soli DEO honor, & gloria. Amen.

आकृती ४ : हिन्दुस्थानात तयार झालेली आद्य मुद्राक्षरे, तमिळ ‘ दौत्रिन ख्रिस्तां ’, क्विलॉन, १५७८

अनुक्रमणिका

१२. बेचाळीस ओळींच्या बायबलनंतरच्या (१४५६) चाळीस वर्षांत युरोपमधील प्रमुख शहरांत मुद्रण होऊ लागले होते. परंतु रशियात मुद्रणाचा प्रवेश १५५३-पर्यंत झाला नव्हता. हिंदुस्थानात तो १५५६-मध्ये झाला. म्हणजे मुद्रणकलेच्या जन्मानंतर बरोबर शंभर वर्षांनी मुद्रणकलेचे हिंदुस्थानात आगमन झाले. असे असले, तरी एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत भारतीय भाषांत मुद्रणकलेची फारशी वाढ होऊ शकली नाही. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे एतद्देशीय भाषांमध्ये मुद्रण करण्यास आवश्यक अशी मुद्राक्षरे तयार करणे सोपे नव्हते हे. गोव्यात स्थापन झालेल्या मुद्रणालयामध्ये फादर स्टीफन्स याचे *ख्रिस्तपुराण*[६] हे मराठी भाषेतील पहिले मुद्रित पुस्तक १६१६-मध्ये प्रसिद्ध झाले. ते रोमन लिपीमध्ये छापिले होते. त्याची प्रत उपलब्ध नाही. इतकेच नव्हे, तर त्यानंतर छापलेल्या दोन आवृत्त्याही उपलब्ध नाहीत. फादर स्टीफन्सचे दुसरे पुस्तक *दौत्रिन क्रिस्तां* १६२२-मध्ये प्रसिद्ध झाले. ते गोव्यातील 'ब्राह्मणी बोली'त लिहिले आहे; पण रोमन लिपीत छापले आहे. सुदैवाने त्याची प्रत उपलब्ध आहे, आणि यथामूल आवृत्ती[७] १९४५-मध्ये निघालेली आहे. इ. स. १६५८–५९-मध्ये प्रसिद्ध झालेल्या *वनवाळ्याचो मळो*[८] या ग्रंथाचे पाच खंड आहेत. हाही ग्रंथ ब्राह्मणी बोलीत आणि रोमन लिपीत छापला. त्यावर "....जो जेजुचे सांगातिच्या पाद्री मिंगेलद आल्मैदान बामन भासेन घडुनु लीहुनु उदेगिलो....सोळासीं अठ्ठावन्नाव्या वरुसा लिहितमंडपी ठासिला" अशी इम्प्रिण्ट आहे.

ख्रिस्तपुराणाचे रोमन लिपीत मुद्रण


१३. *ख्रिस्तपुराण* मराठीमध्येच छापण्याची फादर स्टीफन्सची इच्छा होती. पण त्यासाठी लागणारी सुमारे ६०० मुद्राक्षरे तयार करण्याचे काम अतिशय कठीण असल्यामुळे त्याला हा ग्रंथ रोमन लिपीमध्येच मुद्रित करणे भाग पडले. तो म्हणतो :

> " Because it looked impossible to cast so many moulds amounting six hundred, whilst the characters are syllables and not alphabets as our twenty-four in Europe. "[९]

याच कारणामुळे मराठीच काय, परंतु संस्कृत, हिंदी, बंगाली, गुजराती, गुरुमुखी, असमी यांसारख्या देवनागरी आणि तत्सदृश लिप्या यांमधून लिहिल्या जाणाऱ्या भाषांतील मुद्रणास हिंदुस्थानात तेव्हा सुरुवातही झाली नाही. एतद्देशीय भाषांतील मुद्रणाचा अग्रमान तत्पूर्वीच तमिळ भाषेला मिळाला होता. 'Doctrina Christiana... en lingoa Tamul Portugues' या १५५४-मध्ये लिस्बनला छापिलेल्या पुस्तकात तमिळ मजकूर लॅटिन टाइपात

6. Thomas Estevao : *Discurso sobre a vinda de Jnsu Christo* Goa, 1616. See " A Tentative Check-list of Indo-Portuguese Imprints 1556-1674 " *Boletim do Instituto Vasco da Gama* Goa : No 73, 1956. p. 27.
7. Thomas, Estevao : *Doutrina Christam* Goa, *emlingoa Bramans Canarim* 1622. Facsimile edition by Dr Marteins Saldanha, Lisban, 1945. Ibid p. 27.
8. Meiguel de Almeida: *Jardim des Pastores*, 1658–59. Ibid p. 35.
9. Stephens, from Salsette Goa, in a letter dated December 5, 1608. Quoted by Priolkar in *Printing Press in India*, p. 14, see note 35 on the same page.

अनुक्रमणिका



स्वस्तिश्री शालिवाहन शाक १५९७ राक्षस संवत्सर चैत्र बहुळ १० को
चीराजपाटणीं बैसिके रंगभट्ट तथा विनायकपंडित आपभट्ट तीघे वैद्य
तानिं कोचिचा कुमदोर आड्रिकि फान्डे त्याचानिरोपानं ह्या मलबारदेशा
तु आतिले ओषधमात्र वृक्षवालि झाडरवडे ओळखते त्या मनुष्याळमु
सारो देशतु ते ते गांवांतु पेट्वून तिति वोरवट आणवून त्या त्या झाडांचे फ स
फूल पान बीज समस्त त्या त्या तुतुकाळावरि मपादून तिंती चितारिली त्या उप
रांत आम्हिं आमगेल्या वैद्यग्रंथाचानि चीटाप्रमाणीं त्या त्या ओषधाचे गुण
वाअनु मबान जो जो गुण आमकाकळेलो तो वात्या आरवदांची नाव पळेउनु
आजि दानि वर्षं सकाम्हि साजे आम्हिं लागिगावूनु द्वालिब्रुस पादून दिला तेल
टिक अशिरागुणुंचा कनज अशिरणु आम्हि आमचीतिसाणिकर्णुदिली
ते सत्यकाणु मानुवेजाइदरशणु नागरबरपानहृ बरवूनुदिली श्रीः

रंगभट

विनायकपंडित

आपु वी आप

HOC EST.

आकृती ५ : देवनागरीतील पहिले ज्ञात मुद्रण ' होर्टस इण्डिकस मलबारिकस ', आम्स्टरडाम, १६७८

अनुक्रमणिका

छापला होता.[१०] ज्युवांव गॉन्साल्व्हिस (जन्म १५२५) या स्पॅनिश कारागिराने गोव्यात (१५७७) आणि नंतर फारियाने क्विलॉनला (१५७८) तमिळ टाइप पाडले. हे हिंदुस्थानी लिपीतील पहिले टाइप होत. पेद्रु लुई नावाच्या एका धर्मांतरित तमिळ ब्राह्मणाला अक्षरांचे वळण समजावून देण्यासाठी मुद्दाम गोव्यास धाडले होते. याच्याच दरम्यान ज्युवांव फारिय हा पाद्री गॉन्साल्व्हिसकडे पंच तयार करण्याची कला शिकला. त्याने केरळप्रांती क्विलॉन येथे नवे तमिळ टाइप पाडले. १५७८-मध्ये क्विलॉनला मुद्रित झालेले *दौत्रिन क्रिस्तां* हे सोळापानी पुस्तक या दोन्ही टाइपांत छापिलेले आहे. हे चोपडे हिंदुस्थानातील देशी भाषेतील आणि लिपीतील पहिले मुद्रित पुस्तक होय. त्याच्या शेवटच्या पानावर दोन्ही टाइपांचे नमुने दिले आहेत. पुस्तकातील हा भाग म्हणजे हिंदुस्थानात मुद्रित झालेला टाइपांचा पहिला कॅटॅलॉग आहे.

१४. आम्स्टरडाम येथे १६७८-मध्ये मुद्रित झालेल्या Hortus Indicus Malabarlcus या पुस्तकात कोकणी बोलीत व देवनागरी लिपीत अकरा ओळी मजकूर ताम्रपट-मुद्रण-पद्धतीने छापिला आंहे. हा देवनागरी लिपीतील पहिला मुद्रित मजकूर. परंतु त्याचे मुद्रण हिंदुस्थानाबाहेर झाले आहे. देशी भाषांतून ख्रिस्ती धर्मवाङ्मय मुद्रित करावे आणि त्याचा येथे प्रसार करावा, असे धर्मोपदेशकांस वाटणे स्वाभाविक होते. परंतु राज्यकर्त्यांची दृष्टी वेगळी होती. त्याचा परिणाम होऊन १६८४-मध्ये पोर्तुगीजांनी एक ठराव केला. तदनुसार देशी भाषांच्या व्यवहारावर बंदी घातली गेली. अशा प्रकारे मराठीतून मुद्रण सुरू होण्याचा असा जो इष्ट संभव निर्माण झाला होता, तो मात्र लांबणीवर पडला.

तमिळ मुद्रणाची पद्धतशीर सुरुवात

१५. हिंदुस्थानात प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांचा प्रवेश अठराव्या शतकाच्या सुरुवातीस झाला. डेन्मार्कचा राजा चौथा फ्रेडरिक याचा धर्माधिकारी डॉ. ल्यूटकेन्स याने तंजावूरच्या राजाकडून त्रांक्वेबार येथे काही जमीन विकत घेतली; आणि धर्मप्रसारासाठी बार्थोलोमेव जियेजनबाल्ग आणि हेन्री प्लत्स्चाव यांना पाठविले. त्यांनी तमिळ भाषेचा अभ्यास सुरू केला; ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी वाङ्मय तयार केले. बायबलचे त्यांनी तमिळ भाषेत भाषांतर केले. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे त्याच्या हस्तलिखित प्रती करून प्रसारित करावयाच्या, तर त्यात कालापव्यय होतो आणि खर्चही फार होतो, म्हणून त्यांनी एका छापखान्याची मागणी केली.

> " A Malabarick and Portuguese Printing Press, you know, would be highly serviceable for the whole design ; the transcribing of books, being attended with almost insuperable difficulties. " (14-6-1709)"[११]

10. George Schurhammer and G. W. Cottrell, " The First Printing in Indic Characters " *Harvard Library Bulletin, Vol. VI No.* 2, Spring, 1952, foot-note 22, page 151.
11. *Propagation of the Gospel in the East* (third edition), London, 1718, Part I, p. 61-68.



आकृती ६ : त्रांक्वेबार येथे मुद्रित झालेले तमिल पुस्तक, १७१४

१६. या प्रयत्नाचा उपयोग होऊन १७११-मध्ये एक मुद्रण-यंत्र आणि टाइप घेऊन Jonas Finck हा इंग्लंडहून निघाला; परंतु तो वाटेतच मरण पावला. प्रेस १७१२-मध्ये त्रांक्वेबारला पोहोचला. डेनिश कंपनीतील खिळे जुळविण्याचे ज्ञान असलेल्या एका जर्मन माणसाच्या मदतीने हा छापखाना सुरू झाला. सुरुवातीस पोर्तुगीज भाषेत जर्मनीहून आणिलेल्या तमिळ टाइपात पुस्तके छापीत. 'The Abomination of Paganism, and the Way for the Pagans to be Saved' (१७१३) हे या छापखान्यात तमिळ लिपीत मुद्रित केलेले पहिले पुस्तक. नंतर तमिळ टाइप येथे नवीन तयार करण्यात आला. कागदाची टंचाई दूर करण्यासाठी कागदाचा कारखाना १७२६ साली सुरू करण्यात आला. या छापखान्यात छापिलेले 'The Four Evangelists and Acts of the Apostles' (१७१४) हे पुस्तक उपलब्ध आहे.

मुद्रणकलेच्या प्रसाराबाबत आमची अनास्था

१७. मुद्रणकलेच्या युरोपमधील प्रसाराच्या इतिहासावरून एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते. ती म्हणजे १४५०-पासून १७७५-पर्यंतचा सुमारे सव्वातीनशे वर्षांचा काळ उत्तमोत्तम मुद्राक्षरे पाडण्याचा काळ होता. या काळात युरोपमध्ये तेथील भाषांतच नव्हे, तर जगातील इतर भाषांतही मुद्रण झालेले आहे. ह्या काळात जर्मनीत आणि इटलीत तमिळ आणि देवनागरी लिपीची मुद्राक्षरे तयार झाली. प्रारंभकालातील ग्रंथमुद्रणाचा इतिहास हा मुद्रणालयांच्या विकासाचाच केवळ नव्हे, तर मुद्राक्षरनिर्मितीचाही इतिहास आहे. हिंदुस्थाना-मध्ये गोव्यास (१५५६) आणि दक्षिणेत क्विलॉन येथे (१५७८) रोमन आणि तमिळ लिपीत मुद्रणास सुरुवात झाली, तेव्हा खिस्ती मुद्रण धार्मिक वाङ्मयापुरते मर्यादित होते. युरोपमध्ये मुद्रणकलेची प्रगती होत असताना हिंदुस्थानात मात्र वरील दोन अपवाद वगळता तिचा मागमूसही दिसत नाही. या बाबतीतील आमच्या अनास्थेवर सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. वि. का. राजवाडे यांनी टीका केली आहे. कै. राजवाडे म्हणतात :

> " मराठ्यांच्या संस्कृतींत प्रथम व्यंग म्हटलें म्हणजे त्यांना छापण्याची कला माहीत नव्हती व ती माहीत करून घेण्याचा त्यांनीं कधीं प्रयत्नही केला नाहीं...
>
> " मुंबईतील परभू, शेणवाई, पारशी, भाटे व वाळकेश्वराचे छत्रे, भातखंडे वगैरे ब्राह्मण पुजारी व वैरागी इंग्लिश लोकांशीं हरहमेश दळणवळण ठेवीत. कित्येकांना चांगलें इंग्रजी लिहितां व बोलतां येत असे. त्यांनीं छापील पुस्तकें पाहिलीं होतीं, ह्यांत संशय नाहीं. नाना फडणिसांच्या दफ्तरांत छापील इंग्रजी नकाशे अद्यापहि आहेत. मोरोबादादाच्या घरच्या पुस्तकालयांत एक इंग्रजी चोपडी होती, असें त्यांच्या पुस्तकांच्या यादीवरून कळतें. असें असून म्हणजे युरोपांतील सर्व देशचे लोक त्यांच्या दारीं उभे असून, मराठ्यांनीं छापण्याची कला कशी घेतली नाहीं, ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यांत योग्य कल्पनांचें बीं पेरण्यास ह्या कलेचाच प्रवेश महाराष्ट्रांत झाला पाहिजे होता. घोरपडे, शिंदे, होळकर, भोसले, कोल्हापूरकर, सावंत, आंग्रे वगैरे सरदारांच्या पदरीं फिरंगी, फराशिस, इंग्रज वगैरे बरेच देशाचे लोक पेशवाई जाईतोंपर्यंत व पुढेंदेखील होते; असें असून ज्या अर्थी मराठ्यांनीं ही कला

उचलली नाहीं, त्या अर्थी त्यांच्या ग्राहकशक्तीच्या कीर्तीला बराच कमीपणा येतो हें निर्विवाद आहे."[१२]

१८. राजवाड्यांची ही टीका जरी बव्हंशी खरी असली, तरी मुद्रणकला येथे जोपासली नाही, त्याला आमची अनास्था इतकेच कारण नव्हते. तुरळक प्रयत्न झाले, परंतु ते फलद्रूप झाले नाहीत. कारण हिंदुस्थानात मुद्रणालयांची वाढ होण्यास मुद्राक्षर-निर्मितीची जी सुविधा निर्माण व्हावयास पाहिजे होती, ती झाली नाही, ही खरी अडचण होती. पुढे देवनागरी वा अन्य भाषा यांच्या मुद्रणास योग्य अशा लिप्यांची जी मुद्राक्षरे उपलब्ध झाली, ती इंग्लिश, डच, जर्मन आणि इटालियन मुद्रणतज्ज्ञांमुळे. प्रथम धार्मिक ग्रंथ छापण्यासाठी युरोपमध्ये मुद्रणकलेचा विकास झाला. आपल्याकडेही धार्मिक ग्रंथ छापण्यासाठी मुद्रणालये निघाली. पण ते ग्रंथ खिस्तधर्मीयांचे होते. त्यानंतरच आमचे लक्ष मुद्रणकलेकडे वळले.

मुंबई प्रांतातील मुद्रणकलेची सुरुवात

१९. एक गुजराती कपोल बनिया भिमजी पारेख यांनी 'ब्राह्मणी' ग्रंथांच्या (Ancient Braminy Writings) मुद्रणासाठी एक छापखाना स्थापन करण्याच्या बाबतीत १६७१ ते १६७६-च्या दरम्यान जो प्रयत्न केला होता, त्याची नोंद शिवकालीन पत्रव्यवहारात सापडते. त्यात ८ मार्च १६७६-च्या पत्रातील उल्लेख महत्त्वाचा आहे.

> "We should gladly hear that Bimgee's design about the printing do take effect, that it may be a means to propogate our religion whereby souls may be gained as well as Estates."[१३]

भिमजीच्या मनात गुजराती मुद्राक्षरे (Banian character) तयार करण्याचा विचार होता. त्याच्या छापखान्यात काम करावयास आलेल्या इंग्रजी तंत्रज्ञाला मुद्राक्षरे तयार करिता येत नव्हती. परंतु १६७४–७५-मध्ये सुरू झालेला उत्तर-कोकणातील हा पहिला छापखाना होता, ही गोष्ट स्पष्ट आहे.

२०. मुंबई शहरात इ. स. १७७९-मध्ये मुद्रण होत होते, असा स्पष्ट उल्लेख सापडतो. दोन रुपये किंमत असलेले '*कॅलेंडर फॉर द इयर ऑफ अवर लॉर्ड १७८०*' हे बत्तीस पानांचे पुस्तक मि. रुस्तुम यांनी मुद्रित केले होते. माडगावकर मुंबई-वर्णनात म्हणतात :

> "पुढें सन १७७७त रस्तमूजी केरसासजी या नांवाच्या पारशी गृहस्थानें मुंबईंत प्रथमच छापखाना आणिला. आणि इ. स. १७८०चें इंग्रजी पंचांग छापिलें."[१४]

१२. राजवाडे, वि. का. : *मराठ्यांच्या इतिहासाची साधने*, भाग १, पृ. १००.
13. *English Records on Shivaji*,
(Doc. 153), 9 January 1671, Vol. I. p. 187.
(Doc. 450), 3 April 1674, Vol. II. p. 327,
(Doc. 148), 8 March 1676, Vol. II. p. 83.
१४. माडगावकर, नारायण गोविंद : '*मुंबईचें वर्णन*,' मुंबई, १८६३, पृ. २४६.

अनुक्रमणिका


बॉम्बे हेरल्ड हे नियतकालिक १७८१-मध्ये सुरू झाले, असे *बॉम्बे सिटी गॅझेटियर*-मध्ये म्हटले आहे. परंतु त्याची प्रत किंवा इतर पुरावा श्री. प्रिओळकरांना शोध करूनही सापडला नाही. *बॉम्बे ग्याझेट* १७९०-मध्ये सुरू झाले. *बॉम्बे कूरियर* नियतकालिक यानंतर (१७९२) सुरू झाले. त्याची सुरुवात मि. विलियम आशबर्नर ह्यांनी सुमारे १७९२-मध्ये केली.[१५] त्याचे दुसऱ्या वर्षाचे अंक उपलब्ध आहेत. मुंबईत छापलेले "पहिले पुस्तक *रिमार्क्स् अँड ऑकरन्सेस् ऑफ मि. हेन्री बिचर* (१७९३) उपलब्ध आहे. परंतु त्यावर मुद्रणालयाचा उल्लेख नाही. कूरिअर प्रेसमध्ये जिजीभाई छापगार यांनी तयार केलेल्या गुजराती मुद्राक्षरांतील एक जाहिरात *कूरियर* १९ जानेवारी १७९७-च्या अंकात छापलेली आहे. जिजीभाई छापगारांच्या उत्तेजनाने फर्दुजी मर्झबान (१७८७–१८४७) या पारशी गृहस्थाने १८१२-मध्ये गुजराती छापखाना सुरू केला. या छापखान्यातून *दाबेस्थान* (१८१५), *खोर्दे अवेस्ता* (१८१७) ही पुस्तके छापून निघाली; आणि १ जुलै १८२२-पासून *मुंबई समाचार* हे साप्ताहिक निघू लागले.

नाना फडणविसांचा गीतामुद्रणाचा प्रयोग

२१. 'मराठ्यांना मुद्रणयंत्राचे महत्त्व कळले नाही हे आमचे दुर्दैव,' हे विधान वारंवार उगाळण्यात येते. कै. राजवाड्यांचे मत मी सांगितलेच आहे. नाना फडणविसाला एका इंग्रज गृहस्थाने एक घड्याळ आणि एक मुद्रित पुस्तक दिले होते, परंतु त्यालाही मुद्रणालयाची स्थापना करण्याचे सुचले नाही, असेही सांगण्यात येते. पण हेही तितकेसे खरे नाही. त्या काळात पुस्तकांचा, लिखित पुस्तकांचा प्रसार होता, तरी मुद्रित पुस्तकांचेही महत्त्व पटलेले होते, ही गोष्ट गीतामुद्रणाचा उद्योग खुद्द नाना फडणविसांनीच केला होता, यावरून सिद्ध व्हावी. रा. ब. पारसनीस लिहितात :[१६]

> "पुण्याचे सुप्रसिद्ध नाना फडणवीस हे राजकारणकुशल होते, हें इतिहासांत प्रसिद्धच आहे. तथापि ते विद्या, कलाकौशल्य, कृषि इत्यादि गोष्टींकडेही लक्ष घालीत असत, असें अस्सल कागदपत्रांवरून दिसून येतें. त्यांनी त्या वेळचे पुण्याचे रेसिडेंट सर चार्लस म्यालेट ह्यांच्या सहानुभूतीनें पुणें येथें एक चित्रशाळा व शिल्पशाळा काढिली होती. ह्या शाळेत शिकून तयार झालेल्या एका तांबट विद्यार्थ्याकडून त्यांनीं मराठी अक्षरांचे खिळे तयार करवून एक गीताग्रंथ छापण्याची कल्पना प्रथम मनात आणिली. त्या वेळीं भगवद्गीता हा ग्रंथ सुंदर अक्षरांनीं लिहून तो ब्राह्मणांस वाटण्याचा फार परिपाठ होता. नाना फडणविसांनीं असे सुंदर रीतीनें लिहिलेले गीताग्रंथ जयपूर, काशी, मथुरा वगैरे ठिकाणांहून मुद्दाम आणविले होते. हे ग्रंथ इंग्रजी छापील पुस्तकाप्रमाणें अक्षरांचे ठसे तयार करून मुद्रित केले, तर फार चांगला उपयोग होईल, असे समजून त्यांनीं कुशल कारागिरांकडून मराठी अक्षरांचे ठसे करविण्याचा

१५. आचार्य, बाळकृष्ण बापू, आणि शिंगणे, मोरो विनायक : '*मुंबईचा वृत्तांत*', १८८९, पृ. २६९.
१६. पारसनीस, द. ब. : 'मराठी मुद्रणकलेचा संशोधक कोण ?' *नवयुग*, खंड २, अंक ८, जून १९१५, मुंबई, पृ. ५६९-७०.



श्रीभगवानुवाच ऊर्ध्वमूलमधःशाख
मश्वत्थंप्राहुरव्ययं छंदांसियस्यपर्णानि
यस्तंवेदसवेदवित् १ अधश्चोर्ध्वंप्रसृ
तास्तस्यशाखागुणप्रवृद्धाविषयप्रवा १३२
लाः अधश्चमूलान्यनुसंततानिकर्मानु

बंधीनिमनुष्यलोके २ नरूपमस्येह
तथोपलभ्यतेनांतोनचादिर्नचसंप्रतिष्ठा
अश्वत्थमेनंसुविरूढमूलमसंगशस्त्रे
णदृढेनछित्वा ३ ततःपदंतत्परिमार्गि
तव्यंयस्मिन्गतानानिवर्तंतिभूयः तमे

आकृती ७ : नाना फडणविसांनी योजिलेल्या गीतामुद्रणाची दोन पाने, १८०५

अनुक्रमणिका


प्रथम प्रयत्न पुणें येथेंच केला. तांब्याचे एका आकाराचे व एका मापाचे पत्रे घेऊन त्यांचे प्रथम वेगवेगळे 'ब्लॉक्स्' (Blocks) तयार करविले, व त्यांवर गीताश्लोकांचें प्रत्येक अक्षर तांब्याच्या तुकड्यांचें उलटें तयार करून ते रुप्याच्या डांकांत जडण्याची योजना केली. तांब्याचीं एका नमुन्याचीं वळणदार उलटीं अक्षरें काढून, कोरून, तीं पुनः रुप्याच्या डांकांमध्यें जडणें हें फार परिश्रमाचें व अवघड काम होतें. तें पूर्णपणें सिद्धीस नेण्यास मुबलक वेळ व पैसा खर्च करावा लागला असता. नाना फडणविसांनीं तितकें करूनही संपूर्ण गीताग्रंथाचे ठसे तयार करून तो पुण्यपत्तनींच मुद्रित केला असता; परंतु इ. स. १७९६-मध्यें दुसरे रावबाजी गादीवर आल्यामुळें पुण्यास अस्वस्थता उत्पन्न होऊन नाना फडणविसांस विपरीत काल प्राप्त झाला. त्यामुळें त्यांनीं योजिलेले सर्व मनोरथ जागच्या जागींच राहिले. आणि, पुण्याचे कुशल कारागीर पुणें सोडून देशांतरावर निघून गेले. त्या वेळी हा गीतामुद्रा तयार करणारा कारागीर पुण्याहून मिरज येथें निघून गेला. तेथें त्या वेळीं श्रीमंत गंगाधरराव गोविंद हे संस्थानचे अधिपति असून ते मोठे रसिक व गुणग्राही होते. त्यांनीं ह्या नाना फडणविसांच्या मुद्राकारास आपल्या पदरीं आश्रय दिला; व त्यानें तयार केलेले गीतामुद्रांचे नमुने पाहून, त्याजकडून संपूर्ण गीताग्रंथाच्या मुद्रा तयार करून घेतल्या; आणि त्या तांब्याच्या ब्लॉकवर लाकडी दाबाने लाखी शाईमध्यें छापून पहिला छापील ग्रंथ महाराष्ट्रामध्ये इ. स. १८०५ सालीं निर्माण केला. तांब्याचीं उलटीं अक्षरें जडून तयार केलेले ह्या गीताग्रंथाचे अस्सल ठसे व त्यांवर छापून काढलेली गीतेची पोथी, यंदाच्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, श्रीमंत सर गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन, मिरज संस्थानचे अधिपति, ह्यांच्या संग्रहीं आहे, हें एकून सर्वांस अत्यंत कौतुक व अभिमान वाटल्यावांचून राहणार नाहीं. ह्या गीतेचे अस्सल ठसे व छापील पोथी श्रीमंत सर गंगाधरराव ह्यांनीं मजला दाखविली आहे. तिच्या शेवटच्या पृष्ठावर पुढील उल्लेख केलेला आढळतो :

शके १७२७ क्रोधन्नाम संवत्सरे
।। मार्कंडेयमुनिक्षेत्रे पटवर्धनसंज्ञिकः ।।
।। निगमागमधर्मज्ञः श्रीगोविंदतनूद्भवः ।।
।। विदुषामंतरायासं गीतापुस्तकसिद्धये ।।
।। कृत्वान्मुद्रिकां दिव्यां कृतो गंगाधरो मुदा ।।
।। तज्जन्यं पुस्तकं यत्तत् द्विजेभ्यो दत्तवान् असौ ।।

तांब्याच्या पत्र्यावर कोरलेली अक्षरे सांधून ज्यांवर बसविलेली आहेत, असे हे ठोकळे (३५०) सापडले आहेत. त्यांवरून छापलेली गीतेची प्रतही (रघुनाथशास्त्री पाटणकर, राजापूर, संस्कृत पाठशाळा, जिल्हा रत्नागिरी, यांच्या संग्रही) उपलब्ध आहे; आणि तांब्याचे ठोकळे आता भारत-इतिहास-संशोधक-मंडळात आहेत.

Since we have ſo far juſtified the claſſing of words under this or that gender, let us now aſcertain the formation of feminines from maſculines, or both, from the generic noun, by the addition, tranſpoſition, or changing of letters, in order more effectually to diſtinguiſh one ſex from the other; for which purpoſe the Fifth and ſubſequent Rules will be found uſeful.

RULE V.



FREE TRANSLATION.

All night I bore upon my heaving breaſt,
Of ev'ry ſweet, and ev'ry charm poſſeſt,
Nor quitted 'till the morn began to breathe —
" Whom? your beloved?" No—A flow'ry wreathe.

SAHID.

N. B.

For	PAGES.	Read
gh,een,	5 & 6,	gueeñ
cholee,ñn,	5 & 6,	cholee,añ.
j,holee,an,	5 & 6,	j,holee,an.
men,	5 & 6,	men
dea,	12,	idea.
joun, in the oblique,	7,	joun.
bans,	31,	ba ñs.
banh,	31,	ba ñh.
perhaps even do,	33,	perhaps even they.
each they their,	33,	each their.
multiplied,	34,	added.
ſatire or	36,	ſatirical.

And in page 34 the ſcholar muſt be guided to the numerical powers of each letter, by the Ubjud in Perſian, that, in the Engliſh characters not having the letters exactly parallel with their correſponding figures. The Authour's diſtance from the preſs will account for ſuch trifling inaccuracies as the above; and he thinks the beſt apology is at once to correct them.

O

आकृती ८ : हिन्दुस्थानातील देवनागरी मुद्राक्षरांचा पहिला उपयोग

३

मुद्रणकलेची पूर्वकिनाऱ्यावरील प्रगती

सर विल्यम जोन्स

२२. सर विल्यम जोन्स (१७४६-९४) हे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून १७८३-मध्ये हिंदुस्थानात आले. पुढच्याच वर्षी त्यांनी एशियाटिक सोसायटीची स्थापना केली, आणि तीन वर्षांत संस्कृत भाषेवर संभाषण करण्याइतके प्रभुत्व मिळविले. हिंदुस्थानात पौरस्त्य ज्ञानाच्या अभ्यासाला जोन्सने फार मोठी चालना दिली. त्यांनी आपल्या 'Orthography of Asiatic Words in Roman Letters'[१७] या लेखात देवनागरी वर्णमाला दिलेली आहे. सुरुवातीच्या काळात तयार करण्यात आलेली देवनागरी मुद्राक्षरे या वर्णमालेतील अक्षरांच्या वळणावर आधारित आहेत, असे दिसते. इ. स. १७९६-मध्ये कलकत्त्याच्या क्रॉनिकल प्रेस-मध्ये छापलेल्या गिलख्रिस्टच्या व्याकरणात[१८] ग्रेट प्रायमर आकारातील देवनागरी टाइप वापरलेले आहेत.

२३. हिंदुस्थानात बंगाली लिपीमध्ये देवनागरीपूर्वीच छपाई झाली होती, त्याचा उल्लेख पुढे येईल. पॅरिसमध्ये मुद्रित झालेल्या (१६९२) एका पुस्तकात[१९] बंगाली वर्णमाला दिलेली आहे. जोसेफ जॅक्सनने बंगाली टाइप फाउंट तयार केला होता, अशी १७७३-मध्ये नोंद केलेली आहे. नंतर जॅक्सनने कॅप्टन विल्यम कर्कपॅट्रिकच्या देखरेखीने देवनागरी टाइप तयार केले होते. कर्कपॅट्रिकचे हिंदी भाषेचे व्याकरण आणि कोश प्रसिद्ध आहे.[२०] पूर्णतया बंगालीत छापिलेले पहिले पुस्तक म्हणजे 'इम्पे कोड'चे भाषांतर. सर इलायजा इम्पे

17. Jones, Sir William : *Asiatik Researches*, pp. 1 to 56.
18. Gilchrist, John : *Grammar of the Hindustanee Language*, 1796.
19. *Observations physiques des mathematiques pour servir a l'histoire naturelle*, Paris, 1692.
20. Kirkpatrik, Captain William : *Grammar and Dictionary of Hindi Langugage*, 1743.

Sanſkṛita. Indeed moſt of the alphabets, properly Indian, agree, in the number, order, and power of their letters, with the *Dēva-nāgari*, the one preferred for this work, becauſe it is that in which *Sanſkrita* is moſt commonly written, and which is the moſt elegant and approved.

ALL languages of the *Hindu* claſs are read from left to right.

LEARNERS are firſt taught to repeat the *Dēva-nāgari* alphabet according to the following very admirable arrangement.

THE ALPHABET.

अ *a*, आ *ā*; इ *i*, ई *ī*; उ *u*, ऊ *ū*; ऋ *ri*, ॠ *rī*; ऌ *ḷri*, ॡ *ḷrī*.
ए *ē*, ऐ *ai*; ओ *ō*, औ *au*; ं *am*, ः *ah*.

क *ka*,	ख *kha*;	ग *ga*,	घ *gha*;	ङ *nga*.
च *cha*,	छ *ch'ha*;	ज *ja*,	झ *jha*;	ञ *ñya*.
ट *ṭa*,	ठ *ṭha*;	ड *ḍa*,	ढ *ḍha*;	ण *ṇa*.
त *ta*,	थ *tha*;	द *da*,	ध *dha*;	न *na*.
प *pa*,	फ *pha*;	ब *ba*,	भ *bha*;	म *ma*.
य *ya*,	र *ra*,	ल *la*,	व *va*.	
श *ṣa*,	ष *ſha*,	स *ſa*,	ह *ha*.	क्ष *kſha*.

Read *a*, *ā*; *i*, *ī*; *u*, *ū*; *&c.* *ka*, *kha*; *ga*, *gha*; *&c.*

IN ſpeaking of the letters individually, it is the practice to uſe the term कारः *kārah* (make, form) after each of their names as here exhibited: Thus, the vowel अ *a* is called अकारः *a-kārah*, and the conſonant क *ka*, ककारः *ka-kārah*.

THERE appear no leſs than fifty letters in the above alphabet; but upon examining their powers, without too cloſe a ſcrutiny, the number of ſimple

आकृती ९ : विल्किन्सने तयार केलेली देवनागरी मुद्राक्षरे, 'संस्कृत ग्रामर', लंडन, १८०८

यांनी नंदकुमार-खटल्यासाठी तयार केलेल्या मूळ इंग्रजी पुस्तकाचे[२१] जोनॅथन डंकनने बंगालीत भाषांतर केले, ते १७८५-मध्ये प्रसिद्ध झाले. अप्जॉन यांचे 'बंगाली व्होकाब्यूलरी'[२२] हे पुस्तक १७९३-मध्ये कलकत्त्यास क्रॉनिकल प्रेसमध्ये छापले. त्यात बंगाली शब्दांसाठी सुटी मुद्राक्षरे वापरली आहेत.

सर चार्ल्स विल्किन्स यांची कामगिरी


२४. बंगाल्यात सर चार्ल्स विल्किन्स् (१७४९-१८३६) यांनी तयार केलेल्या बंगाली मुद्राक्षरांचा उपयोग हॉल्हेडच्या बंगाली व्याकरणात करण्यात आला होता. नॅथानियेल ब्रासे हाल्हेड (१७५१-१८३०) हा कंपनी सरकारात मुलकी अधिकारी होता. त्याने सर विल्यम जोन्सच्या सांगण्यावरून पौरस्त्य भाषांचा अभ्यास केला. गव्हर्नर-जनरल वॉरन हेस्टिंग्ज याच्या आज्ञेनुसार त्याने पर्शियनवरून Gentoo Code भाषांतरित केले. त्याचे *बंगाली व्याकरण*[२३] १७७८-मध्ये हुगळीला मुद्रित झाले. हे बंगालीमधील सुट्या मुद्राक्षरांनी छापलेले पहिले संपूर्ण पुस्तक होय, आणि हुगळीचा अँड्रूजचा प्रेस हे बंगालमधील पहिले मुद्रणालय. सर विल्यम जोन्सचा चरित्रकार सर विल्किन्सूबाबत म्हणतो :

> " Charles Wilkins, Esqr., the first Englishman who acquired a critical knowledge of the language of the Brahmins, and who, by the application of rare talents and industry, by his own personal exertions, invented and cast types of the Debnagree, Persic and Bengalese characters in such a perfection, that no succeeding attempts have exhibited an improvement upon his labours. "[२४]

हाल्हेड आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेत म्हणतो :

> " The advice and even the solicitations of the Governor-General prevailed upon Mr. Wilkins, a gentleman who has been some years in the India Company's Civil Service in Bengal, to undertake a set of Bengal types. He did and his success has exceeded every expection. In a country so remote from all connection with European artists, he has been obliged to charge himself with all the various occupations of the Metallurgist, the Engraver, the Founder and the Printer. To the merit of invention he was compelled to add application of personal labour . . . . . and has thus singly on the first effort exhibited his work in a state of perfection

21. Empey, Sir Eliza : *Regulation for the Administration of Justice in the Court of Dewanee Adaulat*, Calcutta 1785.
22. Upjohn, A. : *Ingarji o Bengali Vokebulari*, Calcutta, 1793.
23. Halhed, Nathaniel Brassey: *Bodhaprakasam, Grammar of the Bengali Language*, Hooghly, 1778.
24. Lord Teigumonth : *Memories of the Life, Writing and Correspondence of Sir William Jones*, London, 1807, p. 301.



काहणी ।१॥ लांडगा आणि येडका यांची

एक्यापर्वतावरूनएकनिर्मलपाण्याचाओ
हळयेतहोतातेथेंयेक्याउष्णकालींएकदि
वसींएकलांडगावएकयेडकाउभयतांही
एक्याचमुहूर्तींपाणीप्यावयासआलेलांड
गाउन्नतप्रदेशींउभाराहिलाहोतावयेड
काखालपटप्रदेशींकाहींदूरअंतरानेउभा
होतालांडग्याचेमनींकोण्याप्रकारेंहीयेड
क्यासींदाटवलेंभांडणेंकरावयाचेंहोतेंतद
नुसारयेडक्यासविचारूंलागलाजेंअरेयेड
क्यानिर्मलआहेतेंपाणीडहुळूनमळाप्याव

आकृती १० : तंजावूर येथे मुद्रित झालेली 'बालबोध मुक्तावली', १८१०

which in every part of the world has appeared to require the united improvements of different projectors, and gradual polish of successive ages."[२५]

२५. विल्किन्स्‌ने देवनागरी मुद्राक्षरे तयार करण्यास सुरुवात केली होती; परंतु त्याचा प्रयत्न मध्येच खंडित झाला. याबाबत त्यानेच लिहून ठेविले आहे :

"I cut letters in steel, made matrices and moulds and cast from them a fount of types of the Devanagari characters all with my own hands . . . with the assistance of such mechanics as a country villager could afford. I very specially prepared all the other implements of printing in my own dwelling house; for the 2nd May of the same year, I had taken proofs of sixteen pages differing little from those now exhibited in the first two sheets till 2 o'clock. On that day everything had succeeded to my expectations, when alas ! the premises were discovered to be in flames, which spreading too rapidly to be extinguished, the whole building was presently burnt to the ground. Greatest part of the punches and matrices were saved but types were ruined."[२६]

शिल्लक राहिलेले पंच घेऊन विल्किन्स्‌ इंग्लंडला गेला. याप्रमाणे मुद्राक्षरांची निर्मिती जरी हिंदुस्थानात झाली होती, तरी त्या टाइपांत पहिले पुस्तक छापण्याचा मान मात्र हिंदुस्थानातील छापखान्यास मिळू शकला नाही. विल्किन्स्‌चे *संस्कृत ग्रामर* हे पुस्तक १८०८-मध्ये इंग्लंडमध्ये बलमर कंपनीने प्रसिद्ध केले.

तंजावूरच्या 'बालबोध मुक्तावली'चे मुद्रण

२६. विल्किन्स्‌चा टाइप हिंदुस्थानात प्रथम तंजावुरास राजे सरफोजी भोसले यांनी स्थापन केलेल्या दरबारी मुद्रणालयात आणण्यात आला. इ. स. १८०९-१०-च्या सुमारास या छापखान्यात *बालबोध मुक्तावली* हे पुस्तक छापण्यात आले. त्याची प्रत अलीकडे ब्रिटिश म्यूझियमच्या ग्रंथालयात माझ्या पाहण्यात आली. ही प्रत सर अलेक्झांडर जॉन्स्टन यांना खुद्द राजाने १८१७-मध्ये भेट दिली होती. सर अलेकनी ती ३० जुलै १८२१ रोजी ब्रिटिश म्यूझियमला नजर केली. पुस्तकात एक पत्र ठेविले आहे. त्यात सर अलेक सांगतात :

"The work was printed in the Raja's palace by his own printers who are all Brahmins. The woodcuts were made, the paper was manufactured and the book itself was bound in the palace." (30-7-1821)

ह्या प्रतीतील थोडा मजकूर मी नकलून आणिला आहे. तो असा :

25. Halhed, N. B. : *A Grammar of the Bengali Langugage*, Hooghly 1778, Introduction.
26. Wilkins, Sir Charles : *A Grammar of the Sanskrit Langugage*, London, 1808. (Preface pp. xi-xiii).

माघमूल १

१

श्रीगणेशायनमः श्रियःपतिः श्रीमति शासितुं ज
गज्जगन्निवासो वसुदेवसद्मनि वसन्ददर्शाव
तरंतमंबराद्धिरण्यगर्भांगभुवं मुनिं हरिः १
गतं तिरश्चीनमनूरुसारथेः प्रसिद्धमूर्ध्वज्वलनं
हविर्भुजः पतत्यधोधाम विसारि सर्वतः किमेत
दित्याकुलमीक्षितं जनैः २ चयस्त्विषामित्यव
धारितं पुरा ततः शरीरीति विभाविताकृतिं वि
भुर्विभक्तावयवं पुमानिति क्रमादमुं नारद इत्य
बोधि सः ३ नवानधोधो बृहतः पयोधरान्समू
ढकर्पूरपरागपांडुरं क्षणंक्षणोत्क्षिप्तगजेंद्रकृ
त्तिना स्फुटोपमं भूतिसितेन शंभुना ४ दधानमं
भोरुहकेसरद्युतीर्जटाः शरच्चंद्रमरीचिरोचिषं
विपाकपिंगास्तुहिनस्थलीरुहो धराधरेंद्रं व्रत
तीततीरिव ५ पिशंगमौंजीयुजमर्जुनच्छविं व
सानमेणाजिनमंजनद्युति सुवर्णसूत्राकलिता
धरांबरं विडंबयंतं शितिवाससस्तनुं ६ विहं
गराजांगरुहैरिवायतैर्हिरण्मयोर्वीरुहवल्लितं
तुभिः कृतोपवीतं हिमशुभ्रमुच्चकैर्घनं घनांतेत
डितां गणैरिव ७ निसर्गचित्रोज्ज्वलसूक्ष्मपक्ष्म
णा लसद्बिसच्छेदसितांगसंगिना चकासितं चारु

आकृती ११ : आणखी एक तंजावुरी मुद्रण, 'माघमूल' १८१२

पान चार :

सुब्वाजि शेपो यानी इंग्रेजी
भाषेमधील अभिप्राय यथामति महाराष्ट्र भाषेत
लिहिला आणि वेद मूर्ति शिवराम शास्त्री यानी
त्यास संस्कृत श्लोक करून लिहिले
अक्षर वलखी सरसे मुलास नीतीविषयी यात्किंचित्
जाणीव व्हावी हा श्रीमंत महाराज छत्रपतीचा अभिप्राय असे ॥

पान चारच्या मागे :

तंजापुरी गतकली (४९०७) शालिवाहन शक (१७२८)
क्षयनाम संवत्सरी कार्तिक शुद्ध २ बुधवारी हे
बालबोध मुक्तावली पुरती लिहिले असे ॥ ”

हे पुस्तक १८०६-मध्ये लिहून पुरे झाले. तेव्हा तंजावुरास मुद्रणाची सोय नव्हती. यात विल्किन्स्चे टाइप वापरले आहेत. ते प्रथम त्याच्या संस्कृत व्याकरणात १८०८-मध्ये वापरले गेले. त्यानंतर तंजावुरास मुद्रणालयाची स्थापना झाली असावी. ग्रंथाच्या शेवटी खालील मजकूर आहे :

शालिवाह शके कलौसयमिते शुक्लाख्य संवत्स
रे पुष्यमासित त्रयोदश तिथौ सौम्ये तथा वासरे ॥
रख्खंणाभि पंडितः शरभूपाला
ज्ञया सौधगे वार्णेयंत्रवरेष्वपद्य घटिता श्रक्रे
कथा घटिताः ॥ १ ॥

तंजावूरचे सरफोजी राजे

२७. तंजावूरचे तुळाजी राजे (कारकीर्द १७६३–१७८७) यांनी आपल्या निधनसमयी सरफोजी (जन्म १७७७) नावाचा मुलगा दत्तक घेऊन त्याला त्या वेळचे तंजावूरचे डच मिशनरी स्वार्झ (१७२६–१७९८) यांच्याकडे शिक्षणासाठी सोपविले होते. सरफोजींचे दत्तकविधान मद्रास-सरकार-दरबारी मान्य न झाल्यामुळे तुळोजीचे धाकटे बंधू अमरसिंह गादीवर बसले. सरफोजींचे सुरुवातीचे गुरू आणि नंतर मित्र स्वार्झ यांनी सरफोजींचा गादीवरील हक्क कंपनी-सरकारच्या अधिकाऱ्यांसमोर मांडिला. शेवटी सर्व प्रकरणाचा कायदेशीर विचार करून सरन्यायाधीश सर विल्यम जोन्स यांनी सरफोजींच्या बाजूने निकाल दिला, आणि सरफोजी १७९८-मध्ये तंजावूरच्या गादीवर आले. पुढच्याच वर्षी झालेल्या करारनाम्यानुसार तंजावूरचे राजे इंग्रजांचे मांडलिक बनले. इंग्रजांच्या संरक्षणामुळे राज्यात शांतता प्रस्थापित झाली. सरफोजींच्या राज्यारोहणापूर्वीच स्वार्झ मृत्यू पावले होते. तंजावुरास

भ्रातः सर्व्वथास्मद्वचनं क्रियतां आहारोऽप्यस्माभिः कृतएव अयं सञ्जीवकः शस्यभक्षकोऽर्थाधिकारे नियुज्यतां एतद्वचनात्तथानुष्ठिते सति पिङ्गलकसञ्जीवकयोः सर्व्वबन्धुपरित्यागेन महता स्नेहेन कालोऽतिवर्त्तते ततोऽनुजीविनामप्याहारदाने शैथिल्यदर्शनाद्दमनककरटकावन्योन्यं चिन्तयतस्तदाह दमनकः करटकं मित्र किं कर्त्तव्यं आत्मकृतोऽयं दोषः स्वयं कृतेऽपि दोषे परिदेवनमप्यनुचितं ।

तथा चोक्तं । — स्वर्णरेखामहं स्पृष्ट्वा बद्धात्मानञ्च दूतिका
आदित्सुः स्वमणिं साधुः स्वदोषाद्दुःखिताइमे ।

करटको ब्रूते कथमेतत् । दमनकः कथयति अस्ति काञ्चनपुरनाम्नि नगरे वीरविक्रमो राजा तस्य धर्म्माधिकारिणा कश्चिन्नापितो वध्यभूमिं नीयमानः कन्दर्पकेतुनाम्ना परिव्राजकेन साधुद्वितीयकेन नायं हन्तव्य इत्युक्त्वा वस्त्राञ्चले धृतः । राजपुरुषा ऊचुः किमिति नायं वध्यः । स आह श्रूयतां स्वर्णरेखामहं स्पृष्ट्वेत्यादि पठति त आहुः कथमेतत् । परिव्राजकः कथयति अहं सिंहलद्वीपे भूपतेर्जीमूतकेतोः पुत्रः कन्दर्पकेतुर्नाम एकदा केलिकाननावस्थितेन मया पोतवणिङ्मुखाच्छ्रुतं यदत्र समुद्रमध्ये चतुर्द्दश्यामाविर्भूतकल्पतरुतले रत्नावलीकिरणकर्व्वुरपर्य्यङ्के स्थिता सर्व्वालङ्कारभूषिता लक्ष्मीरिव वीणां वादयन्ती कन्या काचिद्दृश्यते इति ततो

अ २

आकृती १२ : पंचानन कर्मकार याची देवनागरी मुद्राक्षरे, ‘ हितोपदेश ’ श्रीरामपूर; १८०३

त्यांचे स्मारक केलेले आहे. तेथे स्वार्त्झच्या निधनसमयीचे दृश्य दाखविणारा पुतळा उभारलेला असून त्याखाली सरफोजींनी रचिलेली इंग्रजी कविता लिहिलेली आहे.[२७]

Firm wast thou, humble and wise,
Honest, pure, free from disguise,
Father of Orphans, the widow's support.
Comfort in sorrow of every sort,
To the benighted dispenser of light,
Doing, and pointing to, that which is right,
Blessing to princes, to people, to me;
May I, my father, be worthy of thee !
Wisheth and prayeth thy Sarabojee.

तंजावूरचे सरस्वतीमहाल ग्रंथालय

२८. सरफोजी राजांची दीर्घ कारकीर्द ही विद्याप्रसार, कलांना उत्तेजन, आणि संस्कृति-संवर्धन यांनी व्यापिलेली आहे. त्यांनी स्थापिलेल्या ' सरस्वतीमहाल ' ग्रंथालयात मराठी, तमिळ, तेलुगू आणि संस्कृत यांमधील अनेक ग्रंथ संगृहीत केलेले आहेत. शिल्प, वास्तू, संगीत, नृत्य, वैद्यक, ज्योतिष इत्यादी विषयांवरील ग्रंथ येथे व्यवस्थितपणे ठेविले आहेत. सरफोजींनी पाठशाळा आणि विद्यालये स्थापन केली. सरफोजी स्वतः विद्वान, व्यासंगी आणि कवी होते. त्यांचे इंग्रज वकिलातीतील अधिकाऱ्यांशी चांगले संबंध होते. त्यांनीच खोदविलेल्या बृहदीश्वर-शिलालेखात खालील मजकूर आहे —

> " आपण विलायतीस गेल्यावरही महाराजांचे ठायी प्रीतीकरून महाराजांस कित्येक पुस्तके व भूगोलाचे पुस्तके व रुप्यांची बासने व रुप्याच्या कित्येक चीजाही पाठविले त्यावरून मेस्तर दुरियन साहेबाचा उपकार महाराज प्रतिपदीही मानिताति "[२८]

मुद्रित पुस्तकांच्या अवलोकनाने, तसेच मिशनऱ्यांनी स्थापिलेल्या त्या वेळच्या छापखान्याची कामे पाहून सरफोजींनी स्वतः छापखाना घातला आणि तेथे देवनागरी टाइपात मुद्रणास सुरुवात केली. या छापखान्यात मुद्रित झालेल्या *बालबोध मुक्तावलीचा* उल्लेख वर केला आहे. शिवाय, *युद्धकांड* (१८०९), *कारिका*, *अण्णंभट्टी*, *रघुवंश*, *माघमूल* (१८१२) या पुस्तकांच्या मुद्रित प्रती ' सरस्वतीमहाल ' ग्रंथसंग्रहालयात पहावयास मिळतात.

श्रीरामपूर मिशन आणि डॉ. केरी यांची कामगिरी

२९. पहिले मराठी पुस्तक डॉ. केरी याच्या प्रेरणेने श्रीरामपूर गावात १८०५-मध्ये छापण्यात आले. डॉ. केरीचा जन्म १७६१-मध्ये इंग्लंडमध्ये हॅक्टन गावात झाला. केरीचे वडील

२७. पारसनीस, द. द. : *तंजावरचे राजघराणे*, मुंबई, १९१२, पृ. ११५–६.
२८. वाकसकर, विनायक सदाशिव : *तंजावरचे मराठी राजे*, श्री सयाजी साहित्यमाला, २२३, मुंबई १९३३, परिशिष्ट १, पृ. २९२–३.

मात्तिउरचित मङ्गल समाचार ।

१ प्रथम पर्व ।

१ आबराहामाचा संतान दाऊदत्याचे सन्तान यिशु ख्रीष्टाचे
पूर्व्वपुरुषाचे पुस्तक हे ।

२ आबरहामान यिस्खाकास् जन्मदिल्हे आणि यिस्खाकान यकुबास
जन्मदिल्हे आणि याकुबान यहोदा तथा त्याचे भावांस् जन्मदिल्हे
३ आणि यहोदान फरस् तथा जरखास तमराचे गर्भी जन्मदिल्हे आणि
फरसान खस्रोणास जन्मदिल्हे तथा खस्रोणान रामास् जन्मदिल्हे
४ आणि रामान आमिनद्बास् जन्मदिल्हे तथा आमिनद्बान नाखशो
५ नास जन्मदिल्हे आणि नाखशोनान शलमास जन्मदिल्हे आणि
शलमान बअ्जास् रहाबाचे गर्भी जन्मदिल्हे आणि बअ्जान
ओबेदास् रोताचे उदरी जन्मदिल्हे आणि ओबेदान यिशयास जन्म
६ दिल्हे त्यानन्तरे यिशिन दाउद् राज्यास् जन्मदिल्हे आणि आउरी
हाची जाया जे होती तीचे गर्भी दाउद् राज्यान शलमनास जन्म
७ दिल्हे आणि शलमनान रखबामास जन्मदिल्हे तथा रखबामान
८ आबीहास् जन्मदिल्हे तथा आबीहान आसास् जन्मदिल्हे या
नन्तर आसान यिहोशाफटास् जन्मदिल्हे आणि यिहोशाफटान
योरमास् जन्मदिल्हे तथा योरमान अ्जीहास जन्मदिल्हे आणि
९ अ्जीहन योतमास् जन्मदिल्हे तथा योतमान आखजास जन्मदिल्हे

आकृती १३ : आद्य मराठी मुद्रण, ‘ मत्तयकृत शुभवर्तमान ’, श्रीरामपूर, १८०५

तेथे शाळामास्तर होते आणि गावातील चर्चमध्ये कारकुनी करीत. घरची अत्यंत गरिबी होती. केरी एका चांभाराकडे उमेदवार होता. काही दिवस त्याने शाळाही चालविली. पुढे १७९३-मध्ये तो धर्मप्रसाराच्या कामासाठी म्हणून बंगाल्यात येऊन पोहोचला. वनस्पति-शास्त्रातही त्याची गती होती. पुढच्या वर्षी त्याला कलकत्त्यापासून ४०० मैलांवर असलेल्या मदनबत्ती येथे निळीच्या कारखान्यात काम करण्याचे निमंत्रण आले. येथे केरीचा पाच वर्षे मुक्काम होता. मदनबत्तीस त्याची आणि राम बसूची गाठ पडली. त्याच्याकडे केरीने बंगाली भाषेचे शिक्षण घेतले. केरीचा संस्कृताचा अभ्यासही चालू होता. बसूचे *राजा प्रतापादित्य चरित्र* (१८०१) प्रसिद्ध आहे. या काळात केरीने बायबलचे बंगाली भाषांतर केले. निळीची लागवड करणारा उदय याने केरीला एक मुद्रणयंत्रच नजर केले, आणि केरीने मदनबत्तीस छापखाना सुरू केला (१७९८). हाच प्रेस घेऊन केरी १८००-च्या जानेवारीत श्रीरामपूरला गेला. तेथे मार्शमन आणि वॉर्ड यांच्या मदतीने त्याने अनेक भाषांमध्ये शेकडो धार्मिक पुस्तके प्रसिद्ध केली. त्याचे पहिले मुद्रण म्हणजे '*बंगाली नवा करार*' श्रीरामपूर प्रेसमधून प्रसिद्ध झाले. या पुस्तकाच्या मुद्रणास नऊ महिने लागले.


पंचानन कर्मकार : आद्य हिन्दी पंचींगार

३०. केरीचे *बंगाली बायबल* १८०१-मध्ये प्रसिद्ध झाले. त्याच वर्षी फोर्ट विल्यम कॉलेजात संस्कृताचा आणि बंगालीचा प्रोफेसर म्हणून त्याची नेमणूक झाली. १८०४-मध्ये त्याने याच कॉलेजात मराठीचे अध्यापन सुरू केले. केरीला टाइप पाडणाऱ्या कारागिराची आवश्यकता होती. चार्ल्स विल्किन्सच्या हाताखाली पंचानन कर्मकार नावाचा एक बंगाली कारागीर तयार झाला होता. तो या वेळी सुप्रसिद्ध संस्कृत पंडित आणि व्याकरणकार कोलब्रुक याच्या पदरी होता. त्याला केरीने श्रीरामपूरला बोलावून घेतले, आणि नंतर कायमचे ठेवून घेतले. इ. स. १८०३-च्या सुमारास देवनागरी टाइप पाडण्याच्या कामात पंचाननची बरीच प्रगती झाली होती. त्याच्या टाइपात '*हितोपदेश*' हे संस्कृत पुस्तक छापण्यात आले. केरीने त्याचे संपादन केले आहे. पंचानन तेव्हा एका पंचास फक्त सव्वा रुपया घेत असे. पंचानन श्रीरामपूरला येण्यापूर्वी इग्लंडहून ५०० पौंड खर्चून पार्शीयन फाउंट आणला होता. फ्राय आणि फिगिन्स या टाइप फाउंडर्सकडे चौकशी करिता ३०० मुद्राक्षरांच्या मराठी फाउंटला ७०० पौंड पडतील, असे आढळून आले होते. त्याच्या तुलनेने पंचाननने तयार केलेला फाउंट फारच स्वस्त पडला. या टाइपात मराठी, हिंदुस्थानी व संस्कृत मुद्रण होत असे.

> " A Mahratta pandit, whom we have retained, had made a beginning of some small portions of the Scripture in that language and the Devanagari letter will answer for that tongue and the Hindustani as well as Sanskrit."[२९]

29. A letter dated September 7,1803, *Memoir of William Carey*, Eustace Carey, London, 1837, p. 415.

अनुक्रमणिका



आकृती १४ : डॉ. केरीचे मोडी मुद्रण, 'ईश्वराच्या अवघ्या गोष्टी', १८१२, श्रीरामपूर

३१. केरीचे *मराठी ग्रामर* आणि *मत्तयकृत शुभवर्तमान* ही पुस्तके १८०५-मध्ये छापून निघाली. हे मराठीतील पहिले मुद्रण. त्यासाठी पंचाननाने देवनागरी टाइप तयार केला होता. १७९६ साली कलकत्त्याच्या क्रॉनिकल प्रेसमध्ये छापिलेल्या *ग्रामर ऑफ द हिंदुस्थानी लँग्वेज* या जॉन गिलख्रिस्टच्या पुस्तकात देवनागरी टाइप वापरले आहेत. हा देवनागरी टाइपांचा हिंदुस्थानातील पहिला उपयोग होय.[३०] डॉ. केरीला मराठी पुस्तकांच्या रचनेत मदत करणारा पंडित वैद्यनाथ हा नागपूरकडचा महाराष्ट्रीय होता, त्याने श्रीरामपूरच्या बायबलमध्ये नागपुरी बोलीचा वापर केला आहे. इ. स. १८०३च्या सुमारास केरीचे संस्कृत व्याकरण तयार झाले होते. त्यासाठी त्याला देवनागरी मुद्राक्षरांची जरुरी होती. त्याच दरम्यान कोलब्रुकचे '*संस्कृत व्याकरण*' तयार होत होते. ते पंचाननाच्या टाइपात छापले आहे. *हितोपदेशा*मध्ये वापरलेला टाइप हा आकाराने मोठा आणि जाड फाट्याचा आहे. पुस्तके आटोपशीर व्हावी, म्हणून लहान आकाराची मुद्राक्षरे तयार करण्याची आवश्यकता होती. श्रीरामपूरच्या पहिल्या देवनागरी फाउंटविषयी मार्शमन ' The Life and Times of Carry ' (लंडन, १८५९) या पुस्तकात दिलेल्या पत्रात म्हणतो :

> Owing to the large number of compound letters in Devanagree, the fount required seven hundred separate punches of which about one-half had been completed at the beginning of the present year (1803).

हे काम लवकर संपावे, म्हणून मनोहर नावाच्या तरुणास पंचाननाने पंच तयार करण्याचे काम शिकविले. श्रीरामपूर प्रेसमध्ये मनोहर पुढे चाळीस वर्षे काम करीत होता. त्याने बंगाली, देवनागरी, पर्शियन, अरेबिक असे अनेक फाउंट तयार केले.


श्रीरामपूरचा मोडी टाइप

३२. डॉ. केरीने आपल्या *मराठी व्याकरणा*च्या पहिल्या आवृत्तीला (१८०५) जी प्रस्तावना लिहिलेली आहे, तीत मराठी पुस्तके बहुधा देवनागरी लिपीत लिहिली जात, असे म्हटले आहे. परंतु व्यवहारात मोडीचे प्राबल्य होते. तरीही केरीचे व्याकरण देवनागरीत छापण्याचे कारण मोडी टाइप त्याला बंगालमध्ये उपलब्ध नव्हता, असे त्याने दिले आहे.

> " Although in the Mahratta Country the Devanagari Character is well known to men of education, yet a character is current among the men of business which is much smaller and varies considerably in form from the Nagari though the number and the power of the letters nearly correspond. We have cast a fount in this character in which we have begun to print the Mahratta New Testament as well as a Mahratta dictionary. This character is moderate in size, distinct and beautiful. "[३०]

यानंतरच्या वीस-पंचवीस वर्षांच्या काळात श्रीरामपूरच्या छापखान्यातून अनेक भारतीय लिप्यांतील पुस्तके छापून निघाली. त्यांचा तेथल्या कॉलेज ग्रंथालयात संग्रह केला आहे.

30. Priolkar, A. K. : *Printing Press in India*, p. 62.



आकृती १५ : मुंबईतील मोडी मुद्रण ड्रमांडचे व्याकरण, १८०८

४

मुद्रणकलेची मुंबईकडील प्रगती

मराठी मुद्रणासाठी बालबोध लिपी

३३. महाराष्ट्रात मुद्रणास सुरुवात झाली, त्या काळात मराठी भाषेतील मजकुराची छपाई मोडी लिपीमध्ये होत असे. *कूरिअर*च्या १७ जुलै १८०२-च्या अंकामध्ये प्रसिद्ध झालेली मराठी जाहिरात मोडीमध्ये छापली आहे. ड्रमांडच्या *इलस्ट्रेशन्स् ऑफ द ग्रॅमॅटिकल पार्ट्स ऑफ द गुजराती, मराठी अँड इंग्लिश लँग्वेजेस्*, या पुस्तकात मोडी टाइपच वापरले आहेत. इकडच्या भागातील अगदी अल्पसंख्याकांनाच नागरी किंवा बालबोध समजते, असे ड्रमांड प्रस्तावनेत म्हणतो. कारण व्यापारात आणि खाजगी पत्रांत मोडीचा वापर असे. पोथ्यापुस्तके मात्र बालबोधीत असत. 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'ने १८२५–२६-च्या दरम्यान मुद्रित पुस्तकांसाठी देवनागरीचा स्वीकार केला. तेव्हापासून मराठीमध्ये मुद्रण करण्यासाठी देवनागरी टाइपाचा उपयोग निश्चित झाला; आणि मुद्रणव्यवसायास जरूर ते मार्गदर्शन झाले. सुरुवातीस गुजरातीसुद्धा देवनागरी किंवा शास्त्री लिपीत छापण्याची प्रथा होती. परंतु गुजराती किंवा महाजनी लिपीने जोर केला. मोडी मात्र मागे पडली ती पडलीच. सुरुवातीच्या काळात मुद्रणकलेचा उपयोग फक्त धार्मिक पुस्तके छापण्यासाठीच होई. त्या काळात वृत्तपत्रांसाठी छापखाने निघाले होते, आणि यांपैकी काही खाजगी छापखान्यांचा उपयोग शासकीय कामासाठीही होई.

मुद्रण-उद्योगात महाराष्ट्राचे उशिरा पदार्पण

३४. *कूरिअर* छापखाना हा मुख्यतः वृत्तपत्रांसाठी स्थापन करण्यात आला होता. तरी मराठीतील सुरुवातीची सात मुद्रित पुस्तके तेथे छापण्यात आली आहेत. अमेरिकन मिशन प्रेस स्थापन झाल्यावर मराठी मुद्रणाची चांगली सोय झाली. महाराष्ट्रातील ग्रंथमुद्रण आणि प्रकाशन या व्यवसायांची खाजगी क्षेत्रातील सुरुवात अमेरिकन मिशन प्रेसच्या स्थापनेपासून झाली,

गणित मार्ग.

या मूळ पुस्तकाचा कवि अज्जम डांकतर हट्टन त्या पुस्तकाचें भाषांतर जार्ज जार्विस साहेब इंजनेर सर्कार इंग्रेज बाहादुर मुंबई यांणी जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांचे साहाय्यानें महाराष्ट्र भाषेंत केलें.

मुंबईं

शके १७४८

इंग्रेजी सन १८२६

हें पुस्तक छापण्याची ही प्रथमावृत्ती. बापूगंगाधर जोशी चिपळोणकर यांचे हातानें लिहून दगडावर छापिली.

आकृती १६ : हिन्दुस्थानातील पहिले शिलामुद्रित पुस्तक ‘ गणितमार्ग ’, मुंबई, १८२६


असे निश्चितपणे म्हणता येते. तत्पूर्वीचा ग्रंथमुद्रणाचा महाराष्ट्रातील प्रयत्न म्हणजे नाना फडणविसांनी केलेला गीता-मुद्रणाचा उद्योग. इ. स. १८००-च्या सुमारास कलकत्त्यास आणि जवळच्या डचांच्या अखत्यारातील श्रीरामपूर येथे देवनागरी मुद्रण सुरू झाले होते. तत्पूर्वी अडीचशे वर्षे गोव्यास छापखाना सुरू झाला होता आणि तेथे रोमन आणि मलबार (तमिळ) लिपीची मुद्राक्षरे पाडण्यात आली होती. मलबार लिपीत मुद्रण सुरू होऊन (१५७८) सव्वादोनशे वर्षे झाली होती. कलकत्त्यास देवनागरीतील मुद्रणास सुरुवात होण्यापूर्वी पन्नास वर्षे अगोदर (१७४३-नंतर) रोम येथे देवनागरी मुद्राक्षरे तयार करण्यात आली होती. त्यांत काही मजकूर छापलाही गेला होता. ज्या वेळी महाराष्ट्रात तांब्याच्या पत्र्यावर सांधलेल्या अक्षरांनी गीता-मुद्रणाचा प्रयोग होत होता, त्याच वेळी कलकत्त्यात डॉ. विल्यम केरी *मराठी बायबल* नव्याने तयार केलेल्या देवनागरी मुद्राक्षरांवरून छापीत होता. त्याचे *मराठी व्याकरण* (१८०५) तेव्हा छापिले जात होते. परंतु महाराष्ट्रात मात्र व्यवस्थित पायावर मुद्रण-उद्योग सुरू व्हावयाला १८१८ साल उजाडावे लागले. शिवकाळातील भिमजी पारिखांचा देशी भाषांतील 'ब्राह्मणी ग्रंथां'च्या मुद्रणाचा प्रयत्न असफल झाला होता. त्याचप्रमाणे पेशवाईच्या अखेरीस गीतामुद्रणाने सुरू झालेला धार्मिक ग्रंथाच्या मुद्रणाचा प्रयत्नही मुळातच खुंटला होता.

३५. अगदी सुरुवातीच्या काळामध्ये मिशनरी लोकांनी काढिलेल्या छापखान्यांव्यतिरिक्त जे छापखाने निघाले, ते प्रामुख्याने वृत्तपत्रे छापण्यासाठी होते. *कूरिअर* या इंग्रजी वृत्तपत्राप्रमाणेच *जामे जमशेद*, *मुंबई समाचार* ही गुजराती वृत्तपत्रे छापण्यासाठी छापखाने स्थापण्यात आले. मुख्यत: वृत्तपत्रमुद्रण आणि तुरळक ग्रंथमुद्रण ही या छापखान्यांच्या कामाची व्याप्ती होती. इंग्रजी वृत्तपत्रे सुरुवातीपासूनच अक्षरमुद्रणपद्धतीने छापिली जात होती. मराठी मुद्रणासाठी मात्र प्रामुख्याने शिळामुद्रणाचा उपयोग होत होता. विल्किन्सची मुद्राक्षरे हिंदुस्थानात सुमारे १८०९–१०-पासून उपलब्ध झाली, आणि तंजावुरास मराठी ग्रंथ अक्षरमुद्रणपद्धतीने छापण्यात आले. तरी खुद्द महाराष्ट्रात पुष्कळ काळपर्यंत बहुसंख्य ग्रंथ शिळामुद्रणपद्धतीनेच छापिले जात. उत्तमोत्तम लेखनकलाकार (litho artist) या कामासाठी लाविले जात असत. त्यांनी लिहिलेल्या मजकुरावरून केलेले मुद्रण आजही मराठीतील उपलब्ध मुद्राक्षरांशी तुलना करिता सुंदर वाटते.

अमेरिकन मिशनऱ्यांची कामगिरी

३६. महाराष्ट्रातील ग्रंथ-मुद्रण-व्यवसायास खरी सुरुवात झाली, ती अमेरिकन मिशनऱ्यांनी मुंबईस स्थापन केलेल्या मुद्रणालयापासून. अमेरिकन मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारास मुंबईत १८१३-मध्ये सुरुवात झाली. त्यानंतर १८१६-च्या अखेरीस किंवा १८१७-च्या सुरुवातीस त्यांचा छापखाना निघाला. सुरुवातीस फक्त एक लाकडी हॅंडप्रेस होता. एक मराठी फाउंट कलकत्त्याहून मागविला होता. पुढे १८२५-मध्ये नवीन फाउंट मागविण्यात आला. प्रेसमधील लोहारखात्यात काम करणारा एक हिंदी-खिस्ती मुलगा टॉमस ग्रॅहम याची हुषारी पाहून

अनुक्रमणिका



AN

EASY AND EXPEDITIOUS MEANS

इंग्लिश भाषणाचें ज्ञान मिळवायासाठीं शीघ्र आणि सोपा उपाय

OF

ACQUIRING A KNOWLEDGE

OF THE

ENGLISH LANGUAGE,

DESIGNED FOR THE BENEFIT OF THOSE IN THIS COUNTRY

ह्या देशांत जे इंग्लिश भाषण आणि विद्या

WHO WISH TO STUDY THE ENGLISH

शिकायास इछितात त्यांचे

LANGUAGE AND SCIENCE

हितासाठीं नेमला ॥

"The fear of the Lord is the beginning of wisdom; and to depart from evil, is understanding."

जिहोवाचें भय हें ज्ञानाचें मूळ आहे

आणि पापापासून फिरणे ही बुद्धी आहे ॥

"Of all things, knowledge is esteemed the greatest treasure, from incapacity to be stolen, from incapacity to be given away, and from incapacity to be destroyed."

सर्वद्रव्येषु विद्यैव द्रव्यमाहुरनुत्तमं ॥

अहार्यत्वादनर्घ्यत्वात् अक्षयत्वाच्च सर्वदा ॥

PRINTED AT THE MISSION PRESS.

BOMBAY. A.D. 1818.

मुंबईंत प्रेषित छापखान्यांत छापलें ॥

ख्रिस्त शक १८१८ ॥

आकृती १७ : मुंबईतील देवनागरी अक्षरमुद्रण, १८१८

मॅनेजर ग्रीव्हज्‌ने त्याला मराठी मुद्र कोरण्यास प्रवृत्त केले. ते १८३१–३२-च्या दरम्यान तयार झाले. ग्रीव्हज्‌ने मातृका करण्यासाठी हे मुद्र अमेरिकेस नेले होते. परंतु वाटेत ते गंजून निकामी झाले. इ. स. १८३५-मध्ये वेबस्टरने मुद्र आणि मातृका बनविण्याची हत्यारे आणिल्यावर टॉमस ग्रॅहॅमने सर्व मुद्र नव्याने तयार केले आणि वेबस्टरने त्यांवरून मातृका आणि साचे बनविले. ग्रॅहॅमच्या मुद्राक्षरांत छापलेले पहिले पुस्तक १८३६-मध्ये प्रसिद्ध झाले. इ. स. १८५४-मध्ये मिशन छापखान्यात सात हँडप्रेस, एक शिळाप्रेस आणि इंग्लिशशिवाय सात बाळबोध, एक मोडी, तीन गुजराती, दोन हिंदी आणि एक झेंद असे मातृकांचे संच होते. १२५ माणसे नोकरीस होती. १८५२-पूर्वीच्या आठ वर्षांत तेरा हजार रुपये नफा झाला होता. या छापखान्यात तेरा कोटी साठ लक्ष पाने छापिली होती, अशी प्रा. प्रिओळकरांची नोंद आहे. मिशन प्रेसमध्ये छापिलेले पहिले उपलब्ध पुस्तक *इंग्लिश भाषेचे ज्ञान मिळविण्यासाठी शीघ्र आणि सोपा उपाय* हे १८१८-मध्ये प्रसिद्ध झाले. तेव्हापासून १८५८-पर्यंत छापलेल्या मराठी पुस्तकांपैकी ८० पुस्तके आज महाराष्ट्रातील ग्रंथालयांत उपलब्ध आहेत. इ. स. १८४५-पासून टॉमस ग्रॅहॅमचे नात्र मुद्रक म्हणून येऊ लागले. त्यालाच हा छापखाना १८५५-मध्ये एक भाग आणि १८५८-मध्ये दुसरा भाग असा विकून टाकण्यात आला. टॉमस ग्रॅहॅमच्या छापखान्यात १८५६-पासून १८६०-पर्यंत छापलेली तेवीस मराठी पुस्तके उपलब्ध आहेत. पुढील काळामध्ये मुद्रणक्षेत्रामध्ये ज्यांनी थोर कामगिरी बजाविली, ते जावजी दादाजी चौधरी आणि राणोजी रावजी आरू हे या अमेरिकन मिशन छापखान्यातच शिकून तयार झाले होते.

बॉम्बे एज्युकेशन सोसायटी आणि सरकारी छापखाना

३७. मुंबई प्रांतामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने १८१५-मध्ये 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. या सोसायटीचा सुरुवातीचा उद्देश 'गोऱ्या सोजिरांपासून हिंदी स्त्रियांना झालेल्या संततीचे शिक्षण' हा होता. संस्थेच्या सहाव्या वार्षिक अहवालात शालेय प्रकाशने करण्याच्या संकल्पाविषयी खालील उल्लेख आहे :

> "One of the first objects, therefore, towards improving the education of the natives must be preparing and publishing some unexceptionable school tracts in the native language. These languages will be for the most part the Mahratta and Guzeratte."[31]

त्याच वर्षी १८२०-मध्ये 'नेटिव स्कूल अँड स्कूल बुक कमिटी'ची स्थापना करण्यात आली. तेव्हा मुलांच्या शिक्षणास योग्य अशी पुस्तके नव्हती. म्हणून सोसायटीने ती तयार करून घेण्याचे ठरविले. पुढील वर्षापर्यंत मुळाक्षरांचा तक्ता, लहान वाक्यांचा संग्रह आणि गोष्टींचे एक पुस्तक इतकेच साहित्य प्रसिद्ध झाले. *पंचोपाख्यान* छापण्याचे ठरले, तेव्हा

31. Sixth Annual Report of the Bombay Education Society (1821). See *Printing Press in India*, p. 88.

(८९)

एकेनगरांत दरिद्री ब्राह्मण राहातहोता त्याला ए पं. सं
क्या यजमानाने गाइचीं दोन वांसरें दिलीं मग त्या
ने तृणादिक आहार घालून तीं मोटीं पुष्ट केलीं त्यां
स पाहून एक चोर होतीं दवें घेउन त्यांच्या हरणा
र्थ निघाला तों वाटेत एक ब्रह्मराक्षस ज्याचे दंत विक्रा
ळ नासिका दीर्घ केश पिंगट आरक्त नेत्र असा पाहू
न तो चित्तांत भय पावला तेव्हां त्यास पुसतो तुं को
ण आहेस मग तो ह्मणतो मी सत्यवचननामा राक्षस
आहे परंतु तुं कोण तेसमइं तो ह्मणतो मी चोर दरि
द्रीब्राह्मणाच्या दोन गाई आहेत त्या हरण करावया
सिं जातों तेकाळीं तो बोलिला मित्रा तो ब्राह्मण प
वित्र आहे यास्तव मीही त्यास भक्षीन ह्मणजे दोघाचें
कार्य होईल असें त्याचें बोलणे ऐकून उभयतां तेथे
गेले तों ब्राह्मण निजला होता त्याला भक्षावा ह्मणून
राक्षस चालिला त्यास चोर बोलतो गडया मी याचें
गोयुग्म नेईन मग तुं यास भक्ष तेव्हां राक्षस ह्मणतो स
ख्या गाईच्या शब्देकरून जर ब्राह्मण जागृत जाहाला
तर हा सर्व उद्योग राहील यास्तव मी अगोधर त्या
स भक्षितों मग तुं निर्भय गाई ने चोर ह्मणतो तुं त्या
स

आकृती १८
विल्किन्सूच्या मुद्राक्षरांचा मुंबईंतील उपयोग, 'पंचोपाख्यान', कूरियर प्रेस, १८२२

त्यासाठी इंग्लंडहून नवीन फाउंट आणण्यात आला. हे पुस्तक *कूरिअर* छापखान्यातून १८२२-मध्ये बाहेर पडले. पुढील वर्षी *विदुरनीति* प्रसिद्ध झाली. या पुस्तकांची किंमत अनुक्रमे युरोपियनांस रु. ८ व रु. ६ आणि नेटिवांस रु. ३ व रु. २ अशी होती. *सिंहासनबत्तिशी* १८२४-मध्ये निघाली.

३८. मुद्रणव्यवसायास आवश्यक अशा मराठी मुद्राक्षरांची टंचाई सोसायटीचा कार्यवाह जॉर्ज जर्विस याच्या लक्षात आली होती. त्याने ४ ऑक्टोबर १८२३-ला सरकारास विनंती केली की,

> " The Society deems it a great object to obtain a larger supply of Mahratta types and a new fount of Guzerathee, the latter to be executed like the new Balbodh; drawings of the letters might be sent home. They might afterwards be disposed of on moderate terms to the native presses, as the words could be most conveniently printed. The Society would solicit, moreover, lithographic press. "[३२]

यांपैकी नवीन मुद्राक्षरे तयार करणे लांबणीवर पडले. परंतु लियोग्राफिक प्रेस स्थापण्याचे मात्र ठरले. त्याप्रमाणे प्रत्यक्षात सहा शिळायंत्रे आणण्यात आली. *कूरिअर* प्रेसमध्ये त्या वेळी सरकारी कामे होत. ती या सरकारी छापखान्यात करावीत, आणि काम नसेल, तेव्हा बाहेरचे काम घ्यावे; शिवाय, ' स्कूल बुक सोसायटी'चे काम फुकट करून द्यावे, असा बेत होता. हा मुंबईचा सरकारी छापखाना १८२४-मध्ये सुरू झाला. परंतु ' स्कूल बुक सोसायटी'चे काम करून देण्याचा बेत मात्र फसला. सरकारने उदारपणे सोसायटीचे काम फुकट छापण्याची व्यवस्था केली होती, तरी प्रत्यक्षात सरकारी छापखान्यावर अन्य कामांचा भार असल्यामुळे सोसायटीचे काम तुंबून राहिले. त्यावर उपाय म्हणून सरकारने सोसायटीला चार शिळायंत्रे आणवून दिली. मुद्राक्षरांचे दोन फाउंट कलकत्त्याहून मागविले. शिवाय, इंग्लंडहून इंग्रजी आणि बालबोध मुद्राक्षरांचे फाउंट आणि हँडप्रेस मागविले. पुढील वर्षापासून सोसायटीचा प्रेस सुरू झाला. याशिवाय तीन शिळायंत्रे येथेच तयार करण्याची व्यवस्था झाली. १८२९-मध्ये कॅप्टन जर्विसची सरकारी शिळाछापखान्याचा सुपरिण्टेण्डण्ट म्हणून नेमणूक झाली. त्याचा इंजिनियरिंग कॉलेजशी शिक्षक म्हणून संबंध होता. हे कॉलेज १८३०-मध्ये पुण्यास गेले, तेव्हा जर्विसही पुण्यास गेला. त्याने आपल्याबरोबर एक शिळायंत्र नेले आणि पुण्यात शिळा-छापखाना सुरू केला. हा पुण्यातील पहिला छापखाना, असा प्रा. प्रिओळकरांचा अंदाज आहे.

अमेरिकन मिशन प्रेसचे शालेय प्रकाशन

३९. अमेरिकन मिशनची स्थापना झाल्यानंतर मुंबईस मराठी शाळा निघाली (१८१५), तेव्हा मुद्रित शालेय पुस्तके नव्हती. पहिले पुस्तक प्रसिद्ध केले, ते मिशनऱ्यांनी. ***लेकराची पहिली पोथी*** १८२०-मध्ये प्रसिद्ध झाली. त्याच्या १८८२-पर्यंत पन्नास आवृत्त्या निघाल्या.

32. *The Bombay Secretariat Records*, G. D., Vol. 8 (63) of 1824, pp. 93-94.

कोणत्या प्रहरीं चोर येईल हें जर घरधनी समजता तर तो
४४ सावध राहून आपलें घर फोडुं न देता ॥ याकरितां तुह्मीही सिद्ध
व्हा कां तर ज्यां घटकेंत तुह्मी कल्पीत नाहींत तेव्हां माण
४५ साचा पुत्र येईल ॥ तर त्याचे धन्याने आपले परिवारांस वेळेचे
वेळेस खाणे देण्याकरितां त्यांजवर ठेविला असा विश्वासु आणि
४६ ज्ञानी चाकर कोणता आहे ॥ ज्या चाकरास असें करितां त्याचा
४७ धनी येऊन पाहील तो धन्य ॥ मी तुह्मास खरें सांगतों कीं तो
४८ आपले सर्व संपत्तीवर त्याला सोपील ॥ परंतु माझा धनी येण्यास
उशीर करितो असें जर तो दुष्ट चाकर आपले अंतःकरणांत ह्मणे
४९ ल आणि सोबती चाकरांस मारूं आणि मस्त्यांबराबर खाऊं आणि
५० पीऊं लागेल तर ज्या दिवसीं तो त्याची वाट पाहात नाहीं आ
णि ज्या घटकेंत तो जाणत नाहीं तेव्हां त्या चाकराचा धनी येई
५१ ल आणि त्यास कापून टाकील आणि जेथे रडणे आणि दांत
खाणे होईल तेथे ढोंग्यांबराबर त्याला वांटा देईल ॥

पर्व ॥ २५ ॥ तेव्हां दाहा कुमारी ज्यानी आपले दिवे घेऊ
न वराला भेटायास बाहेर गेल्या त्यांसारिखें स्वर्गाचें राज्य दाखवि
२ लें जाईल ॥ आणि त्यांमधील पांच ज्ञानी व पांच मूर्ख होत्या ॥
३ मूर्ख ज्या होत्या त्यानी आपले दिवे घेतले परंतु आपणांबराबर
४ तेल घेतलें नाहीं ॥ परंतु ज्ञानी ज्या त्यानी आपल्या दिव्यांबराब
५ र आपले भांड्यांत तेल घेतलें ॥ वरास उशीर लागला असतां सर्वां
६ स डुकल्या आल्या आणि त्या झोंपीं गेल्या ॥ आणि मध्यरात्रीं
हाक जाली कीं पाहा वर येत आहे त्याला भेटायास बाहेर
७ जा ॥ तेव्हां सर्व कुमारी उठल्या आणि त्यानी आपले दिवे
८ नीट केले ॥ आणि मूर्ख ज्या त्या ज्ञान्यांस बोलिल्या कीं आमचे
९ दिवे विझाले आहेत यास्तव तुमचे तेलांतून आह्मास द्या ॥ परंतु
ज्ञानी उत्तर देऊन बोलिल्या कदाचित आह्मास आणि तुह्मास

आकृती १९ : कलकत्ता टाइपात मुंबईस छापलेले बायबल, १८८६

लेंकराची दुसरी पोथी प्रसिद्ध झाली, त्याची दुसरी आवृत्ती १८४०-मध्ये निघाली. तीत 'माझी आई' नावाचा एक धडा आहे. हा विल्यम मावरच्या इंग्लिश स्पेलींग बूक वरून घेतलेला आहे. ह्या धड्यातील भाषा मुळातील कवितांशी ताडून पाहणे मनोरंजक ठरते. मुळातील कवितेचा सुरुवातीचा भाग असा :

MY MOTHER

Who fed me from her gentle breast,
And hush'd me in her arms to rest,
And on my cheek sweet kisses prest ?
My mother.

When sleep forsook my open eye,
Who was it sung sweet lullaby,
And soothed me that I should not cry ?
My mother.

Who sat and watched my infant head,
When sleeping on my cradle bed,
And tears of sweet affection shed ?
My mother.

आता लेंकराची पोथी-मध्ये[३३] या कवितेचे काय झाले, पहा :

माझी आई


मृदु उरस्थलें मला कोणीं पोसलें,
मला विश्रांति व्हावी म्हणून आपल्या भुजांच्या ठायीं घेऊन माझें कोणीं सांत्वन केलें,
आणि माझ्या गालाचे गोड मुके कोणीं घेतले,
माझ्या आईनें.

जेव्हा मला झोंप न लागे त्या समयीं सांत्वनाचें मधुर गाणें कोणीं गायलें ?
आणि म्यां न रडावें म्हणून मला कोणीं हालविलें ?
माझ्या आईनें.

मी पाळण्यांतल्या अंथरुणावर निजलों असतां वारंवार मजकडे पाहून माझ्या कोंवळ्या डोक्याची चौकी कोणीं केली ?
माझ्या आईनें.

नंतरच्या काळात भास्कर दामोदर पाळंदे यांच्या सरकारी क्रमिक पुस्तकांत हीच कविता कसे ललित रूप देऊन आली,[३४] हेही पाहणे उद्बोधक ठरेल.

३३. *लेंकराची दुसरी पोथी*, आ. २ री, १८४०, पृ. ४९.
३४. *लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक*, भाग दुसरा, आ. २ री १८६१, पृ. ३६.



तें झालेलें वर्त्तमान मडमीने आपल्या खोलींतून पाहिलें, आणि चाकराकडून त्या म्हातारीला खाया ला व पांघरायाला पाठवून दिल्हें. मग जेव्हां शोरिबाईची मडमीशीं गांठ पडली, तेव्हां दोघींचीं संभाषणें याप्रकारें झालीं; मडमीने तिला विचारिलें, अगे तूं जेवीत असतां कोण तुझ्याजवळ आली होती बरें?

शोरिबाई.—ती भीकमागी एक म्हातारी आली होती.

मडम.—तिला तूं काय दिल्हेंस?

शो.—मी तिला काय देऊं? मीहि गरीब दुबळीच आहें.

आकृती २० : अमेरिकन मिशन प्रेसमध्ये प्रथमतः बनविलेली देवनागरी मुद्राक्षरे, 'चमत्कारिक गोष्टी', मुंबई, १८३८,

अनुक्रमणिका

थोर तुझे उपकार ।। आई थोर तुझे उपकार ।। ध्रु० ।।
वदत विनोदें, हांसत सोडी ।। कोण दुधाची धार ।। १ ।।
नीज न आली तर गीत म्हणे ।। प्रेम जिचें अनिवार ।। २ ।।
येई दुखणें तेव्हां मजला ।। कोण करी उपचार ।। ३ ।।

मिशन प्रेसचे धार्मिक प्रकाशन

४०. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे धोरण धर्मशिक्षणाचे होते. त्यामुळे त्यांच्या प्रकाशनात धार्मिक आणि प्रच्छन्न धार्मिक पुस्तकांचा विशेष भरणा असावा, हे स्वाभाविक आहे. *आमचे धन्य उद्धरणाराचे चमत्कार* (१८२६), *शास्त्रातील* (बायबलमधील) *काही गोष्टी* (१८२६), *त्रिभुवनाची गोष्ट* (१८२७), *धर्माच्या मुख्य गोष्टी* (१८२७), *हेनरी आणि त्याचा सांभाळणारा गडी संभू ह्यांची गोष्ट* (१८३३), *मुलांसाठी बोधाच्या गोष्टी* (१८३३), *नवीन पंचोपाख्यान* (१८३७) ही पुस्तके बालांसाठी होती. प्रौढांसाठी *शुभवर्तमान* (१८२४), *खऱ्या धर्मांची चिन्हे* (१८२९), *पापपीडितांस शांति* (१९२९), *खरा मार्ग कोणता याचा विचार* (१८३०) अशी पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. ही पुस्तके प्रसिद्ध करण्यातील हेतू असा होता —

> " Our American friends are very guarded as to the character of the Books in the schools. In all their efforts in the cause of Education, they have one great aim, viz. to raise the native population from their state of ignorance to remove the prejudices which keep the morally and intellectually degraded, and above all, to make them acquainted with Christianity so that they may feel the force of its great truths on their hearts and become wise unto salvation. With this view the books used for reading in all the schools are scriptures and religious works and no book, not approved by the Mission is allowed to be used, or to be kept in the schools. "[३५]

मिशनरी लोकांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांविषयी *ज्ञानोदय*कार म्हणतात :

> " त्यांनी जीं पुस्तकें केलीं त्यांतून कित्येक अद्यापि शाळेंत शिकवितात ... त्या उपदेशकांनीं भूगोल, खगोल, धर्म, नीति इत्यादि विषयांवर पुष्कळ पुस्तकें छापून शाळांत शिकविलीं... त्या उपदेशकांस ह्या विषयांवर पुस्तकें लिहिण्याचें अगत्य होतें...कारण त्यांनी पुस्तकें रचिल्या अगोदर त्या मुंबई इलाख्यांत तर चुकीरहित भूगोल, खगोल, नीति, धर्म, इत्यादि विषयांवर एकहि पुस्तक नव्हतें. "[३६]

आज या लिखाणाला बारा दशके झाली; पण बिनचूक शालेय पुस्तके प्रसिद्ध करण्याच्या बाबतीत आम्ही अजून प्रयत्नशीलच आहोत! तीच गोष्ट बिनचूक ग्रंथमुद्रणाची!

35. *The Evangelist and Reporter*, Bombay, June, 1837.
३६. *ज्ञानोदय*, पु. १२, सन १८५३, पा. ३४५–३४६.

मोशयानें केलेलें पहिलें पुस्तक ह्मणजे

उत्पत्ति.

अध्याय १.

प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी हीं
उत्पन्न केलीं. २आणि पृथ्वी अस्ताव्यस्त व
शून्य होती, आणि जलाशयाच्या पाठीवर
काळोख होता, आणि देवाचा आत्मा पाण्या-
च्या पाठीवर हालत होता. ३मग देव बोलला
कीं, उजेड होवो, तेव्हां उजेड झाला. ४आ-
णि देवानें पाहिलें कीं उजेड चांगला आहे,
आणि देवानें उजेड व काळोख यांस वेग-
वेगळें केलें. ५मग देवानें उजेडाला दिवस
ह्मटलें, आणि काळोखाला रात्रि ह्मटलें;
आणि सायंकाळ व सकाळ होऊन पहिला
दिवस समाप्त झाला. ६मग देव बोलला कीं,
पाण्यांच्या मध्यें अंतराळ होवो, आणि तें पा-
ण्यापासून पाणी वेगळें करो. ७तसें देवानें
अंतराळ उत्पन्न केलें, आणि अंतराळाखालचें
जें पाणी आणि अंतराळावरलें जें पाणी त्यांस
वेगवेगळें केलें, मग तसें झालें. ८तेव्हां
देवानें अंतराळाला आकाश ह्मटलें; आणि
सायंकाळ व सकाळ होऊन दुसरा दिवस
समाप्त झाला.

९मग देव बोलला कीं, आकाशाखालचें
पाणी एका जाग्यांत सांचो आणि कोरडी
भूमि दिसो; तेव्हां तसें झालें. १०आणि दे-
वानें कोरड्या भूमीस पृथ्वी ह्मटलें, आणि
पाण्याच्या संचयाला समुद्र ह्मटलें; आणि दे-
वानें पाहिलें कीं चांगलें आहे. ११मग देव
बोलला कीं, बीज देणारें गवत व हिरवळ,
आणि आपल्या जातीप्रमाणें फळ देणारें फ-
ळझाड ज्याचें बीज त्यांच्यांत पृथ्वीवर हो-
ईल तीं पृथ्वी उपजवो, तेव्हां तसें झालें.
१२ह्मणजे आपल्या जातीप्रमाणें बीज देणारें
गवत व हिरवळ आणि फळ देणारें झाड
ज्याचें बीज त्यांच्या जातीप्रमाणें त्यांच्यांत
असतें, तीं पृथ्वीनें उपजविलीं; तेव्हां देवानें
पाहिलें कीं चांगलें आहे. १३आणि सायंकाळ
व सकाळ होऊन तिसरा दिवस समाप्त झाला.
१४मग देव बोलला कीं, दिवस व रात्रि
यांस वेगवेगळें करायासाठीं अंतराळांत
ज्योति होवोत, आणि खुणा व ऋतु व दिवस
व वर्षें यांसाठीं होवोत. १५आणि पृथ्वीवर प्र-
काशायासाठीं अंतराळांत ज्योती होवोत;
तेव्हां तसें झालें. १६आणि देवानें दोन मोठ्या
ज्योती केल्या, जी मोठी ज्योति ती दिवस
चालवायासाठीं आणि जी लाहान ज्योति ती
रात्रि चालवायासाठीं केली, आणि तारेंहि
केले. १७,१८तेव्हां पृथ्वीवर उजेड द्यायासाठीं,
आणि दिवस व रात्रि चालवायासाठीं आणि
उजेड व काळोख यांस वेगवेगळें करायासा-
ठीं देवानें त्या अंतराळांत ठेविल्या; तेव्हां देवानें
पाहिलें कीं चांगलें आहे. १९आणि सायंकाळ
व सकाळ होऊन चवथा दिवस समाप्त झाला.

२०मग देव बोलला कीं, श्वासवान जीव-
जंतूंस पाणी फार उपजवो, आणि पांखरेंहि
पृथ्वीवरतें आकाशाच्यां अंतराळांत उडोत.
२१तेव्हां मोठे मासे व प्रत्येक जिवंत वळवळ-
णारा जंतु जीं पाण्यापासून फार उपजलीं
त्यांस त्यांच्या जातीप्रमाणें व प्रत्येक सपक्ष
पांखराला त्याच्या त्याच्या जातीप्रमाणें देवानें
उत्पन्न केलें, आणि देवानें पाहिलें कीं चांगलें
आहे. २२तेव्हां देवानें त्यांस आशीर्वाद
दिल्हा कीं, सफळ होऊन वाढा आणि समु-
द्रांतील पाण्यांत वृद्धिंगत व्हा, आणि पृथ्वीवर
पांखरें वाढोत. २३आणि सायंकाळ व सकाळ
होऊन पांचवा दिवस समाप्त झाला.

२४मग देव बोलला कीं, एकएक जातींतील
श्वासवान जीव, ह्मणजे एकएक जातींतील
ग्रामपशु व वळवळणारीं व वनपशु यांस पृथ्वी
उपजवो, तेव्हां तसें झालें. २५आणि देवानें
एकएक जातींतील वनपशु व एकएक जा-
तींतील ग्रामपशु व एकएक जातींतील भू-
मीवरील सर्व वळवळणारीं यांस उत्पन्न केलें;
आणि देवानें पाहिलें कीं चांगलें आहे. २६मग
देव बोलला कीं, आह्मी आपल्या प्रतिछायेप्र-
माणें आपल्या प्रतिमेसारिखें माणूस उत्पन्न
करूं; आणि तीं समुद्रांतील मास्यांवर व
आकाशांतील पांखरांवर व पशूंवर व सर्व
पृथ्वीवर व पृथ्वीवरल्या प्रत्येक वळवळणाऱ्या

GENESIS I. १ 1

आकृती २१ : टॅामस ग्रॅहॅमच्या हातचे पायका देवनागरीचे वळण, 'नवा करार' मुंबई, १८५७.

अनुक्रमणिका

५

टॉमस ग्रॅहॅम आणि गणपत कृष्णाजी

मराठी ग्रंथमुद्रणाची भक्कम पायावर उभारणी

४१. मराठीतील ग्रंथमुद्रणास श्रीरामपूर येथे १८०५-मध्ये सुरुवात झाल्यापासून १८६७-मध्ये ग्रंथालयाचा कायदा होईपर्यंत प्रसिद्ध झालेले मराठी ग्रंथ, *मराठी दोलामुद्रिते*[३७] ह्या पुस्तकामध्ये नोंदिलेले आहेत. 'मुंबईच्या अमेरिकन मिशन प्रेस'मध्ये धार्मिक पुस्तके छापिली जात. त्याचप्रमाणे श्रीरामपूर येथील मिशनरी छापखान्यामध्ये धार्मिक पुस्तके आणि भाषा-विषयक पुस्तके छापिली जात होती. त्याने स्फूर्ती घेऊन गणपत कृष्णाजीने मराठी ग्रंथमुद्रणास सुरुवात केली. मुंबईमध्ये काही पुस्तके '*कूरिअर*' प्रेसमध्ये छापण्यात आल्याचा उल्लेख केलाच आहे. भक्कम पायावर मराठी ग्रंथमुद्रणाची उभारणी मात्र 'अमेरिकन मिशन प्रेस'मध्येच झाली. त्यातील प्रेरणा केवळ ख्रिस्ती धर्मविषयक साहित्य छापण्याची होती. टॉमस ग्रॅहॅम छापखान्यामध्ये जबाबदारीच्या जागेवर आल्यानंतर त्याने मराठी ग्रंथमुद्रणास आवश्यक असलेली मुद्राक्षरांची उणीव भरून काढिली. याच छापखान्यात टॉमस ग्रॅहॅमने छापिलेले, १८५६-मध्ये प्रसिद्ध झालेले, संपूर्ण बायबल सुरुवातीच्या काळातील मराठी मुद्राक्षरकलेचा आणि जुळणीचा एक नमुना म्हणून आजही उल्लेखनीय आहे.

गणपत कृष्णाजींचा मुद्रण-उद्योग

४२. गणपत कृष्णाजींचे अधिकृत चरित्र लिहिले गेलेले नाही. उपलब्ध त्रोटक माहिती-वरून[३८] त्यांचा जन्म इ. स. १८००-मध्ये झाला आणि त्यांनी १८३१-मध्ये छापखाना काढिला, असे समजते. त्यापूर्वी ते अमेरिकन मिशन प्रेसमध्ये होते आणि तेथे टॉमस ग्रॅहॅमकडे

३७. *मराठी दोलामुद्रिते*, सं. प्रा. मु. आ. गावस्कर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, आवृत्ती २ री, १९६१.

३८. देव, बाळकृष्ण नारायण, 'गणपत कृष्णाजी', *विविधज्ञानविस्तार*, पु. ५३, १९२२, पा. ४१९–२६.

नाईक असें होतें तेंच चालविले सन् सोळाशे सुमारें त्या कुळाचा एक पुरुष यंगोजी
नाईक होता, त्याला लोक जगपाळ ह्मणत. तो मोटी पुंडाई करीत असे त्याची बहीण
शिवाजी महाराजाची माय आजी. मलावरीचे देशमूख झुंझारराव, ते घाटगे यांचे
कुळांत श्रेष्ठ होते, त्यांचें राहाणे स्वदेश देशीं असे; त्यांचे देशाची मर्यादा व निंबाळ-
कर यांचे देशाची मर्यादा या दोहों मध्यें महादेवाचा डोंगर. ते घाटगे मान परगण्या-
चे देशमूख होते त्यांचे मूळपुरुषास ब्राह्मणी वंशाचे बादशाहाने +मनसब् दिल्ली हो-
ती. ती तारीख कोणती व तो बादशाह् कोणे नावाचा होता तें कळत नाहीं. विजापूरचा
बादशाह इभ्राहीम आदिलशाह, याणें घाटगे यांस *सरदेशमुखी व झुंझारराव अ-
सें नाव, सन् सोळाशें सघिसांत दिलें. पूर्वी पासून घाटगे यांचे कुळाचा स्वभाव आप-
ल्ये आपल्यांत भांडावें असा लोकांत प्रसिद्ध आहे. माने यांचे मूळपुरुष ह्मसवडचे दे-
शमूख होते, त्यांची जागा व घाटगे यांची जागा दोन्हीं शेजारीं होत्या. ते विजापूरकरां-
जवळ †शिलेदारी करून विख्यात झाले. घोरपडे यांचें मूळचें उपनाव भोंसले होतें.
त्यांचा एक पुरुष कोंकणचा मोठा कठीण किल्ला घ्यावयाकरितां, घोरपडीचे कमरेस
व आपल्ये कमरेस एक दोरी बांधून, घोरपड किल्यावर चढवून त्या दोरीवरून आप-
ण किल्यावर गेला; आणि तो किल्ला घेतला. ह्मणून त्याचें नाव घोरपडे पडलें आहे,
असें बखरेवरून वाटतें. विजापूरचे बादशाहींत त्याची देशमुखी होती, त्याचे कु-
ळास नावें दुसरीं, त्या नावांतच दोन होतीं एक ‡कापशी, आणि एक मुधोळ. कापशी
वारणातीरीं होते; आणि मुधोळ घटप्रभेचे कांठीं असत. डफळे विजापुराजवळ झ-
ट् परगणा आहे तेथचे देशमूख. यांचें पूर्वींचें उपनाव चव्हाण हे डफळापुरीं पाटि-
लकी करीत ह्मणून, यांचें नांव डफळे असें पडलें. विजापूरसरकारांतून त्यांस मन-
सब् अधिकार मिळाला होता; परंतु दुसरें कांहीं वेगळें नाव मिळालें नाहीं. सावंत पहि-
लेपासून वाडीचे देशमूख, त्याणीं पोर्टुगीसलोकांशीं फार चांगली लढाई केली ह्मणू-
न बादशाहानें त्यांचे नांवास बहादर असें पद जोडिलें त्यापासून सावंत बहादर अ-
सें त्यांस लोक ह्मणूं लागले. त्यांचें मूळचें उपनाव भोंसले. त्यांजवळ नुस्ती पायदळ
फौज होती, आणि त्यामुळुखीं दुसऱ्ये फौजेचा उपयोग नव्हता त्या वाडीप्रांतास कु-

---

\+ मनसब ह्मणजे, मोंगलाईत स्वारांचे सरदारी सारिखा अधिकार होता, तो कधीकधीं १०००० दहा हजार स्वारांचा असे. ते लोक त्याचे खर्चाप्रमाणें त्यास जहागीर देत असत.

---

* सरदेशमुखास विजापूरचे बादशाहींत वसूलाचा विभाग किती होता तो कळत नाहीं; परंतु दिल्लीच्या औरंजेब बादशाह याचे वेळेस किलेका सरदेशमुखाना शेकडा दोन रुपये प्रमाणें विभाग होता.

---

† शिलेदार ह्मणजे जो आपल्ये सत्तेचा घोड्यावर बसून धण्याची चाकरी करितो तो, आणि जो धण्याचे घोड्यावर बसून चाकरी करितो तो बारगीर.

---

‡ कापशी यांस विजापूरचे सरकारांत नवकस् ह्मणत, आणि मुधोळास सातकस् ह्मणत.

डाळ

आकृती २२ : प्रारंभीचे एक शिळामुद्रण, ग्रॅण्ट डफची ‘ मराठ्यांची बखर ’, मुंबई, १८२९.
(मुद्रणाच्या सोयीसाठी पानाचा आकार लहान केला आहे.)

अनुक्रमणिका


मुद्राक्षर-निर्मितीची कला शिकले, असे *अक्षरसाधना*कर्ते कुळकर्णी म्हणतात. ही माहिती त्यांनी देवांच्या *विविध-ज्ञानविस्तारा*तील लेखावरून घेतली असावी. परंतु मला ती संभवनीय वाटत नाही. '*मुंबईवर्णन*'कार सांगतात :

> "अमेरिकन मिशनरींनीं सन १८१३ त छापखाना घालून खिस्ती धर्म प्रकरणीं मराठी भाषेंत शिलाछापावर पुस्तकें छापण्याचा कारखाना सुरू केला. हीं त्यांचीं पुस्तकें छापून बाहेर पडलेलीं पाहून मयत गणपत कृष्णाजी यांच्या मनांत (१८२५—३०, शके १७६२, म्हणजे सन १८४०) आलें कीं आपणही असाच कारखाना उभारून हिंदुधर्म प्रकरणीं व दुसरीं पुस्तकें छापावीं...प्रथम त्यांनीं लांकडी यंत्र आपल्या हातानें तयार केलें. आणि लहान शिलांचे तुकडे इकडून तिकडून जमवून त्यांवर अक्षरें कशीं उठतात ही कृति करून पाहिली. मग शाई वगैरे कशी करतात त्याच्या शोधास लागले. प्रथम त्यांनीं आपल्या तर्कानें दोनचार प्रकारची शाई करून पाहिली. मग हळूहळू श्रम आणि उद्योग ईहीं करून त्यांनीं ही सर्व कृति साध्य करून घेतली. जसेंजसें हें काम त्यांस साधत गेलें तसतसी उमेद येऊन त्यांनी सर्व गोष्टी अनुकूल करून घेतल्या. त्यांचें सगळें धोरण छापखान्याच्या कामांत गम्य करून घेण्याकडे लागलें होतें. आणि तें त्यांनीं साध्य करून घेतलें. मग त्यांनीं येथें (मुंबईस) एक लोखंडी प्रेस करवून मोठ्या शिला विकत घेऊन लहानलहान ग्रंथ छापण्याचे काम सुरू केले. शके १७५३ (सन १८३१)त त्यांनीं आपण स्वतः लिहून त्या वर्षाचें मराठी पंचांग छापिलें. शके १७६५ (सन १८४३) मध्यें त्यांनीं स्वतः टैप करण्याचें कसब साध्य करण्याचा उद्योग मांडिला आणि मोठ्या प्रयत्नानें अक्षरांचे सांचे तयार करून ते ओतविण्याचा कारखाना घातला आणि सर्व प्रकारचीं अक्षरें तयार करून टैपाचा छापखाना चालू केला."[३७]

४३. टॉमस ग्रॅहॅमचा मुद्राक्षर-निर्मितीचा उद्योग १८३५-पर्यंत व्यवस्थितपणे कार्यान्वित झालेला नव्हता. गणपत कृष्णाजी बालवयात मिशन प्रेसमध्ये होते असे मानिले, तरी त्यांनी तो छापखाना सोडीपर्यंत तेथे मराठी मातृका तयार झाल्या नव्हत्या, ही गोष्ट स्पष्ट आहे. ग्रॅहॅमने १८३१–३२-च्या सुमारास प्रथम मराठी मुद्र तयार केले होते. परंतु प्रत्यक्षात ते उपयोगात आले नाहीत. ग्रॅहॅमची मराठी मुद्राक्षरे पुढे १८३६-मध्ये तयार झाली, तेव्हा गणपत कृष्णाजींचा शिळा छापखाना सुरू होऊन पाच वर्षे झाली होती. म्हणून गणपत कृष्णाजींचा उद्योग हा स्वयंभू होता, असे म्हटले पाहिजे. त्यांनी स्वतः शिळाप्रेस बनविला. (१८३१–३२). शाईही गणपत कृष्णाजींनी स्वतःच बनविली, आणि पुढे (१८४३) मुद्राक्षरे पाडण्यास सुरुवात केली. मात्र त्यांचा मदतनीस रामजी नावाचा लोहार हा टॉमस ग्रॅहॅमचा सहाध्यायी होता, असे म्हणतात. गणपत कृष्णाजींचा शिळा-छापखाना सुरू होण्यापूर्वी सात वर्षे अगोदर इंग्लंडहून शिळाप्रेस मागविण्यात आले होते. आणि ते चालविण्यास इंग्रज सुपरिण्टेण्डण्टच पाहिजे, अशी तेव्हा समजूत होती.

> "... a more able superintendence than is likely to be obtained from natives and a more constant employment than would thus be ensured

३७. माडगावकर, गोविंद नारायण, *मुंबईचें वर्णन*, मुंबई, १८६३, पान २४६–४७.


अंक १ शाकुंतलनाटक. २७

राजा— (त्वरेनें जवळ जाऊन मोठ्या क्रोधानें स०)

आर्या.

पुरवंशाचा नृप हा शास्ता असतां हि दांडगा, ईनें ॥
कोण असा पीडितसे, जेसा वृक दुष्ट दांड गाईंतं ॥
(सान्या राजास पाहून चपापतात)

अन०— अंज्ज ! ण किम्पि अच्चाहिदं, किंदु इयंणो पिअसही दुठ्ठमहुअरेण आउलीकिअमाणा कादरीभूदा । इति शकुन्तलां दर्शयति ।

अन०— महाराज, कांहीं फारसें सांगावयाजोगें भय नाहीं, ही आमची प्रियसखी हा भुंग्याला भ्याली आहे. एवढेंच. (असें बोलून शकुंतलेतें दाखविते.)

राजा— शकुन्तलाभिमुखो भूत्वा अयि ! तपो वर्द्धते ?

राजा— (शकुंतलेच्या समोर उभा राहून) हे तपस्विनि निर्विघ्नपणें तपोवृद्धि होत आहेना ?

शकुं०— ससाध्वसावनतमुखी अवचना तिष्ठति ।

शकुं०— (कांहींच उत्तर न देतां भयानें खालीं मुख करून उगीच उभी राहती)

अन०— दाणिं अदिधिविसेसलाहेण ।

अन०— या समयीं आपल्यासारिख्या अतिथीच्या लाभानें तपाची वृद्धी आहेच.

प्रियं०— सांअदं अज्जस्स ! हला सउन्दले ! गच्छ. उडआदो फलमिस्सं अग्घभाअणं उवहर, इदम्पि पादोदअं भविस्सदि । इति घटं दर्शयति ।

प्रिय०— आर्यांचे स्वागत असो (असें राजाशीं बोलून) शकुंतले, आज आपणास मोठ्या अतिथीचा लाभ झाला आहे, याकरितां तूं पर्णशाळेंत जाऊन पुष्पें, फळें इत्यादिक पूजेचें साहित्यानें युक्तपात्र घेऊन ये. हें येथें पाद प्रक्षालनास उदक आहेच.

(असें बोलून पाण्यानें भरलेला घट दाखविते)

छाया— १ आर्य ! न किमपि अत्याहितम्, किन्तु इयं नःप्रियसखी दुष्टमधुकरेण आकुलीक्रियमाणा कातरीभूता । २ इदानीमतिथिविशेषलाभेन । ३ स्वागतमार्यस्य ? अपि शकुन्तले ! गच्छ उटजात् फलमिश्रमर्घ्यभाजनमुपहर, इदमपि पादोदकं भविष्यति ।

आकृती २३ : गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात मुद्रित झालेले 'अभिज्ञानशाकुंतल' १८६९.


is essential, to render the establishment expert. One European superintendent would be required for one press. ."[३८]

४४. गणपत कृष्णाजींनी मूळ छापखाना स्थापन केला, तो हिंदुधर्मविषयक साहित्य मुद्रित करून प्रसिद्ध करण्याकरिता. तो शिळा-छापखाना होता. त्यांचे पहिले प्रकाशन पंचांग होते. दरम्यानच्या काळामध्ये 'स्कूल बुक सोसायटी'चा छापखाना, 'डिपार्टमेंट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन'चा छापखाना आणि 'सरकारी शिळा-छापखाना' यांतून शिळायंत्रावर शालोपयोगी पुस्तके छापण्याचे काम सुरू झाले होते. पाठ्यपुस्तके अगदी सुरुवातीच्या काळामध्ये सरकारी क्षेत्रातच प्रसिद्ध होत होती. त्यानंतर पाठ्यपुस्तकेच नव्हेत, तर शैक्षणिक महत्त्वाचे ग्रंथही मोठ्या प्रमाणावर छापण्याची सुरुवात गणपत कृष्णाजींनी केली. ह्या छापखान्यातून दादोबांचे *व्याकरण* १८३६-मध्ये प्रसिद्ध झाले. गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात मुद्रित झालेले हे पहिले उपलब्ध पुस्तक होय. ते शिळाप्रेसवर छापिले होते. त्यानंतर या छापखान्यात अनेक भाषाविषयक आणि इतर विविध विषयांवरील ग्रंथ प्रसिद्ध झाल्याची नोंद दोलामुद्रिते या यादीमध्ये केलेली आहे. गणपत कृष्णाजींच्या छापखान्यातून सात-आठ नियतकालिके निघू लागली होती. गणपत कृष्णाजींच्या निधनानंतर (१८६०) त्यांचे सुपुत्र कान्होबा यांना जर जास्त आयुष्य लाभले असते, तर मराठी मुद्रण-व्यवसायाचे भले झाले असते, असे आता म्हणता येते. कान्होबांच्या मृत्यूनंतर (१८६५) मुद्रणालयाची व्यवस्था रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक आणि गंगाधर गोविंद फडके या विश्वस्तांकडे गेली. त्यांच्या कारकीर्दीत 'जैसे थे' परिस्थिती होती. गणपत कृष्णाजींचे नातू आत्माराम हे वयात आल्यावर छापखान्याची व्यवस्था त्यांनी आपल्या हातांत घेतली (१८७१). परंतु आठ-दहा वर्षांतच झालेल्या त्यांच्या निधनानंतर (१८८०) छापखान्याची व्यवस्था पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांजकडे गेली. त्यांनी १९००-पर्यंत छापखान्याची चांगली देखभाल केली. परंतु नंतरमात्र गणपत कृष्णाजींचा छापखाना डबघाईस आला. इ. स. १९१४-मध्ये बेकायदेशीर मजकूर छापल्यामुळे छापखान्यावर जप्ती आली आणि त्याचा लिलाव झाला.

गणपत कृष्णाजींची मुद्राक्षर-लेखनकला

४५. गणपत कृष्णाजींच्या पूर्वी टॉमस ग्रॅहॅमने देवनागरी मुद्राक्षरे तयार केली होती. परंतु त्यांत विविध वळणे आणि आकार नव्हते. ते गणपत कृष्णाजींनी स्वतः तयार करविले. या छापखान्यात मुद्रित झालेल्या *शाकुंतला*ची (१८६९) प्रत माझ्या संग्रही आहे. तीत विविध आकारांची मुद्राक्षरे वापरली आहेत. ग्रांथिक मुद्राक्षरलेखनकलेचा (Book Typography) तो एक चांगला नमुना आहे. यात वापरलेल्या मुद्राक्षरांचे पुढे काय झाले, कळत नाही. लिलावात निघालेल्या इतर छापखान्यांप्रमाणे जुने सामान बोहऱ्यांनी विकत घेऊन बहुधा

38. Quoted in the "*Printing Press in India*" by A. K. Priolkar, Bombay 1955, p. 92. *The Bombay Secretariat Records*, G. D. Vol. 14/70 of 1824, pp. 57–59, Vol. 1, p. 12.



आकृती २४ : मोडी मुद्रणाचा एक नमुना, 'बोधवचने', मुंबई, १८३३.

भट्टीत घातले असेल. दोनतीन वळणे मात्र आजही केसरी मुद्रणालयात उपलब्ध आहेत, आणि त्यांच्या मातृकाही तेथेच असाव्या. त्यांचे संरक्षण झाले पाहिजे.

४६. गणपत कृष्णाजींनी आपल्या कामगिरीस सुरुवात केली, तेव्हा मुद्रणकलेची येथे फारशी माहिती नव्हती. *मुंबईचें वर्णन*कर्ते कै. माडगावकर म्हणतात :

> "भरतखंडांतील लोकांस शिळाछाप म्हणजे काय ? व ठसेछाप म्हणजे काय ? हें पुष्कळ वर्षेपर्यंत स्वप्नींही ठाऊक नव्हतें. छापल्यानें कागदावर अक्षरें निघतात व त्यांपासून पुस्तकें होतात हाटलें ह्मणजे या लोकांस मोठें अद्भुतच वाटे. एकदा छापलेला कागद पाहिला ह्मणजे स्वर्गाहून विमान आल्यासारिखें लोक पाहायला जमत." [३९]

अशा परिस्थितीत अनेक आपत्तींना तोंड देत महाराष्ट्रात मुद्रणोद्योगाचा भक्कम पाया घालण्याचे श्रेय हे गणपत कृष्णाजींस द्यावयास पाहिजे. ते टॉमस ग्रॅहॅमचे समकालीन होते. मिशन छापखान्यात तयार झालेली मुद्राक्षरे पाहून गणपत कृष्णाजींस देवनागरी मुद्राक्षरे तयार करण्याची स्फूर्ती झाली, असे एकवार म्हणता येईल. परंतु त्यांच्या छापखान्यात तयार झालेली मुद्राक्षरे विविध वळणांची आणि आकारांची आहेत, ही गोष्ट लक्षात घेता त्यांच्या निर्मितीचे श्रेय गणपत कृष्णाजींनाच द्यावयास पाहिजे. चित्रे व नक्षी, कोरीव-कातीव काम करण्याचे व वेलबुटी करण्याचे काम ते स्वतः करीत, असे *मुंबईचें वर्णन*कर्ते सांगतात. महाराष्ट्रात सुबक मुद्रणाचा पाया गणपत कृष्णाजींनी घातला, ही गोष्ट त्या छापखान्यात छापिलेल्या उपलब्ध पुस्तकांवरून आजही लक्षात येण्याजोगी आहे. इ. स. १८०५ ते १८६९ या कालात छापिलेल्या आणि आज उपलब्ध असलेल्या सुमारे ९०० मराठी पुस्तकांपैकी सर्वांत जास्त म्हणजे १९९ पुस्तके गणपत कृष्णाजींच्या छापखान्यांत छापिलेली आहेत.

सनातन्यांचा मुद्रणविरोध

४७. गणपत कृष्णाजींच्या मराठी प्रकाशनांपूर्वी 'कूरिअर प्रेस', 'सरकारी शिळाछापखाना', 'सोसायटीचा छापखाना', 'अमेरिकन मिशन प्रेस' यांमध्ये शालोपयोगी पुस्तके छापिली गेली होती. त्यांचा मूळ हेतू एतद्देशीय गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा होता. शिवाय, 'मिशन प्रेस'मधून ख्रिस्ती धार्मिक पुस्तके प्रसिद्ध होत. त्यामुळे आणि आपल्या मुद्रित पुस्तकांबाबतच्या एकंदरीच्या अनास्थेमुळे नवीन पुस्तकांना लोक बिचकत. मुद्रणास लागणारी शाई चरबीयुक्त असते, हेही कारण तेव्हा देण्यात येई. कै. माडगावकर लिहितात :

> "आमचे कित्येक भोळे व नैष्ठिक ब्राह्मण छापलेल्या कागदांस स्पर्श करण्यास भीत असत, आणि अद्याप मुंबईत व बाहेर छापील कागदास शिवत नाहींत, व छापलेलें पुस्तक वाचीत नाहींत, असे पुष्कळ सांपडतील." [४०]

३९. माडगावकर, गोविंद नारायण, *मुंबईचे वर्णन*, १८६३, पान २४६.
४०. कित्ता, पा. २४८.

मग उगचि कां शंकामनांत आणितेस?

सीता—तर मग आपण निःशंक पुढें जाऊं.

(असें ह्मणून दोघी पुढें जातात.)

राम०—हे भगवती गोदावरी तुला नमस्कार असो.

वासंती—रामदेवा, आनंदाची गोष्ट झाली. सीतादेवींचा पुत्र गजराज स्त्रीसहवर्तमान विजयी होऊन आला.

राम०—हे पुत्रका, विजयी आणि दीर्घायूहो.

सीता—काय आश्चर्य हें! एकून माझा लाडका वत्स इतक्या योग्यतेचा झालाना?

राम०—हे महादेवी जानकी, तूं मोठ्यादैवाची होस. पहा.

श्लोक.

ज्यानेंबाळपणींतुझ्याचजवळीयेऊनि* दंतांकुरें ॥
ओढावातव† कर्णपल्लवभयेंदूरूनि‡ किंवाकरें ॥
तोह्यापुत्रतुझा§ गजायुतबळीझालाकसागेपहा ॥
जेंकल्याणघडे|| वयांततरुणान्याजाहलापात्रहा ॥ २० ॥

सीता—ह्याला उदंड आयुष्य असो. आणि ह्याला स्वस्त्रीशीं वियोग कधीं नघडो.

राम०—गे सखि वासंती, बायकोची बरदास्त कशीठेवावी ह्याविषयींचें चातुर्य हा वत्स कसाशिकला आहे पहा!

श्लोक.

¶ श्रांता** स्वकांतानिरखूनिसत्वरी ॥
†† करीकरानें‡‡ जलसेकतीवरी ॥

---

* दंताग्रानें. † काना वरचा भूषण रूप पल्लव. ‡ शुंडाग्रानें.
§ दहासहस्र हत्तींचें बळज्यास. || तरुणवयांत.
¶ दमलेली. ** स्वस्त्री. †† सोंडेनें. ‡‡ शिडकाव.

आकृती २५ : मुंबईतील निर्णयसागरपूर्व मुद्रण, 'उत्तरराम चरित्र नाटक', १८५९.
(एल. एम्. डिसोजा यांचा प्रेस)

अनुक्रमणिका

४८. अशा या परिस्थितीत वर सांगितल्याप्रमाणे मुख्यतः ब्राह्मणांच्या उपयोगाचे पंचांग गणपत कृष्णाजींनी १८३१ साली छापून प्रसिद्ध केले. त्यांत त्यांच्या ज्या ज्योतिषी मित्राने मदत केली, ते संस्कृतज्ञ रखमाजी जातीने शिंपी होते. या पंचांगासंबंधी ***विविधज्ञान-विस्तारा***चे संपादक हरी माधव पंडित म्हणतात :

"तें पंचांग प्रसिद्ध करणारे छापखान्याचे मालक ब्राह्मणच असले पाहिजेत असें मुंबईच्या बाह्यप्रदेशीय लोकांस वाटे व ते त्यांस वेदशास्त्रसंपन्न रा. रा. अशा मायन्यांचीं पत्रें लिहीत. त्या परस्थांस जर कोणीं हे भंडारी आहेत असें सांगितलें, तर ते त्यांस खरें वाटत नसे, कारण अशा जातींतल्या पुरुषाचें अंगीं असले ब्राह्मणी गुण असंभाव्य आहेत, अशी त्यांची दृढ समजूत होती. प्रथमतः जेव्हां हें पंचांग प्रसिद्ध होऊं लागलें, तेव्हां मुंबईतील ब्राह्मण मंडळी तें शिंप्यानें तयार केलेलें पंचांग म्हणून त्याचा उपयोग करण्याचा कंटाळा करीत. परंतु स्थळ पडलें मुंबई व राज्य पडलें इंग्रजांचें ! म्हणून आमची जुन्या समजुतीची मंडळी गप्प बसली, नाहीं तर हें पंचांग वर्तविणारे ज्योतिषी व त्यांचे पुरस्कर्ते छापखान्याचे मालक यांचें आमच्या कर्मठ राजांच्या कारकीर्दीत खचित हात कलम केले गेले असते."[४१]

४९. गणपत कृष्णाजींचे पंचांग १८३१-नंतर दरवर्षी निघू लागले, आणि विद्वानांच्या हातांत पडू लागले. तरी मुद्रित ग्रंथांविषयीचा विरोध काही कमी झाला नव्हता. कै. जांभेकरांनी '*दिग्दर्शन*' नियतकालिक सुरू केले, त्यात ते लिहितात :

"या छापाच्या शाईत चर्बी पडत असते. त्यामुळें छापलेलें पुस्तक अपवित्र अशी लोकांची समजूत आहे, म्हणून याविषयीं कांही लिहिलें पाहिजे. घरजिनसांच्या याद्या लिहिल्या आहेत. त्यांत तूप अथवा चर्बी असें आहे. परंतु हें दिग्दर्शन ज्या छापखान्यांत छापतात, तेथे चर्बीच्या ठिकाणीं तुपाचा उपयोग करितात व तेणेकरून काम चर्बीप्रमाणें होते. परंतु तुपामध्ये चरबी-प्रमाणें तेज नाहीं म्हणोन मेहनत जास्त पडती."[४२]

यानंतर अनेक वर्षांनी रा. सा. मंडलीक यांनी *तुकारामगाथा* गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात छापविला. त्याबाबत त्यांचे स्नेही रावजी सखाराम लिमये २७ मार्च १८३७-च्या पत्रात लिहितात :

"तुकारामाच्या गाथांच्या प्रती पुष्कळ खपतील, परंतु छापील प्रती घेण्यांस लोकांचा अंदेशा आहे. कारण शाईत कांहीं वर्ज्य पदार्थ आहेत असें त्यांच्या मनानें घेतलें आहे. अक्षर मोठें, सुवाच्य व शिळाछाप असावें व शाईची खात्री द्यावी."[४३]

'अक्षर शिळाछाप असावे,' या वाक्यास महत्त्व आहे. त्या काळी '*विदुरनीती*'मध्ये विल्किन्सची वापरलेली मुद्राक्षरे, कलकत्त्याहून मागविलेली मुद्राक्षरे आणि 'अमेरिकन

४१. पंडित, हरी माधव, *विविधज्ञानविस्तार*, पुस्तक २४, जून १८९२.

४२. *दिग्दर्शन*, पुस्तक १, १८४०. पा. २१२

४३. पहा—हवालदार, ग. रा., *रा. सा. मंडलिक यांचें चरित्र*, खंड दुसरा, पा. ९५९.

मिशन प्रेस'मध्ये नुकतीच पाडलेली टॉमस ग्रॅहॅमची मुद्राक्षरे, अशी तीन प्रकारची देवनागरी मुद्राक्षरे उपलब्ध होती. ती जरी शक्यतो तत्कालीन हस्तलिखितांतील अक्षरवटिकांप्रमाणे केलेली होती, तरी त्या काळी शिळाप्रेसवर छापण्यात येणाऱ्या उत्तम हस्ताक्षरांची त्यांना सर नव्हती. पुढे १८४३-मध्ये गणपत कृष्णाजींनी देवनागरी मुद्राक्षरांचा वापर सुरू केला, आणि त्यानंतर देवनागरी मुद्राक्षरे उत्तरोत्तर सुबक होत गेली.

मराठीतील १८६९-पर्यंतचे ग्रंथमुद्रण

५०. इ. स. १८६७-अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांची जी एक यादी *मराठी दोलामुद्रिते* म्हणून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने प्रसिद्ध केली आहे, तीमध्ये ८४४ ग्रंथांची नोंद आहे. शिवाय, ब्रिटिश म्यूझियम, तंजावूरचे सरस्वतीमहाल ग्रंथालय, पुण्याचे मध्यवर्ती मराठी ग्रंथालय, कलकत्त्याचे राष्ट्रीय ग्रंथालय, श्रीरामपूरचे 'केरी' ग्रंथालय, डॉ. विल्यम यांतून संरक्षिलेली अशी सुमारे एकंदर ९०० पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांत भर घालून १९६९ पर्यंत छापिलेल्या उपलब्ध ग्रथांची मी एक यादी केली आहे. त्यांपैकी बहुसंख्य म्हणजे १९९ ग्रंथ गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात मुद्रित झालेले आहेत. त्यांखालोखाल 'अमेरिकन मिशन प्रेस'मध्ये आणि टॉमस ग्रॅहॅम यांच्या प्रेसमध्ये १८१७ ते १८६०-पर्यंत १०७ पुस्तके छापिली आहेत. या यादीत सुमारे* १०१ छापखान्यांची आणि ९१३ पुस्तकांची नोंद आहे. केवळ इंग्रजी किंवा गुजराती पुस्तके छापणारे छापखाने या यादीत आलेले नाहीत. तीत मुंबईचे छापखाने निम्म्याहून अधिक म्हणजे ५९ आहेत. पुण्यास या मुदतीत सोळा छापखान्यांत पुस्तके छापिली आहेत. अहमदनगरसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी या काळात (१८४२ ते १८६९) पाच छापखान्यांत पुस्तके छापिलेली आहेत. नाशिकला मिशनऱ्यांच्या खटपटीमुळे १८३५-मध्येच छापखाना सुरू झाला होता असे दिसते. रत्नागिरी-सारख्या ठिकाणी असलेल्या जगन्मित्र छापखान्यात १८५४-पासून १८६९-पर्यंत पंचवीस पुस्तके छापली होती. बेळगाव (१८५०), कोल्हापूर (१८५७), भोर (१८६७) या ठिकाणीच केवळ नव्हे, तर कराची (१८६७) आणि धारवाड (१८५८) यांसारख्या महाराष्ट्राबाहेरच्या शहरांतील छापखान्यांतही एकेक मराठी पुस्तक छापिलेले आढळते. या यादीत नागपूरचा एकच छापखाना आहे. तेथे १८६९-मध्ये छापलेले पुस्तक उपलब्ध आहे. निर्णयसागर छापखाना १८६९ साली सुरू झाला असला तरी त्या साली छापलेले पुस्तक उपलब्ध नाही.

५१. इ. स. १८६९-च्या पूर्वी ग्रंथमुद्रण करीत असलेल्या ज्या छापखान्यांतून त्या सालापर्यंत दहांहून जास्त पुस्तके छापिली, अशा प्रमुख छापखान्यांची खालील यादी उद्बोधक ठरेल.

* 'सुमारे' म्हणण्याचे कारण काही पुस्तकांवर मुद्रणालयाचे नाव नाही, तर काही नावे स्पष्टार्थसूचक नाहीत.

अनुक्रमणिका

परिशिष्टातील क्रमांक	मुद्रणालय	ठिकाण	काळ	पुस्तकांची संख्या
१	श्रीरामपूर मिशन प्रेस	श्रीरामपूर	१८००–१८३०	१३
२	कुरिअर प्रेस	मुंबई	१८०५–१८२५	११
४	अमेरिकन मिशन प्रेस	मुंबई	१८१७–१८५८	८४
५	सरकारी शिळा छापखाना	मुंबई	१८२८–१८३८	१०
७	आर. प्रेरा यांचा छापखाना	मुंबई	१८३२–१८३९	१२
१५	गणपत कृष्णाजींचा छापखाना	मुंबई	१८३६–१८६९	१९९
१६	सरकारी पाठशाळेचा छापखाना	पुणे	१८४०–१८५८	४४
२२	विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचा छापखाना	मुंबई	१८४६–१८५८	२४
२७	ज्ञानप्रकाश छापखाना	पुणे	१८४९–१८६८	४५
३१	ज्ञानदर्पण छापखाना	मुंबई	१८५१–१८६३	२७
३३	बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा छापखाना	मुंबई	१८५२–१८६७	२३
३८	जगन्मित्र छापखाना	रत्नागिरी	१८५४–१८६९	२५
३९	बापू हरशेट देवळेकर यांचा छापखाना	मुंबई	१८५४–१८६८	१५
४०	बापू सदाशिव हेगिष्टे यांचा छापखाना	मुंबई	१८५४–१८६७	११
४३	टॉमस ग्रॅहॅम यांचा छापखाना	मुंबई	१८५६–१८६०	२३
५०	माधव चंद्रोबा डुकले यांचा छापखाना	मुंबई	१८६०–१८६८	४३
५१	एक्स्चेंज प्रेस	मुंबई	१८५९–१८६४	२
६०	इंदुप्रकाश छापखाना	मुंबई	१८६२–१८६९	५२
६१	नारो अप्पाजी गोडबोले यांचा छापखाना	पुणे	१८६२–१८६५	१०
६९	ओरिएंटल छापखाना	मुंबई	१८६४–१८६९	४८

दक्षणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी.



मुंबई.

परिशिष्ट अ

इ. स. १८६९-अखेरपर्यंत
मराठी ग्रंथमुद्रण करीत असलेल्या
मुद्रणालयांची यादी
आणि उपलब्ध मराठी ग्रंथांची संख्या

अनुक्रमणिका

दोलामुद्रिते या ग्रंथात उल्लेखलेली आणि त्यांशिवाय लेखकाच्या संग्रहातील आणि इतरत्र पाहण्यात आलेली मराठी पुस्तके (१८६९-अखेरपर्यंत) ज्या मुद्रणालयांत छापण्यात आली, त्या मुद्रणालयांची यादी आणि उपलब्ध ग्रंथांची संख्या. तारांकित मुद्रणालयांमध्ये १८६९-नंतरही पुस्तके छापली जात होती.

क्रमांक	छापखान्याचे नाव	मुद्रण-स्थळ	मुद्रणकाल	दोलामुद्रित क्रमांक	पहिले उपलब्ध पुस्तक	पुस्तक-संख्या
१	मिशन प्रेस	श्रीरामपूर	१८००।३०	१	अ ग्रामर ऑफ द महरट्ट लँग्वेज	१३
२	कूरिअर प्रेस	मुंबई	१८०८।२९	२	इलेस्ट्रेशन ऑफ द ग्रॅमॅटिकल पार्ट्स	११
३	राजा सर्फोजींचे मुद्रणालय	तंजावूर	१८०९।१२	—	बालबोध मुक्तावली (ब्रिटीश म्यूझियम)	६
४	अमेरिकन मिशन प्रेस	मुंबई	१८१८।५८	७	इंग्लिश भाषणाचे ज्ञान : सोपा उपाय	८४
५	स्कूल बुक सोसायटीचा छा.	मुंबई	१८२६।३३	१६	गणित मार्ग, दुसरा भाग : अपूर्णांक	६
६	सरकारी शिळाछापखाना	मुंबई	१८२८।३८	१९	शिक्षामाला, प्रथम पुस्तक	१०
७	आर. प्रेराचा छापखाना	मुंबई	१८३२।३९	२९	मराठी बोधवचने, आ. ४ थी	१२
८	डी. पी. आय. प्रेस	पुणे	१८३२	३०	भूगोल आणि खगोल संवाद	१
९	ज्ञानोदय छापखाना	मुंबई	१८३३	३१	दुसरा इंग्लिश इन्स्ट्रक्टर	१
१०	न्यू बाँबे लिथोग्राफिक प्रेस	मुंबई	१८३४	३५	महाराष्ट्र विदुरनीति	१
११	दर्पण छापखाना	मुंबई	१८३५।३७	३६	गणितशास्त्राचा उपयोग : संवाद	२
१२	आपा रामा यांचा छा.	मुंबई	१८३५।५०	६६	मेदी आणि पार्शी : वृत्तांत कथन	९
१३	मिशन प्रेस	नाशिक	१८३५।३९	३८	हेन्री आणि गडी संभू यांची गोष्ट	४
१४	सावकारी छापखाना	मुंबई	१८३५	४१	श्री श्लोक रामदासी	१
१५	गणपत कृष्णाजींचा छापखाना*	मुंबई	१८३६।६९	४४	दादोबाचे मराठी भाषेचे व्याकरण	१९९
१६	सरकारी पाठशाळेचा छा.†	पुणे	१८४०।५८	७६	अंकगणित, दुसरा भाग—अपूर्णांक	४४
१७	आंग्रोळीतील छापखाना	मुंबई	१८४०।४८	७९	पहिली प्रश्नोत्तरावळी, आ. ८ वी	४
१८	मिशन (शिळा) छापखाना	नगर	१८४२।४७	८९	शनीश्वर नवग्रहाची वार्ता – पद्य	२
१९	ज्ञानसिंधू छापखाना	मुंबई	१८४२।६७	९२	फुर्डुकवही, म्हणींचा संग्रह	७
२०	प्रभाकर छापखाना*	मुंबई	१८४३।४९	९७	शब्दसिद्धि निबंध	४
२१	मित्रोदय छापखाना	पुणे	१८४४	१०२	आरत्या भाग २	१
२२	वि. स. अग्निहोत्री यांचा छा.	मुंबई	१८४६।५८	१२१	हिंदुस्थानचा इतिहास, जांभेकर	२४
२३	मुकुंदराव देवजी व गोविंदराव पांडुरंगजी यांचा छा.	मुंबई	१८४७	१३६	नित्यकर्म गद्य-पद्य	२
२४	धर्माधिरत्न छापखाना	मुंबई	१८४७।४८	१३९	वृद्ध चाणक्य	२
२५	बापू हरशेट देवळेकर व बापू सदाशिव हेगिष्टे यांचा छा.	मुंबई	१८४७	१४०	सिंहासनबत्तिशी	१
२६	लक्ष्मण विठोजी यांचा छा.	मुंबई	१८४७	१६२	स्वप्नचिंतामणि	१

† तीन पुस्तकांवर ‘ पूना कॉलेज ’ व एकावर ‘ संस्कृत पाठशाळा ’ असा निर्देश आहे.

अनुक्रमणिका

क्रमांक	छापखान्याचे नाव	मुद्रण-स्थळ	मुद्रणकाल	दोलामुद्रित क्रमांक	पहिले उपलब्ध पुस्तक	पुस्तक-संख्या
२७	ज्ञानप्रकाश छापखाना*	पुणे	१८४९।६८	१७०	मराठी भाषेतील दृष्टांतिक वाक्ये	४५
२८	पयाब्धिरत्न छापखाना	मुंबई	१८४९	१७१	भुलेश्वर माहात्म्य	२
२९	गुरुप्रसाद छापखाना	मुंबई	१८५०	१७७	अंगद शिष्टाई	२
३०	बेळगाव येथील छापखाना	बेळगाव	१८५०	१८७	राजव्यवहारकाल्मान	१
३१	ज्ञानदर्पण छापखाना*	मुंबई	१८५१।६३	२०५	गंगालहरी (सटीक)	२७
३२	गोविंदराव पांडुरंगजी यांचा छा.	मुंबई	१८५१	२०९	मराठी अँड इंग्लिश ॲसिस्टंट	१
३३	बॉम्बे एज्यु. सो. चा छा.*	मुंबई	१८५२।६७	२४०	रोगनिदान	२३
३४	मुकुंदराव देवजी यांचा छा.	मुंबई	१८५३	२५२	द्रौपदी वस्त्रहरण	१
३५	सुधाकर छापखाना	मुंबई	१८५३।५५	२७०	पद्बोधिनी गीता	३
३६	चंद्रप्रकाश छापखाना	मुंबई	१८५४।६३	२७५	चंद्रिका (नियतकालिक)	५
३७	सन्मार्गदर्शक मंडळीचा छा.	मुंबई	१८५४	२७८	बुधवळांचा ग्रंथ	२
३८	जगन्मित्र छापखाना*	रत्नागिरी	१८५४।६९	२८९	प्रातःस्मरणादि पद्य	२५
३९	बापू हरशेट देवळेकर यांचा छा.*	मुंबई	१८५४।६८	२८५	पदे	१५
४०	बापू सदाशिव हेगिष्ट्रे यांचा छा.*	मुंबई	१८५४।६७	२९६	मुक्ताबाईकृत ताटीचे अभंग	११
४१	ज्ञानमित्र छापखाना	मुंबई	१८५४	३०१	तुकाराम बुवांचे अभंग : निवडक वेचे	१
४२	ज्ञानसागर छापखाना	मुंबई	१८५५।६०	३३८	पोलीस कायदे १८२२–१८२४	४
४३	टॉमस ग्रॅहॅम यांचा छापखाना	मुंबई	१८५६।६०	३४८	उद्भिदजन्यपदार्थ	२३
४४	चौगुले यांचा छापखाना†	मुंबई	१८५६।६२	३५१	रसायनशास्त्र अथवा हुन्नर निधि	९
४५	वि. स. अग्निहोत्री यांचा छा.*	पुणे	१८५७।६७	३८७	समीकरण संग्रह	७
४६	ज्ञानप्रसारक छापखाना	कोल्हापूर	१८५७	४०४	कोल्हापूर वर्णन आणि राजांचा इतिहास	१
४७	नारो रामचंद्र ठकार यांचा छा.§	पुणे	१८५७	पु.२०	वेणीसंहार	१
४८	सन्मार्गदर्शक छापखाना	धारवाड	१८५८।६३	४१६	व्यावहारिक ज्ञानाचे पुस्तक आ. २	७
४९	एल्. एम्. डिसोजा यांचा छा.	मुंबई	१८५९।६०	४४०	दिवाणी अदालतीच्याठरावांचे भाषांतर	५
५०	माधव चंद्रोबा डुकले यांचा छा.	मुंबई	१८५९।६८	४६१	मोरोपंतकृत केकावली	४३
५१	एक्स्चेंज प्रेस	मुंबई	१८५९।६४	४५२	प्रभोदय (नियतकालिक)	१२
५२	बा. रा. ठकार यांचा छा.	पुणे	१८५९।६४	४७२	हरिश्चंद्रोपाख्यान	९
५३	ज्ञानसिंधू छापखाना	नगर	१८६०	४८३	ख्रिस्तीधर्माचे सार	१
५४	ज्ञानबोधक छापखाना	मुंबई	१८६०।६५	४९१	दामोदर कविकृत श्रीकृष्णलीला	४
५५	मुंबई समाचार छापखाना	मुंबई	१८६१	५३०	वेणीसंहार नाटक आ. २ री	२
५६	ग्रंथप्रकाशक छापखाना	मुंबई	१८६१।६३	५४०	पाळणे पद्य	५
५७	खंडेराव त्रिंबक यांचा छा.	मुंबई	१८६१	५५६	शुकबहात्तरी	१

† रामजी गणोजी (पेन्शनर) डॉक्टर. § ही नोंद '*दोलामुद्रिते*'मधील पुरवणीवरून घेतली. '*दातेसूची* 'त 'पूना कॉलेज प्रेस ', असा उल्लेख आहे.

क्रमांक	छापखान्याचे नाव	मुद्रण-स्थळ	मुद्रणकाल	दोलामुद्रित क्रमांक	पहिले उपलब्ध पुस्तक	पुस्तक-संख्या
५८	विद्यासागर छापखाना	मुंबई	१८६१।६२	५५८	सुन्नमत प्रकाश दिवाणी प्रकर्णी आक्ट	४
५९	शिलायंत्र छापखाना	पुणे	१८६२।६६	५६१	नामदेवकृत तीर्थावळीचे अभंग	३
६०	इंदुप्रकाश छापखाना*	मुंबई	१८६२।६९	५६५	सत्यासत्यविवेचन	५२
६१	ना. अ. गोडबोले यांचा छा.	पुणे	१८६२।६५	५८६	पांडुरंग स्तोत्र, महिपती	१०
६२	बुद्धिप्रकाश छापखाना*	पुणे	१८६२।६७	५९३	श्रीधर : लहुकुश आख्यान	७
६३	स. भि. खातू यांचा छा*	मुंबई	१८६३।६७	६०९	वेताळपंचविशी	२
६४	वृत्तवैभव छापखाना*	नगर	१८६३।६६	६१३	वालीवध नाटक	५
६५	सापकरआणि बंधू यांचा छा.*	पुणे	१८६३।६५	६१५	मेधावती परिणय	१
६६	कृष्णशास्त्री गुर्जर यांचा छा.	मुंबई	१८६३।६७	६२५	भजन व गणपती श्लोक	२
६७	डेक्कन हेरल्ड प्रेस	मुंबई	१८६३	६२८	मॅरेज ऑफ हिंदु विडोज	१
६८	पाछापूरकर यांचा छा.	पुणे	१८६३	६४७	सिंहासनबत्तिशी	१
६९	ओरिएण्टल छापखाना*	मुंबई	१८६४।६९	६५५	रत्नावली	४८
७०	अमरापूरकर यांचा छापखाना*	मुंबई	१८६४।६९	६६८	वैद्यजीवन	५
७१	राचल् प्रेस	मुंबई	१८६४	६५४	शिपाई-बंडाविषयी विचार	१
७२	वृत्तदीप छापखाना	मुंबई	१८६४।६८	६५४	शिपाई-बंडाविषयी विचार	२
७३	वृत्तप्रकाश छापखाना	पुणे	१८६४।६७	६५६	न्यायमधुकर	४
७४	जॉइंट स्टॉक छापखाना*	मुंबई	१८६४	पु.२५अ,	स्त्रीभूषण, नियतकालिक	१
७५	वृत्तप्रसारक छापखाना*	पुणे	१८६६।६९	७२५	चमत्कारिक गोष्टी भाग १	९
७६	ज्ञानचक्षु छापखाना*	पुणे	१८६६।६९	७३४	दिवाणी-फौजदारी निवाडे भाग२	७
७७	भोर येथील छापखाना	भोर	१८६६	७४२	सातारकर छत्रपतींचा इतिहास	१
७८	ह. ल. मापुसकर यांचा छा.*	मुंबई	१८६६	७५४	मनाचे श्लोक	१
७९	हरिबा घाटी यांचा छा.	मुंबई	१८६६	७६१	शिवलीलामृत	१
८०	जगद्धितेच्छु छापखाना*	पुणे	१८६६।६८	७६२	गुरुपाठाचे अभंग	४
८१	हरी लिंगू कदम यांचा छा.*	मुंबई	१८६७	७६९	शब्दसिद्धि निबंध	१
८२	भारतवर्षीय मुद्रणालय	कराची	१८६७	७७०	प्रयागमाहात्म्य	२
८३	न्यायसिंधू छापखाना*	नगर	१८६७	७७६	महमदीशास्त्र	१
८४	खं. बा. फडके यांचा छा.	नगर	१८६७	७८९	रत्नमाला	१
८५	युनियन प्रेस*	मुंबई	१८६७	७९७	इंग्लंडातील प्रवास	१
८६	ग. बा. मालवणकर यांचा छा.	मुंबई	१८६७	८०५	लेखनकला	१
८७	मुंबई सिटी प्रेस*	मुंबई	१८६७	८०६	संख्यावाचक दुर्बोध शब्दार्थकोश	३
८८	कल्पतरु छापखाना*	सोलापूर	१८६७	२७०	मुंबई हायकोर्टाचे निवाडे भाग १ ला	१
८९	आनंदसागर छापखाना*	धार	१८६७	२३०	शार्ङ्गधर विरचित नीतिपद्धति	२
९०	आबाजी हिंगणे डॉक्टर यांचा छा.	नगर	१८६७	३५४	वरावर्दीकृत गणित	१

क्रमांक	छापखान्याचे नाव	मुद्रण-स्थळ	मुद्रणकाल	दोलामुद्रित क्रमांक	पहिले उपलब्ध पुस्तक	पुस्तक-संख्या
९१	बेळगांव समाचार छापखाना*	बेळगांव	१८६८	३५६	समीकरण आणि सिद्धांतसंग्रह	१
९२	ज्ञानवर्धक छापखाना*	धारवाड	१८६८	२६०	खातेवारी आणि अनुक्रमणिका	१
९३	रेव्हिन्यू सर्वे छापखाना	धारवाड	१८६८	१०४७	दुरभिग मोजणीचे बुक	१
९४	वऱ्हाड समाचार छापखाना*	अकोला	१८६८	७००	वन्हिरथ राजाचे नाटक	१
९५	पारसनिवीस यांचा छापखाना	कोल्हापूर	१८६८	३१	तिथी–चिन्तामणि	१
९६	नेटिव्ह ओपिनीयन प्रेस*	मुंबई	१८६८	२६९	व्यवहार संग्रह, खंड १ ला	२
९७	बॉम्बे टाऊन प्रेस*	मुंबई	१८६८।६९	४९०	रुक्मिणी स्वयंवर, एकनाथ	३
९८	वृत्तसूचक छापखाना पुणे*	पुणे	१८६९	६२०	पुर्नदर्शन नाटक	१
९९	सर्वोदय छापखाना*	टाणे	१८६९	२७५	उमेदवारांचा साथी	२
१००	अरुणोदय छापखाना*	ठाणे	१८६९	३३	घटित पाहण्याची रीत	२
१०१	युनियन प्रेस	नागपूर	१८६९	३५५	टोंडचे हिशेब	१

टीप : वरील यादीमध्ये १०१ छापखान्यांच्या नावांची नोंद केलेली असली, तरी वस्तुतः छापखान्यांची ही खरी संख्या नव्हे. ती त्याहून कमी आहे. छापखान्याच्या मालकीचे हस्तांतर झाले, म्हणजे नावही बदलते. अमेरिकन मिशन प्रेस (क्रमांक ४) आणि टॉमस ग्रॅहॅमचा छापखाना (क्र. ४३) ही एकच मुद्रण संस्था. विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांच्या छापखान्याच्या नावाने मुंबई (क्र. २२) आणि पुणे (क्र. ४५) या दोन्ही ठिकाणांहून पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. शिवाय, 'शिलायंत्र छापखाना' पुणे (क्र. ५९) येथेही अग्निहोत्री यांनी पुस्तके छापली आहेत. पुण्यातील त्यांचे दोन वेगळे छापखाने नसून एकच असावा. नारो आपाजी गोडबोले यांचा छापखाना (क्र. ६१) आणि वृत्तप्रसारक (क्र. ७५) हाही एकच छापखाना असावा. बापू हरशेट देवळेकर व बापू सदाशिव हेगिष्टे (क्र. २५) यांच्या छापखान्याचेच पुढे 'देवळेकरांचा छापखाना' (क्र. ३९) आणि 'हेगिष्टे यांचा छापखाना' (क्र. ४०) असे दोन छापखाने झाले असावेत. तीच गोष्ट मुकुंदराव देवजी व गोविंदराव पाडुरंगजी यांच्या छापखान्याची (क्र. २३). त्याचे गोविंद पांडुरंगजी यांचा छापखाना (क्र. ३२) आणि मुकुंदराव देवजी यांचा छापखाना (क्र. ३४) असे दोन छापखाने झाले असतील. सदाशिव अमरापूरकरांच्या 'ज्ञानदर्पण' (क्र. ३१) छापखान्याचाच उल्लेख (१८६४-पासून) पुढे 'महादेव गोपाळ अमरापूरकर यांचा छापखाना' (क्र. ७०) म्हणून उल्लेख होऊ लागला. 'पयाब्धिरत्न' (क्र. २८) छापखान्याचे मुद्रक म्हणून रावजी भास्कर रानडये यांचा उल्लेख आहे. (१८४९). इ. स. १८५०-मध्ये गुरुप्रसाद (क्र. २९) छापखान्यात छापलेल्या पुस्तकावर सखारामशेट कापर्डीच्या जोडीने याच रावजी भास्कर रानडये यांचे नाव आहे. त्यानंतर (१८५३) 'सुधाकर' (क्र. ३५) छापखान्याचे चालकत्व त्यांच्याकडे आलेले दिसते. इ. स. १८५५-मध्ये त्याच्या बरोबरच मुकुंदराव देवजींचेही नाव आले आहे. त्यावरून मुकुंदराव देवजींचा छापखाना 'सुधाकर'मध्ये सामील झाला की काय नकळे! एकंदरीत हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

श्रीगणेशाय नमः ॥

ब्रह्मा रुद्रः कुमारो हरिवरुणयमा वह्निरिन्द्रः कुबेर
श्चन्द्रादित्यौ सरस्वत्युदधिघननगा वायुरुर्वी भुजङ्गाः ।
सिद्धा नद्यो ऽश्विनौ श्रीर्दितिरदितिसुता मातरश्चण्डिकाद्या
वेदास्तीर्थानि यज्ञा गणवसुमुनयः पान्तु नित्यं ग्रहाश्च ॥ १ ॥
मनवे वाचस्पतये शुक्राय पराशराय ससुताय ।
चाणक्याय च विदुषे नमो ऽस्तु नयशास्त्रकर्तृभ्यः ॥ २ ॥
सकलार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदं ।
तन्त्रैः पञ्चभिरेतच्चकार सुमनोहरं शास्त्रं ॥ ३ ॥

तद्यथानुश्रूयते। अस्ति दाक्षिणात्ये जनपदे मिहिलारोप्यं नाम नगरं। तत्र च सकलशास्त्रकल्पद्रुमः प्रवरनृपमुकुटमणिमरीचिचयचर्चितचरणः सकलकलापारं गतो ऽमरशक्तिर्नाम राजा बभूव। तस्य च त्रयः पुत्राः परमदुर्मेधसो बहुशक्तिरुग्रशक्तिरनन्तशक्तिश्चेति बभूवुः। अथ तान् शास्त्रविमुखान् समालोक्य स राजा सचिवानाहूय प्रोवाच। भो ज्ञातमेतद्भवद्भिर्यन्ममैते पुत्राः शास्त्रविमुखा विवेकरहिताः। तदेतान् पश्यतो मम हतकण्टकमपि राज्यं न सौख्यमावहति। अथवा साधिदमुच्यते।

अज्ञातमृतमूर्खेभ्यो मृताजातौ सुतौ वरं ।
यतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत् ॥ ४ ॥

आकृती २७ : निर्णयसागरपूर्व देवनागरीमुद्रणाचे युरोपीय अक्षररूप. जर्मनीत तयार झालेली मुद्राक्षरे.

अनुक्रमणिका

६

ग्रंथमुद्रणातील निर्णयसागर-युग

जावजी दादाजी चौधरी, १८३९—१८९२

५२. इ. स. १८१८ ते १८५६-पर्यंतच्या काळास 'अमेरिकन मिशन प्रेस-युग' म्हणता येईल. १८५६ ते १८६९-पर्यंतचा काळ हे 'गणपत कृष्णाजी-युग' होय. इ. स. १८६९ ते १९१२-पर्यंतचा काळ हे 'निर्णयसागर-युग' म्हणून गणले पाहिजे. 'अमेरिकन मिशन छापखान्या'मध्ये जावजी दादाजी चौधरी यांनी मुद्रण-शिक्षण घेतले होते. त्यानंतर यांनी इंदुप्रकाश, ओरिएण्टल, टाइम्स, ब्रिटिश इंडिया, इत्यादी छापखान्यांत उमेदवारी केल्यानंतर स्वतःची 'जावजी दादाजी टाइप फाउण्ड्री' काढली, ती १८६४-मध्ये. त्यानंतर पाचच वर्षांनी त्यांनी 'निर्णयसागर' छापखान्याची स्थापना केली. या छापखान्यामध्ये छापलेले पहिले पुस्तक *गरुडपुराण*. त्याची प्रत मला उपलब्ध झालेली नाही. इ. स. १८६९-पासून, १८९२-मध्ये जावजींचे निधन होईपर्यंतच्या काळात, शेकडो पुस्तके आणि मासिके 'निर्णयसागर'मध्ये छापून प्रसिद्ध झाली. त्यांची संपूर्ण गणती अजून व्हावयाची आहे. हा तेवीस वर्षांचा काळ मराठी ग्रंथमुद्रण आणि प्रकाशन-व्यवसाय यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा समजला पाहिजे. जावजींचे सहकारी राणोजी रावजी आरू यांची मुद्राक्षर-निर्मितीतील कारागिरी अजोड आहे. जावजींच्या कारकीर्दीत त्यांनी वीस नवीन वळणाचे फाउंट तयार केले. आणि नंतर तुकाराम जावजींच्या काळात (१८९२—१९१८) आणखी वीस फाउंट तयार केले. निर्णयसागरमधून जी उत्तमोत्तम पुस्तके छापून निघाली, त्याचे पुष्कळसे श्रेय आरूंच्या सुबक वळणाला आहे. नंतरच्या काळात या टाइपांची सर्वत्र नक्कल झाली.

५३. मराठी ग्रंथमुद्रणामध्ये अत्यंत महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या जावजी दादाजींचा जन्म केव्हा झाला, हे निश्चित झाले नाही. इ. स. १८३९-विषयी बहुमत दिसते. जावजींचे घराणे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामधील खिंडे-सुरवाडचे. मूळचे ते सुपे-सासवडचे.

अनुक्रमणिका

पनवेल, मांजरवेल, सोनवेल, हरखेल, कुशा, दोडका, मुदगा, भडस, तांबडहळवा, भुरा, एकलोंब्या, काळाभात, पांढरीसाळ, इत्यादि जातींचीं भातें मध्यमांपैकीं होत.

महाडी, निरपुंज, हेंवडी, राता, पटणी, सोरटी, बुरबुटे, आवटें हीं भातें कनिष्ठ प्रतीचीं होत.

ज्या जातींची माहिती खातरीलायक मिळाली आहे तितकीच दिली आहे. बाकींच्या बद्दल कांहींच लिहिलें नाहीं.

वर सांगितल्या जातींपैकीं कमोद आणि पंकसाळ हीं भातें गुजराथेंत फार [१]पिकतात. पांढरीसाळ, मोरीसाळ, मसुरीसाळ, आणि काळाभात ह्या जातींचें पीक देशावर विशेष होतें. चिमणसाळ, चिकणसाळ, आंबेमोहोर आणि ज्या नांवापुढें साळ हीं अक्षरें लागलीं आहेत तीं बहुतेक भातें मावळांत फार होतात. पाटणी, सोरटी, पनवेल आणि नवान्न ह्या जाती वेंगण्यांत पिकतात. एकंदर भातें कोंकणांत फार पिकतात. त्यांत मुख्यत्वेंकरून कुलाबा जिल्ह्यांतील जमिनी फार सुपीक असल्यामुळें तेथें भाताचें उत्पन्न फार होतें. तेथें भडस आणि पटणी फार पिकवितात. आवटें ह्मणून जें एक भात दिलें आहे तें वरीनाचणीप्रमाणें माळजमिनीवर पिकतें. त्यास एकदां पेरून पुनः उपटून लावावें लागत नाहीं; काईमप्रमाणें एकदांच पेरावें.

वर सांगितलेल्या जातींपैकीं कांहींची विशेष फोड करूं. कमोद हा तांदुळ सर्वांत उत्तम होय. ह्याच्या भातास आणि तांदुळास फार सुवास येतो. शिजलेल्या तांदुळाचा तर घमघमाट चाललेला असतो. तांदुळ शिजल्यावर नरम होतो. ह्यास रुचीही फार उत्तम असते. ह्याच्या झाडासही थोडा वास येतो. पिकलेल्या शेताच्या बाजूनें गेलें असतां मधुर वास येतो. बंगाली कमोद आणि साधा कमोद यांत फारसा फेर नाहीं. ह्याचें बीं प्रथम बंगा-

१ ह्या जाती इतर ठिकाणीं पिकत नाहींत असें नाहीं; परंतु वर सांगितल्या ठिकाणीं त्यांचें विशेष पीक होतें.

आकृती २८ : आरूंचे एक वळण 'कृषिकर्म-विद्या', निर्णयसागर, मुंबई, १८७८

जावजींचे आजोबा पदाजी मुंबईस आले; त्यांनी हवालदाराची नोकरी पतकरिली. जावजींचे वडील दादाजी, सावकाराकडे वसुली करण्याच्या कामावर होते. जावजींनी वयाच्या दहाव्या वर्षी 'अमेरिकन मिशन प्रेस'मध्ये दोन रुपये पगारावर टाइप घासण्याचे काम मिळवले (१८४८?). तेथे ते आठदहा वर्षे होते. पुढे (१८५६-नंतर) तो प्रेस टॉमस ग्रॅहॅमने विकत घेऊन काही दिवस चालवला आणि मग (१८६०) तो 'एक्श्चेंज प्रेस'मध्ये सामील झाला. एक्श्चेंज प्रेसचे आजचे नाव 'टाइम्स ऑफ इण्डिया प्रेस'. जावजी काही दिवस 'टाइम्स प्रेस'मध्येही होते. तेथे त्यांना महिना रु. १० पगार मिळे. इ. स. १८६२-मध्ये ते इंदुप्रकाश प्रेसमध्ये गेले. तेथे रु. १५-वर त्यांनी सुमारे दीड वर्ष नोकरी केली. इ. स. १८६४-मध्ये जावजींनी 'ओरिएण्टल प्रेस'मध्ये टाइप पाडण्याचे काम पतकरिले, तेव्हा त्यांचा पगार रु. ३० झाला होता.

जावजींचा टाइप पाडण्याचा उद्योग

५४. जावजींनी टाइप पाडण्याचा स्वतंत्र उद्योग त्याच वर्षी (१८६४) सुरू केला. पांडुरंग काशिनाथ बनारसे हे बॉम्बे गॅझेट प्रेसचे उपव्यवस्थापक होते. तेथे जी. आय. पी. रेल्वेचे एक पोस्टर छापण्याचे काम आले होते. त्या कामासाठी मोठे टाइप पाहिजे होते. ते टाइप तयार करण्याचे काम बनारसे यांनी जावजींस मिळवून दिले. या बाबतीत बनारसे लिहितात :


> "त्यांनीं (जावजी दादाजींनी) पंच तयार केले, व ते गॅझेट हाफिसांत पसंत पडले. पुढें त्या पंचांच्या मेट्रिसा ठोकून जावजी यांच्या घरच्या चुलीवर व घरच्याच कढईत शिसें कढवून, व एक मोल्ड तयार करून त्याच्या द्वारें मोठीं मराठी अक्षरें ओतलीं, व तीं गॅझीट आफिसांत पुरविलीं, व तीं अक्षरें हल्लीं गॅझीट आफिसांत आहेत; त्यांचा पंच व मेत्रीसी रा. जावजी यांच्या कारखान्यांत असतील. यांचें द्रव्य आलें, तें सर्व मीं रा. रा. जावजी यांना दिलें. ह्यामुळें रा. जावजी यांस बरेंच उत्तेजन येऊन त्यांनीं मजजवळून लहानमोठे पंच तयार करण्याची माहिती करून घेतली, व ते आणि मीं एका घरांत असल्यामुळें त्याच फाउंडरीच्या कामांत ज्या कांहीं अडचणी किंवा शंका येत त्यांचें मी निवारण करीत असें."[४४]

५५. जावजींनी नंतर जेव्हा स्वतःची टाइप फाउंड्री सुरू केली, तेव्हा त्यांनी बनारसे यांनी आपल्याला येऊन मिळावे, असा प्रयत्न केला होता. बनारसे यांना फाउंड्रीच्या कामाचा अनुभव होता. परंतु बनारसे त्याला कबूल झाले नाहीत. बनारसे लिहितात :

> "रा. जावजी यांणीं फाउंड्री काढण्याचे पूर्वीं बरींच वर्षें रा. रघुनाथ कृष्णाजी कराचीवाले यांनीं व मीं फाउंड्री काढण्याचा कारखाना सुरू केला होता, व एक ग्रेट प्रिमरचा मराठी फाऊंड पंच-मेट्रसीसहित गव्हर्नमेंट गॅझीटमधील एका सदाशिव नांवाच्या गृहस्थापासून तयार करविला होता, व इलिट्रीक ब्याटरीच्या द्वारेंही मेत्रीस तयार करीत होतों; परंतु पुढें रघुनाथजी कराचीस निघून गेल्यामुळें व मला दुसऱ्या कोणाची चांगली मदत मिळाली नाहीं म्हणून तें सामान विकून टाकलें. पैकीं चार मोल्ड, पंच व एका फाऊंटच्या मेत्रीसा प्रभाकर छापखानेवाल्यास कमी दरानें विकून टाकल्या; त्या हल्लीं त्यांच्या संग्रहीं असतीलच."[४४]

४४. बनारसे, पांडुरंग काशिनाथजी, '*सुबोध पत्रिका*', मुंबई, २० एप्रिल, १८९२.

लली ह्मणजे तें खालीं येई. अलीकडे असलीं विमानें बहुधा कोणी करित नाहींत. (आ० ९ पहा.) हल्लींचीं विमानें बहुतकरून भोंवऱ्याच्या आकाराचीं असतात. व तीं रेशमी कापडाच्या कळ्या एकीस एक शिवून केलेलीं असतात. आंत जे वायु भरायाचे ते बाहेर पडूं नयेत ह्मणून रबराचें पक्कें रोगण विमानास देतात; व त्यास बळकटी आणण्याकरितां बाहेरून एक जाळें त्याच्याभोंवतीं घातलेलें असतें. या जाळ्याच्या दोऱ्या खालीं आणून त्यांस नावेच्या आकाराची वेताची पांटी टांगिलेली असते. तिजमध्यें विमान उडविणारा बसतो. विमानांत 'हैद्रोजन' किंवा 'कोलग्यास' (ज्याचे दिवे मुंबईतील रस्त्यांतून लावतात तो) भरतात. जितकें मोठें विमान करावें तितकें तें अधिक वजन उचलून नेतें. वैमानिक आपणाबरोबर वाळूनें भरलेल्या कांहीं पिशव्या, एक गळ, व कांहीं गांठी दिलेल्या लांब दोऱ्या घेतो. या सर्वांचा उपयोग विमान खालीं आणायाच्या वेळीं होतो कारण विमान खालीं आणायाचें असल्यास, तें हवेपेक्षां जड केलें पाहिजे ह्मणून त्यांतील कांहीं 'ग्यास' सोडून द्यावा लागतो. परंतु पुढें तें एकदा खालीं पडूं लागलें ह्मणजे त्यास इतका वेग येतो कीं, तें तसेंच खालीं पडत राहिल्यास पृथ्वीवर एवढ्या मोठ्या जोरानें येऊन आदळेल कीं, त्या आघातानें वैमानिकाच्या हाडांचा चुराडाच होईल. विमानास फार गति आली असें दिसलें कीं, तो एकादी वाळूची पि-


(आ० ९ वी.)[1]

1 विमान वर चढत असतां तें कसें दिसतें हें या आकृतींत दाखविलें आहे.

आकृती २९ : आरुंचे एक वळण, सहावें (क्रमिक) पुस्तक, निर्णयसागर, १८९३

अनुक्रमणिका

निर्णयसागर मुद्रणालयाची स्थापना

५६. इ. स. १८६६-पासून जावजींनी, जुने छापखाने विकत घेऊन दुरुस्त करून विकायचा, जोडधंदा सुरू केला होता. इ. स. १८६८-च्या दरम्यान त्यांनी एक प्रेस काही दिवस चालवलाही होता. तो नंतर कमळोजी गौरोजीला विकला. पं. विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचा त्या वेळी शिळाप्रेस होता. तेथे ते पंचांग छापत. गणपत कृष्णाजींचे मुद्राक्षरित पंचांग तेव्हा पहिल्याने प्रसिद्ध झाले. तसे पंचांग छापण्यासाठी लहान मुद्राक्षरे तयार करण्याचे काम त्यांनी जावजींस सांगितले. जावजींनी ते पतकरले आणि यशस्वी केले. परंतु दरम्यान अग्निहोत्रींची सांपत्तिक स्थिती खालावली होती. त्यामुळे ते त्याचा उपयोग करू शकले नाहीत. म्हणून जावजींनी स्वतःच छापखाना घालण्याचा 'निर्णय' केला आणि पंचांग छापले (१८६९). छापखान्यात तेव्हा सुपर-रॉयल आकाराचा एक हँडप्रेस होता. 'निर्णयसागर प्रेस' प्रथम भांगवाडी काळबादेवी येथे होता. इ. स. १८८३-मध्ये तो कोलभाट लेनमध्ये गेला (डॉ. वेलकर स्ट्रीट, चिरा बाजार मुंबई). आज त्याचे शिवडीला स्थलांतर झालेले आहे. जावजी ५ एप्रिल १८९२ रोजी जलोदराने निधन पावले.

५७. सत्तावीस वर्षांच्या स्वतंत्र मुद्रणाच्या उद्योगात, जावजींच्या फाउंड्रीतून २० मराठी, १५ गुजराती आणि ४० इंग्रजी टाइप फाउंट बाहेर पडले. नऊ टाइप कास्टिंग यंत्रे तेव्हा तेथे काम करीत होती. याच काळात जावजींनी १९३ संस्कृत आणि २२८ मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध केले. त्यांशिवाय इतरांसाठी छापलेली पुस्तके वेगळीच. 'निर्णयसागर' छापखान्यात तेव्हा ४५० माणसे काम करत होती. तुकाराम जावजींच्या काळात निर्णयसागरने २०० संस्कृत, १७० मराठी, ३५ हिंदी-गुजराती प्रकाशने आणि दोन कन्नड पुस्तके छापली.

मुद्राक्षर-निर्माते राणूजी रावजी आरू

५८. राणूजी रावजी आरू यांचा जन्म केव्हा झाला, हे निश्चित माहीत नाही. ते स्वतः आपल्या आत्मवृत्तपर निवेदनात सांगतात की, आपला जन्म १८४८-मध्ये झाला. परंतु पुढे म्हणतात की, जावजी आपल्यापेक्षा सहा वर्षांनी वडील. म्हणजे त्यांचा जन्म १८४४–४५-मध्ये झाला असावा. मुंबईस आल्यावर त्यांनी प्रथम हेलकऱ्याची कामे केली. वयाच्या पंधराव्या वर्षी ते 'टाइम्स प्रेस'मध्ये फाउंड्री खात्यात टाइप घासण्याच्या कामावर राहिले. पगार महिना तीन रुपये! एज्युकेशन सोसायटीच्या प्रेसमध्ये त्यांनी १८६१-च्या सुमारास नोकरी पतकरली. तेव्हा तेथे ते देवनागरी, गुजराती, कन्नड, तमिळ इत्यादी लिप्यांचे टाइप पाडून देत. येथे आरू मातृका तयार करण्याचे काम शिकले. 'एज्युकेशन सोसायटीचा छापखाना' मोठा होता. १५०० माणसे कामावर असावीत, असे आरू सांगतात. जावजींनी १८६४-मध्ये फाउंड्री सुरू केली, ती आरूंच्या मदतीने. नंतरच्या काळात आरू पुण्यास 'ज्ञानप्रकाश टाइप फाउंड्री'त काही दिवस होते. त्यांनी तेथे दोन फाउंट तयार केले : ग्रेट प्रायमर ब्लॅक आणि साधा. पुण्यात त्यांना 'जगद्धितेच्छु प्रेस'च्या रावजी श्रीधर गोंधळेकरांची मदत झाली. त्यांचा त्यांनी कृतज्ञतेने उल्लेख केला आहे.

अनुक्रमणिका

२०. क्रिस्तोफर कोलंबस.



अमेरिकाखंड ज्यानें शोधून काढिलें, तो हा मनुष्य होता. हा युरोपखंडामध्यें इटाली देशांत जिनोवाशहरीं इ० स० १४३६ ह्या वर्षी जन्मला. त्याचा लहानपणचा विद्याभ्यास पादुआ येथील शाळेंत झाला. त्यामध्यें सगळ्या विषयांत भूगोलविद्येची अभिरुचि त्याला फार लागली. त्या विषयाचीं पुस्तकें वाचण्याचा नाद त्याला होता. त्याच्या मनांत असें आलें कीं, पुस्तकांत सांगितलें आहे, तें प्रत्यक्ष जाऊन पाहावें. म्हणून तो एका गलबतावर चाकरीस राहिला, आणि पु-

आकृती ३० : निर्णयसागरवाचनग्रंथमाला "बालबोध पांचवें पुस्तक" संपादक, विनायक कोंडदेव ओक, आवृत्ती पहिली, १९१०, पान ७२

५९. अमेरिकन मिशन प्रेसमध्ये जीवन वल्लभ लोहार, टॉमस ग्रॅहॅमच्या बरोबर पंचमातृका तयार करत असत. नंतरच्या काळात रामजी नावाचे एक पंचीगार गणपत कृष्णाजींसाठी पंचमातृका करून देत. जावजी स्वतः पंचीगार होते. परंतु या सर्वांहून राणूजींचे पंच सरस असत. त्यांच्या हातांतच कला होती. प्रकाश-लेखनाची कला जेव्हा माहीत नव्हती, त्या काळात आठ पॉइंटचे देवनागरी पंच तयार करणे हे किती कठीण असेल ! आणि ती मुद्राक्षरे इतकी सुबक नि प्रमाणबद्ध की, आज पॅण्टोग्राफची मदत असूनही अशी मुद्राक्षरे तयार होत नाहीत. आरूंच्या कलेची तुलना 'कैलास लेणे' खोदणाऱ्या शिल्पकारांच्या कलेशीच करिता येईल. आराखडे, 'ब्लू प्रिण्ट', इत्यादींची मदत नसताना, कातळात वरून खाली खोदीत हे अजरामर शिल्प निर्माण करण्यातील शिल्पकारांचे कौशल्य, आणि पोलादाच्या तुकड्याच्या मोहरीएवढ्या टोकावर देवनागरी जोडाक्षरे कोरण्यातील कौशल्य ही एकाच जातीची आहेत. आरूंनी निर्माण केलेल्या संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराती आणि कन्नड मुद्राक्षरांवर या भाषांतील मुद्रणाचा आज गेली पाउणशे वर्षे निर्वाह होत आहे; आणि यापुढेही तो तसा होत राहील, यात शंका नाही.

निर्णयसागर-युगातील ग्रंथनिर्मिती

६०. ग्रंथमुद्रणातील 'निर्णयसागर'-युगास १८६९-मध्ये प्रारंभ झाला, असे मी म्हटले आहे. गणपत कृष्णाजींचे १८६०-मध्ये निधन झाल्यावर बरीच वर्षे त्यांची ग्रंथमुद्रण-परंपरा चालू होती. १८७० ते १८९२ या काळांत गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात ११५ पुस्तके मुद्रित झालेली आहेत. इ. स. १८६९-मध्ये स्थापन झालेल्या 'निर्णयसागरा'ने मुद्राक्षर-निर्मितीत क्रान्ती केली आणि पुढील मुद्रणावर त्याचा मूलग्राही परिणाम झाला. इ. स. १८७० ते १८९२ या काळात, तत्पूर्वी स्थापन झालेल्या छापखान्यांपैकी ३५ छापखान्यांत ग्रंथमुद्रण होत होते. त्याची यादी, ८२ व ८३ पानांवर दिली आहे. या ३५ छापखान्यांत मुद्रित झालेली ८७० पुस्तके आज उपलब्ध आहेत. यांपैकी १७ छापखान्यांत दहाहून जास्त पुस्तके मुद्रित झालेली आहेत (पान ८० पहा). या यादीतील प्रमुख ग्रंथमुद्रणकेन्द्रे म्हणजे गणपत कृष्णाजी, ज्ञानप्रकाश, सोसायटी, जगन्मित्र, अग्निहोत्री, इन्दुप्रकाश, खातू, ओरिएण्टल, जॉइण्ट स्टॉक, वृत्तप्रसारक, ज्ञानचक्षु, जगद्धितेच्छु, नेटिव्ह ओपिनियन 'सर्वोदय' आणि अरुणोदय, हे छापखाने होत. इ. स. १८७० ते १८९२ या काळात, याशिवाय स्थापन झालेल्या एकूण १५४ छापखान्यांत १५७९ पुस्तके मुद्रित झालेली आहेत. (पान ८४-८८ पहा) यांपैकी ज्या छापखान्यांत दहाहून जास्त पुस्तके मुद्रित झाली, अशा ३० छापखान्यांची यादी पान ७९-८०-वर दिली आहे. त्यांपैकी जगदीश्वर, निर्णयसागर, अँग्लो-व्हर्नाक्युलर, इंडियन, चित्रशाळा, श्रीशिवाजी, आर्यभूषण, सुबोधप्रकाश आणि तत्त्वविवेचक, या छापखान्यांनी ग्रंथमुद्रणकार्यात विशेष कामगिरी केली आहे. इ. स. १८७०-नंतर स्थापन झालेल्या १५४ छापखान्यांपैकी ६१ छापखाने मुंबईतील आणि २१ छापखाने पुण्यातील आहेत. त्यांखालोखाल वडोदे (८), कोल्हापूर (७), सातारा (६) यांचा क्रम लागतो. या मुदतीत नागपूरला फक्त तीन छापखान्यांत ग्रंथमुद्रण झाले आहे.

६० जावजी दादाजी ह्यांचें चरित्र.

बडोदावत्सल—हे पूर्वी अगदीं गरीब स्थितींतील असतांही आपल्या बुद्धिचापल्यानें, दृढउद्योगानें आणि मनमिळाऊ स्वभावानें फार मोठ्या योग्यतेस चढले.... यांच्या आंगीं व्यवहारज्ञान व विचारशक्ति इतकी उत्तम होती कीं, ते जें जें काम हातीं घेत, तें तें फार सावधगिरीनें व काळजीपूर्वक करीत असत..... हाताखालच्या लोकांस वागवून घेण्याची यांची रीत वर्णनीय होती. ...दुष्ट काळानें हजारांचें प्रियरत्न जे जावजी शेट त्यांस जगांतून नाहींसें केलें.

चिकित्सक—यांनीं केवळ गरीब स्थितींत वाढून आपल्या उद्योग, दृढनिश्चय व चातुर्यबलावर लक्षाधीशांमध्यें आपली गणना करविली; मुंबई इलाख्यांतीलच नव्हे, परंतु आज हिंदुस्थानांतील मुद्रणकलेस खऱ्या ऊर्जित दशेस आणिलें..... शांतता, लोकप्रियता, गंभीरपणा, सचोटी या गुणांविषयीं मि० जावजींनीं आपलें जगाकडून वर्णन करून घेतलें आहे. जावजींच्या मरणानें आज मुंबई इलाख्यांतील छापखानेवाल्यांचें भूषणच गेलें म्हणण्यास हरकत नाहीं.

बांबे ग्याझेट—ह्यांस थोड्या दिवसांमागें मुंबईसरकारानें जस्टिस आफ् धि पीस ह्या मानाचा किताब दिला. त्याचा उपभोग घेण्यास व तत्संबंधानें लोकांस उपयोगी पडण्यास ते फार दिवस राहिले नाहींत. जावजी मेल्यामुळें मुद्रणकलेच्या धंद्यांतला एक मोठा खंदा व खटपटी मनुष्य नाहींसा झाला आहे. ह्यांनीं अनेक उपयुक्त संस्कृत, हिंदुस्थानी, मराठी आणि गुजराथी ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. ह्यांचा टैप पाडण्याचा आणि छापण्याचा कारखाना फार मोठा आहे.

सुधारक—आमच्या इकडे छापखान्यांस जी ऊर्जित दशा आली आहे, ती बऱ्याच अंशानें यांच्या मेहनतीचें फळ होय. यांच्या आयुष्यक्रमांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे त्यांची मूळची स्थिति फार गरीबीची असून केवळ आपल्या उद्योगाच्या व नेकीच्या बळावर ते इतक्या प्रसिद्धीस आले. आजपर्यंत त्यांच्या साह्यानें जें अनेक संस्कृत मराठी ग्रंथांचें प्रकाशन झालें आहे, तें मनांत आणितां त्यांच्या हातून विद्यावृद्धीच्या प्रसारास किती मदत झाली आहे हें कोणासही दिसून येणारें आहे.

अरुणोदय—तीन रुपये दरमहा घेऊन दगडावर टैप घांशीत बसणारें त्या वेळचें तें पोर पुढें अशा योग्यतेस येईल, असें कोणाच्या स्वप्नांतही नव्हतें.... हे बुद्धीनें तिखट होते म्हणून छापखान्याच्या संबंधाच्या हरएक कामांत ते इतके प्रवीण झाले होते कीं या इलाख्यांतल्या छापखान्यांचे मूळ पुरुष जे टामस ग्राहाम त्यांनींही पुढें पुढें मि० जावजींच्या पुढें हात टेंकले होते.. .त्यांची जरी इतकी भरभराट झाली तरी आरंभींच्या आपल्या यरो-

v.

आकृती ३१ : आरूंचा ८ पॉ. टाइप. कै. विनायक कोंडदेव ओक यांच्या 'जावजी दादाजी ह्यांचें चरित्र' (१८९२) या पुस्तकाचे एक पान

अनुक्रमणिका

इ. स. १८७० ते १८९२ या काळात दहा किंवा जास्त ग्रंथ मुद्रित केलेल्या छापखान्यांची नावे

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	मुद्रण-स्थळ	परिशिष्ट अ, ब, क यांमधील क्रमांक	मुद्रणकाल	पुस्तकांची संख्या
	१. इ. स. १८७० पूर्वी स्थापन झालेली मुद्रणालये				
१	गणपत कृष्णाजी यांचा छापखाना	मुंबई	१५	१८७०–९२	११५
२	ज्ञानप्रकाश छापखाना	पुणे	२७	१८७०–९२	११६
३	एज्युकेशन सोसायटीचा छापखाना	मुंबई	३३	१८७०–९२	१५५
४	जगन्मित्र छापखाना	रत्नागिरी	३८	१८७०–८५	१८
५	वि. स. अग्निहोत्री यांचा छापखाना	पुणे	४५	१८७०–८२	१४
६	इंदुप्रकाश छापखाना	मुंबई	६०	१८७०–९२	९०
७	सखाराम भिकुशेठ खातू यांचा छापखाना	मुंबई	६३	१८७०–९२	२३
८	ओरिएण्टल छापखाना	मुंबई	६९	१८८०–८०	२९
९	जाइण्ट स्टॉक छापखाना	मुंबई	७४	१८८५–९२	५७
१०	वृत्तप्रसारक छापखाना	पुणे	७५	१८७०–९१	३७
११	क्षानचक्षु छापखाना	पुणे	७६	१८७०–९२	६१
१२	जगद्धितेच्छु छापखाना	पुणे	८०	१८७०–९२	१५
१३	ज्ञानसिंधू छापखाना	नगर	८३	१८७२–८९	१०
१४	बेळगाव समाचार छापखाना	बेळगाव	९१	१८७१–९२	१७
१५	नेटिव्ह ओपिनियन छापखाना	मुंबई	९६	१८७७–९२	३२
१६	सर्वोदय छापखाना	ठाणे	९९	१८७१–८८	१३
१७	अरुणोदय छापखाना	ठाणे	१००	१८७०–९२	१६
	२. इ. स. १८७० नंतर स्थापन झालेली मुद्रणालये				
१	सत्यशोधक छापखाना	रत्नागिरी	१०५	१८७२–९२	१७
२	नॅशनल छापखाना	मुंबई	१०६	१८७०–८१	४०
३	एशियाटिक प्रेस	मुंबई	११३	१८७१–८३	१६
४	जगदीश्वर छापखाना	मुंबई	११४	१८७१–९२	११५
५	निर्णयसागर छापखाना	मुंबई	११५	१८७२–९२	२५४
६	सत्यसदन छापखाना	अलिबाग	१२३	१८७३–९२	१३
७	ॲंग्लो-व्हर्नाक्युलर प्रेस	मुंबई	१२६	१८७५–९०	७३
८	फॅमिली प्रेस	मुंबई	१२७	१८७५–९०	३०

अनुक्रमणिका

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	मुद्रण-स्थळ	परिशिष्ट अ, ब, क मधील क्रमांक	मुद्रणकाल	पुस्तकांची संख्या
९	इंडियन प्रेस	मुंबई	१३३	१८७७–९२	९६
१०	नासिकवृत्त छापखाना	नासिक	१३६	१८७८–८५	२५
११	देव्हारे प्रिंटिंग प्रेस	मुंबई	१३९	१८७९–९२	१५
१२	चित्रशाळा छापखाना	पुणे	१४१	१८७९–९२	२१
१३	श्री शिवाजी छापखाना	पुणे	१४२	१८७९–९२	५०
१४	ऑर्फनेज प्रेस	पुणे	१४६	१८८०–९२	२१
१५	आर्यभूषण छापखाना	पुणे	१४८	१८८१–९२	९९
१६	विचारदर्शक छापखाना	माल्वण	१४९	१८८१–९२	१७
१७	सुबोधप्रकाश छापखाना	मुंबई	१५४	१८८३–९६	४१
१८	पुणे वैभव छापखाना	पुणे	१६०	१८८२–८८	१६
१९	सुधाकर छापखाना	पेण	१७४	१८८४–९२	१३
२०	माजगाव छापखाना	मुंबई	१७९	१८८५-९१	२२
२१	सौजन्यमित्र छापखाना	मुंबई	१८२	१८८५–९२	१०
२२	ग्रंथवर्धक छापखाना	पुणे	१८३	१८८५–८९	११
२३	मिशन प्रेस	कोल्हापूर	१८८	१८८५–९२	१४
२४	बडोदावत्सल छापखाना	बडोदे	१८९	१८८५–९२	१८
२५	कर्नाटक प्रेस	मुंबई	१९१	१८८७–९०	१३
२६	गंगाप्रसाद छापखाना	पुणे	१९४	१८८७–९१	२३
२७	श्रीकल्पतरु छापखाना	मुंबई	२०२	१८८७–९२	१६
२८	श्रीचक्रवर्तिनी छापखाना	मुंबई	२०३	१८८८–९२	१३
२९	तत्त्वविवेचक छापखाना	मुंबई	२१४	१८८९–९२	३८
३०	श्रीहरिवरदा छापखाना	मुंबई	२३२	१८९१–९२	१०

परिशिष्ट ब, क

इ. स. १८७० पासून
१८९२ अखेर पर्यंतच्या काळात
मराठी ग्रंथमुद्रण करीत असलेल्या
मुद्रणालयांची यादी

अनुक्रमणिका

परिशिष्ट ब

इ. स. १८७० पूर्वी स्थापन झालेल्या आणि १८७० नंतरही ग्रंथमुद्रण करीत असलेल्या मुद्रणालयांची यादी

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	मुद्रण-स्थळ	परिशिष्ट ब 'अ' मधील क्रमांक	मुद्रणकाल	पुस्तकांची संख्या
(१)	गणपत कृष्णाजींचा छापखाना	मुंबई	१५	१८७०–७२	११५
(२)	प्रभाकर छापखाना	मुंबई	२०	१८७२	२
(३)	ज्ञानप्रकाश छापखाना	पुणे	२७	१८७०–९२	११६
(४)	ज्ञानदर्पण छापखाना	मुंबई	३१	१८७२–८८	७
(५)	एज्युकेशन सोसायटीचा छापखाना	मुंबई	३३	१८७०–९२	१५५
(६)	जगन्मित्र छापखाना	रत्नागिरी	३८	१८७०–८५	१८
(७)	बापू हरशेट देवळेकर यांचा छापखाना	मुंबई	३९	१८७३–९२	९
(८)	बापू सदाशिव हेगिष्टे यांचा छापखाना	मुंबई	४०	१८७४–९२	६
(९)	वि. स. अग्निहोत्री यांचा छापखाना	पुणे	४५	१८७०–९२	१४
(१०)	इन्दुप्रकाश छापखाना	मुंबई	६०	१८७०–९२	८०
(११)	बुद्धिप्रकाश छापखाना	पुणे	६२	१८७२–९१	४
(१२)	सखाराम भिकुशेट खातू यांचा छापखाना	मुंबई	६३	१८७०–९२	२३
(१३)	वृत्तवैभव छापखाना	नगर	६४	१८७०	१
(१४)	गं. गो. सापकर आणि बंधु यांचा छापखाना	पुणे	६५	१८७४	१
(१५)	ओरिएण्टल छापखाना	मुंबई	६९	१८७०–८०	२९
(१६)	म. गो. अमरापूरकर यांचा छापखाना	मुंबई	७०	१८७०–७४	३
(१७)	जाईण्ट स्टॉक छापखाना	मुंबई	७४	१८८५–९२	५७
(१८)	वृत्तप्रसार छापखाना	पुणे	७५	१८७०–९१	३७
(१९)	ज्ञानचक्षु छापखाना	पुणे	७६	१८७०–९२	६१
(२०)	ह. ल. मापुमकर यांचा छापखाना	पुणे	७८	१८७१	३
(२१)	जगद्धितेच्छु छापखाना	पुणे	८०	१८७०–९२	१५

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	मुद्रण-स्थळ	परिशिष्ट 'अ' मधील क्रमांक	मुद्रणकाल	पुस्तकांची संख्या
(२२)	हरि लिंगू कदम यांचा छापखाना	मुंबई	८१	१८७०–७५	३
(२३)	न्यायसिंधू प्रेस	नगर	८३	१८७२–८९	१०
(२४)	युनियन छापखाना	मुंबई	८५	१८७३	३
(२५)	सिटी प्रेस	मुंबई	८७	१८८६–९२	८
(२६)	कल्पतरु छापखाना	सोलापूर	८८	१८७२–७५	४
(२७)	आनंदसागर छापखाना	धार	८९	१८८८	१
(२८)	बेळगाव समाचार छापखाना	बेळगाव	९१	१८७१–९२	१७
(२९)	ज्ञानवर्धक छापखाना	धारवाड	९२	१८७५–८५	३
(३०)	वऱ्हाड समाचार छापखाना	अकोला	९४	१८७८	१
(३१)	नेटिव्ह ओपीनियन छापखाना	मुंबई	९६	१८७७–९२	३२
(३२)	बॉम्बे टाउन प्रेस	मुंबई	९७	१८७०	२
(३३)	वृत्तसूचक छापखाना	पुणे	९८	१८७१	१
(३४)	सर्वोदय छापखाना	ठाणे	९९	१८७१–८८	१३
(३५)	अरुणोदय छापखाना	ठाणे	१००	१८७०–९२	१६

परिशिष्ट क*

इ. स. १८७० नंतर निघालेला ग्रंथ मुद्रण करीत करणारी मुद्रणालये आणि त्यात मराठी पुस्तकांची संख्या

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	ठिकाण	काळ	दातेसूची पान	पहिले उपलब्ध पुस्तक	ग्रंथसंख्या
१०२	महाराष्ट्रमित्र छापखाना	सातारा	१८७१-८०	६३७	गौरीहर विनोद नाटक	५
१०३	शुभसूचक छापखाना	सातारा	१८७१-९२	३०२	विधवाविवाह खंडनाचा इतिहास	२
१०४	बोधसुधाकर छापखाना	सातारा	१८७१	८१०	विदग्ध स्त्रीचरित्र	५
१०५	सत्यशोधक छापखाना	रत्नागिरी	१८७२-९२	८७२	रत्नागिरी जिल्ह्याचे वर्णन	१७
१०६	नॅशनल छापखाना	मुंबई	१८७०-८१	२००	ब्राह्मधर्मप्रतिपादक वाक्यसंग्रह	४०
१०७	रॉयल छापखाना	मुंबई	१८७०-७१	६५७	झाशीचे राणीचे नाटक	३
१०८	नीतिप्रकाश छापखाना	मुंबई	१८७०-७२	३६३	पंचागसाधनसार	५
१०९	इण्डस्ट्रियल प्रेस	मुंबई	१८७०-७२	३४७	सृष्टीतील चमत्कार	३
११०	मनोहर छापखाना	मुंबई	१८७०	१०४५	स्त्रीपुनर्विवाहाची अशास्त्रता	१
१११	सुज्ञानबोधक छापखाना	मुंबई	१८७०-७१	८०१	अवर्णनीय स्नेहभाव	४
११२	गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस	मुंबई	१८७१-९२	१०६५	हिंदुस्थानातील गुराचे रोग	६
११३	एशियाटिक प्रेस	मुंबई	१८७१-८३	२६७	सर्वसंग्रह भाग-२	१६
११४	जगदीश्वर छापखाना	मुंबई	१८७१-९२	५५	विचारसागर	११५
११५	निर्णयसागर छापखाना	मुंबई	१८७२-९२	२३६	दशप्रकरण	३५४
११६	ज्ञानदीपक छापखाना	मुंबई	१८७३	९३१	कोलंबसचा वृत्तांत	२
११७	पूना सिटी प्रेस	पुणे	१८७२-७४	२७४	पुराव्याविषयी आक्ट	७
११८	वर्तमान छापखाना	मुंबई	१८७३	४२७	खतांचे प्रकार, झाडपाल्याची रोगराई	१
११९	सह्याद्री छापखाना	मुंबई	१८७३	५८८	मुक्तावली	२
१२०	एक्झॅमिनर प्रेस	मुंबई	१८७३	९८	कॅथलिक धर्मासंबंधी—आवृत्ती २ री	१
१२१	सुविद्याप्रकाश छापखाना	पुणे	१८७२-७४	४७२	वर्णावलीदर्शक गंजीफा	६
१२२	व्यवहारोद्बोधक छा.	कलादगी	१८७३	३१४	इंग्रजीत भाषांतर करावयाचे नियम	१
१२३	सत्यसदन छापखाना	अलिबाग	१८७३-९२	५९९	हिंदुजनांस सुप्रार्थना	१३
१२४	रघुनाथ कृष्णाजी यांचा छा.	मुंबई	१८७४-८३	३००	बालविवाह (निबंध)	३
१२५	ईगल प्रेस	मुंबई	१८७४-७९	१०१	परमेश्वर प्रीत्यर्थ दशमांश	३
१२६	अँग्लोव्हर्नाक्युलर प्रेस	मुंबई	१८७५-९०	३३८	वाचन विद्या	७३
१२७	फॅमिली प्रेस	मुंबई	१८७५-९०	१८७	पांडुरंगस्तोत्रांची टीका	३०
१२८	ज्ञानमित्र छापखाना	मुंबई	१८७५-८५	९६३	गाईकवाड इंग्रज तह	४

* ही यादी 'दातेसूची'वरून तयार केली आहे.

अनुक्रमणिका

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	ठिकाण	काळ	दातेसूची पान	पहिले उपलब्ध पुस्तक	ग्रंथसंख्या
१२९	आर्यप्रकाश छापखाना	मुंबई	१८७५	२३६	चित्तपावन भाग्योदय	३
१३०	ज्ञानसागर छापखाना	कोल्हापूर	१८७५–९१	३७०	रसायनशास्त्र – पूर्वार्ध	७
१३१	विद्वद्भूषण छापखाना	बडोदे	१८७५–७७	९१३	मल्हारराव गाइकवाड-विषप्रयोग	२
१३२	सद्गुरू छापखाना	मुंबई	१८७५	१९६	सार्थ गणेशगीता	१
१३३	इंडियन प्रेस	मुंबई	१८७७–९२	३०२	विवाहविज्ञान	९६
१३४	सरकारी छापखाना	बडोदे	१८७७–८६	४२२	ढोरांच्या देवीच्या रोगविषयी	२
१३५	मालवण समाचार छा.	मालवण	१८७७–८८	६५१	कालिदासचातुर्य नाटक	८
१३६	नासिकवृत्त छापखाना	नाशिक	१८७८–८५	९८३	ऐतिहासिक गोष्टी – भाग २	२५
१३७	वसई समाचार छा.	वसई	१८७८–७९	४३	लाच खाणे मोठे पाप आहे	२
१३८	सत्यप्रकाश छापखाना	मुंबई	१८७९	८२१	अलमावलीन यांचे वर्णन	१
१३९	देव्हारे प्रिंटिंग प्रेस	मुंबई	१८७९–९२	४९१	महिपतीकृत कथासारामृत	१५
१४०	वेदान्तप्रकाश छापखाना	पुणे	१८७९–८५	१६६	मार्गशीर्ष महात्म्य	९
१४१	चित्रशाळा छापखाना	पुणे	१८७९–९२	५००	ज्ञानेश्वर विजय	२१
१४२	श्रीशिवाजी छापखाना	पुणे	१८७९–९२	४९२	मुक्तेश्वरकृत वनपर्व	५०
१४३	बिहारबंधू छापखाना	बॉकिपूर	१८७९	५९२	श्रीहरिस्तव	२
१४४	सरकारी छापखाना	इंदूर	१८७९–९२	२६७	फौजदारी कायदा	७
१४५	सरकारी छापखाना	नवीन गोवे	१८७९	३२८	महाराष्ट्र पोर्तुगीज कोश – प्रथम भाग	१
१४६	ऑर्फनेज प्रेस	पुणे	१८८०–९२	९६	पाप त्याचा दोष आणि अनर्थ आ.३री	२१
१४७	भाऊनानाचा छापखाना	कुरुंदवाड	१८८१–९२	३१७	महाराष्ट्र संस्कृत अमर टिप्पणिका	७
१४८	आर्यभूषण छापखाना	पुणे	१८८१–९२	६३३	संगीत शाकुंतल	९९
१४९	विचारदर्शक छापखाना	मालवण	१८८१–९२	६३४	प्रमिलार्जुन नाटक	१७
१५०	सुबोधसिंधु छापखाना	खांडवा	१८८१–८२	२२८	बोधामृत निबंध	३
१५१	इस्राईल धर्मदीप छा.	मुंबई	१८८२	४५	पित्रभक्ती	१
१५२	वर्तमान छापखाना	मुंबई	१८८२	८३३	हितोपदेश – आ. ४ थी	१
१५३	न्यायसुधा छापखाना	हरदा	१८८२	५९६	मैना – आ. २ री	१
१५४	सुबोधप्रकाश छापखाना	मुंबई	१८८३–९२	४६	कर्तव्यविचार अथवा व्यवहारनीति	४१
१५५	आर्यालंकार छापखाना	मुंबई	१८८३	६९१	आर्यवसुंधरा नाटिका	२
१५६	विद्योदय छापखाना	मुंबई	१८८३	८०४	बर्थोल्ड चरित्र	१
१५७	जगदीश छापखाना	मालवण	१८८३	४२	चाणक्य सूत्र	४
१५८	बासल मिशन प्रेस	मंगलोर	१८८३	३३८	इंग्लिश-कोंकणी डिक्शनरी	२
१५९	बकुळ छापखाना	रत्नागिरी	१८८३–८४	३९८	मुलींची सासरी वागणूक	२
१६०	पुणे वैभव छापखाना	पुणे	१८८३–८८	९४८	विंचूरकर घराण्याचा इतिहास	१६
१६१	सॅपर्स मायनर्स प्रेस	खडकी	१८८३	४३६	पाकक्रिया किंवा स्वयंपाक	१

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	ठिकाण	काळ	दातेसूची पान	पहिले उपलब्ध पुस्तक	ग्रंथसंख्या
१६२	पंच हौद मिशन प्रेस	पुणे	१८८३–८५	१०८	कुसाची छाया	४
१६३	अँग्लोज्यूइश व्हर्ना प्रेस	मुंबई	१८८४	४७	मद्यपान निषेध	१
१६४	विश्वचक्षू छापखाना	मुंबई	१८८४–८८	७४२	स्त्रीचरित्र भाग १ ला, आ. ३ री	६
१६५	दीनबंधू छापखाना	मुंबई	१८८४–९१	६४४	संगीत द्रौपदी नाटक	७
१६६	गो. ना. आणि कं. छा.	मुंबई	१८८४–९१	४९८	रामविजय	७
१६७	विद्याप्रकाश छापखाना	मुंबई	१८८४–८९	१६७	सिंहस्थमहात्म्य सार	१२
१६८	आर्यन ट्रॅक ॲण्ड बु. डे.	मुंबई	१८८४–८५	५३४	पद्यरूप अहिल्याबाईचे चरित्र	५
१६९	श्रीकृष्णभूषण छापखाना	मुंबई	१८८४–९१	७०७	धूर्तचातुर्यदर्शन प्रहसन	३
१७०	चंद्रिका छापखाना	पुणे	१८८४–८७	३३६	मराठी व्याकरण प्रश्नोत्तरावली	६
१७१	कोलंबियन प्रेस	सातारा	१८८४	८९५	रे. विष्णु भास्कर करमरकर चरित्र	१
१७२	चंद्रोदय छापखाना	नागपूर	१८८४	८३०	नकल्या–भाग पहिला	३
१७३	आर्यप्रबोध छापखाना	कोल्हापूर	१८८४	३४८	अंकगणित प्रश्नसमुदाय	१
१७४	सुधाकर छापखाना	पेण	१८८४–९२	५७१	शृंगारतिलकादर्श	१३
१७५	प्रमोदसिंध छापखाना	उमरावती	१८८४	६०८	बोधामृत कविता	२
१७६	प्रतोद छापखाना	इस्लामपूर	१८८४	६०६	पद्यात्मक कामेरीवर्णन	१
१७७	हितेच्छू कारखाना	कलादगी	१८८४	२५	मुहूर्त मुक्तावली	१
१७८	आर्यानंद छापखाना	मुंबई	१८८५	६२९	दुःशासनवध नाटक	३
१७९	माजगाव छापखाना	मुंबई	१८८५–९१	६५३	राजशोक	२२
१८०	दि हिंदुस्थान	मुंबई	१८८५–९०	३३६	व्याकरणबोध	४
१८१	आर्यसेवक	मुंबई	१८८५–९२	१०५०	दीपरत्नाकर	६
१८२	सौजन्यमित्र छापखाना	मुंबई	१८८५–९२	४८	सुरापाननिषेध	१०
१८३	ग्रंथवर्धक छापखाना	पुणे	१८८५–८९	४६९	जादूचा अद्भुत खेळ	११
१८४	चंद्रिका छापखाना	बडोदे	१८८५	८४९	रायगड किल्ल्याचे वर्णन	१
१८५	गोवात्मा छापखाना	मठग्राम	१८८५	७०५	फंदी आणि गोवेंकार्णीचा शृंगार	१
१८६	विद्याविलास छापखाना	कोल्हापूर	१८८४–९१	८८६	अद्भुत रमणीय बाळकाचे चरित्र	७
१८७	श्रीरामदास छापखाना	सातारा	१८८५–८८	८३४	सुबोधवचनसार	४
१८८	मिशन प्रेस	कोल्हापूर	१८८५–९२	४९२	ग्रामवैद्य	१४
१८९	बडोदावत्सल छापखाना	बडोदे	१८८५–९२	५३५	श्रीशिवछत्रपतिकथाब्धिमंथन	१८
१९०	सौजन्यमित्र छापखाना	पुणे	१८८६–८९	६४	सिद्धांतत्रयोदशी	३
१९१	कर्नाटक प्रेस	मुंबई	१८८७–९०	५७८	श्रीमद्भगवतगीता	१३
१९२	भारती छापखाना	मुंबई	१८८७–८९	७०७	गप्पीदास ढवळे, मारखाऊ वैद्य	६
१९३	गौरीप्रसाद छापखाना	मुंबई	१८८७–८८	७१०	यशवंतविजया नाटक	५
१९४	अंबाप्रसाद छापखाना	पुणे	१८८७–९१	३०९	मराठी भाषेतील म्हणी रत्नमाला	२३

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	ठिकाण	काळ	दातेसूची पान	पहिले उपलब्ध पुस्तक	ग्रंथसंख्या
१९५	आर्यप्रकाश छापखाना	पुणे	१८८७–९१	४९५	काव्यरत्नप्रभा – भाग २ रा	३
१९६	दंडधारी छापखाना	नागपूर	१८८७–८८	५७५	पवनप्रकोप	२
१९७	वैदर्भ छापखाना	अकोले	१८८७–८८	५३८	श्रीमत् श्रियाळ चरित्र	३
१९८	सरकारी (करवीर) छाप.	कोल्हापूर	१८८७–९१	४२१	गुरांचे आजार	२
१९९	विद्याविलास छापखाना	सोलापूर	१८८७–८८	३६७	पदार्थविज्ञानशास्त्राची मूलतत्त्वे	३
२००	केरळमित्र छापखाना	कोचीन	१८८७–८९	८२१	मकूयमिनी स्वप्न	३
२०१	वाणीविलास छापखाना	बेळगाव	१८८७–८७	३६४	पंचांगसार	२
२०२	श्रीकल्पतरु छापखाना	मुंबई	१८८८–९२	१९३	आगमज्ञान उपदेश	१६
२०३	चक्रवर्तिनी छापखाना	मुंबई	१८८८–९२	८३२	मनोरंजक करमणूक – भाग २	१३
२०४	तेलगूमित्र छापखाना	मुंबई	१८८८–८९	६३७	संगीत सावित्री : पातिव्रत्य महात्म्य	३
२०५	आर्यविजय छापखाना	पुणे	१८८८–९२	१०६७	राष्ट्रीय प्रदर्शन १८८३–८४	९
२०६	राजहंस छापखाना	पुणे	१८८८	४४९	विविधकला-प्रसार भाग १ ला	१
२०७	आनंदवृत्त छापखाना	सोलापूर	१८८८	२०६	श्रीसिद्धेश्वर पुराण कथासागर	१
२०८	आनंदसागर छापखाना	धार	१८८८	८३५	सुबोधवचन संग्रह	१
२०९	श्रीदत्तप्रसाद छापखाना	इंदूर	१८८८	५९७	पद्यमाला	१
२१०	रामतत्त्वप्रकाश छापखाना	बेळगाव	१८८८–९०	६४४	संगीत यादवगर्वपरिहार नाटक	३
२११	जनरल ऑफीस प्रेस	इंदूर	१८८८–८९	४२१	अश्वसंजीवन	२
२१२	भाऊनाना छापखाना	कुरुंदवाड	१८८८–९२	७१५	अनाथ पांडुरंग	३
२१३	सदानंद (शिळाछाप)	सातारा	१८८३	१५२	चक्षुणा सुदर्शन	२
२१४	तत्त्वविवेचक छापखाना	मुंबई	१८८९–९२	६१६	संगीत ययाति नाटक	३८
२१५	धन्वंतरी छापखाना	पुणे	१८८९	४०४	विलायती औषधे – भाग ३ रा	१
२१६	स्वदेशप्रकाश छापखाना	मुंबई	१८८९	२३	सामुद्रिक लक्षणम्	१
२१७	श्रीशेतकरी छापखाना	पुणे	१८८९–९२	६४०	संगीत विक्रमोर्वशीय नाटक	६
२१८	सुबोधप्रकाश छापखाना	पुणे	१८८९-९०	७१३	जुनावाडा (ऐतिहासिक कादंबरी)	२
२१९	गोरक्षण छापखाना	नागपूर	१८८९	६७५	संगीत गोदुःखविमोचन नाटक	३
२२०	ज्ञानवर्धक छापखाना	धारवाड	१८८९–९२	३०२	विधवावपन अनाचार	२
२२१	वृत्तसुधा छापखाना	सातारा	१८८९	४०३	गृहपंचाक्षरी – भाग १ ला	२
२२२	वीरक्षेत्र मुद्रणालय	बडोदे	१८८९–९१	१००१	गायकवाडी संक्षिप्त इतिहास	२
२२३	बाबजी छापखाना	जळगाव	१८८९–९२	५७५	कृतांत केतन काव्य	८
२२४	बालरामदास प्रेस	राजनांदगाव	१८९०	२९८	कीर्ति मंदिर	१
२२५	ज्ञानसंग्रह छापखाना	मुंबई	१८९०–९१	१०२३	सवाई विक्रम चरित्र	२
२२६	भानुप्रकाश छापखाना	मुंबई	१८९०	७०२	अफझुलखानाच्या मृत्यूचा फार्स	१
२२७	न्यायाश्रम छापखाना	पुणे	१८९०–९१	८१४	न्यायाच्या व अकलेच्या गोष्टी	२

क्रमांक	मुद्रणालयाचे नाव	ठिकाण	काळ	दातेसूची पान	पहिले उपलब्ध पुस्तक	ग्रंथसंख्या
२२८	हिंदू पोर्तुगीज प्रेस	गोवा	१८९०	८१४	साध्वी तारा अथवा योग्य मोबदला	२
२२९	धुंडिराज छापखाना	शहापूर	१८९०	१००६	शुद्ध लेखन दीपिका–भाग १ ला	१
२३०	आर्यावर्त छापखाना	धुळे	१८९०–९१	४३३	पहिली सुधारणा	२
२३१	फतेहसिंह छापखाना	बडोदे	१८९०–९१	५३४	संत चरित्रे (१८९२)	२
२३२	हरिवरदा छापखाना	मुंबई	१८९१–९२	५०२	श्रीहरिवरदा	१०
२३३	विश्वप्रकाश छापखाना	मुंबई	१८९१–९२	४४५	उपयुक्त हुन्नर प्रकाश	२
२३४	नवीन किताबखाना	पुणे	१८९१	९९४	मराठ्यांच्या बखरीवर टीका	१
२३५	श्रीगणेश छापखाना	पुणे	१८९१	५४१	श्रीचिन्तामणी विजय	१
२३६	सत्यवक्ता छापखाना	बडोदे	१८९१	४९	देव आणि उद्याने	१
२३७	सेंट्रल गुजरात प्रेस	बडोदे	१८९१	६८२	रंभा नाटक	२
२३८	हिंदुस्थान छापखाना	अहमदाबाद	१८९१	६८२	रंभा नाटक	(१)
२३९	सरकारी छापखाना	देवास	१८९१	५९८	पदसंग्रह	१
२४०	प्रमोदसिन्धू छापखाना	अमरावती	१८९१	८६१	वऱ्हाड प्रांताचे वर्णन–आ. ६ वी	१
२४१	सच्चिदानंद छापखाना	सोलापूर	१८९२	२१८	श्री दिगंबरी धर्मातील भक्तिसार	१
२४२	सिद्धान्त कल्पतरु	खामगाव	१८९१	४९०	रुक्मिणी स्वयंवर	१
२४३	रामदास छापखाना	विजापूर	१८९२	७५०	नाहीच ना ऐकायचं !	१
२४४	बालामृत छापखाना	सातारा	१८९२	२९	भाडळी मताचें ज्योतिषसार भाग १	१
२४५	शिलाछाप	कोल्हापूर	१८९२	३७१	रसायनशास्त्राची मूलतत्त्वे	१
२४६	ब्राह्मण छापखाना	मुंबई	१८९२	९११	राजारामाचे चरित्र	१
२४७	विचारदर्शक छापखाना	मुंबई	१८९२	१४५	नलदमयंती चरित्र	१
२४८	बॉम्बे न्यू प्रेस	मुंबई	१८९२	९२२	दादाभाई नौरोजी चरित्र	१
२४९	डायमंड प्रेस	मुंबई	१८९२	७०३	दामाजीपंताचा फार्स आ. २ री	१
२५०	प्रबोधरत्नाकर छापखाना	मुंबई	१८९२	८०७	चतुरलोकांच्या नकला	१
२५१	ज्ञानसागर छापखाना	मुंबई	१८९२	५९५	कर्मबंधमाला अथवा कटाव संग्रह	१
२५२	मिलिटरी प्रेस	बडोदे	१८९२	४७४	पदाति व्यायाम	१
२५३	दीनवत्सल छापखाना	मुंबई	१८९२	८३४	गुर्वाज्ञा व बोधवचने	१
२५४	श्रीसमर्थ छापखाना	पुणे	१८९२	६६०	राणा भीमदेव अथवा खरा रजपूत	१
२५५	व्यापारी छापखाना	पुणे	१८९२	६७१	मारवाड्याचे कसब	१

७

मुद्रणाचा प्रसार आणि व्यापारी मुद्रण

ज्ञानप्रकाश की न्यूनप्रकाश ?

६१. *पुणे शहराचे वर्णन*[४६] या इ. स. १८६८-मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात पुण्यातील मुद्रणालये, ग्रंथालये आणि वृत्तपत्रे यांवाबत काही माहिती प्रसिद्ध झाली आहे. तीत म्हटले आहे :

" सन १८५८ या सालीं पुण्यांतील पुस्तकगृहांत जीं पुस्तकें होतीं, त्यांत ३८१ इंग्रजी, २६ संस्कृत, १८ गुजराथी, ३ हिंदुस्थानी, १८० मराठी, ८ पारशी, ५ कानडी (एकूण ६२१) पुस्तकें होतीं. या वेळेस ज्ञानप्रकाश व प्रभाकर ही वर्तमानपत्रें येथें येत असत. " (पृ. १२६)

" शिवाय सात छापखाने आहेत, पैकीं दोन इंग्रजी आहेत. " (पृ. १३६) " ज्ञानप्रकाश नामक एक मराठी वर्तमानपत्र याच वर्षी (१८४९) पुण्यांत सुरू झालें. त्याचे अगोदर पुना क्रॉनिकल म्हणून इंग्रजी पत्र निघत होतें. तें सन १८५१त बंद झालें. ज्ञानप्रकाश सुरू झाला त्या वेळेस दुसरें मराठी वर्तमानपत्र दक्षिण प्रांतीं नव्हतें. या पत्रांस प्रथम आश्रय रा. रा. मोरो रघुनाथ ढमढेरे व रा. रा. गोपाळराव हरी देशमुख यांचा होता. त्यांनीं मनःपूर्वक श्रम घेऊन हें काम चालविलें. तें काम बरेच दिवस रेंगाळत चाललें होतें. कारण लोकांस वर्तमानपत्र वाचण्याची त्या वेळेस गोडी नव्हती व उपयोग काय हाही माहीत नव्हता, तरी त्यांच्या कर्त्यांनीं धैर्य सोडलें नाहीं. एकानें द्रव्यबळ व दुसऱ्यानें विद्याबळ खर्चून त्याला उत्तम स्थितीस आणिलें. परंतु कर्त्यांची अदलाबदल झाल्यामुळें त्यांचा पूर्वीचा सोज्ज्वळ प्रकाशही बदलला व आता तें न्यूनप्रकाश झालें आहे. " (पृ. १२१)

मुद्रणाचा पुण्यातील विकास

६२. इ. स. १८८१-मध्ये 'केसरी' निघाला. 'किरण' छापखान्याचे सामान शनिवारातील

४६. जोशी, नारायण विष्णू, '*पुणे शहराचें वर्णन*', १८६८.

(ज्ञानेश्वरीटीका गीतेची अध्याय २ ओंव्या.)

स्वजनवधाच्या दुःखानें विषाद पावून शस्त्र टाकून युद्धपराङ्मुख झालेल्या
अर्जुनास पाहून कृष्ण म्हणतो.

ओंव्या.

मग आपुलेनि चित्तीं म्हणे, येथें हें काय आदरिलें येणें,
अर्जुन सर्वथा कांहीं नेणे, काय कीजे १
हा उमजे कवणेपरी, कैसेनी धीर स्वीकारी,
जैसा ग्रहातें पंचाक्षरी, [1]अनुमानी कां २
[2]नातरी असाध्य देखोनि व्याधी, अमृतासम औषधी,
वैद्य [3]सूची निरवधी, निदानींची ३
तैसें [4]विवरीत असे श्रीअनंत, तया दोहीं सैन्याआंत,
जयापरी पार्थ, भ्रांती सांडी ४
तें कारण मनीं धरिलें, मग सरोष बोलों आदरिलें,
जैसें मातेच्या कोपीं [5]थोकलें, स्नेह[6]आर्थी ५
कीं औषधाच्या कडवटपणीं, जैशी अमृताची पुरवणी,
ते [7]आहाचि न दिसे परी गुणीं, प्रकट होय ६
तैशीं वरिवरि पाहतां उदासें, अंतरीं अति सुरसें,
[8]तियें वाक्यें हृषीकेशें, बोलों आदरिलीं ७
मग अर्जुनातें ह्मणितलें, आम्हीं आजि हें नवल देखिलें,
जें तुवां येथ आदरिलें, [9]माझारींची ८
तूं जाणता जरी म्हणविशी, तरी नेणिवेतें नसांडिशी,
आणि शिकवूं ह्मणों तरी बोलशी, बहुसाळ नीती ९
जात्यंधा लागे [11]पिसें, मग तें [12]सैरा धांवे जैसें,
तुझें शहाणपण तैसें, दिसतसे मज १०
तूं आपणातें तरी नेणसी, परि या कौरवांतें [13]शोचूं पाहसी,
हा बहु विस्मय आम्हांसी, पुढती पुढती ११

१काढूं पाहे. २किंवा. ३आठवी. ४विचार करीत. ५राहिलें. ६आर्थी. ७असून. ८तीं ९युद्धामध्यें किंवा मधेंच. १०अज्ञानातें. ११वेड १२स्वछंद १३शोकविषय करूं पाहसी

आकृती ३२ : पुण्यातील सुरुवातीचे अक्षरमुद्रण, ‘ कवितासार ’, ज्ञानप्रकाश छापखाना, पुणे. १८६३

अनुक्रमणिका

'शिवाजी' छापखान्यात पडले होते, ते हप्तेबंदीने 'केसरी'च्या संस्थापकांनी घेतले आणि मोरोबादादांच्या वाड्यात 'आर्यभूषण' छापखान्याची (१८८१ साली) स्थापना केली. इ. स. १८८१-मध्ये केसरीचे वर्गणीदार ५००-वर वाढले, म्हणून नवीन टाइपाची गरज भासू लागली. टिळकांनी सहदेवराव पिंपळे यांना आर्यभूषणमध्ये ठेवून घेतले आणि फाउंड्रीची वाढ केली. इ. स. १९०५-मध्ये गायकवाडवाड्यात आल्यावर टिळकांनी 'केसरी टाइप फाउंड्री'ची जुळवाजुळव केली. इ. स. १८९७-मध्येच 'केसरी' छापखान्याची स्थापना झाली होती. तत्पूर्वी १८९१-मध्ये टिळकांनी गणपत कृष्णाजींच्या छापखान्यातून टाइप मागविला होता. त्या वेळी पुण्यामध्ये ग्रंथमुद्रणासाठी फारच थोडे छापखाने होते. शाळाखात्याच्या पुण्यातील छापखान्यात १८३२-मध्ये एक पुस्तक छापिलेले आढळते. 'सरकारी पाठशाळेचा छापखाना' विश्रामबाग-वाड्यातून १८४०-च्या पूर्वीपासूनच पुस्तक-प्रकाशन करीत होता. सरकारी छापखान्या-व्यतिरिक्त, ज्ञानप्रकाश छापखान्यात (१८४९)* ग्रंथमुद्रण होई. शिवाय 'मित्रोदय' (१८४४), बाळकृष्ण रामचंद्र ठकार (१८५९), नारो अप्पाजी गोडबोले (१८६२), बुद्धिप्रकाश (१८६२), सापकर बंधू (१८६४), वृत्तप्रकाश (१८६४), वृत्तप्रसारक (१८६६), ज्ञानचक्षु (१८६६) ह्याही छापखान्यांची नोंद सापडते. १८६६-पासून 'जगद्धितेच्छु' छापखान्यातून ग्रंथ बाहेर पडू लागले.

चित्रशाळा आणि आर्यभूषण

६३. चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनी लोकशिक्षणाचा जो मोठा उद्योग पुण्यात मांडला, त्यामध्ये दुय्यम शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालय, वृत्तपत्र, नियतकालिक, इतकेच नव्हे, तर छापखान्याचाही समावेश होता. पुस्तकविक्रीसाठी त्यांनी 'किताबखाना' काढला. ग्रंथमुद्रणासाठी आणि चित्रछपाईसाठी 'चित्रशाळा' छापखाना स्थापन केला. या छाप-खान्याच्या स्थापनेविषयी विष्णुशास्त्री चिपळूणकर '*निबंधमाले*'मध्ये म्हणतात :

> "**चित्रशाळा** : आमच्या वाचकांपैकी कित्येकांस माहीत असेलच की 'काव्येतिहासा'च्या तिसऱ्या अंकात नाना फडणविसांची लहानशी रंगीत तसबीर घातली होती तो चित्रशाळेचा आरंभ होय. तेव्हापासून सुधारणा होता होता हल्ली रामपंचायतन, शिवपंचायतन, येथपर्यंत मजल येऊन ठेपली आहे. या तसबिरींचे काम कोणत्या तऱ्हेचे झाले आहे हे आम्ही स्वतः सांगण्याची आज गरज उरली नाही. हजारो प्रती उडून दूरदूरच्या गावांहूनही त्याजविषयी प्रतिदिवशी मागण्या येत आहेत. असो; या उद्योगाच्या संबंधाने आमच्या वाचकांस विशेषेंकरून येवढीच एक गोष्ट कळवावयाची की, आमच्या *इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या मूर्ती चिरकाल रहाव्या एवढ्यावरती मुळी हा कारखाना आम्ही काढला*, व हल्ली वरील तसबिरी जेवढ्या पैदा झाल्या तेवढ्यांचा आम्ही संग्रहही करून ठेवला आहे; तर आमच्या शोधकमित्रांनी आणखी काही शोध लागल्यास आम्हांस वरदी द्यावी. वरील ऐतिहासिक मंडळी अवकाशानुसार हाती घेण्याचा आमचा इरादा आहे."

* कंसांतील आकडे त्या-त्या छापखान्यात छापलेल्या पहिल्या उपलब्ध पुस्तकाचे प्रसिद्धिवर्ष दर्शवितात.

अनुक्रमणिका

मुलगा, आमचें सर्व कांहीं तूं आहेस. मंगलापूरच्या शाळेला परत जाण्याचा जो तुझा विचार आहे तो मात्र आह्मांला बिलकुल आवडत नाहीं; आणि ह्मणून आमचें तुला फिरून फिरून असें सांगणें आहे कीं तूं येथें आमच्या डोळ्यासमोर राहण्याचा निश्चय कर; आह्मांला वारंवार तुझ्याकडे पाहिल्यावांचून कसें चैन पडेल ?

राणी—चंद्रसेना, तुझ्या आईचा तरी शद्ब खालीं पाडूं नको; बाळा, मंगलापुराला जाण्याचा हेका सोड; येवढी जोड मी तुझ्यापासून मागून घेतें.

चंद्रसेन—आई, होतां होईल तों तुझा शद्ब मोडणार नाहीं.

राजा—वाः चंद्रसेना, फार चांगलें उत्तर दिलेंस. तूं आणि आह्मी कुंजपुरांत आनंदानें राहूं. मदनिके, चल आतां. चंद्रसेनानें आपण होऊन येथें रहाण्याचें कबूल केलें हें ऐकून मला फार समाधान वाटलें. याच्या या 'हो 'नें आम्हांलाच सा काय, पण कुंजपुरांतील एकून एक मनुष्याला आनंद होईल. उठा, चला आतां.

(**चंद्रसेना**खेरीज सगळे निघून जातात.)

चंद्रसेन—काय करावें, हें कठोर मांस आपोआप झडून जाईल, किंवा याचें पाणी पाणी होईल तर किती बरें होईल! अथवा शास्त्रकर्त्यांनीं आत्महत्या सदोष मानिली नसती तरी फार बरें झालें असतें! नको, नको, हा जीव परमेश्वरा! या जगांतल्या वस्तूनवस्तूचा मला वीट आला आहे व कांहीं एक मकोसें झालें आहे! धिक्कार असो, धिक्कार असो या जगाला! जिच्यावर वारंवार हात न फिरल्यामुळें जिकडे तिकडे हवेंतसें रान माजून तें बियाला आलें आहे अशा बागेप्रमाणें हें जग मला भासूं लागलें आहे! जात्या अमंगळ आणि घाणेरड्या चिजेखेरीज दुसरी चीजच यांत नाहीं असें वाटतें! त्याचा असा प-

आकृती ३३ : ' विकारविलसित ', आर्यभूषण छापखाना, पुणे, १८८३

अनुक्रमणिका

६४. आर्यभूषण छापखान्याच्या स्थापनेनंतर मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर 'निबंध-माले'च्या प्रतिवार्षिक समारोपात म्हणतात :

> " **आर्यभूषण :** गेल्या वर्षीच्या उपसंहारात सांगितलेला जो छापखाना तो हा होय. यात पूर्वोक्त विद्यालयीन मंडळीच भागीदार असून त्यांच्या परिश्रमावर हेही अवाढव्य काम सुरू केले आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणे *छापखान्याचा उद्योगही अविद्वान व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत*. त्यामुळे अज्ञानध्वंसनाविषयी केवळ वज्रच असे जे मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रगट झालेला नाही. तो झाला असता, आता उघडमाथ्यांनी जे आपले उन्नतत्व निर्भयपणे खुशाल मिरवीत, अशा बिचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळी जाऊन दडून बसावे लागेल. "[४७]

६५. मालाकारांचे वरील अधोरेखित विधान मुंबईतील तत्कालीन छापखान्यांना लागू पडत नाही. मुंबईतील छापखान्यांपैकी अनेक छापखाने असे दाखवून देता येतील की, जे लेखकांनी आणि संपादकांनी चालविले होते. अग्निहोत्री, डुकले यांचे छापखाने याच कोटी-तील आहेत. गणपत कृष्णाजींची एकंदर करामत पाहता ते निरक्षर होते असे वाटत नाही. जावजींची प्रभावळ तर विद्वानांचीच होती. पुण्यात त्याकाळी फारसे छापखाने नव्हते. त्यातून शास्त्रीबोवांना कोणते छापखाने अभिप्रेत होते हे नक्की समजत नाही. पण त्यांच्या समोर पुण्यातीलच काही छापखाने असावेत. संस्थांनी सुरू केलेल्या मुद्रणालयांच्या मागे सुशिक्षित आणि विद्वान माणसे असल्यामुळे मुद्रणयंत्रांचा प्रभाव प्रकट व्हावयास मदत व्हावयास हवी, असा शास्त्रीबोवांचा रोख दिसतो. या संबंधात सन १८८२-मध्ये, म्हणजे पुढल्याच वर्षी, आर्यभूषण छापखान्यात मुद्रित झालेल्या एका ग्रंथाच्या पहिल्या पानावर छापलेला लेखकाचा अभिप्राय येथे लक्षात घेणे युक्त ठरेल.

" सर्व वाचकांस ग्रंथकाराची विनयपूर्वक प्रार्थना "

> " हा ग्रंथ मी पुणे येथील ज्ञानप्रकाश व आर्यभूषण छापखान्यांत छापावयास दिला तेव्हा त्या छापखान्याच्या व्यवस्थापकांनी व्याकरणविषयक शब्दशुद्धीविषयीची जबाबदारी आपल्या शिरावर घेतल्यामुळे मी दुसरी काही योजना केली नाही, परंतु त्यानी पत्करलेली जबाबदारी पूर्ण रीतीने शेवटास न नेल्यामुळे या ग्रंथात अशुद्ध प्रयोगांचा भरणा फार आहे आणि त्याविषयी जर संपूर्ण शुद्धिपत्र केले तर किती वाढेल याचे अनुमान देखील करवत नाही. सबब जरुरीपुर्त्या शब्दांचे मात्र शुद्धिपत्र केले आहे. यास्तव वाचकांनी त्याबद्दल क्षमा करून हा ग्रंथ लक्ष लावून वाचावा. "[४८]

मुद्रकाकडून लेखक-प्रकाशकांच्या अपेक्षा

६६. वरील उतारा येथे देण्याचे कारण आर्यभूषण छापखान्याचे उणे काढणे हा नाही, तर

४७. चिपळूणकर, विष्णुशास्त्री, *निबंधमाला*, वर्ष ६-वे

४८. *श्रीमंत मल्हाराज मल्हारराव गायकवाड यांच्या कारकीर्दीतील खरा इतिहास*, आर्यभूषण छापखाना, पुणे, १८८२

ळूना भोगावें लागणार हें कळत नाहीं. आणखी एक खेप या विषयाकडे देणें जरूर दिसल्यावरून आज येथेंच पुरे करितों.

वर्ष १, अंक ४, ५, १६.

बहिष्कार.

—*—

या शब्दाचा सामान्य अर्थ सर्वास माहीत आहेच. सर्व लोकांच्या रिवाजाविरुद्ध कोणी वर्तन केल्यास त्याला लोकांतून काढून टाकण्याची रीत फार पुरातन काळापासून सुरू आहे. एखादा कुजका पदार्थ जसा आपण टाकून देतों, तद्वतच लोकांनीं आपल्या मंडळींतून दुर्वतन करणाऱ्यास घालविलें पाहिजे. "समानशीलव्यसनेषु सख्यं" या न्यायानें दोन विरुद्ध वस्तूंचा कधींही समागम व्हावयाचा नाहीं. त्या दोन निरनिराळ्याच टेविल्या पाहिजेत. नाहींतर एकही सुरळीत चालणार नाहीं. व हाच विचार मनांत आणून आपल्या शास्त्रकर्त्यांनीं कित्येक पातकांस सदर शिक्षा सांगितली आहे. इंग्लिश ग्रंथकारांनीं शिक्षेचे दैविक, लौकिक, व राजकीय असे जे त्रिविध भेद सांगितले आहेत, त्यांतील मधल्यांत याचा अंतर्भाव होतो. यास जें धर्माचें रूप आलें आहे तें केवळ आनुषंगिक होय. आपल्यांत धर्म व कायदा यांचे धर्मग्रंथांतून एकाच ठिकाणीं विवेचन झाल्याकारणानें आपली अशी समजूत झाली आहे. धर्मशास्त्राचें कोणतेहीं पुस्तक घ्या, त्यांत मौंजीबंधनादिसंस्कारही यावयाचे, व त्यांचे बरोबर राजानें प्रजेस कसें वागवावें हेंही पण सांगितलें असतें. एकादशीचा उपास मोडल्यास प्रायश्चित्त, व चोरी केल्यास दंड हे एकेच ठिकाणीं गोंवलें असतात. हल्लीं जसें लोकांच्या व राजाच्या हक्कांचें फारसत होऊन प्रत्येकाच्या हक्कांचे नियमन झालें आहे, तसा प्रकार पूर्वी नसून राजा ह्मणजे देवाचा अंश, व प्रजा ह्मणजे त्याचीं लेंकरें, असें समजत असत. "स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः" हाच प्रकार पूर्वींचे ग्रंथांतून आढळतो व अद्यापिही सरकार आपलें मायबाप होय अशा तऱ्हेचें उद्गार ऐकू येतात! अशा स्थितींत शिक्षेचे त्रिविधत्व कोणाच्याही मनांत येणार नाहीं. खरेंच आहे; रामचंद्र राजासारखा राज्यकर्ता असल्यावर 'मासाचार्टा' किंवा 'हेबस कार्पस' कशास पाहिजे. पण अशी स्थिति सदोदित कोठून आणणार? खुद्द रामचंद्रास ही "ते हि नो दिवसाः गतः" असा अनुभव मिळाला, मग आपली काय कथा!

असो; तर ज्याप्रमाणें राज्यकर्त्यांत अंतर पडलें आहे, त्याचप्रमाण पूर्वींचे राजनितींतही फेरफार झाला पाहिजेत; "राजा कालस्य कारणम्". मांडून घेतल्याखेरीज आतां कांहीं एक मिळणार नाहीं. अशा वेळेस लौकिक व राजकीय कामाचा व शिक्षेचा निरनिराळा भेद होणें अवश्य होय. व तसें हल्लीं होतही चाललें आहे. आतां परधर्मी लोक या देशावर राज्य करूं लागल्यापासून आमचे धर्मसंबंधी तंटे त्यांजकडे जाण्याचा संभवच राहिला नाहीं, व अशानें जरी पेशवाईंतील रामशास्त्रीबुवाप्रमाणेंच आतां कलेक्टर व जज्ज यांचा अधिकार आहे, तथापि आपण अजून लभ नोंदवीत नाहीं, किंवा घटस्फोटांचें याज्ञिकत्व करण्यास जज्ज साहेबांस निमंत्रणही करीत नाहीं! सरकारास या कार्यांत मुळींच बोलतां येत नसल्याकारणानें, त्यास तें आमच्याकडे ठेवणें भाग पडलें आहे, व त्यासंबंधानें जे जे तंटे उपस्थित होतील त्यांचा निकालही आपणच केला पाहिजे. व निकाल झाल्यावर तो अमलांत आणण्यास शिक्षाही आपणच केली पाहिजे; यावरून ऐवढें ध्यानांत येईल कीं पूर्वींचे राजे सधर्मी असल्याकारणानें धर्म व व्यवहार संबंधानें जो त्यांजकडे अधिकार होता, तो परधर्मी राजे झाल्याबरोबर निराळा करावा लागला.

आकृती ३४ : 'केसरींतील निवडक निबंध (दुसरे पुस्तक)', आर्यभूषण छापखाना, पुणे, १८८८

लेखक-संपादकांचा चोखंदळपणा, तसेच मुद्रण-व्यवसायामध्ये छापखान्याकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा आणि त्यांची पूर्ती यांतील अंतर दाखविणे हा आहे. मूळ मुद्रणप्रत बरोबर असती, तर "*खरा इतिहास*"कर्त्यास वरील शब्दांत मुद्रकास दोष देण्याचे प्रयोजन नव्हते. व्यापारी मुद्रण हे सेवामुद्रण आहे. ते मनपसंत झाले नाही, तर वाया जाते. ग्रंथमुद्रणामध्ये जरी प्रकाशक चोखंदळ आणि लेखक दक्ष असला तरी झालेले काम सहसा वाया जाऊ देत नाही. शुद्धिपत्राने काम भागविता येते. म्हणून की काय, मुद्रक तितके जागरूक नसतात. काही वर्षांपूर्वी पुण्यास प्रकाशकांच्या एका चर्चेत काही मुद्रणालयांच्या गचाळ्या कारभाराबद्दल आणि निकृष्ट छपाईबद्दल बरीच टीका करण्यात आली होती, तिचे येथे स्मरण होते.

राजा रविवर्म्याची चित्रे आणि रविवर्मा प्रेस

६७. गेले शतक उलटण्यापूर्वीच 'रविवर्मा प्रेस'ची मुंबईस स्थापना झाली होती. राजा रविवर्म्याची चित्रे छापण्यासाठी हा प्रेस निघाला. त्यात श्लायशर हे जर्मन तंत्रज्ञ आणि जोशी नावाचे लिथो आर्टिस्ट होते. जोशी पुढे बाहेर पडले. आणि त्यांनी मुंबईस 'रविउदय प्रेस'ची स्थापना केली. मुंबईच्या प्लेगला कंटाळून 'रविवर्मा प्रेस'चे मळवलीस स्थलांतर झाले. या मुद्रणालयात आजही राजा रविवर्म्याची मूळ चित्रे आणि त्यांवरून श्लायशरने छापण्यासाठी तयार केलेल्या चित्रांकित शिळा पहायला मिळतात. येथे छापून निघालेल्या चित्रांचे वितरण प्रसिद्ध उद्योगपती अनंत शिवाजी देसाई टोपीवाले करीत. रविवर्मा प्रेसमधून त्या काळात बाहेर पडलेल्या चित्रांस हिंदुस्थानात इतरत्र तोड नव्हती. ही देवादिकांची चित्रे आजही घरोघर पहायला मिळतात. राजा रविवर्म्यांनी शृंगारिक चित्रे लोकप्रिय केली. पौराणिक कथांवर आधारिलेली ही शृंगारिक चित्रे अलीकडेपर्यंत अनेक सुखवस्तू गृहस्थांच्या शय्यागृहांतच नव्हेत, तर दिवाणखान्यांतही लावली जात. त्यांच्या नकलाही अनेक झाल्या; आणि त्या चित्रांच्या नकला छापण्यासाठी अनेक लिथो प्रेस निघाले, लिथो आर्टिस्ट तयार झाले. महाराष्ट्रातच नव्हे, तर हिंदुस्थानात लिथो छपाई लोकप्रिय करण्यात राजा रविवर्मा आणि त्यांचे जर्मन सहाध्यायी श्लायशर यांचा फार मोठा वाटा आहे. या चित्रांचे वितरक अनंत शिवाजी टोपीवाले यांच्या व्यवसायावर पुढे जेव्हा गंडांतर आले. तेव्हा रविवर्म्याच्या चित्रांनाही त्याची झळ लागली. आजही या चित्रांना लोकाश्रय मिळणे शक्य आहे. परंतु त्यासाठी त्यांच्या चांगल्या प्रती उपलब्ध व्हावयास हव्यात.

६८. राजा रविवर्मा यांचा जन्म केरळमधील किलिमनूर गावी १८४८-मध्ये झाला (२९-४-१८४८). त्यांना कुमारवयातच चित्रकलेची आवड उत्पन्न झाली होती. त्यांच्या विसाव्या वर्षी थिओडर जॉन्सन हे इंग्रज चित्रकार त्रावणकोर येथे आले असता, त्यांच्या तैलचित्र काढण्याच्या कौशल्याचा अभ्यास करण्याची रविवर्म्यांना संधी मिळाली. इ. स. १८७३ साली मद्रास येथे भरलेल्या चित्रकला-प्रदर्शनात रविवर्म्यांना त्यांच्या 'नायर युवती' या चित्राबद्दल सुवर्णपदक मिळाले. पुढल्या वर्षी त्यांच्या 'तमिळ स्त्री' या चित्रास सुवर्णपदक मिळाले. त्यांचे 'शकुंतलापत्रलेखन' हे चित्र १८७६-च्या मद्रास येथील प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट

इतिहासतरंगिणी

मिसरदेश.

हा देश आफ्रिकाखंडामध्यें ईशान्येस आहे. हा प्राचीन काळापासून फार प्रसिद्ध आहे. ह्यांतले मूळचे राहणारे लोक नोहाचा मुलगा हाम ह्याचे वंशज असावे, असें बहुत इतिहासकारांचें मत आहे. ह्या देशामध्यें पाऊस कधीं पडत नाहीं. ह्यामध्यें नैल नदी दक्षिणोत्तर वाहते. तिला वर्षांतून दोनदां महापूर येतात; आणि त्यांच्या योगानें तेथील शेतें भातें पिकतात. ह्या देशाचा पहिला राजा मिनीस ह्या नांवाचा होता; त्यानें नैल नदीचा प्रवाह पलीकडे सारून त्याच्या जागीं मेंफिस ह्या नांवाचें शहर बांधिलें होतें, अशी दंतकथा आहे. तो राजा मेल्यानंतर त्याच्या प्रजेनें त्याचें मोठें देव्हारें मांडिलें होतें.

मिसर देशाचा प्राचीन इतिहास पुष्कळ विलक्षण गोष्टींनीं भरला आहे. त्या गोष्टींवर कोणी ही विश्वास ठेविणार नाहीं. इ०स० पूर्वीं २०८४ पासून तों इ०स० पूर्वीं १८२५ पावेतों त्या देशावर जे राजे राज्य करीत होते, ते गुराख्यांसारखे राहात असत, ह्मणून ते गुरख्ये राजे असे इतिहासांत प्रसिद्ध आहेत. पुढें कांहीं वर्षांनीं ह्या राजांस त्या देशांतून काढून लावून नितोक्रिस ह्या नांवाची एक इथिओपियाची* राणी त्यांजवर राज्य करूं लागली. हें वर्तमान इ०स० पूर्वीं १६७८ वे वर्षीं घडलें. नंतर तिच्या भावास मिसरी लोकांनीं ठार मारिलें. तेव्हां तिला अतिशयित संताप येऊन तिनें त्याबद्दल त्यांचा सूड घेण्याचा निश्चय केला; आणि त्याप्रमाणें आपला हेतु सिद्धीस नेला; त्याचा प्रकार असा. ज्या लोकांवर तिचा वहीम होता, त्यांस तिनें आपल्या येथें बोलावून, एका तळघरांत जेवायास बसविलें. ती रात्रीची वेळ होती; ह्मणून तेथें पुष्कळ मशाला लाविल्या होत्या. ते लोक जेवणाच्या भरांत आल्यावर, त्या राणीनें, पूर्वीं योजना करून ठेविल्याप्रमाणें, एक मोठा नदीसारखा पाण्याचा लोट त्या जागीं सोडून दिला. तेव्हां त्या मशाला विझून जाऊन ते सर्व लोक बुडून मरण पावले.

मिसर देशाचा सर्वांत प्रसिद्ध राजा सेसोस्त्रिस ह्या नांवाचा होता. हा कधीं होऊन गेला, हें बरोबर समजत नाहीं. परंतु, आलीकडे एक जुना हस्तलेख सांपडला आहे; त्यावरून हा राजा तीनहजार वर्षांमागें होऊन गेला असावा, असा विद्वान लोक तर्क करितात. सगळें जग जिंकण्याच्या इराद्यानें, पांच लक्ष पायदळ, चोवीस हजार स्वार, आणि सत्तावीस हजार युद्धोपयोगी रथ इतक्या मोठ्या सैन्यासहवर्तमान हा राजा स्वदेशांतून बाहेर पडला; आणि

---

* हा देश मिसर देशाच्या दक्षिणेस आहे.

आकृती ३५ : ' इतिहास तरंगिणी ', गणपत कृष्णाजी यांचा छापखाना, मुंबई, १८७८

ठरले. इ. स. १८८१-मध्ये रविवर्मा सयाजीरावांच्या निमंत्रणावरून बडोद्यास गेले. तेथे त्यांनी चित्रित केलेल्या तसविरी बडोद्याच्या राजवाड्यात आजही पहावयास मिळतात. त्यांतच त्यांची पौराणिक प्रसंगांवरची चित्रे आहेत. ती त्यांनी १८८८ ते १८९० यांच्या दरम्यान काढली आहेत. ही चित्रे छापून वितरित करण्यात आली. त्यातच 'रविवर्मा मुद्रणालया'चा जन्म झाला. राजा रविवर्म्यांचे वास्तव्य मुंबईस होऊ लागले. पुढे ते त्रावणकोर येथे स्थायिक झाले, आणि छापखान्याची मालकी श्लायशरकडे आली. श्लायशरनी एतद्देशीय स्त्रीशी विवाह केला होता. छापखान्याची मालकी त्यांच्या पश्चात त्यांची मुलगी आणि जावई डॉ. सिंग यांच्याकडे गेली. डॉ. सिंग यांच्या कारकीर्दीत या छापखान्यात सहा स्वयंचलित प्रतिरूप मुद्रणयंत्रे आली. ग्रंथमुद्रणाशिवाय नकाशे, चित्रे, खेळण्याचे पत्ते ही छापण्याची अद्ययावत व्यवस्था झाली. निर्णयसागरप्रमाणेच रविवर्मा प्रेसची नोंद महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासकारास घ्यावयाला हवी.

व्यापारी मुद्रणाची सुरुवात आणि विकास

६९. गेले शतक उलटण्याच्या सुमारास ग्रंथेतर मुद्रणासाठी छापखाने निघू लागले. त्यांत प्रथम शिळामुद्रणयंत्रे (Lithographic hand presses) होती. त्यानंतर प्रतिरूप मुद्रणयंत्रे (Offset machines) प्रचारात आली. शिळायंत्रांची पोस्टर्स छापणे, जाहिराती छापणे आणि विड्यांची लेबले छापणे ही प्रमुख कामे असत. या ग्रंथेतर मुद्रणालयांचा व्यवसाय ग्रंथमुद्रण करणाऱ्या मुद्रणालयांपेक्षा अगदी वेगळा पडतो. त्यामुळे दोघांची वाढ स्वतंत्रपणे होत राहिली. याव्यतिरिक्त औषधी वस्तू, सौंदर्यसाधने आणि इतर ग्राहकोपयोगी वस्तूंच्या (consumer goods) विक्रीमध्ये 'वेष्टनमुद्रणा'चा (packaging) एक नवीनच धंदा सुरू झाला. त्यासाठी वेगळी मुद्रणसामग्री लागते. आणि ती कामे करणाऱ्या मुद्रणालयांची तांत्रिक रचनाही वेगळी असावी लागते. अलीकडच्या काही वर्षांत औद्योगिक आणि गृहोपयोगी कागदांच्या (Industrial and wall papers) आणि तत्सम इतर मुद्रणासाठी ताम्रपटमुद्रणाचे (photogravure printing) कारखाने निघाले आहेत. या ग्रंथेतर मुद्रणासाठी निघालेल्या छापखान्यांची आर्थिक स्थिती जास्त चांगली असते. कारण त्यांत फायद्याची माया जास्त असते. म्हणून अनेक मुद्रक त्या व्यवसायाकडे वळतात. परिणामी ग्रंथमुद्रणाची आबाळ होते, असे आढळून येते. 'निर्णयसागर'सारखे केवळ ग्रंथमुद्रण करणारे जुने छापखाने पुढील काळात तग धरून राहिले, ते मुख्यतः धार्मिक ग्रंथांच्या मुद्रणावरच. मौलिक ग्रंथमुद्रणाचे महत्त्व कायम असले, तरी त्यातील कष्ट, त्या मानाने अपुरा मोबदला, त्यांच्या व्यवस्थापनास लागणारी सहनशीलता, स्पर्धायुगात या गुणांचा उत्तरोत्तर पडणारा तुटवडा इत्यादींमुळे ग्रंथमुद्रणास वाईट दिवस येत गेले.

मुद्रणव्यवसायातील 'कर्नाटकयुग'

७०. 'निर्णयसागर' छापखान्यानंतर मुंबईस स्थापन झालेला 'कर्नाटक छापखाना'

अनुक्रमणिका

भाग दुसरा

नियतकालिकांचा इतिहास

(मासिकें – त्रैमासिकें – वगैरे)

मराठी पहिलीं नियतकालिकें

(१)

मराठींतील पहिलें वृत्तपत्र काढण्याचा मान ज्याप्रमाणें श्री. बाळशास्त्री जांभेकर व श्री. भाऊ महाजन यांच्याकडे जातो, त्याप्रमाणें मराठींतहि पहिलें नियतकालिक '**दिग्दर्शन**' १८३७त सुरू करण्याचा मानहि त्यांच्याकडेच जातो. मराठी नियतकालिक '**मराठी ज्ञानप्रसारक**' हें मुंबईच्या 'उपयुक्त ज्ञानप्रसारक' सभेच्या विद्यमानें १८५० पासून सुरू झालें. हें मासिक सुमारें १५।१६ वर्षे चाललें होतें. इंग्रजी भाषेंतील भारदस्त अशा 'क्वार्टर्ली'च्या धर्तीवर या मासिकाची आंखणी करण्यांत आली होती. मराठींतील दुसरें विख्यात त्रैमासिक '**ज्ञानदर्शन**' हें १८५४ मध्यें सुप्रसिद्ध वृत्तपत्रकार श्री. भाऊ महाजन यांच्याच संपादकत्वाखालीं सुरू झालें. त्यांनीं यापूर्वीच '**दिग्दर्शन**' व '**उपदेश-चंद्रिका**' चालविली होती. ज्ञानदर्शन या त्रैमासिकाच्या जुलै महिन्यांत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या अंकांत श्री. भाऊसाहेबांनीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत (विविधज्ञानविस्तार १९२६ मे, पृ. १८७) वर्णिलेली परिस्थिति आजच्या घटकेसहि तशीच कायम आहे. तीन-चार वर्षांतच त्यांना हा आंतबट्ट्याचा व्यवहार सोडून द्यावा लागला. तिसरें नांवाजलेलें मासिक 'शाळापत्रक' हें १८६१ मध्यें '**पुणें पाठशाळापत्रक**' या नांवानें प्रथम प्रसिद्ध झालें व तिसऱ्या वर्षाच्या ४ थ्या अंकापासून तें मराठी 'शाळापत्रक' ह्याच नांवानें प्रसिद्ध होत होतें. त्यानंतर सुप्रसिद्ध अशा विविधज्ञानविस्तार मासिकाचा जन्म १८६७ च्या जुलैंत झाला. सुदैवानें गेलीं ६९ वर्षे विविधज्ञानविस्तार चालू असून विस्तारानें कित्येक लेखकांना आणि कवींना लेखन-प्रवण केलें आहे. विस्तारापूर्वीं लहान मोठीं किरकोळ २९ मासिकें निघालीं होतीं अशी नोंद सांपडते. '**न्यायाश्रय**' (१८६६) व '**वकिलांची साथी**' १८६७ हीं दोन कायद्याचींच मासिकें होतीं. त्याशिवाय '**ज्ञानोदय**' (१८४२), हरी केशवजी यांचें '**तारप्रसारक**' (१८५०), '**प्रभोदय**' (१८५६) व '**सायंदीपिका**' (जुनी) १८६१ हीं ख्रिस्तीमतप्रचारक मासिकें होतीं. '**विचारलहरी**' (१८५२), '**चंद्रिका**' (१८५४) व **सद्धर्मदीपिका** (१८५६) हीं तिन्ही मासिकें हिंदुधर्माचा प्रसार करून ख्रिस्तीमतप्रचाराला विरोध करीत होतीं.

आकृती ३६ : 'कर्नाटक'च्या अखंड पायऱ्यात जुळविलेले एक पान,
' नियतकालिकांचा इतिहास ' कर्नाटक प्रेस, मुंबई

अनुक्रमणिका

आणि ‘ कर्नाटक प्रकाशन ’ या संस्थांनी मुद्रणाच्या व्यवसायामध्ये उज्ज्वल प्रगती केली. कर्नाटक संस्थेची स्थापना १९०२ साली झाली. तरी १९१६-मध्ये कै. मंगेशराव कुलकर्णी यांनी त्याची व्यवस्थापकीय जबाबदारी अंगावर घेईपर्यंत संस्थेची फारशी प्रगती होऊ शकली नव्हती. कै. मंगेशरावांनी उत्तम व्यवसायाच्या ज्या दोन बाजू, कामाचा उच्च दर्जा आणि आर्थिक स्थैर्य ही दोन्ही साध्य केली. म्हणून १९१६ ते १९४५ हे ‘ कर्नाटक-युग ’ म्हणावयाला पाहिजे. ‘ निर्णयसागर ’ आणि ‘ कर्नाटक ’ यांनी मराठी सुबक मुद्रणाचे मानदंड निर्माण केले. कर्नाटक मुद्रणालयामध्ये निर्णयसागराचेच टाइप उपयोगात असत. परंतु अखंड पायका, उभा पायका आणि त्यांचे ठळक टाइप (Bold) ‘ कर्नाटक’ने नव्याने पाडून घेतले. जुळणीच्या बाबतीत कर्नाटक मुद्रणालयाने फार चांगली प्रगती केली. ‘ भारत गौरवग्रंथमाला ’, विवेकानंदांच्या व्याख्यानांचे खंड, महाभारताचे भाषांतर इत्यादी प्रकाशने ‘ कर्नाटक’च्या कामगिरीची आजही साक्ष देतील. या मुद्रणालयात छापलेले ‘ ***मराठी नियतकालिकांचा इतिहास*** ’ हे पुस्तक देवनागरी जुळणीचा उत्तम नमुना म्हणून उल्लेखनीय आहे. रॉयल आठपानी, दोनशे पाने, उत्तम क्रीमलेड कागदावर छापलेल्या, छप्पन्न आर्ट पृष्ठांवरील चित्रे आणि पूर्ण कापडी बांधणी असलेल्या या पुस्तकाची किंमत फक्त रुपये पाच होती !

सुबक ग्रंथमुद्रणाचे आजचे मानकरी : मौज प्रिंटिंग ब्यूरो

७१. ‘ कर्नाटक छापखाना ’ श्री. बा. ग. ढवळे यांनी १९४५-मध्ये विकत घेतला आणि काही वर्षे उत्तम प्रकारे चालविला. तो नंतर हस्तांतरित झाला. तरी त्या काळातील श्री. ढवळे यांची मुद्रणकलोपासना समकालीन मुद्रणाचा विचार करिता अतुलनीयच म्हणावी लागेल. पण ती अपवादात्मक होती. मुंबईस प्रथम नियतकालिकांसाठी निघालेला आणि नंतर ग्रंथमुद्रणासाठी प्रसिद्धीस आलेला ‘ मौज प्रिंटिंग ब्यूरो ’ ग्रंथमुद्रणात आज अग्रेसर आहे. स्वतःची दोनशेवर प्रकाशने ‘ मौज’च्या सुबक छपाईची साक्ष देतीलच, परंतु कै. दामले यांच्या ‘ ***शास्त्रीय मराठी व्याकरणा***’ची ‘ मौज’ने जी जुळणी आणि छपाई केली आहे, ती पाहता ‘ मौज’ची ही कामगिरी केवळ मराठी मुद्रणातच नव्हे, तर या देशातील एकंदर ग्रंथमुद्रणात अतुलनीय म्हणावी लागेल. आणि म्हणून मराठी ग्रंथमुद्रणात आज ‘ मौज’युग चालू आहे, असे मी म्हणतो.

आजची आघाडीवरची ग्रंथमुद्रणालये आणि बांधणी-व्यवस्था

७२. टाइम्स वृत्तपत्र संस्थेचा ‘ टाइम्स प्रेस ’, त्याचप्रमाणे केवळ इंग्रजी ग्रंथमुद्रणासाठी स्थापन झालेला आणि आज इंग्रजी ग्रंथमुद्रणात अग्रेसर असलेला ‘ इंडिया प्रिंटिंग वर्क्स ’, श्री. जी. यू. मेहता यांनी संपादिल्यानंतर भराभराटीस आलेला ‘ वकील ॲण्ड सन्स् ’ इत्यादी छापखाने आज सुबक ग्रंथमुद्रणासाठी प्रसिद्ध आहेत. ‘ वकील ॲण्ड सन्स् ’ यांनी तर ग्रंथमुद्रणाच्या काही मागण्या परदेशातून मिळविल्या आहेत. इंडिया प्रिंटिंग वर्क्स मुख्यतः

प्रकरण पहिलें

नाट्यकला व नाट्यशास्त्र

देवानामिदमामनन्ति मुनयः कान्तं क्रतुं चाक्षुषं
रुद्रेणेदमुमाकृतव्यतिकरे स्वाङ्गे विभक्तं द्विधा ।
त्रैगुण्योद्भवमत्रलोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् '[1] ॥

नाट्यकलेवरील उपलब्ध असलेल्या अत्यंत प्राचीन ग्रंथांत म्हणजे भरतमुनीच्या नाट्यशास्त्रांत नाट्याची उत्पत्ति सांगतांना ब्रह्मदेवानें ऋग्वेदापासून पाठ्य, यजुर्वेदापासून अभिनय, सामवेदापासून गान, व अथर्ववेदांतून रस असे घेऊन नवीन नाट्यवेद तयार केला, असें वर्णन आहे [२]. नाट्यास आवश्यक असणाऱ्या पाठ्य, गान, अभिनय व रस ह्या चारी गोष्टींत अभिनयास अधिक महत्त्व आहे, हें निर्विवाद आहे. आंगिक, वाचिक, सात्त्विक व आहार्य या पुढें सांगितलेल्या चारी अभिनयांनीं जोंपयत पाठ्य किंवा गानयुक्त होणार नाहीं, तोंपर्यंत त्यांत रसहि उत्पन्न होणार नाहीं व त्यास नाट्य ही संज्ञाहि दिली जाणार नाहीं. एखादा मनुष्य नुसतेंच एखादें वाक्य म्हणून दाखवीत असेल, अथवा एखादें गान गाऊन दाखवीत असेल, तर तो नाट्य करून दाखवीत आहे, असें म्हणतां येणार नाहीं; पण तोच मनुष्य जर त्याच्या तोंडीं ज्याचें गाणें किंवा वाक्य असेल, त्याचें सोंग घेऊन तेंच गाणें किंवा तेंच वाक्य साभिनय म्हणून दाखवील, तर त्या क्रियेस नाट्य असें म्हणतां येईल. उदाहरणार्थ, ऐतरेय ब्राह्मणांत शौनःशेप आख्यानाचे शेवटीं, होत्यानें तें आख्यान सांगावें व अध्वर्यूनें प्रत्येक ऋचेच्या शेवटीं त्यास ॐ असें म्हणून हुंकार द्यावा, असें सांगितलें आहे. पण अशा प्रकारच्या पाठास नाट्य असें म्हणतां येणार नाहीं. मॅक्स मुल्लरच्या म्हणण्याप्रमाणें 'an early attempt at dramatic representation' असें म्हणतां येईल,[३] पण त्याच आख्यानाचा जर एकानें शुनःशेपाचें,

(१) का. मा. १-४ (२) भा. ना. १-१७
(३) Max Muller's *History of Ancient Sanskrit Literature*, p. 216.

आकृती ३७ ; कर्नाटकच्या उभ्या पायक्यात जुळविलेले एक पान. डॉ. गोदावरी केतकर यांचे 'भारतीय नाट्यशास्त्र', आवृत्ती दुसरी, कर्नाटक प्रेस, मुंबई

अनुक्रमणिका

हिशेब आणि कायदेविषयक पुस्तके छापीत असला, तरी इतर बरेच सुबक ग्रंथ त्यांनी छापले आहेत. 'टाइम्स छापखाना' ही संस्था महाराष्ट्रातच नव्हे, तर अखिल भारतात अग्रेसर आहे. वृत्तपत्र आणि ग्रंथमुद्रण यांप्रमाणेच इतर विविध मुद्रण करण्याची तेथे सोय आहे. परंतु देशी भाषांत मात्र तेथे ग्रंथमुद्रण होत नाही, ही मोठी उणीव होय. ग्रंथमुद्रणाशी संबद्ध अशा पुस्तक-बांधणीचा व्यवसाय आपल्याकडे वाढला असला, तरी सुबक बांधणीच्या बाबतीत आपण फारशी प्रगती करू शकलेलो नाही. वर उल्लेखिलेल्या मुद्रणालयांव्यतिरिक्त 'के. एल. भार्गव', 'उषा प्रिंटर्स' आणि 'फोर ओशन्स', टाइम्स ऑफ इंडिया, कमर्शियल बुक बाइंडिंग वर्क्स, यांच्याकडे बांधणीची यंत्रसामग्री असून, काही पुस्तकांच्या बांधणीत त्यांनी बराच वरचा दर्जा मिळविला आहे. त्याशिवाय मौज प्रिंटिंग ब्यूरो, इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वकील्स, लालवानी ब्रदर्स यांच्याकडे चांगली बांधणी होते.

पुण्यातील ग्रंथमुद्रण-व्यवस्था

७३. पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त जे ग्रंथमुद्रण होते, त्यातील धार्मिक पुस्तके सोडिली, तर फायद्याची माया अनुल्लेखनीयच असते. पाठ्यपुस्तके छापण्याचा उद्योग करणारी अनेक मुद्रणालये गेल्या काही दशकांत पुण्यास निघाली, आणि जुनी वाढीस लागली. यांपैकी ज्या मुद्रणालयांनी सुबक मुद्रणाची दृष्टी ठेविली, असे मोजके छापखाने सोडिले, तर पुण्यातील मुद्रणधंद्यात झालेली ही वाढ दर्जापेक्षा विस्ताराचीच आहे, असे दिसून येते. त्यास सन्माननीय अपवाद म्हणजे श्री. चिंतामणी लाटकरांचे 'कल्पना मुद्रणालय'. मुंबईच्या कर्नाटक छापखान्याचा वारसा 'श्रीसरस्वती मुद्रणालया'च्या रूपाने आता पुण्यास लाभला आहे. तेथे आता ग्रंथ आणि संशोधनात्मक नियतकालिके छापली जातात. एवढे संपन्न मुद्रणालय एक आर्यभूषण सोडता पुण्यास दुसरे नाही. महाराष्ट्रातील सुबक मुद्रणाची चर्चा करणारा '*लेखनकला*' हा ग्रंथ ज्या 'आनंद मुद्रणालया'त छापला गेला (१९२६), तेथे आजही '*मराठीतील शिलालेख*' यांसारखी मुद्रकांच्या सोशिकपणाचा अंत पाहणारी पुस्तके मुद्रित होत आहेत. प्रस्तुत लेखकाचे गुरुतुल्य ज्येष्ठ स्नेही मामाराव दाते, यांच्या कारकीर्दीपासून ग्रंथमुद्रणास वाहिलेले 'लोकसंग्रह मुद्रणालय', श्री. जोशी-लोखंडे यांचे 'प्रतिभा मुद्रणालय' इत्यादी मुद्रणालयांतून ग्रंथमुद्रण चालू आहे. जुन्या 'आर्यभूषण'प्रमाणेच नवे 'संगम मुद्रणालय' प्रामुख्याने ग्रंथमुद्रणच करीत आहे. त्यात आता किर्लोस्करवाडीहून स्थलांतरित झालेल्या 'किर्लोस्कर छापखान्या'ची भर पडली आहे. थोडक्याच काळांत श्री. प. ह. पटवर्धनांच्या नेतृत्वाने 'संगम'ने हिंदुस्थानभर कीर्ती संपादन केली होती. आता ते मुद्रणालय आपल्या भव्य वास्तूत गेले आहे. 'राजगुरु मुद्रणालया'ने एके काळी श्री. गानूंच्या व्यवस्थापनाखाली दर्जेदार मुद्रणाची पताका पुण्यात फडकाविली होती. ते मुद्रणालय 'विश्वकर्मा' ह्या नावाने ग्रंथमुद्रणाची वाटचाल करीत आहे. काही वर्षांपूर्वी दर्जेदार काम करण्याबद्दल नाव मिळविलेली 'समर्थ भारत' आणि 'आर्यसंस्कृती' ही मुद्रणालये आज विद्यमान नाहीत, ही मात्र खेदाची गोष्ट होय. पुण्यामध्ये दुर्दैवाने चांगल्या दर्जाची बांधणी

करण्याची सोय आज उपलब्ध नाही. आणि तशी करण्याच्या बाबत पुण्यातील मुद्रणालये उदासीन आहेत, असे दिसते.

तरीही ग्रंथमुद्रणालयांची वाण

७४. मुद्रण-व्यवसायास महाराष्ट्रात आता बरे दिवस आले आहेत, असे म्हणायचा मोह होतो. परंतु परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यास फार वाव आहे. 'महाराष्ट्र-राज्य पाठ्यपुस्तक मंडळ' स्थापन झाल्यापासून त्या संस्थेची ८० ते ९० टक्के पुस्तके खाजगी मुद्रणालयांत मुद्रित होतात. ही बहुतेक पुस्तके प्रतिरूप-मुद्रणपद्धतीने छापण्यात येतात. कारण राष्ट्रीयकरण झालेल्या पाठ्य-पुस्तकांचे मोठ्या प्रमाणात मुद्रण करण्यास आवश्यक ती स्वयंचलित यंत्र-सिद्धता अक्षर-मुद्रणालयांनी अजून केलेली नाही. अशा प्रकारे 'पश्चिम आघाडी'वर सर्व सुरळीत नाही. साहित्य-संस्कृति-मंडळाच्या विश्वकोश-मुद्रणासाठी स्वतंत्र मुद्रणालयाची आवश्यकता आजही भासत आहे. बिनचूक, आणि वक्तशीर मुद्रण करणाऱ्या मुद्रणालयाची एकंदरीने वाणच आहे.

८

महाराष्ट्रातील एक प्रचंड मुद्रण

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या मुद्रणाचा इतिहास

७५. महाराष्ट्रात झालेले ग्रंथमुद्रणाचे एक प्रचंड काम म्हणजे महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या मुद्रणाचे. त्या बाबतीत ज्या अडचणी आल्या, त्यांचे ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी सविस्तर वर्णन केले आहे.[४९] त्यात त्यांची आत्यंतिक वैयक्तिक मते असली, तरी त्यांना आलेले अनुभव सार्वत्रिक असल्यामुळे त्यांचे सर्वच विवेचन वाचनीय झालेले आहे.

> "ज्ञानकोशाचें मुद्रण ही ज्ञानकोशाच्या इतिहासांतील धंद्याच्या दृष्टीनें महत्त्वाची उपकथा होय. छापणें म्हणजे केवळ यांत्रिक काम, तें पुरें करणें म्हणजे त्यांत कठीण काय आहे ? — अशी माझी कार्यारंभापूर्वी समजूत होती. आणि मुंबईची कॉंग्रेस आटोपल्यानंतर मीं पुण्यास येऊन उमरावती व नागपूरकडे जातांना मुंबईस उतरलों, तेव्हां टाइम्स ऑफ इंडियाच्या मुद्रणशाखेच्या मुख्यास मीं स्वतः विचारलें कीं, ५०० पानांचा एक असे २० भाग १ वर्षांत काढूं शकाल काय ? तेव्हां त्यांनीं "सहज" म्हणून उत्तर दिलें. तथापि पुढें एकदां जेव्हां त्यांच्याकडे एक भाग छापावयास द्यावयास गेलों होतों आणि एक भाग दीड महिन्यांत छापून द्या म्हणून म्हटलें, तेव्हां त्यांनीं तें आमच्याकडून होणार नाहीं, म्हणून नाकारलें. ज्ञानकोशाचा पहिला भाग निर्णयसागरकडे नोव्हेंबर १९१९-मध्यें गेला व त्याच महिन्यात त्यांच्याकडे आगाऊ २५०० रुपये आम्हीं नेऊन भरले. व पुढें थोडक्याच दिवसांनीं आणखी ५०० रुपये भरले. तरी देखील निर्णयसागरनें ५०० पौंड टाइपावरच काम करावयास सुरुवात केली. निर्णयसागरनें ज्ञानकोशाचें काम छापावयास दिरंगाई लावून प्रथम गोत्यांत घातलें आणि नंतर आर्यभूषणनें गोत्यांत घातलें आणि आम्हीं जेव्हां कंपोझिंगचें काम सुरू केलें तेव्हां आम्ही अडचणींतून बाहेर पडूं लागलों. सर्वांत गचाळपणें काम करणारा, दर ज्यास्त घेणारा आणि कामांत दिरंगाई करणारा छापखाना म्हटला म्हणजे

४९. केतकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश, '*माझें बारा वर्षांचें काम ऊर्फ ज्ञानकोश मंडळाचा इतिहास*', पुणे, १९२७, पाने ९०–९७.

गांव आहे. अमृतेश्वराचें एक देऊळ असून तें जखनाचार्यानें बांधलें असें म्हणतात. देवळांतील भिंतींवर पुराणांतील चित्रें खोदलेलीं आहेत. देवळांत इ. स. ११५७ पासून १२०८ पर्यंतच्या दरम्यानचे सहा शिलालेख सांपडले आहेत. दुसऱ्याहि कांहीं देवळांतून शिलालेख सांपडतात.

इ. स. ११६१ सालीं कलचुरीचा राजा बिजल यानें पश्चिमेकडील चालुक्यांचा पाडाव करून अण्णिगिरी ही आपली राजधानी केली. इ. स. ११७५ पर्यंत ही राजधानी असावी असें बिज्जलच्या पुत्र सोमेश्वर (११६७-११७५) याच्या वेळचे शिलालेख येथें सांपडले आहेत, यावरून दिसतें. इ. स. ११८४ सालीं पश्चिम चालुक्यांचा राजा चवथा सोमेश्वर यानें कल्याण येथील जैन व लिंगायत यांमधील लागलेल्या भांडणाचा फायदा घेऊन चालुक्य राज्य पुन्हां स्थापण्याचा प्रयत्न केला होता. इ. स. ११८९ सालीं देवगिरीचा तिसरा यादव भिल्लम (११८७-११९१) याचा मांडलिक महामंडलेश्वर बाचिराज याची राजधानी अण्णिगिरी होती असें एका शिलालेखावरून दिसतें. पुढें लवकरच वीरबल्लाळ नांवाचा होयसल राजा (११९२-१२११) याचीहि ती राजधानी होती असें एका शिलालेखावरून दिसतें (फ्लीटचा "कानडी राजघराणीं" ग्रंथ).

इ. स. १८०० सालीं प्रसिद्ध धोंड्या वाघ ह्यानें डंबलहून पळ काढला तेव्हां अण्णिगिरीस त्यानें मुक्काम केला होता. अण्णिगिरी, धारवाड आणि हुबळी येथें आक्टोबर १८०० सालीं क. वेल्स्लीनें तंबु तयार करविले (सप्लिमेंटरी डिस्पॅचेस भाग २). ब्रिटिश अंमल सुरू झाला त्यावेळीं अण्णिगिरी हें निपाणी संस्थानच्या जहागिरींत मोडत होतें. १८२७ सालीं येथें ४५० घरें, १४ दुकानें व कांहीं विहिरी होत्या. इ. स. १८३९ सालीं कोणी कायदेशीर वारस न उरल्यामुळें ती जहागीर ब्रिटिश सरकारनें खालसा केली. हुबळी धारवाडप्रमाणें हें गांव पूर्वी कापडाविषयीं प्रसिद्ध होतें. (धारवाड ग्याझेटीअर; इंपीरियल ग्या. ५)

अतरसुंबा पोटविभाग—याच्या उत्तरेस देहगांव तालुका; पूर्व व दक्षिण दिशांस खेडा तालुक्याचा कांहीं भाग; व पश्चिमेस देहगांव पोटविभाग. याशिवाय या विभागांतील पुष्कळ गांवें ब्रिटिश हद्दींत आहेत.

हा प्रदेश डोंगराळ, अरण्यमय व रमणीय असा आहे. १८७९-८० सालीं पावसाची सरासरी २५.६० इंच होती. वात्रक, मागम, धम्मी, वाराणशी आणि मोहोर या नद्या यांतून वाहातात. पृष्ठभागची जमीन बहुतेक रेताड आहे तरी कांहीं ठिकाणीं काळी जमीन दिसते. वस्ती बहुतेक कोळ्यांची आहे. १९११ सालीं लोकसंख्या २०,२२२ होती.

अतरसुंबा गांव—बडोद्याच्या अतरसुंबा पोटभागांतील (मुं. इ.) ठिकाण. लोकसंख्या तीन हजार. येथें महालकरी कचेरी, टपालकचेरी, गुजराथी शाळा व एक पडित किल्ला आहे. येथील लोक कांहीं लोखंडी काम करितात व त्यांची सुऱ्यांबद्दल प्रसिद्धी आहे. (मुं. ग.).

अतारी:—हें खेडेगांव (३०°.२६' उत्तर अक्षांश; ७२°.१' पूर्व रेखांश) पंजाब प्रांतांत, मुलतान जिल्ह्यांतील कबीरवाला तहसिलीमध्यें आहे. अलेक्झांडरनें हिंदुस्थानावर स्वारी केली त्यावेळीं त्यानें घेतलेलें हें तिसरें गांव होय. हेंच ब्राह्मणाबाद असावें असें कनिंगहॅम याचें मत आहे. हल्लीं या गांवाला कांहींच महत्त्व नाहीं. येथें एक पडका किल्ला आहे. तो पूर्वी फार अभेद्य असावासें दिसतें. हा ७५० चौरस फूट असून, ३५ फूट उंच आहे. याच्या दोन्ही बाजूंना प्राचीन शहराचे अवशेष पसरले आहेत. या अवशेषांचा इतिहास किंवा जुन्या शहराचें नांव कोणाला माहीत नाहीं. या शेजारचें अतारी गांव अगदीं अर्वाचीन आहे. (इं. ग.).

अतिकाय—धान्यमालिनी नामक स्त्रीपासून, रावणास झालेला पुत्र. याचें शरीर अतिस्थूल होतें म्हणून यास हें नांव पडलें होतें. यानें ब्रह्मदेवाचें आराधन करून तो प्रसन्न झाल्यावर, अस्त्रें, कवचें, दिव्यरथ, आणि सुरासुरांपासून अवध्यत्व, इत्यादि संपादिलें होतें म्हणून इंद्राचा पराभव केला, व वरुणास जिंकून त्याचा पाशहि आणिला. रावणास याचें मोठें साह्य होतें. कुंभकर्ण मरण पावल्यावर, हा युद्धार्थ रामासंमुख आला असतां, लक्ष्मणानें याशीं घोर युद्ध करून यास मारिलें. (वा० रा० युद्ध० स० ७१).

अतिपरमाणु विद्युत्कण.—१ निरवयव विद्युत् मूलमान अथवा विद्युत्परमाणूची कल्पना:—विद्युत् विश्लेषणाच्या (Electrolysis) सहाय्यानें मॅक्सवेल यास असें दिसून आलें कीं पदार्थाच्या प्रत्येक परमाणूवर सारखाच विद्युद्भार असतो. पण यानंतर (१८७३)मध्यें तो स्वतःच त्याच्या विरुद्ध विधान करूं लागला पण पूर्ण शोधाअंतीं आतां त्यानंतरच्या शास्त्रज्ञांनीं वरील गोष्ट सिद्ध केली आहे.

एकाकी परमाणूवरील विद्युद्भार हें विद्युत्चें स्वाभाविक मूलमान (Unit) आहे. याचे पूर्ण आधार अथवा पटी असूं शकतात पण अपूर्ण पटी असूं शकत नाहींत आणि हें मूलमान सध्यां व्यवहारांत असलेल्या स्थिर विद्युत् मूलमानापेक्षां बरेंच लहान आहे.

डॉ. जॉनसन स्टोनी यानें, विद्युद्भार असलेल्या परमाणूला 'विद्युत्कणवाही परमाणू' व द्रव्य विरहित विद्युद्भाराला 'विद्युत्कण' अशी संज्ञा दिली व तींच नांवें अद्याप चालू आहेत. हे विद्युत्कण परमाणूंना अगदीं बिलगलेले असतात व विद्युत्विश्लेषणाचे वेळीं मात्र ते निरनिराळ्या विद्युन्मार्गांशीं संघात झाल्यामुळें नाहींसे होतात. हे विद्युद्भार, परमाणूबरोबर जातात म्हणा, किंवा विद्युद्भारच परिमाणूंना विद्युन्मार्गांकडे नेतात म्हणा, पण विद्युत्विश्लेषणाचे वेळीं विद्युन्मार्गामुळें विद्युद्भार नाहींसा होऊन निव्वळ द्रव्यपरमाणू कायम रहातो. व

आर्यभूषण होय. हा पुण्यांतला सर्वांत मोठा छापखाना आहे तथापि हा छापखाना आमचें काम बरोबर करूं शकला नाहीं आणि या छापखान्याच्या निष्काळजीपणामुळें ज्ञानकोशमंडळाचें सुमारें कमींत कमी वीस हजार रुपये नुकसान झालें आहे. या छापखान्यानें छापण्याची तयारी करण्यासाठीं आगाऊ ५०० रुपये १३–१२–२१ व २५–१–२२ रोजीं घेऊन निष्काळजीपणें काम केलें आणि काम चालू असतां कामाकडे दुर्लक्ष केलें, असें सर्टिफिकिट दिल्याशिवाय राहवत नाहीं. याच वेळेस त्यांना ५०० रुपये भरण्याऐवजीं स्वतःच ५०० रुपयांचा टाइप घेऊन कामास सुरुवात केली असती, तर ज्ञानकोशमंडळाचे एक वर्ष तरी वांचलें असतें. ”

ग्रंथ छापून काढण्यासाठी लागणारी खटपट

७६. १९२२ सालच्या सप्टेंबर महिन्यांत ज्ञानकोशकारांनी शेअर होल्डरांकडे एक पत्रक पाठविले होते. त्यातील महत्वाचा भाग असा —

“ निर्णयसागराकडून सुमारें दीड वर्षांत दोन भाग छापून निघाले. तिसरा भाग आर्यभूषणकडे १९२१-च्या आक्टोबर महिन्यांत छापावयास दिला. तो त्यांच्याकडेच छापत आहे. पण त्यांच्याकडून फारसें जलद काम होत नाहीं, असें पाहून १९२२-च्या एप्रिल महिन्यांत पाडव्याच्या मुहूर्तावर “ ज्ञानकोश छापखाना ” म्हणून मंडळाने आपल्या मालकीचा छापखाना काढावयाचें ठरविलें. छापखाना रजिस्टर केला आहे. वस्तुतः छापखाना रजिस्टर केला नसून कंपोजशाखा तेवढी काढली आहे; व छपाईचें काम जगद्धितेच्छु छापखाना करतो. ज्ञानकोश छापखान्यांत ५-व्या भागाचे खिळे जुळून पुढें छापखान्यांत येत आहेत. आतांपर्यंत (१५ आगस्ट १९२२) ३४ फार्म म्हणजे २१६ पृष्ठें छापून झालीं आहेत. ज्ञानकोशाचा कार्यसमितीचा अंदाज चुकला यांत तो कोणत्या कारणांमुळें प्रामुख्यानें चुकला, असें विचारलें असतां असें उत्तर देतां येईल कीं, संपादकीय काम फारसें कमी झालें नाहीं. उलट बराचसा भाग वेळेच्या अगोदर तयार झाला होता. हा सबंध ग्रंथ एका वर्षांत छापून काढणें महाराष्ट्रांतील सर्वांत मोठमोठ्या छापखान्यांपैकीं बऱ्याच जणांस शक्य असेल, असें चुकीनें धरलें होतें. ”

धंद्यात स्पर्धेबाहेर असलेल्या छापखान्याची आवश्यकता

७७. स्पर्धेत असलेल्या छापखान्यांमध्ये जी अकार्यक्षमता निर्माण होते आणि सांस्कृतिक आणि शैक्षणिक कामाबाबत अनास्था निर्माण होते, त्याचा अनुभव डॉ. केतकरांना आला होता. डॉ. केतकर म्हणतात —

“ आम्ही असें म्हणूं शकतों कीं, *हा ग्रंथ ३ वर्षांत छापून काढण्याची ताकद महाराष्ट्रांतील कोणत्याहि मोठ्या धंद्याच्या स्पर्धेत असलेल्या छापखान्यास नाहीं.* आम्हांस लहानसा पण स्वतंत्र छापखाना काढूनच तें कार्य दोन-अडीच वर्षांत करणें शक्य आहे. मात्र दररोज दोन फार्म म्हणजे सोळा पृष्ठें छापून निघालीं पाहिजेत. आम्हांला हें शक्य आहे, असें विधान आम्ही करतों, याचें कारण असें : कंपोझिटरचा तुटवडा पडला म्हणजे कोणताहि चालू छापखाना निरनिराळ्या कंपोझिटरांना स्वीकारलेल्या गिऱ्हाइकाचीं निरनिराळीं कामें वाटून देतो व तीं जेव्हां पार पडतील, तेव्हां पडूं देतो. आपण छापखान्यास किफायतदार दर दिला, म्हणजे आपलें काम जलद होईल, असें नाहीं; छापखानदारास आपल्याच कामाकडे अधिक माणसें देतां येतील, असें

ॲबट,लीमन.—हा अमेरिकन धर्मोपदेशक व लेखक रॉक्सबरो येथें जन्मला (१८३५). उच्च शिक्षण पूर्ण झाल्यावर यानें कायद्याचा अभ्यास केला. तो. "हार्पर्स मॅगॅझीन" "इलस्ट्रेटेड ख्रिश्चन वुइक्ली" वगैरे नियतकालिकांचा सहसंपादक व "दि ख्रिश्चन यूनियन," "दि आउट लुक" वगैरेंचा मुख्य संपादक होता.

याच्या लेखांवरून सामाजिक सुधारणा, धर्मशास्त्र, उदारमतवाद, ख्रिस्ताचें मनुष्यत्व व एकात्मकेश्वरवाद वगैरे विषयांतील त्याचे विचार दिसून येतात. "ख्रिश्चॅनिटी ॲण्ड सोशल प्रॉब्लेम्स (१८९७), दिराइट्स् ऑफ मॅन (१९०५), हे त्यानें लिहिलेल्या ग्रंथांपैकीं कांहीं प्रमुख ग्रंथ होत.

अबट्टाबाद,त ह शी ल.—वायव्य सरहद्दीवरील हझारा जिल्ह्यांत ही एक तहशील आहे. ही उत्तर अक्षांश ३३°,४९' ते ३४°२२' व पूर्व रेखांश ७२°५५' ते ७३°३१' ह्यांमध्यें असून एकंदर क्षेत्रफळ ७१५ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस झेलम नदी आहे. या तहशिलींत डोर व हरोह या नद्यांच्या खोऱ्यांतील पुष्कळ मुलुख येत असून पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशाचा यांत समावेश होतो. उत्तर व ईशान्येकडील टेंकड्यांवर इमारती लांकूड पुष्कळ होतें. लोकसंख्या सुमारें दोन लक्ष. यांत अबट्टाबाद शहर, तहशील व मुख्य ठिकाण व नौशहर आणि ३५९ गांवें आहेत. इ. स. १९०३-०४ मध्यें या तहशिलीचें उत्पन्न रुपये. ९७००० होतें [इं. गॅ. ५].

अबट्टाबाद, श ह र.—हझारा जिल्हा व अबट्टाबाद या तहशिलीचें मुख्य ठाणें. उत्तर अक्षांश ३४°९' व पूर्व रेखांश ७३°१३' मध्यें असून लोकसंख्या सुमारें आठ हजार. हें इ. स. १८५३ त मुख्य ठाणें झालें इ. स. १८४०-५३ मध्यें हझारा येथें असलेले डेप्युटी कमिशनर मेजर जोन्स ॲबट यांच्या नांवावरून त्यास वरील नांव देण्यांत आलें. हें शहर समुद्रसपाटीपासून ४१२० फूट उंचीवर आहे. येथें गुरखे लोकांच्या चार पलटणी व ४ देशी बातेऱ्या एवढें सैन्य असतें. इ. स. १८६७ मध्यें येथें म्युनिसिपालिटी स्थापन करण्यांत आली. इ. स. १९०२-०३ सालीं येथील उत्पन्न सुमारें १४९००होतें तें इ. स. १९०३-०४मध्यें अबकारीच्या उत्पन्नाची भर पडल्यामुळें ४००० रुपयांनीं वाढलें. येथें सरकारी दवाखाना आहे. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेवरील हॅवेलियन स्टेशनवर उतरून टांग्यानें या शहरास येतां येतें. येथें दोन हायस्कुलें आहेत (अलबर्ट व्हिक्टोरिया हायस्कूल व अबट्टाबाद गव्हर्मेंट हायस्कूल). येथें कोणताहि माल तयार होत नाहीं गांवांत सागवानी लांकडाचे कांहीं मोठे व्यापारी आहेत. (अर्नोल्ड-इंडियन गाइड १९२० इं. गॅ.).

अबदल (पंजाब)-हे लोक कांग्रा व होशियारपूर जिल्हे व बिलासपूर, चंबा, मंडी व सुकेत या संस्थानांत आढळतात. हे भिक्षा मागत, गाणीं गात, एका गांवाहून दुसऱ्या गांवाला

होत नाहीं. त्याची काम करणारास दर देण्याची व माणसें मिळविण्याची शक्ति नियमित असते. ती त्याजकडे ज्या दरानें जें इतर काम येईल, त्यावर अवलंबून असते. शिवाय, छापखानदारास गिऱ्हाइकांकडून बराच किफायतीचा दर मिळाला, म्हणजे कंत्राटी कामगारांत व छापखानदारांत तंटे सुरू होतात; आणि त्या तंट्यांमुळें अधिक किफायतीचें काम मुळींच पडून राहतें. ज्ञानकोश छापणाऱ्या छापखान्यांत हा अनुभव आला. कंत्राटी कामगारांस चालू दरापेक्षा अधिक दर देणें आणि विशिष्ट कामासाठीं जास्त माणसें लावणें मोठ्या छापखान्यास शक्य नसतें. कारण कांहीं काम करण्यासाठीं जास्त पैसे देऊन माणसें लावलीं, तर सर्वच माणसें अधिक पगार मागूं लागतात. तो छापखान्यास देणें शक्य नसतें. या कारणामुळें आम्हांस स्वतःचा छापखाना काढणें भाग झालें. आतां आम्हांस असें दिसते कीं, सर्व ग्रंथ छापून घेण्याची जबाबदारी आम्हांसच घेतली पाहिजे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश-मुद्रणाचें वेळापत्रक

" ज्या वेळेस वरील वाक्यें लिहिलीं, तेव्हां असें वाटलें कीं, स्पर्धाक्षेत्रांत विशिष्ट छापखाना आहे, म्हणूनच तो छपाई वेळेवर करण्यास असमर्थ होत असेल. आतां मात्र माझें असें मत होऊं लागलें आहे कीं, जेव्हां दोन यंत्रें असलेले छापखाने दररोज दोन फरमे देण्यास असमर्थ होतात, तेव्हां त्या असमर्थतेचें व्यवस्थापकाच्या नालायकीशिवाय दुसरें कारण नाहीं. *गचाळ छापखानदार आपल्या कामाची दिरंगाई करून प्रकाशकास कसे भिकेस लावतात, याचें उदाहरण ज्ञानकोश हें होय.* ज्ञानकोश हें काम जर मध्येंच बंद पडलें असतें, तर तें संपादकाच्या नालायकीमुळें किंवा पैशाचा पुरवठा कमी पडल्यामुळें पडलें असतें असें नाहीं, तर मुद्रकांच्या नालायकीमुळें अपुरें राहिलें असतें. प्रत्येक भाग छापून पुरा केव्हां झाला, याचें कोष्टक येणेंप्रमाणें आहे —

भाग	पहिली प्रत दिल्याची तारीख	भाग	पहिली प्रत दिल्याची तारीख
१	२–२–२१	११	१०–१२–२४
२	६–३–२२	१२	१४–२–२५
३	२२–१–२४	१३	१–४–२५
४	१९–३–२३	१४	२३–६–२५
५	१४–५–२३	१५	७–८–२५
६	९–४–२४	१६	३०–१०–२५
७	११–६–२४	१७	२३–१२–२५
८	२९–७–२४	१८	३०–३–२६
९	२८–८–२४	१९	३–७–२६
१०	१०–११–२४	२०	१७–११–२६
		२१	११–४–२७

१९२२ जानेवारीपासून ज्ञानकोश-इतिहास एकसारखा प्रगतीचा आहे. या काळांत प्रथमतः ज्ञानकोशाच्या २ ऱ्या भागाच्या ज्या प्रती निर्णयसागराकडे अडकल्या होत्या, त्या सोडवून आणण्यास सुरुवात झाली. त्यांचें १० हजारांचें बिल होतें. तें दिलें नाहीं, म्हणून त्यांनीं नमुन्याच्या १–२ प्रतीदेखील देण्याचें नाकारलें होतें. व पुढें ५ हजार रु. घेऊन काही प्रती

n.) उष्ट्र or उष्ट्रिका–*in jocose speech* आकाशमुनि *m.* BRIDLE OR NOSESTRING OF A C. नुकता *m*, नथणी *f.* PIN OF IT FIXED IN THE NOSE नकील *n.* BUNCH OR HUMP OF A C. सदार *f*, कुदर *n.* C.-GROUND, C.-YARD पीलखाना, शुतरखाना *m.* GUN CARRIED UPON A C. शुतरनाल, शुतरनाळ *f.* LINE OR STRING OF CAMELS कतार *f*, कतारा *m.* RIDER UPON A C. शुतरस्वार. RIDER UPON A FEMALE C. सांडणीस्वार. RUBBING C. *camel that rubs* बगली उंट. SORENESS ARISING FROM RUBBING बगली *f.* SACKING FOR THE BURDEN OF A C. शलिता OR सलिता *m.* SADDLE FOR A C. पलाण *n. f.* YOUNG C. करभ *m.* BELONGING OR RELATING TO A C. उंटाचा, औष्ट्र.] २ उंट, उंटासारखें यंत्र, समुद्रांतील रेतीमध्यें सांपडलेलें जहाज वर उचलण्याचें यंत्र *n.* Camel-backed *n.* *hump-backed* कुबडा, कुब्ज. Camel-bird *n.* *the ostrich* शहामृग. Cam'eleer, Cam'el-driver *n.* सारवान. Cam'elish *a.* उंटासारखा. Camelry *n.* सांडणीस्वार, उंटाचें सैन्य *n*, उष्ट्रसेना *f.* Camel's thorn *n.* उंटांना आवडणारें एक प्रकारचें कांटेरी क्षुद्रुप *n.*

Cameleon, See Chameleon.

Camelopard (kam'el-ō-pärd or kam-el'ō-pärd) [L. *camelus.*—Gr. *kamelos*, the camel & *pardalis*, the female panther.] *n.* *the giraffe* जिराफ *n*, उंटासारख्या उंच मानेचें पण हरिणाच्या कोटींतलें एक आफ्रिकेंतील जनावर.

Camelopardalis (ka-mel'ō-pard-a-lis) *n.* *astron.* उंटाची मान *f*, करभ *m.* Also Camalus.

Cameo (kam'ē-ō) *n.* ज्यावर नकशीचें उठाव काम आहे असें रत्न किंवा शिंप *f.*

Camera (kam'ėr-a) [L. *camera*, a vault.] *n.* *photo.* प्रकाशलेखनाची पेटी *f.* Camera obscura काळोखपेटी, खरें प्रतिबिंब पाडण्याची पेटी *f*, अंधाराची पेटी-खोली, ह्या खोलीला एक छिद्र ठेविलेलें असतें. त्या छिद्रांतून बाहेरील पदार्थांपासून परावृतन पावलेले किरण आंत येतात व ते छिद्रासमोरच्या पड्यावर त्या पदार्थांची प्रतिमा उठवितात. Camera lucida (भ्रामक प्रतिबिंब पाडण्याची) सप्रकाश पेटी *f.*

Camera (kam'ėr-a) *n.* न्यायाधिशाची खाजगी बसण्याची खोली *f.* २ घुमटाकार-घुमट असलेली खोली *f.* Cam'erated *a.* A case heard in camera रीतीप्रमाणें उघड रीतीनें चौकशी न झालेला मुकदमा. Cam'erate *v. t.* घुमटाकार बांधणें. २ खोल्या पाडणें, घुमटासारखे खण-भाग पाडणें.

Camlet (kam'let) [L. *camelus.*] *n.* बकऱ्याच्या किंवा उंटाच्या केसांचें केलेलें कापड *n*, बुरणूस, वयास्लेट, कांबळें. Sometimes written as Camelot or Camblet.

Camp (kamp) [L. *campus*, a field.] *n.* *ground* तळ *m*, छावणी *f*, गोट *m*, सेनानिवेश *m*, निवेश *m.* [APPOINTED SPOT FOR A TENT IN A C. मिसल. FOLLOWING A C. (FOR SUBSISTENCE &c.) लष्करगिरी *f.* QUARTER OR DIVISION OF A C. गोट *m*, शिबिर *n.*] २ लष्कर *n*, क्यांप *m*, काप *m*, लष्करी शिपायांचें कायमचें ठाणें *n.* ३ मोहिमेवर गुंतलेलें सैन्य *n.* ४ उतरण्याची जागा *f*, प्रवाशाची थोडासा वेळ राहण्याची जागा *f.* ५ तटबंदीची छावणी *f*; as, British or Roman camp. ६ एक प्रकारचें वलननृत्य *n.* ७ बटाटे आणि इतर पदार्थ नासूं नयेत म्हणून ज्यांत पुरून ठेवितात तो मातीचा ढीग *m.* Health camp (रोगाच्या सांथीपासून आपलें निवारण करण्याकरितां बांधलेल्या) झोंपड्यांची छावणी *f*- गोट *m.* C. *v. i.* तळ देऊन राहणें, डेरा-तळ देणें, ठाणें करणें, तंबू ठोकणें. २ (R) नाचणें. C. *v. t.* राहूं देणें, विश्रांतीस जागा देणें, मुक्काम करवणें Camp-follower *n.* लष्करी मनुष्य *m*, लष्कराबरोबरचा मनुष्य *m* (हा लष्कराबरोबर असतो परंतु लढाईंत लढत नाहीं). २ बाजारबुणगा *m.* Camp-meeting *n.* उघड जागेंतील उपदेशसभा *f.* Camp-shedding-sheeting-shot *n.* नदीच्या कांठीं मजबुतीकरितां उभारलेला तट *m.* Camp-stool or bedstead *n.* मोडून इकडे तिकडे नेतां येण्याजोगा पलंग किंवा चवरंग-घडवंची *f*, मोडपलंग *m*, प्रवाशी पलंग *m.* To pitch a camp तंबू मारणें-ठोकणें. To strike a camp तंबू उतरणें, तंबू काढून टाकणें, तंबू मोडणें.

Campaign (kam-pān') [L. *campus*, a field.] *n.* *a level tract* मैदान *n*, पटांगण *n*, सपाटी *f*, समस्थळ *n*, समथळ *n.* २ *mil.* स्वारी *f*, मुलखगिरी *f.* ३ समरांगणामध्यें लढाईंत गेलेला काळ *m*, मोहिमेचा काळ *m.* ४ (एखाद्या सामाजिक किंवा धार्मिक विषयासंबंधानें) तरफदारीची कार्यसरणि *f*, मोहीम *f*, सारखी खटपट *f.* ५ वाऱ्याची भट्टी एकसारखी चालण्याची वेळ *f.* C. *v. i.* मोहिमेंत जाणें किंवा लढणें. Campagna *n.* नेपल्स शहरालगतचें क्याम्पेनाचें मैदान-प्रदेश Campaign'er *n.* पुष्कळ मोहिमींतून जाऊन आलेला शिपाई *m*, फार दिवसांचा-जुना-कसलेला शिपाई *m.* To enter upon the campaign, To open the campaign मोहिम सुरू करणें.

Campanile (kam-pan-ē'lā) [It. *campanile*, a bell-tower, a steeple, from It. & L.L. *campana*, a bell.] *n.* (देवळालगतचा) घांटेकरितां बांधलेला घुमट *m*, देवळालगतचा घांट-घुमट *m.* Campan'ili *pl.*

Campanology (kam-pan-ol'o-ji) [L. L. *campana*, a bell & Gr. *logos*, discourse.] *n.* घंटाशास्त्र *n.* [घंटाशास्त्रांत घंटा कशा करतात व वाजवितात ह्यासंबंधीं माहिती असते.] २ घंटाशास्त्रावरील पुस्तक *n.* Camp'anist, Campanologist *n.* घंटावादनपटु, घंटाशास्त्रवेत्ता. Campanolog'ical *a.*

Campanula (kam-pan'-ū-la) [L. L. *campana*, a bell.] *n.* पांढरें किंवा निळें घंटाकृति सुंदर पुष्प *n*, घंटापुष्प *n.* Also called Bell-flower. Campan'iform, Campan'ulate, Campa'nular *a.* घांटेच्या आकाराचा, घंटाकार, घांटेसारखा.

Campestral, Campestrian (kam-pes'tral,-trian) [L. *campester*, from *campus*, a field.] *a.* *relating to, or*

सोडविण्याचें नाकारलें. शेवटी त्यांना आम्हीं असें कळविलें कीं, प्रती आम्हांस दिल्याशिवाय तुमचें बिल लागूच होत नाहीं. गिऱ्हाइकाचें नुकसान केल्यानें छापखानदाराची भरभराट होत नाहीं. उलट, त्यास मदत केल्यानेंच होतें, इत्यादि गोष्टी आम्हीं सांगून पाहिल्या. तरी त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं.

"हें पत्र गेल्यानंतर निर्णयसागरानें थोडीशी हुशारी आरंभिली, आणि आमच्याकडून गेलेले सर्व पैसे नुसते हिशोबी जमा केले, व पहिल्या व्हॉल्युमचें नवीन बिल करून पाठविले व सॉलिसिटरमार्फत नोटीस पाठविली. ही सर्व लटपट अर्थात् कज्जा दाखल झाला असता, तर बाहेर पडलीच असती. यासंबंधानें जेव्हां ज्ञानकोशाच्या प्रतिनिधींशीं व त्यांच्या सॉलिसिटर्सशीं आमचें बोलणें झालें, तेव्हां सॉलिसिटरनीं त्यांना १५०० प्रती सोडावयास सल्ला दिला व त्यांनीं केलेल्या हिशोबाच्या फिरवाफिरवींत आमची संमती घेतली. त्यामुळें १५०० प्रती लोकांच्यापुढे पाठवून आम्हांस कांहीं पैसे वसूल करता आले.

"दुसरा भाग लवकर तयार झाला, तरी गिऱ्हाइकांच्या हातीं तो उशिरा पडला, याचें कारण हेंच होतें. निर्णयसागर छापखान्याची अनुदार वृत्ति अत्यंत अविचाराची होती, हें सांगावयास नकोच!

"हे कारभार छापणें व विकणें जेव्हां परक्या छापखानदारावर अवलंबून असत, तेव्हां दुसरे छापखानदार आमचें काम बाजूला टाकून दुसरें काम घेण्याचा मोह त्यांना पडे, त्यामुळें ते कामास दिरंगाई लावीत. *केवळ शंभर पुस्तकें बांधून यावयाचीं तींदेखील पुस्तक छापून झाल्यानंतर महिन्या-दीड-महिन्यानें हातीं यावयाचीं, असा प्रकार होई.* बांधणीसुद्धां वेळेवर होईना. तेव्हां आम्हांला खातें काढावें लागलें. जसजसा बांधणीवाले एकेक दिवस जास्त लावीत, तसतसें आमचें नुकसान दररोज दीडशें रुपयांच्यावर होई. ही गोष्ट आम्ही बांधणीवाल्याला, तशीच छापखानदाराला कितीदां जरी सांगितली, तरी त्याला त्याची फिकीर काय? पुष्कळदां असें व्हावयाचें की, आम्हीं पुस्तक छापून काढलें, म्हणजे छापखानावाल्यानें लाविलेल्या दिरंगाईमुळें आमचे पैसे संपून जावयाचे आणि त्यामुळें त्यांना पुन्हां आमचे पैसे कोठे आहेत ते आणा, म्हणजे पुस्तकें सोडतों, एरव्ही सोडीत नाहीं, असें छापखानदारास म्हणावयास सांपडे. आमचा मासिक खर्च २५०० रु. आणि छापखानदारानें दीड महिन्याच्याऐवजीं भाग छापावयास सहा महिने लावले, म्हणजे दहा हजार रुपये गेलेच! आणि आपल्या नालायकीमुळें जरी प्रकाशक बुडाला, तरी त्यांना काय?"

ग्रंथमुद्रणालयांची सांस्कृतिक कामाबाबतची अनास्था

७८. ज्ञानकोशासारख्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक महत्त्वाच्या कामास महाराष्ट्रातील मुद्रणालयांची कोणतीच मदत झाली नाही, असे मत डॉ. केतकर यांनी व्यक्त केले आहे. त्याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे, म्हणून त्यांचा अभिप्राय मुळातून खाली देतो :

"निर्णयसागर छापखान्यानें जी बेपरवाईची वृत्ति दाखविली, तिची हकीकत मागें दिलीच आहे. आर्यभूषणची कथा तशीच. *त्यांना २५० पानें छापावयास सुमारें दीड वर्ष लागलें.* तिसरा भाग छापत असतां आम्हीं कंटाळून स्वतःच खिळेजुळवीपुरता छापखाना काढला आणि त्यांत पांचवा भाग (पृ. ७००), चौथा भाग (पृ. ५७५) आणि तिसरा भाग उत्तरार्ध (पृ. १४०) इतका छापून घेतला. तेव्हां त्यांचें काम फक्त पृ. २४८ इतकें झालें होतें. म्हणजे आमचे काम सर्व

अनुक्रमणिका

× ४·२ [Thomas A. Kempis कृत ग्रंथाच्या कांहीं भागाचें भाषांतर]

---

२४३ धर्मप्रचार

आत्मे जिंकणें. केडगांव; पं. रमाबाई; मुक्तिमिशन; केडगांव; १९०८; २ + १२२; ८·४ × ५·४ [टॉमस हॉगवेन साहेबांनीं रचलेल्या पुस्तकाचें भाषांतर]

एक नास्तिक मनुष्य ख्रिस्ती झाला याविषयीं हकिकत. मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी; अमेरिकन मिशन छा.; मुंबई; १८५८; ५६; ५·१ × ३·५

एका सत्यशोधकाचें आपल्या देशबांधवांशीं संभाषण. मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी; अँग्लो-व्हर्नाक्युलर; मुंबई; १८८३; ४ + ५ ते २७; ५·५ × ३·५; ८८।·

कोंकरांचा चारा. आ. ३ री; मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी; ऑर्फनेज; पुणें; १८८२; २ + ३ ते ६६; ५·५ × ३·५; ८८॥·

खरा मार्ग. मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी; एज्युकेशन सोसैटीचा छा.; मुंबई; १८७४; २१; ५·५ × ३·७; सचित्र; ८८।·

खरा मार्ग कोणता याचा विचार. (शिळाछाप); हर्णई; १८३२; २४; ७·४ × ६ [ख्रिस्ती. हिंदू चालीरीतींवर हल्ला]

खरेपणा काय आहे ? मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी; अमेरिकन मिशन; मुंबई; १८५६; २८; ५·५ × ३·५; ८८।·

ख्रिस्त हाच मार्ग. बुलढाणा; रे. पी. आर. बील्स; आर्यभूषण; पुणें; १९३४; ४८; रॉयल ३२; ८॥·

देवाचें बोलावणें. पुणें; पंचहौद मिशन; श्रीशेतकरी; पुणें; १९१७; २६; ६·३ × ४·१

धर्मशील अथवा एका हिंदु स्वामीच्या धर्मांतराची हकीकत. मिशन; कोल्हापूर; १९०८; २ + १३; ७·२ × ४·२ [रे. फादर निकलसनकृत मूळाचें भाषांतर]

पुणें जिल्ह्यांतील पुरंधर तालुका एथील समस्त लोकांस. मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी; एक्सचेंज; मुंबई; १८६४; १४; ५·५ × ३·५

येशूकडे ये. मुंबई; अमेरिकन मिशन; ओरिएण्टल; मुंबई; १८६८; २ + ३ ते ७५; ७·१ × ४·१; ८।।·

सधन होण्याचा एकच मार्ग–एक सुवार्तासंदेश अर्थात् त्याचें धन तें आमचें धन. वाडा (ठाणें); रे. जे. आय्. केलॊर; श्रीरामदास; मुंबई; ५१; ६·३ × ४·६; ८=

[ए. सी. गिवलैनकृत His Riches वरून]

ज्ञानमार्गाची सूचना. आ. २ री; मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी; अमेरिकन मिशन छा.; मुंबई; १८४९; ३१; ५·१ × ३·५; ८।·

ज्ञानाचा शोध. (शिळाछाप); बाणकोट; १८२९; ४७; ८·४ × ५·४

उजगरे, मनोहर कृष्ण

लोकधीवर म्हणजे धीरानें व चातुर्यानें लोकांना ख्रिस्ताकडे नेणारे. मुंबई; बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी; १९१९; १० + ८१; ६·३ × ४·८; ·।· [B. C. Sircar कृत मूळावरून]

एडी, शरवुड

जगांतलें सर्वश्रेष्ठ कार्य म्हणजे मनुष्यास ख्रिस्ताकडे आणणें. पुणें; स्कॉटिश मिशन इन्डस्ट्रिज कं.; ऑर्फनेज; पुणें; २७; ६·५ × ४

कँडी, टी. (मेजर)

भाव कोणावर ठेवावा याचा विचार. मुंबई; बॉंबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी; १८७५; २८; ४·६ × ३·६

जोशी, विनायक विष्णु

ख्रिस्तानुगम. इन्टरनॅशनल बुक सोसायटी; लखनौ; २ + १५७; ७·२ × ४·८; ·।· [व्हाइटकृत मूळ ग्रंथावरून]

ट्रूसी, एल्. एस्.

ख्रिस्ती होणें म्हणजे काय ? बुलढाणा; एल्. एस्. ट्रूसी; आर्यभूषण; पुणें; १९३२; १६; ७·२ × ४·८

ताईसाहेब

ये, बाळ. कूर्ग; मिसेस ई. मलिन्स; चित्रशाळा; पुणें; १९३०; १८; ६·४ × ४·८; ८✓

फ्रँकलिन, विलियम (मिसेस)

होय ये. (साहा. सी. एच्. लेले) मेथॉडिस्ट; मुंबई; १८९८; ६ + ७२ + १; ७·२ × ४·८; ८=

जनतेच्या सहानुभूतीनें झालें, पण मुद्रकवर्गाच्या सहानुभूतीचा अभाव असतां – किंबहुना, त्याचें अविश्वसनीय वर्तन असतां – झालें. *आमचें काम पार पाडण्यास महाराष्ट्राच्या मुद्रकवर्गास कोणतेंच श्रेय देतां येत नाहीं.* कर्नाटक छापखान्यानें सहाव्या विभागाचीं पृष्ठें २३२ छापलीं, पण तीं छापण्यास सुमारें चार महिने लागले. त्या वेळेसदेखील मुद्रणाचा हुकूम द्यावयास कांहीं दिवस मी किंवा रा. दाते हे मुंबईंत मुद्दाम हजर होतो.

" येथें प्रश्न असा येईल कीं, निर्णयसागर, आर्यभूषण, कर्नाटक हे महाराष्ट्रांतले सर्वांत मोठाले छापखाने आहेत, आणि हे सर्वच वाईट कसे ? हाच प्रश्न माझ्याहि मनात येतो. आणि त्याचें उत्तर मी आज असें देतों कीं, या सर्व मंडळींमध्यें काम करण्यास प्रत्यक्ष वेळ किती लागतो, याचा मुळींच अजमास नाहीं. *ज्याला प्रकाशकाचा धंदा करावयाचा आहे, त्याला छापण्याचें काम दुसऱ्यावर टाकतां येणार नाहीं.* "

ग्रंथमुद्रण करून घेणाऱ्या प्रकाशकाना गुरुमंत्र

७९. डॉ. केतकर यांचे मत त्यांच्याशी संबंध आलेल्या मुद्रणालयांच्या चालकांस "आपण स्वीकारलेल्या कामास किती वेळ लागेल त्याचा अंदाज नाही, " हे मला पूर्णतया मान्य आहे. परंतु त्यावरून त्यांनी काढलेला सिद्धांत "प्रकाशकाचा धंदा करणारांस छापण्याचे काम दुसऱ्यावर टाकता येणार नाही, हे मला पटत नाही. प्रकाशकाने छापखाना काढल्याशिवाय तरणोपाय नाही, हा त्यांचा निष्कर्ष धोक्याचा आहे. तरीही पुढील मजकूर वाचल्यावर डॉ. केतकर एका विशिष्ट परिस्थितीत त्याना आलेल्या अनुभवांच्या आधारे त्यांच्या दृष्टीने निर्विवाद सत्य सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे स्पष्ट दिसते.

" प्रकाशकानें ज्या कांहीं गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत, त्या येथें देतों —

(१) साधारणपणें कोणताहि कागदाचा व्यापारी साठ दिवसांपेक्षां जास्त दिवस रक्कम उधार ठेवूं शकत नाहीं. यासाठीं जें पुस्तक छापावयाचें, त्याचें ४५-पासून ६० दिवसांच्या आंतच मुद्रण होऊन व बांधणी होऊन त्याच्या व्ही. पी. गिऱ्हाइकांकडे जाण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

(२) *बहुतेक छापखानदारांस आपलें काम किती दिवसांत होईल, याचा मुळींच अंदाज नसतो व दररोजचे दोन फरमे नियमानें जावयास तयारी किती पाहिजे, याचाहि अंदाज नसतो.* व यामुळें बरेच छापखानदार 'तुम्ही कॉपी मात्र वेळेवर पुरविली पाहिजे, म्हणजे दिवसांतून दोन फरमे छापूं,' असें अभिवचन देतात, पण तें त्यांस खरोखर शक्यच नसतें.

(३) रोज दीड फरमा नियमानें जाण्यास कमींत कमी तयारी पुढीलप्रमाणें पाहिजे—

टाइप दहा फरम्यांचा पाहिजे. म्हणजे जर एका फरम्यास शंभर पौंड टाइप लागत असेल, तर एक हजार पौंड तरी टाइप पाहिजे. कारण टाइपाचा फौंट येतो, तो लोकांच्या गरजांप्रमाणें नसतो. *उदाहरणार्थ फ, फ़ हे टाइप फारच क्वचित लागतात व अशा अनेक जोडाक्षरांच्या टाइपांनी केस भरलेली असते. आणि ५० पौंडांच्या केसींतील उपयोगास येणारा टाइप २५ पौंडांपलीकडे येत नाहीं.*

षष्ठी-उपपदार्थ

अ] **प्रयोजन** किंवा **हेतु**–'स्नानाची' केळा, 'निजावयाची' खोली, 'उपाध्यायाचें' पागोटे, 'मोटेचा' बैल, 'संध्येची' पळी, इ०

[आ] **स्थित्यन्तर**–'गरिबाचा' श्रीमंत झाला; 'श्रीमंताचा' गरीब; 'मूर्खाचा' शहाणा; परिसानें 'लोखंडाचें' सोनें होतें; 'पांढऱ्याचें' पिवळें; 'रंकाचा' राव, 'रावाचा' रंक; 'मराठीचें' इंग्रजी; 'इंग्रजीचें' मराठी; इ०.

[इ] **मूल्य** किंवा **माल**–'रुपयाचें' तूप, 'तुपाचा' रुपया; 'पैशाचा' तंबाखू, 'तंबाखूचा' पैसा; इ०.

[ई] **कार्य** किंवा **कारण** (कार्यकारणभावसंबंध)–'दागिन्याचें' सोनें, 'मूर्तीचा' दगड; 'सोन्याचा' दागिना, 'दगडाची' मूर्ति; 'खुर्चीचें' लांकूड, 'लांकडाची' खुर्ची; इ०.

टीप–लोखंडाची कांब, सोन्याची चीप, इ० हीं प्रकृतिविकृतींचीं उदाहरणें कार्यकारणभावांतच येतात.

[उ] **जन्य** किंवा **जनक** (जन्यजनकभावसंबंध)–या 'मुलाचा' बाप, 'त्याचा' मुलगा, 'मुलाची' आई, 'तिचा' मुलगा, 'जगाचा' कर्ता, 'काव्याचा' कर्ता, 'मोरोपंतांचें' काव्य, 'त्याचा' अपराध, 'रामाचा' जय, 'रावणाचा' वध, इ०. [६७६]

टीप–'*कर्तृवाचक, कर्मवाचक षष्ठी.*' 'रामाचा जय' आणि 'मोरोपंतांचें काव्य' इ० ठिकाणीं षष्ठीचा जनक हा अर्थ आहे; हीसच इंग्रजींत कर्तृवाचक षष्ठी असें म्हणतात. 'रावणाचा वध, काव्याचा कर्ता' इ०. ठिकाणीं षष्ठीचा जन्यार्थ आहे; हीसच इंग्रजींत कर्मवाचक षष्ठी असें म्हणतात. इंग्रजी नांवांपेक्षां आपली जन्यजनकभावसंबंध ही भाषा सरस आहे. कर्ता, कर्म या इतर ठिकाणच्या शब्दांचा येथें उपयोग करून घोंटाळा उत्पन्न होण्याचा संभव तरी कशास पाहिजे ?

[ऊ] **अन्य शरीरसबंध** म्हणजे **नातें**–'त्याचा' भाऊ, 'माझा' चुलता, इ०.

[ऋ] **स्व** किंवा **स्वामी** (स्व-स्वामिभावसंबंध)–'वाड्याचा' मालक, 'नानाचा' वाडा, 'घराचा' धनी, 'माझें' घर, ह्या 'पुस्तकाचा' मालक; हें पुस्तक 'कोणाचें'? इ०.

[ऌ] **अंग** किंवा **अंगी** (अंगांगिभावसंबंध)–'खुर्चीचा' पाय, चार 'पायांची' खुर्ची, 'मेजाचा' खण, दोन 'खणांचें' मेज, दोन 'हातांचा' मनुष्य, 'मनुष्याचा' हात, 'हाताचीं' बोटें, सहा 'बोटांचा' हात, इ०.

[ए] **वाह्य** किंवा **वाहक** (वाह्यवाहकभावसंबंध)–'गाडीचा' घोडा, 'घोड्याची' गाडी, 'डोलीचे' गडी, चार 'गड्यांची' डोली, इ०.

[ऐ] **आधार** किंवा **आधेय** (आधाराधेयभावसंबंध)–'विहिरीचें' पाणी, 'पाण्याची' विहीर; 'आगबोटीचे' उतारू, 'उतारूंची' आगबोट; 'पेंवाचे' गहूं, 'गव्हांचें' पेंव; इ०.

आकृती ४२ : शास्त्रीय मराठी व्याकरण, मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई

प्रत्येक अक्षराच्या टाइपाची शास्त्रीय मोजदाद

८०. वरील अभिप्राय म्हणजे आपल्या टाइप फाउंड्र्यांवरील टीका आहे. मराठीमध्ये प्रत्येक टाइप किती लागतो, याचा पद्धतशीर अभ्यास आजवर का झाला नाही, याचे मलाही कोडे आहे. मुख्यत: ही जबाबदारी टाइप फाउंड्र्यांची आहे. छापखान्यांनीही या गोष्टीचा फारसा विचार केलेला नाही. आजही तसा विचार करण्याची त्यांना आस्था आहे, असे दिसत नाही. डॉ. केतकर या बाबतीत म्हणतात —

"*प्रत्येक अक्षराचा टाइप किती असावा, याची शास्त्रीय मोजदाद कोणीं अजून करून त्याचें कोष्टक मांडलेलें प्रसिद्ध नाहीं. बहुतेक फाउंडऱ्यांचे अजमास चुकलेले आहेत. पुष्कळशा फाउंडऱ्या आपली ऑर्डर मोठी करण्यासाठीं कमी उपयोगाचा टाइप प्रमाणाबाहेर फॉंटमध्यें घालतात. त्यामुळें पुष्कळ टाइप निरुपयोगीच राहतो.* यामुळें जरी एका फरम्यातील टाइपांचे वजन शंभर पौंड असलें, तरी तो टाइप उपयोगात येण्यास २०० पौंडांच्या केसेस खरडून काढाव्या लागतात. २०० पौंड म्हणजे सुमारें ४ केसेस होतात. केसींमध्ये असलेल्या एकंदर टाइपापैकी जो प्रत्यक्ष उपयोगांत येणारा टाइप असतो, त्याचें प्रमाण वाढवीत नेणें ही गोष्ट परिश्रमानें साध्य होण्यासारखी आहे. पण त्या तऱ्हेचा संशोधक परिश्रम कोणीं केला असेल, असें वाटत नाहीं. शिवाय, हें प्रमाण पुस्तकपरत्वें बदलतें. एखाद्या वेळेस मनुष्य एखादा कोश छापूं लागला, म्हणजे पहिल्या फरम्यात "अ"चा तुटवडा पडेल, 'ऋषि' हा शब्द अनेक वेळ एकाच फरम्यात आला, म्हणजे "ऋ" हें अक्षर कमी पडेल. *यासाठीं मोठें पुस्तक छापणारानें आपल्यापाशीं मुद्रांचें ओतकाम करणारी फाउंडरी बाळगली पाहिजे किंवा जास्त टाइप ठेवला पाहिजे.* माझा अनुभव असा आहे कीं, दीड फरमा रोज छापून निघावा, अशी अपेक्षा असल्यास सुमारें १५०० पौंड टाइप जय्यत ठेवावा लागतो, एरव्हीं तें कार्य होत नाहीं. तो तसा ठेवावा लागतो, याचीं कारणें म्हणजे त्याचा हिशोब येणेंप्रमाणें :– दीड फरमा रोज, म्हणजे दोन दिवसांनी तीन फरमे छापणें. ज्या दिवशीं जो फरमा छापावयाचा असेल, त्याच्या आधल्या दिवशीं तो शेवटची तपासणी व शुद्धीकरण होऊन तयार रहावा लागतो. त्याच्या अगोदर ज्ञानकोश छापखान्यांत खालील तपासण्या होत असत :– (१) पहिलें कच्चें प्रुफ, (२) दुसरें प्रुफ. (३) यानंतर संपादकास कांहीं मजकूर घालावयास तें देण्यांत येत असे, व संपादकीय दुरुस्त्या होत. त्यामुळें तिसरें प्रुफ काढावें लागे व त्यांत संपादकीय सर्व फेरफार आले आहेत कीं नाहीं, हें पाहिलें जाई. (४) पेजप्रुफ, (५) दुसरें पेज प्रुफ, (६) मशीन प्रुफ. कधींकधीं यातील एकदोन प्रुफें गाळलीं जात असत. तथापि जो फरमा आज कंपोज होतो, त्याच्या पुढले तीन फरमे छापखान्यांतच राहून पांचवा फरमा छापावयास जाई; हा धोपट नियम सांगता येईल. *नियमानें दीड फरमा छापला जावयास पाच फरमे टाइप गुंतवावा लागतो आणि त्याच्या निदान दुप्पट तसा टाइप केसींत राहतो.* तथापि एवढ्यानेंच भागत नाहीं. कांहीं फरम्यांत खुणा किंवा विशिष्ट टाइप आणावयाचा झाला, किंवा कोठें पुस्तक छापतांना संपादनखात्यास विधानाची चूक आढळून आली, म्हणजे तो फरमा बाजूलाच पडतो. *म्हणजे रोजचा दीड फरमा छापवयास सहा फरमे टाइप लागतो. याशिवाय केसींतला टाइप आणि प्रत्यक्ष उपयोगास येणारा टाइप, यांचें प्रमाण १००शीं ५० असल्यास बारा फरम्यांचा म्हणजे १२०० पौंड टाइप लागतो.* आर्यभूषण छापखान्यानें आमचें काम इतकें दिरंगाईनें केलें, याचें कारण त्यांनीं ५०० पौंड टाइपांतच सर्व काम उरकण्याचा

विचार केला आणि त्यासाठीं लागणारे ५०० रुपये तयारीसाठीं आमच्यापासूनच मागून घेतले होते. *छापखानदार वचनभंग करतात याचें कारण केवळ त्यांची लबाडी असते, असें नाहीं; तर त्यांच्यामध्यें फाजील आशावादीपणा असतो, हें होय.*

आमचा प्रकाशकांस असा सल्ला आहे कीं, मुद्रकाच्या आशावादीपणाविषयीं फार सावध रहावें.''

ग्रंथमुद्रकांना टाइप फाऊंड्री आवश्यक

८१. ग्रंथमुद्रकांनी टाइप फाउंड्री जवळ बाळगली पाहिजे, हे डॉ. केतकरांचे सांगणे त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देते. महाराष्ट्रातील अनेक ग्रंथमुद्रणालयांची वाढ त्यांच्या जुळणी-व्यवस्थेवरच झाली. परंतु आपल्या व्यवसायातील यशस्वितेची मक्खी त्यांनी न ओळखल्या-मुळे आपापल्या टाइप फाउंड्या त्यांनी काढून टाकिल्या आणि 'मोनो'टाइपाची आराधना केली. तसे करिताना आपल्या धंद्याच्या नाशाची बीजे पेरली, हे आजच्या मराठी ग्रंथ-मुद्रणाच्या व्यवसायाचे दुर्दैव होय.

व्याख्यान दुसरे

ग्रंथमुद्रण तंत्र आणि
भारतीय भाषातील मुद्रण

अनुक्रमणिका

प्रास्ताविक

माझ्या आज सकाळच्या व्याख्यानामध्ये मी युरोपातील आणि भारतातील ग्रंथमुद्रणाचा इतिहास या विषयावर बोललो. मराठीमध्ये ग्रंथमुद्रण करणाऱ्या मुद्रणालयांमध्ये 'गणपत कृष्णाजी' यांच्या छापखान्याचे स्थान फार मोठे आहे आणि त्यांच्या काळात छापलेल्या एकंदर ९०० उपलब्ध पुस्तकांपैकी १७४ पुस्तके त्यांनी आपल्या छापखान्यात छापली असे मी आपल्याला सांगितले. 'गणपत कृष्णाजीं'नी आपला छापखाना १८३१ मध्ये सुरू केला. 'जावजी दादाजीं'नी 'निर्णयसागर' छापखान्याची १८६९ मध्ये सुरुवात केली. जावजी १८९२ मध्ये कैलासवासी झाले. तिथपर्यन्त मराठीतील ग्रंथमुद्रण हे युरोपीय ग्रंथमुद्रणाहून फारसे मागे नव्हते. युरोपमध्ये १४५६ साली पहिले अक्षरमुद्रित पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यानंतर बरोबर शंभर वर्षांनी महाराष्ट्र देशात (गोव्यात) ग्रंथमुद्रणास सुरुवात झाली.

भारतात १५५६ मध्ये ग्रंथमुद्रणास सुरुवात झाली असली तरी सुरुवातीचे ग्रंथमुद्रण फार कमी प्रमाणावर होत असे. त्या काळी उपलब्ध असलेले मुद्रणयंत्र म्हणजे 'हातछाप यंत्र' होते. इ.स. १८१४ साली लंडन येथून प्रसिद्ध होणाऱ्या लंडन टाईम्स या वृत्तपत्राच्या प्रकाशनास वेगवान मुद्रणयंत्राची गरज भासली. आणि त्यासाठी 'कोनिंग आणि बॉवर' या दोन जर्मन यंत्रज्ञांना वेगवान मुद्रणयंत्र निर्माण करण्याची विनंती करण्यात आली. या यंत्रज्ञांनी अनेक प्रयोग करून सुलोट यंत्र (Cylinder Printing Machine) सिद्ध केले. इ. स. १८५४ च्या सुमारास 'अक्षरचक्र-मुद्रणयंत्र' (Letter Press Rotary Printing Machine) प्रचारात आले.

आपल्याकडे अशी एक समजूत आहे की, 'हातछाप मुद्रणयंत्रा'नंतर 'पायछाप मुद्रणयंत्र' म्हणजे 'ट्रेडल मशिन' उपयोगात आले. ही समजूत चुकीची आहे. 'हातछाप मुद्रणयंत्रा'नंतर 'सुलोट मुद्रणयंत्र' सिद्ध झाले आणि त्यानंतर अनेक वर्षांनी अमेरिकेमध्ये 'पायछाप यंत्रा'ची निर्मिती सुरू झाली.

अनुक्रमणिका

आज सर्वत्र प्रचलित असलेली 'शिळामुद्रण पद्धती' (Lithographic Printing) १७९७ च्या सुमारास शेनेफिल्डर या जर्मन तंत्रज्ञाने शोधून काढली. हिंदुस्थानामध्ये पहिले शिळामुद्रित पुस्तक १८२६ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याचे नांव 'गणित मार्ग'.

ग्रंथमुद्रणासाठी त्वरित सुबक जुळणीची आवश्यकता असते. त्वरित जुळणी करण्याचे प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या चतुर्थपादामध्ये चालू होते. इ. स. १८८७ च्या सुमारास मोनो आणि लायनो या यंत्राचा शोध लागल्यानंतर त्वरित जुळणी शक्य झाली.

भारतीय भाषांतील असंख्य अक्षरांमुळे, त्या भाषांतील ग्रंथमुद्रणात फारशी प्रगती झाली नव्हती. इ. स. १८०५ मध्ये श्रीरामपुरीं प्रसिद्ध झालेल्या 'मॅथ्यू' ह्या बायबलच्या एका भागाचे मराठी भाषांतर, हे मराठीतील देवनागरी लिपीतील, पहिले मुद्रित पुस्तक. तत्पूर्वी मराठीत फादर स्टिफन्सचे 'ख्रिस्त पुराण' प्रसिद्ध झाले होते. परंतु ते होते रोमन लिपीत. ते मराठीतील पहिले मुद्रित पुस्तक. तत्पूर्वी बंगालमध्ये मुद्रण चालू होते. महाराष्ट्रामध्ये प्रथम मुंबईत मुद्रण सुरू झाले ते वृत्तपत्रांसाठी. त्यानंतर अमेरिकन मिशनऱ्यांच्या प्रयत्नांनी ख्रिस्ती धार्मिक पुस्तकांचे प्रकाशन मुंबईस सुरू झाले. हिंदु धार्मिक पुस्तके मुद्रित होण्यास जेव्हा सुरुवात झाली तेव्हा मुद्रित पुस्तकांचा उपयोग करण्याबाबत वाचक साशंक असत. याबाबतचे माडगांवकर, जांभेकर, लिमये, यांचे उद्गार मी आपणास सांगितले. त्यावरून मराठी ग्रंथमुद्रणाच्या प्रारंभकाळातील प्रकाशकांच्या अडचणी आपल्या ध्यानात येतील. आणि गणपत कृष्णाजी आदिकरून मुद्रक-प्रकाशकांच्या चिकाटीची कल्पना येईल.

आतां माझ्या दुसऱ्या व्याख्यानात ग्रंथ-मुद्रणतंत्र, भारतीय भाषांत मजकूर-जुळणी करण्यातील अडचणी आणि मराठीतील शालेय प्रकाशनांचा इतिहास या विषयांवर बोलणार आहे.

९

ग्रंथमुद्रणाचा ओनामा

मुद्रणकामाचे तीन प्रकार

८२. मुद्रणकामाचे ग्रंथमुद्रण, वृत्तपत्रमुद्रण आणि इतर मुद्रण असे तीन भाग आहेत. ग्रंथमुद्रण, वृत्तपत्रमुद्रण आणि इतर मुद्रण या तिन्ही प्रकारच्या मुद्रणांमध्ये एकरंगी आणि बहुरंगी हे दोन्ही प्रकार संभवतात. तरी ग्रंथमुद्रण हे इतर मुद्रणांपासून बव्हंशी वेगळे असते; वेगळ्या पद्धतीने करावे लागते. इतर मुद्रणांमध्ये संपूर्ण मुद्रित एकाच वेळी छापले जाते, उदाहरणार्थ, वृत्तपत्र, लेटरहेड, देयक, नमुने, भित्तिपत्रक, दिनदर्शिकेवरील चित्र, लेबल. लेजरचे पान, वेष्टन इत्यादी. त्यामुळे ते समोर धरताच त्याच्याबद्दलचे सम्यक ज्ञान चटकन होऊ शकते. ग्रंथमुद्रिताचा तसा प्रकार नाही. तसे का, हे समजण्यासाठी ग्रंथमुद्रण म्हणजे काय, हे प्रथम स्पष्ट केले पाहिजे. येथे ग्रंथामध्ये मी 'सलगपणे वाचनासाठी किंवा संदर्भासाठी अनेक पाने एकत्र छापलेली सर्व प्रकारची मुद्रिते' समाविष्ट करितो. त्यांत नियतकालिके, टेलिफोन डायरेक्टरी, कॅटॅलॉग, माहितीपुस्तिका इत्यादी ग्रंथेतर मुद्रणही येते.

ग्रंथांचे बदलते स्वरूप

८३. 'ग्रंथ' या शब्दाचा मूळ अर्थ 'एक पुस्तक' असा आहे. ताडपत्राची लिहिलेली पाने एकत्र एका सूत्रामध्ये ओवली, म्हणजे तो ग्रंथ झाला. ही पाने हस्तलिखित असत, आणि ती एकटाकी लिहिलेली असत. ती एकत्र ठेवण्यासाठी सूत्राचा उपयोग करीत. आपल्याला येथे जो विचार अभिप्रेत आहे, तो मुद्रित ग्रंथाचा. मूळ ताडपत्रे अथवा भूर्जपत्रे लिहिली गेली, ती सुट्या पानांच्या स्वरूपात. वाचक जमिनीवर बसून ती वाचीत असल्यामुळे समग्र ग्रंथ एका वेळी हातात वागविणे कठीण; म्हणून सुट्या पानांचा उपयोग करावा लागला. याला 'पोथी' म्हणतात. आजही धार्मिक ग्रंथ या पद्धतीने छापले जातात. युरोपीय देशांत हस्तलिखिताच्या

अनुक्रमणिका

गुरुजींची अवस्था मोठा व्याकुळ झाली होती. मी गेल्या-गेल्या म्हणाले—कोण? अल्लाउद्दीन? ये ये. तुला खूप त्रास दिलाय मीं. त्याचं पाप लागलंय मला. थोरल्या मुलाला सगळं शिकवून तयार केलं होतं. त्यानं सगळं शिकवलं असतं. तो वारला. शिष्याचं शिक्षण, मुलाचं शिक्षण न् मुलीच्या घरचं शिक्षण. थोरल्या मुलाला शिकवलेलं सगळं तुला देतों. वीणा शीक. तीन वर्षांत सगळं शिकवतों. राह्यलों तिथंच. नेसत्या कपड्यांनिशी आलों होतों. राजाकडं तार गेली. गुरुजी म्हणाले— चाळीस दिवस झाल्यावर मग शिकवतों. मुलाच्या घरचं सगळं शिकवलं. 'हमार भगवान' हा धमार तेव्हां शिकलो. धृपद पण शिकलों त्यांच्याकडनं. वीणा शिकवायची

१४ पॉईंट फेस मोनोटाईप साधा

गोष्ट काढल्यावर मी म्हणालों—वीणा ! मी मरून जाईन गुरुजी ! मग रबाब शीक. सूरशृंगार शीक. तें शिकलों. शिकवतां—शिकवतां गुरुजी सारखंसारखं म्हणायचे—सगळं शिकून घे. नाहींतरी आणखी कुणाला द्यायचंय आतां हें? नातवंडं अजून लहान आहेत सगळीं. आतां तुझ्याचकडनं शिकतील तीं. तुला फार त्रास दिला होता मीं. आतां तुझा सगळा त्रास संपून जाईल. मला तीन मुली. एक मुलगा—अलीअकबर. मुलींचीं नांवं सरोजिनी, अन्नपूर्णा, जहानारा. जहानारा वारली. हा मुलगा मला गुरूंच्या कृपेनं मिळाला. मुलगा होत नाही असं गुरूंच्या लक्षात आल्यावर त्यांनीं एक भस्म दिलं. ते वजीरखाँ नाहीत—दुसरे एक गुरु होते. म्हणाले—बायकोला खायला दे. तें दिल्यावर अलीअकबर मिळाला. मला आणखी एक मलगा हवा होता. तो कांहीं देवान

१२ पॉईंट फेस मोनोटाईप साधा

दिला नाही. नाहीं नाहीं. तो पण दिला—रविशंकर. आमच्या अन्नपूर्णेशीं लग्न केलं त्यानं. हा माझा नातू— अलीअकबरचा मुलगा. नांव ठेवलंय महंमदआशीष. मुसलमान म्हटलं तर महंमद. हिंदू म्हटलं तर आशीष. सरोद मी डाव्या हातानं वाजवतों. रामपूरला चार वर्षं उजव्या हातानंच शिकलोंय. रामपूरच्या दरबारांत बरेचजण माझी खूप टिंगल करायचे—बंगाली धोतीबाज, मच्छीका पानी पीनेवाला ! —असं रोज चालायचं. दोनएक महिने मी मुकाट्यानं ऐकून घेतलं. मी व्हायलीन चांगलं वाजवायचों—ते जळायचे. अन् टिंगल करायचे—मच्छीका पानी पीनेवाला ! असलं खाऊन कांहीं गाणं बजावणं होत नाहीं. बँडमास्टर म्हणायचे—नाहीं नाहीं, असं म्हणूं नका तुम्ही. बंगाली माणसाच्या डोक्याला तोडच नाही. अल्लाउद्दीनला नोटेशन कसं अचूक येतं ! कुणी गाऊं दे तर, एका मिनटात ऐकवेल. ह्यावर ते म्हणायचे

१२ पॉईंट विजापुरे मोनोटाईप साधा

क्या नोटेशनमे गाना होता है ? मच्छीका पानी पिया है ? मग मला नाहीं सहन झालं. म्हणालों—आपके बापको पिया है ! तरी ते माझा पिच्छा काही सोडेनात. —मासे खातोस —मासे तर मिळतच नाहींत. मी आपला हरभरे खाऊन राहतो. पैसे कुठायत ? असंख्य गोष्टी नाना लोकांच्याबद्दल, देशांच्याबद्दल. असं काही बोलायचे—जे निव्वळ बोलायपुरतंच. शुममयनं लिहून घेताना एकपण शब्द गळूं दिला नाही. जें जें बोलले, तें तें त्यानं उतरवून घेतलं. फक्त एक—वयाचा हिशेब तेवढा वगळून टाकला. खाँसाहेब वय एकेका दिवशी एकेक सांगायचे. त्याचा काहीच मेळ बसायचा नाही. परत विचारलं तर म्हणायचे—आता वय झालं ना ! हिशेब काही लागत नाही ! उदय जाणार होता युरोपात. नाचाचं टोळकं घेऊन. मला पण घेऊन जायचं त्यांच्या मनात होतं. मी म्हणालो—बाबा तुम्ही लोक किती दिवस तिकडंच राहाल कोण जाणे. मला काही वर्षभरापेक्षां जास्ती दिवस राहणं जमायचं नाही. जानेवारी

१० पॉईंट फेस मोनोटाईप साधा

अनुक्रमणिका

स्वरूपात प्रकाशित झालेले ग्रंथ आणि त्यांच्या अनुकरणाने पंधराव्या शतकाच्या मध्यापासून मुद्रित झालेले ग्रंथ एकत्रित बांधलेल्या पुस्तकाच्या स्वरूपात होते.

ग्रंथाची व्याख्या आणि व्याप्ती

८४. हिंदुस्थानात ग्रंथमुद्रणास सोळाव्या शतकात सुरुवात झाली. परंतु देवनागरी ग्रंथमुद्रणाचा इतिहास दोनशे वर्षांच्या आतलाच आहे. ग्रंथमुद्रणातील पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे सुटी मुद्राक्षरे (movable types),– मग ती हाताने जुळवावी, किंवा यंत्राने. फोटो-कॉम्पोझिशनपद्धती आपल्याकडे अजून प्रस्थापित झालेली नाही. मुद्राक्षरे मजकुराच्या स्वरूपात जोडून पाने तयार करावयाची आणि ती पाने चार, आठ, सोळा अशा गटांमध्ये एकत्र मांडून छापावयाची. पानांची मांडणी (imposing) अशा प्रकारे करावयाची की, दोन्ही बाजूंनी छापलेला कागद घडी घालून घेतला, म्हणजे पाने सलगपणे एकापुढे एक यावी. साधारणपणे अशा स्वरूपामध्ये छापावयाचे सर्व काम ग्रंथमुद्रण या सदरात मोडू शकेल. पाने जर दोनच असतील, तर घडी घालण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कारण ती एकामागे एक छापता येतात. ती चार किंवा आठ असली, किंवा त्यांहून जास्त, म्हणजे ४८-पर्यंत असली, तर त्यांना 'पुस्तिका', 'पॅम्फ्लेट' (pamphlets) म्हणण्याचा प्रघात आहे. ४८-पेक्षा जास्त पाने असलेले पुस्तक तयार करावयाचे, तर ते बांधवून घ्यावे लागते आणि मग त्याला 'ग्रंथ' ही संज्ञा प्राप्त होते. अर्थात ४८-पेक्षा जास्त पानांची पुस्तकेसुद्धा कित्येक वेळा 'पुस्तिका' या सदरात टाकतात. 'ग्रंथ' हा शब्द येथे मी 'बुक' या अर्थी वापरीत आहे. मराठीमध्ये जाडजूड आणि महत्त्वाच्या पुस्तकासच 'ग्रंथ' म्हणतात; तो अर्थ येथे अभिप्रेत नाही. ग्रंथामध्ये चित्रे येतात, ती एकरंगी किंवा बहुरंगी असतील, ती ग्रंथात सर्वत्र विखुरलेली असतील, किंवा चित्रपत्रांच्या स्वरूपामध्ये चिकटविलेली असतील. नकाशे असले, तर ते घडी घालून चिकटविलेले असतील. सर्वच प्रकारांत पुस्तक पक्के बांधून घ्यावे लागते. पुस्तकाच्या स्वरूपावरून एक गोष्ट स्पष्ट होते; आणि ती म्हणजे कोणतेही पुस्तक एकाच वेळी एकाच यंत्रावर छापता येत नाही; तर ते अनेक यंत्रांवर एकाच वेळी किंवा एका यंत्रावर एकामागून एक गट, अशा स्वरूपात छापावे लागते. त्यामुळे मुद्रणात सर्वत्र सारखेपणा राखणे हे काम कठीण होऊन बसते. म्हणून 'ग्रंथमुद्रणकौशल्य' हे मुद्रकाचे एक महत्त्वाचे लक्षण आहे.

ग्रंथाची जुळणी आणि टाइपाचा पुरवठा

८५. पुस्तक जसे लहान असते, तसेच शेकडो पाने असलेले असे मोठेही असू शकते. पुस्तकामध्ये मागे कोणत्या पानावर कोणता मजकूर आहे, पुढे कोणत्या पानावर कोणता मजकूर यावयाचा आहे, याचा संदर्भ द्यावा लागतो. अशा पुस्तकाच्या बाबतीत सबंध पुस्तकाचा मजकूर एकाच वेळी उभा केल्यावाचून भागत नाही. सर्वच पुस्तकांच्या बाबतीत ३२ पानेतरी उभी करावी लागतात. मुद्रिते लेखकाकडे जावयाची असल्यास ४८ ते ६४ किंवा त्यांहून जास्त पाने एका वेळी उभी ठेवावी लागतात. या विशिष्ट आवश्यकतेमुळे ग्रंथमुद्रणा-

गुरुजींची अवस्था मोठी व्याकुळ झाली होती, मी गेल्या गेल्या म्हणाले–कोण? अल्लाउदीन? ये ये, तुला खूप त्रास दिलाय मीं, त्याचं पाप लागलंय मला. थोरल्या मुलाला सगळं शिकवून तयार केलं होतं. त्यानं सगळं शिकवलं असतं. तो वारला. शिष्याचं शिक्षण, मुलाचं शिक्षण न् मुलीच्या घरचं शिक्षण. थोरल्या मुलाला शिकवलेलं सगळं तुला देतों. वीणा शीक. तीन वर्षांत सगळं शिकवतों. राह्यलों तिथंच. नेसत्या कपड्यांनिशी आलों होतों. राजाकडं तार गेली. गुरुजी म्हणाले— चाळीस दिवस झाल्यावर मग शिकवतों. मुलांच्या घरचं सगळं शिकवलं, 'हमार भगवान' हा धमार तेव्हां शिकलो. धृपद पण शिकलो त्याच्याकडनं. वीणा शिकवायची

१४ पॉईंट कर्नाटक (कल्पना) अखंड साधा

गोष्ट काढल्यावर मी म्हणालों–वीणा! मी मरून जाईन गुरुजी! मग रबाब शीक. सूरशृंगार शीक. तें शिकलों. शिकवतां–शिकवतां गुरुजी सारखंसारखं म्हणायचे–सगळं शिकून घे. नाहीतरी आणखी कुणाला द्यायचंय आतां हे? नातवंडं अजून लहान आहेत सगळीं. आता तुझ्याचकडनं शिकतील तीं. तुला फार त्रास दिला होता मी. आतां तुझा सगळा त्रास संपून जाईल. मला तीन मुली. एक मुलगा–अलीअकबर. मुलींची नांवं सरोजिनी, अन्नपूर्णा, जहानारा. जहानारा वारली. हा मुलगा मला गुरूंच्या कृपेनं मिळाला मुलगा होत नाही असं गुरुंच्या लक्षांत आल्यावर त्यांनी एक भस्म दिलं. ते वजीरखां नाहीत–दुसरे एक गुरु होते. म्हणाले–बायकोला खायला दे. ते दिल्यावर अलीअकबर मिळाला. मला आणखी एक मुलगा हवा होता. तो कांही देवानं

१२ पॉईंट कर्नाटक (कल्पना) इंग्लिश फेस साधा

दिला नाही. नाहीं नाहीं. तो पण दिला–रविशंकर. आमच्या अन्नपूर्णेशी लग्न केलं त्यानं. हा माझा नातू–अलीअकबरचा मुलगा. नांव ठेवलंय महंमदआशीष. मुसलमान म्हटलं तर महंमद. हिंदू म्हटलं तर आशीष. सरोद मी डाव्या हातानं वाजवतों. रामपूरला चार वर्षं उजव्या हातानंच शिकलोंय. रामपूरच्या दरबारांत बरेचजण माझी खूप टिंगल करायचे–बंगाली धोतीबाज, मच्छीका पानी पीनेवाला!–असं रोज चालायचं. दोनएक महिने मी मुकाट्यानं ऐकून घेतलं. मी व्हायलीन चांगलं वाजवायचों–ते जळायचे. अन् टिंगल करायचे–मच्छीका पानी पीनेवाला! असलं खाऊन काही गाणं बजावणं होत नाही. बँडमास्टर म्हणायचे–नाहीं नाहीं असं म्हणूं नका तुम्ही. बंगाली

१२ पॉईंट कर्नाटक (कल्पना) अखंड पायका ब्लॅक नं. १

क्या नोटेशनमे गाना होता है? मच्छीका पानी पिया है? मग मला नाहीं सहन झालं. म्हणालों– आपके बापको पिया है! तरी ते माझा पिच्छा सोडेनात. –मासे खातोस–मासे तर मिळतच नाहींत. मी आपला हरभरे खाऊन राहतो. पैसे कुठायत? असंख्य गोष्टी नाना लोकांच्याबद्दल, देशांच्याबद्दल. असं काही बोलायचे–जे निव्वळ बोलायापुरतंच. शुभमयनं लिहून घेताना एकपण शब्द गळूं दिला दिला नाही. जें जें बोलले, तें तें त्यानं उतरवून घेतलं. फक्त एक–वयाचा हिशेब तेवढा वगळून टाकला. खॉसाहेब वय एकेका दिवशी एकेक सांगायचे. त्याचा काहीच मेळ बसायचा नाही. परत विचारलं तर म्हणायचे–आता वय झालं ना! हिशेब काही लागत नाही! उदय जाणार होता युरोपात. नाचाचं टोळकं घेऊन. मला पण घेऊन जायचं त्यांच्या मनात होतं. मी म्हणालो–बाबा

१२ पॉईंट कर्नाटक (कल्पना) अखंड ब्लॅक नं. २

साठी लागणारा टाइप भरपूर प्रमाणात उपलब्ध असणे ही एक अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. यांत्रिक ग्रंथजुळणीत, निदान मराठीमध्येतरी, एकाच वळणात फक्त तीनच आकारांचे टाइप उपलब्ध आहेत. त्यामुळे हातजुळणीचा आश्रय करावा लागतो. आणि म्हणून टाइपाचा योग्य पुरवठा हा ग्रंथमुद्रणामध्ये एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्याकडे ग्रंथमुद्रणात प्रामुख्याने पायका नं. १ (तत्सदृश मोनो-पायका), इंग्लिश फेस पायका बॉडी, चौदा पॉइंट ग्रेट फेस हे सर्वांत जास्त लागणारे टाइप. यांच्या जोडीने मथळ्यांसाठी आणि तळटीपांसाठी वेगळा टाइप असतो. यांशिवाय प्रत्येक आकारात दोन ठळक आणि दोन तिरके टाइप उपलब्ध आहेत. जुळणीस घ्यावयाच्या कामाचे स्वरूप, त्यात किती विविध प्रकारचे टाइप वापरावयाचे, छपाईची योजना, म्हणजे किती लवकर टाइप छापून मिळेल, त्याचा अंदाज, आणि टाइपात गुंतवाव्या लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा ह्या गोष्टी लक्षात घेऊन टाइप भरला पाहिजे. त्यामुळे स्वतःची फाउंड्री नसली, तर एखाद्या चांगल्या टाइप फाउंड्रीशी कायमची व्यवस्था करून ठेवणे आवश्यक आहे.

ग्रंथमुद्रणातील दिरंगाईची कारणे

८६. ग्रंथमुद्रणामध्ये मुद्रणालये कशी दिरंगाई करितात, या बाबतची डॉ. केतकर यांची तक्रार मागे दिली आहे. महाराष्ट्रातील आजचे अग्रेसर मुद्रक आणि यशस्वी प्रकाशक श्री. विष्णुपंत भागवत या बाबतीत काय म्हणतात,[५१] ते येथे पाहणे उद्बोधक ठरणार आहे.

"पुस्तकांची छपाई वेळच्या-वेळी होत नाही. याचे काही थोडे अपवाद सोडले, तर मुद्रकांकडून आपली पुस्तके केव्हाही वेळेवर छापून मिळत नाहीत; प्रकाशकाने मनाशी ठरविलेली तारीख जर गाठावयाची असेल, तर प्रकाशकांना जिवाचा फार आटापिटा करावा लागतो, असे संतापाने सांगितले जाते. त्यातील थोडी अतिशयोक्ती सोडली, तर ही तक्रार बऱ्याच अंशांनी खरी आहे, आणि त्याचे कारण मुद्रणव्यवसायाच्या स्वरूपात जसे आहे, तसेच ते मुद्रण-संचालकांच्या व व्यवस्थापकांच्या अज्ञानात व बेशिस्तीत आहे असे म्हटले, तर त्यामुळे कुणाला राग येऊ नये.

"आपण स्वीकारिलेले काम वेळेवर, ठरलेल्या दिवशी करून दिले पाहिजे, अशी सवय आपल्यापैकी बहुसंख्य मुद्रकांच्या अंगी मुरलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. काम ठरलेल्या दिवशी पुरे करून देणाऱ्या अपवादात्मक मुद्रणालयांचा उल्लेख गौरवाने केला जातो, तर बहुसंख्य मुद्रक 'अहो तुमची तर कादंबरी आहे. ती आज प्रसिद्ध झाली काय, किंवा आणखी थोड्या दिवसांनी झाली काय,' अशा भूमिकेवरूनच प्रकाशकांशी भाषा करितात.

"माझ्या मते ग्रंथछपाई करणाऱ्या मुद्रकांची ही वृत्ती, भूतकाळात प्रकाशकांकडून मिळालेली वागणूक यांसारखी काहीही कारणे असली, तरी योग्य नाही. कोणत्याही निर्मितीत वा सेवा-व्यवसायात काम केव्हा पुरे होणार, याबद्दल दिलेला शब्द पाळण्याचा कसोशीचा प्रयत्न केला जाणे त्या व्यवसायाच्या भरभराटीसाठी मी अवश्य मानतो.

"काही छापखान्यात मजकूरजुळणीच्या खात्यात जेवढे मनुष्यबळ असते, त्या सर्वांना एक

५१. भागवत, वि. पु., "ग्रंथमुद्रणातील योजनेवर विचार", *मुद्रणप्रकाश*, जून १९६९, पा. २५–२७.

प्रकारचे काम सातत्याने करिता येईल, एवढा टाइपच नसतो. उलट, काही छापखान्यांत टाइप पुरेसा असला, तर मनुष्यबळ पुरेसे नसते.

"प्रतींची संख्या मर्यादित असणाऱ्या ललित व सर्वसामान्य ग्रंथांचे मुद्रणकाम करणाऱ्या मुद्रणालयांच्या दृष्टीने ही बाब फारच महत्त्वाची आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या मुद्रणालयांच्या चालकांनी आपल्याकडील झालेल्या कामाचे वेळापत्रक जर पाहिले, तर त्यांना असे दिसून येईल की, काम पुरे करण्याचा दिवस चुकण्याला जुळणीखात्यातील अपुरेपणा व तज्जन्य उशीर हेच प्रामुख्याने कारण आहे.

"मजकूर जुळविण्यापासून त्याची अंतिम छपाई होऊन तो टाइप पुनर्जुळणीसाठी उपलब्ध होण्यास कमीत कमी बारा दिवसांचा तरी कालावधी लागतो. तेव्हा साधारणपणे पंधरा दिवसांत एकही पृष्ठ छापले गेले नाही, तरी टाइपाअभावी जुळाऱ्यावर स्वस्थ बसण्याची पाळी येणार नाही, एवढा टाइपाचा साठा मुद्रणालयाजवळ असणे आवश्यक आहे. तसेच, पुस्तक-छपाईसाठी प्रामुख्याने वापरल्या जाणाऱ्या छापखान्यांतील उपलब्ध टाइपांचा सतत उपयोग होईल, अशा रितीने कामांची निवड व त्यांच्या छपाईचे वेळापत्रक आखण्याची दृष्टी सतत ठेविली पाहिजे. त्यामुळे टाइपाअभावी काम थांबण्याचा प्रसंग कमी वेळा येईल.

"ग्रंथछपाई करणाऱ्या मुद्रणालयांतील कच्च्या मुद्रितांवरील नियंत्रण हे सर्वच दृष्टींनी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मी समजतो. म्हणूनच मुद्रणालयातील कामाची जबाबदारी असणाऱ्या व्यक्तीने स्वतः किंवा तिच्या बरोबरीच्या दुसऱ्या कोणीतरी नियंत्रण ठेविले पाहिजे, असे मी मानीत आलेलो आहे.

"ग्रंथनिर्मिती करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या मुद्रणालयांनी आपल्या मुद्रणालयांतून बाहेर जाणारी कच्ची मुद्रिते व प्रकाशकांकडून वा लेखकांकडून दुरुस्त्या होऊन परत येणारी कच्ची मुद्रिते एका जबाबदार व्यक्तीच्या हातूनच जातील, आणि ती व्यक्ती कच्ची मुद्रिते बाहेर जाताना अथवा जुळाऱ्याकडे परत जाताना त्यांवर नजर टाकून मगच पुढील कार्यवाही होईल, असे कटाक्षाने ठरवावे. तसे केले, की मुद्रणालयाची कार्यक्षमता तर वाढतेच, पण त्याबरोबर कामाचा दर्जाही सुधारतो.

"बांधणीच्या प्रत्येक क्रियेस किती वेळ लागतो, याची पूर्ण कल्पना फारच थोड्या मुद्रकांना असते व पुस्तकाच्या निर्मितीच्या सर्व कार्यक्रमात बांधणीसाठी लागणाऱ्या वेळाची योजना योग्य प्रकारे केली जात नाही.

"बांधणीक्रियेचे जसजसे यांत्रिकीकरण होईल, तसतसे पुस्तकाची प्रत्यक्ष छपाई सुरू करण्यापूर्वी पुस्तकग्रंथाच्या बांधणीचा विचार करणे आवश्यक होऊन बसेल. विशिष्ट पुस्तकाच्या छापील कागदाची मोडणी आपण कोणाकडे, कशी व कोणत्या यंत्रावर करणार, हे अगाऊ ठरवून नंतरच त्या यंत्राला जुळणारी अशी कागदावरील पृष्ठांची रचना वगैरे गोष्टी कराव्या लागतात."

काटकसरीने आणि त्वरित मुद्रण करण्यासाठी पूर्वनियोजन

८७. जुळणी केलेला मजकूर दोन-तीन वेळा तपासून घ्यावयाचा असतो. तो तपासल्यावर दुरुस्त करावयाचा असतो. यामुळे तपासण्यामध्ये जाणारा वेळ आणि दुरुस्तीसाठी जाणारा

वेळ यांचे प्रमाण सर्वत्र सारखेच असते, असे नव्हे. जुळणीखात्यात हा जो दुरुस्तीसाठी जादा वेळ जातो, त्यामुळे मुद्रणविभागास कामाचा पुरवठा होत नाही. परिणामतः मुद्रणयंत्रे रिकामी राहतात. पुस्तक समग्र छापून झाल्याशिवाय ते बांधवून घेता येत नाही. तोपर्यंत छापून झालेले कागद छापखान्यामध्ये साठवावे लागतात आणि त्यासाठी लागणाऱ्या जागेची चणचण भासते. प्रत्यक्ष बांधणी सुरू झाल्यावरसुद्धा ती लवकर संपविण्याच्या दृष्टीने मूळ छपाईची योजना अशा प्रकारे करणे आवश्यक असते की, ज्यामुळे पुस्तकबांधणी सोपी व कमी खर्चाची होईल, आणि उपलब्ध असलेली यंत्रसामग्री पुरेपूर उपयोगात येईल.

प्रबंधन-योजना

८८. छापखान्यात एका क्रियेत ३२ पानांच्या फॉर्मची घडी घालणारे यंत्र उपलब्ध असेल, आणि छपाईखात्यामध्ये सोळाच पाने एका वेळी छापणारे यंत्र उपलब्ध असेल, तर सोळा पानांचा कागद घेऊन एका बाजूस सोळा पाने व दुसऱ्या बाजूस सोळा पाने छापून ३२ पानांचा फॉर्म तयार करणे योग्य ठरते. याच्या उलट हे ३२-पानी घडीयंत्र उपलब्ध नसेल, तर सोळा-पानीच फॉर्म छापणे इष्ट. कारण जरूर पडल्यास मग हातानेच घडी घालता येते. अशाही परिस्थितीत बाइंडिंग-खात्यातील जुंपणी, शिवण इत्यादी कामे वाचविण्यासाठी सोळा पानांचे दोन फॉर्म घडी केल्यावर एकात एक घालून ३२ पानांचा गट तयार करणे इष्ट ठरते. त्यासाठी फर्मे ठोकण्यात पूर्वनियोजन पाहिजे. म्हणजे, ही जी अंतर्गत योजना करावयाची, तिची सुरुवात जुळणी-खात्यातच करावी लागते.

चित्रे, नकाशे, आसपास यांचे पूर्वनियोजन

८९. कित्येक पुस्तकांत रंगीत चित्रे, रंगीत नकाशे आणि आराखडे असतात. आसपासचे कागद कित्येकदा छापावयाचे असतात. ते वेळेवर छापून मिळणे आवश्यक असते. त्यांशिवाय बांधणी सुरू होत नाही. पुस्तकाच्या पानांवरच जर चित्रे छापावयाची असतील, तर त्यासाठी मजकुरात घालावयाचे ठसे जुळणीच्या वेळीच उपलब्ध असणे आवश्यक असते. म्हणजे जुळणीत वेळ जात नाही. बहुधा वरील कामे अन्यत्र करून घेण्याची वहिवाट आहे. त्यांची व्यवस्था वेळीच केली पाहिजे, आणि ती कार्यान्वित होते किंवा नाही, याकडे लक्ष ठेविले पाहिजे. ही सहज समजणारी साधी गोष्ट आहे, परंतु तिकडे दुर्लक्ष होत असते.

मुद्रणसाहित्य : कागद आणि शाई

९०. सर्वसाधारण ग्रंथाच्या मुद्रणासाठी लागणारा कागद पाहिजे तेव्हा उपलब्ध व्हावा, म्हणून त्याचा साठा करून ठेवावा लागतो. त्यासाठी जागेची आणि भांडवलाची आवश्यकता असते. ती सुविधा नसली, तर पुस्तकाची जुळणी सुरू करतानाच कागद आणून ठेवण्याची व्यवस्था करावी लागेल. ते अवधान ठेवावे लागते. ठसे करून घेण्यापूर्वी पुस्तकास कोणता कागद वापरणार, हे ठरवावे लागते. शंभर स्क्रीनचे ब्लॉक केल्यावर सुपर कॅलेंडर कागद न

४३

२ शब्द, अर्थ आणि उक्ती

काव्य हा मानवी मनाच्या एका विशिष्ट प्रवृत्तीचा आविष्कार आहे. हा आविष्कार अर्थयुक्त शब्दांच्या द्वारा होतो. म्हणून प्राचीन आचार्यांनी शब्द आणि अर्थ ह्या दोहोंनी मिळून काव्य निर्माण होते असे म्हटले आहे. 'शब्दार्थौ सहितौ काव्यम्' अशी भामहाने त्याची व्याख्या केली आहे.[1] तिचाच अनुवाद रुद्रट, कुन्तक प्रभृतींनी केला आहे. परंतु केवळ शब्द आणि अर्थ एकत्र आले म्हणजे काव्य निष्पन्न होत नाही. सामान्य व्यवहारात सुद्धा ते एकत्र असतातच. म्हणून कुन्तकाने व्याख्येतच असा खुलासा केला आहे की जेव्हा शब्द आणि अर्थ वक्रतायुक्त अशा कविव्यापारामुळे निर्माण झालेल्या आल्हादकारक अशा बांधीव रचनेत योजिले जातात तेव्हाच त्यांच्या सहिततेमुळे काव्य निर्माण होते.[2] सामान्य व्यवहारात शब्दार्थांची अशी योजनापुरःसर बांधीव रचना होत नाही. त्याचप्रमाणे मम्मटाने काव्याच्या व्याख्येत दोषरहित, गुणांनी युक्त आणि सामान्यतः अलंकारयुक्त असलेले शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य असे म्हटले आहे.[3]

---

१ भामह, काव्यालंकार, १.१६.

२ शब्दार्थौ सहितौ वक्रकविव्यापारशालिनि ।
बन्धे व्यवस्थितौ काव्यं तद्विदाह्लादकारिणि ॥
— कुन्तक, वक्रोक्तिजीवित, १.८.

3 तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि । — मम्मट, काव्यप्रकाश, १.३.

आकृती ४५ : उत्तम मुद्रणप्रतीचा एक नमुना

मिळाल्यास चित्रांची छपाई बिघडल्यावाचून राहत नाही. ग्रंथमुद्रणास कागद चांगला मोहरेदार आणि घडी-क्षमता (folding strength) असलेला असा हवा. अक्षरमुद्रणास मऊ कागद बरा. प्रतिरूप-मुद्रणास कोणताही कागद चालतो म्हणतात. परंतु भुसा नसलेला आणि पाण्याचा फारसा परिणाम न होणारा कागद चांगला. सर्वच ग्रंथमुद्रणात अपारदर्शक कागद असणे युक्त होय. शिवाय, निवडिलेल्या कागदावर शाई कशी वाळते, ही गोष्ट ध्यानी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नेहमी वापरात असलेली शाई मर्यादित प्रमाणात साठा करून ठेवता येईल. परंतु काही विशिष्ट प्रकारच्या मुद्रणासाठी विशिष्ट शाई वापरावी लागेल; तिची वेळीच व्यवस्था करावयास हवी. शाईही वापरलेल्या टाइपांना किंवा ठशांना साजेशी, आणि ग्रंथ ज्या कागदावर छापावयाचा त्यास योग्य अशी असावी लागते. त्यासाठी पूर्वयोजना करावी लागते. तसे केले नाही, तर पुढे पस्तावण्याची पाळी येते. उत्तम मुद्रणात कागदा-पेक्षाही योग्य शाईस जास्त महत्त्व आहे. आपल्याकडे फार चांगले शाई-कारखाने असूनही मुद्रकांना उत्तम शाईचे महत्त्व ते पटवू शकलेले नाहीत. त्यात त्यांची कुचराई की मुद्रकांची अनास्था, हे शोधणे संशोधनाचे काम आहे. महाग शाई परिणामी निर्मितिखर्च कमीच करिते आणि शिवाय गिऱ्हाइकाचे तिने समाधान होते, ही गोष्ट ध्यानात ठेविली पाहिजे.

उत्तम मुद्रणासाठी निर्दोष मुद्रणप्रतीची आवश्यकता

९१. ग्रंथनिर्मितीमध्ये उत्तम मुद्रणप्रत असण्यासारखी काटकसरीची दुसरी गोष्ट नाही. ही गोष्ट लेखकास आणि प्रकाशकास पटेल तो सुदिन ! ग्रंथातील मजकूर निर्दोष व्हावा, हे आपणा सर्वांसच पटते. त्याला लेखकाचा विरोध असणे शक्य नाही. परंतु ही गोष्ट निर्दोष मुद्रण-प्रतीवर अवलंबून असते. मुद्रितांत बदल करणे, मागाहून सुधारणा सुचविणे सोयीचे नसते, ही गोष्ट ध्यानात घ्यावयाला हवी. जादा खर्चाची गोष्ट सोडा; परंतु मागाहून केलेल्या दुरुस्त्यांमुळे शब्दांतील सूट अनियमित होते, पानांची मांडणी बिघडते, आणि सौंदर्यहानी होते, हे पटावे. मुद्रणप्रतीची आवश्यकता पटवून देताना सर स्टॅन्ले अनविन म्हणतात :

> " However excellent the printer selected, it is necessary for the publisher to prepare the manuscript for the press, more so today than ever. The main task of the assistant in the editorial department undertaking this important task is to apply House Rules and to eliminate as far as possible all causes for subsequent corrections. With machine composition, where the operators are highly paid and the capital value of the machinery involved is high, the saving made by well-edited typescript is considerable. "[५२]

ग्रंथविभाग-योजना

९२ परदेशांत हस्तलिखिते टंकलिखित असतात. देशी भाषांत अजूनही चांगल्या प्रकारे

52. Unwin, Sir Stanley, *The Truth About Publishing*, London, 7th Edition, 1960, p. 106.

अनुक्रमणिका

ग्रंथविभाग-योजना

अ : ग्रंथाचा प्राथमिक भाग

१. संक्षिप्त मुखपृष्ठ (Half Title)
२. लेखकाच्या इतर पुस्तकांची माहिती (Bibliographical details)
३. दर्शनी चित्र (Frontispiece)
४. मुखपृष्ठ (Title)
५ आवृत्तिशक, कॉपी राइट व मुद्रणालय-निर्देश (Copyright statement and Imprints)
६. अर्पण-पत्रिका (Dedication)
७. पुरस्कार (Foreward)
८ प्रकाशकाचे निवेदन (Publisher's narrative)
९. आभार-प्रदर्शन (Acknowledgements)
१०. प्रस्तावना (Preface)
११. अनुक्रमणिका (Contents)
१२. चित्रांची, आकृत्यांची, नकाशांची यादी (List of Illustrations)
१३. संक्षेपांची यादी (List of abbreviations)
१४. उपोद्घात (Introduction)
१५. शुद्धिपत्र (Errata)
१६. विभागशीर्षक पान (ग्रंथ मोठा असल्यास)

ब : ग्रंथाचा मुख्य भाग

१. प्रकरणे (Chapters)
२. मथळे (Headings)
३. परिच्छेद (Paragraphs)
४. टीपा, तळटीपा इत्यादी (Notes, foot-notes, shoulder-notes, cut-in notes, bottom-notes)

क : ग्रंथाची शेवटची प्रकरणे

१. परिशिष्ट (Appendices)
२. लेखकाच्या टीपा (Author's notes)
३. शब्दसंग्रह (Glossary)
४. संदर्भग्रंथ आणि (Bibliogaphy)
५ सूची (Index)

टीप : या ग्रंथविभाग-योजनेवर भारतीय मानक-संस्थेने स्टँडर्ड्स् प्रकाशित केले आहेत. त्यांचा निर्देश शेवटी संदर्भग्रंथांच्या यादीत केला आहे.

अनुक्रमणिका

टंकलेखन करण्याची सोय नसल्यामुळे चांगल्या सुवाच्य अक्षरांत हस्तलिखित लिहून काढण्याची आवश्यकता असते. मजकुरात एक शब्द एकाच पद्धतीने लिहिलेला असावा. अनुक्रमणिकेचा मजकूर तयार केलेला असावा; मुखपृष्ठावर काय-काय द्यावयाचे, याची निश्चिती करावी. यांशिवाय पुस्तकाच्या सुरुवातीस प्रस्तावना, चित्रांची व आकृत्यांची सूची, पुरस्कार, आभारनिर्देश (acknowledgements), शुद्धिपत्र, कॉपी राइटविषयक मजकूर इत्यादी भाग असतात. शेवटी संदर्भग्रंथांची यादी, शब्दकोश, विषयसूची आणि इतर सूची असतात. त्यांचा क्रम निश्चित करून शक्यतो हाही मजकूर हस्तलिखितात प्रथमतःच द्यावा. सुरुवातीच्या भागांतील मजकुराची मांडणी कशी असावी, ते बाजूच्या पानावर दिले आहे.

ग्रंथाचा मुख्य भाग आणि 'शेवटची प्रकरणे'

९३. यानंतर ग्रंथाचा मुख्य भाग येतो. त्यात ग्रंथविभाग, प्रकरणे, परिच्छेद, टीपा (foot-notes, shoulder-notes and cut-in-notes) इत्यादींचा विचार करावा लागतो. शेवटच्या भागांतील प्रकरणे क्रमाने बाजूच्या पानावर दिली आहेत.

प्रस्तावना आणि उपोद्घात यांतील फरक समजून घेणे इष्ट आहे. प्रस्तावना पुस्तकाविषयी किंवा लेखक आणि त्यांचे कार्य यांविषयी एखाद्या अधिकारी व्यक्तीने लिहिलेली असते. लेखक स्वतः आपल्या एकंदर अभ्यासाविषयी आणि पुस्तकाविषयी वाचकाना विश्वासात घेऊन त्यांच्याशी हितगुज करण्यासाठी प्रस्तावनेचा उपयोग करतो. उपोद्घात हा ग्रंथाचाच भाग असून विषयाची ओळख करून देणे आणि ग्रंथातील विवेचनाची दिशा, विषयांचा क्रम, प्रतिपादनाची पद्धती इत्यादी विषयांचा त्यांत समावेश होतो.

हस्तलिखित कसे असावे ?

९४. मुद्रित होत असलेल्या पुस्तकाची मुद्रिते तपासण्यामध्ये वेळ जातो; आणि त्याहून जास्त वेळ दुरुस्त्या करून घेण्यामध्ये जुळणीकाराचा जातो. तयार झालेली पाने लवकर छापून टाइप सोडवून घेणे मुद्रकाच्या हिताचे असते; आणि तसे करण्यास तो उत्सुक असतो. फारशा दुरुस्त्या नाहीत, किंवा कमी दुरुस्त्या आहेत, अशीच पाने लवकर छापावयाला घेऊन मुद्रणसामग्रीचा पुरेपूर उपयोग करून घेण्याचा मुद्रक प्रयत्न करितो. अशा प्रकारची अंतर्व्यवस्था त्यास त्वरित हितकारक असेलही. पण चालू पुस्तक लवकर संपविण्याच्या दृष्टीने ती उपयुक्त ठरत नाही. म्हणून दुरुस्त्या-पुरुस्त्या मागाहून करण्यासाठी राखून न ठेवता निर्दोष मुद्रणप्रत करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. मुद्रणप्रतीसाठी चांगला जाड आणि टिकाऊ कागद घेतला पाहिजे. कारण मुद्रणप्रत अनेक व्यक्तींच्या हातांतून जाते. कागदावर एकाच बाजूस भरपूर समास सोडून हस्तलिखित व्यवस्थित टाइप केले पाहिजे. मराठी हस्तलिखित सुवाच्य अक्षरांत लिहिणेच जास्त चांगले.

अनुक्रमणिका

ग्रंथमुद्रक म्हणजे नाडेभोरपी तर नव्हे ?

९५. ग्रंथमुद्रणामध्ये अशा या अनेक प्रकारच्या अडचणींचा नित्य विचार करावा लागतो. ग्रंथमुद्रकाची अवस्था दोरीवर नाचणाऱ्या नाडेभोरप्यासारखी असते. एका बाजूस कबूल केलेल्या तारखेस पुस्तक तयार करण्याची खटपट करणे, जुळणी बिनचूक करणे, मुद्रिते तपासणे, दुरुस्त्या करणे, कागद वेळेवर मिळविणे; तर दुसऱ्या बाजूस छापखान्यात असलेली सामग्री व माणसे यांना काम पुरवून सारखे गुंतवणे अशा दोन्ही बाबींकडे त्याला लक्ष द्यावे लागते. त्यात तोल सांभाळावा लागतो. त्यासाठी दोरीवर तोल सांभाळणारा नाडेभोरपी जसा जागरूक असतो, तसे ग्रंथमुद्रकाने नित्य सावधान असावे लागते. *ग्रंथमुद्रण हे परस्पर करून घेण्याचे काम नव्हे. तेथे साक्षात उपस्थिती आवश्यक असते.* ग्रंथमुद्रणालयात निदान सर्व काळ एक माणूसतरी असा असावयास पाहिजे की, सर्व चालू कामाची त्याला अद्ययावत माहिती असेल, किंवा ती जो तत्काळ मिळवून गिऱ्हाइकास देऊ शकेल. खाजगी दवाखाना चालविणाऱ्या डॉक्टराप्रमाणे ग्रंथमुद्रण हे पूर्ण वेळेचे काम आहे, हे अनुभवाने पटलेले असल्यामुळे अनुपस्थितीत ग्रंथ-मुद्रणालये चालवू म्हणणारे आणि तसे वागणारे मुद्रक भेटले, म्हणजे त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे, असे मला वाटते !

ग्रंथमुद्रणासाठी विशिष्ट मुद्रणालयाची आवश्यकता

९६. ग्रंथमुद्रणास सर्वच छापखाने योग्य असत नाहीत. पण छापखान्याच्या बहुत चालकांस तसे वाटत मात्र असते. काहींना वाटते, 'ट्रेडलवर चारचार पाने छापून टाकू.' दुसरे काही म्हणतात, 'आमच्याकडे एक मर्सिडीज आहे. आम्ही फक्त पुस्तकाची मलपृष्ठे व चित्रे छापू.' लेबले किंवा पोस्टर छापणाऱ्या प्रतिरूप-मुद्रकांना (Offset Printers) कधीकधी वाटते की, 'ग्रंथ छापण्यास आपणांस कोणती हरकत आहे? फक्त जुळणी दुसरीकडून करून आणू, म्हणजे झाले. बांधणी नाही तरी बाहेरूनच करून आणावयाची असते !'

ब्रिटनमधील नामवंत प्रकाशक सर स्टॅन्ले अनविन या बाबतीत म्हणतात :

> " To the uninitiated, any printer is a potential book printer, but this is no more the case than that any tailor is competent to make a lady's costume. Either a printer is a book printer or he is not a book printer; the commercial printer who has occasionally printed a book (probably a local directory or a glorified catalogue) is a person to be avoided, if you want a presentable article. The firms which specialize in book printing may be divided roughly into two classes : (1) the competent, but often uninspired; (2) the incompetent but cheap "[५३]

ग्रंथमुद्रणालयांचे तीन प्रकार

९७. ग्रंथमुद्रणाची परंपरा असलेली मुद्रणालये पहिल्या वर्गात मोडतात. दुसऱ्या वर्गातील

53. Ibid, pp. 103-4.

मुद्रणालयांच्या चालकांना ग्रंथमुद्रणाचे महत्त्व उमजलेले नसते. आवश्यक अशा काही प्रक्रिया टाळून 'झटिति कार्यपूर्ती'वर (short cut) अवलंबून हे मुद्रक अनिष्ट स्पर्धा करितात. काही मुद्रणालये ग्रंथमुद्रणाच्या केंद्रापासून लांब असल्यामुळे त्यांच्या अडचणीही असतात. त्यांची साधनसामग्री आणि पर्यवेक्षणव्यवस्था अपुरी असते. सर स्टॅन्‌ले पुढे म्हणतात :

> " . . . It is seldom that they are trusted with the printing of anything less straightforward than a novel. It is apt to prove disastrous when they are, because they pay no competent reader to check the proofs; have no one able to make a trustworthay 'cast off' and spend no adequate time upon " making ready " before machining without which satisfactory results are unobtainable."[५४]

९८. सर स्टॅन्‌ले यांचा हा अनुभव इंग्लंडमधील मुद्रण-व्यवसायासंबंधी असला, तरी आपल्याकडच्या परिस्थितीलाही तो लागू पडतो. त्यांनी वर्णन केलेल्या पहिल्या वर्गात मोडणारी मुद्रणालये आपल्याकडे फारच थोडी आहेत; आणि म्हणून दुसऱ्या वर्गातील मुद्रणालयांविषयी त्यांनी काढिलेले उद्गार आपल्याकडच्या बहुसंख्य मुद्रणालयांना लागू आहेत. ग्रंथमुद्रण ज्यांना मोठ्या प्रमाणावर करून घ्यावयाचे असेल, त्यांना अनेक मुद्रणालयांकडून दर मागवून आणि कमी दर देणाऱ्यास, किंवा जास्त दिवस पैशांची सवड देणाऱ्यास काम देण्याचा मोह होतो. त्यात परिणामी पश्चात्ताप करण्याची पाळी येते, असा अनुभव आहे. यात दोष मात्र मुद्रकांचा असतो, असे नाही. उत्तम मुद्रणालये निवडून केलेल्या कामाचे पैसे वेळेवर दिले, तर ग्रंथप्रकाशकांना मागाहून पस्तावण्याची पाळी येणार नाही. सर स्टॅन्‌ले म्हणतात :

> " The ideal arrangement is probably entire independence, but **close association with one or at most two firms of printers,** coupled with perfect freedom to go elsewhere at times of pressure."[५५]

ग्रंथमुद्रणास विशिष्ट मनोवृत्तीची आवश्यकता

९९. ग्रंथमुद्रणासाठी मुळात टाइपाच्या पुरवठ्याची तरतूद करावी लागते. त्यात भांडवल गुंतवावे लागते. जुळणीस संभाळावे लागतात. मुद्रिते तपासण्यासाठी अनुभवी मुद्रितशोधक बाळगावे लागतात. अशा तऱ्हेने सिद्ध केलेल्या मुद्रणालयांतच ग्रंथमुद्रण करून घेणे परिणामी हिताचे असते, ही गोष्ट ध्यानात ठेविली पाहिजे. तात्कालिक सोय पाहणे धोक्याचे असते. ग्रंथमुद्रणासाठी विशेष प्रकारची सामग्री, विशिष्ट यंत्रे आणि पद्धतशीरपणे अनुभव घेतलेली माणसे लागतात. इतकेच नव्हे, तर ग्रंथमुद्रणाची पूर्वतयारी म्हणजे एक विशिष्ट मनोवृत्ती तयार करणे, त्यासाठी सहनशीलता अंगी बाणविणे, सर्व कामांचे सम्यक् ज्ञान करून घेऊन पुन्हा लहानसहान बाबींवर लक्ष ठेवण्याची सवय लावून घेणे, सुबकपणाकडे लक्ष पुरविणे, या गोष्टी होत. ग्रंथमुद्रकांनी हे ध्यानात ठेवावयाला पाहिजे.

54. Ibid, p. 104-5.
55. Ibid, p. 105-6.

सुबक ग्रंथमुद्रणाची पथ्ये

१००. सुबक बिनचूक आणि चांगले ग्रंथमुद्रण करावयाचे, तर खालील बाबी अवश्य संभाळल्या पाहिजेत :

१. उत्तम मुद्रणप्रत तयार करून घेणे.

२. मुद्रणप्रतीत घालावयाची चित्रे, नकाशे, आसपास यांची आखणी करून ठेवणे. जुळणी सुरू होण्यापूर्वी त्यांचा आकार ठरविणे आणि सुयोग्य ठसे करवून घेणे किंवा अन्यत्र छापून घेऊन वेळेवर तयार ठेवणे.

३. मुद्रिते तपासण्याची पूर्वव्यवस्था, कागदाचा आणि शाईचा पुरवठा, मुद्रणयंत्राची नियुक्ती आणि प्रबंधनयोजना केल्याशिवाय पुस्तकाच्या जुळणीस हात न घालणे.

४. पुस्तकाची जुळणी करून फर्मे तयार करिताना उपलब्ध असलेल्या मुद्रणयंत्राचा आकार आणि पुस्तकाच्या बांधणीमध्ये काटकसर करण्याच्या दृष्टीने पाने मांडण्याची, ‘इंपोझिंग’ची, योजना या गोष्टी निश्चित केल्या पाहिजेत. यालाच मी ‘*प्रबंधनव्यवस्था*’ म्हणतो.

५. पुस्तकाचा आकार, प्रती आणि पुस्तक पुरे करण्यास मिळालेली मुदत (delivery date) ध्यानात घेऊन कामाची आखणी (scheduling) केली पाहिजे. तदनुसार काम होते किंवा नाही, ते वेळोवेळी पाहिले पाहिजे. होत नसल्यास उपाययोजना केली पाहिजे.

६. मुद्रणाचा दर्जा टिकविण्यासाठी सतत तपासणीची (continuous inspection) व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यावर कामसू (industrious) आणि कर्मनिष्ठ (devoted) अशा कुशल माणसांची योजना केली पाहिजे.

ग्रंथमुद्रण-प्रक्रियेतील संतुलन

१०१. मोठ्या प्रमाणात ग्रंथमुद्रण करणाऱ्या छापखान्यास पुस्तकबांधणीची स्वतंत्र व्यवस्था करिता आली, तर फार उपयुक्त ठरते. तसेच, जुळणीची व्यवस्था स्वतंत्र करिता आली, तर तीही उपयुक्त ठरेल. अलीकडे इंग्लंडसारख्या देशात एके ठिकाणी जुळणी, दुसऱ्या ठिकाणी छपाई व तिसऱ्या ठिकाणी पुस्तकबांधणी केली जाते. ग्रंथमुद्रणातील या तीन प्रधान क्रियांत संतुलन (balancing the capacities) साधणे कठीण असते. एका विभागात कामाची गर्दी, तर दुसऱ्या विभागात कामाचा तुटवडा अशी आपत्ती कधीकधी ओढवते. अर्थात ग्रंथमुद्रणालय स्वयंपूर्ण असणे हीही गोष्ट कांही दृष्टींनी सोयीची असते. विशेषतः काही विशिष्ट कामांच्याबाबत तर हे जास्तच खरे आहे. म्हणून सरधोपट एकच तत्त्व सांगता येत नाही. ग्रंथ जर मोठ्या आकाराचा असेल, तर पुस्तक छापून झाल्यावर सर्व प्रती न बांधविता आवश्यक त्या प्रती बांधवून, बाकीचे फॉर्म जुळवून, साठवून ठेवणे काटकसरीचे आणि अन्य दृष्टींनीही इष्ट ठरते.

ग्रंथमुद्रणातील काही अतिसामान्य पण दुर्लक्षित गोष्टी

१०२. पुस्तकाच्या प्रत्यक्ष छपाईमध्ये अनेक कारणांमुळे नित्य व्यत्यय येत असतो. जुळणीखात्यामध्ये ज्या-ज्या वेळी मजकुराचे उपमुद्रित काढिले जाते, त्या-त्या वेळी मजकूर

अनुक्रमणिका


केरोसिन, पेट्रोल यांसारख्या द्रावकाने स्वच्छ करून घेतला नाही, तर शाई अक्षरांवर वाळून जाते. आणि मग पुढे चांगली छपाई होत नाही. अक्षरे नंतर स्वच्छ करण्यात बराच वेळ जातो. गॅलीमुद्रिते काढताना, त्याचप्रमाणे मुद्रणयंत्रावर पहिले मुद्रित काढताना सुरुवातीसच अत्यंत कमी दाब देणे आवश्यक असते. ही गोष्ट कित्येक मुद्रकांना माहीत नसते, असे दिसते. जास्त दाबाने एकदा मुद्रित काढले की, मुद्राक्षरे आणि ठसे दबून जातात, आणि मग कितीही प्रयत्न केला, तरी मुद्रण निर्दोष होत नाही. ही गोष्ट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. मजकूर घट्ट नसणे, टाइपावर शाई वाळलेली असणे, मोडका टाइप राहू देणे, पानांची रचना बरोबर नसणे, ओळीवर ओळ न येणे इत्यादी अनेक जुळणीदोषांमुळे मुद्रणयंत्रावर बराच वेळ वाया जातो; त्यामुळे खर्च वाढतो; मुद्रणाची जी पूर्वयोजना असते, ती कोसळते; आणि काम वेळेवर होत नाही.

यंत्रे काम करीत नाहीत, माणसे काम करितात.

१०३. पानावर पान, ओळीवर ओळ आणि पृष्ठांकावर पृष्ठांक छापणे ग्रंथमुद्रणात आवश्यक असते. या गोष्टी अगदी सुरुवातीपासूनच संभाळाव्या लागतात. पानावर पान बरोबर छापण्याच्या क्रियेस 'रजिस्टर जमणे' असे म्हणतात. ते बरोबर व्हावे किंवा अनेकरंगी छपाईचा 'बेरंग' होऊ नये, म्हणून मुद्रणयंत्रात 'मांडणीस' कागद बरोबर लागला पाहिजे. यंत्र स्वयंचलित असले, तर कागद बरोबर लागतो. पण ही गोष्ट आपोआप होत नाही. त्यासाठी एकमेकांस चिकटलेले कागद सोडवून, त्यांतील फाटके कागद काढून, आणि रिमे छाट मारून घेतलेली असली, तरच स्वयंचलित यंत्रावर चांगली छपाई होते. अलीकडे कित्येक छापखान्यांतून डबल डेमीहून मोठी (२६" × ३८") स्वयंचलित मुद्रणयंत्रे बसविण्यात आली आहेत. तेथे कापणी-यंत्र ३२-इंची किंवा ३६-इंची असते. आणि छाट न मारता यंत्रावर कागद चढविला जातो. अर्थात वाईट छपाईचे खापर मग कागदावर फुटते. केवळ एखाददुसरे अद्ययावत मुद्रणयंत्र बसवून मुद्रणालयाचा तोंडवळा फारतर बदलेल, पण कामाचा दर्जा सुधारणार नाही. कारण खरे म्हणजे *यंत्रे काम करीत नाहीत, माणसे काम करितात, मग ती यंत्रे स्वयंचलित का असेनात!* यंत्र जेवढे स्वयंचलित, तेवढे ते *पूर्वयोजनेवाचून चालू ठेवणे कठीण.*

यशस्वी ग्रंथमुद्रणाची गुरुकिल्ली

१०४. पूर्वनियोजित वेळी (according to delivery schedule) चांगली छपाई करून द्यावयाची असेल, तर *अनालस्य, नित्य जागरूकता, संयम, अविचल चित्त, सौंदर्यदृष्टी आणि उपक्रमशीलता या गुणांची ग्रंथमुद्रकास अत्यंत आवश्यकता असते.*



विद्यालय

संवाद ७

शुद्ध गणिताविषयीं

आतां आम्ही ज्याविषयाचें निरूपण करणार तो इतरविषयांप्रमाणे
विशेष आनंददायक नाहीं खरा परंतु सर्वोत्कृष्ट फार प्रत्ययास येणा
रा असा आहे. तो फार प्रत्ययास येणारा आहे, कारण कीं गणि
तज्ञानी जे सिद्धांत केले आहेत त्यांचा फळांचा व्यापारी लोक नित्य
ही उपयोग करिताहेत. त्याणी सिद्धांत सर्वास सांगून त्यांचीं का
रणें स्पष्ट केलीं आहेत तीं जर केली नसतीं तर दिशोवराखलतांनये
ता व व्यापार ही चालत नसता.

एके देशचा माल दुसरे देशास न्यावयाकरितां जर जाहाजें नस
तीं तर व्यापार फार मोटा चालताना,व कदाचित् अगदींच त्या
चा लोप होता कारण जहाजें बांधणारांवाचून एकही जहाज जाहा
लें नसतें, व व्यवहारोपयोगी भूमितीचें ज्ञान असल्यांविना कोणी
ही जहाज बांधायास समर्थ जाहाला नसता. सिद्धांतीजे गणितज्ञ त्या
णीं पूर्वीं रेषाव कोणयांचा नियमांचाअभ्यास केला नसता व त्याच
रेषा आणि कोनयांचे त्रिकोण चतुष्कोण आणि वृत्तें कल्पिलीं नसतीं
तर जहाज बांधणारांस प्रतिलांकडाचा आकरा विषयीं अटकळ क
रावी लागती व क्षणोक्षणी आउत घेण्याचा पूर्वीं संशयेंकरून त्यास
तपासून पाहावें लागले असतें. सिद्धांति याणी आपले ज्ञानापासून
कित्येक सिद्धांतकरून त्याचे त्याणी ग्रंथ लिहिले त्यांत ज्यांस या सिद्धा
ताचें ज्ञान नाही त्यांकरितां व्यवहारोपयोगी रीति सांगीतल्या आहे
त परंतु ज्या नियमावरून त्या रीती बांधल्या आहेत त्याचा मूळाची
कामगार लोकांस इतकी माहितगारी नसती कीं जर त्याना विचा
रले की या रेषा खऱ्या आहेत हें कशावरून तुम्ही म्हणतां? तर ते उत्त
र देतील कीं जर त्या रेषा मोजल्या तर त्याप्रमाणें भरतात. कारागीर
लोकांतून मोटेशाहाणे माणसांची मी ही गोष्ट सांगतें त्यातून बकुतां
तर उत्तर देतां येणारच नाही. दुसरें कारागीर लोक आखण्या व

कंपास

आकृती ४७ : सुरुवातीच्या टाइपाचा नमुना

१०


देशी भाषांतील जुळणीव्यवस्था

हिंदी भाषांच्या मुद्रणात टाइप फाउंड्रीचे महत्त्व

१०५. पहिल्या महायुद्धापर्यंतचा काळ हा सामान्यतः वृत्तपत्रमुद्रण आणि ग्रंथमुद्रण यांचाच काळ होता. ग्रंथमुद्रणाचा इतिहास म्हणजेच विविध मुद्राक्षरांच्या निर्मितीचा इतिहास होय. मुद्रणात वेग आणणे आवश्यक होऊन बसल्यावर प्रथम एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून सुलोट मुद्रणयंत्राची (cylinder printing machine) प्रगती होऊ लागली. मुद्रणयंत्रांनी संपादिलेल्या वेगास जुळणीचा वेग अपुरा पडू लागला. तेव्हा नवीन-नवीन कल्पना काढून जलद जुळणी करण्याचे प्रयोग होऊ लागले. रोमन वर्णलिपीला अक्षरलिपीचे स्वरूप देण्याचेही प्रयत्न झाले. the, ing, is, was, इत्यादी वर्णसमुच्चय आज प्रचलित असलेल्या ffi, fi, fl यांच्याप्रमाणे तेव्हा एकत्र पाडून देण्यात येत. त्याची तशी जाहिरात करीत. त्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या चतुर्थपादात जुळणीयंत्राच्या शोधाकडे कल्पक यंत्रज्ञ वळले.

१०६. लायनोटाइप आणि मोनोटाइप यंत्रावरील इंग्रजी जुळणीस इ. स. १९००-पूर्वी दशकभर सुरुवात झाली होती. तरी मराठी आणि इतर देशी भाषांतील मुद्रणासाठी हातजुळणीवरच विसंबून रहावे लागे. म्हणून छापखान्यास टाइप फाउंड्रीची मदत आवश्यक होती. महाराष्ट्रातील फाउंड्रीचा उद्योग ‘अमेरिकन मिशन प्रेस’नंतर गणपत कृष्णाजींनी चालू ठेविला, आणि जावजी दादाजींनी तो वाढीस लावला. दरम्यान पुण्यास ‘आर्यभूषण’ टाइप फाउंड्रीचा जन्म झाला. मुंबईस ‘गुजराती’ टाइप फाउंड्री निघाली, ती १९००-मध्ये. ‘गुजराती’ टाइप फाउंड्रीने ग्रंथेतर मुद्रणास आवश्यक असलेले सर्व प्रकारचे टाइप उपलब्ध करून दिले. या काळात जे-जे म्हणून नवीन छापखाने निघाले आणि ग्रंथमुद्रणाची कामे करू लागले, त्यांनी टाइप फाउंड्रीचे महत्त्व ओळखून आपल्या ग्रंथमुद्रणाच्या कारखान्यात फाउंड्रीचा समावेश केला होता.

अनुक्रमणिका



आकृती ४९ : देवनागरी मुद्राक्षर-जुळणीच्या पद्धती

मात्रेचा किरटेपणा, उकार-वेलांटी आणि अक्षर यांमधील अंतर, ऱ्हस्व वेलांटीचे टांगते उजवे टोक इत्यादी उणिवा आहेत. परंतु सामान्य वाचकास डिग्री किंवा अखंड हातजुळणीची छपाई आणि मोनोवरील छपाई यांतील फरक जाणवत नाही. मोनो १२ पॉइंटमध्ये रूपाच्या दृष्टीने बरीच सिद्धता प्राप्त झाली असली, तरी असंख्य 'कर्ण'युक्त अक्षरांमुळे जुळणीमध्ये अनेक दोष उत्पन्न झाले. निर्णयसागरी 'इंग्लिश फेस', 'ग्रेट फेस', 'कर्नाटक अखंड पायका' इत्यादी फॉंटमधील अक्षरे सुबक दिसतात. पण त्यांची खिळेघरांतील संख्या जास्त आहे. डिग्री पद्धतीने खिळेघरे कमी करिता येतात, परंतु जस्टिफिकेशनचा किचकटपणा टाळता येत नाही. म्हणून आधीच अल्पवेतनाने नाखूष असलेले जुळारी डिग्री-कंपोज करण्यास कंटाळतात. जे नवीन जुळारी तयार झाले आहेत, त्यांना डिग्री-कंपोजची सवय नाही. फाउंड्री टाइप मोनोटाइपच्या तुलनेने महाग पडतो. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील बहुसंख्य छापखान्यांनी मोनोटाइपचा आश्रय घेतला. आणि १२ पॉइंट आकारात, विशेषतः वृत्तपत्र-मुद्रणामध्ये मोनोटाइप स्वीकार्य ठरला.

मोनोवर उपलब्ध असलेल्या वळणाच्या मर्यादा

११४. मोनोटाइपवर देवनागरी बसविण्याची खटपट करण्याच्या उद्योगामध्ये त्वरित जुळणीसाठी मोनो जुळणीयंत्राचा वापर करिता यावा, हा प्रधान हेतू होता. प्रत्यक्षात जेथे मोनो जुळणीयंत्रे उपलब्ध होती, अशा फारच थोड्या ठिकाणी तो साध्य झाला. इतर ठिकाणी मोनोवर पाडलेला टाइप सोडवून पुन्हा जुळणीस घेण्याची प्रथा रूढ झाली. मोनोचे किंवा लायनोचे जे वैशिष्ट्य की, प्रत्येक वेळी नवा टाइप, ते मोनोवर पाडलेला टाइप हाताने जुळवून पुन्हा-पुन्हा वापरण्याच्या प्रथेत नष्ट झाले. मोनोटाइपच्या वापरामुळे हातजुळणीसाठी डिग्री टाइपाचा वापर होत असे, तो कमी झाला. त्यामुळे जुन्या टाइप फाउण्ड्र्यांना वेगवेगळ्या वळणांचे टाइप पुरविण्याचा धंदा चालू ठेवणे किफायतशीर होईना. अशा प्रकारे सुबक ग्रंथमुद्रणास आवश्यक असे उत्तमोत्तम टाइप पाडणाऱ्या फाउंड्र्या हळूहळू संकोचू लागल्या. तरीही नामवंत छापखान्यांनी स्वतःची टाइप फाउंड्री ठेविली होती. प्रतिकूल परिस्थितीमध्ये ज्यांनी महाग असूनही फाउंड्री टाइपाचा वापर चालू ठेवला, त्यांना मुद्रणाचा दर्जा टिकविणे शक्य झाले.

मोनो-जुळणी जास्त कागद व्यापते.

११५. मोनोटाइपवर जुळणी सुलभ होते, स्वस्त पडते, असे सांगतात. परंतु त्यामुळे छापील पुस्तकाचा निर्मितिखर्च काही कमी होत नाही. मोनोवर देवनागरी बसविताना मुळापेक्षा वळण जरा पसरट घेणे आवश्यक ठरले. त्यामुळे त्याच आकाराच्या टाइपातील मुद्रणास जागा जास्त लागू लागली. उदाहरणार्थ, 'मोनो १२ पॉइंट' हा 'इंग्लिश फेस पायका बॉडी'पेक्षा लहान असूनही तेवढीच जागा व्यापतो. 'ग्रेट फेस इंग्लिश बॉडी' हातजुळणीचा टाइप '१४ पॉइंट मोनोटाइप'पेक्षा कमी जागा व्यापतो. हीच गोष्ट '१६ पॉइंट टाइपा'ची. मोनोच्या आणि हातजुळणीच्या टाइपाच्या रुंदी-उंचींची तुलना वरील कोष्टकात दाखविली

अनुक्रमणिका

आहे. देवनागरीच्या वळणात आडव्या रेघा जास्त आहेत. उदाहरणार्थ, 'ह' या अक्षरात त्या पाच आहेत त्यामुळे देवनागरीतील उभी वळणे जास्त सुवाच्य (legible) असतात आणि जागा वाचवितात. 'कर्नाटक उभा पायका' आणि पाठ्यपुस्तक-मंडळाने चौथी-पाचवीच्या पुस्तकांसाठी वापरलेला 'अविराज' हे टाइप यामुळेच लोकप्रिय ठरले आहेत. *

जुळणिसांचा तुटवडा : चिन्ता करण्यासारखी गोष्ट

११६. मुद्रण सोपे करण्याच्या खटपटीत वरील गोष्टी कोणी ध्यानात घेतल्या नाहीत. परिणामी पुस्तकांची पाने वाढून वाचकांवरील आर्थिक भार वाढला. हातजुळणीच्या टाइपामध्येही कंत्राटी पद्धती रूढ झाल्यामुळे शब्दांमध्ये जास्त जागा टाकण्याची अनिष्ट प्रथा प्रचलित झाली. यात पानांचा भाव कमी देण्याच्या चढाओढीची आणखी भर पडली. त्यामुळे आज महाराष्ट्रामध्ये काही मोजके छापखाने सोडले, तर चांगली जुळणी होत नाही. मुद्रणालयांची वाढ आज फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यात व्यापारी मुद्रण जास्त आहे. ग्रंथमुद्रणाची मागणी वाढत आहे. परंतु पुरेशा प्रमाणात डिग्री पद्धतीने जुळणी करणारे कामगार मिळत नाहीत, ही एक चिंता करण्यासारखी गोष्ट आहे.

मोनोपद्धतीतील वळणांचा अभाव

११७. अखिल हिंदुस्थानात भारतीय लिप्यांतून होणाऱ्या मुद्रणाशी तुलना केली असता महाराष्ट्रात मुद्रणाचा जो दर्जा पूर्वसूरींनी उंचावला होता, आणि समकालीन मान्यवरांनी संभाळला आहे, तो खात्रीने उच्च आहे. परंतु हा कपिध्वज उंच ठेवावयाचा असेल, तर मुद्राक्षरलेखनकलेच्या व्यासंगात विशेष लक्ष घालून काही योजनाबद्ध कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. फाउंड्री-टाइपाचा वापर हातजुळणीसाठी मोठ्या प्रमाणात होत राहिला, तर फाउंड्रीचा धंदा किफायतशीर ठरून नवीन-नवीन सुबक वळणे निघू शकली असती. या शतकाच्या पूर्वार्धात नवीन वळणे करण्याच्या कामात लक्ष घालणाऱ्या पंचीगारांना या कलेवर उदरनिर्वाह करणे कठीण झाले. ते नामशेष झाले. नवीन पंचीगार पुढे आले नाहीत. मोनोटाइपावरचे काम वाढत असल्यामुळे आणि यांत्रिक जुळणीतील फायदे पटल्यामुळे मोनोटाइप यंत्रांची आयात वाढली. दर मोनोटाइप यंत्राला आपण जी किंमत देतो, तीत रोमन व इतर

*टिप्पणी : अलीकडे मुळात लायनोटाइपासाठी तयार केलेल्या विजापुरे देवनागरी टाइपाचा मोनो-यंत्रावर स्वीकार करण्यात आलेला आहे. हा देवनागरी टाइप कर्नाटकच्या 'अखंड पायका' वळणाच्या संकलन-चित्रावरून तयार करण्यात आलेला आहे. आणि त्याची रुंदी मूळ मोनो-वळणाहून कमी (म्हणजे नऊ सेटवरून आठ सेट इतकी) करण्यात आलेली आहे. असा तयार झालेला टाइप जागा वाचविणारा आहे. परंतु त्याचा आकार 'निर्णयसागर' पायकाहून लहान झाला आहे. शिवाय कै. विजापुरे यांची जी एकरेखिक पद्धती, तिचा पूर्ण स्वीकार या 'मोनो विजापुरे'मध्ये झालेला नाही. मोनोटाइप करणपद्धती कायमच आहे. त्यामुळे मोनोटाइप देवनागरीवरील आक्षेपांचे निरसन झालेले नाही.

अनुक्रमणिका

भाषांतील नवीन वळगे तयार करण्यासाठी करावा लागणारा भांडवली खर्च अंतर्भूत असतो. त्याचा फायदा देवनागरी मोनोचा वापर करणाऱ्यांस नवीन वळणाच्या रूपाने मिळाला पाहिजे. त्यासाठी आग्रह धरिला पाहिजे. *मोनोच्या खरेदीत दीड-दोन लाख रुपये गुंतवूनसुद्धा ग्राहकांना फक्त एकच वळण उपलब्ध व्हावे, तेही मोठ्या आकारात सुबक नसावे, आणि तरीही आम्ही मोनोटाइपाचा हातजुळणीसाठी वापर करावा, ही गोष्ट देशी भाषांच्या मुद्रणविकासास खात्रीने पोषक नाही, हे अप्रिय सत्य स्पष्टपणे कोणीतरी सांगितले पाहिजे.* हिंदुस्थानातील राजमान्य भाषांत उत्तरोत्तर मुद्रणाची फार मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे, ही गोष्ट ध्यानी घेऊन परदेशी कंपन्या नवीन वळणे उपलब्ध करून देतील. नवीन वळणे करण्याच्या या उद्योगात मोनो-कंपनी मुळीच मागे पडणार नाही, ही गोष्ट त्यांनी जगातील शेकडो भाषांतील टाइपांची वळणे बनवून सिद्ध केली आहे. परंतु एतद्देशीय ग्रंथमुद्रकांनी नेट धरिला पाहिजे. यशोगिरीवर पोहोचण्याची वाट सपाट भूमीवरून असत नाही, तद्वत सुबक मुद्रण सोपे करिता येत नाही. त्यासाठी उत्तम मुद्राक्षरांचा आग्रह धरिला पाहिजे. आणि जोवर सुबक वळणे जुळणीयंत्रावर उपलब्ध होत नाहीत, तोवर फाउंड्री-टाइपात हातजुळणी करण्यात कमीपणा मानता कामा नये.

देवनागरीचे प्रमाणित रूप

११८. मराठीतील ग्रंथमुद्रणात जावजी दादाजी फाउंड्रीमध्ये आरूंनी तयार केलेली वळणे आणि त्यांच्या अनुकरणाने काही अन्य टाइप फाउंड्र्यांनी तयार केलेली मुद्राक्षरे यांहून देवनागरी मुद्राक्षरकलेची प्रगती झालेली नाही. आरूंच्या प्रयत्नानंतर नवीन-नवीन वळणे तयार व्हावयाचे बंद झाले. याचे एक कारण देवनागरी-जुळणीतील किचकटपणा होय. या बाबतीमध्ये सुधारणा करण्याचे जे प्रयत्न झाले, ते या प्रकरणाच्या शेवटी परिशिष्टामध्ये मी साररूपाने दिले आहेत. देवनागरी जुळणीमध्ये सुधारणा करण्याच्या कामामध्ये अनेक लिपिसंशोधकांनी, मुद्राक्षर-कलावेत्त्यांनी भाग घेतलेला आहे. या सर्व प्रयत्नांचा इतिहास मी आपल्या 'Typography of Devanagari' या ग्रंथामध्ये दिलेला आहे. पुष्कळ चर्चेनंतर भारत-सरकारने आता देवनागरी लिपीचे लिखित आणि मुद्रित स्वरूप प्रमाणित केलेले आहे. आणि म्हणून नवीन वळणे तयार करण्याचे काम केवळ देवनागरीतच नव्हे, तर भारतातील इतर लिप्यांमध्येसुद्धा हाती घेणे शक्य झाले आहे. या संदर्भात अलीकडे केरळ-राज्यात तेथल्या सरकारने मल्याळी लिपीचे एकरेखिक जुळणीसाठी जे स्वरूप निश्चित केले आहे, त्याची दखल घेणे जरूर आहे. या सुधारणांमध्ये मल्याळी लिपीतील सुमारे चारशे मुद्राक्षरांची संख्या शंभरावर आली आहे. परंतु ह्या प्रयत्नात लिपीचे मूळरूप कितपत कायम राहिले, ते पाहिले पाहिजे.

विचारमंथनाची आवश्यकता

११९. देवनागरीच्या दृश्यरूपात फार क्रांतिकारक बदल न सुचविता अक्षरांना उभे छेद देऊन ही लिपी यांत्रिक जुळणीसाठी सोपी व्हावी, म्हणून लोकमान्य टिळकांनी नवीन योजनेचा पाया घातला. त्यानंतरची पुढची पायरी म्हणून विजापुरे-पद्धतीच्या जुळणीचा

महाराष्ट्र-सरकारच्या मुद्रणालयात अवलंब करण्यात आला. याव्यतिरिक्त श्री. मामा दाते यांनी देवनागरीच्या मूळ रूपात मुळीच फरक न करिता एक नवी जुळणीपद्धती मोनोयंत्रासाठी तयार केली. तरी मुद्रणात आणखी सौकर्य येणे इष्ट व शक्य आहे, हे वर दाखविले आहे. मुद्रकांच्या रोजच्या कामात हे प्रश्न जिव्हाळ्याचे आहेत. म्हणून त्यांची मते व्यवहारतः मोलाची ठरतील. तेव्हा मुद्रकांनी यावर आपले मत सांगणे इष्ट आहे. त्याचबरोबर आपण लिहिलेली भाषा कशी ' दिसते ' किंवा ' दिसावी ', हे सांगण्याचा अधिकार लेखकांचा आहे. आणि ती वाचताना काय अडचणी येतात, ते जाणून त्यांत सुधारणा सुचवण्याचा अधिकार वाचकांचा आहे. यासाठी सर्व संबंधितांनी याविषयी आपले विचार मांडणे इष्ट ठरेल.

देशी भाषांतील मुद्रण सुलभ करण्यासाठी कार्यवाही

१२०. मुद्राक्षरांची नवीन वळणे तयार करणे हे कौशल्याचे, तसेच अतिकष्टाचे काम आहे. या कामगिरीमध्ये लिपिशास्त्रज्ञ, लेखनिक, कोरीव काम करणारे, मुद्राक्षर-कलाकार आणि प्रत्यक्ष मुद्राक्षरे पाडणारे या सर्वांचे सहकार्य हवे. नवीन वळणे तयार करण्यामध्ये फार वेळ घालवावा लागतो. त्यासाठी पंच कोरण्याचे आणि नवीन वळणासाठी संकल्पचित्रे तयार करण्याचे शिक्षण देण्याची व्यवस्था असावी लागते. प्रत्यक्ष काम करण्याकरिता लागणारी प्रकाशलेखन-यंत्रे, पँटोग्राफ, पंच ठोकण्याचे यंत्र इत्यादी सामग्री आजतरी परदेशातूनच आयात करावी लागते. लायनोटाइप आणि मोनोटाइप या दोन्ही संस्था सोडून दिल्या, तरी नवीन वळणे तयार करण्याचे काम इंग्लंडमधील स्टीफन-ऑस्टिन ही एकमेव कंपनी करिते. त्यांनी मातृका तयार करण्याचा स्वतंत्र विभाग अलीकडे उघडला आहे. जपानमध्ये या बाबतीमध्ये बरीच प्रगती झालेली आहे. नवीन वळणे एकदा बाजारात आली, की ' बॅटरी पद्धती'ने ती कोणालाही तयार करिता येतात. आणि त्यांवरून टाइप पाडून घेता येतो. या कार्यात जो पैसा सुरुवातीस गुंतविला जातो, त्याला संरक्षण मिळत नाही; आणि म्हणून असा पैसा गुंतविण्यामध्ये धंदेवाईक संस्था भाग घेत नाहीत. शासनमान्य संशोधन-संस्थांनी हातात घ्यावयाचे हे काम आहे. या संदर्भात मुंबईत अलीकडे स्थापन झालेल्या ***' अक्षर-संशोधन-केंद्र '*** या संस्थेची दखल घेतली पाहिजे. आता जवळजवळ प्रत्येक राज्यामध्ये पाठ्यपुस्तक-मंडळे स्थापन झालेली आहेत आणि त्यांच्याकरवी फार मोठ्या प्रमाणावर प्राथमिक शाळांत लागणारी पुस्तके निर्माण करण्यात येऊ लागली आहेत. ही मंडळे फार मोठी आर्थिक उलाढाल करितात. त्यांना देशी भाषांमध्ये नवी वळणे तयार करण्यासाठी, त्या बाबतीत संशोधन करण्यासाठी काही रक्कम वेगळी काढून ठेविता येणे शक्य आहे. तसे त्यांनी केल्यास आणि या कार्यात भारत-सरकार आणि राज्य सरकारे यांनी मदत केल्यास देशी भाषांतील त्वरित जुळणीचा प्रश्न मार्गी लागू शकेल.

परिशिष्ट

देवनागरी मुद्राक्षरांची काही वळणे

निर्णयसागर टाइप फाउंड्रीने
तयार केलेल्या देवनागरी मुद्राक्षरांचे नमुने

3 Long Primer (338) १० पॉ. साधा ' भागीरथी '

निर्णयसागर हें महाराष्ट्रमुद्रणकलेचें, महाराष्ट्रवाङ्मयाचें एक भूषण आहे. हें भूषणावह स्थान कायम राखण्याचें कार्य शेठ तुकाराम जावजी ह्यांनीं फारच उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें. मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले.

4 Pica No. 1 (334) १२ पॉ. नं. १ ' जिजाबाई '

टाईप तयार करण्याच्या कामांत मुंबईस जावजी दादाजी व गणपत कृष्णाजी या दोघांनींच नांव मिळविलें. (केसरी—१२-४-९२) मुंबई ...... कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. ०००

5 Pica Black No. 1 (332) १२ पॉ. ब्लॅक नं. १ ' तुकाराम '

गौतमबुद्ध हा बिहार प्रांताचा राजा शुद्धोदन ह्याचा एकुलता एक पुत्र होता. ...... मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ०००

6 Pica Black No. 2 (333) १२ पॉ. ब्लॅक नं. २ ' विठोबा '

निर्णयसागर छापखान्याचे मालक कैलासवासी जावजी दादाजी हे आपल्या उद्योगानें व श्रमानें भरभराटीस आले होते.......मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. ०००

7 Pica Italic (347) १२ पॉ. इटॅलिक ' सरिता '

मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ० ०००

8 English Face No. 1 १२ पॉ. ' शामराव '

एका श्रीमंत गृहस्थानें आपल्या खजिन्यावर पाहारा करण्यास एक शिपाई ठेविला, मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०००

9 New Face 14 Point English No. 1 १४ पॉ. नं. १ ' शांताराम '

विश्वशांतीचे कट्टे पुरस्कर्ते होते आणि तिचा प्रसार करण्यासाठींच जणु त्यांचा अवतार होता. मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०००

10 Great Primer No. 1 (325) १६ पॉ. नं. १ 'तारा'

थोडें नुकसान झालें तरी होवो पण खरा सरळपणा राहो असे ते वागत. मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ० ०००

11 Great Primer Black No. 1 (323) १६ पॉ. ब्लॅक नं. १ 'राणूजी'

रविवर्मा चित्रकले, वर्णशलाकांस जावजी शेट ॥ १ ॥ मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ०००

12 Great Primer Black No. 2 (324) १६ पॉ. ब्लॅक नं. २ 'आरू'

लोकांनीं आपणांस चांगलें म्हणावें, आपली वाहवा व्हावी, अशी साहजिकच इच्छा असते .... मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले.

13 Great Primer No. 3 (327) १६ पॉ. नं. ३ 'अविराज'

'बादरायणसंबंध' हा शब्द अनेकदां येतो. ज्या गोष्टींचा संबंध मुळींच नसतो, त्या गोष्टींचा संबंध....मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३

14 Great Primer Black No. 3 (469) १६ पॉ. ब्लॅक नं. ३ 'हरिश्चंद्र'

मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ०००

15 One Nick Great Primer (322) २० पॉ. साधा 'सुनंदा'

मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले. १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०

16 One Nick Great Primer Black No. 2 (321) २० पॉ. 'अवंतिका'

मुंबई कॉंग्रेस अधिवेशनांत कर्तृत्वपूर्ण मराठी रंग-भूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यांत आले.

गुजराथी टाइप फाउंड्रीने तयार केलेल्या देवनागरी मुद्राक्षरांचे नमुने

17 12 Point Bimal १२ पॉ. विमल

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आलें.

18 16 Point Pushpa Italic १२ पॉ. पुष्पा इटालिक

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आलें.

19 16 Point new style Italic १६ पॉ. न्यू स्टाइल इटालिक

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आलें. १२३४५६७८९०

20 18 Point Vasant १८ पॉ. वसंत

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आलें. १२३४५६७८९०

21 24 Point Bharat २४ पॉ. भरत

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आलें. १२३४५६७८९०

22 24 Point Uma २४ पॉ. उमा

मुंबई काँग्रेस आधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक आभिरूप १२३४ नाट्यदर्शन घडविण्यात आलें. ५६७९०

23 22 Point Anant Shaded

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आलें. १२३४५६७८९०

24 24 Point Tanaji

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्य दर्शन घडविण्यात आलें. १२३४५६७८

25 36 Point Bhishma

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्य दर्शन घडविण्यात आलें १२३४५६

मौज टाइप फाउंड्रीने प्रसृत केलेले विजापुरे टाइप

26 16 Point Vijapure

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आले. १२३४५६७८९०

26 अ 20 Point Vijapure

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आले. १२३४५६७८९०

27 24 Point Vijapure

मुंबई काँग्रेस अधिवेशनात कर्तृत्वपूर्ण मराठी रंगभूमीचे एक अभिरूप नाट्यदर्शन घडविण्यात आले. १२३४५६

प्रकाश टाइप फाउंड्री, पुणे यांनी प्रसृत केलेल्या देवनागरी मुद्राक्षरांची वळणे

28 **12 Point Raghunath**

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढना सरल मालूम होता है । उसका शिखर आवाहन करता दिखाई देता है लेकिन ज्यों ज्यों हम उसके नजदीक पहुँचते हैं, कठिनाईयाँ दिखाई

29 **12 Point Ashok**

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता है । उसका शिखर आवाहन करता दिखाई देता है, लेकिन ज्यों ज्यों हम उसके नजदीक पहुंचते हैं ।

30 **14 Point Madhav**

मनुष्यमें सबसे बडी शक्ति विचारोंकी शक्ति है । इसकेद्वारा मनुष्यने बडे बडे आविष्कार किये हैं । किन्तु मनुष्य अपनी विचारशक्तिका श्रीगणेश धमार एडका गणेश रमान अगतिक केशव जलाल

31 **14 Point Narayan**

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता है । उसका शिखर आवाहन करता दिखाई देता है, लेकिन ज्यों ज्यों हम उसके नजदीक पहुंचते हैं ।

32 **12 Point Vishnu**

हम समाज के साथ ही ऊपर उठ सकते हैं और समाज के साथ ही नीचे गिरना होगा । यह तो नितान्त असम्भव है कि कोई व्यक्ति अपूर्ण

33 **16 Point Vishnu**

हम समाज के साथ ही ऊपर उठ सकते हैं और समाज के साथ ही नीचे गिरना होगा । यह तो नितान्त असम्भव है

34 **24 Point Vishnu**

हम समाज के साथ ही ऊपर उठ सकते हैं और समाज के साथ ही नीचे गिरना

35 12 Point Shri Ganesh

स्वानंद प्रदीपासंबंधीची पारमार्थिक जनतेची जिज्ञासा अधिका-धिक वाढत आहे. आमच्याकडे आलेल्या वाचकांच्या शेकडों

36 16 Point Shree Ganesh

भारतकी पवित्र भूमिपर चीन द्दारा किये गये हमलेसे भारतके नित-जागृत-प्रहरी-

37 24 Point Shri Ganesh

श्रीगणेश: आम्ही शेवटपर्यंत लढूं शेवटी विजय आमचाच होईल

38 16 Point Prakash

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढना सरल मालूम होता है। उसका शिखर आवाहन करता दिखाई देता है। १ २ ३ ४ ५

39 16 Point Oturkar

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता है। उसका शिखर आवाहन करता दिखाई देता है। १ २ ३ ४ ५

40 18 Point Govind

सबसे श्रेष्ठ वह है जो परार्थको ही अपना स्वार्थ मानकर अपनी हानिकरके भी दूसरेको लाभ पहुचाता है। उससे

41 20 Point Mayadev

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढना सरल मालूम होता है। १ २ ३

अनुक्रमणिका

42 18 Point Balkrishna

सुदूवर्ती पर्वत सुगम्य। उसपर चढ़ना सरल मालूम होता है। उसका शिखर आवाहन। १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०

43 24 Point Yashawant

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता हैं। उसका शिखर आवाहन करता दिखाई देता हैं। १ २ ३

44 24 Point Arun

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता है। १ २ ३ ४ ५ ६ ७

45 22 Point Painter

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता है। १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०

46 32 Point Keshav

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढ़ना सरल मालूम होता है। १ २ ३ ४ ५ ६

47 36 Point Anant

सुदूरवर्ती पर्वत सुगम्य और उसपर चढना १ २

११

शालेय ग्रंथांची निर्मिती

ग्रंथमुद्रणातील शालेय पुस्तकांचे स्थान

१२१. या देशातील सुरुवातीचे मुद्रण हे धार्मिक पुस्तके आणि शालेय पुस्तके यांनीच व्यापलेले होते. परदेशी राज्यकर्त्यांना एतद्देशीय भाषा शिकण्यासाठी व्याकरणे आणि कोश यांची जरुरी होती. धर्मप्रसारकांना धार्मिक पुस्तके भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याची आवश्यकता वाटत होती. भारतीय भाषांमध्ये धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या प्रचारकांना शिकवून तयार करण्यासाठी व्याकरणे आणि कोश यांची जरुरी होती. त्या काळात, म्हणजे अठराव्या शतकात, शिक्षणाची गुरुकुल-पद्धती होती. त्यास आवश्यक ते ग्रंथ हाताने लिहिलेले असत. तेही मोजके असत; आणि त्यांत चुका असत. म्हणून बंगाल्यात, मद्रास-मध्ये आणि मुंबईस, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस, ज्या शिक्षणसंस्था आणि शिक्षण-मंडळ्या निघाल्या, त्यांना प्रथम शालेय पुस्तकांची सोय करणे आवश्यक होते. ही जबाबदारी त्यांनी कशा प्रकारे पार पाडली, याचे थोडे विहंगमावलोकन केले पाहिजे. प्रस्तुत विषयाच्या चर्चेशी त्याचा साक्षात संबंध आहे. याचे कारण एकोणिसाव्या शतकातील पहिल्या साठसत्तर वर्षांतील ग्रंथमुद्रणात शालेय पुस्तके, व्याकरणे, कोश आणि धार्मिक ग्रंथ यांचे स्थान प्रधान आहे. प्रस्तुत प्रकरणातील विवेचन मुख्यतः डॉ. कृ. भि. कुलकर्णी यांच्या ***एकोणिसाव्या शतकातील शालेय मराठी वाङ्मय*** या प्रबंधाच्या आधाराने केले आहे.[५९] या प्रकरणात दिलेले बरेच संदर्भ मुळातून पाहता आले, परंतु तळटीपांत दिलेले संदर्भ डॉ. कुलकर्णी यांच्या प्रबंधातून घेतलेले आहेत. त्याशिवाय मला उपलब्ध झालेल्या शालेय पुस्तकांच्या आणि तत्कालीन वृत्तपत्रांतील लिखाणांचाही उपयोग केला आहे. आमचे

५९. कुलकर्णी, डॉ. कृष्णाजी भिकाजी, *आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती*, मराठी-संशोधन-मंडळ, पुरस्कृत ग्रंथमाला, ग्रंथ पहिला, मुंबई, १९५६.

गुरुतुल्य ज्येष्ठ स्नेही प्रा. प्रिओळकर यांच्याशी नित्य होणाऱ्या संभाषणांतून मला बरीच माहिती मिळाली. किंबहुना या एकोणिसाव्या शतकातील ग्रंथनिर्मितीच्या अभ्यासाची प्रेरणा मला त्यांच्यापासूनच मिळाली आहे.

फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना आणि प्रयोजन

१२२. हिंदुस्थानात शालेय पुस्तकांच्या प्रकाशनास एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरुवात झाली. मे ४, १८०० रोजी कलकत्त्याचे 'फोर्ट विल्यम कॉलेज' स्थापन झाले. तेथे संस्कृत, बंगाली, मराठी आणि इतर हिंदी भाषा यांच्या अभ्यासास सुरुवात झाली. त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली ह्यांच्याकडे या कॉलेजच्या स्थापनेचे श्रेय जाते. कॉलेज-स्थापनेतील हेतू लॉर्ड वेलस्ली सांगतात :

> " My principal purpose in founding this institution was to secure the junior servants of the company from all undue influence in the discharge of their official functions and to introduce them into the public service in the perfect freedom and independence, exempt from every restraint, excepting the high and sacred obligations of their civil, moral and religious duty."[६०]

टिपू सुलतानाच्या संग्रहातील हस्तलिखित ग्रंथ कॉलेजच्या या ग्रंथालयात आणविण्यात आले. डॉ. विल्यम केरी यांची १८०१-मध्ये बंगाली भाषेचा अध्यापक म्हणून फोर्ट विल्यम कॉलेजात नेमणूक झाली होती. संस्कृतच्या आणि मराठीच्या अध्यापनाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. डॉ. केरीच्या मदतीस पंडित वैजनाथ शर्मा आणि पंडित रंगनाथ हे मराठी पंडित दिले होते. या वैजनाथ शर्मांच्या मदतीने केरीने *मराठी भाषेचे व्याकरण* (१८०५), *मराठी भाषेचा कोश* (१८१०), *सिंहासन बत्तिशी* (१८१४), *हितोपदेश* (१८१५) इत्यादी पुस्तके लिहून प्रसिद्ध केली. ही मराठीतील आद्यमुद्रित शालोपयोगी पुस्तके होत. ती सर्व 'सेरामपूर मिशन प्रेस'मध्ये मुद्रित झाली.

पुणे पाठशाळेची स्थापना : शालेय पुस्तक निर्मितीचा प्रारंभ

१२३. मद्रासेत असेच एक कॉलेज स्थापण्यात आले. तेथेही मराठीच्या अभ्यासाची सोय होती. तत्पूर्वी (१७९२-मध्ये) बनारसला 'हिंदु कॉलेज'ची स्थापना झाली होती. त्यात हिंदू कायद्याचा अभ्यास होई. मुंबईस तेव्हा असे कॉलेज स्थापन झाले नाही. तो मान महाराष्ट्रात प्रथम पुण्यास मिळाला. 'हिंदु कॉलेज' किंवा 'पुणे पाठशाळा' या संस्थेची ६ ऑक्टोबर १८२१ रोजी स्थापना झाली. तीत तेव्हा १०० विद्यार्थी होते. त्यांना दरमहा रु. ५ शिष्य-वृत्ती मिळे. त्यानंतरच्या काळात मराठीच्या अभ्यासास सक्रिय हातभार लावणारे पुणे पाठशाळेचे मुख्याध्यापक आणि भाषांतरप्रमुख मेजर कँडी शालेय पुस्तकनिर्मितीविषयी म्हणतात :

60. The College of Fort William in Bengal, 1805, p 137.

" In a word, knowledge must be drawn from the stores of the English language, the vernaculars must be employed as the media of communicating it and Sanskrit must be largely used to improve the vernaculars and make them suitable for the purpose. "६१

याच भूमिकेतून शालेय पुस्तकांची निर्मिती होऊ लागली होती ही गोष्ट त्या वेळच्या प्रकाशित पुस्तकांची यादी पाहिली असता लक्षात येते.

हैंदशाळा पुस्तक मंडळी

१२४. इ. स. १८१५ मध्ये धार्मिक शिक्षणासाठी The Society for Promoting the Education of the Poor या संस्थेची मुंबईत स्थापना झाली होती. नंतर सात वर्षांनी (१८२२) Bombay Native School Book and School Society ची स्थापना करण्यात आली. तिला ' हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी ' असे नाव होते. संस्थेचे पहिले कार्यवाह, व्यंकोबा सदाशिव नाईक, यांनी इसापच्या गोष्टींचे भाषांतर केले होते, असा उल्लेख सापडतो. त्यांच्यानंतरचे कार्यवाह, सदाशिव काशिनाथ छत्रे, (१७८८–१८३०) यांचे *इसापनीति* हे पुस्तक १८२८ साली प्रसिद्ध झाले. वरील संस्थेचे Bombay Native Education Society असे १८२७-मध्ये नामकरण करण्यात आले. या संस्थेचे प्रमुख कार्य शालोपयोगी पुस्तके प्रसिद्ध करणे हे होते.

१२५. सुरुवातीस एकंदर छापील पुस्तकांबाबत एतद्देशीयांत जो विरोध होता, त्याची झळ संस्थेला लागणे अपरिहार्य होते. त्या काळी लिहिलेल्या पुस्तकांचाच प्रसार होता. ती शुद्ध नसत. याविषयी व्याकरणकार दादोबा पांडुरंग म्हणतात :

" लिहिलेल्या पुस्तकांत दोष फार असतात व अशा सदोष पुस्तकांचाच प्रचार फार चालला आहे, त्यास तो मोडून सर्व भरतखंडांत नाहीं तर नाहीं, परंतु महाराष्ट्र व गुजराथ या देशांत तरी सर्वत्र एक अप्रतिम पुस्तकांचाच प्रचार असावा असें उद्देशून महाराष्ट्र पंडितांहीं इतर हिंदुलोकांचा छापलेल्या पुस्तकाविषयीं कांहीं अमंगल पदार्थ छापण्याच्या शाईत पडतो त्या निमित्तानें जो अनादर आहे त्याचा हा त्यांहीं ब्राह्मण होत्साते उदारपणानें त्याग करून या छापलेल्या पुस्तकांची प्रवृत्ति घातली असावी. "६२

१२६. पुस्तक-मंडळीच्या प्रोत्साहनाने प्रारंभकाळी *पंचोपाख्यान* (१८२२), *विदुरनीति* (१८२३), *सिंहासन बत्तिशी* (१८२४), *वेताळ पंचविशी* (१८३०) याशिवाय *बोधकथा* (१८२५), *नीतिकथा* (१८३१), *इसापनीतिकथा* (१८२८), *बाळमित्र* (१८२८) ही पुस्तके प्रसिद्ध झाली. *पंचोपाख्यान* आणि *विदुरनीति* यांची किंमत साहेब लोकांस अनुक्रमे रु. ८ व ६ आणि ' गावचे लोकांस ' फक्त रु. ३ व २ अशी होती. तरी ती फारशी खपली

61. G. D. Vol. 30/655, 1842, p. 132.
६२. *प्रभाकर*, पु. २, १८४२, पान ३७८.

नाहीत. *पंचोपाख्याना*च्या ९४ आणि *विदुरनीती*च्या ६४ प्रती खपल्या. बाकीच्या कलेक्टरां-मार्फत फुकट वाटल्या! अर्थात हा पुस्तक-प्रकाशनाचा व्यवसाय आतबट्ट्याचाच होता; तरीही मुद्रणालयांचा प्रसार ग्रंथमुद्रणासाठी केला पाहिजे असे एल्फिन्स्टनचे मत होते.

> " That the press may, in a long succession of ages, cause the natives to throw off our yoke is possible and even probable, but it will in the first place destroy the superstitions and prejudices of the natives and remove the pressing dangers created by the entire and marked separation between them and their conquerors and this effect is certain while the other is problematical. The establishment of printing presses therefore is highly desirable"[६३]

१२७. शाळा-पुस्तक-मंडळीने शालेय पुस्तकांबाबत विचार करण्यासाठी नेमिलेल्या समितीचे मत होते की " उपयुक्त ज्ञानाचा फैलाव व तद्द्वारा लोकांची नैतिक उन्नति या दोन गोष्टी शालेय पुस्तकें तयार करतांना ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. समितीनें अंकलिपि, व्याकरण, कोश, बोधकथा, नीतिदर्शक वाक्यावळी, व्यावहारिक गणित, इतिहास, भूगोल, खगोल विज्ञान, पदार्थ विज्ञान, इत्यादि विषयांवर पुस्तके लिहून घ्यावी असे सुचविले. "[६४]

सरकारने ही योजना मान्य केलीच, पण छपाई व इतर खर्च सोसण्याचेही मान्य केले (२२ जानेवारी १८२५). सरकारी पाठिंब्याची सोय होताच पुस्तक-मंडळीने ८ एप्रिल १८२५ रोजी पत्रक प्रसिद्ध करून पुस्तके मागविली. त्या वेळी सरकारकडून लेखकांस बक्षिसेही बरी मिळत, असे दिसते. स्वतंत्र आणि भाषांतरित पुस्तकास एक हजार (*बालमित्र*) पासून पाच हजार (*मराठ्यांची बखर*) पर्यंत बक्षिसे मिळत.

१२८. त्या काळी (१८३६-पर्यंत) नवीन शाळा निघाली की 'पुस्तक मंडळी'कडून कलेक्टरमार्फत मोफत पुस्तके मिळत. खाजगी प्रकाशक तुरळक शालेय पुस्तके प्रसिद्ध करू लागले होते, असे दिसते. मुंबई सरकारचा चीफ सेक्रेटरी डब्ल्यू. एन्. वॉर्डन याने स्वतः झीज सोसून *नीतिकथा* (बाळशास्त्री जांभेकर) आणि *नीतिदर्पण* (विष्णुशास्त्री बापट) ही पुस्तके प्रसिद्ध केली. नीतिदर्पणकार विष्णुशास्त्री बापट, हे पुणे पाठशाळेत असिस्टंट पंडित होते. जेम्स फॅरिशने *यात्रेकऱ्यांचा वृत्तांत* आणि *जागृतज्योत* ही पुस्तके स्वतःच्या खर्चाने तयार करून घेतली होती.

कॅप्टन जॉर्ज जर्विस यांचे कार्य : शास्त्रीय विषयांवरील पुस्तके

१२९. A Seminary for the Instruction of Natives in Engineering या संस्थेची स्थापना १८२५-मध्ये झाली. कॅप्टन जॉर्ज जर्विस हा तिचा प्रमुख होता. या संस्थेत शिक्षण घेणारांसाठी गणितविषयक पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली. त्यांची रचना, कॅप्टन

63. G. D. Vol. 63, 1824, pp. 111-112.
64. G. D. Vol. 237, 1831, p. 78.

अनुक्रमणिका

जर्व्हिसच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रीमंडळीने केली होती. ती पुस्तके *पूर्णांक, अपूर्णांक* (१८२५-२६), *कर्तव्य भूमिती, लोगेरिथम* (१८२५), *गणितमार्ग* (१८२६) ही होत. शिवाय *आदिकरण भूमिती, बीजगणित, त्रिकोणमिती, क्षेत्रफळ-घनफळ* ही पुस्तके शिक्षण-माला म्हणून १८२८-मध्ये प्रसिद्ध झाली. इंजिनियरिंग सेमिनरी १८३०-मध्ये पुण्यास हलविण्यात आली; पुढे म्हणजे १८५३-पूर्वी केव्हातरी ती बंद झाली. १८५३-मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकात या संस्थेची यंत्रसामग्री, उपकरणे पुण्याच्या पाठशाळेत धूळ खात पडली होती असा उल्लेख आहे.[६५] अमेरिकन मिशनऱ्यांनी फेअरबँकचे *अंकगणित* तीन भागांत प्रसिद्ध (१८३७) केले. ते नंतर चाळीस वर्षे वापरात होते. *मनोकृत्य गणित* हे मिसेस बॅलंटाइनने लिहिलेले पुस्तक १८४०-पासून चालू झाले. बाळशास्त्री जांभेकरांनी जर्व्हिसच्या कामगिरीची दखल घेतली होती. ते म्हणतात,

> "त्यांणीं (कलकत्ता व मुंबई येथील शिक्षामंडळी) सर्व लोकांस शिकवावयाचें जें मनांत कार्य धरिलें आहे तें साध्य होण्याकरितां जी रीति चालविली आहे ती सर्वांत उत्तम आहे. तीमध्ये दुसरा हा गुण आहे कीं, ज्या पदार्थांचे बोधक शब्द देशभाषांत नाहीत, ते शब्द आल्यानें तिचा योगानें देशाचा भाषा परिपूर्ण होतात, आणि चांगले रूपास येतात. अशी गोष्ट कांहीं काळाने घडेल हे जांणीं जांणीं एथील शिक्षामंडळीचे पूर्वीचे सक्रतारी कप्तान जार्विस साहेब यांणीं दोन वर्षांपूर्वी केलेली लार्ड ब्रहम साहेबांचे विद्योद्देशांचीं मराठी आणि गुजराथी भाषांतरें पाहिलीं असतील, ते नाहीं म्हणणार नाहींत. त्या ग्रंथांत गणित, शिल्प, रसायन, दर्शनानुशासन, आणि सृष्टिविज्ञानाचे दुसरे भाग यांचे विषय आहेत; म्हणून वाचणारास नव्या गोष्टी बहुत समजतात, आणि नवे शब्दांचा परिचय होतो. या शब्दांचा अर्थ त्या ग्रंथाचे शेवटीं कोश केला आहे त्यांत यथास्थित समजण्याजोगा लिहिला आहे. परंतु या जातीचे आणि तसेच उपयोगी ग्रंथ मंडळीचे छापखान्यांत बहुत छापले आहेत, आणि दुसरे तयार होत आहेत, त्यांतला हा एक."[६६]

१३०. शास्त्रीय विषयांवरील ग्रंथनिर्मितीची सुरुवात कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस (१७९४–१८५१) याने केली. त्याचे *विद्येचे उद्देश लाभ आणि संतोष याविषयींचे संवाद* हे भाषांतरित पुस्तक १८२९-मध्ये प्रसिद्ध झाले. ते शास्त्रीमंडळींच्या मदतीने लिहिले होते. त्यावर तेव्हा क्लिष्ट म्हणून टीका झाली होती. त्या पुस्तकातील नमुन्याचे एक वाक्य :

> "ज्या सत्यता जडज्ञानेकरून कळतात...त्या सत्यतांस कर्मनिश्चय वास्तविक आधार आहे तो कर्मनिश्चय प्रत्यक्षानें आणि अनुभवानें कळतो, त्या सत्यता कदापि केवळ तर्कें करूनच सिद्ध होत नाहींत."

या पुस्तकास पुस्तकमंडळीकडून रु. ३,०००चे बक्षिस मिळाले! हरी केशवजींचे (१८०४–१८५८) *सिद्ध पदार्थ विज्ञानशास्त्र विषयक संवाद* १८३३-मध्ये प्रसिद्ध झाले. त्याबद्दल त्यांस रु. २,०००चे बक्षिस मिळाले. त्या पुस्तकाच्या ५०० प्रती काढल्या होत्या.

65. *Affairs of India*, 1853, p. 36, quoted in the *आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती*, पृ. ४४.
६६. जांभेकर, बाळशास्त्री, *दर्पण*, पु. १, कागद ६, मार्च १६, १८३३, पृ. ४५.

किंमत रु. ८ होती. त्यांपैकी तीन वर्षांत फक्त १०९ प्रतीच खपल्या. हरी केशवजींचे *रसायनशास्त्र विषयक संवाद* १८३७ साली निघाले. हेही पुस्तक खपले नाही. त्याची किंमत फार म्हणजे प्रतीस रु. १७-८-० होती. *शिल्पविद्या या विषयाचे निबंध* (१८३५) हे पुस्तक विल्यम हेन्री वेल आणि नारायणशास्त्री जोशी चोळकर यांनी लिहिले होते. त्याच्या फक्त २५० प्रती छापल्या होत्या. अनेक विषयांची ओळख करून देणारे *सारसंग्रह* हे पुस्तक १८३१-मध्ये प्रसिद्ध झाले. या पद्धतीचे ते पहिलेच पुस्तक होय. नंतर माधवराव मोरोजी आणि नाना मोरोजी यांनी लिहिलेले *विद्योपक्रमाचा ग्रंथ* हे पुस्तक १८४८-मध्ये प्रसिद्ध झाले. ही पुस्तके म्हणजे क्रमिक पुस्तकांचे पूर्वज होत.

१३१. जॉर्ज जर्विसच्या शिल्पशाळेप्रमाणेच वैद्यशाळेची (Native Medical School) स्थापना १८२६-मध्ये झाली. त्याचा प्रमुख डॉ. मॅकलेनन याने *औषध कल्पनाविधि* हा ग्रंथ तयार केला (१८२८). त्यानेच *शारीर* हा ग्रंथ १८५२-मध्ये लिहिला. शास्त्रीय विषयांवर तेव्हा निघालेली पुस्तके निबंध वा संवाद स्वरूपात होती. विल्यम हेन्री वेल व नारायण-शास्त्री जोशी यांचा *शिल्पविद्या याविषयीचे वरील निबंध* (१८३५) हरी केशवजी पाठारे यांचे वर उल्लेखिलेले ग्रंथ या प्रकारात मोडतात. इतर विषयांप्रमाणे शास्त्रीय विषयावर अमेरिकन मिशनने पुस्तके प्रकाशित केली. रे. ॲबटचे *पदार्थविज्ञान* (१८४६) हे यांपैकी एक.

व्याकरण आणि कोश

१३२. इ. स. १८२६-पर्यंत मराठीमध्ये कॅरेच्या व्याकरणाशिवाय अन्य पुस्तक नव्हते. १८२६-मध्ये व्याकरणाची तीन पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यांचे लेखक होते बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके आणि दादोबा पांडुरंग. *पंडित मंडळींचा कोश* १८२९-मध्ये प्रसिद्ध झाला. त्याच्या रचनेत जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके, बाळशास्त्री घगवे आणि रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांनी भाग घेतला होता. कँडीचा *इंग्रजी मराठी कोश* त्यांनी (१८४० ते १८४७ अशी) सात वर्षे मेहनत करून पुरा केला. कँडीच्या कोशाची सुधारित आवृत्ती १८७३-मध्ये निघाली. या बृहत्कोशाशिवाय बाबा पदमनजी आणि श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर यांचेही कोश प्रसिद्ध झाले होते. कँडीच्या क्रमिक पुस्तकातील कठीण शब्दांचा *रत्नकोश* बाळकृष्ण मल्हार वीरकर यांनी तयार केला (१८६९). कवितांतील कठीण शब्दांचा *हंसकोश* रघुनाथ भास्कर गोडबोले यांनी १८६३-मध्ये प्रसिद्ध केला होता.

भूगोल आणि खगोल विषयक पुस्तके

१३३. हरी केशवजींनी *इंग्लंडचा वृत्तांत* (१८३८) आणि *इंग्लंड देशाची बखर* (१८३२) हे ग्रंथ रचिले. ग्रॅन्ट डफच्या पुस्तकाचे भाषांतर कॅप्टन केविन आणि बाबा साने यांनी केले. ते १८२९-मध्ये शिळाप्रेसवर छापले. नाना नारायण यांनी मिस बर्ड यांच्या इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर *इंग्लंड देशाचे वर्णन* (१८३५) प्रसिद्ध केले.

भूगोलाच्या अभ्यासास आपल्याकडे फार उशिरा सुरुवात झाली. जुन्या पद्धतीने चालणाऱ्या अध्यापनात भूगोलाचा समावेश नव्हता. महाराष्ट्रात नाना फडणविसाने सवाई माधवरावांस भूगोलशिक्षण देण्यासाठी प्रथम डॉक्टर फिंडले यांची योजना केली. तेव्हा या विषयावर हस्तलिखित पुस्तकेसुद्धा नव्हती. अमेरिकन मिशनतर्फे भूगोलाचे पहिले पुस्तक *खगोल भूगोल इत्यादिक* हे १८२४-मध्ये प्रसिद्ध झाले. ते गॉर्डन हील याने लिहिले होते. भूगोलाचे पहिले पुस्तक, 'पुस्तक मंडळीचे' *भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद* हे १८३२-मध्ये प्रसिद्ध झाले. ते मि. मेनवेअरिंग आणि रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांनी तयार केले होते. बाळशास्त्री जांभेकरांचे *भूगोलविद्या* १८३६-साली प्रसिद्ध झाले. त्याची दुसरी आवृत्ती १८४९-मध्ये निघाली. *भूगोल शास्त्र गणित* १८३६-साली प्रसिद्ध झाले. दादोबा पांडुरंग आणि नाना नारायण यांनी त्याच वेळी आपले एक *मराठी नकाशाचे पुस्तक* प्रसिद्ध केले होते (१८३६).

१३४. त्या काळी भूगोलाविषयी कसे अज्ञान होते, ते खालील मजकुरावरून कळेल :

> "It is a lamentable fact to notice that a considerable number may still be found among them who cannot yet bring their consciences - believe that the earth is not placed on one of the heads of the great serpent, and that there might not be discovered, in some parts of it which have not yet been explored by European navigators, oceans of milk and curd. But, in spite of all these drawbacks, I have strong reason to believe that the knowledge is surely making its way, though slowly, but steadily." ६८

१३५. भूगोलाच्या शिक्षणाविषयी हिंदुस्थानात अनास्था होती असे नव्हे, तर इतर धर्मीयांच्याही धर्मग्रंथांत नमूद असलेल्या विज्ञानाविरुद्ध मजकूर शालेय पुस्तकांत आला, तर त्यांना विरोध होई. त्या वेळच्या मुंबई प्रान्तात सामील असलेल्या कराची शहरातील खालील घटना पहा :

> "कराचीला इ. स. १८५४–मध्यें तेथील नॉर्मल क्लासच्या विद्यार्थ्यांनीं भूगोल विषय शिकविण्यास हरकत घेतली. त्यासाठीं त्यांनीं शिक्षामंडळीकडे अर्ज केला कीं, पृथ्वी वाटोळी आहे, ती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते, इत्यादि विधानें कुराणांतील विचारांशीं जुळणारीं नाहींत, म्हणून या विषयाचा अभ्यास होत असतांना वापरल्या जाणाऱ्या शालेय पुस्तकांतील हीं विधानें काढून टाकावीं." ६९

इंग्लंड देशाची बखर रॉबर्ट मनी आणि बाळशास्त्री जांभेकर यांनी लिहिली, ती दोन भागांत (१८३२ व ३४) प्रसिद्ध झाली. या बखरीतील इंग्रजी शब्दांबाबत असे सांगितले आहे की 'मोठ्या अक्षरांनीं लिहिले आहेत, ते इंग्रेजी आहेत असे समजावे.' इंग्रजी

68. Report of the Board of Education, 1851, p. 23.
69. D. P. I. Government 1854, p. 572.

शब्दांचा अर्थ बहुधा पृष्ठांचे खालचे बाजूस खुणा करून बारीक अक्षराने लिहिला आहे. या बखरीची तिसरी आवृत्ती १८५७-मध्ये निघाली.

शालेय अभ्यासक्रमाचे तत्कालीन स्वरूप

१३६. वरील सर्व पुस्तके इंग्रजी पुस्तकांवरून तयार केली आहेत. तीच पद्धती पुढे चालवावी, असा बऱ्याच चर्चेनंतर निर्णय झाला, आणि १८४७-मध्ये मेजर कँडीची मराठी भाषांतरप्रमुख म्हणून नेमणूक झाली. तत्पूर्वी १८३७-पासून ते दक्षिणेतील शाळांचे तपासनीस म्हणून काम पाहात. त्या वेळी शाळांमधून अक्षरओळख झाल्यावर *नीतिकथा*, *बोधवचने*, *बालोपदेश* इत्यादी पुस्तके वाचून घेण्यात येत. *इसापनीति*, *बाळमित्र*, *इंग्लंडचा वृत्तांत*, *मराठ्यांची बखर* ही पुस्तके नंतर शिकवीत. व्याकरण आवश्यक असे. भूगोलाच्या अभ्यासास मेजर कँडींनी सुरुवात करून दिली. १८४१-मध्ये बोर्ड ऑफ एज्युकेशनने शालेय पुस्तक-समिती नेमिली होती. त्या समितीच्या अहवालावर निर्णय करण्याऐवजी १८४७-मध्ये सरकारने पाठ्यपुस्तकाचा विचार मेजर कँडी यांजवर सोपविला. मेजर कँडीबद्दल बोर्ड ऑफ एज्युकेशनचा चेअरमन आस्किन पेरी म्हणतो :

> " Major Candy is one of the best Maharatta scholars in this presidency; he writes it (Marathi) with great purity and all his energies are devoted to the task of diffusing the useful information of Europe through the tongue which he has studied so diligently. " ७०

इ. स. १८४७-पर्यंत प्रचारात असलेली शालेय पुस्तके काही विशिष्ट शिक्षणक्रम पुढे ठेवून तयार केलेली नव्हती. ही गोष्ट कँडीनी ध्यानी घेऊन ती प्रचारातून काढून घेण्याचा निर्णय केला आणि शालेय पुस्तकप्रकाशनातील कँडी-युग सुरू झाले.

शालेय पुस्तकांतील मेजर कँडीयुग

१३७. मेजर कँडीने १८५०-मध्ये *वाचनपाठमाला* या पाठ्यपुस्तकाची रचना केली, आणि अनेक भाषांतरकार नेमून इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे करण्याचे काम सुरू केले. या भाषांतरकारांत कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यासारखे, मराठी लिहिण्याबद्दल पुढे गाजलेले, लेखक होते. मराठी भाषेतील पहिले पाठ्यपुस्क *वाचनपाठमाला* Series of Lessons of Third Reading Book या इंग्रजी पुस्तकावरून भाषांतर केले होते. प्रस्तावनेत कँडी म्हणतात :

> " इंग्रजीमध्यें सिरीइज आफ् लेसन्स्, आणि थर्ड रीडिंग बूक ह्या नांवांची दोन पुस्तकें मकलक नांवें साहेब ह्यांनीं केलेलीं आहेत, त्यांतील बहुतेक गोष्टींचीं भाषांतरें ह्या पुस्तकांत आहेत... ह्या पुस्तकांत ६६ गोष्टी आहेत, त्यांपैकी कितीएक नीतीच्या आहेत, कितीएक विद्या-कला-कौशल्य ह्यांच्या आहेत, कितीएक देशरीति लोकरीति वगैरे विषयांच्या माहितगारांच्या आहेत,

70. Report of the Board of Education, 1847, p. 178

OF VERBS.

Sing.

Fem.

1. मीं होत् होते, *I was existing.*

2. तूं होत् होतीस्, *thou wast existing.*

3. ती होत् होती, *she was existing:*

Neut. ते होत् होत, *it was existing.*

Plur.

1. आम्ही होत् होतों, *we were existing.*

2. तुम्ही हात् हातेत्, *ye were existing.*

3. ते हात् होतेत्, Fem. त्या होत् होत्यात्.

Neut. ती होत् होतीत्, *they were existing.*

PERFECT TENSE.

Sing.

Masc.

1. मीं झालों आहें, *I have been.*

2. तूं झाला आहेस्, *thou hast been.*

3. तो झाला आहे, *he hath been.*

आकृती ५० : A Grammar of the Mahartta Language Serampore 1805

श्री

विदुरनीति

प्रारंभ

कोणे एके समयीं संजय धृतराष्ट्राजवळ
येवून कौरवांची निंदा करून बोलिला कीं मी उ
द्यां राजसभेस येउन चार भीष्म द्रोणादिक शि
ष्ट बसले असतील तेथें पांडव यांचा निरोप सांग
णार आहें मग काय घडेल तें घडो ऐसें वचन
बोलोन तो आपले घरीं गेलाअसतां परम शा
हाणा धार्मिक निस्पृह ज्याचे बोलण्याने आईक
णाराचें समाधानच व्हावें असाजो विदुर त्यास
बोलाउन आणून राजानें तें सर्व वर्तमान सांगी
तलें आणि बोलला हे विदुरा संजय उद्यां येउन
सभेमध्यें पांडवांकडिल निरोप बोलणार आहे तें
भाषण आमचे निंदेचेंच करील यांत संशय नाहीं
व त्यापासोन काय अनर्थ होईल तो कळत नाहीं

यास्तव

आकृती ५१ : विदुरनीति, कुरिअर प्रेस, मुंबई १८२३

व कित्येक सदाचरणाच्या आहेत...तीन गोष्टी कृष्णशास्त्री चिपळोणकर पाठशाळेंतील एक विद्यार्थी ह्याने इंग्रजी पुस्तकांतील विषय मनात आणून इकडील रीतीप्रमाणे रचिल्या. हीं भाषांतरें करतांना परशुरामपंत गोडबोले ह्यांचे साहाय्य उत्तम रीतीचें मिळालें. हे भाषांतर कर्ता संतोषाने लिहितो."

पुणे पाठशाळेमध्ये कँडी भाषांतरवर्ग चालवीत. मेजर कँडी मराठी भाषेच्या शुद्धते-विषयी जागरूक असत; त्यांचे परीक्षणलेख मार्मिक आणि समर्पक असत. हे परीक्षणलेख वाचून विनायक कोंडदेव ओक यांनी आपली शैली बनविली होती. ते म्हणतात :

"मी प्रांजलपणें आणि मोठ्या कृतज्ञता भावनें कबूल करितों कीं, मला मराठी लिहिण्यास मेजर कँडी साहेबांनीं शिकविलें. चांगल्या गुरूने आपल्या आवडत्या विद्यार्थ्यास जसे आस्थेनें शिकवावें, त्याचा हात घेऊन त्याला सुमार्गास लावावे, त्याप्रमाणे मेजर कँडी साहेबांनीं मला मराठी लिहण्याच्या मार्गास लावले." [७१]

पहिली क्रमिक पुस्तकमाला

१३८. इ. स. १८५५-मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' रद्द होऊन शिक्षणविषयक अधिकार डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्या हातात गेले. इ. आय. हॉवर्ड हे पहिले डायरेक्टर होते. त्यांच्या देखरेखीखाली मेजर कँडी यांची *क्रमिक पुस्तक वाचनमाला* १८५७ ते १८६१ या काळात तयार झाली. १८६८ साली या पुस्तकांची काही नवीन धडे घालून सुधारित आवृत्ती प्रसिद्ध झाली.

दक्षिणा प्राइज कमिटी आणि इतर ग्रंथप्रसारक संस्था

१३९. इ. स. १८५१-मध्ये 'दक्षिणा प्रैझ कमिटी' स्थापन झाली. तिच्यामार्फत उत्तमोत्तम पुस्तकांना बक्षिसे देण्यास सुरुवात झाली.

'दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी' किंवा 'तर्जुमा संबंधीं कमिटी' १८४९-मध्ये मुंबईस स्थापन झाली. ती बव्हंशी खाजगी प्रयत्नांनीच निघाली होती. तरी त्यात सरकारातील अनेक व्यक्तींचा संबंध होता. १८६३-पर्यंत समितीने आठ-दहा ग्रंथ प्रसिद्ध केले होते. त्यांत *गुजराथचा इतिहास* (१८५०), *नाना फडणविसाची बखर* (१८५२), *देशव्यवहार व्यवस्था* (१८५४), *शास्त्रीय ज्ञानदर्शन* (१८५६) ही पुस्तके होती. या कमिटीप्रमाणेच 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभे'ची स्थापना १८४८-मध्ये झाली. ती 'स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी'ची शाखा होती. या सोसायटीतर्फे मुलींच्या शाळा चालविल्या जात. त्यांसाठी 'ज्ञानबोधक' मराठी क्रमिक पुस्तके तयार केली. या योजनेत शिक्षणासाठीही एका पुस्तकाची योजना होती.

इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतराविषयी विचार

१४०. महाराष्ट्र-शासनातर्फे प्रसिद्ध झालेल्या भूगोलाच्या इंग्रजी पुस्तकांबद्दल काही

७१. *विविध-ज्ञान-विस्तार*, पु. ३६, सन १९०५, पृ. ४३

श्री

मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तकमंडळी-

ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणा
रांस बक्षिसा विषयींचें-

प्रसिध्धि पत्र

१ हीमंडळी सर्वांस विदित करित्ये कीं जो
कोणी बाळबोधग्रंथ अथवा प्रौढग्रंथ यांचीं म
राठी किंवा गुजराथी बोलीत चांगली भाषांत
रें करून आणील अथवा या दोहोंभाषांत मा
न्यपडे असा आपल्ये कल्पनेनें नवीन ग्रंथ र
चील किंवा पुढें सांगीतले प्रकाराचे ग्रंथ हिंदु
स्थानी भाषेंत करील त्यास बक्षीस देण्या विष
यीं गवरनर कौंशल यांही उदार होउन या मं
डळीस समर्थ केलें आहे-

आकृती ५२ : हैंदशाळा पुस्तक मंडळीचे प्रसिद्धिपत्र

वर्षांपूर्वी फार टीका झाली होती. त्या वेळी हास्यास्पद भाषांतराचे अनेक नमुने दाखविण्यात आले. या संदर्भात क्रमिक पुस्तकांच्या भाषांतराबाबत गेल्या शतकात काय विचार मांडला गेला होता, ते पाहणे येथे उपयुक्त ठरेल.

> " Translations from English into Marathi if literal are almost certain to be rejected. The idiom of Marathi is so exceedingly unlike that of English that adaptations are far more desirable than mere translations. " ७२

मेजर कँडीची पुस्तक शुद्धी

१४१. भाषांतर तपासण्याच्या कामावरील अधिकारी, मेजर कँडी, हे मराठी भाषेच्या शुद्धतेबद्दल, त्याचप्रमाणे शुद्धलेखनाबद्दल बरेच जागरूक होते. एका इंग्रज अधिकाऱ्याने एतद्देशीयांस मराठी भाषेच्या बाबतीत धडे द्यावे, ही गोष्ट कित्येकांस आवडणारी नव्हती, हे साहजिकच आहे. परंतु मेजर कँडीच्या शिफारशीशिवाय सरकारमान्यता मिळणे कठीण असल्यामुळे त्यांच्या अधिकारापुढे नमते घ्यावे लागे. त्यांच्या सूचनाही मोठ्या मार्मिक असत. परशुरामपंत तात्यांच्या **मृच्छकटिक** नाटकावरील अभिप्रायात त्यांनी लिहिले आहे.

> " परस्त्रीकडे पाहणे योग्य नाहीं. Would be better than परस्त्रीचें दर्शन घेणें योग्य नाहीं. " ७३

कँडींनी अवलंबिलेली लेखनपद्धती मुंबईकर विद्वानांस मान्य नव्हती, असे त्यांच्या तत्सम सूचनांवरून दिसते. बाळाजी पांडुरंग म्हणतात :

> " That it has mischievous cannot be doubted from the murmur that is unanimously raised by all respectable usage, but it is opposed to that principle of grammar which discards the use of words which are hard of utterance and harsh to the ear. " ७४

१४२. कँडीच्या कारकीर्दीनंतर '*विद्योपक्रमाचा ग्रंथ*' (१८४२) हे पुस्तक तपासणीसाठी रे. स्टीव्हन्सन यांजकडे देण्यात आले. त्याविषयी तत्कालीन मासिकातील उतारा उद्बोधक आहे.

> " या विचाऱ्यानें (रे. स्टीव्हनसन्) मात्र आपलें खरें स्वरूप बाहेर दाखविलें व असें कबूल केलें कीं ज्याची जन्मभाषा त्यानेंच शुद्ध करावी. परंतु हे विचार आमचे प्रख्यात क्यांडीसाहेब यांस कसे वाटले असतील ते असोत; ते तर धडकून मोठमोठ्या विद्वानांचीं पुस्तकें शुद्ध करीत आहेत. स्टीव्हनसन् साहेबाप्रमाणें यांपाशींही मराठी शास्त्री आहेत, परंतु जेव्हां हे एखाद्या मोठ्या विद्वानाचें पुस्तक शुद्ध करण्याचें हातीं धरतात, तेव्हां स्टीव्हनसन् साहेबाप्रमाणें आपलें खरें स्वरूप दाखविणें ही मात्र त्यांना मोठी अपमानाची गोष्ट असें वाटत असावें ! सरकारच्या

72. D.P.I. Government, Vol. 6, 1856, p. 257.
73. D.P.I. Book Depot, Vol. 18, 1861–62, p. 204.
74. D.P.I. Miscellaneous, Vol. 20, 1857, p. 157.

अनुक्रमणिका

पाठ १

मुलांसउपदेश.

मुलांनो, तुह्मी आपल्या आईबापांची प्रीति बाळगा. तुमचे आईबापांच्या इतकी दया तुह्मांवर कोण करितात? तुह्मांला शिकविण्याविषयीं इतके श्रम कोण घेतात? अन्न, आणि वस्त्र, आणि रात्रीं निजावयाकरितां उबेचें अंथरूण, ह्यांची पुरवणी तुमच्यासाठीं कोण करितात? तुह्मी दुखणेकरी असतां, आणि तुह्मांला वेदना होती, तेह्मां तुमची दया कोण करितात? आणि ममतेनें तुमची चाकरी कोण करितात? आणि तुह्मांला औषधपाणी कोण देतात? आणि देवानें तुह्मांला आरोग्य, आणि शक्ति, आणि हरएक चांगली वस्तू द्यावी ह्मणून त्याची प्रार्थना कोण करितात?

तुमचीं आईबापें दुखण्यांत असलीं, किंवा संकटांत असलीं, तर त्यांचें समाधान करण्यास तुमच्यानें होईल तितकें तुह्मीं करावें. तीं गरीब असलीं, तर त्यांची मदत तुह्मांस करतां यावी ह्मणून तुह्मी अधिक कष्ट करा.

आकृती ५३ : वाचन पाठमाला, सुधाकर छापखाना, पुणे, १८५०

वजनावर कसेंही चालो, परंतु विद्वानांची समजूत तर अशी आहे कीं, एकाद्या भाषेचें कोणीही परक्या गृहस्थानें एकादें पुस्तक लिहिलें, तर ती ज्याची जन्मभाषा, अशा एखाद्या विद्वानानें तें शुद्ध करावें तेव्हांच भाषेच्या दृष्टीनें त्यास तितका मोठेपणा येतो. असेंच दुसऱ्याची मदत घेऊन एखादें कृत्य केलें, आणि त्याची खरी मदत जर कबूल केली नाहीं, तर ज्यांना पक्की माहिती नसते, ते कदाचित् फसून सर्व मान एकालाच देतात. तथापि जे आतल्या खुब्या जाणतात, ते तर अशा कृत्याची चेष्टा करितात, आणि त्या कृत्याबद्दल अर्धा किंबहुना सर्वही मान त्या मदतनीसासच देतात, आणि त्यांतील दोषांना मात्र तो प्रख्यात मनुष्य मालक होतो; कारण त्या कृत्यांतील गुण त्याच्या अंगचे असण्यापेक्षां दोषच त्याच्या अंगचे असण्याचा संभव विशेष आहे. " ७५

शालेय पुस्तकांच्या प्रती, खप आणि लेखकाचा मोबदला

१४३. सुरुवातीच्या काळात मराठी पुस्तकास मागणी फार कमी होती. व्याकरणाची गोष्ट घेतली, तर शाळांतून लावलेल्या जांभेकरांच्या *बालव्याकरणाच्या* १५,००० प्रतीही निघत. परंतु दादोबांच्या *व्याकरणाच्या* ७०० प्रतीच्या प्रथम आवृत्तीपैकी फक्त २५० खपल्या, आणि बाकीच्या 'शाळा पुस्तक मंडळी'ने दादोबांच्या खास विनंतीवरून रुपये अडीच-ऐवजी प्रत्येकी दीड रुपयाप्रमाणे विकत घेतल्या. दुसरी सुधारित आवृत्ती १८५०-मध्ये निघाली, आणि पुढे १८७९-पर्यंत सात आवृत्त्या निघाल्या. इतकी लोकप्रियता त्या पुस्तकाला लाभली, तेव्हा कुठे सरकारने या ग्रंथाचे मालकी हक्क घेण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारमान्य सुधारणा करण्यास दादोबांचा नकार आणि रु. १०,००० मोबदल्याचा आग्रह, यामुळे तो सफल झाला नाही. दादोबांचे *लघुव्याकरण* १८६५-मध्ये प्रसिद्ध झाले. १८८२-पर्यंत त्याच्या बारा आवृत्त्या निघाल्या होत्या.


१४४. दादोबा पांडुरंगाच्या *व्याकरणाचे* मालकी हक्क रु. १०,००० या रकमेस महाग आहेत, असे म्हणणाऱ्या सरकारने केनडी यांच्या '*मराठी इंग्रजी आणि इंग्रजी मराठी कोशास*' (१८२४) रु. १५,००० चे बक्षिस दिले. *मोल्सवर्थ कोशाच्या* (१८३१) १००० प्रती काढल्या होत्या तेव्हा दर प्रतीची किंमत रु. ९० होती. परंतु प्रती खपेनात म्हणून किंमत कमी करीत वीस रुपयांपर्यंत खाली आणली. पहिल्या आवृत्तीच्या वेळी कोश तयार करण्याचा खर्च म्हणून रु. १०,००० आणि वर रु. ५,००० बक्षीस देण्यात आले. सुधारित आवृत्ती तयार करण्यासाठी मोल्सवर्थला इंग्लंडहून बोलावून घेण्यात आले. इ. स. १८५१ ते १८५७ या सहा वर्षांत त्याने ही कामगिरी पुरी केली. त्याला आणि त्याच्या मदतनिसांना रु. ४९,००० खर्चासाठी दिले. १८५४ साली प्रसिद्ध झालेले *नवनीत* हे शालोपयोगी पुस्तक होते. भाषाभ्यासासाठी त्याची मुद्दाम निवड झाली होती. त्याच्या सतरा आवृत्त्या निघाल्या. परंतु संपादक परशुरामपंत गोडबोले (१८००-१८७४) यांना फक्त दीडशे रुपये मिळाले.

७५. श्री. *दंभहारक*, पु. १, अंक. ४–१८७२, पृ. ६९–७०.

१९. इष्टस्थलींच भूपृष्ठाला स्पर्श करून दृश्य अंडकटाहाला छेदणारी जी सरळ पातळी तिला इष्टस्थलाचें **दृश्यक्षितिज** ह्मणतात. (दृ क्ष, आ० २.)

दृश्य क्षितिजाशीं समांतर अशी भूमध्यांतून जाणारी जी सरळपातळी तिला, व ती चौफेर वाढविली असतां खगोलाला दुभागणारें, जें वृत्त होतें त्याला, इष्टस्थलाचें **वास्तव क्षितिज** म्हणतात. (**वा क्षि** आ० २.)

(वास्तव क्षितिज हें महावृत्त असल्यामुळें विषुवाला दुभागतें, पण दृश्य क्षितिज हें लघुवृत्त असल्यामुळें विपुवाला दुभागीत नाहीं (पुस्तकारंभींची आकृति पहा). तथापि विपुवांतून भ्रमणाऱ्या ताऱ्यांचे उदयास्तकाल पाहून ते वक्रीभवनाच्या संस्कारानें खरे केले (क० ५७) तर क्षितिजावरील मार्ग चालण्याच्या कालापेक्षां त्याखालचा मार्ग चालण्याचा काल अधिक येत नाहीं. ह्यावरून ताऱ्यांच्या संबंधांत दृश्य क्षितिज हें वास्तव क्षितिजाशीं मिळून जातें असें म्हणावें लागतें. परंतु चंद्र पृथ्वीला फार जवळ आहे, ह्यामुळें तो क्षितिजाचेवर जितका वेळ फिरतो त्यापेक्षां क्षितिजाचे खालीं अधिक वेळ फिरतो असें आढळतें, ह्मणून दृश्य क्षितिज वेगळें कल्पावें लागतें.)



आकृति २—भूगोल, दृश्य व वास्तव क्षितिज, इ०.

सामान्य व्यवहारांत दृश्य क्षितिजच विचारांत घेतात.

पाहणारानें स्थलांतर केलें कीं, त्याचेबरोबर त्याच्या क्षितिजाचेंही स्थलांतर होतें. पाहणाराचा डोळा भूपृष्ठापासून वर उचलला, ह्मणजे त्याच्या क्षितिजाला डोळ्याच्या उंचीच्या प्रमाणाचा टप्पा येतो (आकृति २० पहा).

(भूपृष्ठापासून वर उचललेले डोळ्यांत सभोंवारच्या दूरदूरच्या पदार्थांपासून जे किरण येतात, त्यांच्या रेषा वर्तुलाकार शंकूच्या पृष्ठाप्रमाणें डोळ्याभोंवतालच्या वर्तुलांत भूपृष्टाला स्पर्श करितात [आंतलें वर्तुळ पहा]. एथें डोळ्यापासून स्पर्शवर्तुलापावेतों जें अंतर त्याला **दृष्टीचा टप्पा** म्हणतात. पहाणाराचा डोळा अधिक उंचीवर गेला, तर दृष्टीचा टप्पा वाढून हें स्पर्शवर्तुल अधिक मोठें होतें (बाहेरचें वर्तुल पहा).

पाहणाराचा डोळा भूपृष्ठापासून किती उंचीवर आहे हें माहीत असलें, तर त्याच्या दृष्टीचा टप्पा पुढील नियमानें शोधितां येतो.

नियम—भूपृष्ठापासून डोळ्याची लंबरूप उंची फुटांत मोजून तिची

2

आकृती ५४ : सूर्यमाला, एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, मुंबई, १८८९

अनुक्रमणिका

क्रमिक पुस्तकांतील मराठी शिक्षण

१४५. क्रमिक पुस्तकांपैकी पहिले पुस्तक कँडीच्या अनुपस्थितीत भास्कर दामोदर पाळंदे यांनी लिहिले होते. त्यावर दादोबा पांडुरंग, गोविंद नारायण आणि बाळाजी पांडुरंग यांनी टीका केली आहे. खुद्द मेजर कँडींना त्यांपैकी बऱ्याच सूचना मान्य नसल्या तरी त्यांनी अनेक वाक्यांवर आक्षेप घेतले आहेत. त्यांपैकी काही वाक्ये—

"तो (पोषाख) तुला जन्मभर नेसावा लागेल."

"मनुष्य हा एक सवयींचा जुडगा आहे."

"त्यांत सत्य पुष्कळ आहे."

"जरी कर्ज फेडण्याविषयीं नियामक असणें यांत मोठा सद्‌गुण नाहीं, तरी हेंही कित्येकांत नसतें."

"एका ग्रंथांत म्यां एक प्राकृत दृष्टांत पाहिला, तो जरी रूपानें दीन दिसतो तरी चातुर्यानें मोठा आहे."

कँडींनी "मिस्तर ब्रुअर म्हणून एका सद्धर्मोपदेशकाविषयीं" या रचनेऐवजी "मिस्तर ब्रुअर म्हणून एक धर्मोपदेशक होता त्याजविषयीं" असा प्रयोग सुचविला आहे. तिसऱ्या पुस्तकातील "तो त्या पापापासून मागे सरला" या इंग्रजी पद्धतीच्या वाक्याऐवजी "त्यास ते पाप करण्यास धीर झाला नाही" असा पर्याय सुचविण्यात आला होता. क्रमिक पुस्तकांपैकी पहिल्या दोन पुस्तकांवर भास्कर दामोदर पाळंदे यांचे नाव असले, तरी ती धरून सर्व सहा पुस्तके कँडीच्या पद्धतीनेच तयार झालेली होती.

क्रमिक पुस्तकांच्या लेखनात अवलंबिलेली पद्धती

क्रमिक पुस्तकांच्या लेखनपद्धतीविषयी विनायक कोंडदेव ओक लिहितात :

"ह्या कामाचीं सगळीं सूत्रें मेझर क्यांडी साहेबांनीं आपल्या हातीं ठेविलीं होतीं. इंग्रजी भाषेंतील अनेक प्रकारचीं क्रमिक पुस्तकें जमविलीं होतीं. त्यांतल्या धड्यांची निवड क्यांडी साहेबांनीं करावयाची. त्यांचीं मराठी भाषांतरें मंडळीनें करावयाचीं. तीं सारींत त्यांनीं तपासावयाचीं. त्यांतल्या भाषापद्धतीविषयीं आणि परिज्ञानाविषयी शंकासमाधानें व्हावयाचीं आणि मग तीं छापावयाचीं, असा क्रम असे... त्या मंडळींच्या सांगण्यांत येत असे कीं, हीं मराठी क्रमिक पुस्तकें इंग्रजींतल्या क्रमिक पुस्तकांच्या नमुन्यावर तयार व्हावीं, अशी त्या साहेबांची फार इच्छा असे. त्यांनीं कधीं एकही वाक्य चालढकलीवर नेलें नाहीं. शब्दशुद्धीवर आणि अर्थस्पष्टतेवर त्यांचा फार कटाक्ष असे."[७६]

क्रमिक पुस्तकांवरील टीका

१४६. चाळीस वर्षांत क्रमिक पुस्तकांच्या पंधरा ते वीस आवृत्त्या निघाल्या. बऱ्याच परिश्रमाने आणि काळजीपूर्वक तयार केलेल्या या पुस्तकांविषयी सर्वत्र समाधान नव्हते.

७६. बालबोध, पु. ३०, १९११, पृ. २४४

अनुक्रमणिका

८२

येत नाहीं त्याला आपलें पागोटें दुसऱ्याकडून आर्जवानें किंवा पैसे देऊन बांधवून घेणें भाग पडतें. पैसे घेऊन पागोटें बांधून द्यावें असा धंदा करणाऱ्या मनुष्यास पगडबंद म्हणतात. पागोटें डोकीवर किंवा गुडम्यावर बांधितात. गुजराथी लोक लाकडाच्या ठोकळ्यावर पागोटीं बांधितात.

हिंदु लोकांत वस्त्रांमध्यें पागोटें हें पुरुषास मुख्य मानिलें आहे. एकाद्यास कोणीं पागोटें दिलें असतां त्याचा त्यानें मोठा सन्मान केला असें समजतात.

धडा ३९.

साखर.



साखर ही उंसांपासून करितात. साखरेची रुचि गोड आहे.

आकृती ५५ : मराठी तिसरें पुस्तक, मेजर टी. क्यांडी मर्झबान आणि कंपनीचा स्टीम प्रिन्टिंग वर्क्स

तिसऱ्या पुस्तकात ' साखर ' या धड्यात " वसई, राजापूर, पट्टण इत्यादि ठिकाणी साखर करितात, पण ती फार चांगली नसते " हे विधान चुकीचे होते. ही गोष्ट तीस वर्षांनी (१८८३) दाखविण्यात आली. एकंदरीत ही पुस्तके प्रत्यक्ष परिस्थितीपासून दूर होती, अशी श्री. कुंटे यांची टीका आहे. ते म्हणतात :

" The readers, boys of 9 or 10 years of age should be able to see and verify what they read, so that they may not get into the habit of reading and merely remembering. I have carefully looked into the book from this point of view and I find, I have not been satisfied. What is taught is not seen in town and large villages in Maharashtra.. " ७७

वामन शिवराम आपटे म्हणतात :

" It is no use revising a book now and another six months hence, making some additions and improvements that may then suggest themselves to the reviser. First settle what subjects each book of the series must include, and then distribute them over the five or six serial books so that they may all form parts of one well defined whole. "

१४७. सहाव्या क्रमिक पुस्तकामध्ये शास्त्रीय विषय अंतर्भूत होते, त्यामुळे ते मुलांच्या आवाक्याबाहेर आहे असा अभिप्राय पडला. त्याचे लेखनही घेडगुजरी झाले होते असे दिसते. यावर **इंदुप्रकाश**कार म्हणतात :

" त्यांत शास्त्रीय विषयाचे जे धडे आहेत त्यांतल्या कितीएकांकडे पाहिलें म्हणजे असें मनांत येतें कीं साहेबाच्या टोपीचें पागोटें बनविण्याकरितां तिजवर पुष्कळ बुक्या माराव्या आणि त्याच्या योगानें धड टोपी ना धड पागोटें असें तिचें कांहीं निश्चित स्वरूप व्हावें. तशी अवस्था त्या शास्त्रीय विषयांची झाली आहे. " ७८

पाठ्यपुस्तक समिती आणि कार्य

१४८. पाठ्यपुस्तकांसाठी समिती नेमण्याची कल्पना सव्वाशे वर्षांइतकी जुनी आहे. परंतु त्या काळातही ती पद्धती सर्वांनाच पसंत होती असे नव्हे. याबाबत मि. कर्कहॅम म्हणतात :

" I would myself strongly deprecate revision by any committee. A Text book must be the work of one person and no mortal text book will please every one. The attempts to produce text books in England by joint authorship have failed. " ७९

आज ज्याप्रमाणे पाठ्यपुस्तकांच्या लेखनासाठी शासन समित्या नेमते, त्याप्रमाणे सुरुवातीच्या काळातही त्या नेमल्या जात. त्यांत बड्या बड्या मंडळींचा समावेश असे. परंतु

77. D.P.I. Govt. Vol. 29, 1887.
७८. *इंदुप्रकाश*, पृ.:२५, अ. २७, १८८६
79. D.P.I. Govt. Vol. 38, 1888.

२१

धडा तेविसावा.

वानर.



हय चय वह दव पर लय मह

ह्य च्य व्ह द्व प्र ळ्य ह्म

हा वानर पाहा. ह्याच्या आंगावर केस आहेत. ह्याचे हात आमच्या हातांसारखे आहेत. हा केव्हां केव्हां आमच्यासारखा उभा राहतो. ह्याचें तोंड देखील आमच्या तोंडासारखें आहे. पण ह्याला हातांनीं काम करितां येत नाहीं; आणि तोंडानें बोलतां येत नाहीं.

आकृती ५६ : बालबोध पहिले पुस्तक, विनायक कोंडदेव ओक, निर्णयसागर वाचन ग्रंथमाला, निर्णयसागर प्रेस, मुंबई, आवृत्ती पांचवी, १८९८

प्रत्यक्ष काम त्यांपैकी एखादाच सभासद करी असे दिसते. अशाच एका समतीचे सदस्य रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक आपल्या रोजनिशीत लिहितात :

> "क्लासबुक कमिटीची सभा डायरेक्टरांच्या बंगल्यावर भरली होती. डॉक्टर बुइलसन, डॉक्टर हार्कनेस, मि. ग्लॅमी हावर्ड, रा. गोविंद नारायणजी, रा. भास्कर दामोदर व मी हजर होतो. पोकळ गप्पांचा सुकाळ होता. शहाण्णव मते प्रतिपादनार्थ निघालीं होतीं. परंतु हातांत लेखणी घेऊन दौतींत बुडविली तेव्हां कागदावर लिहिण्यासारखें कांहीं नाहीं असें आढळलें."[८०]

समित्यांची कामे जरी अशी चालत, तरी पुस्तकांची बारकाईने पाहणी होत असे आणि त्यावर टीकालेख येत. तत्कालीन दप्तरात मेजर कँडी, दादोबा पांडुरंग, गोविंद नारायण, बाळाजी पांडुरंग यांनी केलेली मार्मिक परीक्षणे आढळतात. *इंदुप्रकाश, शाळापत्रक* इत्यादी नियतकालिकेही शालेय पुस्तकांवर विस्तृत अभिप्राय देऊन अभ्यासपूर्ण टीका करीत असे दिसते.

शास्त्रीय विषयांवरील पुस्तकांची निर्मिती

१४९. रसायनशास्त्र या विषयावरील तीन पुस्तके १८५२-मध्ये प्रसिद्ध झाली. त्यांतील *पदार्थविज्ञानशास्त्र* पुस्तकाची पाच वर्षांत दुसरी आवृत्ती निघाली. पदार्थविज्ञानशास्त्र विषयावरील नंतरचे चांगले पुस्तक म्हणजे बाळाजी प्रभाकर मोडक यांचे *रसायनशास्त्र*. ते १८७५-मध्ये प्रसिद्ध झाले. *यंत्रशास्त्राची मुळे* (१८५३) हे पुस्तक गोविंद गंगाधर फडके यांनी लिहिले. *शास्त्रीय ज्ञानदर्शन* हे सखाराम रामचंद्र दीक्षितांचे पुस्तक 'दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणाऱ्या मंडळी'मार्फत १८५६-मध्ये प्रसिद्ध झाले. याच मंडळीतर्फे कृष्णशास्त्री भाटवडेकरांचे *वर्तमानवाहक विद्युतयंत्र* १८५९-मध्ये निघाले. याची भाषा सुबोध आहे, आणि शैली मनोरंजक आहे. *वातावरण आणि त्यातील चमत्कार* हे भाऊशास्त्री थेऊरकरांचे भाषांतर १८५७-मध्ये निघाले. *विद्योपक्रमाचा ग्रंथ* हे पुस्तक १८४८ साली निघाले होते. त्याची दुसरी आवृत्ती निघाली १८५५-मध्ये. तेव्हा त्याच्या २०० प्रती खपल्या. याच गटातले दुसरे अत्यंत लोकप्रिय पुस्तक म्हणजे, थोरल्या चिपळोणकरांचे *अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह* (१८६१) होय. यात शास्त्रीय विषयांव्यतिरिक्त चरित्र, स्थलवर्णने, असेही विषय होते. शेतीविषयक पुस्तकात *रेशीम*,[८१] *शेती*[८२] अशा विषयावर तुरळक पुस्तके प्रसिद्ध होत होती. लोकहितवादींचे *लक्ष्मीज्ञान* (१८४९), हरि केशवजींचे *देशव्यवहारव्यवस्था वा शास्त्राची*

८०. हवालदार, गणेश रामकृष्ण, *रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे चरित्र*, भाग १ ला, १९२७, पृ. ७१.

८१. *दक्षिण देशांत तुतीचें झाड करण्याची व रेशमाचे किडे पाळण्याची व रेशीम उत्पन्न करण्याची रीति* (१८३८)

८२. *जागती जोत किंवा शेत पोत रीम भात याविषयीं संवाद* १८३८, *शेतकी आणि घरगुती व्यवस्था* (१८४६) *उद्भिज्जन्य पदार्थ*, गोविंद नारायण माडगांवकर (१८५६)

(५२)

मिसळतात. ह्मणजे तें उष्णतेनें चिकट होत नाहीं, कीं थंडीनें आंखडत नाहीं. हा गंधक घालून तें पुष्कळ कढवलें ह्मणजे तें शिंगासारखें लखलखीत आणि कठिण होतें. त्याच्या सांखळ्या, फण्या, करंडे, पेट्या इत्यादि पदार्थ करितात. ते लांकडाचे केल्यासारखे दिसतात.

रबर हें नऊ हिसे कोळसा आणि एक हिसा हैड्रोजन वायु मिळून झालेलें असतें.

प्रश्न.—१ रबर कोणत्या देशांत होतें? २ तें कशापासून होतें? ३ पावसाचे कपडे कशाचे करितात? ४ तें मऊं होऊं नये ह्मणून त्यांत काय घालतात? ५ रबराचा उपयोग काय होतो?

धडा सत्ताविसावा.

कोंबडा आणि रत्न.



एक कोंबडा आपल्या मंडळीस बरोबर घेऊन

आकृती ५७ : बालबोध तिसरें पुस्तक, विनायक कोंडदेव ओक, निर्णयसागर वाचन ग्रंथमाला, निर्णयसागर छापखाना, आवृत्ती १ ली

अनुक्रमणिका

मूलतत्त्वे (१८५४) हे पुस्तक, पुस्तक मंडळीने रु. १२०० देऊन गौरविले. कृष्णशास्त्रींचे *अर्थशास्त्र परिभाषा प्रकरण* पाहिले १८५५-मध्ये प्रसिद्ध झाले. हे पुस्तक 'Higher class of vernacular students' यांसाठी होते.

इतिहास विषयक पुस्तके

१५०. ग्रँट डफच्या बखरीच्या मराठी भाषांतराची आवृत्ती १८४६-४७-मध्ये छापली. पहिल्या आवृत्तीचा संक्षेप करून १८४०-मध्ये *महाराष्ट्र देशाचे वर्णन आणि इतिहास प्रश्नोत्तरावलीरूप ग्रंथ* छापला. इझडेल यांनी संक्षेपकाचे काम केले. ३००० प्रती काढल्या होत्या. भाषांतरकार कुशाबा लिमये यांना ५०० प्रती बक्षीस दिल्या. या संक्षिप्त पुस्तकाच्या १८७३-पर्यंत चौदा आवृत्त्या निघाल्या. त्याच पुस्तकावरून नंतर (१८७६) रावजी सदाशिव गोडबोले यांनी *महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास* लिहिला. जांभेकरांचा *हिंदुस्थानचा इतिहास* १८४६-मध्ये प्रसिद्ध झाला. १८५५–मध्ये त्याची दुसरी आवृत्ती निघाली. *हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास* १८४९-मध्ये बाळशास्त्र्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाला. मरेच्या History of British India चे भाषांतर–पहिला भाग लेखक अनामिक, *हिंदुस्थानचा इतिहास भाग* २ (१८६०) लेखक नरसिंह विनायकशास्त्री ओक, विष्णुशास्त्री पंडित, भाग ३ (१८६१) अशा तीन भागांत प्रसिद्ध झाला. त्याच वेळी एल्फिन्स्टनच्या *हिंदुस्थानच्या इतिहासाचे* भाषांतर रावसाहेब मंडलिकांनी दोन भागांत केले (१८६१). तिसरा भाग १८६२-मध्ये प्रसिद्ध झाला.

१५१. केरोपंत छत्रे यांच्यासारख्या विद्वानाला मंडलिकांचे भाषांतर पसंत पडले. मेजर कँडीसारख्या चिकित्सक टीकाकराच्या कसोटीला ते उतरले, परंतु विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे या तिन्ही भागांबद्दलचे मत मराठी भाषेच्या दृष्टीने प्रतिकूल झाले. विष्णुशास्त्री म्हणतात :–

> "ऐतिहासिक ग्रंथास व सामान्यतः देशभाषेंतील सर्व पुस्तकांस जो भिकारपणा आला आहे तो कोणत्याही प्रकारच्या उणिवेमुळें आला आहे असें नाहीं, तर लोकांच्या शुद्ध अनास्थेमुळेंच आला आहे. त्याविषयीं त्या पुस्तकांमधूनच एक मोठें प्रमाण दृष्टीस पडतें. तें कोणतें म्हणाल तर घेडगुजरी भाषा! अशुद्ध शब्द किंवा लिहिण्याची तऱ्हा मराठी आहे कीं नाहीं याचा निश्चय करणें हें तर मराठी दफ्तर चाळण्यापेक्षां व हिंदुस्थान फिरण्यापेक्षां फारच सोपें ना! पण चमत्कार हा कीं मुंबईच्या विद्वत्समाजानें जो इतिहास ग्रंथ (वि. ना. मंडलिक यांनीं केलेलें एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें भाषांतर) बी. ए. सारख्या वरच्या परीक्षेस मराठी-करितां तिगस्त सालपर्यंत नेमला असे, त्याची लिहिण्याची शैली इतकी विचित्र आहे कीं, इंग्रजी न शिकलेल्या एखाद्या मनुष्यापुढें जर त्याचें एक अर्ध पृष्ठ वाचलें तर तो भांबावून जाऊन ही भाषा कोणती म्हणून वाचणारास विचारूं लागेल. हा प्रसाद मुंबईच्या वस्तीनें ग्रंथकर्त्यास दिला, किंवा अशा प्रकारच्या भाषेशिवाय मराठींत इतिहास शोभत नाहीं असें त्यांस वाटलें कीं काय नकळे. शेवटीं आम्हांस आमच्या नवीन विद्वानांस एवढेंच सांगणें आहे, कीं

७५

महापुण्यवान् हरिभट्टजी ह्यांचे वयास तीस वर्षें होतपर्यंत दारिद्र्यामुळें लग्न झालें नाहीं. मग त्यांनीं आपल्या मातापितरांची आज्ञा घेऊन प्रसिद्ध श्रीक्षेत्र गणपतिपुळें येथें बारा वर्षें दूर्वांचा रस मात्र प्राशन करून कडकडीत तप केलें. तेव्हां त्यांस गणेशप्रसाद होऊन हे महातपस्वी व एकनिष्ठ गणेशभक्त झाले. नंतर पुळ्यांचेच राहणारे शेंडे उपनांवाचे पुराणिक ह्यांच्या कन्येशीं विवाह करावा असा श्रीचा दृष्टांत झाला. त्याप्रमाणें हरिभट्टजींनीं विवाह केला. कुटुंबाचें नांव लक्ष्मीबाई ठेविलें. पुढें बोवांचे वृद्ध मातापितर वारले, व भट्टजींनीं आरंभीं लिहिलेल्या बहुतेक मुलांच्या मुंजी व लग्नें कोंकणांतच गरिबीच्या रीतीनें केलीं. पुढें दारिद्र्याच्या तापास कंटाळून सहकुटुंब फिरत फिरत ह्मापणगांवीं गेले. तेथें जोशी उपनांवाची एक स्त्री [1]नारायण नांवाच्या आपल्या मुलास घेऊन हरिभट्टजींकडे आली, आणि ह्मणाली, दारिद्र्यामुळें ह्या मुलाची मुंज माझ्या हातून होत नाहीं व ह्यास पालनकर्ता कोणी नाहीं; आमच्या कुलोपाध्यायांस ह्याची मुंज करण्याविषयीं अनेक प्रकारांनीं विनविलें असतां तुमचा दरिद्र्यांचा उपाध्यायपणाच आह्मांस नको, असें ह्मणून त्यांनीं उपाध्यायपणाच सोडिला; ह्मणून आपणांकडे आलें आहें. आपण समर्थ आहां. ह्यास ब्राह्मण करून ह्याचें कल्याण करावें. तिनें असें ह्मणतांच हरिभट्टजींपाशीं पुष्कळ मंडळी असे, त्यांत दांडेकर [2]रामभट्टजी ह्मणून असत, त्यांकडे हरिभट्टजींनीं

१ हा इचलकरंजीकरांचा मूळ पुरुष.

२ हरिभट्टजी ह्यांस लोक कांहीं द्रव्य देत. परंतु, ते आपल्या कु-

आकृती ५८ : बालबोध पुस्तक १८ अ, ४ जुलै १८९८, निर्णयसागर प्रेस

आजपर्यंत भाषांतर रूपानेंच इतिहासाची माहिती लोकांस होण्याचा जो भाग होता तो ठीकच होता. पण यापुढेंही तोच मार्ग ठेवणें यासारखें मात्र हास्यास्पद कांहीं नाहीं. "[८३]

१५२. विनायक कोंडदेव ओक यांची *हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास* (१८६८) आणि *हिंदुस्थानातील कथारस* (१८७१) ही पुस्तके लोकप्रिय होती. इ. स. १८९१-पर्यंत त्यांच्या नऊ आवृत्त्या निघाल्या. मार्शमनच्या Brief Survey of History या पुस्तकाचे संक्षिप्त भाषांतर हरी रघुनाथ गाडगीळ यांनी दोन भागांत (१८५२ व १८५७) प्रसिद्ध केले. याशिवाय बेहेरेकृत *जगाचा संक्षिप्त इतिहास* (१८७१) व मोडक यांचे *जगाच्या इतिहासाचे सामान्य निरूपण* (१८७४) ही पुस्तके प्रसिद्ध झाली.

लेखकावरील किटाळ आणि त्याचा परिहार

१५३. शालेय पुस्तकांच्या निर्मितीच्या प्रारंभकाळी ज्यांनी त्यात भाग घेतला त्यामध्ये विष्णुशास्त्री बापट हे एक प्रमुख होते. त्यांच्या *नीतिदर्पण* आणि *बालोपदेश कथा* या पुस्तकांचा उल्लेख मी केला आहे. ते पुणे पाठशाळेत असिस्टंट पंडित झाले (१८३७). ह्या त्यांच्या कारकीर्दीत चौदा विद्यार्थ्यांना ग्रॅच्युइटी देण्याची कामगिरी त्यांजवर आली. त्या वेळचा 'मुंबई रुपया' आणि 'चिंचोरे रुपया' यांच्या दरातील फरक, रुपये ४ आणे ३ पै त्यांनी स्वतःजवळ ठेवल्याच्या आक्षेपावरून त्यांना नोकरीतून कमी करण्यात आले. 'हे पैसे आपल्याकडे राहिले, कारण त्या मुदतीत आपण शाळा तपासण्यासाठी फिरतीवर होतो' असे त्यांनी सांगितले, परंतु त्याचा उपयोग झाला नाही.

१५४. *नवनीत*चे लेखक परशुराम तात्या गोडबोले (१८००-१८७४), हे काही काळ सरकारी छापखान्यांचे सुपरिण्टेण्डण्ट होते. त्या वेळी काही खाजगी कागदपत्र त्यांनी छापून घेतले आणि *इसापनीति* पुस्तकाच्या प्रती छापील किमतीपेक्षा जास्त किमतीस विकून वरचे पैसे आपल्याजवळ ठेवले, म्हणून त्यांना शिक्षामंडळीने बडतर्फच केले. नंतर पन्नास रुपये दंडावर त्यांची सुटका झाली. त्यांत कँडीच्या शिफारशीचा त्यांना उपयोग झाला. कँडी लिहितातः—

> "Parshooram Pant is a man of great respectability and character, and is well suited for his situation. I therefore feel reluctant to recommend his dismissal which, I think would be punishment more severe than is necessary."[८४]

१५५. मेजर कँडी हे पुणे पाठशाळेचे मुख्याधिकारी होते. इ. स. १८४७-मध्ये त्यांची मराठी ट्रॅन्सलेटर व रेफरी म्हणून नेमणूक झाली. इ. स. १८५१-मध्ये पुण्याची पाठशाला आणि इंग्रजी शाळा एक होऊन 'न्यू पूना कॉलेज' स्थापन झाले. मेजर कँडीचा शिक्षण-

८३. वेलसरे, खंडेराव भिकाजी, *विष्णुशास्त्री चिपळोणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह, भाग १*, १८९६ पृ. ८४–८५

84. D.P.I., Board of Education, Institution, 1842, p. 4.

९.

संपत्तीची उत्पत्ति.

मनुष्यें अगदीं रानटी स्थितींत होतीं—त्यांच्यामध्यें कलाकौशल्य मुळीं कांहीं नव्हतें—त्या वेळींच संपत्तीची उत्पत्ति झाली आहे. ती अशी. रानटी स्थितीमध्यें झालें तरी प्रत्येक मनुष्याचें सामर्थ्य वेगळें वेगळें असतें. एकाद्याला धान्य पुष्कळ पिकवितां येतें. एकाद्याला शिकार पुष्कळ करितां येते. एकाद्याला कापड पुष्कळ विणतां येतें. एकाद्याला मडकीं पुष्कळ घडतां येतात. ह्यांत पुष्कळ ह्याचा अर्थ, स्वतः त्याला जितकें उपयोगास लावितां येत असतें त्यापेक्षां अधिक असा घ्यावयाचा आहे. आणखी, ह्या सगळ्या वस्तु उत्पन्न करणारीं माणसें जरी वेगळीं वेगळीं असतात, तरी, त्या वस्तूंची अपेक्षा बहुतेक सर्वांस सारखी असते. धान्य उत्पन्न करितो, त्यास कापडाची गरज असते. कापड उत्पन्न करितो, त्यास धान्याची गरज असते. शिकार करतो, त्यास मडक्याची गरज असते. ह्मणजे प्रपंचामध्यें ह्याचें त्याच्या साह्यावांचून चालूंच नये, आणि त्याचें दुसऱ्याच्या साह्यावांचून चालूं नये, अशी स्थिति असते. असें असल्यामुळेंच फार प्राचीन काळापासून तत्त्वज्ञानी पुरुष हे, मनुष्य हा समाजवासी प्राणी आहे, असें ह्मणत आले आहेत.

आपणा स्वतःस वस्तु लागत असते, तिजपेक्षां अधिक उत्पन्न केलेली वस्तु माणसापाशीं राहाते, तीच त्याची संपत्ति होय. कल्पना करा. एका माणसानें शंभर मडकीं घडलीं. त्यांतलीं पंचवीस त्याच्या स्वतःच्या उपयोगास लागलीं. आणि पंचवीस मडकीं लोकांस देऊन, त्याला अन्नवस्त्रादि आवश्यक वस्तु घ्याव्या लागल्या. त्या त्याच्या प्रपंचाकडे खर्चल्याच. ह्यानंतर, बाकीचीं पन्नास मडकीं जीं राहिलीं, ती त्याची संपत्ति होय. किंवा तीं पन्नास मडकीं दुसऱ्यांस देऊन त्यांच्या मोबदला त्यानें

आकृती ५९ : "बालबोध" पुस्तक १९, अंक १, निर्णयसागर प्रेस, एप्रिल १८९९

अनुक्रमणिका

क्षेत्रात त्या काळी सर्वत्र दरारा होता. परंतु त्यांच्याबद्दल तक्रारीही होत्या. त्यांची चौकशी करण्यासाठी कॅप्टन काऊपर यांची नेमणूक करण्यात आली. आपल्या रिपोर्टात ते म्हणतात :

> " The Principal (Candy) for years had never seen the institution after nine in the morning and during the hours of study of the great majority of the classes, entire absence of discipline, order and decorum, having of course resulted. "[८५]

१५६. या वेळी थोरले शास्त्रीबुवा कृष्णशास्त्री चिपळोणकर यांच्यावरही शिंतोडे उडाले. कँडीच्या वर्तणुकीची सरकारी चौकशी होऊन त्यांना चार महिने कामावरून दूर केले. कँडींना तेव्हा दरमहा रुपये ६०० पगार होता, तो रु. २६७ रुपयांवर खाली आणला, आणि मराठी ट्रॅन्सलेटरचे काम देण्यात आले. त्यांनी १८६३ मध्ये आपली बाजू सरकारपुढे मांडली. त्यात १८५७-पासून सरकार अडचणीत असल्यामुळे आपण अर्ज करावयाचे थांबलो असे त्यांनी म्हटले आहे. सरकारने उदार होऊन त्यांचा पगार रु. ३०० केला आणि Classifier of Record चे काम दिले. पुढे दोन वर्षांनी क्रमिक पुस्तकांच्या कामाबद्दल त्यांना रुपये ३००० बक्षीस दिले. इ. स. १८७७-मध्ये कँडी मरण पावले. मृत्यूपूर्वी एक वर्ष त्यांनी आपल्या जागेचे त्यागपत्र दिले होते. त्यात ते म्हणतात :

> " It is with my regret that I seek the severance of my connection with the Deptt. of Education and Marathi literature a connection which commenced 50 years ago when (in 1826) I was taken from my Regiment and appointed to assist Captain Molesworth in the preparation of first Dictionary. "[८६]

85. D.P.I., Poona College, Vol. 16, 1858, p. 347.
86. D.P.I. Translation Deptt. Vol. 37, 1876-77.

व्याख्यान तिसरे

ग्रंथमुद्रण व्यवसाय

अनुक्रमणिका

प्रास्ताविक

जन्माने मुद्रक होण्याचे भाग्य मला लाभलेले नाही. मी स्वेच्छेने मुद्रक झालो, मुद्रक होणे मी हेतुपूर्वक पसंत केले. ही गोष्ट केवळ यदृच्छेने घडलेली नाही. माध्यमिक शाळेत प्रवेश मिळण्यापूर्वीच श्री. अनंत वासुदेव मराठे हे संपादन करीत असलेल्या 'किरात' या साप्ताहिकाच्या कार्यालयात मी नेहमी जात असे. चाळीतल्या एखाद्या खोलीएवढ्या शेडमध्ये हे 'किरात' मुद्रणालय थाटलेले होते. त्यात केसीस ठेवण्याचे दोन-तीन घोडे, एक दोन डझन टाइप केसीस, एक लहानसा हँडप्रेस, हाताने चालणारा एक शीट-कटर आणि सर्वत्र आढळणारे एक मुद्रण यंत्र १२" × १८" अशी यंत्रसामग्री होती. बाजूला संपादकीय कचेरी आणि मुद्रित-शोधकाच्या टेबलापुरती जागा होती. याच जागेचा उपयोग घड्या घालणे, जुपणी करणे, पृष्ठांकन, हातशिलाई, आवेष्टन आणि विक्री यांकरिता होत असे. छपाई नेहमी काळ्या शाईत करीत. मौजीबंधन आणि विवाह निमंत्रणपत्रिकांची छपाई लाल रंगात होत असे. मधून मधून काळ्याबरोबर लाल शाई चालवून 'किरात'चे शीर्षक आणि खाली एखादा इंचपर्यंत साप्ताहिकाचे स्तंभ रंगीत छापण्यापुरतीच 'बहुरंगी' छपाई करण्यात येत असे. फॉर्म रोलरांच्या खालची शाई मसळणारी तबकडी फिरवायचे थांबवून हे साध्य करता येत होते. त्याकरिता ही तबकडी फिरविणाऱ्या रॅचेट-पॉल यंत्रणेचा तिच्याशी असलेला संबंध तोडून टाकावा लागे. हे मुद्रणालय नंतर आपल्या २५० चौ. फुटांच्या नव्या जागेत, अर्थात, भाड्याच्या, गेल्यावर मी पावत्या व निमंत्रण पत्रिका 'जुळवण्या'तील पहिले धडे घेतले. मुद्रणालयात एका १२" × १५" आकाराच्या ट्रेडलची व एका चोवीस इंची कापणी यंत्राची भर पडली. लहान ट्रेडलवर काम करावयाची मला परवानगी असे. तेव्हा एकच हरकामी मुद्रक नोकरीला होता आणि एका मुलाच्या मदतीने तो जुळणी, छपाई व बांधणीची कामे करीत असे. त्यामुळे मुद्रणालयाचे मालक आणि व्यवस्थापक श्री. बाबा मराठे मला ट्रेडल चालवण्याची, मुद्रिते काढण्याची किंवा पावत्यांना क्रमांकन करण्याची परवानगी सहजच देत असत.

अनुक्रमणिका

या मुद्रणालयाने नंतर शालान्त परीक्षेच्या प्रश्नपत्रिका छापण्याचे काम घेतले होते. तेथे स्थानिक नगरपालिकेचे व सहकारी पतपेढ्यांचे काम चाले. गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून मतदारांच्या याद्या छपाईच्या मोसमी कामांसाठी मुद्रणालयांत चढाओढ होत असते. आता या मुद्रणालयाला आठ-दहा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या दुसऱ्या एका छापखान्याच्या चढाओढीला तोंड द्यावे लागते असे ऐकतो. जगण्यासाठी धडपड आधीपासून होतीच, पण चढाओढ नव्हती तीही आता निर्माण झाली. संकटांना तोंड देत अनेक वर्षे यंत्रसामग्री न बदलता कुशल कारागिरावाचून कसेबसे दिवस काढीत जगण्यासाठी धडपडणाऱ्या, महाराष्ट्रातील तालुक्याच्या गावी धंदा करणाऱ्या, असंख्य मुद्रणालयांचा हा छापखाना प्रातिनिधिक म्हणून समजायला हरकत नाही.

अशा या लघुउद्योगात मोडणाऱ्या मुद्रणालयांची सर्वांगीण पाहणी माझ्या या तिसऱ्या व्याख्यानात करण्याचा माझा विचार आहे. आपल्या व्यवसायाविषयी आकडेवारी फारशी उपलब्ध नाही. मी मुख्यतः जुन्या मुंबई राज्यातील मुद्रण-व्यवसायाचा पाहणी अहवाल, किमान वेतन विषयक अहवाल, लकडावाला-खिंडसेरा यांचा मुंबई शहरांतील लघुउद्योग पहाणीचा अहवाल आणि आमचे स्नेही श्री. शासाहेब पटवर्धन यांनी संपादित केलेल्या मुद्रण व्यवसायाच्या डायरेक्टरीचा उपयोग करणार आहे.

अनुक्रमणिका

१२

ग्रंथमुद्रण व्यवसाय

पाठ्यपुस्तक प्रकाशन–व्यवसाय

१५७. धार्मिक पुस्तके आणि पाठ्यपुस्तके यांचे प्रकाशन प्रकाशकांस पैसा मिळवून देते. इतर प्रकाशनांत प्रकाशकांनाच फारसा पैसा मिळत नाही. त्यामुळे लेखकांना आणि मुद्रकांना त्यांची झळ लागणे स्वाभाविक आहे. अशा प्रकारे वाङ्मयोत्पादन हा व्यवसायच नव्हता, असे डॉ. केतकरांचे त्यांच्या काळाविषयी म्हणणे होते.

> "वाङ्मयोत्पादन हा महाराष्ट्रांत अजून धंदा झाला नाहीं. लेखक, मुद्रक व प्रकाशक या तिघांची कार्यें जेव्हां एखाद्या व्यक्तींत एकवटतात, तेव्हां त्या व्यक्तीस आपली उपजीविका चांगल्या तऱ्हेनें करता येते अशीं कांहीं उदाहरणें महाराष्ट्रांत सांपडतील. तथापि निव्वळ लेखक म्हणून कोणी आपली उपजीविका करूं शकला अशा गोष्टी झाल्या नाहींत." ८७

डॉ. केतकरांचे वरील विधान उद्‌धृत करून कै. आपटे आपल्या '*लेखनकला*' या ग्रंथात म्हणतात :

> "या विधानास कांहीं अपवाद असेलच तर ते शालोपयोगी पुस्तक लिहिणारांचे होत. सरकारी किंवा निमसरकारी शाळांतल्या अभ्यासक्रमांतली पुस्तकें लिहून मोठ्या खटपटीनें त्यांना विद्या खात्याची मंजूरी मिळविण्याचें भाग्य ज्यांना लाभतें तें मात्र थोड्या वर्षांत स्वतंत्रपणें निर्वाह चालवून घरेंदारेंहि बांधूं शकतात. पण अशा भाग्यवान व्यक्ति फार थोड्या असतात. बहुधा ट्रेनिंग कॉलेजांत किंवा विद्याखात्याशीं निकट संबंध असलेल्याच लेखकांची तेथें वर्णी लागते आणि इतरांनीं लिहिलेलीं पुस्तकें चांगलीं असूनही तीं शाळांतून चालविण्यासाठीं बहुधा मंजूर केलीं जात नाहींत अशी तक्रार सात-आठ वर्षांपूर्वी रँग्लर परांजपे यांनीं मुंबईच्या कायदे कौन्सिलापुढें सप्रमाण मांडली होती. आजही (१९२६) त्या स्थितींत विशेषसा फरक झालेला

८७. केतकर, श्रीधर व्यंकटेश, *विद्यासेवक*, वर्ष १ अं. १.

अनुक्रमणिका

दिसून येत नाहीं. शालोपयोगी पुस्तकांचा वाङ्मयांत अंतर्भाव होत नसल्यामुळें डॉ. केतकरांच्या विधानास बाध येत नाहीं. " ८८

१५८. पाठ्यपुस्तकांच्या प्रकाशनाचा हुकमी उत्पन्नाचा व्यवसाय मुद्रणालयास भाकरतोणी पुरवतो आणि पर्यायाने ग्रंथमुद्रणासाठी त्यांना तंदुरुस्तीत ठेवतो. 'कर्नाटक प्रेस'सारख्या महाराष्ट्रीय मुद्रण-व्यवसायात अग्रेसरत्व संपादिलेल्या संस्थांनीच नव्हे, तर तत्पूर्वी 'निर्णयसागर'-सारख्या संस्थांनीही पाठ्यपुस्तक-प्रकाशनाचा धंदा यशस्वीपणे केला आहे. पुण्याच्या 'लोकसंग्रह' मुद्रणालयास आलेल्या स्थैर्यास पाठ्यपुस्तक-प्रकाशनाने हातभार लावलेला आहे. महाराष्ट्रातील एक नामांकित प्रकाशक श्री. स. कृ. पाध्ये अलीकडच्या एका परि-संवादामध्ये प्रकाशन-व्यवसायाविषयी लिहिताना म्हणतात :

"पाठ्यपुस्तकांमुळें लेखकांना लाभ होतो. छापखान्यांनाही किफायतशीर काम मिळतें, आणि या पुस्तकांची पद्धतशीर विक्री करून धंदा चालतो ही जाणीव प्रभावीपणानें झाली, ती तीन प्रकारच्या पुस्तकांनीं. भांडारकरांचीं संस्कृत पुस्तकें, तर्खडकरांची भाषांतरमाला आणि ना. गोखल्यांचे अंकगणित. ब्रिटिश प्रकाशकांनी राजकीय पुढाऱ्यांकरवी पाठ्यपुस्तक लिहून घेतलें, ही भारतीय प्रकाशन व्यवसायांतील मोठी घटना होय. तिजमुळें अनेक लेखक-प्रकाशकांना स्फूर्ति लाभली. पद्धतशीर व्यवसाय करण्याच्या आकांक्षा उद्भवल्या आणि हा एक नवा, शिष्टसंमत व्यवसाय असल्याची खात्री पटली." ८९

असा हा पाठ्यपुस्तक प्रकाशनाचा धंदा लोकांच्याच हाती राहिला पाहिजे, यांचे कारण श्री. पाध्ये असे सांगतात :

"कारण त्यामुळें धंदेवाईक प्रकाशक तयार होतो. पाठ्यपुस्तकांच्या अनुषंगाने इतर प्रकाशनें पत्करता येतात. कारण साहित्यिक प्रकाशन हें लाभदायक नसतें. त्याला आधार म्हणून हक्काच्या खपाचे प्रकाशन हवें असतें." ८९

ग्रंथ मुद्रणालयाची आर्थिक बाजू

१५९. प्रकाशकांचा वर्ग निर्माण होऊन सुस्थितीत आला म्हणजे पर्यायाने मुद्रण-व्यवसायास स्थैर्य प्राप्त व्हावे. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे घडलेले दिसत नाही. महाराष्ट्रातील एक अग्रेसर ग्रंथमुद्रक आणि पाठ्यपुस्तकेतर ग्रंथांचे प्रकाशक श्री. विष्णुपंत भागवत यांनी याबाबत वरील परिसंवादात केलेले विवेचन उद्बोधक ठरेल.

"मराठी प्रकाशन-व्यवसायासमोर आज उभी असलेली व दिवसेंदिवस अधिक गंभीर होत जाणारी दुसरी समस्या चांगल्या मुद्रण सोयीच्या उपलब्धतेची आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शुद्ध स्वरूपांत नीटनेटकें ग्रंथमुद्रण करणारीं पाचपंचवीस मुद्रणालयें पुण्या-मुंबईत होतीं. आज त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी थोडी राहिली आहे...पण नव्यानें सुरू झालेलीं

८८. आपटे, कै. वासुदेव गोविंद, *लेखनकला आणि लेखन व्यवसाय*, पुणें, १९४६, पा. ४०४.
८९. पाध्ये, स. कृ., "महाराष्ट्रांतील प्रकाशन इतिहास" *परचुरे प्रकाशन पंचविशी*, मुंबई १९७०, पा. ३५–४०

जवळजवळ सर्व मुद्रणालयें इतर विविध प्रकारचें व्यापारी मुद्रण करण्यासाठीं स्थापन झालेलीं आहेत. त्यांचा विकासहि त्या दिशेनेंच झालेला आहे. अगदीं याच्या उलट परिस्थिति ग्रंथमुद्रणाच्या बाबतींत घडली आहे. फक्त याच कामासाठीं नवीं मुद्रणालयें निघाल्याचें उदाहरण विरळच आहे. उलट अनेक नामवंत ग्रंथ-मुद्रणालयें एकतर काळाच्या उदरांत विलीन झालीं आहेत, किंवा जीं कांहीं जीव धरून आहेत, त्यांचा संसार टुकुटुकू चालल्यामुळें त्यांचा विकास झालेला नाहीं. आज सबंध महाराष्ट्रांत दोन-चार अपवाद सोडले तर ग्रंथमुद्रण करणारी बहुतेक मुद्रणालयें तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या समाधानकारक नाहींत.

"साधन-सामग्रीनें सुसज्ज आणि चांगले कसबी तंत्रज्ञ व कारागीर असलेले ग्रंथ-मुद्रणालय विकसित करण्यासाठी फार मोठें भांडवल व दीर्घकालीन प्रयत्न करावे लागतात आणि असे पाठ मोडणारे प्रयत्न करून मुद्रणालय नांवारूपाला आणल्यानंतर ते करणाऱ्या व्यक्तीस त्यापासून जो आर्थिक मोबदला मिळतो तो व्यापारी मुद्रकाला मिळणाऱ्या मोबदल्याशी तुलना करतां फारसा समाधानकारक नसतो आणि येथेंच हें असमाधान थांबत नाहीं. हा मोबदलाही त्याला वेळच्या वेळीं मिळत नाहीं.

"व्यापारी मुद्रणाच्या कामाचे पैसे मिळण्यासाठीं लागणारा अल्पकाळ व त्याउलट ग्रंथ-मुद्रणाच्या कामाचे पैसे मिळण्यास लागणारा काळ यामुळें मुद्रणाच्या व्यवसायांत पडूं इच्छिणारा नवतरुण व्यापारी मुद्रणशाखेची निवड करतो." ९०

१६०. ग्रंथमुद्रण करणाऱ्या मुद्रणालयांचा नफा पुरेसा नसतो याची जी कारणे आहेत त्यांत कामाची बिले वेळेवर मिळत नाहीत, ते निर्माण करीत असलेल्या मालास धार्मिक पुस्तके आणि पाठ्यपुस्तके सोडता निश्चित मागणी नसते, मागणी निर्माण करण्यातील एक महत्त्वाचा घटक पुस्तक-विक्रेता हा आपल्याकडे अजून पूर्णतया तयार झालेला नाही, ही कारणे आहेत. अलीकडे इंग्लंडमध्ये भरलेल्या एका संमेलनात या विषयाची चर्चा झाली. चर्चेचा विषय होता : "Can British Book Production Survive ?—The Next Five Years."

या चर्चेत मुद्रकांचा दृष्टिकोण पुढीलप्रमाणे मांडण्यात आला :

"Within the last five years, there has been change all right in the book production field. Some, but relatively little, in plant and in techniques : the most interesting change has, as it seems to me, been in our ways of thinking. There's been the realization that book publishers and book printers and binders share one function. Both are concerned with one thing — seemly and economically and reasonably expeditious book production. There is all-round acknowledgement now of the truth that there's much more to be gained by co-operation than by fighting with one another — at least by talking with one another rationally instead of emotionally; by discussing standards of quality or steps towards efficiency and

९०. भागवत वि. पु., "प्रकाशन व्यवसायापुढील कांहीं समस्या" *परचुरे प्रकाशन पंचविशी*, १९७०, पान ४१–४४

economy, rather than just price. There's been this new realization of the scope that there is for learning from one another, and a new willingness to share good ideas."[91]

१६१. विलायतेतच नव्हे, तर हिंदुस्थानात आणि इतरत्रही ग्रंथमुद्रण-व्यवसाय कमी फायद्याचा, पण शैक्षणिक, सांस्कृतिक, इतकेच नव्हे तर एकंदर राष्ट्रीय उत्कर्षाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असा व्यवसाय आहे. प्रकाशकांच्या फायद्याच्या मानाने ग्रंथमुद्रकांचा फायदा आणखीच कमी. वरील चर्चेतील वक्ता प्रतिपादन करितो की :

"Within the whole of printing there is hardly any sector of the industry earning less than the Book Printers; and that Book Printers' return on capital compares very unfavourably indeed with that of Book Publishers. 'Your opposite numbers in publishing', he's been saying to me, 'are in fact doing ever so much better than you. You saw the figures in the Little Needy report; between 1961 and 1966 the Book Publishers' ratio of profits as a percentage of capital employed rose from 15·1 to 18·3, whilst during the same period Book Printers, percentage fell from 13.4 to 9.7.'"[91]

ग्रंथमुद्रकांना गुंतविलेल्या भांडवलावर पुरेसा फायदा का होत नाही याबाबत या अहवालात म्हटले आहे :

"There were three main reasons for inadequate return on capital... book printers and binders had no real marketing function, their volume of work depending on what publishers reckoned they. could market; their capital was used as working capital by book publishers with, for example, invoices being in publishers' hands 83.8 days on average before they are paid; and the book manufacturing industry was a bespoke one with no two jobs the same. Despite this; capital invested in book printers was in the safe hands of people who know what they were doing and who had nothing to be ashamed of in matters of quality, service and price."[91]

१६२. विलायतेतसुद्धा ग्रंथमुद्रकांना वेळेवर पैसे मिळत नाहीत हे यावरून स्पष्ट होईल. तेथेही मुद्रक म्हणतात की, आमचा पैसा प्रकाशक आपले भांडवल म्हणून वापरतात. प्रकाशकांवरच अवलंबून असल्यामुळे त्यांना उधारी देण्यावाचून मुद्रकांना गत्यंतर नसते. चर्चेचा अहवाल म्हणतो की,

"Another respect in which we seem to bear Book Publishers' capital burdens is work-in-progress. A book is like piece of string of indefinite length. Book Printers' outlay in hard cash — on wages and everything else — may start months, years before date of invoice."[91]

91. Comment on the Report of the Conference on "*Can British Book Production Survive—the next five years*" British Federation of Master Printers.

प्रकाशकांच्या सुस्थितीचा फायदा ग्रंथमुद्रकास मिळत नाही

१६३. ग्रंथछपाई करणाऱ्या मुद्रणालयांना फार मोठा आधार शालोपयोगी पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशन संस्थांचा. या संस्थांना गेल्या पंधरा वर्षांचा काळ तरी फार चांगला गेला. त्यांच्या या सुस्थितीचा फायदा त्यांच्या व्यवसायाची मुख्य वस्तू जे ' पुस्तक ' ते तयार करणाऱ्या मुद्रणव्यवसायासही व्हावयास हवा होता. परस्परावलंबी असलेले हे दोन्ही व्यवसाय एकमेकांच्या सहकार्याने वाढावयास हवे होते. ते दोघांच्या हिताचे होते. परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. आपल्या सुस्थितीत आपल्या मुद्रकांनाही सहभागी करावे, असा आत्महिताचा विचार फारशा प्रकाशन-व्यावसायिकांना शिवला नाही. त्यामुळे मुद्रण-व्यवसायाच्या ' ग्रंथछपाई विभागा'ची परिस्थिती जवळजवळ पूर्वीसारखीच (हातातोंडाची गाठ) अशा प्रकारची राहिली. हे काम करणाऱ्या मुद्रणालयांमध्ये नवी यंत्रे फारशी नाहीत. जुन्या यंत्रांची जागा नव्या यंत्रांनी घेतली, तीही डागडुजी करून कार्यक्षम केलेल्या (rebuilt) मुद्रणयंत्रांनी.

उत्कृष्ट मुद्रणाचे मानदंड

१६४. ग्रंथमुद्रण व्यवसायाच्या या विशिष्ट परिस्थितीमुळे मुद्रणाच्या दर्जावर अनिष्ट परिणाम होतो. मुद्रणाचा दर्जा चांगला राहावा म्हणून नेहमीच प्रयत्न होत राहिलेले आहेत. विविध प्रकारची मुद्राक्षरे वापरून गणपत कृष्णाजींनी आपल्याकडे प्रथमतः दर्जेदार मुद्रणास सुरुवात केली. त्या कालात शिळायंत्रावरील छपाईत उत्तमोत्तम हस्ताक्षराचा उपयोग होत असे. तत्कालीन सुलेखनाच्या तुलनेने मुद्राक्षरमुद्रण लोकप्रिय करण्यासाठी अशा प्रयत्नांची जरुरी होती. ' निर्णयसागर ' च्या सुरुवातीपासूनच तेथील सुंदर मुद्राक्षरांमुळे मराठी, संस्कृत, हिंदी या भाषांच्या छपाईस सुबकपणा येत गेला आणि उत्कृष्ट मुद्रणाचे मानदंड निर्माण झाले. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे सर्वसाधारण प्रकाशनात नफा नसला तरीही सुबक मुद्रण करण्याकडे तेव्हा प्रवृत्ती होती.

१६५. लेखनकला या पुस्तकात कै. वा. गो. आपटे यांनी सुंदर मुद्रण का आवश्यक आहे आणि ते साधण्यासाठी काय करावे याचे उद्बोधक विवेचन केले आहे :

> " पुस्तक दिसण्यांत सुंदर व चित्ताकर्षक दिसलें म्हणजे तें साहजिकच हातांत घेऊन वाचावेसें वाटतें. पुस्तकाची पहिली परीक्षा त्याच्या बाह्य सौंदर्यावरून होते. म्हणून त्याचें बाह्यांग चित्ताकर्षक करणें अवश्य असतें. पुस्तकाचें बाह्यांग सुंदर व चित्ताकर्षक करावयाचें म्हणजे अर्थात त्याचा आकार त्याला शोभेल असा ठेवणें, कागद पांढरा स्वच्छ व चांगला वापरणें, टाइप चांगला वळणदार आणि कोरा घालणें, आणि छपाई डोळ्याला सुंदर दिसेल व पाहणारांचें मन प्रसन्न होईल अशी करणें, या सगळ्या गोष्टींकडे पाहावें लागतें. पुस्तकाचें अंतरंग कितीही चांगलें असलें तरी त्याचें बाह्यांग चित्ताकर्षक नसल्यास तें वाचण्याची बुद्धि माणसाला लवकर होत नाहीं. "

> " चांगल्या छपाईला थोडा अधिक खर्च लागतो. पण हा केलेला अधिक खर्च अनाठायीं झाला

अनुक्रमणिका

असें समजूं नये. कारण, त्याच्या योगानें पुस्तकाच्या सौंदर्यांत आणि चित्ताकर्षकतेंत भर पडते व त्यामुळें पुस्तकाच्या खपालाही साहाय्य होतें. ''

'' एखादा मुद्रक कमी दरानें पण छपाईचें काम वाईट रीतीनें करणारा असला, तर त्याच्याकडे काम न देता थोड्या अधिक दरानें पण चांगलें काम करणाऱ्या छापखान्याकडूनच छपाईचें काम करवून घ्यावें. तेथें कंजूषपणा केल्यास पुस्तकाचें अंतरंग चांगलें असतांही केवळ छपाई वाईट झाल्यामुळें पुस्तकाचा आदर व्हावा तसा होत नाही आणि लेखकाचा हिरमोड होतो व असला कंजूषपणा एकंदरीनें पश्चात्तापाला कारण होतो. ''[९२]

ग्रंथ-मुद्रण-व्यवसायापुढील अडचणी

१६६. माझ्या एकंदर विवेचनात मी ग्रंथ-मुद्रणाच्या चर्चेस विशेष महत्त्व दिलेले आढळून येईल. त्याचे कारण असे की, व्यापारी मुद्रण, त्यातील फायद्याच्या ओढीने आपोआप वाढत असते. त्याचे गिऱ्हाईक म्हणजे कारखानदार. विक्री करण्यासारख्या वस्तू तयार करणारे कारखानदार चोखंदळ असल्यामुळे व त्या कामाची व्यवस्था करणाऱ्या जाहिरातसंस्था संघटित असल्यामुळे कामाचा दर्जा टिकतो आणि वाढतो. कामास भाव चांगला मिळतो आणि तो दर्ज्यावर अवलंबून असतो. म्हणून उत्तम व्यापारी मुद्रणकाम करणारी मुद्रणालये वाढीस लागतात. ग्रंथमुद्रणाचे तसे नाही. त्याचे कारण ग्रंथमुद्रण करून घेणारे जे प्रकाशक आहेत, त्यांपैकी काही सुबुद्ध प्रकाशक सोडून दिले, तर भावात घासाघीस, पैसा देण्यात विलंब, अशी सर्वत्र परिस्थिती असल्याचे दिसून येते. याचा व्यवसायावर अनिष्ट परिणाम होतो. ग्रंथमुद्रणास विपुल भांडवल लागते. ते गुंतवणारे छापखाने जेरीस येतात आणि त्यांना कामाचा दर्जा टिकवणे कठीण जाते. भांडवलाची टंचाई भासू लागते; अंतर्गत तांत्रिक व्यवस्थेत अडथळे निर्माण होतात; व शेवटी त्याचे पर्यवसान छापखाना हस्तांतरित होण्यात, किंवा सुटी-सुटी यंत्रे विकण्यात होते. एकदोन दशकांपूर्वी भरभराटीस असलेली ग्रंथमुद्रणाचे कित्येक कारखाने या प्रकारे निकालात निघाले आहेत. गेल्या तीन वर्षांच्या खाजगी मुद्रण-व्यवसायाशी आलेल्या साक्षात संबंधाने माझे असे मत बनले आहे की, *महाराष्ट्रात चांगले ग्रंथ-मुद्रण करू इच्छिणारी अशी स्थापित मुद्रणालये आहेत त्यांना, जर योग्य भाव, चोखंदळ गिऱ्हाईक व अविलंबाने मोबदला मिळाला तर ग्रंथ-मुद्रणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर राहू शकेल.*

१६७. महाराष्ट्रामध्ये पुस्तकांची उत्तम बांधणी होत असे, असे काही जुनी पुस्तके पाहिली असता दिसून येते. जुळणी, छपाई व बांधणी या दृष्टींनी काही उत्कृष्ट पुस्तके कर्नाटक छापखान्यातून बाहेर पडली आहेत. त्यांपैकी माझ्या संग्रही असलेले *मराठी नियतकालिकांचा इतिहास* हे पुस्तक उत्कृष्ट वाटते. दुर्दैवाने अशा प्रकारची छपाई अणि पुस्तकबांधणी होणे आज कठीण झाले आहे. सामान्यत: कापडपुठ्याची बांधणी कमी प्रमाणात होत आहे. कागद-वेष्टनाच्या (paper back) बांधणीत योग्य ती मजबुती राहात नाही. परंतु खर्च

९२. आपटे, वा. गो. लेखनकला आणि लेखनव्यवसाय. पृ. ३२३-३२५

कमी ठेवण्यापोटी ती आज रूढ झाली आहे. काही मुद्रणालयांतून उत्तम बांधणी होत असल्यामुळे परदेशांतून आलेले फॉर्म्स येथे पुस्तके बांधण्यासाठी वापरण्यात येतात, ही माहिती असूनही, मी वरील विधाने करतो आहे. याचे कारण महाराष्ट्रातील छापखान्यांतून बाहेर पडणारी बहुसंख्य पुस्तके निकृष्ट बांधणीची असतात. काही परदेशी प्रकाशक एक-दोन वर्षांपूर्वी मुंबईत आले होते आणि इथे पुस्तक छापून घेण्यास उत्सुक होते. त्यांनी या पुस्तक-बांधणीच्या बाबत चिंता व्यक्त केलेली मला माहीत आहे.

महाराष्ट्रीयांची ग्रंथाभिरुची आणि ग्रंथविक्रय

१६८. ग्रंथमुद्रण-व्यवसाय हा ग्रंथ-प्रकाशन-व्यवसायावर अवलंबून असतो. ग्रंथ-प्रकाशन-व्यवसाय ग्रंथ-विक्रीवर अवलंबून असतो. पावरोटी, शर्ट, बूट इत्यादी आवश्यक वस्तूंत पाठ्य-पुस्तकेतर ग्रंथांचा समावेश होत नाही. त्यांच्या वाचनाची अभिरुची असली तरी ग्रंथ गिऱ्हाइकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघटित योजना असावी लागते. आपल्याकडे आज तरी मुंबई, पुणे, यांसारख्या मोठ्या शहरांतील काही अपवाद सोडले तर नवीन मुद्रित पुस्तके पाहायलासुद्धा मिळत नाहीत. मग विक्रीस उपलब्ध होणे तर दूरच. डॉ. केतकरांनी महाराष्ट्रीयांचे काव्य-परीक्षण या आपल्या निबंधात ग्रंथाभिरुची आणि ग्रंथविक्रय या विषयावर एक प्रकरण लिहिले आहे. त्यात महाराष्ट्रातील ग्रंथप्रसाराविषयी सहसा न आढळणारी अशी माहिती दिली आहे. ते म्हणतात :

> " ग्रंथांचा प्रसार आणि ग्रंथविक्रय या गोष्टी भिन्न आहेत. मोरोपंतांच्या आर्या पुराणिकांनीं व हरिदासांनीं लोकप्रिय केल्या, पण त्यांनीं ग्रंथाच्या प्रती करवून त्यांचा प्रसार केला नाहीं. पुण्यासारख्या मोठ्या शहरांत निरनिराळ्या ग्रंथांच्या प्रती सांपडत असत आणि निरनिराळी संस्थानिक मंडळी पुण्याहून ग्रंथांच्या नकला करवून घेत असत. अशी नकल करतांना नकला करणाऱ्यास नकल करण्याचा खर्च मिळत असला पाहिजे यांत शंका नाहीं, पण आपल्यापाशीं ग्रंथ बाळगून वाटेल त्या ग्रंथाची नकल करवून देण्याचा धंदा पुण्यांत होता किंवा नाहीं याविषयीं निश्चयात्मक माहिती नाहीं. तथापि असा धंदा असला पाहिजे असें वाटतें.
>
> पेशवाईच्या काळामध्यें किंवा मराठी राज्यामध्यें ग्रंथांचा प्रसार कसा होत असे, याविषयीं माहिती फारशी नाहीं. तथापि प्रत्येक मोठ्या शहरांत हस्तलिखितांचा साठा पुष्कळांपाशीं होता, हें हस्तलिखितें जमा करणाऱ्यांच्या अनुभवावरून दिसून येतें. अनेक हस्तलिखिते जीं आज उपलब्ध होत आहेत, त्यांवरून मोठमोठे जमीनदार लोक आपल्या पदरीं ग्रंथलेखक बाळगीत, व कित्येक शास्त्री पुराणिक कांहीं ग्रंथ स्वतः लिहून काढीत असें दिसतें. माझ्या परिचयाच्या एका घराण्यामध्यें दोन चार पुरुषांनीं एक दोन पिढ्यांमध्ये शेंसवाशें ग्रंथांची स्वतःच नकल केलेली आहे. अशामुळें कौटुंबिक ग्रंथसंग्रह गरीब भिक्षुकांच्या घरींही तयार झाले आहेत ते मीं पाहिलेले आहेत. याशिवाय विक्रीसाठीं नकला तयार करून ठेवणारे लोकही मीं पाहिले आहेत. अजूनही ओरिसासारख्या मागासलेल्या भागांत हस्तलिखितें तयार करण्याची परंपरा राहिली आहे. कांहीं मंडळी फावल्या वेळांत एकाच ग्रंथाच्या दोनतीन नकला करतात व कांहीं प्रसंगीं एकाच ग्रंथाच्या एखादा मनुष्य दहा-बारा नकला करून ठेवतो, अशींही उदाहरणें क्षेत्रांतून दिसतात. जगन्नाथपुरी येथें मी विक्रीसाठीं हस्तलिखितें तयार करण्याचा प्रकार पाहिला

एवढेंच नव्हे तर ताडपत्रांवर ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्तीही शिल्लक राहिलेली पाहिली आहे. कागद चिंध्यांचा असल्यामुळें पुष्कळांना कागदी पोथी सोवळ्यांत चालत नाहीं. म्हणून ताडपत्रांची परंपरा ओरिसांत अजून आहे. हस्तलिखितें जीं तयार होत तीं प्राप्तीच्या आशेनें होत. भाविक लोक असले ग्रंथ विकत घेऊन ब्राह्मणांस दान देतात व यामुळें पुष्कळ लोक रिकामपणाच्या वेळांत ग्रंथ लिहून ठेवीत असतात. हा किरकोळ धंदा झाला. ग्रंथविक्रेते व ग्रंथप्रकाशक यांच्यासंबंधीची पेशवाईतील अत्यंत जुन्या काळची माहिती उपलब्ध होत नाहीं. अव्वल इंग्रजींत मुद्रणकला आल्यानंतर देखील हस्तलिखितांचा व्यापार चालूच असे. त्या काळची माहिती देण्याचे ऐकीव साहित्य मजपाशी आहे. महाराष्ट्रांतील अत्यंत जुन्या प्रकाशकांपैकी माझे आजोबा गोविंद रघुनाथ केतकर हे असल्यामुळें त्यांच्यासंबंधींची कांहीं माहिती जी मला माझ्या चुलत्यांपासून (कै. नारायण गोविंद केतकर, वकील, उमरावती यांच्यापासून) कळली ती येथें मांडीत आहे. गोविंद रघुनाथ केतकर यांचा जन्म व मृत्यू यासंबंधानें मला माहिती नाहीं. १८१८ नंतर जे पेशव्यांचे कांहीं धनको बुडाले त्यांतच त्यांचे वडील रघुनाथ महादेव केतकर होते, व आपले ऋणको पेशवे बुडाले व धनको मात्र पैसे मागत आहे, असें पाहून त्यांनीं गांगरून जाऊन संन्यास घेतला व ते काशीस जाऊन राहात होते. गोविंद रघुनाथ केतकर यांनीं त्या वेळेस जितकें देणें देतां येईल तितकें देऊन टाकलें व घरांतील बायकांचे दागिने व पोथ्या यांवरच संसार आरंभला, व त्यांचा आयुष्यक्रम एकंदर फिरण्यांत बराच गेला. ते अंजनवेलीस आपल्या घरच्या मंडळींस ठेवून चोहोकडे प्रवास करीत असत. आणि सत्तावन सालच्या पूर्वी त्यांचा व्यापार बराच वाढला होता. तो त्यांच्या झाडून सर्व मराठी दरबारांत असलेल्या ओळखीवरच चालत असे. त्या वेळची पुस्तकविक्रीची पद्धत येणेप्रमाणे होती.

आमचे आजोबा नेहमीं दहापासून वीसपर्यंत खटारे घेऊन फिरत. या खटाऱ्यांतून पुस्तकें भरलेलीं असत, आणि पुष्कळदा एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणावर जातांना त्यांनीं सुरक्षितपणें पोचावें म्हणून ज्या संस्थानांतून ते निघत तें संस्थान बरोबर स्वारहि पाठवी, व दुसऱ्या संस्थानच्या अधिकाऱ्यांच्या हवाली त्या करून देई. एका गावांतून दुसऱ्या गांवीं जातांना मध्यें मोठमोठ्या गांवीं मुक्काम होई आणि त्या प्रसंगी घोड्यांची व बैलांची दाणावैरण गांवच पुरवीत असे; व असला एक पुस्तकसंग्रहवाला आला, म्हणजे त्यांच्या सर्व मंडळींचें स्वागत गांवाकडून चांगल्या तऱ्हेनें होत असे. अशा वेळीं लहानशा गांवांतदेखील पुस्तकें खपत असत, आणि या रीतीनें पुस्तकें घेऊन येणारा व्यापारी क्वचितच येत असल्यामुळें ती वेळ साधून काहीं तरी बरींच पुस्तकें घेऊन ठेवावीं अशी लोकांची प्रवृत्ति होई. जमीनदार वगैरे लोक पुस्तकें घेत असत; परंतु भिक्षुक मंडळींना पुस्तकें घेणें शक्य नसे. तेव्हां भिक्षुकांस पुस्तकें दान करण्याकरिता म्हणून श्रीमंत लोक पुस्तकें घेऊन ठेवीत.

एखाद्या संस्थानिकांच्या गावात हे ग्रंथविक्रेते गेले म्हणजे तो संस्थानिक त्यांची चांगली बडदास्त ठेवी. राहावयास घर मिळे, भांडीकुंडीं मिळत, धान्य, तूप, साखर वगैरे सर्व जिन्नस मिळत व हे पुस्तकविक्रेते आमचे आजोबा यांच्या व संस्थानिकांच्या भेटी व परतभेटीहि होत व सहकुटुंब असल्यास त्यांच्या कुटुंबाच्या व संस्थानिकांच्या घरच्या मंडळींच्या भेटी व परतभेटीहि होत. संस्थानिकास पुस्तकें कोणतीं घ्यावयाचीं हें सर्व सावकाश ठरत असे. कारण संस्थानिकापाशीं जीं पुस्तकें नसतील तीं घ्यावयाचीं एवढेंच नसे तर भांडारांत असलेल्या प्रतीपेक्षां एखादी चांगली नक्कल असेल, तर तीही घ्यावयाची असा रिवाज होता. बडोद्यास असतांना आमचे आजोबा ५०–६० ब्राह्मण लेखक ठेवीत व त्यांचेकडून नवीन नकला करवून घेत. त्या वेळेस या

ब्राह्मण लेखकास दरमहा तीन रुपये देण्यात येत असत असे कळते. याचे कित्येकास आश्चर्य वाटेल, पण वस्तुस्थिति लक्षांत घेतली असतां तीन रुपये ही बरीच बिदागी होत असावी, असें दिसतें. कारण त्या वेळेस या ब्राह्मणास खिचडी दरबारातूनच मिळत असे, आणि ही जी तीन रुपयांची मिळकत होत असे ती खरोखरच त्यांची शिल्लकच पडत असे. आणि त्या वेळेस बरीच स्वस्ताई होती. ग्रंथांच्या किंमतीविषयीं माहिती आहे ती अशी – महाभारत सुमारे १५० पासून २५० रुपयांपर्यंत विकले जाई, व भगवद्गीतेची पोथी दोनपासून तीन रुपयांस विकली जात असे. महाभारताचें दान म्हणजे मोठें दान समजलें जात असें, व त्याबरोबर एक मोहोर तरी दक्षणा दिली पाहिजे असा रिवाज होता. संस्थानिक मंडळी पुस्तकें घेतांना केवळ पुस्तकाची किंमत दिली म्हणजे झालें असें समजत नव्हती. तर आमच्या आजोबांची बिदागी वैयक्तिक दृष्ट्याहि होत असे. बायकांना जरीकांठी लुगडीं मिळत. मुलांना एखादे वेळेस सल्ल्यांची जोडी मिळे, व आमच्या आजोबांस पागोटें, शालजोडी व कधीं कधीं हिऱ्याची आंगठी या वस्तू मिळत. व त्या वेळेस रेल्वे वगैरे नसल्यामुळें इतक्या अडचणींतून ग्रंथप्रसाराचें काम – म्हणजे विद्याप्रसाराचें काम – हे करीत आहेत अशी त्यांच्याविषयीं पूज्य भावना संस्थानिक व इतर गिऱ्हाईक बाळगीत.

गोविंद रघुनाथ केतकर १८५४ सालीं नापत्ता झाले. ते १८५८-५९ सालीं पुन्हां घरीं आले. त्यानंतर त्यांनीं शिळाप्रेसवर पुस्तकें छापून घेऊन तीं विकण्याचें काम सुरू केलें. त्या वेळेचीं कांहीं छापलेलीं पुस्तकें आमच्या घरांत होतीं, व त्यावर गोविंद रघुनाथ केतकर हें नांव होतें. छापखान्याचें नांव आठवत नाहीं, पण ज्ञानसागर असावें, असें वाटतें. गीतगोविंदाच्या दीडशेंच प्रती काढीत असें कळतें. यांच्या ऑफिसमध्यें कै. माधव चंद्रोबा हे कारकून म्हणून प्रथम आले व पुढें ते कांहीं दिवसांनीं भागीदार झाले. कांहीं दिवसांनी माधव चंद्रोबांनीच एकंदर सर्व धंदा विकत घेतला.[९३]

९३. केतकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश, *महाराष्ट्रीयांचे काव्य-परीक्षण*, ज्ञानकोश छापखाना, १९२८, पान १२३–१२६.

१२

महाराष्ट्रातील मुद्रणव्यवसायाची पाहणी

मुद्रण – उद्योगातील वेतनमान[९१]

१६९. मुंबई शासनाच्या कामगार-विभागाने १९३४ साली मुद्रण-धंद्यातील वेतन-मानाची पाहणी केली. ज्या मुद्रणालयांनी माहिती पुरविली, त्या १०० मुद्रणालयांपुरती ही पाहणी मर्यादित होती. यात नाशिकचा सिक्युरिटी प्रेस (स्थापना १९२५), मुंबईचा टाइम्स ऑफ इंडिया प्रेस आणि शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, ही मोठी मुद्रणालये होती. भारतीय फॅक्टरी कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या मुद्रणालयांचा फक्त या पाहणीत समावेश होता. त्यामुळे बहुतांश लहान छापखान्यांचा या पाहणीत समावेश होऊ शकला नाही. तरी ज्या मुद्रणालयांचा समावेश झाला, त्यांच्या आकाराबाबतची माहिती उद्बोधक आहे. त्या वेळी (१९३४) मुंबई प्रान्तात (सिंध सोडून) मुद्रणव्यवसायात काम करणाऱ्या एकंदर कामगारांच्या संख्येपैकी सुमारे ७० टक्के कामगार मुंबई शहरात काम करीत होते, तर सुमारे २३ टक्के कामगार पुणे, नाशिक आणि अहमदनगर, या भागात काम करीत होते. मुद्रण-व्यवसायाची सुरुवात मुंबईत इतर शहरांच्या मानाने बरीच आधी झाली. तेथे वृत्तपत्रे निघाली. अमेरिकन मिशन छापखान्यामुळे आणि विशेषत: थॉमस ग्रॅहॅममुळे, मुद्रण-परंपरा निर्माण झाली. या सर्व कारणांमुळे आणि नंतर मुंबईचा औद्योगिक आघाडीवर जो विकास झाला, त्यामुळे मुद्रणव्यवसायात मुंबई शहर नेहमीच पुढे राहिलेले आहे. पाहणी केलेल्या एकूण १०० मुद्रणालयांपैकी ६२ मुद्रणालये मुंबईतील होती. त्यांपैकी निम्म्या म्हणजे ३१ मुद्रणालयांत २० ते ५० कामगार काम करत होते. ५० ते ३०० कामगार असलेली मुद्रणालये २७ होती, आणि तीनशेवर कामगार असलेली फक्त तीनच मुद्रणालये

91. General Wage Census. Part I. Perennial Factories-Second Report. Govt. of Bombay 1936.

तक्ता 'अ'

मुंबई प्रांत कामगार विभागाच्या पाहणीतील (१९३४) मुद्रणालयांचा आकार[९५]

कामगार संख्या	मुद्रणालये					
	मुंबई शहर	मुंबई उप-नगर, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी	अहमदाबाद शहर	भडोच, सुरत	पुणे, नाशिक, अहमदनगर	एकूण
२० पेक्षा कमी	१	—	४	२	२	९
२० ते ३०	१७	—	२	२	२	२३
३० ते ४०	३	—	२	—	५	१०
४० ते ५०	११	१	१	१	—	१४
५० ते १००	११	१	१	—	५	१८
१०० ते १५०	१०	—	—	—	३	१३
१५० ते ३००	६	१	—	—	२	९
३०० ते ५००	१	—	—	—	—	१
५०० पेक्षा जास्त	२	—	—	—	१	३
पाहणी केलेली एकूण मुद्रणालये	६२	३	१०	५	२०	१००
त्यातील एकूण कामगार	६४५२	२८४	२६५	११४	२०८९	९२०४
सरासरी मासिक वेतनमान रुपये	३७·५८	२५·८१	२५·९१	२२·४४	२७·०१	३४·३७

95. Ibid page 4, 6 and 50

होती. सरासरी वेतन मुंबईत रु. ३७·५८ आणि पुण्यात रु. २७·०१ होते. हा वेतन-मानातील फरक अलीकडे बराच संकुचित झाला आहे. पहा पान १९६ वरील तक्ता 'अ'.

१७०. मुद्रण-व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांच्या मासिक कमाईची माहिती तक्ता 'ब' (पान १९८) मध्ये दिली आहे. मुद्रण-कामगारांच्या वेतनातील वाढीच्या प्रमाणाचा अभ्यास होणे जरूर आहे. पण सध्याची आकडेवारी मला आता उपलब्ध नाही; म्हणून मी खेर-समितीने महाराष्ट्राच्या चार भौगोलिक विभागांकरिता शिफारस केलेले वेतनमान या तक्त्याच्या शेवटच्या स्तंभात उद्धृत केले आहे. वेतनमानातील वाढीचा अभ्यास मोठा उद्बोधक ठरणार आहे. जुळणीखात्यातील कामगारांच्या वेतनात २०० टक्क्यांहून जास्त वाढ झाली आहे, तर मुद्रितशोधकांच्या वेतनात झालेली वाढ फक्त सुमारे १०० टक्के आहे. बांधणीखात्यात २०० ते ३०० टक्के वाढ झाली आहे. लायनोटाईप ऑपरेटरच्या पगारात सुमारे २० टक्के वाढ आहे, तर मोनोऑपरेटरचा पगार दुप्पट झाला आहे. अर्थात १९३४ चे आकडे आणि आताचे आकडे यांत फरक आहे. १९३४चे आकडे सरासरी नगद वेतनाचे आहेत, तर आताचे आकडे एकतर किमान वेतनाचे आहेत, आणि त्यांत महागाईभत्ता धरलेला नाही; शिवाय प्रत्यक्षात निदान मुंबई शहरात तरी, दीड ते दोन पट वेतन मिळते. यासाठी प्रत्यक्षात दिल्या जाणाऱ्या वेतनाची नव्याने पाहणी केली पाहिजे. पहा पान १९८ वरील तक्ता 'ब'.

१७१. इ.स. १९५६ साली 'पहिल्या मुंबई राज्य किमान वेतनसमिती'ने[९६] मुद्रणालयांना एक प्रश्नावली पाठविली होती. तिला मुंबई शहरातील एकंदर ९७५ मुद्रणालयांनी उत्तरे पाठविली. त्यांपैकी ४७ म्हणजे सुमारे पाच टक्के मुद्रणालयांत एकही कामगार नव्हता. सुमारे २५ टक्के (२५०) मुद्रणालयांत फक्त १ ते ४ कामगार होते. ५ ते ९ कामगार असलेली मुद्रणालयेही २५ टक्के (२५०) होती. सुमारे ४५ टक्के मुद्रणालयांत (४४९) १० ते ४९ कामगार होते. ५० ते ९९ कामगार असलेली मुद्रणालये फक्त ३८ होती, आणि त्याहून जास्त कामगार असलेली मुद्रणालये २२ होती. कामगारसंख्या हे मुद्रणालयाचे आकारमान समजावयास हरकत नाही. आजही आकाराचे हेच प्रमाण दिसून येते. पुण्याचे आकडे जरा वेगळे आहेत. एकंदर १७५ मुद्रणालयांनी माहिती पुरविली. त्यांपैकी कामगार नसलेली मुद्रणालये सुमारे ७ टक्के (१२) होती. एक ते चार कामगार असलेली २० टक्के (३४) होती. तर पाच ते नऊ कामगार असलेली १७ टक्के (२९) होती. १० ते ४९ कामगार असलेली २२ टक्के (३८) आणि ५० ते ९९ कामगार असलेली ५ टक्के (९) होती. पुण्याची मुद्रणालये मुख्यतः ग्रंथमुद्रण करणारी मुद्रणालये आहेत. तर मुंबईत बहुसंख्य मुद्रणालये (७५ टक्क्यांहून जास्त), व्यापारी मुद्रण करणारी

96. Minimum Wages Committee Report, Government of Bombay, 1956

तक्ता ‘ब’

१९३४ सालची मासिक कमाई (रुपयांत)

	मुंबई शहर	उपनगर ठाणे कुलाबा रत्नागिरी	पुणे नाशिक अहमदनगर	महाराष्ट्र विदर्भ सोडून इतर विभागांसाठी सुचविलेले किमान वेतन[९७] विभाग १	२	३	४
मुख्य आवेक्षक	२५४	२२५	१८६	सुचविले नाही			
आवेक्षक	९४.५	५७	६४				
कार्यदेशक (मुद्रण)	१६७	—	८०				
जुळणी कार्यदेशक	८१	—	४९	१५५	१४०	१३५	१३०
बांधणी कार्यदेशक	५९	३७	५१				
मुद्रित-शोधक	६२.८	२५	३८.३	१३०	११५	११०	१०५
जुळारी	३८.२	२२.६	२३.२	१३०	११५	११०	१०५
इम्पॉझिटर	४२.३	—	३०.२	११५	१००	९५	९०
मुद्राक्षर वितरक	२१	१५.६	१२	९५	८०	७५	७०
ट्रेडल यंत्र चालक	३३.६	३१.६	२५.७	११५	१००	९५	९०
सिलिंडर यंत्रचालक	४७.२	२६.६	३१.८	१३०	११५	११०	१०५
				११५	१००	९५	९०
साह्यकारी	२१.५	१४.५	१४	९५	८०	७५	७०
मोनो ऑपरेटर	६१.२	—	३२	१३०	११५	११०	१०५
मोनो ओत परिचर	५१.६	—	२६.६	११५	१००	९५	९०
पंक्ती मुद्रण यंत्रचालक	१३६.६	—	४८.२	१५५	१४०	१३५	१३०
शिलामुद्रण यंत्र-चालक	४२.३	३७.३	५३	१३०	११५	११०	१०५
प्रतिरूप मुद्रक	५१.६	५३.७	२९.४	१५५	१४०	१३५	१३०
बांधणीकार	२९.७	२०.९	२५.२	११५	१००	९५	९०
				१०५	९०	८५	८०
तार व हात शिलाईकार	२३.८	९.२	१३.१	९५	८०	५३	७०
बांधणीकार नोकर	१४.९	—	८.९	८५	७०	६५	७०

९७. १. बृहनमुंबई; २. पुणे, ठाणे, कल्याण, उल्हासनगर, मळवली; ३. सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, आणि ४. जिल्ह्याची ठिकाणे.

आहेत. किमान वेतन समितीने केलेली पाहणी प्रामुख्याने पगारमानाविषयी असल्यामुळे भांडवलाची गुंतवणूक, नफ्याचे प्रमाण, यंत्रसामग्री इत्यादी माहिती त्यावरून मिळत नाही. तक्ता 'क' – मुंबई प्रान्तातील पश्चिम महाराष्ट्र विभागातील मुद्रणालये आणि कामगार यांच्या माहितीचा तक्ता पान २०० पहा.

मोठ्या शहरातील लहान मुद्रणालये*

१७२. दुसरी पाहणी डिसेंबर १९५४ ते फेब्रुवारी १९५६ या काळात झाली.[९८] भारतीय फॅक्टरी कायदा १९४८ मध्ये अंतर्गत उत्पादनप्रक्रिया किंवा दुरुस्ती अशी व्याख्या केलेल्या औद्योगिक कारखान्यापुरती ही चौकशी मर्यादित होती. त्यात मुद्रणालयांचा समावेश होता. इतर लघुउद्योगांच्या तुलनेने लहान मुद्रणालयांच्या संसाराची ही पाहणी मोठी उद्बोधक आहे. या पाहणीच्या कक्षेत येणाऱ्या लहान मुद्रणालयांचे दोन गट होतात. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे :

(अ) दहापेक्षा कमी कामगार असलेली व वीज वापरणारी मुद्रणालये.

(ब) वीसपेक्षा कमी व वीज न वापरणारी.

ही पाहणी जरी मुंबई शहरातील परिस्थितीवर आधारली असली तरी गोळा केलेली माहिती, तिचे पृथक्करण आणि विवेचन देशातील लहान मुद्रणालयांच्या अभ्यासासाठी फार उपयुक्त ठरते. या अहवालानुसार त्या वेळी मुंबई शहरात लहान-मोठी १०५० मुद्रणालये होती व त्यांत सुमारे १९,००० कामगार होते. अहवालात मोठी, मध्यम व लहान अशी तीन प्रकारची मुद्रणालये उल्लेखिली आहेत.

(अ) **मोठी मुद्रणालये** विशेषेकरून वर्तमानपत्रे व नियतकालिके छापतात. सामान्यपणे जी कामे मध्यम मुद्रणालयात होतात ती कामेही, अनेक पानांची आणि अनेक प्रतींची असल्यास, किंवा विशेष चांगल्या दर्जाची असल्यास, या मोठ्या मुद्रणालयांतून केली जातात.

(ब) **मध्यम मुद्रणालये** विशेष म्हणजे ती पुस्तके, अनेकरंगी पोस्टर्स, नकाशे, लेबले इत्यादींचेही काम करतात. सर्वसाधारपणे जी कामे लहान मुद्रणालयात होतात ती कामेसुद्धा काही प्रमाणात ही मध्यम आकाराची मुद्रणालये करतात.

(क) **लहान मुद्रणालये** प्रामुख्याने लेटरहेड्स, व्हिजिटिंग कार्ड्स, आमंत्रणपत्रिका, पावतीपुस्तके व बिलबुके, लेजर वह्या, हजेरी पुस्तके, हँडबिले आणि अशाच प्रकारची एकरंगी किंवा दुरंगी किरकोळ कामे करतात.

* यापुढील विवेचनात जे तक्ते दिले आहेत ते "स्मॉल इंडस्ट्री इन बिग सिटी" या सर्व्हे अहवालावरून दिले आहेत. मूळ तक्त्यांचा निर्देश T या अक्षरापुढे मुळातील संदर्भ देऊन केला आहे.

98. Lakdawala D. T. Sandesara J. C. *Small Industry in a Big City— A Survey in Bombay*, University of Bombay, Bombay 1961

अनुक्रमणिका

विभाग	एकूण मुद्रणालये	एकही कामगार नसलेली मुद्रणालये	१ ते ४ कामगार मुद्रणालये	१ ते ४ कामगार कामगार संख्या	५ ते ९ कामगार मुद्रणालये	५ ते ९ कामगार कामगार संख्या	१० ते ४९ कामगार मुद्रणालये	१० ते ४९ कामगार कामगार संख्या	५० ते ९९ कामगार मुद्रणालये	५० ते ९९ कामगार कामगार संख्या	१०० ते ४९९ कामगार मुद्रणालये	१०० ते ४९९ कामगार कामगार संख्या	एकूण कामगार
अहमदनगर	२९	२	१६	४०	३	२०	३	७२	१	६२	—	—	१९४
पश्चिम खानदेश	२३	१	१३	३५	७	४८	२	२५	—	—	—	—	१०८
पूर्व खानदेश	४१	४	१४	४३	१७	११३	२	२८	—	—	—	—	१८४
कुलाबा	१७	३	८	१९	४	२७	१	२१	—	—	—	—	६७
कोल्हापूर	६२	१२	२४	४९	११	६२	७	१०२	१	८१	—	—	२९४
नाशिक	५४	७	१९	५१	१०	७३	३	४७	१	७५	२	२८६७	३११३
पुणे	१७५	१२	३४	८५	२९	२११	३८	७४५	९	५६४	६	११७१	२७७६
रत्नागिरी	२६	२	८	१८	८	४५	१	२५	—	—	—	—	८८
उत्तर सातारा	३८	८	१७	४४	६	३८	४	६०	—	—	—	—	१४२
दक्षिण सातारा	५१	५	२९	६८	११	७४	१	१७	१	६९	—	—	२२८
सोलापूर	६२	५	३२	८३	१४	९३	४	७३	—	—	—	—	
ठाणे	४१	१	६	११	४	२७	४	६०	—	—	—	—	१०८
मुंबई	९७५	४७	२५०	६६७	२५२	१६९९	४४९	४६५९	३८	२५६४	२२	६६०८	१६,१९७

99. Report of the Minimum Wages Committee. Printing Industry 1955. Government of Bombay **1956** pp. 66-69.

अनुक्रमणिका

मुंबई शहरातील मुद्रणालये (१९५५)

१७३. पाहणीच्या वेळी मुंबईतील नोंदलेल्या एकूण १०५० मुद्रणालयांपैकी ७०० किंवा जवळजवळ ७० टक्के मुद्रणालये लहान होती. त्यांत २० पेक्षा कमी कामगार होते. या लहान मुद्रणालयांतून ४२०० म्हणजे (एकूण १९००० कामगारांच्या) सुमारे २० टक्के कामगार होते. पैकी एकतृतीयांश मुद्रणालयांत फक्त सहा ते दहा कामगार होते. या दुसऱ्या गटातील मुद्रणालये एक किंवा दोन ट्रेडलवाली होती. काही मुद्रणालयांत प्लेटनयंत्रे पण बसविलेली होती. नमुन्यादाखल एका लहान मुद्रणालयाची यंत्रसामग्री देतो.

लहान मुद्रणालयांतील मुद्रणयंत्र सामग्री	**किंमत**
(अ) ट्रेडल ८" × १२" / १०" × १५" आवश्यक सामग्रीसह	रु. ७,०००
(ब) टाइप व इतर सामग्री	रु. २,०००
(क) टेबल, दोन खुर्च्या, स्टँड व इतर सामान	रु. ३००
(ड) खेळते भांडवल	रु. १,२००
(इ) कापण्याचे व छिद्रे पाडण्याचे यंत्र ...	रु. २,५००
	रु. १३,०००

मुद्रणाची अतृप्त कुवत (unutilized capacity, 1955) **व त्याची कारणे**

विशेष अभ्यास केलेल्या ३१ मुद्रणालयांपैकी २७ मुद्रणालये पूर्ण कुवतीने (full utilization) काम करत नव्हती. उपयोगात आणलेली कुवत शेकडेवारीत अशी :

मुद्रणालये : संख्या	१	३	२	७	५	७	२
टक्केवारी काम	११/२०	२१/३०	४१/५०	५१/६०	६१/७०	७१/८०	८१/९०

१७४. पाहणीच्या काळात (१९५५) छपाई कामात घट झाल्याची नोंद आहे. त्याची प्रमुख कारणे दिली आहेत ती अशी :

(१) शासननियंत्रित शिधावाटप बंद झाल्यामुळे, एतद्विषयक छपाईच्या कामाची मागणी कमी झाली.

(२) प्रवासीमोटार वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे, त्यासाठी तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी होणारे छपाई काम काही मध्यवर्ती ठिकाणी केंद्रित झाले.

(३) शासन, स्थानिक संस्था व खाजगी संस्थांनी स्वतःची मुद्रणालये स्थापन केली व असलेली वाढविली.

(४) अनेक प्रती काढण्यासाठी सायक्लोस्टाइलिंग आणि इतर काटकसरीच्या साधनांचा अवलंब करण्यात येऊ लागला.

तक्ता 'ड'

गुंतविलेले भांडवल आणि विनियोग

	स्थापनेच्या वेळची स्थिती T III 1		सद्यःस्थिती T III 2		सद्यःस्थिती रिप्लेसमेंट मूल्य T III 5	
	संख्या	टक्के	संख्या	टक्के	संख्या	टक्के
वीज वापरणारी मुद्रणालये	१५	४८.४	२९		२९	
			(खालील माहिती २९ मुद्रणाल्यांविषयी आहे.)			
वीज न वापरणारी मुद्रणालये	१६	५१.६				
यंत्रसामग्री-मध्ये गुंतविलेले भांडवल	४,९१,७७५	६९.४	३,३२,६६१	६५.६	५,५१,८८५	७३.४
फर्निचर व पिकाव्यांमध्ये गुंतविलेले भांडवल	[illegible]	५.६	२३,९२९	४.७	४९,२२६	६.६
एकूण अचल संपत्ती	५,३१,७७१	७६ %	३,५६,५९०	७०.३ %	६,०१,१११	८० %
गुडविल	१८,०५१	२.५%	—	—	—	
खेळते भांडवल	१,५८,६९७	२२.४ %	१,५०,४५३	२९.७ %	१,५०,४५३	२० %
एकूण	७,०८,५१९	१००%	५,०७,०४३	१००%	७,५१,५६४	१०० %
ग्रंथित व रिप्लेसमेंट किंमतीच्या उत्पादन भांडवलाची गुंतलेल्या भांडवलाशी टक्केवारी (T. III. 6)		१०० %		६७ %		११३ %
भाडे (T III 1) २०,८०२						
प्रत्येक मुद्रणालयाचे			(T III 2)		(T III 5)	
सरासरी अचल भांडवल	—	—	१२,२५८	—	२०,७२८	—
एकूण भांडवल सरासरी	—	—	१७,४४८	—	२५,९१६	—

खेळत्या भांडवलाचे घटक (T III 7)

मुद्रणालयांची संख्या	३१	शेकडेवारी
कच्चा माल	४२,८९७	२७%
तयार मालाचा साठा	२,४५०	१·५%
चालू काम	१०,१८१	६·४%
रोख रक्कम हातात व बँकेत	५२,३१९	३३·३%
येणे	५०,२५०	३१·७%
एकूण	१,५८,६९७	१००%
सरासरी खेळते भांडवल (T III 8)	५,१९९	

छापखान्यांच्या मालकीचे प्रकार व भांडवली रचना

१७५. 'लहान' गटात मोडणारे बहुतांश छापखाने खाजगी मालकीचे होते. एकूण ३१ मुद्रणालयांपैकी २१ (६७·७%) वैयक्तिक मालकीची आणि ३ (९·७%) एकत्र कुटुंबाच्या मालकीची होती. फक्त ५ मुद्रणालये (१६·१%) भागीदारीत व २ (६·५%) प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांची होती.

गुंतविलेले भांडवल व त्याचा विनियोग

१७६. एकंदर २९ खाजगी मुद्रणालयांनी माहिती दिली. त्यांपैकी १३ मुद्रणालयांजवळ रु. १०,००० इतकेच भांडवल होते. १३ मुद्रणालयांकडे रु. १०,००० ते रु. २५,००० इतके भांडवल होते. फक्त ३ मुद्रणालयांचे प्रत्येकी भांडवल रु. २५,००० ते रु.५०,००० इतके होते. या पाहणीतील लहान मुद्रणालयांमध्ये झालेली भांडवलाची गुंतवणूक आणि वेगवेगळ्या गटातील टक्केवारी या अहवालांत दिली आहे. त्या पैकी ७० ते ८० टक्के भांडवल यंत्रसामग्री आणि शिलकी सामानात गुंतविलेले आहे. २० ते ३० टक्के भांडवल खेळते आहे. एकंदर यंत्रसामग्रीची मूळ किंमत ४·९२ लक्ष होती. घसारित किंमत ३·३३ लक्ष होती, तर यंत्रसामग्री नवीन घेण्यास ५·५२ लक्ष रक्कम लागणार होती. आजची स्थिती पाहून वेगळी आहे. आज चालू यंत्रसामग्री बदलण्यास चौपटीहून जास्त खर्च येईल, आणि घसारा मूळ किंमतीवर काढण्याची पद्धत असल्यामुळे भांडवलाचा क्षय होतो आहे, असे दिसून येईल. खेळत्या भांडवलापैकी २७ टक्के भांडवल कच्च्या मालात (कागद) आणि ३१ टक्के उधारीत गुंतलेले होते.

१७७. मुद्रणव्यवसायासकट सात उद्योगधंद्यांचा अभ्यास या पाहणीत करण्यात आला होता. त्यांच्या ग्रंथित मूल्यावर आधारित उत्पादक भांडवलाचे तुलनात्मक विवरण तक्ता 'इ' मध्ये केले आहे.

अनुक्रमणिका

	पिठाच्या गिरण्या	कापड रंगवणे आणि छापणे	धातूच्या किरकोळ वस्तू	यंत्र कारखाने	फर्निचर	फोटोग्राफी	संकीर्ण व्यवसाय	प्रिंटिंग
	१	२	३	४	५	६	७	८
एकंदर कारखाने	१०२	१८	४२	२२	३६			२९
	%	%	%	%	%	%	%	%
यंत्रसामग्री	५७·९	५१·२	६०·८	६०·३	१४·०	५५·९	१४·९	६५·६
फर्निचर ॲण्ड फिक्स्चर	५·०	१·८	३·२	४·०	१·९	१७·६	२·४	४·७
खेळते भांडवल	३७·१	४७·०	३६·०	३५·७	८४·१	२६·४	८२·८	२९·७
सरासरी भांडवल रुपयांत	१,५९१	१,५८३	३,०१६·७	६,६१६·६	५५६·६	३६६८·४	८३७·४	१२,२५८·३
एकूण भांडवल	२,४१७	२,९८७	४,७१०·५	१०,२९७·९	३,४७९·८	४,९८६·२	४,८५५·७	१७,४४६·३

खेळत्या भांडवलाची गुंतवणूक (T III 7)

एकंदर कारखाने T III 7	११४	२०	४२	२५	३७	२२	३९	३१
	%	%	%	%	%	%	%	%
कच्चा माल, वंगण, जळण	१·४	३८·३	३०·०	१४·९	१७·०	२८·९	१३·९	२७·०
तयार माल	०·२	२·५	९·४	१०·३	३०·६	७·४	५·२	१·५
चालू काम	०·२	३·९	५·९	७·७	१२·७	५·७	१·२	६·४
रोख रक्कम हातांत व बँक	९६·०	१९·७	२०·२	२१·५	१६·४	२३·७	३१·९	३३·३
येणे	२·२	३५·५	३४·५	४५·५	२३·४	३४·२	४७·७	३१·७
खेळत्या भांडवलाची प्रतिगट सरासरी रुपये T III 8	८११·५	१,३३५·६	१,९०९·१	३,७४४·९	३०५०·८	१,३१५·४	२,१८९·६	५,११९·३

उत्पादक भांडवलाची गुंतवणूक

लहान मुद्रणालयांमध्ये गुंतविण्यात आलेले एकूण भांडवल इतर धंद्यांच्या तुलनेने जास्त आहे असे दिसून येईल. तसेच इतर सर्व व्यवसायांच्या तुलनेने खेळते भांडवलसुद्धा मुद्रणालयांना जास्त प्रमाणात लागते. पहा तक्ता ' इ '.

कामगारांचे वर्गीकरण व व्यवस्थापकीय व्यक्तींची गुणवत्ता

१७८. सर्व ३१ मुद्रणालयांत त्यांचे मालक निरनिराळ्या प्रकारे प्रत्यक्षात काम करत होते. एकूण २७ मुद्रणालयांत त्यांना पगारी कामगारांचे आणि फक्त चार ठिकाणी कुटुंबातील व्यक्तींचे साहाय्य होते. एकूण ३१ मुद्रणालयांत २१९ माणसे काम करत होती. त्यांत मालकांपैकी ४९, त्यांचे कुटुंबीय ६, व्यवस्थापक १२, कुशल कामगार १३९, आणि अकुशल कामगार फक्त १३ होते. या धंद्यात फायद्याच्या प्रमाणात कुशल कामगारांची संख्या फार मोठी आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. पहा तक्ता ' ई '.

तक्ता ' ई '

कामगारांचे वर्गीकरण व्यवस्थापकीय व्यक्तींची गुणवत्ता

	संख्या	शेकडेवारी	इतर धंद्यांतील शेकडेवारी* किमान	इतर धंद्यांतील शेकडेवारी* कमाल
मालक	४९	२२·४	(२) १७·७	(१) ४७·२
कुटुंबातील व्यक्ती	६	२·७	— —	(७) ११·८
सवेतन (स्थापकीय)	१२	५·५	(५) १·३	(७) ९४·६
कुशल कामगार	१३९	६३·५	(७) ३९·७	(२) ६८·८
अकुशल कामगार	१३	५·९	(२) १·४	(७) १८·०
एकूण	२१९	१००%		

१७९. त्या वेळी मुंबई शहरामधील या लहान छापखान्यांतून काम करणारे सुमारे ९० टक्के कामगार मुंबई राज्यातील होते. यावरून परप्रांतीय कामगार मुद्रण धंद्याकडे आकर्षिले नव्हते, असे दिसून येईल. एकूण कामगारांपैकी ९१ टक्के कामगार निश्चित वेतनश्रेणीत होते. ७ आणि ९ टक्के कामगार कंत्राटी होते. व्यवस्थापकीय कामगारांचे सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये १,३१० होते. कुशल कामगारांचे वार्षिक उत्पन्न सरासरी रु. १,१३२·३ आणि अकुशल कामगारांचे रु. ३९६·५ इतके होते. या मुद्रणालयांच्या मालकांच्या शैक्षणिक

* कंसातील आकडे धंद्याचे निदर्शक : १. पिठाच्या गिरण्या २. रंगविणे-छापणे ३. धातूच्या किरकोळ वस्तू ४. यंत्र कारखाने ५. फर्निचर ६. फोटोग्राफी ७. संकीर्ण व्यवसाय.

पात्रतेविषयीची जी माहिती अहवालात दिली आहे ती अत्यंत मनोरंजक आहे. एकंदर ४९ पैकी दोन निरक्षर होते. २० मॅट्रिक झालेले आणि २० मॅट्रिकपर्यंत शिकलेले होते. पदवीधर दोन. त्यांपैकी तंत्रशाखेची पदवी घेतलेला फक्त एकच होता. पहा तक्ता ' फ '.

तक्ता ' फ '

मुद्रणालयाच्या मालकाची शैक्षणिक पात्रता

			इतर धंद्यांतील आकडेवारी*	
	क्र.	टक्केवारी	किमान	कमाल
(१) निरक्षर	२	४·१	(६) नाही	(३) २४·६
(२) साक्षर, प्राथमिक शिक्षण	५	१०·२	(६) १६·०	(२) ५६·०
(३) माध्यमिक शिक्षण व मॅट्रिकपर्यंत	२०	४०·८	(२) ८·०	(६) ४१·०
(४) मॅट्रिक	२०	४०·८	(५) ७·०	(२) २०·०
(५) पदवीपूर्व शिक्षण व पदवीधर	१	२·०	(१) २·७	(७) ६·०
(६) तंत्र शाखा पदवी	१	२·०	(४) ३·३	(६) २५·०
	एकूण ४९	१००%		

उत्पादन खर्च वितरण

१८०. मुद्रणव्यवसायात शिक्षित मालक जास्त प्रमाणात तर पदवीधर आणि तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांची संख्या तुलनेने कमी होती.

१८१. या मुद्रणालयांतून करण्यात आलेल्या मुद्रण कामाचा आणि उत्पादन-खर्चाचा अभ्यास, आर्थिक अंदाजपत्रकीय व निर्मिती खर्च नियंत्रणाच्या दृष्टीने, विचार करण्यास उपयोगी ठरेल, म्हणून परिशिष्टात दिला आहे. याच पाहणीत इतर सात उद्योगधंदे व मुद्रणालयांच्या या उत्पादन-खर्चातील विविध रकमांची टक्केवारी तुलनेसाठी दिली आहे. पहा तक्ता ' ग '.

* कंसातील आकडे धंद्याचे निदर्शक : १. पिठाच्या गिरण्या २. रंगविणे-छापणे ३. धातूच्या किरकोळ वस्तू ४. यंत्र कारखाने ५. फर्निचर ६. फोटोग्राफी ७. संकीर्ण-व्यवसाय.

तक्ता 'ग'
उत्पादन खर्च वितरण

	रुपये	एकूण खर्चाची टक्केवारी	इतर धंद्यांतील टक्केवारी* किमान	इतर धंद्यांतील टक्केवारी* कमाल
(अ) भाडे	१९,९०२	३·०	(७) १·८	(१) ८·८
(ब) सामग्री				
१. जळण व वंगण	५,२३१	०·८	(७) ०·३	(१) १९·५
२. कच्चा माल	२,२४,०८९	३४·८	(१) १·४	(७) ५८·२
३. वेष्टन कागद व इतर सामग्री	४,७८८	०·७	(५) ०·३	(७) २·५
४. यंत्रदुरुस्ती इत्यादी	७,७३७	१·२	(५) ०·१	(१) ४·३
५. उपभोक्त्यांना कामापोटी दिलेली रक्कम	२०,६०१	३·२	(१) ०·४	(२) ६·३
६. इतर खर्च	३३,३९९	५·२	(३) २·०	(६) ५·७
१ ते ६ एकूण	२,९५,८४५	४५·९	—	—
(क) पगार व वेतन	१,७८,२७२	२७·७	(७) १३·९	(२) ३०·८
एकूण खर्च (अ) + (ब) + (क)	४,९४,०१९	७६·७	—	—
एकूण निव्वळ नफा	१,५०,४०१	३३·३	(७) १९·५	(१) ३८·९
एकूण	६,४४,४२०	१००·०	—	—
उत्पादकतेचा निर्देशांक		६४·५	(४) ४७·६	(३) ६१५.

* कंसातील आकडे धंद्याचे निदर्शक : १. पिठाच्या गिरण्या २. रंगविणे-छापणे ३. धातूच्या किरकोळ वस्तू ४. यंत्र कारखाने ५. फर्निचर ६. फोटोग्राफी ७. संकीर्ण-व्यवसाय.

	पिठाच्या गिरण्या	डाइंग प्रिंटिंग	किरकोळ धातू, वस्तू	इंजिनियरिंग वर्कशॉप	फर्निचर	फोटोग्राफी	किरकोळ उद्योगधंदे	मुद्रण
	१	२	३	४	५	६	७	८
अ. भाडे	८·८	३·१	२·१	२·५	३·६	५·१	१·८	३·१
ब. सामान								
१. जळण व वंगण	१९·५	१·५	३·९	१·९	०·६	०·५	०·३	०·८
२. कच्चा माल	१·४	३१·५	४४·५	२६·९	४४·८	२५·५	५८·२	३४·८
३. वेष्टण व इतर सामान	०·६	१·१	१·८	०·५	०·३	९·९	२·५	९·७
४. दुरुस्ती	४·३	०·९	१·१	१·३	०·१	०·६	०·३	१·२
५. बाहेरचे काम	०·४	६·३	१·०	२·३	२·६	१·८	१·०	३·२
६. इतर खर्च	३·७	२·२	२·०	४·६	३·६	५·८	२·४	५·२
एकूण १ ते ६	२९·९	४३·५	५४·३	३७·३	५२·२	३५·१	६४·७	४५·९
क. रोजगार व पगार	२२·३	३०·८	१८·९	२४·०	१७·६	२५·८	१३·९	२७·७

	पिठाच्या गिरण्या	डाइंग प्रिंटिंग	किरकोळ धातू, वस्तू	इंजिनियरिंग वर्कशॉप	फर्निचर	फोटोग्राफी	किरकोळ उद्योगधंदे	मुद्रण
एकूण अ, ब, क,	६१·१	७७·४	७५·३	६३·८	७३·४	६५·९	८०·५	७६·७
निव्वळ नफा	३८.९	२२·६	२४·७	३६.१	२६·६	३४·०	१९·५	२३·३
उत्पादकतेचा निर्देशांक	५१·९	५६·५	६१·५	४७·६	५२·६	५४·६	४९·५	६४·५

आठही उद्योगांत मुद्रण व्यवसाय कुवतीचा (capacity) सर्वांत जास्त उपयोग केला जातो हे लक्षात येईल.

अनुक्रमणिका

लहान मुद्रणालयांसमोरील समस्या

१८२. डॉ. लकडावाला व सांदेसरा यांच्या मते, मुंबईतील लहान मुद्रणालयांसमोर तेव्हा पुढील प्रमुख समस्या होत्या :

(१) अपुरी मागणी, अपुरे काम.

(२) अपुरे भांडवल की ज्यामुळे लहान मुद्रणालयांना मोठी कामे घेता येत नाहीत. कर्जाच्या अपुऱ्या उपलब्ध सोयी.

(३) आवश्यक वस्तूंचा तुटवडा, अपुरा साठा, यामुळे उत्पादनक्षमतेचा अपुरा उपयोग.

(४) कुशल कामगारांचे दुर्भिक्ष, विशेषेकरून कामाच्या गर्दीच्या काळात.

(५) काही छोट्या मुद्रणालयांना कापणीयंत्रासारख्या साध्या सोईसाठी इतर मुद्रणालयां-वर अवलंबून राहावे लागते, यामुळे वक्तशीरपणात बाध येतो.

(६) लहान मुद्रणालयांचे काम हळूहळू मध्यम व मोठ्या मुद्रणालयांकडे स्थलांतरित होत जाते.

(७) योग्य अशा निर्मिती मूल्यमापन आणि दरदाम पद्धतीचा अनुपयोग.

१८३. शेवटी मुंबईतील लघु उद्योगांची (मुद्रणालयांसकट) पाहणी संपविताना डॉ. लकडावाला व सांदेसरा म्हणतात —

> " तथापि समस्येचें मूळ दुसरीकडेच आहे. पुष्कळशा लघु-उद्योगांच्या बाबत मागणीहून पुरवठा जास्त हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. इतर कारखान्यांशीं स्पर्धा हें कारण नसून आपापसांतील स्पर्धा हें कारण आहे. बाजारांतील मालाच्या मागणीच्या मानानें जास्त असलेली उत्पादनक्षमता हें समस्येचें सार आहे. कार्यक्षमता वाढवून किंमत कमी झाली म्हणजे मागणी वाढण्यास वाव असेल तेवढी बाजारांतील मागणी वाढेल, व वाया जात असलेली कुवत तेवढीच वाचेल. उत्पन्नांत वाढ झाल्यास, मालाची मागणी वाढण्यास मदत होईल. पण सर्वसाधारणपणें, इतर क्षेत्रांत रोजंदारी वाढवून या क्षेत्रांतील गर्दी कमी करणे हाच मार्ग आहे. प्राप्त परिस्थितींत लघु-उद्योग घटकांची समस्या हा जलद आर्थिक प्रगतीच्या मोठ्या समस्येचा एक भाग ठरतो. " [१००]

100. Lakdawala D. T. Sandesara J. C. *Small Industry in a Big City — A Survey in Bombay*, University of Bombay, Bombay 1961

अनुक्रमणिका

१४

लहान मुद्रणालयांचे प्रश्न

मुद्रण – व्यवसाय एक लघुउद्योग

१८४. मुद्रण उद्योग हा बहुतांशी सर्व जगभर लघुउद्योगच आहे. अमेरिकेत जरी मोठ्या कारखान्यात काम करणारे कामगार ५० टक्क्यांहून जास्त असले तरी लहान छापखाने संख्येने ४० टक्क्यांहून अधिक आहेत, आणि फ्रान्समध्ये तर ते ९० टक्क्याहून जास्त आहेत. यावरून ही गोष्ट लक्षात यावी की, औद्योगिक प्रगती होईल तसतसे लहान छापखाने बंद पडतील ही भीती वृथा आहे.

> " So much has been written about the future of the Printing Industry in terms of large groups and advanced technology that one might think the days of small printer were numbered. This is very far from being true, despite the difficulties which small printers today have in command with small traders and manufacturers.[101]

उत्पादनाच्या उपलब्ध साधनांच्या योग्य उपयोगाने जास्तीत जास्त काम काढून उत्पन्न वाढविणे आणि राहणीमानाचा दर्जा वाढविणे या कामात, सामान्यतः लघुउद्योग आणि पर्यायाने लघुमुद्रणालये ही चांगली साधने आहेत. लहानपणात काही फायदे अंतर्भूतच असतात. उदाहरणार्थ :

(१) लहान प्रमाणात करावयाच्या उद्योगात गिऱ्हाइकांच्या गरजांशी उत्पादनाची सांगड घालता येते.

(२) एका बाजूस गिऱ्हाईक, दुसऱ्या बाजूस कच्चा माल आणि इतर उत्पादनसामग्रीचा पुरवठा करणारांशी तसेच मोजक्या कामगारांशी साक्षात संबंध राहतो.

(३) साध्या व्यवस्थापकीय रचनेने काम भागते आणि वरखर्च कमी येतो.

101. Engene Staley and Richard Morse, *Modern Small Industry for Developing Countries.*

अनुक्रमणिका

१८५. मुद्रणालये, विशेषत: वैयक्तिक उपयोगाचे मुद्रण करणारी आणि लहानसहान व्यापाऱ्यांसाठी आणि लहानसहान धंदेवाइकांना लागणारी मुद्रण कामे करणारी मुद्रणालये ही 'सेवा व्यवसाय' या सदरात मोडतात. म्हणून ती त्यांच्या गिऱ्हाइकांच्या सन्निध असली पाहिजेत. ही गोष्ट लक्षात घेता आणि तशी त्याची सोय करून दिली तर लहान मुद्रणालयांना, मोठ्या मुद्रणालयांच्या स्पर्धेत टिकून राहणार किंवा नाही, याची काळजी करण्याचे कारण नाही. परंतु कमी भांडवली खर्चामुळे लहान मुद्रणालये उभारणे सुलभ होते; ही गोष्ट लक्षात घेता दर्जेदार कामे आणि उत्तम सेवा-कौशल्य अंगी बाणवणे मात्र आवश्यक असते. दरात स्पर्धा करण्याऐवजी दर्जात आणि सेवातत्परतेत स्पर्धा करणे लहान मुद्रणालयांच्या हिताचे असते. यंत्रोत्पादनासारख्या व्यवसायातून सुटे भाग तयार करणाऱ्या लहान कारखान्यांची, वर्कशॉपची, आवश्यकता असते. तसे मुद्रणधंद्याचे नाही. म्हणून लहान मुद्रणालये मोठ्या मुद्रणालयास पूरक म्हणून निर्वाह करू शकणार नाहीत. लहान मुद्रणालये स्वयंपूर्ण असावी लागतात. परंतु लघुउद्योगाचे इतर विशेष लहान मुद्रणालयांस लागू पडतात म्हणून ते लकडावाला सांडेसरा अहवालावरून इथे देतो :

(१) लघुउद्योगात व्यवस्थापकीय माणसे तयार होतात. तसेच धंद्यास आवश्यक अशा वृत्तीची (entrepreneurial) आणि व्यवस्थापकीय उत्साहाची जोपासना होते.
(२) लघुउद्योगाने धनसंचय प्रक्रिया सुरू होते. त्यात भांडवल थोडे लागते. एरवी या थोड्या भांडवलाचा इतरत्र चांगला उपयोग नसतो. त्यामुळे लघुउद्योगात गुंतले नसते तर ते दैनंदिन खर्चात वा अनुत्पादकीय गुंतवणुकीत जिरले असते.
(३) लघुउद्योग हे तुलनेने थोड्याशा भांडवलात अधिकांना काम मिळवून देतात.
(४) लघुउद्योग औद्योगिक विकेंद्रीकरणास मदत करतात.
(५) लघुउद्योगामुळे सामाजिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण होऊ शकते. प्रतिभाशाली व्यक्तींना प्रेरणा आणि संधी मिळते. सामाजिक वातावरण उत्साही आणि कार्यसंचारी (vigorous) बनते.

१८६. लघुउद्योग जर स्वयंपूर्ण आणि यशस्वी व्हायचे असतील तर त्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते. या नियोजनात खालील गोष्टी येतात.[१०२]

(१) आधुनिकीकरण : शास्त्रीय व आधुनिक तंत्रविषयक प्रगतीचा उत्पादनवाढीसाठी उपयोग करणे आणि उत्पादन अद्ययावत करणे.

(२) निवडयुक्त प्रगती : कार्यक्षम व निश्चित भविष्य असलेल्या कारखान्यांना भांडवल आणि इतर साहाय्य पुरवणे.

(३) व्यवस्थापन युयुत्सा : व्यवस्थापन तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून आधुनिक व्यवस्थापकीय तंत्र अवलंबिणे.

102. Engene Staley and Richard Morse, *Modern Small Industry for Developing Countries.*

(४) तांत्रिक प्रगतीचा उपयोग : अत्याधुनिक तंत्राचा अवलंब लघुउद्योगात होणार नाही; परंतु आहे त्या परिस्थितीत नित्य सुधारणा घडवून आणण्याची तयारी ठेवता येईल.

(५) परस्पर साहाय्य : लघुउद्योगांचे स्थान स्वतंत्र असले तरी मोठ्या उद्योगांशी नित्य संबंध आणि सहकार्य ठेवणे शक्य होईल.

विलायतेतील मुद्रणालये

१८७. मुद्रणव्यवसाय हा सामान्यतः लघुउद्योग आहे, असे मी म्हटले. ही स्थिती केवळ भारतातच आहे असे नव्हे तर इतर संपन्न व पुढारलेल्या देशांतही असाच प्रकार आहे. विलायतेतील शेकडा ४० टक्के मुद्रणालयांत दहाहून कमी कामगार आहेत. त्यांची संख्या एकूण कामगारांच्या सहा टक्के आहे. शेकडा नऊ टक्के मुद्रणालयांत १०० पेक्षा जास्त कामगार आहेत, पण त्यांची संख्या मात्र एकूण कामगारांच्या शेकडा ५८ टक्के आहे. या संबंधातील १९५२ सालचे आकडे मला सहज उपलब्ध आहेत ते इथे देतो. त्यात आता वाढ झाली असली तरी आकारबंधात आणि टक्केवारीत फारसा बदल झालेला नाही.

विलायतेतील मुद्रणालये आणि कामगारसंख्या (१९५२)

कामगारांची संख्या	कारखान्यांची संख्या	एकूण कामगार	कामगारांची टक्केवारी	मुद्रणालयांची टक्केवारी
१० व कमी	१८००	१२,६००	६	४०
११ ते २४	१०००	१७,०००	८	२२
२५ ते ४९	८५०	३०,६००	१४	१९
५० ते ९९	४५०	३१,५००	१४	१०
१०० ते ४९९	३४०	७४,८००	३४	८
५०० ते ९९९	४०	२९,०००	१३	१
१००० च्यावर	२०	२५,०००	११	—
एकूण :	४५००	२,२०,५००	१००	१००

फ्रान्समधील मुद्रणालये

१८८. युरोप खंडातील स्थिती भारतीय परिस्थितीशी पुष्कळच मिळतीजुळती आहे. तथापि लहान कारखान्यांची टक्केवारी पुष्कळ जास्त आहे. तीच स्थिती कामगारांच्या संख्येच्या बाबतीत आहे. ही गोष्ट मुद्रणधंद्याच्या पुढील आकडेवारीवरून दिसून येईल.

फ्रान्समधील मुद्रणालये व कामगारसंख्या (१९६४)

कामगारांची संख्या	कारखान्यांची संख्या	एकूण कामगार	कामगारांची टक्केवारी	मुद्रणालयांची टक्केवारी
१० व कमी	६,०००	३३,०००	३८	८८
११ ते ५०	६००	१४,७००	१७	९
५१ ते १००	१००	७,४००	८	१·५
१०१ ते २००	४९	६,७००	८	१
२०१ ते ५००	२८	१०,४००	१२	०·५
५०१ ते १०००	१०	७,३००	८	—
१००० च्या वर	४	७,७००	९	—
	६,७९१	८६,५००	१००	१००

अमेरिका व जपानमधील मुद्रणालये

१८९. अमेरिका व जपानमधील परिस्थिती याहून फारशी वेगळी नाही. अमेरिकेतील एकूण १७,९३७ मुद्रणालयांपैकी १९५८ मुद्रणालये व्यापारी मुद्रण करतात. त्यांत ३ लाख कामगार काम करतात. १५,०३४ मुद्रणालयांत (८३·४ %) वीसपेक्षा कमी कामगार होते. जपानमध्ये, १,६७,००० कामगार असलेल्या एकूण १२,५०० मुद्रणालयांपैकी, फक्त सहा कारखान्यांत हजारांवर कामगार काम करतात. आणि सुमारे २५ कारखान्यांत ३०० पेक्षा अधिक लोक काम करत होते. बहुतांश मुद्रणालयांत २० पेक्षा कमी कामगार काम करत होते.

प्रगत देशांतील लहान मुद्रणालयांचे प्रश्न

१९०. पुढारलेल्या देशांतील लहान मुद्रणालयांच्या कामकाजाचा अभ्यास करून त्याची या देशातील स्थितीशी तुलना करणे मनोरंजक ठरेल. विलायतेतील लहान मुद्रणालयांची पाहणी मि. हेन्री केन्डल, कॉस्टिंग सेक्रेटरी, ब्रिटिश फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्स, यांनी आपल्या एका लेखामध्ये[103] केली आहे. इंग्लंडमधील एकंदर ६००० मुद्रणालयांपैकी ५००० मुद्रणालयांतून पंचवीसपेक्षा कमी कामगार काम करत. मि. केन्डल यांच्या विवेचनाचा गोषवारा असा :—

चढाओढीचा परिणाम : खालील कारणांमुळे विलायतेतील लहान मुद्रणालये फार नाजूक परिस्थितीतून जात आहेत :

103. Kendall, Henry, "The Small Printer Expansion or Extinction ?" *British Printer*, April 1963, p.p. 73-79

(१) लहान मुद्रणालयांची आपापसात आणि मोठ्या मुद्रणालयांची त्यांच्याशी स्पर्धा.

(२) कार्यालयातच डुप्लिकेटिंग यंत्रावर प्रती काढणे व ऑफिस-ऑफसेट यंत्राचा उपयोग.

(३) नवीन नवीन खर्चिक मुद्रणपद्धतींचा अवलंब. जागांच्या वाढत्या किंमतीमुळे, वाढत्या भाड्यामुळे आणि नगरविकास योजना, यामुळे अनेक कारखाने बंद होत आहेत.

विलायतेतील लहान मुद्रणालयांच्या असमाधानकारक वाटचालीची कारणे

१९१. मि. केन्डल यांनी आपल्या विवेचनात ब्रिटिश मास्टर प्रिन्टर्स फेडरेशनतर्फे चालवल्या जाणाऱ्या 'मॅनेजमेंट रेशियो' योजनेचा उल्लेख केला आहे. या योजनेनुसार आंतर-मुद्रणालयीन तुलना केली जाते. त्या योजनेत अभ्यासलेल्या मुद्रणालयांचा व्यवहार सुमारे बावीस कोटी रुपयांचा होता. या तुलनात्मक अभ्यासाने मुद्रणालयांच्या अकार्यक्षम कारभारावर नेमके बोट ठेविता येते. त्यात नऊ प्रकारचे 'रेशिओ' येतात. पैकी नगद नफ्याचे प्रमाण उलाढालीवर ६½ टक्के पडते. मि. केन्डल यांनी वरील लेखात तक्ता दोनमध्ये असमाधान-कारक व्यापारी नफ्याची कारणे नोंदली आहेत ती अशी :

(अ) मनुष्यबळ व यंत्रे यांचा अपुरा वापर :

(१) तयार मालास गिऱ्हाईक मिळवण्याच्या प्रयत्नातील अनास्था. गिऱ्हाईक बदलत असते. जुनी गिऱ्हाइके अनेक कारणांमुळे जातात. त्यांची जागा नवीन गिऱ्हाइके घेतील असा पद्धतशीर प्रयत्न केला पाहिजे.

(२) स्वीकारलेल्या कामात संतुलनाचा अभाव. त्यामुळे एका खात्यात फार काम तर दुसऱ्या खात्यात कमी काम, अशी स्थिती होते. पुष्कळ वेळा गिऱ्हाइकांशी संबंध ठेवणाऱ्या विक्रेत्यांना छापखान्यास आर्थिक दृष्ट्या आवश्यक काम कोणते त्याची योग्य ती माहिती दिली जात नाही. किती काम पाहिजे ते सांगून भागत नाही. अशा प्रकारचे काम आणले म्हणजे सर्व खाती चालू राहतील हे स्पष्ट केले पाहिजे.

(३) कामाचे सदोष नियोजन आणि असमाधानकारक प्रगती. गिऱ्हाइकांच्या काही मागण्या गैरवाजवी असतात तेव्हा जास्त दर आकारण्याकडे लक्ष दिले पाहिजे. पण तसे करण्याचे जेव्हा टाळले जाते तेव्हा त्याचा अनिष्ट परिणाम होतो. खरे म्हणजे योग्य वेळी चांगले काम मिळाल्यास वाढीव दरदाम द्यायला गिऱ्हाईक तयार असते. उत्पादनसाधनांचा परिणामकारक वापर केल्यानेच नफ्याचे प्रमाण वाढत असते.

(ब) प्रत्यक्ष निर्मिती खर्चाबद्दल अज्ञान आणि शास्त्रीय निर्मिति-मूल्यांकन आणि दरदाम पद्धतीचा अभाव :

कारखान्यातील सर्व उत्पादनसाधनांचा संपूर्ण उपयोग केला तरी, निर्मितिमूल्याबद्दल अनास्था

अनुक्रमणिका

आणि अज्ञान असल्यावर फायद्यावर विपरीत परिणाम होतो. तपशीलवार अंदाज न करताच दर सांगणे कोणत्याही धंद्याला विनाशकारी ठरते. तेव्हा हा 'त्वरित् कोटेशन' मोह टाळला पाहिजे. खर्चाचा योग्य अंदाज बांधल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत दर देणे योग्य नव्हे.

(क) खालावलेली (poor) उत्पादनक्षमता :

यंत्रांच्या गतीप्रमाणे कामगारांनी काम करावे असा आग्रह साधारणपणे धरण्यात येत नाही. तसा तो धरला पाहिजे. जास्त वेगाने काम केल्यास कामाचा नेहमीच दर्जा खालावतो ही समजूत मुळात खरी नव्हे.

(ड) विनाफायद्याची (किंवा कमी फायद्याची) प्रमाणाबाहेर कामे :

किचकट आणि तोट्याची कामे प्रमाणाबाहेर घेणे आणि फायद्याच्या कामास मग वेळच न राहणे. (विद्वत्ताप्रचुर, अनंत खुणा, अपरिचित टाइप असलेली अशी कामे अवश्य घ्यावी, पण मग दरही तसाच आकारला पाहिजे) अशा कामांचे हस्तलिखित वेळेवर मिळत नाही, दुरुस्त्यांचे काम वाढते आणि वरकाम करून अधिकच खर्च होतो.

(इ) छपाई खर्चात होणाऱ्या वाढीप्रमाणे दरात वाढ न करणे :

बरेचसे मुद्रक नेहमीच्या गिऱ्हाइकांकडून येणाऱ्या, किंवा नियमित कामावर उत्पादन-खर्चात प्रमाणाबाहेर होणाऱ्या वाढीनुसार रास्त वाढ करण्यास नाखूष असतात.

लहान मुद्रणालयांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी इंग्लंडमध्ये योजण्यात येत असलेले उपाय

१९२. (१) योग्य त्या प्रमाणात नफ्याचे उद्दिष्ट पुढे ठेवून त्याप्रमाणे पद्धतशीर दर आकारणी करणे.

(२) उत्पादन साधनांचा सम्यक् विचार करून किती नफा मिळवणे रास्त आहे व किती नफा घेणे शक्य होईल, त्याप्रमाणे दरपत्रक तयार करणे. पूर्वीच्या विक्रीवरून वा नफ्याच्या प्रमाणावरून दरपत्रक तयार करणे सर्वस्वी चूक आहे.

(३) दरपत्रकावर आधारलेले असे खर्चाचे पत्रक तयार करणे, मात्र ते करताना खर्चाचा प्रत्येक भागांश लक्षात घेणे जरूर आहे.

(४) वरील दोन पत्रकांवरून दिसून येणारा फायदा पुरेसा आहे किंवा नाही हे ठरविणे.

(५) उत्पादनक्षमतेप्रमाणे तयार होणाऱ्या मालाच्या उठावासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करणे.

(६) उत्पादनखर्चावर नियंत्रण राहण्यासाठी कामाचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. याचा आणखी एक फायदा म्हणजे चालकांना कोणताही व्यवस्थापकीय व आर्थिक निर्णय घेण्यास मदत होते.

(७) यंत्रसामग्रीच्या वाढत्या किमतीमुळे भांडवलात घट होते. यासाठी निर्मितिखर्चामध्ये जादा घसारा दाखविला पाहिजे व तो भरून काढण्यासाठी त्या प्रमाणात दरवाढ केली पाहिजे.

अनुक्रमणिका

(८) भांडवलात वाढ करण्यासाठी जादा व अनुत्पादक मालमत्ता विकली पाहिजे. मजकूर उभा ठेवण्यात फार खर्च होतो. भांडवल गुंतून पडते म्हणून तो सोडवून टाकणे इष्ट ठरेल.

(९) सर्व साधनसामग्रीवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. आधीच बसवलेली यंत्र-सामग्री पूर्ण उपयोगात आणल्याशिवाय नवीन यंत्रसामग्रीत पैसा गुंतला जाऊ नये. त्याच-प्रमाणे सामानाचा साठा जरुरीपेक्षा वाढू न देणे.

(१०) देणेकऱ्यावर (debtors) सुद्धा नियंत्रण असणे अवश्य आहे. उधारीची मुदत कमी केल्याने हातात पैसा लवकर येतो.

(११) पैशाच्या शिलकेची आवक आणि खर्च यांची पूर्वकल्पना ही धंद्याच्या वृद्धीची एक प्रमुख गुरुकिल्ली आहे.

(१२) भांडवलाची कमतरता, बँकेकडून दीर्घ मुदतीचे कर्ज काढून किंवा हप्त्याने यंत्र-सामग्री खरेदी करून दूर करता येईल. तात्पुरती गरजमात्र ओव्हरड्राफ्टसारख्या पद्धतीनेच भागवावी लागते.

(१३) लघुउद्योगाच्या महत्त्वाच्या गरजा म्हणजे तारुण्यसुलभ उत्साह आणि साहस (dash) ही होत.

(१४) नवीन योजना, तंत्र आणि कार्य ह्यांचा नेहमी अवलंब करणे. कौटुंबिक धंद्यात जेव्हा वडिलधारी मंडळी अधिकार सोडीत नाहीत, बदल करीत नाहीत तेव्हा हे कठीण होऊन बसते याचा विचार झाला पाहिजे.

(१५) कॉम्प्युटरसारख्या आधुनिक सोईचा उपयोग सहकारी तत्त्वावर करणे. त्याचप्रमाणे यांत्रिक गणकयंत्रे इत्यादींचा वापर.

(१६) तज्ज्ञ संस्थांचा सल्ला घेऊन, त्याचा फायदा घेण्याची तयारी ठेवणे.

१५

महाराष्ट्रातील मुद्रण व्यवसाय

मुद्रण व्यवसायाची खानेसुमारी

१९३. दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र राज्यातील मुद्रणालयांच्या जंत्रीमध्ये ३१४४ मुद्रणालयांची नोंद आहे. त्यांपैकी पश्चिम महाराष्ट्रात ११४१, विदर्भात ५०२ तर मराठवाड्यात फक्त १६८ मुद्रणालये होती. या धंद्यात एकूण ३९,००० कामगार होते. याव्यतिरिक्त बांधणी खात्यातून आणि न नोंदलेल्या मुद्रणालयांतून अनेक कामगार होते. आज मुद्रणालयांची संख्या सुमारे ४,००० असावी, आणि त्यातून सुमारे ५०,००० कामगार काम करीत असावेत, असा माझा अंदाज आहे. आमचे ज्येष्ठ स्नेही श्री. शासाहेब पटवर्धन यांनी महत्प्रयासाने संपादिलेल्या जंत्रीत त्यांनी दिलेला तक्ता उद्बोधक आहे.[१०४] तक्ता पान २२० वर पाहा.

महाराष्ट्रातील मुद्रणालयांचे स्वरूप

१९४. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांव्यतिरिक्त भागातील मुद्रणालये लहान असणे स्वाभाविक आहे. अशा मुद्रणालयांतून एखाददुसरे ट्रेडल असते. एकदोन कामगार असतात. अशा प्रकारची मुद्रणालये एकोणीस टक्के आहेत, तर सुमारे साठ टक्के मुद्रणालये दहाहून कमी कामगार असलेली अशी आहेत. ग्रंथमुद्रण करणारी मुद्रणालये याहून जास्त कामगार असलेल्या गटात येतात. दहा ते एकूणपन्नास कामगार असलेली एकूण मुद्रणालये पाचशेहून कमी आहेत. या वर्गातील मुद्रणालयांचा आकार किफायतशीर मुद्रणास अनुकूल असतो. अशा मुद्रणालयांस चांगली यंत्रसामग्री आणि टाइपांचे प्रकार बाळगणे सोपे असते. ही गोष्ट ध्यानात घेता या गटातील मुद्रणालयांची वाढ करण्याचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. ग्रंथ

104. Patvardhan Vishwanath Anant, *Maharashtra State Printers' Directory* 1968, Maharashtra Mudran Parishad, Poona, 1968

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील मुद्रणालये आणि कामगार संख्या

प्रदेश	मुद्रणालये		कामगार संख्या	मुद्रणालयांची वर्गवारी : कामगार			
	नोंदलेली	माहिती पाठविलेली		२–२	३–९	१०–४९	५० वर
पश्चिम महाराष्ट्र	११४१	१०७५	९८१०	२५९ (२५%)	६४५ (६१%)	१४४ (१२%)	२७ (२%)
मराठवाडा	१६८	१६१	८७९	५१ (३२%)	९९ (६१%)	१० (६%)	१ (१%)
विदर्भ	५०२	४३२	४१३१	१३६ (३२%)	२४७ (५७%)	४१ (९%)	८ (२%)
एकूण	१८११	१६६८	१४८२०	४४६	९९१	१९५	३६
मुंबई	१३१३ —	१११४ —	२४१०४ —	८० (७%)	६७२ (६%)	२८९ (२६%)	७३ (७%)
एकूण (१९६८)	३१२४	२७८२ —	३८९२४ —	५२६ १९%	१६६३ ६०%	४८४ १७%	१०९ ४%
एकूण (१९६१)		१४९९ —	३०४१८ —	२२७ १९%	८२८ ५६%	३४९ २३%	९५ ६%

महाराष्ट्रातील मुद्रणयंत्रांची खानेसुमारी

विभाग	एकूण मुद्रणालये	प्लेटन यंत्रे एकूण	प्लेटन यंत्रे स्वयंचलित	सिलिंडर यंत्रे एकूण	सिलिंडर यंत्रे स्वयंचलित	एक ट्रेडल मुद्रणालये	सिलिंडर विना मुद्रणालये
पश्चिम महाराष्ट्र	११४१	१६८८	७७	४०२	८७	५८२	८८६
मराठवाडा	१६८	२२८	२	१७	२	१०४	१४९
विदर्भ	५०२	८११	१४	१९७	४७	२३३	३५८
मुंबई	१३१३	२७५२	२९३	१०४४	६१३	१५३	७७६
एकूण	३१२४	५४७९	३८६	१६६०	७४९	१०७२	२१६९

मुद्रणालयास चांगले जुळणी खाते लागते आणि ग्रांथिक मुद्राक्षरांचा (Book Faces) साठा असावा लागतो. या संदर्भात १९६१ ते १९६८ दरम्यान या वेगवेगळ्या गटातील मुद्रणालयांत झालेली वाढ विचारात घेणे उपयुक्त ठरेल. एक ते दहा कामगारांच्या गटातील वाढ आठ टक्के आहे तर १० ते ४९ कामगार गटात पाच टक्के घट आहे. पाचवरील कामगार गटात दोन टक्के घट आहे. पहिल्या दोन गटांतील वाढ एकंदर वाढीशी सुसंगत आहे तर दुसऱ्या दोन गटांतील घट चिंतनीय आहे.

महाराष्ट्रातील मुद्रणयंत्रसामग्री

१९५. महाराष्ट्रातील मुद्रणालयांतून एकंदर मुद्रणसाहित्य किती प्रमाणात उपलब्ध आहे, यांची नोंद झालेली नाही. परंतु उपरिनिर्दिष्ट जंत्रीमध्ये एकूण कामगार आणि मुद्रणयंत्रे यांची नोंद आहे. त्याचा तक्ता पान २२० वर दिला आहे.

या तक्त्यावरून विदर्भ आणि मराठवाड्यात स्वयंचलित प्लेटन यंत्रे आणि सिलिंडर यंत्रे अत्यंत कमी प्रमाणात आहेत ही गोष्ट स्पष्ट होते. या भागातून ग्रंथमुद्रणाची चांगली सोय नाही म्हणून ती व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत असे दिसून येते. कारण गेल्या नऊ-दहा वर्षांत मराठवाड्यात आणि विदर्भात मुद्रणालयांत झालेली वाढ अनुक्रमे १४० टक्के आणि ७० टक्के आहे हे या तक्त्यावरून दिसून येईल.

मुद्रण व्यवसायातील कामगारांचा तुटवडा

एकूण मुद्रणालयांत ६८ टक्के वाढ झाली असली तरी मुद्रण कामगारांतील वाढ फक्त ३६ टक्के आहे. याचा अर्थ नवीन मुद्रणालयांनी त्यांना लागणारे कामगार जुन्या मुद्रणालयांतून पळविले असा दिसतो. स्वयंचलित यंत्रसामग्री बसविल्यामुळे पूर्वीच्या प्रमाणात कामगारांची संख्या वाढत नाही, हे सुद्धा एक कारण असावे. कामगार पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत याचे कारण मुद्रणशिक्षणाची सोय नाही. मुद्रणालयांची वाढ झपाट्याने होत राहिल्यामुळे चालू छापखान्यातून कामगार तयार होण्यास वेळच नसतो. याशिवाय मुंबईसारख्या ठिकाणी यंत्रचालकांना आणि काही विशिष्ट मुद्रण विभागातील कामगारांना मिळणारे वेतन सोडले तर बहुसंख्य मुद्रण कामगारांना मिळणारे वेतन पुरेसे आकर्षक नाही. इंग्लंडमध्ये जुळणिसाला मिळणारे वेतन इतर धंद्यांतील कुशल कामगाराला मिळणाऱ्या वेतनाहून जास्त असते. आपल्याकडे हे प्रमाण व्यस्त आहे. त्यामुळे जुळणीसाठी माणसे मिळत नाहीत.

मुद्रण व्यवस्थापकांसमोरील समस्या

१९६. महाराष्ट्रातील मुद्रणव्यवसाय व विशेषेकरून लहान मुद्रणालये यांच्यासमोरील समस्या इंग्लंडमधील प्रश्नांशी मिळत्याजुळत्या आहेत. म्हणून मि. केन्डल यांनी सुचविलेल्या उपायांचा गंभीरपणे विचार करायला हवा.

मुद्रण कामगार, त्यांची विभागणी आणि टक्केवारी

विभाग	१९६१ मुद्रणालये	१९६१ कामगार	१९६८ मुद्रणालये	१९६८ कामगार	टक्के वाढ मुद्रणालये	टक्के वाढ कामगार	मुद्रणालये असलेली गावे
पश्चिम महाराष्ट्र	६८९	७७८५	११४१	९८१०	६६%	२६%	१७२
मराठवाडा	७०	३७९	१६८	८७९	१४०%	१३२%	३४
विदर्भ	२८८	३८६५	५०२	४१३१	७०%	७०%	६३
मुंबई	८१३	१८३८९	१३१३	२४१०४	७१%	३१%	—
एकूण	१८६०	२९४१८	३१२४	३८९२४	६८%	३६%	२६९

(१) व्यवस्थापनतंत्र कालमानानुसार व बदलत्या परिस्थितीनुसार बदलते. जेव्हा कोणत्याही धंद्यात फायद्याची शक्यता असते, तेव्हा अधिकाधिक लोक त्याची कास धरतात. लहान उद्योगांच्या बाबतीत तर हे जास्त खरे आहे. विकसनशील देशातील लहान उद्योगांच्या महत्त्वावर पूर्वीच जोर दिला गेला आहे व मुद्रणालये त्याला अपवाद नाहीत.

(२) महाराष्ट्रातील मुद्रण व्यवसायाची, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व नंतर काही काळ, वाढ झाली. स्वातंत्र्यानंतर अनेक कल्याणकारी कार्यक्रमांना प्रारंभ झाल्यामुळे मुद्रणाचे काम वाढले. दुसऱ्या महायुद्धात निघालेल्या मुद्रणालयांनाच नव्हे तर त्यानंतर स्थापन झालेल्या मुद्रणालयांनाही पुरेसे काम मिळाले. शासनाच्या समाज-शिक्षण योजनांमुळे जास्त पुस्तकांची आवश्यकता भासली व पाठ्यपुस्तकांच्या कामाचा मुद्रणालयांना पुरवठा होत राहिला.

(३) औद्योगिक उत्पादनामुळे व्यवस्थापनाचे काम वाढले आहे. लेखा-खर्च, अंदाजित खर्च, तांत्रिक व्यवस्थापन व उत्पादनक्षमता ह्याबद्दलचे ते काम होय. १९४८ साली फॅक्टरी कायद्यात सुधारणा झाली व त्याच वेळेस काही नवीन औद्योगिक कायदे पास झाले. या कायद्यांची अंमलबजावणी जास्त काटेकोरपणे करण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात येते. वेतन देण्याविषयीचा कायदा आणि किमान वेतन कायदा यांचे पालन करण्याची जबाबदारी व्यवस्थापकांवर ठेवली आहे. मुद्रणालय कामगारांच्या आता चांगल्या संघटना आहेत, त्या याबाबत जागरूक आहेत. पण दुर्दैवाने आपल्याकडील काही कामगार संघटना राजकीय पक्षांच्या वर्चस्वाखाली आहेत. त्यामुळे व्यवस्थापकाचे काम बरेच कठीण होऊन बसले आहे.

(४) वरील सर्व कारणांमुळे मोठ्या मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांचेच नव्हे तर लहान मुद्रणालयांच्या व्यवस्थापकांचे कामही दिवसेंदिवस कठीण होत आहे. ज्यांनी भरभराटीच्या दिवसांत मुद्रणालये स्थापन केली त्या मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांना भांडवलाची सोय, साहाय्यकांची नियुक्ती, उत्पादनावर दृष्टी, इतकेच व्यवधान असे. आता व्यवस्थापकांचे काम तसे सोपे राहिलेले नाही. वर सांगितलेल्या कायदेकानूंचे पालन करण्याव्यतिरिक्त त्यांना

अनुक्रमणिका

कुशल कामगारांचा शोध करणे व ते न मिळाल्यास कामगार शिकवून तयार करणे ही कामेही सतत करावी लागत आहेत.

(५) आपल्या देशातील मुद्रणालये आणि विलायतसारख्या पुढारलेल्या देशांतील लहान मुद्रणालये यांतील एक मोठा फरक म्हणजे आपल्याकडे असलेला विशेष शिक्षणाचा अभाव. केन्डल म्हणतात, " नेहमी, लहान मुद्रणालये चालवणारे मुद्रक जरी सक्षम असले तरी त्यांच्या ठायी धंद्याचे कसब नसते. म्हणून त्यांपैकी पुष्कळांना व्यवस्थापन, कारभार व विक्री यांतील समस्यांचे पुरेसे ज्ञान नसते; तरी पण नेहमी व्यवसायात पडण्यापूर्वी पुरेसे प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न असतो. " कोणत्याही कामगाराला प्रशिक्षण पुरे केल्याशिवाय काम मिळत नाही. व्यवस्थापकीय प्रशिक्षणाकरिता विशेष अभ्यासक्रम असून त्यांचा पुरेपुर फायदा घेतला जातो. (मला एका महाराष्ट्रीयाने लंडनमध्ये एक लहान मुद्रणालय स्थापन केल्याचे माहीत आहे. त्याने आपल्या तळघरात एक लहान प्लेटन टाकण्याचे ठरविले तेव्हा प्रथम स्थानिक तांत्रिक विद्यालयात जुळणी व मुद्रणाच्या वर्गात एक वर्ष प्रशिक्षण घेतले. एक लहान प्लेटन व काही टाइप केसेस खरीदल्या. लेटर हेड्स, देयके अशा प्रकारचे काम ते करीत. या किरकोळ कामाकरिता तिथे दर बांधलेले असल्यामुळे फारशी चढाओढ नाही.)

(६) आपल्या देशांतील लहान मुद्रणालयांच्या व्यवस्थापनास लागणारे शिक्षण देण्याची विशेष अशी सोय मुंबई, अलाहाबाद, कलकत्ता आणि मद्रास, जबलपूर आणि पुणे इथेच फक्त आहे. त्या सोयीचाही पाहिजे तसा फायदा घेण्यात येत नाही. दुसरे, निर्मितिमूल्य पद्धती नसल्यामुळे व लहान मुद्रणालयांसाठी दरकोष्टके नसल्यामुळे अनिष्ट चढाओढ होते. याचा संबंधित मुद्रणालयांवर विपरीत परिणाम होतो व शेवटी गिऱ्हाइकांचा मुद्रकावरील विश्वासच उडतो.

(७) लहान मुद्रणालयांना पुरेसे काम नसल्यामुळे तो आणखी एक सामाजिक प्रश्न निर्माण झालेला होता. आवश्यकतेपेक्षा जास्त मुद्रणाची सोय होती असे श्री. लकडावाला अहवालात म्हटले आहे. मशीनचा वाढता खर्च, व्यवस्थापनाचा, भाड्याचा खर्च, भांडवलावरचे भारी व्याज आणि इतर खर्च यामुळे यंत्रसामग्री विनाकाम पडून राहू देणे परवडणारे नाही.

(८) म्हणून या परिस्थितीशी सामना करण्यासाठी चांगल्या नियोजनाची, प्रश्न सोडविण्यासाठी विचारपूर्वक ठरविलेल्या इलाजांची आणि अधिक परिश्रमाने कामाला वाहून घेण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील मुद्रक संघटना

१९७. महाराष्ट्रातील मुद्रण व्यवसायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मुद्रक संघटना. १९१९ मध्ये पुणे येथे मुद्रक संघाचा जन्म झाला, ही गोष्ट तेव्हा अखिल हिंदुस्थानात अपूर्व होती. १९३७ आणि त्यानंतर १९३९ मध्ये महाराष्ट्रातच पुण्यात अखिल भारतीय मुद्रण परिषदा भरविण्यात आल्या. १९३९ मध्ये प्रसिद्ध पत्रपंडित तुषारकांती घोष यांच्या

अध्यक्षतेखाली झालेल्या मुद्रण परिषदेस मी उपस्थित होतो. या परिषदेपुढे 'महाराष्ट्रातील मुद्रणव्यवसाय' या विषयावर मी एक निबंध वाचला होता. मुद्रण संघटनेमधील अग्रेसर अशा पुणे मुद्रक संघाने १९४९ मध्ये महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे अधिवेशन पुण्यामध्ये भरविले व त्या वेळेपासून महाराष्ट्रामध्ये जिल्हा मुद्रक संघटनांची स्थापना होऊ लागली. तत्पूर्वी फक्त पुणे व सांगली येथे मुद्रक संघ होते.

मुद्रण परिषद अध्यक्षांचे विचार

१९८. महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे पहिले अधिवेशन (१९४९) श्री. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. श्री. चितळे यांच्या या अध्यक्षीय भाषणामध्ये लिपिविचार, ग्रंथकार व प्रकाशक यांचे संबंध, अशा मूलभूत प्रश्नांशिवाय हस्तलिखिते कशी तयार करावीत असे अत्यंत महत्त्वाचे परंतु मामुली वाटणारे विषयसुद्धा चर्चिले होते. या परिषदेच्या द्वितीय अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. य. रा. दाते यांनी मुद्रण-शिक्षणाची सोय करण्याची आवश्यकता, भारतात यंत्रसामग्री उपलब्ध होणे आणि मुद्रणातील प्रगती, याकडे लक्ष वेधले तर तिसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. विठ्ठलराव बागले यांनी मुद्रणाच्या व्यावसायिक बाजूंचा विचार केला. चौथ्या आणि पाचव्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. विष्णुपंत भागवत हे स्वतः ग्रंथमुद्रक होते आणि आहेत. त्यांनी मुद्रण-दर्जाचा मूलभूत प्रश्न उपस्थित केला.[१०५]

> "......छपाईचा दर्जा सुधारलेला नाहीं, उलट तो खालावलेला आहे. (त्याला अनेक कारणें आहेत.)...त्यांच्याबरोबर दुसरें एक महत्त्वाचें कारण माझ्या मतें आहे तें म्हणजे आपण मुद्रक आपल्या व्यवसायाशीं पूर्वीच्या इतकें सच्चे राहिलेलों नाहीं. आपणाकडे होणारें काम रोजच्या रोज अधिकाधिक चांगलें व्हावें असें मनापासून आपल्याला आज वाटत नाहीं. युद्धकाळांत काम मिळत होतें; कसेंही केलें तरी खपून जात होतें; त्यामुळें आपल्या मनाला त्याची सवय लागली; आणि आपलें काम वाईट झालें.
>
> "आपल्या छापखान्यांत छापलेले पुस्तक वाचकांना नीट वाचतांही येणार नाहीं असें असलें तरी त्याबद्दल आपल्याला कांहीं वाटेनासें झालें....शालोपयोगी पुस्तकांच्या बाबतींत प्रकाशकां-प्रमाणेंच मुद्रकाबरही फार मोठी नैतिक जबाबदारी आहे असें मी म्हणतों. आज आपण आपली जबाबदारी हें नैतिक कर्तव्य पुरेशा कसोशीनें पार पाडतों आहों, असें कांहीं आपल्याला म्हणतां यावयाचें नाहीं.
>
> "प्रकाशकांना जर त्यांच्या कर्तव्याची जाणीव नसेल तर ती त्यांना करून दिली पाहिजे. धंद्यांत चढाओढ अवश्य करावी, पण ती मुद्रणमूल्यांचा बळी न देतां करावी. प्रथम कमी दर घ्यावयाचा आणि मागाहून त्या दरांत परवडत नाहीं म्हणून कामाचा दर्जा खालवावयाचा असें करूं नये."

१९९. वरीलप्रमाणे आत्मपरीक्षण केल्यावर श्री. भागवतांनी निर्दोष मुद्रणप्रत, यंत्रज्ञ, आणि शाई-कागदाचे उत्पादक यांच्याशी संपर्क, योग्य निर्मिति-मूल्य काढण्याची व्यवस्था

१०५. महाराष्ट्र मुद्रण परिषद् अध्यक्षीय भाषण

अनुक्रमणिका

इत्यादींचे विवेचन केले असून शेवटी सुबक मुद्रणास आवश्यक अशी टाइपांच्या विविध वळणांची आवश्यकता प्रतिपादली आहे :

> " देवनागरी लिपींतील मुद्रणाची कलात्मकता वाढायला हवी असेल तर इतर प्रयत्नांबरोबर नव्या नव्या वळणाचे टाइप प्रचारांत आणण्याची खटपट करणेंही आवश्यक आहे. पण तें बोलणें जितकें सोपें आहे तितकें तें प्रत्यक्षांत आणणें कठीण आहे. अक्षरांचें एक नवें वळण टाइपावर बसवावयाचें हें अतिशय जिकिरीचें, कौशल्याचें व खर्चाचें काम आहे...आतांपर्यंतचें त्याबाबतचें सर्व काम व्यक्तिगत जबाबदारीवर झालेलें आहे.
>
> " मराठी मुद्रण व्यवसाय त्या सर्व व्यक्तींचा कायमचा ऋणी आहे. पण यापुढें हे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व सतत झाले पाहिजेत. सहकारी पायावर झाल्यासच ते प्रयत्न होणें शक्य आहे व ते तसे झाले तरच त्यांत यश मिळण्याची शक्यता अधिक आहे. परिषदेच्या छायेखालीं तसा कांहीं प्रयत्न करणें शक्य आहे का ? "

२००. श्री. भागवतांचा हा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे. सातव्या अधिवेशनाचे अध्यक्ष आर्यभूषणचे श्री. वि. अ. तथा शासाहेब पटवर्धन सांगतात :

> " आजवरच्या संवईनें असलें (चोखंदळ) गिऱ्हाईक नकोसें वाटतें. ही वृत्ति जितक्या लवकर आपण बदलूं, तितक्या द्रुत गतीनें आपल्या मुद्रणाचा दर्जा वाढणार आहे...दाम तसें काम या तत्त्वावर दाम कमी मिळतात म्हणून निकृष्ट कामें करणें योग्य ठरणार नाहीं. व्याव-सायिक सचोटी सुटली की, व्यवसायाला उतरती कळा लागेल. "

नंतरचे अध्यक्ष महाराष्ट्रातील मुद्रणशिक्षणाचे एक प्रवर्तक श्री. गांगल. त्यांनी मुद्रण-शिक्षणाची जबाबदारी मुद्रण व्यावसायिकांची आहे हे महत्त्वाचे सूत्र सांगितले. त्याचबरोबर किमान वेतन कायद्याने मुद्रकांवर आर्थिक ओझे घालीत असताना सरकारवर जी जबाबदारी येत होती ती सरकारने साफ टाळली आहे असे विधान केले. आठव्या व नवव्या अधिवेशनांचे अध्यक्ष के. बांबर्डेकर यांनी "वेतनाचा संबंध उत्पादनाशी जोडला जाईल तो दिवस देशाच्या औद्योगिक इतिहासात क्रांतिकारक समजावा लागेल " असे सांगताना उत्पादना-तील दुसरा महत्त्वाचा घटक यंत्रसामग्री. त्याच्या सुस्थितीसाठी योजना आखून अखिल महाराष्ट्रात पायपिटी केली. दहाव्या आणि अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. मामाराव दाते हे स्वतः मुद्राक्षरतज्ज्ञ. त्यांनी नागरी लिपी यंत्रसुलभ करण्याच्या यक्षप्रश्नावर भर दिला. बाराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. शेंबेकर म्हणतात, " आपण व्यवसायाशी समरस झाल्याशिवाय धंदा ऊर्जितावस्थेस आणू शकणार नाही. "

परिषदांनी दुर्लक्षिलेला महत्त्वाचा विषय

२०१. इथवर कामाचा दर्जा वाढविण्याकडे सर्वच अध्यक्षांचे लक्ष होते असे दिसते. पुढील अध्यक्षांनी मुद्रणव्यवसायाए कर्ज देणे, सरकारी मुद्रणालयांचा विस्तार थांबविणे, सरकारी कामाची टेंडरे न मागविणे, क्रमिक पुस्तके खाजगी छापखान्यांकडून छापवून घेणे इत्यादी आर्थिक आणि निव्वळ व्यावसायिक अडचणींवर आणि मागण्यांवर भर दिला असे दिसून येईल.

मुद्रण परिषदेच्या कामगिरीचा आढावा घेताना एक गोष्ट मान्यवर मुद्रकांच्या चर्चेतून पूर्णतया सुटलेली दिसते आणि ती म्हणजे ' मार्केट सर्व्हे ' किंवा नवीन नवीन निर्माण होणाऱ्या आणि होऊ शकणाऱ्या कामाचा आढावा घेऊन ती चांगल्या रीतीने कशी करून देता येतील, यासाठी मुद्रकांना मार्गदर्शन करणे. जी कामे आधीच खाजगी क्षेत्रात होत आहेत त्यावर भर देण्याऐवजी महाराष्ट्रात जी नवीन कामे उपलब्ध होऊ शकतील त्यांचा विचार करण्याची व त्यासाठी मुद्रकांना तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. सरकारी खात्यांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी छापकामासाठी टेंडरे मागवू नयेत, दर ठरवून कामे द्यावीत, असे ठराव मुद्रण परिषदांतून पास होत आले आहेत. टेंडर मागविण्याचे दोन हेतू असतात. चढा-ओढीत (Competition) ज्यांची इच्छा असेल त्यांना भाग घेऊ द्यावा आणि त्यायोगे शक्य तो कमी भाव मिळवावा. दुसरा हेतू छापखाना किंवा छापखाने वस्तुनिष्ठ पद्धतीने निवडता यावेत. दर ठरवून कामे देण्याची पद्धती अवलंबिली तर संबंधित अधिकाऱ्यांच्या निवड-बुद्धीवर विश्वास ठेविला पाहिजे. त्याचप्रमाणे जास्त काम मिळविण्यासाठी प्रसंगी कमी दर देण्याची तयारी दाखविणाऱ्या मुद्रकांना मुद्रक संघटनांनी रोखले पाहिजे. त्यासाठी संघटनेचे मुद्रकांत वजन असले पाहिजे. याबाबत मुद्रण परिषद जागरूक आहे. याबाबत परिषदेच्या तळेगाव अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. सोनार यांच्या मार्गदर्शनाखालील कार्यकारिणीने केलेल्या ठरावातील उतारा देतो.

> " सुरुवातीस मुद्रणाच्या कामासाठीं निविदा मागविण्यांत आलेल्या होत्या. निविदांतील तज्ज्ञांच्या मदतीनें विचार करून मंडळानें मुद्रणाचे व पुस्तकबांधणीचे दर ठरविले. त्यामुळें मुद्रण-धंद्यातील अनिष्ट व जीवघेणी स्पर्धा टळली. मंडळानें गेलीं तीन वर्षें अवलंबिलेले दर निश्चित करून त्यानुसार निविदा न मागवितां काम करण्याची पद्धत, यापुढेही चालू ठेवणें सर्वांच्या हिताचें आहे असें परिषदेचें निश्चित मत आहे. "

मुद्रण-शिक्षणाची व्यवस्था

२०२. मुद्रकांची संघटना उभारण्यास जसा पुण्याने पुढाकार घेतला त्याचप्रमाणे मुद्रण-शिक्षणासही पुण्यानेच सुरुवात केली. ' पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन 'मार्फत मुद्रण शिक्षणाचे वर्ग चालतात. पुण्याच्या विद्यार्थीगृहातर्फे मुद्रणशाळेचा उपक्रम करण्यात आला आहे. १९३७ पासून मुंबईच्या व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये शासकीय उद्योग खात्या-मार्फत मुद्रणशिक्षणाचे वर्ग सुरू झाले. त्यानंतर हिंदुस्थान सरकारच्या मुद्रणशिक्षणाचे योजने-प्रमाणे ' पश्चिम विभागीय मुद्रणशाळे'ची मुंबईत स्थापना झाली. या संस्थेत दरवर्षी ५० विद्या-र्थ्यांना प्रवेश मिळतो. तीन वर्षांचा पूर्ण वेळ आणि चार वर्षांचा अर्ध वेळ अभ्यासक्रम असून त्याचे अक्षरमुद्रण आणि प्रतिरूपमुद्रण असे दोन विभाग आहेत. या संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी थोड्या अभ्यासाने मुद्रणालयात खातेप्रमुखांची कामे करू शकतील. अलीकडे उमेद-वार कायद्यानुसार मुद्रणातील प्रत्येक विभागात प्रत्यक्ष काम करण्याचे शिक्षण घेण्यासाठी उमेदवार घेण्यात येऊ लागले आहेत. ही योजना मुंबई व पुणे शहरांव्यतिरिक्त इतर शहरांना अजून लागू व्हायची आहे.

१६

शासकीय मुद्रण आणि मुद्रणालये

सरकारी क्षेत्रातील मुद्रणालये

२०३. महाराष्ट्रात मुद्रणधंद्यात गुंतलेल्या सुमारे ५० हजार कामगारांपैकी सरकारी क्षेत्रामध्ये येणाऱ्या छापखान्यांत सुमारे ४५३३ म्हणजे ९ टक्के कामगार गुंतलेले आहेत.[१०६] त्याशिवाय सुमारे ७०० कैदी येरवडा व नागपूर येथील कारागृह मुद्रणालयात काम करतात. यंत्रसामग्रीच्या बाबतीत सरकारी छापखाने खाजगी छापखान्यांना तुल्यबल असे आहेत. या सरकारी छापखान्यांची वाढ होऊ नये, जास्तीत जास्त छापकाम खाजगी क्षेत्रात करून घेण्यात यावे अशी मागणी मुद्रण परिषदांमधून होत असते. या संदर्भातील सरकारी क्षेत्रातील छापखान्यात होणाऱ्या कामाचा तथाकथित निकृष्ट दर्जा, जास्त खर्च आणि विलंब याचा उल्लेख करण्यात येतो. महाराष्ट्रातील मुद्रण उद्योगाचा जो इतिहास आतापर्यंत दिला आहे, त्यावरून एक गोष्ट लक्षात येईल ती ही की, अगदी सुरुवातीच्या काळामध्ये सरकारचे काम एकदोन खाजगी मुद्रणालयांत होत असे. तरी त्यानंतरच्या काळामध्ये सरकारी छापखान्यांनी सरकारी कामाच्या बाबतीतच नव्हे तर पाठ्यपुस्तक आणि इतर ग्रंथमुद्रणातही मोलाची कामगिरी केलेली आहे. ज्या काळी खाजगी क्षेत्रामध्ये मुद्रण आणि वितरण व्यवस्थित प्रमाणात सुरू झाले नव्हते, त्या वेळी सरकारी क्षेत्रातील मुद्रण आणि वितरण समाजाची गरज भागवीत असे. १८८९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मुंबईचा वृत्तांत' या पुस्तकामध्ये खालील उल्लेख आढळतो.

> "गव्हर्नमेंट सेंट्रल बुक डेपो हे हल्ली काळबादेवीच्या रस्त्यावर आहे. ह्यांत सरकारी शालोपयोगी व दुसरी अनेक भाषांतील पुस्तकें व उत्तम तऱ्हेचे नकाशे येथें विकत मिळतात."

106. Activities and Progress of Government Presses in Maharashtra, Directorate Government Printing and Stationery, Bombay. Page 10.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी सरकारी छापखान्यातून बाहेर पडलेली काही पुस्तके, विशेषतः गॅझेटियर, पेशवा दप्तर आणि रेसिडेन्सी रेकॉर्डस इत्यादी पुस्तके सुबक मुद्रणाचा नमुना म्हणून उल्लेखता येतील. यांच्या मुद्रणात टाईप, कागद आणि प्रत्यक्ष मुद्रण या बाबतीमध्ये सौंदर्यदृष्टी आणि पूर्व योजना दिसून येते.

शासकीय मुद्रणालयाची कामगिरी

२०४. ज्या काळात महाराष्ट्रामध्ये शिळामुद्रण आणि नंतर प्रतिरूपमुद्रण खाजगी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नव्हते, अशा काळात पुण्याच्या शासकीय फोटो झिंको प्रेसमध्ये उत्तम मुद्रण होत असे. नकाशे छापण्यात हे मुद्रणालय अग्रेसर होते. ठसे करणे आणि त्यापासून रंगीत छपाई करणे या बाबतीतही हा छापखाना वाकबगार होता. 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' मध्ये पारितोषिकपात्र झालेली चित्रे वार्षिक अहवालात तेव्हा छापण्यात येत. ते काम फोटो झिंको प्रेसमध्ये होई. येरवडा येथील कारागृह मुद्रणालयात कैद्यांकडून चांगली छपाई करून घेण्यात येई. तेथे अद्ययावत यंत्रसामग्री आणि अशा प्रकारचे काम करणारे हे मुद्रणालय अखिल हिंदुस्थानात एकमेव असावे. याच मुद्रणालयात प्रथम सरकारी छापकामाचे निर्मितिमूल्य (Costing) काढण्याची पद्धती, कौशल्याधिष्ठित वेतनपद्धती (Efficiency Wage) इत्यादी व्यवस्थापकीय प्रश्नांबाबत चांगला विचार झाला होता. ही गोष्ट १९१३ ते १९२६ या काळातील आहे.

२०५. दुसऱ्या महायुद्धाच्या काळामध्ये सर्व सरकारी छापखान्यांवर कामाचा ताण पडल्यामुळे दर्जापेक्षा विस्ताराकडे जास्त लक्ष पुरविले गेले ही गोष्ट साहजिकच होती. यंत्रसामग्री नवी आली नाही, त्वरित वाढ झाल्यामुळे उत्तम कारागीर शिकून तयार व्हायला वेळ मिळाला नाही, इत्यादी कारणांमुळे कामाचा दर्जा खालावला. नंतरच्या काळामध्ये, विशेषतः स्वातंत्र्यानंतरच्या लोकशाही कारभारामध्ये, नित्य वाढते काम वेळेवर करून देण्याची कामगिरी या छापखान्यांनी बजावली आहे.' विधान सभेची आणि विधान परिषदेची कामे मराठीत होऊ लागल्यानंतर, अंदाजपत्रके, कायदेकानू आणि इतर शासकीय कामे इंग्रजीबरोबरच मराठी आणि हिंदी भाषांमध्ये करून देण्याची प्रचंड जबाबदारी या छापखान्यांनी उचलली आहे.

२०६. सरकारी छापखाने कशा परिस्थितीत कामे करतात त्याची योग्य माहिती नसल्यामुळे या छापखान्यांच्या कामाबाबत सर्वसामान्यांमध्ये केवळ नव्हे तर मुद्रकांमध्येही बराच गैरसमज आढळून येतो. खाजगी मुद्रकाचा शासकीय मुद्रण खात्याशी संबंध येतो तो बहुधा छापखान्याची बिले पास करून घेण्याच्या बाबतीत. त्यामुळे सरकारी छापखान्याच्या वाढीमुळे खाजगी क्षेत्रातील कामे कमी होतात असाच सर्वत्र गैरसमज असल्याचे आढळते. अलीकडे मुद्रण परिषदेने पुढाकार घेऊन वार्षिक अधिवेशनात सरकारी प्रतिनिधी बोलविण्याचे ठरविले. नागपूर अधिवेशनापासून अशा अनेक मुद्रण परिषदांच्या अधिवेशनात मी स्वतः शासकीय

अनुक्रमणिका

मुद्रण आणि लेखनसामग्री खात्याचा उपसंचालक या नात्याने उपस्थित राहिलो. शासकीय मुद्रण विभागाने राज्यपातळीवर दोन मुद्रक संमेलने भरविली आणि त्यात ठरलेली धोरणे अमलात आणण्यासाठी स्थायी समिती नेमली. तिचा मी पहिला कार्यवाह होतो. या संमेलनाच्या निर्णयाप्रमाणे उत्तम मुद्रणासाठी पारितोषिके देण्याची प्रथा शासनाने रूढ केली. या सर्व गोष्टींमुळे खाजगी क्षेत्रातील मुद्रकांचा शासकीय मुद्रण खात्याशी, पर्यायाने शासनाशी, संबंध दृढ झाला. निवडणुकांपूर्वी मतदारांच्या याद्या छापण्याच्या कामात महाराष्ट्र मुद्रण परिषदेने सहकार्य दिले. पानाचे दर ठरवून, कामे करून घेण्यास मदत केली. त्यामुळे एरवी चालणारी जीवघेणी स्पर्धा टळली आणि महाराष्ट्रातील खाजगी मुद्रणालयांस त्याचा फायदा मिळाला.

शासकीय आणि खाजगी मुद्रणातील सहकार्य क्षेत्र

२०७. सरकारी विभागातील मुद्रण आणि खाजगी मुद्रणक्षेत्र यामध्ये कामाबाबत नव्हे तर काम करण्याच्या पद्धतीमध्ये आणि कामाच्या स्वरूपामध्ये मध्यंतरीच्या काळामध्ये जे फार मोठे अंतर निर्माण झाले होते ते आता नष्ट होण्याच्या मार्गात आहे. शासनाच्या विविध विभागांचे जे छापकाम शासकीय मुद्रणालयांतून होते त्यातील अनावश्यक मुद्रणास आळा बसावा म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रत्यक्ष शासकीय कामाव्यतिरिक्त जे प्रकाशन होते त्याचा खर्च त्या त्या खात्याच्या अंदाजपत्रकातून द्यावा असा आदेश काढला, यामुळे शासकीय छापखाने आणि खाजगी मुद्रणक्षेत्र यामध्ये कामाच्या दर्जाच्या बाबतीतच नव्हे तर निर्मितिमूल्यांच्या बाबतही समान पातळी निर्माण होणार आहे असे दिसते. याबाबत मुंबईच्या शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. स. आ. सप्रे म्हणतात[१०७] :

> " The role that presses in the public sector are called upon to play is a most complex one. It is quasi-commercial. A purely commercial approach is totally inappropriate. For instance, when important decisions are to be implemented the cost of printing tends to be a very minor matter and what is essential is to execute the printing work with maximum speed, irrespective of the cost, but this does not mean that printing costs should always be ignored, which is obviously wasteful.
>
> " To ensure this, Government of Maharashtra has recently adopted certain measures as recommended by the Administrative Reorganisation Committee. Briefly, printing work is now classified as non-chargeable (Bills, Acts, Budget etc.) and chargeable [Ad hoc reports, publicity material etc.] For chargeable work, departments are required to pay the printing charges from their own grants. In addi-

107 Sapre, S. A. : 'Problems of Presses in the Public Sector' *Excerpts from India.—A challenge to printers.* 13th All India Printers Conference, Bombay, 1969, pp. 38-39.

tion the departments are to pay extra charges for urgent work. A penalty is also imposed for delay in returning the proofs. The Government Presses in Maharashtra, which were hitherto purly a service department, have now become a quasi-commercial department.

" The range of Govenment Printing and Publishing is ever-widening. It is therefore inevitable that it should overlap to some extent the normal sphere of activities of the private sector. Consider, for instance, the printing of Textbooks. The requirements of Textbooks are simply vast and the production facilities available in both sectors, public and private, are hardly adequate to fulfil the requirements. All these facilities must be utilised to the utmost in meeting our requirements. Apparently the two sectors may compete with each other but such competition should prove to be healthy in the long run. It should lead to greater efficiency and economy in both sectors. At any rate, it seems inevitable that the presses in the public sector will have to adopt the competitive public enterprise approach. "

शासकीय आणि निमशासकीय मुद्रण

२०८. सरकारी आणि निमसरकारी छपाईचे काम बऱ्याच प्रमाणामध्ये खाजगी मुद्रणालयांना देण्यात येते. सरकारची विविध खाती, विशेषत: मुद्रण व लेखन सामग्री खाते आणि स्थानिक स्वराज्य संस्था छपाईचे आणि बांधणीचे काम खाजगी मुद्रकांवर सोपवतात. निविदा मागवून कमीत कमी दर देणाऱ्या मुद्रकास काम देण्याची पद्धत आहे. याबाबत महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या अधिवेशनांतून अशी मागणी होत आली आहे की,

(१) सरकारने जी कामे खाजगी मुद्रणालयांकडून करून घेता येतील अशा कामांसाठी शासकीय मुद्रणालयांची वाढ करू नये.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा. जिल्हा परिषदा) स्वतःचे छापखाने स्थापन करण्यापासून परावृत्त करावे.

(३) निविदा पद्धती बंद करावी.

२०९. निविदा पद्धतीमध्ये दोन निश्चित हेतू आहेत त्यांची दखल शासकीय खाती आणि निमसरकारी संस्था यांनी घेणे आवश्यक आहे. ते हेतू असे

(१) वाजवी दर मिळविणे, आणि

(२) मुद्रणालयांची निवड करणे.

निविदा पद्धती जर बंद केली तर मुद्रणाचे वाजवी दर ठरविण्यासाठी काही एक पद्धती शोधून काढणे आवश्यक ठरते. दुसरे म्हणजे मुद्रणालयाची निवड करण्यासाठी काही निश्चित तत्त्वे ठरवून देणे आवश्यक आहे. पूर्वीच्या मुंबई सरकारने श्री. आ. रा. भट यांच्या

अध्यक्षतेखाली किमान वेतन समिती नेमली होती. तिच्या अहवालात[१०८] या मुद्द्याचा विचार करण्यात आलेला आहे. त्यातून खालील उतारा घेतला आहे.

Economic Rates for Government Work.

"127. In giving its work to private presses the State Government at present is taking advantage of cut-throat competition among the private printing presses. Not only that, but even where a tender is accepted and the work executed by the the press, the payment of bill is subject to its scrutiny by the Superintendent of the Stationery and Pirnting Department. It was complained that on occasions he reduced the agreed rates. The Committee considers this practice undesirable. It would suggest that Government should arrive at the economic rate of printing on expert advice and offer its work to the private printing presses only through their associations at that tate. If Government adheres to such a policy it would help the associations to bring about conditions of self-regulation. The Committee realises that all the printing presses may not be possessing sufficient equipment for the purpose. Government may, therefore, maintain a list of approved presses to which only the association should be permitted to give work. Government should prescribe standards of equipment which the presses should possess, in order to qualify themselves for being included in the approved list. Further, it should be the policy of Govenment to assign the work connected with a particular district to the industry in that district. Only where the presses in the district may not have the capacity to do the job, the work be given outside. One of the major items of Government work that is at present given to private presses is the printing of electoral rolls. Government should so fix time for its printing that the presses may not have to work overtime. In short, the Government work should be spread over a reasonable period."[१०९]

Work of Local Bodies.

"128. Government should, also, advise local bodies and semi-Government institutions to get their work done at the local presses. There appears to be a tendency on the part of Government to undertake work which was formerly done by private presses Government have, also, been introducing modern equipment in their presses yielding larger output of work. For instance, the pimary text-books which were formerly being printed by the private presses are being printed in the Government presses. The Committee found during its

108. *Report of the Minimum Wages Committee, Printing Industry*, Government of Bombay 1955.
109. Ibid p. 43-44.

visit to the Photo-Zinco Press the same being printed on offset machine. The Committee, therefore, would like Government to consider the advisability of not introducing further mechanisation in their own presses for the work which can conveniently be done by private presses."[११०]

२१०. हा अहवाल मुंबई सरकारने विचारात घेतला आणि त्यानुसार किमान वेतन ठरवून दिले, परंतु निविदा पद्धतीबाबतच्या शिफारसींचा अनुकूल विचार केलेला दिसत नाही. महाराष्ट्र शासनाने त्यानंतर १९६३ मध्ये श्री. पु. ग. खेर (आता नगरविकास मंत्री) यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी किमान वेतन समिती नेमली. ह्या समितीच्या अहवालामध्ये निविदापद्धतीचा मुद्दा पुन्हा उपस्थित करण्यात आला. अहवालातील परिच्छेद ५·१ शिफारशीमध्ये समिती म्हणते :

"While enforcing the minimum wages and rates, Government should see that the industry is not adversely affected but it is stabilised and adequately distributed all over the State. Government can achieve this objective by laying down sound administrative and economic policies.[१११]

२११. उपरिनिर्दिष्ट पहिल्या किमान वेतन समितीने केलेल्या शिफारशींचा उल्लेख करून ही समिती म्हणते :

"The previous Minimum Wages Committee appointed by the then Bombay Government had brought to the notice of the Government that the proposed recommendations of the Committee would increase the financial burden on the Industry. In order to counter-act and minimise the burden and to stabilise the industry the Committee has made a number of recommendations. It is however, very unfortunate to note that the Government accepted and implemented only the schedules of rates and zones but totally disregarded the important recommendations which were required to be implemented concurrently to give the necessary relief to the Industry in some measure. This has reduced the printer of the towns and the district places to a pitiable plight and has brought about demoralisation among their ranks. It has been brought to the notice of the Committee that the nationalisation of Transport, Life Insurance and School Textbooks, etc. removed a considerable part of the printing work from the private sector. Naturally the struggle for survival became serious and the individual printers in desperation started a very keen cut-throat competitions by offering ridiculously low rates of printing.

110. Ibid p. 44.

111. *Report of the Minimum Wages Committee, Printing and Allied Trades*, Bombay 1965 p. 21.

२१२. मध्यंतरीच्या काळामध्ये शासनाने मतदारांच्या याद्यांचे काम सरकारी प्रमाणित दर आठ रुपये असताना रु. ३–५० ला करून घेतल्याबद्दल समितीने टीका केली आहे. शिवाय या पद्धतीमुळे संबंधित जिल्ह्याच्या बाहेर काम देण्यात आले आणि त्यायोगे जिल्ह्यातील मुद्रकांचे नुकसान झाल्याची नोंदही समितीने केली आहे. अहवाल पुढे म्हणतो.

> "that such kind of working on the part of Government creates discrepancies in the local industry and actively encourages the printers to circumvent the provisions not only of the Minimum Wages Act but of other labour acts also".

वरील गोष्टी लक्षात घेऊन समिती शिफारस करते :

> "that all the Government work of the district should be entrusted to the District Association of printers at standard economic rates or to the individual printers of the district, in case there is no association or in case the association declines to shoulder the responsibility."[११२]

२१३. पाठ्यपुस्तकांच्या मुद्रणाबाबत समितीने शिफारस केली ती अशी —

> "that the printing work of these books, which really does not form a part of nationalisation has also been assigned to the Government presses which are already overloaded with confidential, emergency and routine departmental work. To meet this added workload the State Government has plans to set up an automatic plant for the production of books. The Committee feels that the investment for such a plant is quite unnecessary when the private sector has enough capacity to print the books at economic rates."[११३]

वरील शिफारसी म्हणजे निविदा न मागविता तज्ज्ञ-मान्य दराने काम देण्याबाबतच्या शिफारशी सरकारला मान्य झाल्या नाहीत ही गोष्ट सरकारी मुद्रणकामासाठी अजूनही निविदा मागविण्यात येतात यावरून सिद्ध होते. पाठ्यपुस्तकाच्या छपाईबाबतही समितीच्या शिफारशी सरकारने अमलात आणल्या नाहीत, परंतु 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या' स्थापने (२७ जानेवारी १९६७) नंतर ही परिस्थिती पालटली आहे.

२१४. मी वर म्हटल्याप्रमाणे इथे दोन महत्त्वाच्या गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे.

(१) मुद्रण कामासाठी योग्य दर कसे ठरवावे आणि नागरिकांच्या करातून उत्पन्न झालेल्या पैशांचा संभाव्य अपव्यय कसा टाळावा.

(२) मुद्रणालयांची निवड कशी करावी.

112 Ibid P. 21
113 Ibsd P. 22

अनुक्रमणिका

मुद्रण परिषदांनी आणि किमान वेतन समितीने असे सुचविले आहे की, मुद्रण कामे देणाऱ्यांनीच स्वतः योग्य दर ठरवावे आणि मुद्रणालये निवडण्यासाठी काही तत्त्वे ठरवून द्यावीत. तत्त्वतः मुद्रणकामाचे दर ठरविणे शक्य आहे. परंतु दर्जा सांभाळण्याच्या बाबतीमध्ये योग्य यंत्रणा निर्माण केल्याशिवाय असे ठरविलेले दर दर्जेदार काम करणाऱ्या मुद्रकांना अन्यायकारक ठरतील असे वाटते. शिवाय एकंदर मुद्रक-समुदायांनी समजूतदारपणा दाखविल्याशिवाय मुद्रणालयांच्या निवडीबाबत असमाधान पसरण्याचा संभव नाकारता येत नाही. असे होऊ नये म्हणून मुद्रकांना प्रशिक्षित करणे हे काम मुद्रक संघटकांनी करावयाचे आहे. याबाबत सुबुद्ध मुद्रक प्रयत्नशील आहेत हे खरे असले तरी अयोग्य स्पर्धा टाळण्याच्या बाबतीमध्ये मुद्रण परिषदा आणि जिल्हा मुद्रण संघटना अजून यशस्वी झाल्याचे दिसत नाही.

२१५. वरील परिस्थितीचे एक कारण म्हणजे निर्मितिमूल्याच्या बाबतीमध्ये पूर्ण अज्ञान. ज्या पुढारलेल्या देशांत निर्मितिमूल्य पद्धती अमलात आहे, तिथे निर्मितिमूल्य काढून मग परवडणारे दर ठरविणे शक्य होते या बाबतीमध्ये इंग्लंड देशातील मुद्रण आणि लेखनसामग्री खात्याने अवलंबिलेली पद्धती विचारात घेणे इष्ट ठरेल :

" The Stationery Office is the biggest buyer of print in the country and in the current year purchases from the printing industry will total £4 million, exclusive of paper. Upwards of 1,000 Printers are regularly employed on Stationery Office Work and about 70,000 orders are placed, with them each year. The aim is to get printing done efficiently and on time at the most economical price. Experience has shown that this can best be achieved with some classes of printing by making long term contracts, usually for seven years. For other kinds of printing a running contract terminable at three months' notice is preferable. But one quarter of the printing is the subject of individual ad hoc contracts. All contracts except for trivial items, are awarded after competitive tendering. A good deal of skill and a comprehensive knowledge of the industry is required in placing to the best advantage this huge quantity of printing with commercial printers. "

" Prices may be related to costs in several ways :

(1) Cost Based Price : In this case total cost is ascertained historically to which the agreed percentage of profit is added. This procedure is adopted in respect of the printing contracts given by H. M. S. O. in the U. K.

(2) Cost Estimated Price : In this case total cost is estimated in the light of past experience, to which a normal percentage of profit is added.

(3) Market Based Price : These prices may be fixed in several ways. The laws of supply and demand may regulate the market prices.

In the normal course, the printer adopts the cost estimated price.

मुद्रण काम देण्याच्या बाबतीतील पाठ्यपुस्तक मंडळाचे धोरण

२१६. वरील दर ठरविण्याच्या विविध पद्धती लक्षात घेतल्या असता योग्य माहितीच्या अभावी दर ठरविले तर कसा गोंधळ माजेल हे ध्यानात घ्यावे. मुद्रणालये निवडण्याच्या बाबतीमध्ये विशेषतः विशिष्ट कामासाठी त्यांची निवड करण्याच्या बाबतीत तर अधिकच अडचणी आहेत. आणि निविदा पद्धतीच्या अभावी काम देणाऱ्या अधिकाऱ्यांनीच या बाबतीमध्ये पूर्ण जबाबदारी घेणे आवश्यक होऊन बसते. सकृद्दर्शनी असे वाटते की, दर ठरविण्याच्या बाबतीमध्ये काही निश्चित तत्त्वे ठरविणे शक्य व्हावे. विशेषतः ज्या कामाचे दर ठरविण्यासाठी निश्चित भाग पाडता येतात, त्या बाबतीत ठोकळ दर ठरविणे शक्य व्हावे. महाराष्ट्र शासनाच्या पाठ्यपुस्तक मंडळाने या बाबतीमध्ये पाऊल टाकले असून पाठ्यपुस्तक छपाईचे आणि बांधणीचे दर ठरवून दिले आहेत. महाराष्ट्र राज्यामध्येच नव्हे तर अखिल हिंदुस्थानामध्ये अशी पद्धती स्वीकारणारी ही पहिलीच पाठ्यपुस्तक प्रकाशन संस्था असेल.

२१७. मुद्रणालये निवडताना जी मुख्य अडचण येते ती ही की, बहुसंख्य मुद्रकांना असे वाटते की, आपण कोणतेही छपाईचे काम करू शकू. विशिष्ट कामासाठी विशिष्ट यंत्रसामग्री लागते, विशिष्ट कौशल्य लागते ही गोष्ट सामान्यतः हे मुद्रक मान्य करीत नाहीत. व्यापारी मुद्रणाच्या बाबतीत अशी समज जास्त दिसते. कारण काम नाकारले जाऊ शकते. कॉम्प्यूटर, हॉलेरिथसारख्या यंत्रासाठी उपयोगात आणल्या जावयाच्या मुद्रित साधनांच्या बाबतीमध्ये एकंदर आकार आणि छपाईची विशिष्ट मांडणी यांना अत्यंत महत्त्व असते. तिथे केसभरही बदल झाल्यास ते मुद्रित साहित्य निरुपयोगी ठरते. काही विशिष्ट आवेष्टनमुद्रणामध्ये निश्चित रंगाचा उपयोग करावयाचा असतो. तिथे तो मूळ दिलेल्या नमुन्यापासून जराही वेगळा असून चालत नाही. वेष्टन–पेट्यात–साहित्य भरण्यासाठी जी पद्धती स्वीकारली असेल त्यामध्ये अडचण निर्माण होणार नाही असेच त्यांचे स्वरूप असले पाहिजे. नाही तर ती निकामी होतात.

२१८. ग्रंथमुद्रणामध्येही वस्तुतः अशीच अचूकपणाची जाणीव असली पाहिजे. पूर्व नियोजनाप्रमाणे सर्व प्रक्रिया झाल्या पाहिजेत. उदाहरणार्थ घडी यंत्राच्या क्षमतेनुसार पानांची मांडणी करणे आवश्यक असते. शाई सर्वत्र सारखी असली पाहिजे. विशिष्ट शब्द विशिष्ट पद्धतीने लिहिले पाहिजेत आणि तोडले पाहिजेत. शब्दांत, ओळीत, परिच्छेदांत जागा सोडण्याच्या बाबतीमध्ये अवलंबिलेली पद्धती सर्वत्र सारखी पाहिजे. सोळा पानी फॉर्मचे पुस्तक असेल तर १६–१७/३२–३३ अशा समोरा समोर येणाऱ्या पानांवरील शाईचे प्रमाण आणि मजकुराच्या ठेवणीमध्ये सादृश्यता असली पाहिजे. अशा अनेक गोष्टी सांगता येतील.

या मुद्द्यांचा इथे विस्तार करावयाचा नाही. इथे एकच गोष्ट स्पष्ट करावयाची आहे आणि तीम्हणजे विशिष्ट कामे करण्यासाठी लागणारे विशिष्ट कौशल्य त्या त्या मुद्रणालयांनी संपादन केले पाहिजे. मुद्रणालयांच्या व्यवस्थापन रचनेत अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

१७

मुद्रणक्षमतेची एक पाहणी

२१९. सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि शिक्षणाचा सर्व स्तरांवरील प्रसार यामुळे या देशात पाठ्यपुस्तकांची आणि संदर्भ ग्रंथांची मागणी फार वाढते आहे. परदेशांतून आयात होणाऱ्या पुस्तकांच्या संख्येत, परदेशी चलन तुटवड्यामुळे, घट झालेली आहे. त्यामुळे अर्थातच इंग्रजी पुस्तके इथेच पुनर्मुद्रित करावी लागत आहेत. शिवाय वरील कारणांमुळे एतद्देशीय भाषांतील पुस्तकांच्या मागणीत वाढ होत आहे. त्यामुळे इतर प्रकाशनाच्या मागण्याही वाढल्या आहेत. असे असले तरी ग्रंथनिर्मितीबाबत, पुस्तके आणि त्यांच्या प्रती इत्यादींबाबत, निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. अंदाजावरच विसंबून राहावे लागते. ग्रंथनोंदणी कायद्याप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक पुस्तकाची प्रत कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयाला पाठवावी लागते. तिथे ग्रंथाच्या याद्या तयार करण्यात येतात, आणि त्या उशिराने का होईना पण प्रसिद्ध होतात. परंतु वर उल्लेखिलेली माहिती तिथेही योग्य वेळी उपलब्ध होत नाही असे दिसून येते. जगातील प्रमुख देशांत १९५२ ते १९६२ ह्या काळातील पुस्तक-प्रकाशनात झालेल्या वाढीची माहिती पुढील पानावरील तक्त्यात दिली आहे. इटली आणि हिंदुस्थान या दोनच देशांत घट झालेली आहे. हिंदुस्थानातील घट ही कागद-टंचाईमुळे होती असे वाटते. १९६२ सालच्या निवडणुकीमुळे कागदाचा पुरवठा आणखी कमी झाला असण्याचा संभव आहे.

अनुक्रमणिका

	१९६५–६६ प्रत्यक्ष	१९७०–७१ अंदाज	१९७५–७६ अंदाज	१९८०–८१ अंदाज
१. विद्यार्थ्यांची संख्या (लाख)		९६०	१२३०	१४९०
२. पाठ्यपुस्तकांची मागणी				
※ (अ) ठोक (लाख) पाने	६२०५८०	९८४३२०	१३७१६८०	१७७५९१०
पुस्तके	६९९०	११३७०	१५४४०	१९०९०
(ब) नगद (लाख) पाने	२०६८६०	३२८१००	४५७२२०	५९१९७०
पुस्तके	२३३०	३७९०	५१४०	६३६०
३. पाठ्यपुस्तकाच्या पानांचा अंदाज	६२,०००	—	—	१७००००
४. पाने दर विद्यार्थ्यामागे	१२५	—	—	२५५
५. दर पुस्तकाची सरासरी पाने	—	८७	८९	९२
६. दर पुस्तकातील कागदाचे वजन (ग्रॅम)	—	१३३	१३६	१४०
७. वरीलप्रमाणे पाठ्यपुस्तकासाठी कागदाची गरज (टनात) (२ब × ६)	—	५०५००	७०,०००	८९४००
८. एकंदर कागद वापरावरून केलेला ग्रंथकागदाचा अंदाज	—	५४६००	७२,०००	९००००
९. सर्व ग्रंथछपाईसाठी लागणाऱ्या कागदाचा अंदाज				
एकंदर कागदाच्या १० टक्के (टनात)	—	७८०००	१,२०,०००	१,८०,०००
		(७०%)	(७०%)	(५०%)
१०. कागद निर्मितीची व्यवस्था (टन)	७,००,०००	१८,३०,०००	३०,००,०००	४४,००,०००
११. ,, ,, ,, सुधारित	—	१३,००,०००	२०,००,०००	—
१२. कागदाची एकंदर गरज (टन)	७,००,०००	१२,००,०००	२०,००,०००	३०,००,०००
१३. दरडोई कागदाचा वापर (किलोग्रॅम)	१·४	—	४००	५००
१४. लिहिण्याचा व छपाईचा कागद (टन)	—	७,८०,०००	१२,००,०००	१८,००,०००

१९५२ ते १९६२ या अवधीत काही प्रमुख देशांतील पुस्तक-प्रकाशनात झालेली वट-घट

देश	एकूण प्रसिद्ध झालेली पुस्तके १९५२	१९६२	शेकडा टक्के वाढ किंवा घट	प्रत्येक पुस्तकाच्या सरासरी प्रती□	दर दशलक्ष लोकांशी पुस्तकाचे प्रमाण १९५२	१९६५	दरडोई @ कागदाचा वापर卐
१	२	३	४	५	६	७	८
१. रशिया	४३,१३५	७९,१४०		१७,३००	१८८	१९५	१५.५ केजी
२. चीन	२,५०७	२६,४१४	३५%		५	३८	१.८ ,,
३. इंग्लंड	१८,७४१	२५,०७९		१५,२००	३७५	४६९	१०७.५ ,,
४. जपान	१७,३०६	२२,०१०	२७%		१९९	२३१	४७.२ ,,
५. अमेरिका	११,८४०	२१,९०४		१३,९००	७४	११७	११६.३ ,,
६. पश्चिम जर्मनी	१३,९१३	२१,४८१	८५%	७,७००			
७. फ्रान्स	११,९५४	१३,२८२	५.३%	९,७००			
८. भारत	१८,२५२	११,०८६			४७	२५	१.१ ,,
९. इटली	८,९४९	७,४०१					
१०. हॉलंड	६,७२८	९,६७४					
११. झेको-स्लोव्हाकिया	५,८३७	८,७०३					
१२. स्पेन	३,४४५	९,५५६					

□ Barkars, R. E. Books for All 1956, UNESCO, p. 23.

卐 Escarpit, Robert. The Book Revolution' UNESCO, p. 56-58

@ Over all world production increased by 40% during 10 years.

२२०. १९६२ नंतर ग्रंथनिर्मितीत निश्चित वाढ झालेली आहे. लिहिण्याच्या आणि छपाईच्या कागदाच्या निर्मितीतही वाढ झालेली आहे. परंतु निश्चित आकड्यांच्या अभावी वाढत्या ग्रंथनिर्मितीसाठी लागणाऱ्या व्यवस्थेचा निश्चित अंदाज करता येत नाही. इतकेच नव्हे तर कागद किती लागेल हेही सांगता येत नाही. अलीकडे (१९६७) यू. एस. एड. (United States Agency for International Development Mission) च्या विद्यमाने एम्. एन्. दस्तूर आणि कंपनीने याविषयी एक पाहणी केली. त्या पाहणीचा अहवाल उपलब्ध आहे.[११४] यामध्ये एकंदर लिहिण्याच्या आणि छापण्याच्या, तसेच ग्रंथ-मुद्रणासाठी लागणाऱ्या कागदाच्या गरजेचा अंदाज केला आहे. त्याचे आकडे उद्बोधक आहेत. हा अंदाज खालील गोष्टींवर आधारित आहे.

(१) हिंदुस्थान सरकारच्या टेक्निकल डेव्हलपमेंट संचालनालयाने केलेले अंदाज.

(२) विद्यार्थि-संख्येवर आधारित अंदाज.

(३) पाठ्यपुस्तकांची साधारण पृष्ठसंख्या आणि दर विद्यार्थ्यामागे लागणाऱ्या पुस्तकांचा अंदाज.

114 *Survey of Physical Capacity for Text-Book Production in India*, M. N. Dastur & Co. Pvt. Ltd. Consulting Engineers, Calcutta, May 1967.

अनुक्रमणिका

या अहवालात जागोजागी दिलेल्या आवश्यक त्या माहितीचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे.

२२१. ग्रंथमुद्रणास लागणाऱ्या कागदाचा अंदाज करावयाचा तर ग्रंथाच्या आकारा-विषयी काही गोष्टी गृहीत धराव्या लागतील. त्या अशा

	दर विद्यार्थ्यामागे पाठ्यपुस्तकाची पाने	पुस्तकातील पानांची सरासरी
कनिष्ठ प्राथमिक	४१५	५३
वरिष्ठ ,,	१३५०	७४
दुय्यम	२६२०	१९७
विद्यापीठीय	३०००	३००
इतर	३०००	३००

या संदर्भात पाश्चात्त्य देशांतील ग्रंथमुद्रणासाठी लागणाऱ्या कागदाची गरज आणि हिंदुस्थानात १९६०–६१ पासून १९६५–६६ पर्यंत वाढत जाणारी कागदाची मागणी यांचे आकडे आपण पाहू :

लिहिण्याच्या आणि छपाईच्या कागदाचा वापर आणि ग्रंथनिर्मिती

	पुस्तक संख्या संख्या लाख	आणि कागद टन कागद	एकंदर लिहिण्याचा छपाईच्या कागदाचा वापर	एकंदर कागदाची टक्केवारी
१. जर्मनी	१०८०	४३,०००	३,४०,०००	१२·६
२. फ्रान्स	१०००	४०,०००	३,४०,०००	११·८
३. इंग्लंड	२८६०	१,१४,०००	७,५०,०००	१५·१
४. अमेरिका	१६५०	६६,०००	४४,००,०००	१·५
५. हिंदुस्थान ६१/६१	८७०	२९,०००	२,२२,०००	१३%
६१/६२	९७०	३२,०००	२,३६,०००	१३·५
६२/६३	९६०	३२,०००	२,४०,०००	१३·३
६३/६४	११३०	३८,०००	३,०८,०००	१२·४
६४/६५	९८०	३३,०००	३,१६,०००	१०·४
६५/६६	९६०	३२,०००	३,१९,०००	१०·०

याच अहवालात मुद्रण-व्यवस्थेचीही पाहणी करण्यात आली असून त्यावर एक प्रकरणच लिहिले आहे. अहवाल म्हणतो की मुद्रण-व्यवस्था पुरेशी आहे. अहवालाच्या सातव्या प्रकरणातील मूळ उतारेच देतो :

" Available data on the number of printing presses in India show considerable variance. According to a survey made by the All-India Federation of Master Printers in 1953-54, the number of printing presses was slightly over 23,000; a recent estimated by the industry places the figure 25,000. However, a sample survey of printing presses made in 1955 by the Government of India indicated that there were 12,549 presses in India. Statistics compiled by the Government's Central Statistical Organisation (CSO) on the basis of data supplied by the State Governments indicate the existence of 11,264 presses in 1959-60, 14,989 in 1960-61 and 14,723 in 1961-62 "...about 70 per cent of the total number of presses are located in the five States of Delhi, Madras, Maharashtra, Uttar Pradesh and West Bengal.[११५]

२२२. हिंदुस्थानातील मुद्रणालयांची अंदाजी संख्या १५,००० ठरविल्यानंतर अहवालात त्याची विगत दिली आहे.

" (i) Large units, employing 26 or more personnel;
(ii) Medium-sized units employing between 10 to 25 persons; and
(iii) Small units, employing under 10 persons.

Of these the first and second categories, namely units employing between 10 to 25 and 26 or above are considered for book production. "

२२३. या पाहणीच्या वेळी विश्वसनीय असे आकडे फक्त महाराष्ट्र राज्यातीलच उपलब्ध होते. याच आकड्यांवरून अहवालात अखिल देशातील मुद्रणालयांची आकारांवरून वर्गवारी केली आहे.

कामगार संख्या	मुद्रणालयांची टक्केवारी	मुद्रणालय संख्या
(अ) दहाहून कमी	७०	१०,५००
(ब) १० ते २५	१८·५	२,७७५
(क) २६ हून जास्त	११·५	१,७२५
एकूण	१००·०	१५,०००

' ब ' गटात सुमारे ३००० मुद्रणालये आहेत असे ' मानले ' आणि यांपैकी पन्नास टक्के मुद्रणालयांत ग्रंथमुद्रण होते असे ' धरले ' तर १५०० ग्रंथ-मुद्रणालये आहेत असे ' सिद्ध होते ' असे अहवाल म्हणतो.

या अंदाजित १५०० मुद्रणालयांच्या कार्यशक्तीचा अंदाज करताना यंत्रसामग्री, त्यांचे आकार, वेग आणि यंत्रे किती वर्षे उपयोगात आहेत ही माहिती अहवाल-लेखकाने काढली

115 Ibid p. 367-.

पाहिजे होती. N. D. C. च्या (नॅशनल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) विभागाने (टेक्नॉलॉजिकल कन्सल्टन्सी ब्यूरो) यंत्रांच्या संख्येचा (१९६५–६६) अंदाज केला होता तो अहवालात दिला आहे.

भारतात उपयोगात असलेल्या मुद्रणयंत्रांच्या संख्येचा अंदाज

वर्णन	यंत्रसंख्या	आकार सें. मी.	मुद्रण पुढाऱ्याचा अंदाज
ट्रेडल	१७,०००	२३४ × ३८१	२००००
स्टॉप सिलिंडर	५,९९०	४२० × ५९४	१००००
टू रेव्होल्यूशन	२,४७०	५९४ × ८४१	
प्रतिरूप मुद्रण यंत्रे	२,२१०	४२० × ५९४	२५००
रोटरी	२५०	४२० × ५९४	—

दस्तुर अहवालात काही मुद्रक-पुढाऱ्यांना विचारून मुद्रण यंत्रसंख्या निश्चित केली ती वर शेवटच्या स्तंभात दिली आहे.

२२४. या यंत्रावर क्षमतेच्या ५० ते ६० टक्के छपाई होते, असे मानले आणि आठ तासांची पाळी, वर्षाचे दिवस ३०० आणि ७५ G. S. M चा कागद धरला तर एकंदर कागद किती लागेल त्याचा अंदाज केला तो असा :

यंत्रसंख्येवरून केलेल्या कागदाच्या गरजेचा अंदाज

प्रकार	आकार सें. मी.	प्रतिदिवशी	यंत्रसंख्या	कागद टन	एकंदर कागद टन
ट्रेडल	२३४ × ३८१	६,०००	२०,०००	५३५	१२०,०००
सिलिंडर	२०८ × ७६२	९,०००	१०,०००	३४८०	३९०,०००
ऑफसेट	५०८ × ७६२	१८,०००	२,५०००	६·९५०	१९५·०००
					७०५,०००

२२५. छपाईची व्यवस्था पुरेशी आहे अशा निष्कर्षाप्रत येताना अहवाल-लेखक पुन्हा मुद्रकपुढाऱ्यांचा सल्ला घेतात.[११६]

" Discussions with printing establishments indicated that most presses work one shift. A two-shift operation would double the printing capacity of 705,000 tons per year. As against this, the consumption of printing and writing paper in 1965-66 was 348,000 tons which showed that the printing capacity was under-utilised during the year.

116 Ibid p. 41.

The prieting existing capacity in relation to requirements for all types of printing (as given in chapter 3. Table 3-4, item 2) expressed in terms of paper used, will be as follows :

year	Printing capacity
1970-71	Less than adequate on a single-shift basis, but more than adequate with a two shift working.
1975-76	Adequate with two-shift working.
1980-81	Inadequate with two-shift working, but adequate on three-shift basis.

" In chapter 3 the consumption of paper for book production is estimated at 100% of the total consumption of printing and writing paper. Thus, if approximately 10% of the printing capacity could be made available for book printing, the demand could be met. This appears feasible as the presses which can do book-work are the larger establishments, which command significantly higher than 10% of the total printing capacity. Whether or not capacity for text-book printing will be available will therefore depend mainly on the profitability of printing of textbooks as compared to other printing jobs. " [११७]

२२६. जुळणीच्या सोईचा अंदाज २६०० जुळणी यंत्रसंख्येवर आधारित आहे. २५% जुळणी यंत्रे वृत्तपत्रांसाठी काम करतात असे धरले आहे. दर दिवशी आठ पाने जुळणी होते, असा अंदाज केला आहे. यावरून ४७ लाख पाने उभी राहतील. जुळाऱ्यांची संख्याही अशीच अंदाजे ४५,९०० धरली आणि यावरून २१० लाख पाने होतील असे ठरवले.

अन्य कामाचा अंदाज, युनेस्कोच्या पाठ्यपुस्तक व इतर पुस्तक अहवालानुसार यांचे प्रमाण, नवीन पुस्तकांचे परस्पर प्रमाण, पहिली आवृत्ती व पुनर्मुद्रण प्रमाण, यावरून करून ४० लाख पानांचा अंदाज केला. पुढे अहवाल म्हणतो :–

" It would appear that the composing capacity now available could meet the requirements in 1970-71, and by working on a two-shift basis and installation of additional machines, the requirements for book-composing in 1975-76 and 1980-81 can be met. "

२२७. उपरिनिर्दिष्ट NIDC च्या ब्यूरोच्या अंदाजाप्रमाणे बांधणी यंत्र संख्येचा अंदाज केला आहे.[११८]

117 Ibid p. 42.
118 Ibid p. 89.

प्रकार	यंत्रसंख्या	दरदिन पुस्तके	एकंदर क्षमता
घडी यंत्रे	१०,०००	१०,०००	१००·०
शिवण यंत्रें (तार-दोरा)	१७,०००	१,२००	२०·४
साधी कापणी यंत्रे	१४,४००	५,०००	७२·०
त्रिधारी	२,७००	१०,०००	२७·०

At the existing levels of output, the total bookbinding capacity is about 1,500 million copies per year for the standard 100-page book adopted in this study. If, however, the capacity for cover-fixing operation is raised by installating machines to match the output of other binding, the overall binding capacity can be raised to 6,000 million standard books a year. Beyond this stage, stitching facilities become the limiting factor.

Based on a lext-book demand of 379 copies in 1970-71, 514 million in 1975-76 and 636 million in 1980-81 the demand for book copies may be estimated at 540 million in 1970-71, 860 million in 1975-76 and 1,272 million in 1980-81.[११९]

२२८. बांधणीयंत्रांपैकी ग्रंथेतर कामासाठी वापरली जाणारी यंत्रे सोडून राहिलेल्यांविषयी अहवालात म्हटले आहे. ग्रंथेतर कामास लागणारी यंत्रे सोडून अहवाल अंदाज करतो.

" Thus while the estimated text-book demand could be met from existing capacity the demand in 1975-76 and 1980-81 may require augmonting the capacity for over-fixing, stitching and other operations. "

The report concludes :

" The approximate estimates made above show that there is adequate manpower and machine capacity for printing, composing and binding to meet the text-book needs in 1970-71. "[१२०]

119 Ibid p. 44.
120 Ibid p. 44.

१८

मुद्रणव्यवसायाच्या विविध बाजू

मुद्रण कामासाठी मुद्रायतन योजना

२२९. मुद्रणनिर्मितीत अनेक गोष्टींचा समावेश होतो. मजकुर–जुळणी, प्रत्यक्ष मुद्रण, त्यात अक्षरमुद्रण, प्रतिरूप मुद्रण (शिळा छाप–ऑफसेट), ताम्रपट–मुद्रण (ग्रेव्ह्यूर), रेशमी जाळीतून केलेले मुद्रण (सिल्क–स्क्रीन) खडीछाप मुद्रण वगैरे मुद्रणाच्या पद्धती, प्रबंधन (बाईंडिंग), व्हार्निशिंग, स्पायरल बाइंडिंग, ठसे बनविणे, प्रतिरूप मुद्रणासाठी सरूप (पॉझिटिव्ह) व पत्रे बनविणे इत्यादी अनेक गोष्टी येतात. या सर्व एकाच छाप-खान्यात होतात किंवा व्हाव्या असे नव्हे. तसे करण्याचा प्रयत्न बहुधा आतबट्ट्याचा ठरतो; उलट वेगवेगळ्या ठिकाणी ती कामे करून घ्यायची तर कालापव्यय होतो; वाहतूक आणि इतर निर्मितिखर्चही वाढतो. शिवाय ग्राहकांना एकाच कामासाठी अनेकांशी संबंध ठेवावा लागतो. त्यातून कटकटी निर्माण होतात. या अडचणी टाळावयाच्या असतील तर वरील विविध कामे करणारे कारखाने एकाच अंगणात एकत्र आणता आले पाहिजेत. औद्योगिक वसाहती स्थापण्याच्या या काळात मुद्रण संस्था एकत्र आणणे कठीण पडू नये. त्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजेत. या दृष्टीने एक आराखडा काही जाणत्या मुद्रकांनी तयार केला आहे तो प्रत्यक्षात येईल तो सुदिन.

मुद्रणव्यवसायाचे भवितव्य आणि ग्रंथमुद्रणाचे महत्त्व

२३०. मुद्रणव्यवसाय हा एक अत्यंत ‘ खास ’ व्यवसाय झाला आहे. त्यात लागणारे तांत्रिक ज्ञान बहुविध तऱ्हेचे असावे लागते, हे तर खरेच. पण यशस्वी मुद्रक होण्यासाठी कामाच्या खर्चाचा हिशेब करून खर्चाचा अंदाज ग्राहकास देणे (Estimating), निर्मिति-मूल्यांकन (कॉस्टिंग), यंत्रसामग्रीची देखभाल, व्यवस्थापकीय आखणी, कामगारविषयक कायदे, इत्यादींबाबत योग्य सल्ला मिळण्याची सोय उपलब्ध असणे, आवश्यक ठरते. अशा

अनुक्रमणिका

तऱ्हेच्या सोई आपल्याकडे फारशा उपलब्ध नाहीत. त्याबाबत काही योजना करणे शक्य आहे.

२३१. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जनतेच्या आकांक्षा वाढल्या आहेत. जनतेचे राहणीमान वाढविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. समाजाला साक्षर करून सुसंस्कृत करण्याचे उद्दिष्ट सरकार व समाजनेते यांनी मान्य केले आहे. सार्वत्रिक शिक्षणाची सोय करणे हे सरकारचे एक प्रमुख कर्तव्य सर्वमान्य झाले आहे. अशा परिस्थितीत वाढलेल्या व वाढत जाणाऱ्या लोक-संख्येच्या प्रचंड प्रमाणातच त्यांच्या शिक्षणाची सोय करण्याची व्यवस्था आपणास करावयाची आहे. शिक्षणासाठी मुद्रित साहित्याची फार मोठ्या प्रमाणात आवश्यकता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य आणि शिक्षितांसाठी वाचनीय पुस्तके यांच्या आवश्यकतेची मोजदाद केली तर हे काम किती प्रचंड आहे याची कल्पना येईल. 'स्वभाषेत शिक्षण' हे तत्त्व मान्य झाल्यानंतर सर्व भाषांत विद्यापीठीय स्तरापर्यंत पुस्तके मुद्रित करणे क्रमप्राप्त आहे. संख्येचा विचार करताना यांत्रिकीकरणाशिवाय हे काम साध्य होणे बिकट आहे. ग्रंथमुद्रणाबरोबरच इतर जीवनोपयोगी साधनासाठीही मुद्रणाची आवश्यकता वाढती असल्यामुळे व्यावहारिक मुद्रणाचीही वाढ मोठ्या प्रमाणात होणे अटळ आहे. परदेशातून मुद्रित होऊन येणारे ग्रंथ अगर इतर मुद्रिते कालानुरूप कमी कमी होणार आहेत. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला तर आपणांस केवढे मोठे काम अंगावर घ्यावयाचे आहे, याची कल्पना येईल. व्यावहारिक मुद्रणातील समस्यांचे स्वरूप वेगळ्या प्रकारचे आहे. या मुद्रणामुळे त्वरित अर्थोत्पादनाची शक्यता असल्यामुळे उद्योगपती या समस्या सोडविण्यासाठी खटपट करतीलच. मात्र ग्रंथ-मुद्रणामुळे होणारे समाजाचे फायदे दीर्घकालीन असल्यामुळे त्वरित दृश्य नाहीत. त्यामुळे या विभागाकडे उद्योगपतींचे लक्ष कितपत जाईल याची शंका आहे. या विभागातील समस्या सोडविणे हे बव्हंशी समाजहितैषी व्यक्तींना करावे लागणार आहे, म्हणूनच ग्रंथमुद्रणाच्या विभागाकडे आपण अधिक लक्ष दिले पाहिजे.

मुद्रणालयाच्या विकासात दूरदृष्टीची आवश्यकता

२३२. परंपरेने जी कामे ज्या पद्धतीच्या मुद्रणालयात करण्यात येतात त्या कामाचे स्वरूप बदलताच एक वेगळी व्यवस्था करण्याची आवश्यकता उत्पन्न होते, त्याचा विचार व्हावयास हवा. उदाहरणार्थ, खाजगी प्रकाशनक्षेत्रात पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करीत असताना ज्या प्रकारची मुद्रणव्यवस्था सोयीची होती तीच मुद्रणव्यवस्था फार मोठ्या प्रमाणात राष्ट्रीयीकरण झालेल्या पुस्तकांच्या मुद्रणात टिकू शकणार नाही. प्रकाशकांमध्ये स्पर्धा असल्यामुळे प्रत्येक प्रकाशकाला छापावयाच्या पुस्तकांची संख्या तोकडी असल्यामुळे काही विशिष्ट मुद्रणपद्धती, टाइपावरून लेटर प्रेस पद्धतीची छपाई, जास्त सोयीची ठरली; परंतु फार मोठ्या प्रमाणात पुस्तकांची निर्मिती करून घ्यावयाची असली तर ज्याप्रमाणे ऑफसेट पद्धती सोयीची पडते, त्याप्रमाणे अलीकडे प्रचारात आलेली रबरी किंवा प्लॅस्टिक ठशांनी लेटरप्रेस

पद्धतीने रोटरी यंत्रावर छपाई करून घेण्याची पद्धती सोयीची ठरते. या गोष्टी अजून उमगलेल्या दिसत नाहीत.

२३३. अलीकडे हिंदुस्थानात प्रतिरूप मुद्रणयंत्रांची आवक फार मोठ्या प्रमाणात होते आहे. मुद्रकांमध्ये आता अक्षर मुद्रणाचे दिवस संपले, जगायचे असेल तर प्रतिरूप मुद्रणाची कास धरली पाहिजे; असा सूर ऐकू येतो. या विचाराच्या आहारी जाऊन आपल्याकडच्या, प्रामुख्याने मुंबईतील मुद्रकांनी प्रतिरूप मुद्रणयंत्रे बसविली. हे लोण बाहेरही पसरते आहे. नागपूरसारख्या शहरी विडी लेबले छापण्यासाठी प्रतिरूप मुद्रणयंत्रे पूर्वीपासून लोकप्रिय होतीच. पोस्टर, कॅलेंडरे, आणि पत्ते (खेळायचे) यासाठी त्यांचा वापर होतच होता आणि आहे. प्रतिरूप मुद्रणाची ही लाट सर्वत्रच पसरली आहे, आणि आपल्याकडच्या मुद्रकांप्रमाणे पाश्चात्त्य देशांतील मुद्रकही विचारग्रस्त झाले आहेत. गतवर्षी याच विषयाची चर्चा ब्रिटनमधील एका मासिकात झाली होती त्यातील उतारा इथे देतो :

" We have also been told repeatedly that the letterpress printing industry is constantly declining or in unkinder terms that " It's dead but it won't lie down ". This is also untrue. Offset—litho has certainly advanced tremendously during the past 10 years or so, but these many fields in which letterpress is still supreme and among these fields are some of the major activities of the small printing company ".

" The medium-sized letterpress company which is competing directly with litho for big orders, is probably in a much more vulnerable position than the small company which can offer close co-operation with the customer on jobs which might be uneconomical for firms with high overheads but prove a descent profit for the small, compact establishment "

वृत्तपत्रांसाठी ऑफसेट रोटरीचा उपयोग करणे हिताचे आहे अशी शिफारस या यंत्रसामग्रीचे एजंट करीत असतात. याबाबत एका अमेरिकन मुद्रकाचा अभिप्राय असा आहे :

" Offset printing is not, in our opinion a practical alternative to letterpress newspapers in the 75,000/2,50,000 circulation range which are converting to cold type ... Ink and paper costs are higher and there is a paper waste factor in offset printing not found in letterpress "

२३४. प्रतिरूप मुद्रण की अक्षरमुद्रण हा प्रश्न सोडवला तरी एकंदर मुद्रण यंत्रसामग्रीची योजना करताना नवीन निघणारे आणि आधीच निघालेले परंतु विस्तारत असलेले छापखाने योग्य ती काळजी घेत नाहीत असे दिसते. बाजारात कोणते काम आहे किंवा निर्माण होणार आहे त्याचा विचार न करता यंत्रसामग्रीची वाढ होते असे आपल्याकडे दिसून येते. गेली पंचवीस-तीस वर्षे ग्रंथ-मुद्रणासाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यातील मुद्रणालयांनी प्रत्यक्ष मुद्रण-

क्षमतेची किती वाढ केली आणि त्यानुसार वाढलेल्या ग्रंथमुद्रणाच्या बांधणीसाठी काय काय यंत्रसामग्री आणली याचा विचार केला असता, मी काय म्हणतो ते लक्षात येईल. नवीन प्रतिरूप मुद्रण-यंत्रे, किंवा स्वयंचलित अक्षर मुद्रण-यंत्रे बसविणाऱ्याच नव्हे तर कर्ज काढून नवी इमारत बांधणाऱ्या मुद्रकांनी ४२ इंची किंवा ४७ इंची कापणी यंत्र, घडी यंत्र किंवा शिवण यंत्र घेण्याकडे लक्ष दिलेले नाही. घडी घातलेल्या फर्म्यांची दाबून बंडले बांधण्याची सोय त्यांनी केलेली नाही. मग ग्ल्यूइंग मशिनसारखी अत्यावश्यक साधने घेण्याचे तर राहू द्याच. या ग्रंथ-मुद्रणाचा वारसा सांगणाऱ्या शहरात आज एकही Lining table नाही, किंवा सोळा पानी मुद्रिते काढण्याची सोय नाही.

मुद्रण व्यवसायातील तांत्रिक संघटनेचे महत्त्व

२३५. मुद्रणालयाच्या तांत्रिक संघटनेच्या (technical oganization) बाबतीत आज होतो आहे त्यापेक्षा जास्त विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. विशिष्ट प्रकारची कामे करण्यास विशिष्ट यंत्रसामग्री लागते, एवढेच नव्हे तर, कामगारांची एक विशिष्ट मनोवृत्ती बनवावी लागते. म्हणून वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळ्या प्रकारे मुद्रणालयांची योजना करणे आवश्यक ठरते. केवळ नमुने छापणारी .मुद्रणालये कोणा एका भल्या पहाटे ग्रंथमुद्रणास तयार होऊ शकणार नाहीत. उत्तम ग्रंथमुद्रण करणारी मुद्रणालये उत्तम दिनदर्शिका छापण्यास तात्काळ सिद्ध होणार नाहीत. त्याचप्रमाणे ग्रंथमुद्रणात कौशल्य मिळविलेल्या मुद्रणालयास लग्नपत्रिका, निमंत्रणपत्रिका, बिलफॉर्म्स अशासारखी मामुली दिसणारी कामे किफायतशीररीत्या करता येणार नाही. तद्वतच, अशा प्रकारची कामे करणाऱ्या मुद्रणालयास ग्रंथनिर्मितीसाठी त्वरित सिद्ध होता येणार नाही.

२३६. केवळ मुद्रणव्यवसायातच नव्हे तर इतर व्यवसायांतही आपल्याकडे एक अनिष्ट प्रवृत्ती दिसते की, जे काम सध्या डोळ्यासमोर दिसते व आपले काही व्यवसायबंधू ज्यात थोडा पैसा मिळवतात त्या कामाकडेच सामान्यत: मुद्रक धाव घेतात. याउलट नवीन धंद्याची वाढ होत आहे, तिथे त्यास लागणाऱ्या मुद्रण-कामाची पाहणी करून ते मिळविण्याचा प्रयत्न करणे घडत नाही असे दिसते. उदाहरणार्थ, नाशिक भागात व पुणे भागात वाढीस लागलेल्या कारखानदारीस आवश्यक असे मुद्रणसाहित्य पुरविण्याच्या दृष्टीने त्या त्या भागातील मुद्रकांनी काही विशेष प्रयत्न केला आहे असे दिसत नाही. गोदावरी प्रकल्पानंतर औरंगाबाद विभागामध्ये जी कारखानदारी वाढीस लागणार आहे त्याची आगाऊ सूचना घेऊन मुद्रणालये सिद्ध करण्याचा विचार अजून सुरू झाला आहे असे दिसत नाही. याद्यांची कामे, पाठ्यपुस्तके, सरकारी कामे याच वर्तुळात सर्वसामान्य मुद्रकांची भ्रमंती जास्त दिसते.

मुद्रणसंवत्सराची योजना

२३७. इ. स. १९६८ च्या जानेवारी महिन्यात जळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र मुद्रण

परिषदेमध्ये शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी येते वर्ष हे मुद्रण संवत्सर म्हणून पाळावे अशी सूचना पुढे मांडली होती, आणि ती मुद्रण परिषदेने तात्काळ मान्यही केली होती. निर्णयसागर शताब्दी साजरी करण्यास ‘ मुद्रणसंवत्सर ’ पाळण्यापेक्षा जास्त सुयोग्य असा कार्यक्रम तो काय असणार ! या मुद्रण संवत्सरामध्ये निर्णयसागराने केलेल्या कामगिरीचा आढावा घेता आला असता. एकंदर मुद्रणव्यवसायाची भक्कम पायावर प्रतिष्ठापना करण्या-साठी काही भरीव कार्यक्रम आखला पाहिजे होता. मुद्रणाने आधुनिक समाजजीवनावर काय परिणाम केला आहे याचा आढावा घेऊन मुद्रणासारख्या सामर्थ्यवान ज्ञानवाहनाचा राष्ट्राच्या उत्कर्षासाठी जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल याचा सर्वांगीण विचार या मुद्रणसंवत्सरात करता आला असता.

मुद्रणसंवत्सरामध्ये हाती घेता येण्याजोगे काही कार्यक्रम त्या वेळी मी सांगितले होते :

(१) महाराष्ट्रातील, शक्य तर हिंदुस्थानातील, मुद्रणाच्या इतिहासाची साधने जमविणे व त्यावर लेख प्रसिद्ध करणे, व्याख्याने आयोजित करणे.

(२) मराठी पुस्तक-प्रकाशनाच्या इतिहासावर व्याख्याने करविणे, लेख लिहून घेणे.

(३) देवनागरी आणि इतर भारतीय लिप्यांमध्ये सुलभतेने मुद्रण करता यावे याकरिता संशोधन करण्याची व्यवस्था करणे.

(४) महाराष्ट्रातील मुद्रणधंदा वाढीस लागावा म्हणून व्यावहारिक योजना आखून त्या कार्यान्वित करणे.

(५) हिंदुस्थानातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील मुद्रणाच्या प्रगतीच्या इतिहासाची साधने, मुद्रणाशी संबंधित व्यक्तींची माहिती, छायाचित्रे, जुनी मुद्रित पुस्तके, शंभर वर्षांपूर्वी मुद्रणात वापरण्यात येणारी यांत्रिक सामग्री, इत्यादींचा संग्रह करून मुंबईसारख्या मध्यवर्ती ठिकाणी एक, जावजी दादाजी मुद्रण वस्तुसंग्रहालय स्थापन करणे.

(६) मुद्रणविषयक वाङ्मय प्रसिद्ध करणे. विशेषतः मराठीतून मुद्रणशिक्षण घेणारांस उपयुक्त होतील अशी पुस्तके लिहून प्रसिद्ध करणे.

वरील गोष्टींकडे अजूनही लक्ष देणे शक्य आहे.

अनुक्रमणिका

परिशिष्टे

परिशिष्ट : १

देवनागरी लिपी आणि सुलभ जुळणी[1]

देवनागरीच्या जुळणीतील अडचणी

१. देवनागरी लिपी साधारणतः डिग्री किंवा तिमजली पद्धतीनें जुळवतात. ही पद्धती अक्षरांचीं लिखित वळणें कायम ठेवण्याच्या दृष्टीनें जवळ जवळ परिपूर्ण आहे. डिग्री पद्धतीचा अवलंब होण्यापूर्वी सर्वच अक्षरें अखंड पाडलीं जात. त्यामुळें ८०० वर मुद्राक्षरांची जरूर लागे. विशेषतः मात्रा, वेलांटी आणि उकार यांची ठेवण हस्तलेखनानुरूप राखण्यांत डिग्री पद्धति यशस्वी झाली. याही पद्धतींत जोडाक्षरें जुळविण्याचा प्रश्न मात्र कठीणच होता आणि यामुळें अनेक अखंड जोड-मुद्राक्षरें (conjunct types) पाडावीं लागत. जोडाक्षरांची रचना सुलभ, तर्कसुगम असावी असा विचार लिपिसुधारकापुढें मुख्यतः आला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं अमेरिका आणि इंग्लंडमध्यें मोनो आणि लायनो जुळणीयंत्रें तयार झालीं, त्यामुळें रोमन लिपीच्या जुळणीचा वेग पुष्कळच वाढला; आणि पाश्चात्त्य मिशनऱ्यांना भारतीय लिप्यांची जुळणी या यंत्रांवर करावी असें वाटूं लागलें. परंतु देवनागरी अक्षरांची संख्या फार मोठी असल्यानें त्या सर्वांची सोय मोजक्या वर्णांच्या (alphabet) रोमन लिपीसाठीं बनविलेल्या यंत्रात नव्हती. शिवाय उकार, मात्रा, वेलांट्या, वर आणि खाली जुळवणे त्या यंत्रांत जमत नव्हतें. त्यामुळें रेव्हरंड जे. नोएल्‌सारख्या भारतीय लिप्यांचा अभ्यास केलेल्या पाश्चात्त्यांनीं प्रतिपादन करावयास सुरुवात केली कीं, भिन्न भिन्न भारतीय भाषांच्या लेखन-मुद्रणासाठीं रोमन लिपीचा अंगिकार करणें श्रेयस्कर ठरेल. ध्वनिदृष्ट्या पुष्कळशी परिपूर्ण अशी देवनागरी लिपि करीत असलेलें काम केवळ २६ रोमन चिन्हांनीं होणार नाहीं. म्हणून संस्कृत ग्रंथांचें रोमनमध्यें लिप्यंतर करतांना ध्वनिविशेषचिन्हें (diacritic) लावण्याची कल्पना पुढें आली. या चिन्हांच्या योजनेमुळें जागेची काटकसर होते हें खरें, परंतु मुद्राक्षरसंख्या मात्र वाढते, कारण चिन्हासकट मुद्राक्षरें वेगळीं पाडावीं लागतात. (उदा. त = t, ट = ṭ, स = s, श = ś, ष = ṣ इत्यादी). युक्तचिन्हांच्या (diagraph) योजनेंत अक्षरांना जागा जास्त लागते. (श = sh, ख = kh). अर्थात पहिल्या पद्धतींत रोमन लिपींतील मुद्राक्षरसंख्या वाढून जुळणी कठीण होते, तर दुसऱ्या पद्धतींत कागद जास्त लागतो.

१. प्रस्तुत लेख माझ्या Typography of Devanagari या पुस्तकांतून भाषांतरित केला होता व तो *सारिका* जानेवारी १९६८ (पान ५३–७०) या वार्षिकात प्रसिद्ध झाला होता.

अनुक्रमणिका

एक लिपीची चळवळ

२. महाराष्ट्रांतील लोकव्यवहाराची लिपी ऐतिहासिक काळापासून 'मोडी' होती. परंतु मराठी-साठी शाळाखात्यांतील शास्त्री-पंडितांनीं एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून देवनागरीचा पुरस्कार केला आणि ही घटना लोकांनीं ग्राह्य मानली. कारण संस्कृतसाठीं देवनागरी आधीच उपयोगांत होती. १९०८ सालीं बंगालमध्ये न्यायमूर्ती शारदाचरण मित्र यांनीं याच हेतूनें "एक लिपी-विस्तार परिषद" स्थापन केली व तिच्यातर्फे '*देवनागर*' नांवाचें मासिकही चालू केलें. परंतु ह्या प्रयत्नाला यावें तसें यश आलेलें दिसत नाहीं.

मुख्य अडचण – प्रचंड चिन्हसंख्या

३. जुळविलेला मजकूर एकत्र पक्का बांधून ठेवण्याच्या दृष्टीनें (justification) तिमजली जुळणी कठिण, त्रासाची व वेळखाऊ आहे. वेगवेगळ्या रुंदीच्या मुद्राक्षरांच्या वर आणि खाली विविध रुंदीच्या वेलांट्या, मात्रा आणि उकारांचीं मुद्राक्षरें बसविल्यावर राहिलेली सुटी जागा 'डिग्री' नामक सूट टाकून भरून काढायची असते. यांतील एखादा खिळा निसटला कीं त्यामुळें निर्माण होणाऱ्या पोकळींत जवळपासचा खिळा नकळत जाऊन बसतो आणि 'मुद्रा-राक्षस' जन्माला येतो.

४. देवनागरी हातजुळणीसाठी मुद्राक्षरांच्या एका संचांत (font) ५०० च्यावर मुद्राक्षरें लागतात. मुद्राक्षरें, वेलांट्या, मात्रा व उकार यांसहित ओतून घेतलीं म्हणजे त्यांना 'अखंड टाइप' म्हणतात. या पद्धतींत मुद्राक्षरसंख्या आणखीच वाढते. गुजराती मुद्राक्षररचना देव-नागरीप्रमाणें शिरोरेखायुक्त नसल्यामुळें मात्रासंयोग सुव्यवस्थित असावा असा आग्रह नाही. तरी गुजरातीत मुद्राक्षरांची संख्या ४०० वर पोचते.

मुद्राक्षर सुधारणांचे अग्रणी–लोकमान्य टिळक

५. मध्यप्रदेश सरकारच्या भाषा विभागानें प्रसिद्ध केलेल्या 'रिफॉर्म ऑफ दी नागरी स्क्रिप्ट' या पुस्तिकेंत नागरी मुद्राक्षरांत सुधारणा करण्याची कल्पना प्रथम नागरी प्रचारिणी सभेनें केली असें विधान केलें आहे. परंतु तें बरोबर नाहीं. या भागांत लिपी सुधारकांचे अग्रणी '*विविधज्ञान-विस्तार*'चे आद्य संपादक कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे होत; त्यांचा लिपी सुधारणेवरील लेख १८७४ मध्येंच प्रसिद्ध झाला आहे. त्यानंतर तीस वर्षांनी (१९०४ मध्यें) लोकमान्य टिळकांनी लायनोटाइपवर देवनागरी लिपी यंत्रारूढ करण्यासाठी पहिला उपयुक्त प्रयोग केला. त्यानुसार निर्णयसागर टाइप फाउन्ड्रीने टिळकांच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन प्रत्यक्ष मुद्रा-क्षरेंही तयार करून दिलीं. टिळकांच्या योजनेंत कांहीं अक्षरें व जोडाक्षरें उभीं छेदून ओतलीं

हल्लींच्या अबकारी कमिट्यांपुढें विचारार्थ आलेल्या सूचनांचीं वासलत कशी लागते याचा मासला म्हणून आम्हीं पुणें शहरच्या कमिटीच्या कामाची त्रोटक हकीकत ता० ३० जानेवारीच्या अंकांत दिली होती त्या हकीकती-वरून कमिटीपुढें आलेल्या सूचना सरकारी अधिकाऱ्यांकडून कशा फेटाळून दिल्या जातात हें उघड होतें अर्थात् वस्तुस्थिति अशीच आहे.

टिळक टाइपांचे निर्णयसागरी वळण

अनुक्रमणिका

होतीं. त्यामुळें मुद्राक्षर संख्या कमी करता आली. उदा. प, व, ᠆ आणि ᢵ अशा चार खिळ्यांत प, व, क; फ, क्‍ आणि फ अशी सहा अक्षरें जुळवितां येतात.

लिपीसुधारकांचे विचारमंथन

६. कै. काशिनाथ रघुनाथ मित्र चालवीत असलेल्या '*मासिक मनोरंजक*' मध्यें १९१४ सालीं 'मधुप' यांचे 'हिंदुस्थानवर हल्ला' या शीर्षकाखालीं दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत.[२] त्यात रेव्हरंड नोयलस् यांच्या रोमन लिपीच्या स्वीकाराबद्दलच्या सूचनेचा ऊहापोह केला आहे. तेव्हांपासून वर्षानुवर्षें याच विषयावर मराठीमध्यें चर्चा चालू आहे. 'मधुप' यांचे लेख फार महत्त्वाचे आहेत. नोयलस् यांच्या रोमनच्या आग्रहावर त्यांनीं कडाडून हल्ला केला, इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या अशा कांहीं मौलिक सूचनाही केल्या. हे 'मधुप' म्हणजेच जतचे न्यायाधीश कृष्णाजी केशव गोखले. त्यांनीं मुद्राक्षर जुळणीची एक योजना तयार केली. त्यावरहुकूम कांहीं मजकूर पुण्याच्या दैनिक ज्ञानप्रकाशमध्यें बरेच दिवस छापून येत होता. पुढें गोखले यांनीं मोनोटाइप यंत्रावर देवनागरी बसविण्याची बरीच खटपट केली. त्याप्रमाणें मोनोटाइप कंपनीनें मातृका तयारही केल्या होत्या. परंतु त्यांतील मात्रा करणपद्धतीच्या (kern, यास गोखले 'कर्ण' म्हणतात.) असल्यामुळें मोडत, म्हणून त्यांनीं स्वतःच्या योजनेचा नाद सोडून दिला. वाईचे '*मोदवृत्त*'कार भाऊशास्त्री लेले यांनीं आपल्या योजनेत इकार-उकारादि मात्रांना अर्धचंद्र दिला होता[३] आणि त्याऐवजी प्रत्यक्ष स्वरच पुढें मांडले होते. या योजनेप्रमाणे निर्णयसागरी मुद्राक्षरांत छापलेला मजकूर पुढें दिला आहे.

प्उरत्इ च्एाकश्इ क्एल्याश्इवाय. एखाद्यास अपराध्इ मान्ऊन श्इक्षा करणए फार वाइट आहए. या प्रकारच्या न्याय कर-णाराञ्च्या उताञ्इळपणाम्उळए खरए ग्उन्हएगार अज्इबात स्उ-टऊन क्इत्यएक व्एळा न्इरपराध्यांस व प्उष्कळ व्एळ ह्इतक-र्त्यांस द्एख्इल व्इनाकारण म्एाठाल्या श्इक्षा झाल्या आहएत.

एकरेखिक जुळतीसाठीं निर्णयसागरानें तयार केलेलीं मुद्राक्षरें

मोदवृत्तकार भाऊशास्त्री लेले यांच्या सूचनेप्रमाणे पाडलेले निर्णयसागरी टाइप

७. हिंदू मिशनरी सोसायटीचे वैद्यबंधू यांनीं नवे पंच करून सोपी देवनागरी जुळणी पद्धती योजिली. तींत स्वरचिन्हाऐवजी मात्राच वापरल्या व जोडाक्षरें फोडून लिहिलीं. वीर सावरकरांनीं तर लिपी सुधारणेची मोठी चळवळच मांडली, आणि '*श्रद्धानंद*' पत्रांतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतसुद्धा लिपी-सुधारणा परिचित करून टाकली. नानल, नाडकर्णी, हुपरीकर, पंडित, वेणारे, भागवत, गुर्जर, काकासाहेब कालेलकर, विनोबा भावे यांजपासून ते अलीकडचे कर्ते लिपी सुधारक पु. बा. काळे यांच्यापर्यंत अनेकांनी नव्या नव्या कल्पना लोकांसमोर मांडल्या.

२. 'मधुप', हिन्दुस्थानवर हल्ला, *मासिक मनोरंजन* नोव्हेंबर–डिसेंबर १९१४.
३. सोमण कृ. वि., *पांडुरंग जावजी चौधरी यांचे चरित्र*, निर्णयसागर, मुंबई, १९४१.

संस्थांचे कार्य

८. मराठी साहित्य संमेलनाच्या पुणें येथें भरलेल्या (१९२७) अधिवेशनांत वाचण्यांत आलेल्या निबंधांत गोखले आणि जतचे हेडमास्तर शितूत यांचे लिपिसुधारणेवरील निबंध आढळतात. यात्र संमेलनानें यांत्रिक जुळणीला साह्यभूत होतील अशा सुधारणांचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीनें आपल्या सूचना १९३१ च्या हैदराबाद संमेलनापुढें मांडल्या. १९३२ मध्यें कोल्हापूर येथें भरलेल्या अधिवेशनांत अध्यक्ष श्रीमंत कै. सयाजीराव गायकवाड यांनीं आपले लिपीवरील विचार मांडले होतेच; पण पुढें १९३४ मध्यें दिल्लीस भरलेल्या हिंदी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरूनही त्यांनीं त्या सुधारणांचा पुरस्कार केला. हिंदी साहित्य संमेलनानें लिपिसुधारणेचे कार्य श्री. काकासाहेब कालेलकर यांजकडे सोपविलें. ते त्यांनीं १९५२ पर्यंत सांभाळलें. १९४१ साली श्री. य. रा. दाते यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर येथे भरलेल्या मुद्रक संमेलनांत हा विषय पुन्हां मोठ्या जोरानें पुढें आला.

शेवटी सरकार-दरबारी लिपिसुधारणा

९. तत्कालीन परकी सरकार या लिपीविषयक चळवळींपासून हेतुतः अलिप्त राहिलें होतें असें दिसतें. स्वराज्य-प्राप्तीच्या उपःकालीं (३१ जुलै १९४७) उत्तर प्रदेश सरकारनें आचार्य नरेन्द्र देवांच्या अध्यक्षतेखालीं एक समिती नेमली. तिनें आपला अहवाल १९४९ मध्यें सादर केला. मुंबई सरकारनें "मराठी गुजराती लिपी सुधार समिती" श्री. काकासाहेब कालेलकरांच्या नेतृत्वाखालीं नेमली होती. तिनेंही १९४९ मध्यें आपला अहवाल मुंबई सरकारला सादर केला. पुढें घटना समितीनें या कामासाठीं एक समिती नेमली. डॉ. राजेन्द्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं मध्य प्रदेशांत एक राष्ट्रीय भाषा परिषद आयोजित केली गेली होती. तिच्या पाठोपाठ १९५३ सालीं लखनौ येथें भरलेल्या सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकींत देवनागरी लिपीच्या स्वरूपाविषयीं निर्णायक विचार झाला. या सूचनांचा हिंदीसाठीं मुंबई सरकारनेंहि स्वीकार केला. परंतु मध्यप्रदेश सरकारनें कांहीं सूचनांना, विशेषतः रफार, ऱ्हस्व वेलांटीबाबतच्या सुचनांना विरोध कला. त्यामुळे भारत सरकारला प्रमाणित देवनागरी लिपीचा पुनः विचार करावा लागला. त्यानुसार १९६० मध्यें भारत सरकारमान्य देवनागरी लिपीचें स्वरूप स्पष्ट झालें. आता थोड्याफार फरकानें तीच लिपी महाराष्ट्र शासनानेंही मराठीसाठीं मान्य केली आहे. या बाबतींतील महाराष्ट्र शासनाचा निर्णय परिशिष्ट २ म्हणून दिला आहे.

लिपीविषयक सुधारणांचे वर्गीकरण

१०. लिपींतील चिन्हांची संख्या कमी कशी करावी हा विचार आज अनेक वर्षे सर्व सुधारकांपुढें सदैव आहे. त्यांच्या सूचनांचे साधारणपणें तीन वर्ग पाडता येतील, ते असे :—

(१) भाषेंतील ध्वनीचें यथातथ्य चित्रण करण्याच्या दृष्टीनें लिपींत सुधारणा करणें आणि परभाषेंतील ध्वनींचेंसुद्धा स्पष्ट लेखन-मुद्रण करता यावें म्हणून नवीन चिन्हांची निर्मिती करणें.

(२) तिमजली जुळणी टाळण्याच्या दृष्टीनें व्यंजनांना लागणाऱ्या स्वरमात्रांच्या प्रचलित रूपांत बदल करणें, तसेच, जोडाक्षरांच्या घटनेंतच बदल करून मुद्राक्षरांची संख्या कमी करणें.

(३) मुद्राक्षरें ओतणीच्या पद्धतींतच सुधारणा करून यांत्रिक जुळणीचें काम सुकर करणें.

प्रमाणभूत ध्वनिचिन्हें

११. वरील परिच्छेदांत सांगितलेला, भाषेंतील ध्वनीचें यथातथ्य चित्रण करण्याच्या दृष्टीनें नवचिन्हांची निर्मिती करणें हा विचार, आणि लेखनाला पूर्णत्व देण्यासंबंधींचा विचार हे वर्णविचार असून ते व्याकरणाचे विषय आहेत. व्यवहाराच्या वाढत्या गरजांसाठीं लिपिचिन्हांत वाढ करण्याची जरूरी आहे. याबाबत मूलग्राही विचार मुख्यतः 'मधुप'[४] आणि आचार्य विनोबा भावे[५] यांनीं पुढें मांडले आहेत. भाषेंतील ध्वनीचें यथातथ्य रूप लेखनांत पडलें पाहिजे आणि लेखनास निश्चितता आली पाहिजे. म्हणून भाषेच्या गरजा लक्षांत घेऊन प्रमाणित लिपी स्वीकारणें जरूर आहे. प्रमाणित लिपीची निश्चिती प्रथम केली पाहिजे. याबद्दल वाद असण्याचें कारण नाहीं. परंतु व्याकरण आणि शुद्धलेखनाच्या प्रश्नांची मुद्राक्षरांच्या आणि जुळणीच्या प्रश्नांची गल्लत झाली. हिंदी आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनांत आणि सरकारी पातळीवर मुख्यतः भाषेच्या गरजांवर चर्चा झाली. त्याबरोबरच जुळणी सुकर करणें आणि लिपी यंत्रसिद्ध करणें या बाबींवर सुद्धा विचारविनिमय झाला. परंतु जोंवर लिपीमध्यें निश्चिती नाहीं तोंवर यंत्र-सिद्धतेचा निर्णायक विचार करणें शक्य नव्हतें. इ. स. १९६० पर्यंत प्रमाणित लिपीवर भारत सरकारचा निश्चित निर्णय झालेला नव्हता. महाराष्ट्र सरकारनें मराठीसाठीं देवनागरी लिपी १९६२ मध्यें निश्चित केली. या प्रमाणित लिपींत लिपिचिन्हें आणि स्वरान्त अक्षरें बनविण्याच्या पद्धतींत मुळींच बदल केलेला नाहीं. द, ह इत्यादी अल्पदंडयुक्त व्यंजनांचा जोडाक्षरांत पूर्वस्थानीं वापर करतांना ही हलन्त करावी अशी सवलत या निर्णयांत आहे. पण 'र' ची त्र, ्र, ॢ, ॅ हीं जुनींच रूपें कायम ठेवलीं आहेत.

मात्रांच्या सुधारणांचे प्रयोग

१२. रोमन लिपीमध्यें केवळ पांच स्वरचिन्हें आहेत; (*a*, *e*, *i*, *o*, *u*) व तीही व्यंजनानंतर किंवा व्यंजनसमूहानंतर लिहिण्यांत येतात. प्रचलित देवनागरींत स्वर चिन्हें डावीकडे (ि), वर (े), उजवीकडे (ी) व खाली (ु) येतात. त्याऐवजी, ऱ्हस्व 'इ' चे चिन्ह (ि) सोडून इतर स्वरचिन्हें श्री. हरीजी गोविल यांच्या लायनो देवनागरींत उजवीकडे घेतली आहेत. त्याच पद्धतीनुसार इंटरटाइप यंत्रावर देवनागरी लिपी बसविण्यांत आली. निर्णयसागरनें या पद्धतीनें जी मुद्राक्षरें पाडलीं त्यांचा नमुना येथें दिला आहे. डिग्रीची पद्धती टाकून, लिपी पंक्तिमुद्रणसुलभ व्हावी आणि मुद्राक्षरांची संख्या अखंड पद्धतींत भरमसाट वाढली आहे ती कमी व्हावी, म्हणून भाऊशास्त्री लेले, पु. बा. काळे, घारपुरे, वैद्य, भागवत, गुर्जर, बेणारे,

तीन रुपये दरमहा घेऊन दगडावर टाइप घांशीत बसणारे त्या वेळचे ते पोर पुढे अशा योग्यतेस येईल असे कोणाच्या स्वप्नातही नव्हते आणि त्या वेळच्या त्यांच्या बरोबरच्या पोरांत दुसरे कोणी असे पुढे आलेही नाहीं.

गोविल पद्धतीचीं निर्णसागरी मुद्राक्षरें

४. मासिक *मनोरंजन*, नोव्हेंबर–डिसेंबर, १९१४

५. भावे, विनोबा, शिक्षण विचार व लोकनागरी लिपी, पान २२५–२४८

वेलिंगकर, काकासाहेब कालेलकर इत्यादी लिपिसुधारकांनीं ज्या कल्पना पुढें मांडल्या त्या वरील वर्गीकरणामध्यें दुसऱ्या वर्गांत बसतात. कोणी मात्रा ओळींत मांडाव्या म्हणतात, तर कोणी मात्रांचे ऐवजी स्वरवर्णच पुढें मांडूं म्हणतात. म्हणजे रोमनची स्पेलिंग पद्धती आली. यांत देवनागरी चिन्हें वापरावयाचीं, पण तीं रोमन पद्धतीनें अशी आपत्ती येते. या सुधारणांनीं देवनागरीचें मात्रा-वैशिष्ट्य नष्ट होऊन वस्तुतः नवीनच लिपि-पद्धती निर्माण होते.

पु. बा. काळे यांच्या सूचना

१३. रेव्हरंड नोएल्सच्या प्रतिपादनाचा परामर्श घेणारा लेख पु. बा. काळे यांनीं *मासिक मनोरंजनमध्यें* लिहिला होता. त्यांत त्यांनीं मुख्य भर दिला होता तो स्वर-चिन्हांची प्रचलित मोडणी बदलून ती व्यंजनापुढें ठेवण्यावर. अलीकडे महाराष्ट्र शासनाच्या टंकलेखन कळफलक समितीचा वृत्तान्त पाहून, पन्नास वर्षांनंतर त्यांनीं पुन्हा लिपिचर्चेंत प्रवेश केला. आपल्या सुधारणांबरहुकूम नमुने कोरवून तयार केलेला ताम्रपट त्यांनीं पं. जवाहरलाल नेहरूंना अर्पण केला. ह्या लिपीला त्यांनीं ' भारती ' हें नांव दिलें आहे. मात्रा तशाच पुढें ठेवल्या तर जी

हमारी परमपरीय परधानम·तरी शरी लालबहादुर शासतरी जी की लीपी अीशवर करी यह शुभ दीन बार बार आयी.

नागपूर, ता. 2-10-64. **पुरुषोत्तम बाळकृष्ण काळी.**

टाटा मरसीडीझ–बी·झ गाडीयां, अ·ब·सडर कार, और जीप की बीपारी और दीवनागरी टाईप की क·पा·झीटर, अीलीकटरीकल अी·जीनीयर तथा ट·कलीधक, अधीकतर 'भारती लीपी' की स·शोधक (जीससी चालू दीवनागरी लीपी की छपाअी, ट·कलीखन और टीलीपरी·टी·ग सुलभतासी तथा कारयक्षमतापूरवक होता ही हे. लीकीन रोमन लीपी सीभी 12 परतीशत जयादा कारयक्षमता बढ़ती हे).

श्री. पु. बा. काळे यांची भारती लिपी

कोरी जागा दिसते ती कमी दिसावी अशा युक्तीनें त्यांनीं मात्रांचे आलेख तयार केले. व्यंजन-संयुक्तीसाठीं देखील त्यांनीं नवी युक्ति योजिली असून अनुस्वार पुढें मांडले आहेत. नंतर श्री. काळे यांनीं आपल्या पद्धतींत आणखी बदल करून प्रत्यक्ष मुद्राक्षरेंच पाडून घेतली. त्यांत छापलेल्या मजकुराचा नमुना पान २५७ वर दिला आहे.

१४. उपरोक्त सूचना करतांना, मात्रांच्या स्वरूपांत आणि संयोग पद्धतींतच बदल करून, मुद्राक्षरांची संख्या कमी करण्याच्या जुन्याच युक्तीचा अवलंब वरील लिपिसुधारकांनीं चालविला आहे. परंतु ह्या कल्पनांना लोकांची संमती मिळवावयाला भगिरथाचीच चिकाटी हवी. कारण शिक्षितां-नाही ही लिपी सायासानेच काय ती वाचता येईल, आणि तिची नवीन मोडणी शिकवावीच

लागेल. विशेषतः भागवत, वेणारे यांची लेखनपद्धति शिकणारे, त्याशिवाय आणखी जुनी देव-नागरी शिकले नाहींत तर सर्व मुद्रित वाङ्मयाला त्यांना पारखें व्हावें लागेल.

१५. गेल्या पन्नास वर्षांत पंक्तिजुळणीयंत्रांत (slug composing machine) व एकाक्षर जुळणी यंत्रात (monotype machine) झालेल्या प्रगतीमुळें जी सुकरता निर्माण झाली आहे, ती वरील लिपिसुधारकांनीं ध्यानांत घेतलेली दिसत नाहीं. रोमन पद्धतीनें देवनागरी जुळविण्याची पद्धति एकदा स्वीकारली म्हणजे नवशिक्षितांसाठीं जुनें वाङ्मय लिप्यंतर करून पुन्हा छापावें लागेल. त्यास किती प्रयास, काळ आणि पैसा लागेल ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घेतलेली दिसत नाहीं. गंमत अशी कीं, असली नवी लिपी अंगिकारण्यापेक्षां रोमनच कां स्वीकारूं नये या प्रश्नाचें मात्र सयुक्तिक उत्तर मिळत नाहीं.

यांत्रिक सुधारकांचे प्रयत्न

१६. आतां लिपीमध्यें फेरफार न करतां मुद्राक्षरांच्या अंतर्गत आणि जुळणीपद्धतींतच तांत्रिक युक्त्यांचा अवलंब करणाऱ्यांच्या प्रयत्नांचा आढावा घेऊं. या वर्गांत जे बोटावर मोजता येण्यासारखे प्रयत्न झाले त्याचे अग्रणी लोकमान्य टिळक होते. गायकवाडवाड्यांत *'केसरी'* नेल्यानंतर टिळकांनीं येथें गणपत कृष्णाजी यांच्या मातृकांवरून स्वतः टाइप पाडण्यास प्रारंभ केला. पुढें त्यांनीं निर्णयसागरमध्यें पंचीगार राणोजी रावजी आरू यांनीं कोरलेल्या पंचांवरून ठोकलेल्या मातृका घेतल्या. सदाशिवराव पिंपळे यांच्याकडून अर्धाक्षरांचे पंच कोरवून त्यांनीं १९०६ मध्यें प्रथम देवनागरी मुद्राक्षरें पाडलीं. त्यांत थोडी सुधारणा करून पाडलेले टाइप १९१४ मध्यें त्यांनीं पुढें मांडले. नंतर विलायतेस गेल्यावर तेथील मुक्कामांत मोनोटाइप यंत्रावर देवनागरी बसविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. केसरीचे मूळ पंच कोरविणारे सदाशिवराव पिंपळे यांचे चिरंजीव नारायणराव यांच्याकडून न. चिं. केळकर यांनीं १९२६ मध्यें कांहीं नवीन पंच करून घेतले होते.

१७. टिळकांची अर्धाक्षरप्रधान उभ्या छेदांची कल्पना हरीजी गोविल यांनीं थोड्या अंशानेंच उपयोगांत आणून लायनो टाइप यंत्रावर देवनागरी आरूढ केली. आज लायनोवर हीच पद्धति प्रचलित आहे. हिंदी *'नवभारत टाइम्स'* मध्यें पूर्णतया आणि कांहीं मराठी वृत्तपत्रांत अंशतः देव-नागरी लायनोचा वापर होतो. तींत मात्रा उभ्या आहेत आणि, क, फ सारख्या अक्षरांना उकार लावावयाचे ते कान्याखाली न येता बरेच पुढें येतात.

दाते यांची मोनोटाइप करण पद्धति

१८. देवनागरींतील वैशिष्ट्यपूर्ण मात्रा-संयोग पद्धतीमुळें अखंड पद्धतीमध्यें अक्षरें मात्रायुक्त पाडावीं लागतात त्यामुळें मुद्राक्षरांची संख्या भलतीच वाढते. डिग्री पद्धतीचा अवलंब करून मुद्राक्षर-संख्या कमी करण्यात आली होती, पण त्यांत अक्षरांचें रूप सुधारलें तरी जुळणी किचकट झाली त्यामुळें करण असलेले अखंड-मुद्र हातजुळणीसाठीं उपयोगांत आहेत. यांत किंवा इंग्रजींतील कांहीं इटॅलिक अक्षरांत वापरतात तशा करण पद्धतीचा अवलंब करण्याची कल्पना गोखले यांनीं पुढें मांडली होती, त्या पद्धतींत व्यंजनांचीं मुद्राक्षरें अर्धी ठेवून मात्रांचीं मुद्राक्षरें पुढें ठेवण्याची कल्पना होती. मात्र मात्रा व उकार बरोबर अक्षरावर आणि खालीं यावेत म्हणून ते टांगते ठेवले होते. मुद्रणांत ते मोडून जात म्हणून मोनोटाइपवर ती पद्धत यशस्वी झाली नाहीं. या पद्धतींत श्री. मामाराव दाते यांनीं मूलग्राही फरक सुचविला. त्यांनीं व्यंजनाचे मुद्र अरुंद बैठकी-

वर (narrow body) पाडले. त्यामुळें उजव्या बाजूस अक्षर मुखाखाली जी जागा राहते त्यांत मात्रांच्या मुद्राक्षरांची ' बैठक ' चपखल जाऊन बसते. आणि पुढें ठेवलेले मात्रा व उकार, व्यंजनांतील कान्याच्या बरोबर वर किंवा खालीं जोडले आहेत असें वाटतें. याही पद्धतींत कांहीं दोष राहिले आहेत. विशेषतः टांगती ऱ्हस्व वेलांटी, किरट्या द्विमात्रा, सुटे उकार व कांहीं विरूप अक्षराकृती.

विजापुरे लायनो पद्धति


१९. किर्लोस्कर प्रेसचे श्री. गणपतराव विजापुरे यांनीं हात–जुळणीसाठीं देवनागरीचीं मुद्राक्षरें करण पद्धतीनें पाडून घेतलीं. त्यांत मात्रा चिन्हमुखाच्या खालीं जादा आधार ठेविला आणि त्याचा समावेश व्हावा म्हणून अक्षर बैठकीची उंची, तिरपा छेद पाडून कमी केली. परंतु त्यांना लागणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या साच्यामुळें ती पद्धति लायनो किंवा मोनो यंत्रावर बसविणें शक्य झालें नाहीं. आतां हीच पद्धति दाते यांनीं प्रत्यक्षांत आणून, मोनो सुपर कास्टरवर मुद्राक्षरें पाडण्यास सुरुवात केली आहे. लोकमान्य टिळकांची, अक्षरांना उभा छेद देण्याची पद्धति विजापुरे यांनीं स्वीकारून लायनो टाइपावरील गोविल देवनागरीच्या स्वरूपांत सुधारणा केली. ऱ्हस्व वेलांटीयुक्त अक्षरें, काना व अर्ध वेलांटीच्या मुद्रांस ए–मात्रायुक्त व्यंजन जोडून बनविण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें आतां लायनोवर सर्व ऱ्हस्व इकारी अक्षरें सुबक दिसतात. ि ण ा = णि.

वाकणकरांची एक नवीच योजना

२०. लिपिशास्त्र व टंकलेखनशास्त्र या दोन्ही विषयांचे अभ्यासक ल. श्री. वाकणकर यांचें मुद्राक्षर-कलेंतील कार्य उल्लेखनीय आहे. भारत सरकारनें टेलिप्रिंटरवर मान्य केलेल्या योजनेंत जोडाक्षरांची योग्य सोय लागत नाहीं. व्यंजनांना हलंत लावून जोडाक्षरें बनवावीं लागतात. त्यावर उपाय म्हणून सर्व वर्णांना तिरपे छेद देऊन जुळणी करण्यानें चालू पद्धतीचीं जोडाक्षरें कमींत कमी चिन्हांत सिद्ध होऊं शकतात, हें श्री. वाकणकरांनीं दाखवून दिलें. याच युक्तीनें वेलांट्या कान्याच्या व विनकान्याच्या सर्व व्यंजनांना, शिरोरेषा आणि अर्धदंडसहित मात्रा लावण्याची युक्ति त्यांनीं योजिली. श्री. वाकणकरांच्या या शोधाचा ' लडलो ' सारख्या, हातांनीं मातृका जुळवून मुद्रपंक्ती ओतण्याच्या, यंत्रासाठीं उपयोग होईल. परंतु इतर यांत्रिक जुळणीसाठीं सध्या प्रचलित असलेल्या यंत्रांत आमूलाग्र फरक केल्याशिवाय तिचा उपयोग होऊं शकणार नाहीं.

जामनगर दि. १९ (टाइम्स वृत्तसंस्था)
' शंकराचार्यांना वाचवा ' दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी दगडफेक
करून येथील शाळा बंद करण्यास भाग पाडले.

सुचविलेल्या पद्धतीप्रमाणे :



यांत्रिक जुळणीमुळें निर्माण झालेल्या समस्या

२१. आतांपर्यंत प्रचारांत असलेल्या हातजुळणीच्या पद्धतींत, तिमजली जुळणीनें देवनागरी लिपीचें सौंदर्य जतन झालें. परंतु हातजुळणीच्या पद्धतीनें ग्रंथनिर्मितींतील वाढत्या गरजांचा निर्वाह होणार नाहीं हें आतां स्पष्ट झालें आहे. वर्तमानपत्राच्या छपाईसाठीं जुळणीचा वेग वाढविणें अपरिहार्य होऊन बसलें असून देवानगरीच्या यांत्रिक जुळणीची गरज तीव्रतेनें भासत आहे. शिवाय नित्य वाढत्या संख्येनें लागणाऱ्या क्रमिक पुस्तकांची गरज भागविण्यास जुळणींतील वेगाबरोबरच यथातथ्य मुद्रणाची आवश्यकता आहे. अशा मुद्रणांत यांत्रिकीकरणांतील तडजोड म्हणून आलेली विरूपता टाळणे आवश्यक आहे. यंत्रांच्या उपयोगांत ज्या कार्यसीमा पडतात त्या सांभाळण्यास जरूर तेवढयापुरताच, कांहीं अक्षरांच्या वा चिन्हांच्या रूपांत अक्षरसौंदर्य सांभाळून, मामुली फरक करणें क्रमप्राप्त होय. परंतु लोकांच्या डोळ्यांत खुपेल असा लिपीच्या दृश्य-स्वरूपातील फरक समाजास रुचणार व पचणार नाही. याबाबत लोकमान्य टिळकांचा खालील इशारा महत्त्वाचा वाटतो. ते म्हणाले होते :

> " लोकांच्या डोळ्यांत न खुपेल अशी आस्तेकदम सुधारणा असावी. मी या बाबतीत फार 'कॉन्झर्वेटिव्ह' आहे म्हटल्यास चालेल. सर्वच सुधारणेचा मक्ता आपण केव्हांही घेऊं नये. आज थोडी सुधारणा करावी, ती पचनीं पडली कीं उद्या थोडी करावी. याप्रमाणें सर्व आस्ते आस्ते व लोकांच्या क्षोभास पात्र न होईल अशी ती असावी- केव्हांही सुधारणा करण्यास पुढील पिढीस वाव ठेवावा, म्हणजे आपल्यावर व लोकांवर बोजा न पडतां सर्व काम निमूटपणें होतें. आपण मागें रेंगाळतही चालता कामा नये किंवा पुढेंही धावपळ करतां कामा नये. " ६

२२. मोनोटाइप यंत्रावर देवनागरी बसवितांना मामाराव दाते यांनीं अखंड पद्धतीचा किंवा करण पद्धतीचा अवलंब केला. आजवर यंत्रावर बसविलेल्या देवनागरींत मोनो टाइपावरील देवनागरीं तच, कांहीं अपवाद वगळतां, मूळ वळण कायम राहिलें आहे. तरी २२५ किंवा २५५ मातृकांच्या चौकटींत फक्त साधा किंवा जाड ठशांचा यांपैकी एकच मातृका-संच बसतो. करणाचा उपयोग मोनो यंत्रावर करतां तरी आला, परंतु लायनो यंत्रावर मात्रा वर खालीं सरकवून बसविणें केवळ अशक्य आहे. दुसरी अडचण म्हणजे साध्या लायनो यंत्रावर मातृकांची केवळ ९० घरें असतात. बाजूला एक जादा मातृकापेटी असलेलें यंत्र वापरलें तर आणखी ३४ मातृकांची सोय होते. प्रत्येक मातृकेवर दोन मुद्राक्षरें पाडण्याची सोय असते. त्यांपैकीं एक साधें अक्षर व दुसऱ्या स्तराबर इटॅलिक किंवा जाड ठशांचे अक्षर ठेवतां येतें. या जागीं एकाच संचांतील दुसरीं अक्षरें बसवून घेतल्यास, साध्या लायनो यंत्रावर तीन स्पेस सोडता, १७४ मुद्राक्षरांची सोय करता येते. अर्थात ही पूर्ण क्षमता उपयोगांत आणण्यांत कांहीं तांत्रिक अडचणी आहेत. या सर्व सुविधांचा फायदा घेऊन आणि मर्यादा लक्षांत ठेवून, देवनागरी लिपी यंत्रारूढ केली पाहिजे.

यांत्रिक जुळणीमधील अडचणी

२३. देवनागरी लिपीचें रूप आणि सौंदर्य न घालवतां सर्व वर्ण आणि जोडाक्षरें शक्य तितक्या

६. लोकमान्य टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका, भाग ३, पा. १५८

कमी चिन्हांत जुळविण्याची व्यवस्था करणें ही खरी समस्या आहे. या संदर्भात देवनागरी यंत्रारूढ करण्याच्या प्रयत्नांतील खालील अडचणींचा विचार करावयास हवा.

(१) मोनो टाइपमध्यें मातृका-चौकटींत सध्यां २५५ मातृकांची सोय आहे. २७० पर्यंत ती वाढूं शकते. तेवढ्यांत देवनागरीची गरज भागविली पाहिजे. शक्य तर साधा आणि जाड ठशाचा किंवा इटॅलिक मजकूर जुळविता आला पाहिजे. लायनोमध्ये मुख्य मातृका-पेटींत ९० व बाजूच्या मातृका-पेटींत ३४ मातृका मावतात. शिवाय क्वचितच लागणाऱ्या आणखी थोड्या मातृका हातानें घालतां येतील. तेवढ्यांत जरूर त्या सर्व मुद्राक्षरांची सोय लागली पाहिजे.

(२) लायनो यंत्रात चारी बाजूंस मात्रा जुळवणे शक्य नाहीं. तरी मात्रा, वर (के) खाली (कु) लावल्या आहेत असे दिसेल अशा पद्धतीनें जुळणी करण्याची युक्ति शोधून काढली पाहिजे.

(३) व्यंजनें एकाखालीं एक ठेवून (ट्ट) किंवा एका व्यंजनांत दुसरे कोंबून (द्ध, ह्य, प्र) जोडाक्षरें बनविण्याची सध्याची पद्धति बदलली पाहिजे.

२४. वरील गरजा लक्षांत घेतां, रोमन लिपीचें छुपें आक्रमण टाळण्याकरितां देवनागरीसाठीं योग्य अशा नवीनच जुळणीयंत्राची योजना आंखणें, किंवा अक्षरांचें रूप फारसें न बदलतां मात्रा आणि जोडाक्षरें जुळविण्याची पद्धति शोधून काढणें, असे दोनच पर्याय उरतात. केवळ देवनागरीसाठीं प्रचलित यंत्राची घडणच बदलून घेणें मोठ्या खर्चाचें म्हणून अव्यवहार्य ठरतें. यंत्रांतच बदल करून साधावयाची गोष्ट म्हणजे जास्त मुद्राक्षरांची सोय. पण मुद्राक्षरें वाढल्यानें कळफलकावरील काम किचकट बनून गतिरोध होईल ही आपत्ति आहेच. अर्थात् दुसरा पर्याय, मुद्राक्षरसंख्या कमी करणें हा महत्त्वाचा ठरतो. यांत्रिक जुळणीच्या भोक्त्यांना लिपीच्या जुळणींत फरक करण्याकडे लक्ष देणें भाग पडतें, त्याचें हें एक कारण आहे.

देवनागरी अक्षरांचे रूपभेद

२५. देवनागरी लिपीच्या रूपांत फरक न करतां मुद्राक्षरसंख्या कमी करण्याच्या प्रयत्नांत प्राथमिक अडचण होती ती लेखनपद्धतींतील अराजकाची; अक्षररचनेबाबतच्या प्रमाणित पद्धतीच्या अभावाची; आणि नित्य सुचविल्या जाणाऱ्या बदलांची. भारत सरकारनें आणि महाराष्ट्र सरकारनें प्रमाणित लिपीचा स्वीकार केल्यानंतर ती आतां बऱ्याच प्रमाणांत दूर झाली आहे. तरी कांहीं अक्षरांच्या बाबतीत हिंदी आणि मराठी पद्धतींत अजूनही थोडा फरक आहेच. तोहि टाळला पाहिजे. शिवाय अगदीं थोड्या फरकानें मुद्राक्षर–संख्याहि कमी करतां येते. त्याचाहि विचार झाला पाहिजे.

भारत सरकारनें पुरस्कारलेलीं अक्षरें व महाराष्ट्र शासनास मान्य असलेलीं मुंबई वळणाचीं अक्षरें, यांतील भेद असा —

		हिंदी	मराठी
(अ) स्वर	:	ऋ, लृ	ॠ, ऌ
(ब) व्यंजन	:	ख, ल, श, छ	ख, ल, श, छ
(क) अंक	:	५, ८	५, ८

(अ) स्वरांचीं हिंदी वळणें घेतल्यानें हें क्वचितच लागणारे स्वर एकाहि जादा खिळ्याशिवाय जुळवितां येतील; जसे : ऽ+र+ ृ = ऋ आणि ऌ + ृ = ॡ (हा बदल आतां महाराष्ट्र शासनानें केला आहे.)

(ब) (१) हिंदी 'ख' चे वळण मराठीसाठीं आतां महाराष्ट्रशासनानें स्वीकारलें आहे. गुजराती किंवा मोडी 'ખ' देवनागरी वळणांत बेंगरूळ दिसतो. म्हणून अस्वीकार्य.

(२) कान्याचा हिंदी 'ल' मान्य झाल्यानें 'ल' चा एक खिळा कमीच होतो, कारण पूर्ण ल अर्ध्या ह पासून बनवितां येतो.

(३) मराठी 'श' चे वळण लिपिशास्त्रदृष्ट्या सदोष आहे. उभा काना अथवा अल्पदंड यांपैकीं एकच अवयव सर्व मराठी अक्षरांत नियम रूपानें आढळतो. मराठी 'श' मध्यें शेंडीचा अल्पदंड आणि शिवाय स्वतंत्र काना दिसतो. आता 'श' चा स्वीकार झाला आहे.

(४) वरील कारणांकरिता हिंदी 'छ' अस्वीकार्य आहे. कारण त्यांतील अकार (अल्पदंड) गाळल्यानें तें हलंत अक्षर बनतें. म्हणून मराठी 'छ' लिपीला धरून आहे. एतदर्थ मराठी 'छ' च स्वीकार्य होय.

(क) सर्व अंक मुंबई वळणाचे घेतल्यावर ५ व ८ हे दोनच अंक हिंदी वळणाचे ठेवणे बरोबर नव्हे. त्याने एक-जातीयता भंग पावते. म्हणून दोन अंकांची मराठी रूपेच हिंदीतहि स्वीकारावी.

वरील मुद्द्यांचा विचार करून महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार मंडळानें 'ख, ल आणि श' या हिंदी वळणांचा स्वीकार करावा अशी शिफारस १९६५ मधील पुणें बैठकींत केली. नंतर ती महाराष्ट्र शासनास संमतहि झाली. त्याचबरोबर वर (ब ४) व (क) मध्ये[७] दाखविलेल्या अक्षरांचीं व दोन अंकांचीं मराठी रूपें हिंदीनें स्वीकारलीं तर देवनागरीचें एकच प्रमाणित स्वरूप राहील.

जोडाक्षरांचा प्रश्न

२६. हिंदी-मराठीसाठीं एक-लिपीची निश्चिती झाल्यावर जुळणींत सौंदर्य आणि सुलभता आणण्यासाठीं काय करतां येईल याचा विचार करूं. जोडाक्षरांच्या रचनेंत कानायुक्त अक्षरांचा काना काढून जोडाक्षरें सिद्ध करण्याची पद्धति आता रूढ झाली आहे. (जसे, पुण्यपत्तन-पुण्यपत्तन). अल्पदंडयुक्त अक्षरांना मात्र पायमोड चिन्ह लावावें लागेल (मठ्ठ = मट्ठ, बुद्धी). जोडाक्षरांतील 'र्' चे दोनच प्रकार आहेत : एक पूर्वरूप ˚ व ॅ, आणि दुसरे उत्तररूप ‸. उत्तररूपाचे दोन उपप्रकार : एक प्र, म्र, त्र इत्यादी मधील जुना नागरी ॅ आणि दुसरा ट्र, ड्र मधील राष्ट्र-चिन्हाचा र. या विविध प्रकारांमुळें अनेक अखंड मुद्राक्षरें पाडावीं लागतात. पैकी पहिल्याचे उच्चाटण करणें सोपें आहे. जसे प्र, म्र, त्र इत्यादी. दुसऱ्या प्रकारांतील जोडाक्षरें ट्र, ड्र, अशी लिहावीं लागतात. यांतच द्र, ह्र व ट्र चा समावेश होतो. अल्पदंडयुक्त अक्षरांची, विशेषतः द ची, जोडाक्षरें फार आहेत. द्ग, द्घ, द्द, द्ध, द्ब, द्भ, द्म, द्य, द्य, द्र,

७. पहा : महाराष्ट्र शासनानें स्वीकारलेली वर्णमाला, पान २६६–२६७

द्र. म्हणून दच्या बाबतींतील पायमोड चिन्हाचा वापर टाळता आला तर टाळावा. यांपैकीं द्व व द्र ही दोनच ठेवावी असें सांगून इतरांच्या बाबतींत श्री. दाते यांनीं द‍ व ह‍ अशीं स्वरूपें सुचविलीं आहेत. ही पद्धत स्वीकारली आणि सर्वच अल्पदंडयुक्त व्यंजनांसाठीं, इथें जें जोड चिन्ह 'द' 'ह' ला लावलें आहे, तें वेगळें ओतून घेऊन योजिलें तर चांगलें होईल. हें चिन्ह = असें असावें. (उदा. मट्‍ट, बुद‍धी)

२७. दुसऱ्या प्रकारांत 'र' पूर्वरूप आहे. त्याचेहि दोन उप-प्रकार आहेत. ऱ्हास, सोऱ्या मधला निराघात र् आणि धर्म, मर्म, आचार्य मधला साघात र्. निराघात र् ची अखंड जोडाक्षरें नाहींत. तो जुळणीसुलभ आहे. उदा. ऱ्हास, तऱ्हा. साघात र् चें काम रफारानें होतें आणि मात्रेप्रमाणें रेफ वर बसत असल्यामुळें अनेक मुद्राक्षरें आवश्यक बनलीं आहेत. विजापुरे पद्धतींत त्यांची संख्या २१ आहे. निर्णयसागरी टाइपांत ते डिग्रीवर पाडले असून ११ डिग्र्या आणि दोन काना रफार आहेत. शिवाय ९ व्यंजन = रफारी मुद्राक्षरें अखंड आहेत. वस्तुतः साघात आणि निराघात र् मध्यें फरक करण्याची आवश्यकता नसावी. कारण इतर जोडाक्षरां-मध्ये तशी सोय नाहीं. मध्यास = मधू यास; आणि मध्यास = मध्यस्थानीं. यांतील फरक आपण संदर्भानेंच करतो. तशीच ऱ्च्या बाबतींतहि संदर्भावरच भिस्त ठेवली तर ऱ्हासमधल्या ऱ नें काम भागावें. म्हणजे धर्म शब्द धऱ्म असा लिहावा. फरक करणे इष्ट वाटलेच तर साघात र नुक्तायुक्त वापरावा उदा. धऱ्म.

२८. याबाबत श्री. दाते सुचवितात कीं, मराठींत फक्त याकारान्त सामान्य रूपापूर्वीं येणाऱ्या 'र' चा उच्चारभेद मात्र दोन्ही पद्धतीवरून दाखवावा. उदा. सुऱ्यास (सुरा + यास), सूर्यास (सूर्य + यास). ही सूचना स्वीकारली तर ्र्य व ऱ्य ह्या दोनच रफारी मुद्राक्षरांनीं काम भागेल. वालावलकरांनी 'रेफ' ही डोक्यावर (जसे पूर्व, कर्वे, कीर्ती, सर्व, कार्ष्णेय) न लिहितां उच्चारानुसार पूर्वी लिहावी, (जसे – पूर्‌व, कर्‌वे, सर्‌व, कार्‌ष्णेय,) असे सुचविले आहे. लिपिशास्त्राला ही सूचना धरून आहे, कारण ती उच्चारानुसारी आहे.[८] साघात व निराघात र्चा अर्थभेद असा : आचाऱ्यानें = (आचारी यानें), आचर्यानें (आचार्यानें). या संदर्भांत बॅ. सावरकरांनीं र चें जें जुनें रूप स्वीकारलें त्याचें स्मरण होतें. देवनागरीच्या लेखनांत र चे लेखन सोपे, आणि त्याचें प्राचुर्य फार. मुळांतला ꣻ लेखन-सौदर्यासाठीं र हें नवीन रूप घेऊन आला आहे. लिपीमध्यें अनेकवार येणाऱ्या अक्षरांचें वळण बदलल्यानें लिपीच्या रुपांतच दृष्टींत भरण्यासारखा बदल होतो. तो सौंदर्यानुसारी असला तर इष्ट. र चें ꣻ हें जुनें रूप स्वीकारल्यानें मुद्राक्षरांत बचत होतें म्हणावें तर तसेंही नाहीं. कारण इतर अल्पदंडयुक्त (ट, द इत्यादि.) अक्षरांसाठीं असलेली स्वरचिन्हांचीं मुद्राक्षरें र ला चालतात म्हणून ट वर्गाच्या पंक्तीत सध्याच्या र ची सोय व्हावी. हीं सर्व अल्पदंडयुक्त अक्षरें कानासहित करतां आलीं तरच र चें रूप बदलण्याचा प्रश्न पुढें येईल. कारण मग अल्पदंडयुक्त अक्षरांसाठीं लागणारी मात्रांचीं जादा मुद्राक्षरें कमी होतील. या सर्व गोष्टींचा विचार करतां सावरकरी 'ꣻ' मान्य होण्यासारखा नाहीं.

मध्यदंडयुक्त वर्णांचा प्रश्न

२९. 'झ' ऐवजी वापरांत असलेलें 'झ' हें मध्यदंडयुक्त अक्षर आता शासनमान्य हिंदीच्या

८ वालावलकर, अ. ब; *समश्लोकी महिम्नस्तोत्र*

लेखनांतहि इतिहासजमा झालें आहे. राहिली क व फ ही. लायनोजुळणींत यांना मात्रा व उकार लावतांना फार अडचण होते. प्रचलित लायनोवर कुंकू हा शब्द कं ुक ू असा छापला जातो. तो प्रचलित पद्धतीनें लिहिण्यासाठीं विजापुरे पद्धतीत ु, ं ँ अशीं वेगवेगळीं मुद्राक्षरें बनविलीं आहेत, त्यामुळें १८ जादा मुद्राक्षरें लागतात. बॅ. सावरकरादी सुधारकांनी 'क, फ' ही क्त, फ्त अशीं छापावीं असें सुचविलें आहे. ती सुधारणा स्वीकारली तर १८ मुद्राक्षरें कमी होतात, पण ५ वाढतात. (ु ू क्त फ्त) म्हणजे एकूण १३ मुद्राक्षरांची बचत होते. अर्थात या योजनेंत, लेखनांत 'क्त' हे 'क्ता' व 'फ्त हे फ्ता' वाचले जाण्याचा संभव आहे, हें ध्यानांत घ्यायला हवें. त्यासाठीं गुजरातीप्रमाणे ક વ ફ शिरोरेषेसह वापरावी अशी एक विचारार्ह सूचना आहे. कारण ती रूपे 'ड' सदृश असून देवनागरी वळणाला फारशी विसंगत नाहीत.

स्वर आणि स्वरचिन्हे

३०. जोडाक्षरानंतरचा प्रश्न म्हणजे स्वरांच्या लेखनाचा. अ ची बाराखडी मराठींत रूढ झाली होती. आतां पुन्हां जुनीं रूपें वापरण्याकडे कल दिसतो. अच्या बाराखडीमुळे इ, उ, ए, ऐ हीं मुद्राक्षरें वाचतात. ('इ' ला ॅ हे रफार चिन्ह लावून ई, आणि 'उ' ला ् हा क व फ चा उत्तर भाग लावून ऊ ही स्वराक्षरें करतां येतात.) मात्र मात्रेचीं अक्षरें ऱ त्र ठेवलीं तर 'ॐ' हें एक मुद्राक्षर नवीन करावे लागेल. स्वरचिन्हाबाबतच्या सुधारणा जास्तच अडचणीच्या आहेत. त्यांतील उकारांचा प्रश्न ते थोडे पुढें ठेवून सोडविण्यात आला आहे. त्यांत तीन प्रकार होतात.

(१) पूर्णदंडयुक्त : त + ु = तु
(२) अल्पदंडयुक्त : ट + ु = टु
(३) मध्यदंडयुक्त : क + ु = कु

यांतील पहिले दोन प्रकार डोळ्यांना फारसे वाईट दिसत नाहींत, हें आतां वृत्तपत्रांतून (नवभारत टाइम्स, महाराष्ट्र टाइम्स, नवशक्ती आणि मराठा) रूढ होत आहेत. प्रश्न उरतो तो क व फ चे उकार करण्याचा. 'क' च्या बाराखडीचे प्रचलित रूप टिकविण्यासाठी श्री. विजापुरे यांनीं १८ मुद्राक्षरें सुचविलीं आहेत. 'क'चे प्राचुर्य फार असल्यामुळे हे इतके खिळे ठेवण्यापेक्षां क्तचे (आणि मग फ्तचे सुद्धा) रूपच बदलून घ्यावें असें वर सुचविलें आहे. अक्षरांवर मात्रा तिरकस देण्याची पद्धति असल्यामुळें त्या कान्यावर पडल्या तर बरोबर दिसत नाहींत. ते = त + ो म्हणून विजापुरे लायनो देवनागरींत मात्रासकट पण बिनकान्याचीं अक्षरें पाडण्यांत आलीं आहेत. (जसें : ते) त्यामुळें ३८ मुद्राक्षरें वाढतात. पण ती मुख्य मातृकापेटींत ठेवण्याची जरुरी नाहीं. कारण त्या सर्वांचें प्राचुर्य कमी आहे. त्यांची व्यवस्था लायनो मातृकांच्या दुसऱ्या स्तरावरही करतां येते.

३१. आतां राहिला प्रश्न ऱ्हस्व वेलांटीचा. सध्याच्या लायनो आणि मोनो पद्धतींत तिचे रूप अनुक्रमें ि त व ति असे आहे. लायनो पद्धतीमध्यें शब्दांत 'ति'चा काना पूर्वीच्या अक्षराजवळ येतो आणि वाचतांना थोडी अडचण होते. विजापुरे लायनोवर मात्रांचीं अक्षरें पुरविलीं आहेत. त्याबरोबर रफारी कान्याच्या वरील वर्तुळखंडाचे वळण बदलून ते अर्धवेलांटीसारखे केले म्हणजे त्याचा मात्रायुक्त अर्धाक्षराशी सांधा जुळविता येतो. (ि + ॆ + ा = गि). ऱ्हस्व

वेलांटीचे प्राचुर्य तुलनेनें फारसें नाहीं. अलीकडील मराठी महामंडळाच्या मराठी शुद्धलेखनामुळें ते आणखीच खाली आले आहे. त्यामुळें ऱ्हस्व अर्ध वेलांटीची विजापुरे मातृका ग्रांथिक जुळणी-साठीं ठेवावी आणि वृत्तपत्रीय जुळणीसाठीं पूर्वीच्याच ऱ्हस्व वेलांटीचा वापर करावा असा पर्याय सुचतो. हें सर्व विवेचन करण्याचें प्रयोजन असें कीं, जुळणीच्या पद्धतींत थोडासाच बदल केल्यानें देवनागरीचें रूप न बदलतां मुद्राक्षरांत बचत करतां येते ही गोष्ट स्पष्ट व्हावी.

परिशिष्ट : २

महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेली वर्णमाला

स्वर : अ आ इ ई उ ऊ ऋ ए ऐ ओ औ अं अः

मात्रा : ा ि ी ु ू ृ े ै ो ौ ं ः

व्यंजने : क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ ड ढ ण त थ
द ध न प फ ब भ म य र ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ श्र

अंक : १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०

१. जोडाक्षरे : उभी रेघ असलेली व्यंजने :

ख ग घ च ज झ ञ ण त थ ध न
प ब भ म य व श ष स क्ष ज्ञ

उभी रेघ असलेल्या व्यंजनापासून जोडाक्षर करताना त्याची उभी रेघ काढून टाकण्यात यावी जसे :– ख्याती, लग्न, विघ्न, कच्चा, सज्जा, माझ्या, व्यञ्जन, नगण्य, सत्ता, पथ्य, ध्वनी, न्यास, प्यादे, डब्बा, सभ्य, रम्य, शय्या, व्यास, श्लोक, राष्ट्रीय, स्वीकृत, यक्ष्मा

२. इतर व्यंजने : (क) ‘क’ आणि ‘फ’ यांपासून जोडाक्षर करण्याची खालील पद्धतीच कायम ठेवण्यात यावी. जसे : संयुक्त, पक्का.

(ख) ङ, छ, ट, ठ, ड, ढ, द, ल, ह, ब, ळ यांपैकी ‘ल’ व्यतिरिक्त इतर वर्णांपासून आवश्यकतेनुसार हलन्त करून जोडाक्षरे करावी. (‘ल’ पासून जोडाक्षर करण्याची सध्याची पद्धतीच कायम ठेवण्यात यावी.*) वरील व्यंजने ‘य’ शी संयुक्त होत असताना हलन्ताऐवजी पाऊण य (य) चा वापर करता येईल.

जसे :– वाङ्मय, खट्ट्ट, अड्डा, विद्या, पाल्य, गोळ्या अगर गोळ्या इत्यादी.

* ‘ल’ चे हिंदीरूप ‘ल’ हे आता महाराष्ट्र शासनाने स्वीकारल्यामुळे त्याचा समावेश वरील (१) मध्ये होतो.

अनुक्रमणिका

(ग) जोडाक्षरांतील 'र'ची प्रचलित रूपे तशीच ठेवावी.

जसे : – प्रकार, धर्म, राष्ट्र, वैऱ्यानें.

'र' वर्णास ऱ्हस्व व दीर्घ उकार लावताना 'रु' व 'रू' अशी रूपे लिहिण्यास हरकत नसावी.

(घ) 'श्री' मधील 'श्र' चे रूप तसेच कायम ठेवावे.

३. (१) शिरोरेखा देण्याची पद्धती चालू ठेवावी.

(२) (क) खालील विरामचिन्हे स्वीकारण्यात यावी.

. – , ; ! ? :

(ख) याशिवाय यांत्रिक व हातजुळणीसाठी आणि टंकलेखक यंत्राच्या कळफलकावर शक्यतोवर पुढील चिन्हांचा समावेश करण्यात यावा : –

ं % " " ( ) + × * = ॅ

परिशिष्ट : ३

महाराष्ट्र शासनाने शासन व्यवहारासाठी मान्यता दिलेली लेखन नियमावली

(शासन निर्णय G. A. D. No. RMO-1062-M. Dated 27-10-62)

अनुस्वार

१. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदाहरणार्थ—तंटा, चिंच, आंबा. संस्कृत अनुनासिकाबद्दल विकल्पाने परसवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

२. य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल संस्कृताप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदाहरणार्थ—सिंह, संयम, मांस.

३. नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपानंतर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ—लोकांस, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे.

४. वरील नियमाव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी, व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नये.

ऱ्हस्व-दीर्घ

५. तत्सम ऱ्हस्व इकारान्त आणि उकारान्त शब्द दीर्घान्त लिहावे. उदाहरणार्थ—कवी, गती, मती, गुरू. इतर शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा. उदाहरणार्थ—पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय). अपवाद—आणि, नि. स्पष्टीकरण—परंतु, तथापि, यथामति इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावी. तसेच बुद्धिवैभव, कविराज, गतिमान, गुरुवर्य इत्यादी सामासिक शब्दांतही इकार-उकार ऱ्हस्व लिहावे.

६. दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार-उकार ऱ्हस्व लिहावे. उदाहरणार्थ— गरिबी, माहिती, हुतूतू, सुरू. अपवाद—नीती, भीती, रीती, कीर्ती इत्यादी संस्कृत तत्सम शब्द.

७. अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार-उकार दीर्घ लिहावे. उदाहरणार्थ—गरीब, वकील, वीट, सून, वसूल. अपवाद — ऱ्हस्वोपान्त्य आकारान्त तत्सम शब्द. उदाहरणार्थ — गुण, विष, मधुर, प्रचुर.

अनुक्रमणिका

सामान्यरूप :

८. उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य ईकार-ऊकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा. उदाहरणार्थ — गरिबास, वकिलांनी, सुनेला, वसुलाची, नागपुरास, जिवाला (प्राण, मन या अर्थी). अपवाद — दीर्घोपान्त्य तत्सम शब्द. उदाहरणार्थ — शरीरास, सूत्रांत, गीतेत, जीवास (प्राणी या अर्थी).

किरकोळ

९. "पूर" हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामाशी लावताना दीर्घोपान्त्य लिहावा. उदाहरणार्थ — नागपूर, संबळपूर, तारापूर.

१०. कोणता, एखादा ही रूपे लिहावी. कोणचा, एकादा ही रूपे लिहू नये.

११. हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू, या शब्दांतील दुसरा व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

१२. एकारान्त नामाचे सामान्यरूप याकारान्त करावे. उदाहरणार्थ — करण्यासाठी, फडक्यांना (म्हणजे फडके यांना), पाहण्याला, करणेसाठी, फडकेंना, पाहणेला यांसारखी एकारान्त सामान्यरूपे करू नयेत.

१३. बोलण्याची भाषा लेखनात पात्राच्या किंवा वक्त्यांच्या तोंडी घालावी लागते. त्या वेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे लिहू नये.

१४. मराठीत रूढ झालेले पुढील तत्सम शब्द अकारान्त लिहावे. उदाहरणार्थ — क्वचित, कदाचित, अर्थात, अकस्मात, विद्वान इत्यादी.

सूची

अनुक्रमणिका

(विषय, व्यक्ती, घटना, संस्था, ग्रंथ, नियतकालिके आणि पारिभाषिक शब्द).


अनुक्रमणिका

बापूराव शिवराम नाईक

भारतातील मुद्रण जगतात बापूराव नाईक हे नाव सुविख्यात आहे. महाराष्ट्रातील शिक्षणप्रेमी जनतेला पाठ्य-पुस्तकांचे नियंत्रक म्हणून त्यांचा परिचय आहे. पाठ्य-पुस्तकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर त्यांनी निर्माण केलेली पहिली ते सातवी इयत्तेपर्यंतची पाठ्य-पुस्तके ही त्यांच्या मुद्रण-क्षेत्रातील सखोल व प्रत्यक्ष अनुभवाची साक्ष आहेत. युनेस्कोतर्फे पाठ्य-पुस्तकांवर कुआलालंपूर येथे १९७१ साली जे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते त्या वेळी या पाठ्य-पुस्तकांचा मुद्दाम गौरव करण्यात आला होता.

बापूराव नाईक यांचा जन्म १ मार्च १९२० रोजी कारवार येथील अंकोला या गावी झाला. १९३७ साली मुंबई राज्य गव्हर्नमेंट प्रिंटिंग ॲन्ड स्टेशनरी-मध्ये अप्रेंटिस म्हणून कामास सुरुवात केली. १९५० साली ते मुद्रणाविषयीच्या उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. लायनो टाईप व मोनो टाईप यंत्रावर त्यांनी प्रत्यक्ष शिक्षण घेतले. १९५२ साली मुंबईला परत आल्यानंतर गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, येरवडा प्रिझन प्रेस, पुणे, बडोदा व नागपूर येथील सरकारी प्रेस अशी वाटचाल करीत १९५८ पर्यंत ते डेप्युटी डायरेक्टरच्या पदापर्यंत गेले.

पाठ्यपुस्तक मंडळातून १९७५ साली निवृत्त झाल्यानंतर त्यांनी मुद्रणविषयक लेखन करण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. ' टायपोग्राफी ऑफ देवनागरी ' या स्वतःच्या तीन खंडांतील इंग्रजी पुस्तकांचे मराठी भाषांतर त्यांनी पुरे केले. कागद या विषयावर सध्या ते ग्रंथ लिहीत आहेत. ' भारतीय ग्रंथमुद्रण ' हा ग्रंथ या व्यवसायातील त्यांच्या दीर्घ व्यासंगाची साक्ष पटविणारा आहे. मुद्रण क्षेत्रात प्रवेश करणारांना पाठ्यपुस्तक म्हणून तसेच या व्यवसायात असणाऱ्यांना संदर्भ ग्रंथ म्हणून तो निश्चितपणे उपयोगी पडेल.



कॅप्टन गो. गं. लिमये पारितोषिक ट्रस्टसाठी प्रस्तुतचा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. ट्रस्टसाठी प्रकाशित करण्यात आलेला – हा तिसरा ग्रंथ आहे. श्री. राम कोलारकर यांचे नाव साक्षेपी लघुकथा–समीक्षक म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. मराठी लघुकथेच्या आपल्या प्रदीर्घ व्यासंगातून विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध असलेले कै. कॅप्टन गो. गं. लिमये हे आधुनिक मराठी लघुकथेचे जनक आहेत हा निष्कर्ष त्यांनी मराठी वाचकांसमोर मांडला. त्यांच्या या निष्कर्षाचा आधार असलेला कॅ. गो. गं. लिमये यांच्या निवडक कथांचा संग्रह पॉप्युलर प्रकाशनने १९७० साली प्रसिद्ध केला १९७१ साली कॅ. गो. गं. लिमये यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ एक योजना आखण्यात आली. वर्षभरात प्रसिद्ध होणाऱ्या लघु-कथांतील निवडक कथांचे वार्षिक, ग्रंथरूपाने प्रसिद्ध करावयाचे आणि या कथा वार्षिकातील कथांतून ज्या कथेची सर्वश्रेष्ठ म्हणून निवड करण्यात येईल त्या कथेच्या लेखकाला अगर लेखिकेला १००० रु. चे पारितोषिक सन्मानपूर्वक द्यावयाचे हे या योजनेचे स्वरूप होते.

या योजनेला मिळालेला प्रतिसाद हा इतका व्यापक आहे की त्यातून ही योजना कायमस्वरूपी राहण्यासाठी एक ट्रस्ट निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रंथ प्रकाशनातून येणारे सर्व उत्पन्न या ट्रस्टला देण्यात येणार आहे.